# कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा

# नामादिशब्दव्युत्पत्तिकोश

## अ

अकटोविकट - [ अकथ्योद्विकट ] वर्णन न करतां येण्यासारखें भयंकर

अकरा १ [ एकादशत् = एग्गाअअट = एग्गाअड = एग्गाअअर = अकरा. सप्तति = सत्तटि = सत्तडि = सत्तरि = सत्तर. ( त = ट = ड = र)]
(२) एक = एक, येक

प्रायः प्राकृतांत द्विवचन नाहीं. तेव्हां द्विचें अनेकवचन द्वीनि नपुंसकलिंगीं करून

द्वीनि = दोण्णि = दोनि = दोन

त्रीणि = तिण्णि = तीनि = तीन

चत्वारि = चत्तारि = चआरि = च्यारि = चार

पंच = पांच

षष् = छा = सा = साहा

सप्तन् = सत्त = सात

अष्टन् = अट्ठ = आठ

नव = नौ, नऊ

दशन् = दह = दहा

येथपर्यंत संस्कृतांतून महाराष्ट्रीद्वारा व अपभ्रंशद्वारा एकपासून दहापर्यंत मराठींत आंखांचीं नांवें नियमाप्रमाणें निष्पन्न होतात. ह्यांच्या निष्पत्तीसंबंधानें कांहीं एक अडचण नाहीं. पण संस्कृत एकादशपासून मराठी अकरा कसा निघतो, हा प्रश्न आहे. एकादश या संस्कृत शब्दाचें नियमांप्रमाणें एआअह असें रूप व्हावें. परंतु तें तसें होत नाहीं. एआरह असें होतें. अपभ्रंशांत एग्गारह असें रूप आढळतें. आणि वर्तमान मराठींत अकरा असें रूप आढळतें. अर्थात् महाराष्ट्री एआरह संस्कृत एकादशपासून निघालेला नाहीं. मध्यें र कोठून आला? अपभ्रंश एग्गारह महाराष्ट्री एआरह पासून आला नाहीं. कारण महाराष्ट्री एआरहचें अपभ्रंशांत एआग, आरा, एरा अशीं रूपें व्हावीं. तसा कांहीं एक प्रकार न होतां एग्गारह असें अपभ्रंशांत रूप आढळतें. तेव्हां अपभ्रंश एग्गारह महाराष्ट्री एआरह व संस्कृत एकादश यांपासून निघालेलें नाहीं. मराठी अकारा अपभ्रंश एग्गारहपासून निघूं शकेल. एग्गारह = एकारा = अकारा = अकरा. पण अपभ्रंश एग्गारह तरी कोठून आला? मध्यें र कोठून आला? खुद्द संस्कृत एकादश शब्द कसा निष्पन्न झाला? एक + दशन् = एकदशन् व्हावें; पण वस्तुतः एकादशन् होतें. क चा का काय म्हणून झाला? पाणिनि एवढेंच सांगेल कीं, एक व दशन् यांचा समास होतांना क तील अ चा आ होतो. कशाचें काय होतें एवढेंच पाणिनि सांगेल. पण कां होतें हें पाणिनि सांगत नाहीं. एक + अ + दशन् = एकादशन्, अशी वास्तविक

स्थिति आहे. येथें जास्त अ कां आला व कोठून आला? माझ्या मतें एकादश हें रूप पूर्ववैदिक म्हणजे वेदाच्या हि पूर्वीच्या भाषेंतून अपभ्रंश होऊन आलेलें आहे. अधिक या अर्थी पूर्ववैदिक भाषेंत कांहीं तरी शब्द असावा. एक + (अधिक या अर्थी पूर्ववैदिक शब्द) + दशन् = एकादश. अशा परंपरेनें पूर्ववैदिक शब्दाचा अपभ्रंश वैदिक भाषेंत एकादश झालेला आहे. वैदिक व संस्कृत भाषांचे जसे पाली, महाराष्ट्री हे अपभ्रंश आहेत, तशीं वैदिक भाषा ही पूर्ववैदिक भाषेचा अपभ्रंश आहे. एकाधिकदशन् असा लांब समास उच्चारण्याला कंटाळून, एकादशन् असा संक्षिप्त उच्चार वैदिक लोक करूं लागले. तात्पर्य, एकादशन् हा वैदिक शब्द एकाधिकदशन् या किंवा याच्यासारख्या लांब पूर्ववैदिक शब्दाचें संक्षिप्त रूप आहे, यांत संशय नाहीं. हा पूर्ववैदिक शब्द बहुशः एकापरदशन् असा असावा. संस्कृताचें महाराष्ट्रींत विपरिणमन होतांना जे नियम लागू होतात, ते किंवा त्यांच्या सारखेच नियम पूर्ववैदिकाचें वैदिक भाषेंत विपरिणमन ऊर्फ अपभ्रंश

शब्द कसा निघावा? मध्येंच र कोठून आला? तेव्हां एआरह हा एकादक या वैदिक व संस्कृत शब्दाचा अपभ्रंश नाहीं. हा एआरह महाराष्ट्री शब्द पूर्ववैदिक एकापरदशन् शब्दाचा अपभ्रंश मानला तरच र ची उपपत्ति लागते.

एकापरदशन् = एआअरदशन् = एआअरअह = एआरह म्हणजे महाराष्ट्री ही संस्कृताचा साक्षात् अपभ्रंश नसून, वैदिक व संस्कृत भाषांच्या बरोबर पूर्ववैदिक भाषेपासून निघालेल्या अपभ्रंशाचा अपभ्रंश आहे, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वैदिक व संस्कृत भाषा प्रचलित असतांना, पूर्ववैदिकापासून निघालेला एक किंवा अनेक अपभ्रंश किंवा प्राकृत भाषा चालू होत्या व त्या प्राकृत भाषांचा अपभ्रंश महाराष्ट्री आहे. आणि हें उघड आहे. देशांत शिष्ट भाषा व अपभ्रष्ट प्राकृत भाषा एकाच कालीं असतात, हें आपण प्रत्यक्ष पाहातों. पुण्याची शिष्ट मराठी भाषा चालू असतांना, इतर प्रांतिक मराठी भाषा व जातिपरत्वें कुणबाऊ, परभी वगैरे अपभ्रष्ट मराठी भाषा हि चालू

एकापरदशन् = एगाअरअह = एग्गारह अशी परंपरा दिसते. महाराष्ट्रींत संस्कृत क चा अ होतो. परंतु अपभ्रंश ज्या प्राकृतांपासून निघाला त्यांत संस्कृत क चा ग्ग होत होता. अर्थात् हेमचंद्रानें दिलेला अपभ्रंश, महाराष्ट्रीचा अपभ्रंश नव्हे; दुसऱ्याच कोणत्या तरी प्राकृताचा अपभ्रंश आहे.

अपभ्रंशांतील ऍग्गारह शब्दापासून मराठी अकरा शब्द निघूं शकतो.

ऍग्गारह = ऍकारा = अकरा येथें ग चा क होत आहे. तात्पर्य मराठी अकरा हा शब्द पूर्ववैदिक एकापरदशन् शब्दापासून प्राकृतद्वारा निघालेला आहे, एकादश या संस्कृतशब्दद्वारा निघालेला नाहीं.

व्यपरदशन् = बिअअरअह = बारह = बारा

त्र्यपरदशन् = तिअअरअह = तेरह = तेरा

पंचापरदशन् = पंञाअरअह = पंण्णाराह = पंण्णरा = पन्हरा = पंधरा.

षडपरदशन् = सळअळअह = सोळाह = सोळा

सप्तापरदशन् = सत्ताअरअह = सत्तरह = सतरा

अष्टापरदशन् = अट्ठाअरअह = अट्ठारह = अठारा = अठरा

येणेंप्रमाणें अकरा, बारा, पंधरा, सोळा, सतरा, अठरा ह्या शब्दांतील र चा उगम पूर्ववैदिक भाषेंत व त्या पूर्ववैदिक भाषेच्या अपभ्रंशांत आहे.

दोन शब्दांचा समास होतांना कोठें कोठें प्रथम शब्दाच्या अन्त्यस्वराला वैदिक भाषेंत दीर्घत्व येतें. जसें, मित्रः + वरुणः = मित्रावरुणौ. येथें पाणिनि एवढेंच सांगेल कीं समास होतांना कित्येक सामासिक शब्दांत असा दीर्घत्वाचा चमत्कार होतो. हा चमत्कार कां होतो, तें पाणिनि सांगणार नाहीं व तें सांगण्याचें त्याचें काम हि नव्हतें. तो कांहीं व्याकरणाचा इतिहास लिहीत नव्हता.

मित्र + अ + वरुण = मित्रावरुणौ या समासांतील अ चा अर्थ काय? माझ्या मतें ह्या द्वंद समासांतील अ चा अर्थ आधिक्य Addition असा आहे. अ हें अक्षर पूर्ववैदिक अपर ह्या शब्दाचा अपभ्रंश किंवा संक्षेप आहे. द्वंद-समास म्हणजे दोन अथवा अधिक शब्दांची मिळवणी.

मित्रेण अपरः नाम अधिकः वरुणः = मित्रावरुणौ = वरुण Together with वरुण मित्र = वरुण and मित्र. (भा. इ. १८३५)

अकाळी [ आकालिकः ] *(आकाळी पहा)*

अंकुश [ अंगकुश = अंकुश (अंगाला टोंचणारें शस्त्र) कुश् टोचणें ]

अक्कड [ आकृति = आकडी, अक्कड ] शरिराची आकडी = शरीरस्य आकृतिः.

अक्षि [ अक्षयं = अक्षि (अव्यय, ग्राम्य)] उ. - तो अक्षि मेला म्हणजे तो पूर्ण मेला, सदा मेला, कायमचा मेला. (भा. इ. १८३६).

अक्षी १ [ अक्षं (प्रत्यक्ष) = अक्षी ] प्रत्यक्ष. (२) [अक्षणया (उपनिषद्) = अक्षी ] a little (adverb)

अखरी [ अक्षरी ] *(अखेर पहा)*

अखाडा १ [ अक्षवाटः (जुगाराचें ठिकाण)

= अखाडा, आखाडा ] (२) [ अक्षपाटः (जुगार खेळण्याची जागा) = अखाडा ]

**अखुडणें** [ अव + खुड् खुडति । खंडने । खंड पाडणें ] त्यानें दोरी अखुडली म्हणजे ह्रस्व केली.

**अखें** [ अक्षयं = अक्खअ = आखें - खा - खी ] आखें म्हणजे सबंध, सबंद, सर्व.

**अखेर** [ अक्षरी (पावसाळा) अखेर, अखेरी, अखरी (पावसाळा). (क्षर् १ संचलने) ] वर्षाक्षरी = वर्षअखेर म्हणजे पावसाळा. अखेरीचे दिवस जवळ आले, असें वाक्य कोंकणांत मृगाच्या सुमारास हमेष योजतात.

**अख्ख** ( खें - खा - खी ) [ अस्कन्न = अक्खण्ण = अख्खं (खा - खी - खें)] अस्कन्न = न फुटलेलें, न फाटलेलें, पूर्ण. (भा. इ. १८३७)

**अख्खें १** [ अक्षय = अक्खअ = अख्ख ( खा - खी - खें ) पोतें, पेटी वगैरेंचें विशेषण (भा. इ. १८३६) (२) [ अक्ष्णं = अख्खं = आख (खा - खी) आखें. अक्ष्णं अखंडं (उणादि ३०४) ] (भा. इ. १८३३) (३) [ अक्षितं (सबंद) ]

**अग** [ अ (निपात) = (अकच्क) = अक = अग ] (भा. इ. १८३४)

**अगई!** [ अगतिकं ! = अगई ! गम् १ गतौ] अगई ! काय करूं? =अगतिकः अहं किं करवाणि? आईशीं काहीं एक संबंध नाहीं.

**अगग** [ अंगक (अकच्क अंग) = अगग ] (भा. इ. १८३४)

**अगडबगड** [ अगितंव्यगितं. अग् कुटिलायां गतौ. वि + अग = व्यग ] अडवेंतिडवें, वेडेंवांकडें. (धा. सा. शब्द)

**अगडबंब १** [ अगदः च असौ बंबः च = अगदबंब = अगडबंब] निरोगी व लठ्ठ. (भा. इ. १८३४) (२) [ अगद्य (नीरोगत्वे) + बंहः (वृद्धिः) ] निरोगी व लठ्ठ.

**अगळ** [ अर्गला ]

**अगा १** [ आ (स्मरणे) = (अकच्क) अका = अगा ! (स्मरणे) ] (भा. इ. १८३४) (२) [ (आः) अकाः = अगा! ]

**अंगारा** [ अंगरागः = अंगारा ] holy powder to rub on the forehead.

**अगे** - [ ए (निपात) = अकच्क) अके = अगे ] (भा. इ. १८३४)

**अगो १** [ ओ (निपात) = (अकच्क) अको = अगो ] (भा. इ. १८३४) (२) [ अघोः ! = अगो !] (हें अव्यय कोंकणांत फार प्रचलित आहे)

**अगोठ १** [ अग्रवृष्टिः ] पावसाळ्याचा आरंभ (२) [ अग्रवर्षा = अगउठ्ठा = अगोठ्ठा = अगोठ ] पावसाळ्याचा आरंभ. (स. मं.)

**अगोतली** [ अग्रपत्रिका + ल (स्वार्थक) ] केळीच्या पानाचा पुढला वाटोळा भाग.

**अगोधर** [ अदौकरं = आदोगार = अगोदर] अगोदर म्हणजे प्रारंभी. (वर्णविपर्यय) (भा. इ. १८३३)

**अग्यारी १** [ अंगारी = अग्यारी (शेगडी)] (पारश्यांची) (भा. इ. १८३६) (२) [ अंगार्या (निखाऱ्यांची रास) ] पारश्यांचें पवित्र निखाऱ्यांचें स्थान.

**अग्यावेताळ** [ अग्निवेताल ] अवंतीराज्यं शून्यं एकेन अग्निवेतालनाम्ना देवेन अधिष्ठितं । सिंहासनद्वात्रिंशतिका.

अघाडा [ अघामार्गवः ] अधामार्गवः असा अमरकोशांत पाठ आहे; परंतु मराठींत अघाडा असा अपभ्रंश अघामार्गव शब्दापासून होईल, अधामार्गव शब्दापासून होणार नाही, व्हावयाला फार आढेवेढे घ्यावे लागतील. ध चा घ प्रायः मराठींत होत नाहीं. तेव्हां अघामार्गव असा पाठ मूळचा असावा.

अघोर [ घुर् भीमार्थशब्दयोः ] *(घोरणें पहा)*

अंघ्रि [ अंगग्रहि = अंघ्रि (अंग तोलून धरणारा अवयव)]

अचकटविचकट [ उपस्कृतं व्युपस्कृतं + ओचकटवुचकट = अचकटविचकट. उपस्कृतं ब्रूते = वाक्याध्याहारेण ब्रूते ।] तुटक ताळतंत्र नाहीं असें बोलणें.

अचरट [ अत्यरिष्टं = अच्चरिट्ट = अचरट]

अचाट [ अत्यर्थ = अच्चट्ट = आचाट = अचाट ] फार, अतिशय.

अचाट पाणी पितो = अत्यर्थं पयः पिबति.

अत्यर्थं कर्म कृत्वा = अचाट काम करून. (भा. इ. १८३४)

अचावचा [ उच्चावच (प्रलापाः) ] उच्चावच म्हणजे उच्चनीच.

अचुक [ आशकु (आशुचें अकच्) = आचुक = अचुक ]

अजगर [ अलगर्द = अलगर = अजगर ] सर्पविशेष. (भा. इ. १८३६)

अजाण, अजाणता [ अजानत् = अजाणता; अज्ञान = अजाण ]

अजी *[ अजे पहा ]*

अजून १ [ अद्य + पुनः = अज्ज + उण = अजून (नी, नियां) ] (भा. इ. १८३३) (२) [ अद्य = आज; अद्यतनं = अजून; अद्यापि = अझूनि, अजुनि, अझूइँ ]

अजे [ आर्य्ये = अज्जे = अजे = अजी ]

मराठींत म्हाताऱ्या स्त्रीस संबोधतांना विशेष सलगी असल्यास अजे अशी हाक मारतात, व बहुमानानें अजी अशी हाका मारतात. ही हाक मराठीनें सहजच संस्कृतांतून वंशपरंपरेनें घेतली आहे. बाण हर्षचरितांत अष्टमोछ्वासांत स्त्रियांना संबोधण्याचे दहापांच प्रकार अर्थासुद्धां देतो. त्यात खालील वाक्य आहे :-

कथं इव महानुभावानां एनां आमंत्रये । वत्से इतिं अतिप्रणयः । इ. इ. इ. । आर्ये जरारोपणम्

जरारोपण असतां बाणाच्या कालीं वृद्ध स्त्रियांस आर्ये अशी हांक मारीत. आर्य्येचा अपभ्रंश अज्जे. अज्जेचा मराठी अपभ्रंश अजे. कुणबी व शूद्र घरांतल्या म्हातारीला अद्याप अजे अशी हाक मारितात. शिष्ट ब्राह्मण अजी अशी हाक मारितात. अजेचें अजी रूप शिष्टांनीं कसें साधलें तें उमगत नाहीं.

वत्से = बच्चे
पुत्रि = पोरी
मूलिके = मुली
भवति = बाई
मातर् = माई
भगिनी = बहिणि, बहिण्ये, वहिनी.
बाले = बाळे

वगैरे हाका मराठींनें आपली अजी जी संस्कृत तिजपासून घेतल्या आहेत. ह्याला बाण साक्ष आहे. (निर्णयसागर प्रत, पृष्ठ २४४) (भा. वा. इ. १८३५)

अटकळ १ [ अंतर्क्लृप् - अंतर्कल्पः =

अटकळ. अंतर्कल्पना = अटकलि = अटकळ ] अटकळीने समजणें = अंतर्कल्पेन सम्बोधनं. (२) [ क्लप् १० व्यक्तायांवाचि. अंतर्कल्प = अटकळ (धा. सा. श.) (३) [ क्लप् १० व्यक्तायां वाचि. कल्प = कप्पा, काप. अन्तक्लप्ति = अटकळ ]. (धा. सा. श) (४) [ अन्तर् + क्लप् तर्क करणें = अटकळणें (तर्क करणें) ]

अटाट १ [ धातोरेकाचो हलादेः क्रियासमभिहारे यङ् (३-१-२२). पौनःपुन्यं भृशार्थो वा क्रियासमभिहारः. अट - अटाट्यते ( अटाट) अति हिंडणें, जिवापाड मेहनत करणें. (भा. इ. १८३२) (२) [ अटाट्या = अटाट (स्त्रीलिंगी) ]

अटी [ अत् १ सातत्यगमने अतिः = अटी] बाबा अटीस पेटूं नकोस. = मा भवात् अतीत्. अटी म्हणजे अतिमर्यादेला जाणें. (धा. सा. श.)

अटोका [ आ + तुज् ] (आटोका १ पहा)

अट्टल१ [ अट्ट अतिक्रमणे अट्टल exceeding] अट्टल सोदा exceedingly mischievous. (२) [ अटल (स्थिर, पक्का) = अट्टल ] (भा. इ. १८३६)

अट्टल चोर [ हट्टचौरक = अट्टचोर = (स्वार्थक ल लागून) ] अट्टलचोर; हट्टचौरक म्हणजे बाजारांतला देखत चोरी करणारा. (भा. इ. १८३५)

अटरा [ अष्टापरदशन् ] (अकरा २ पहा)

अठरापगड [ अष्टादशप्रकृतयः = अठरापगड. प्रकृति = पगडी ]

अठरापगड (जात) [(अष्टादश) प्रकृति = पगडी. अष्टादशप्रकृतिः जातिः ]

अठरापगड जात [ अष्टादशनप्रकृतिका जातिः = अठरापगड जात. प्रकृति म्हणजे प्रजाजन. प्रकृति = पगडी ] प्रत्येक जातीचें शिरोभूषण लक्षणार्थ निराळें असे. सबब शिरोभूषणालाच पगडी नांव पडलें.

अठळी [ अष्ठीला = अठळी ]

अठी - अठळी [ अष्ठि = अट्ठि = अठी. अष्ठिलिका = अट्ठिलिआ = अठळी (गऱ्याची) ] (भा. इ. १८३४)

अंडगडी [ अंतर्गडी ] (भा. इ. १८३२)

अडघर [ अंतर्गृह = आँडघर = आडघर = अडघर ] (भा. इ. १८३३)

अडणी [ अटनी = अडणी (शंख ठेवावयाची) ] (भा. इ. १८३६)

अंडपंचा [ अंतःपंचह् = अंडपंचा ] दहा हात लांब व पाउणे तीन हात रुंद जें धोतर तें पायघोळ धोतर, त्याच्या आंत नेसण्याचें जें लहान वस्त्र तें अंडपंचा (भा. इ. १८३३)

अडविणें [ अंतरायनं = अँडअवणें = अडावणें = अडविणें ] अडावणें असा हि उच्चार फार ऐकूं येतो. अंतरि म्हणजे मध्यें येणें, प्रतिबंध करणें. (भा. इ. १८३५)

अडण [ उधस् ] *(अढें पहा)*

अडाखा [ अत्याखा ] *(धातुकोश - अडख पहा)*

अडाण [ उधस् ] *(अढें पहा)*

अडाणी - प्राकृतांत अडअणा म्हणून एक शब्द आहे. त्याचा अर्थ असति, लबाड, कुंटण स्त्री असा आहे. ह्या अडअणा शब्दाचा मराठी अपभ्रंश अडाणा, अडाणी असा होत असे. पैकीं अडाणी हें रूप मात्र मराठींत राहिले आहे. अडाणी शब्दाचा लबाड, लुच्ची हा मूळ अर्थ जाऊन, अज्ञानी असा अर्थ सध्यां

होतो. हा अडाणी शब्द मराठींत तिन्ही लिंगीं वापरला जातो. (स. मं. शके १८२६)

अडीच [ सार्धद्वि = साडइड = साडीच = अडीच. स चा लोप ] (ग्रंथमाला)

अंडील [ आण्डीर = अंडील ] उ. – अंडील बैल.

अंडू [ अंतर्भू (to be in) = अंडू ] हा त्याचा अंडू आहे म्हणजे त्याच्यांत समावणारा आहे; अंडू म्हणजे आंडगडी खेळांतला. (भा. इ. १८३६)

अडून १ [ अंतरित्वा = आंडून, अडून (अव्यय) ] (२) [ अंतर्धाय (आकर्णनं) = अडून ऐकणें.] (३) [ अंतर्धाय = अडून. धा. ३ धारणपोषणयोः ] (धा. सा. श.)

अडेलतट्टू [ अड्ड - अड्डिल + तस्थु stationary अडेलतट्टू ] ताठ व आडणारा माणूस, घोडा इ.

अड्डा (बाजारांतील व्यापाऱ्यांची सभा), आडत [ आड् उद्यमे ] आडबाजार ह्यांत आड ह्या मराठी शब्दाला बाजार हा फारशी शब्द दिला आहे. (ग्रंथमाला)

अड्डा [ मल्ल वगैरेंचा) [ अड्ड अभियोगे ] मल्लांचें युद्धस्थान, आखाडा, तालीमखाना. (ग्रंथमाला)

अड्यालपड्याल – नदीच्या अलीकडील तीराला अड्याल व पलीकडील तीराला पड्याल म्हणतात. संस्कृत तट ह्या शब्दाला प्राकृत शब्द अड आहे. तल ह्या शब्दाचें प्राकृतरूप अल होतें. तेव्हां तटतल = अडअल = अडाल = अड्याल. प्रतितल = पडअल = पडाल = पड्याल. अडाल व पडाल हीं रूपें अडालगंगा, पडालगंगा ह्या उखाण्यांत कित्येक गांवढ्यांच्या तोंडांतून अद्यापही येतात. प्रस्तुत कालीं अड्याल व पड्याल हीं रूपें सार्वत्रिक आहेत. (स. मं. शके १८३६)

अढण [ उधस् ] *(पुढे पहा)*

अढें [ उधस् = उढें = अढें, अढण, अडाण, अडण ]

अणकुला [ अणुक + ल = अणकुल (ला - ली - लें) ] अणकुला म्हणजे अति लहान.

अंतर [ अंतराय = अंतरा = अंतर ] सासू सुनेला अंतर करीत नाहीं = श्वश्रूः स्नुषायै अंतरायं न करोति. अंतर म्हणजे प्रतिबंध, अडथळा, इजा. सा तव जीवितान्तरायं करिष्यति = ती तुझ्या जीवाला अंतर करील. (कारंडव्यूह अश्वराजवर्णनम्). (भा. इ. १८३४)

अंतरा [ सतारीचा) १ [ अंतरालः = अंतरा (ल लोप) ] (भा. इ. १८३६) (२) (वाद्य - गान परिभाषेंत) [अंतरायः interposition = अंतरा ]

अंतरा अंतरावर [ अंतरान्तरोपरि ]

अंतराळीं [ अंतराले ]

अतिवीख [ अतिविषा ]

अत्ता [ (वैदिक) अस्था at once, without delay (अ + स्था) = अत्ता ] without delay, at once. अतः = आतां now ह्याहून अत्ता हें अव्यय निराळें.

अत्या [ अंतिका = आंतिआ = आंत्या = अत्या ] अंतिका म्हणजे वडील बहीण. अत्या हा शब्द वडील बहिणीला मराठींत लावतात. (भा. इ. १८३४)

अथतथ [ अत्रतत्र ] अथतथ करतो = अत्रतत्र इति करोति.

अथाक [ अस्याग = अथाक, अथांग ] अति खोल. (भा. इ. १८३७)

अथांग १ [ अस्ताघ्य = अत्याग्घ = अथांग] bottomless, deep. (२) [ अस्ताघ, अस्थाग = अथांग (फार खोल) ] अथांग पाणी. (३) [ अस्ताघ (फार खोल) = अथाग = अथांग ]

अदमणी [ अर्धमाणिका ]

अदुमरें १ [ अर्धमूर्च्छितं = अदमुरें ] अर्धवट विरजलेलें दूध. (२) [ मूर्च्छ् १ मोहसमुच्छ्राययोः. अर्धमूर्, अर्धमूर्च्छितं = अधमुरे = अदमुरें ]

अदलाबदल [ अतिराव्यतिरा ] *(धातुकोश - अदल् पहा)*

अदळणें [ अद् (खाणें) + ल (स्वार्थक) = अदंळ ] खाणें. भाकऱ्या अदळ म्हणजे भाकऱ्या खा. (कुत्सितार्थक). [ भा. इ. १८३४]

अन्दु, अंदू [ अन्द् १ बन्धने. अंदुकः = अंदू (हत्तीच्या पायांतील शृंखळा) शृंखलो निगडोंदुकः (हर्षकीर्तिकृत लघुनाममाला) हत्तीच्या पायांत अन्दु (साखळदांड) बांधला. (धा. सा. श.)

अद्वातद्वा [ अदस्वातद्वा = अद्वातद्वा ] अद्वातद्वा म्हणजे हें कां तें, अनन्वित.

अधकोर [ अष्टकृत्वा = अढकुर = अढकोर = अधकोर ] (भा. इ. १८३३)

अधण [ उष् दाहे. अध्युष्ण = अधोण्ह = अधोण = अधण ] ( धा. सा. श.)

अधांतरीं [ अर्धान्तरे ]

अधाशी [ अधि + अश्. अध्यश् = अधासणें. अध्यशिन् = अधाशी ] अति खाणारा. (भा. इ. १८३६)

अंधी [ अंध् १० दृष्ट्युपघाते. अधिका (नेत्ररोग) = अंधी ] डोळ्याला काय अंधी आली आहे? (धा. सा. श.)

अधीक [ आत्ययिकं = अधीक ] कांहीं अधीक उणें झाल्यास मला स्मर = किमपि आत्ययिकं ऊनं भवच्चेत् मां स्मर ! अधीक म्हणजे संकट.

अधीक विधीक [ अधिकं अभ्यधिकं = अधिक बिधीक ]

अधेला [ अर्ध + ल = अर्धल = अधल = अधेला = अधेली - अधेलें ] अधेला रुपया म्हणजे अर्धा रुपया. अधेली रुपी. अधेला साप. अधेलें (न.) = क्षुल्लक साप. अधेला पैसा, अर्धी. (भा. इ. १८३२)

अधेली, अधेला [ अर्द्धिकी = अधेली. अर्द्धकः (गद्यानः) = अधेला. वार्तिक कंसाट्ठिठन् ५-१-२५]

अधोली [ अर्धपाय्या = अधो + (स्वार्थे ली) = अधोली ]

अनमानणें [ मन् ४ ज्ञाने. अन्यमनायते ] अनमानणें म्हणजे दुसरा विचार करणें. (धा. सा. श.)

अनवाणी १ [ अनुपानहम् ] without shoes (२) [ अनुपानहक = अनुवाणअअ = अनवाणी ]

अनन - शा - शे [ अश् ९ भोजने. अनश्नत् (not eating) = अनश - शा - शे. अनशापोटीं म्हणजे खाल्ल्यावांचून. (धा. सा. श.)

अनान [ अन्यान्य = अनान (ज्ञानेश्वरी) ]

अनिवार [ वृ १० आवरणे. अनिर्वार्यं = अनिवार ] (धा. सा. श.)

अपकारा १ [ अपस्कारः = (धुडघ्याची बैठक) = अपकारा, घुडघ्याचा अपकारा म्हणजे घुडघ्याच्या हाडाची बैठक. (भा. इ. १८३६)

(२) (पायाच्या घोट्याचा) [ अपस्कारः = अपकारा. ] पायाचा घोटा शरीराच्या ज्या भागावर उभा असतो तो भाग. (भा. इ. १८३६)

अपखडी [ अपषदी, अपसदी a woman of the outcaste = अपखडी) क्षत्रिय × वैश्या or शूद्री; वैश्य × शूद्री. निषादप्रमाणें स चा ष होऊन अपषद. children from the above two are called अपसद ]

परि धर्मपत्नी कां धांगडि । पोसितां जरि एकि वोढि । तरि कां अपखडि । आणावी आंगां ॥ ज्ञा. १८-९३६.

अपंग [ अपांग ] अवयवहीन.

अपर [ अल्पतर = अप्पअर = आपर = अपर (रा - री - रें) ] (भा. इ. १८३२)

अपरूप १ [ अभिरूपक (श्रमणादिगण) = अपरूप ] handsome, beautiful. (२) [ अभिरूपकः = अपरूप ] सुंदर, शोभन. अपरूप लावण्य म्ह. शोभन लावण्य. (३) [ अप्रतिरूप (निरुपम) = अपरूप ] Matchless.

अप्कारा [ अपल्ल + करकः = आपकारा, आप्कारा, अप्करा, आप्कारा. कमंडलौ च करकः ] आप्करा म्हणजे पाणी पिण्याचें लहान पात्र. अल्पकरकः = आपकारा (लहान कमंडलू)

अप्पलपोट्या [ आत्मपुष्ट ]

अपाप [ अल्पापं (adverb) = अपाप (हळूहळू) आत्मनैव = अपाप (आपल्या आपण) ]

अपेशी [ अपयशस् = अपेशी ] Unsuccessful, unenterprising.

अबब [ अंब अंब ! = अबब ! ]

अंबाडा १ [ आम्रातक = अंबाडअ = अंबाडा (डी-डें) ] (भा. इ. १८३२) (२) [ अंबष्टा = अंबाडा ]

अंबिआ [ अंबुवाहः (पाण्यांतून नेणारा नावाडी) = अंबिया, अंब्या ] नदीवरील होडीवाल्यांना अंबिये म्हणतात.

अंबिया [ *अंबिआ पहा*]

अबू [ आत्मभू = आपबू = आबू = अबू] अबू हें वडील माणसाचें लाडकें नांव आहे. आत्मभू म्हणजे ब्रह्मा, विष्णू इत्यादि.

अबोटि - [ अभ्युद्वृत्ति ] उटणें, माखणें. (धातुकोश - अबोट पहा)

अबोटी [ व्यूढ married, व्यूढता marriedness, अव्यूढता unmarriedness = अबोटी ] unmarried state, Bachellorship.

जातनेन प्रसंगें । स्त्रीदेह सिवणें आंगें।
तेथौनि देह आवघें। अबोटी कीजे॥ ज्ञा. १७-२१०

अंबोली [ अंबुपल्ली = अंबोली ]

अब्द [ आ + पद् ]

अब्दणें [ पद् ४ गतौ. आपद् पासून मराठी क्रियापद अब्दणें. ] अब्दणें म्हणजे आपद्, संकट, कष्ट सोसणें. (धा. सा. श.)

अब्दा [ आपद्, आपदा ] (*आबद पहा*)

अंब्या [ *अंबिआ पहा*)

अभंग - अभंग म्हणजे पर्यायोक्ति, व्यंजना लक्षणा वगैरेंच्या द्वारा बोलण्याचा प्रकार. अभंग म्हणजे खडे बोल, वाच्यार्थानें स्पष्ट बोलण्याचा प्रकार. त्यांत पर्यायानें आढेवेढे घेऊन बोलणें नसतें. जें काय सांगावयाचें तें उघड उत्तान अर्थानें व शब्दांनीं सांगावयाचें.

(भा. इ. १८३३)

अभ्रा [ अंबरकः = अंब्रा = अभ्रा, आभ्रा] अंगरख्याच्या आंत लावलेलें जोड कापड.

अंमळ [ अम्नर् (अल्पार्थे निपातः) = अम्मल = अंमळ.] (भा. इ. १८३४)

अमुक [ अमुष्य + अमुक ] This one. अमुष्य हें नाम आहे. ष्य हा षष्ठीचा प्रत्यय सर्वनाम आहे.

अमूप [ अनुपम = अनुप अँ = अमूप, मूप, मोप, म्होप ] (भा. इ. १८३२)

अरबट [ अपभ्रष्ट = अरबट्ट = अरबट ]

अरर ! अररे ! (अव्यय, घाई दाखविणारें) [ अररे = अररे, अरर ] (भा. इ. १८३६)

अरेहल्या [ आर्यहलं (बलात्कारे निपातः) = अरेहल्या ] पाणिनीच्या वेळेपासून हा निपात बैलांना हाकतांना करीत आले आहेत. (भा. इ. १८३४)

अर्ज *[ अर्जी पहा ]*

अर्जी [ अर्द् १ याचने, अर्दितं (याचितं) = अर्जी, अर्ज ] अर्जी, अर्ज म्ह. याचना. अर्जीदन् या फारसी क्रियापदापासून हि अर्जी शब्द निघतो. परंतु फारसी अर्जीदन् च स्वतः संस्कृत अर्द धातूपासून निघालेलें आहे. (धा. सा. शब्द)

अर्जुनी - पांढऱ्या गाईला विशेष नाम. अर्जुनी गवि (विश्वमेदिन्यौ) उणादि ३४५ तत्त्वबोधिनी. (भा. इ. १८३३)

अर्बाचर्बा - अर्बताचर्बता = अर्बाचर्बा. अर्बचर्ब गतौ. अर्वाचर्वा म्ह. जातां येतां.

अर्बाचर्बा खातो म्हणजे येतांजातां खातो.

अर्वाचर्वा १ [ चर्व् १ अदने. चर्बं = चर्वा, चर्बा. अर्वाचर्वा ] (धा. सा. श.)

(२) [ अर्बताचर्बता] (अर्बाचर्बा पहा)

अलगज्, अलगत् [ लग् १ गतौ अलगत् = अलगत् = अलगज् ] अलगत् म्ह. कोठेंही न लागतां. (धा. सा. श.)

अलला ! अलल ! [ अललाभवन्त् = Sounding merrily = अलला (ऋग्वेद ४-१८) ]

अलुता, अलुतें [ अल् to adorn = अलितृ = अलुता Supernumerary village-servants. अलितं = अलुतें. Perquisites of supernumerary village - servants.

अलुमालु (ज्ञानेश्वरी) [ अल्पंअल्पं = अलुमालु ]

अलोट [ लुट् बोलणें ह्या धातूपासून लोट = नकारार्थी अलोट ] = अनिर्वचनीय. अलोट शहाणपण = अनिर्वचनीय शहाणपण. (ग्रंथमाला)

अल्याडपल्याड [ आरात्तात् परात्तात् ] *(आलाडपालाड पहा)*

अल्लाद [ आरात् (जवळ, संनिकृष्टत) = आलाद् = अल्लाद् ] त्यानें चेंडू अल्लाद् झेलला = तेन चिंधुकः आरात् सेलितः (भा. इ. १८३४)

अवघड [ अवघटं ]

अवचित् - ता - ती [ आहोस्वित् = आवोचित् = अवचित् - ता - ती - तें] (भा. इ. १८३३)

अवढणें [ ध्वन् १ शब्दे. अवध्वनं = अवढणें. (अरुची) ] ध्वनी म्ह. वास, गंध, रुचि. ध्वन, ध्वन, ध्वन = ढण् ढण् ढण्. (धा. सा. श.)

अवदसा [ अपसदा = अवदसा, औदसा ] a contemptible, low woman.

अवर्जणें [ वृज् १० वर्जने, त्याग करणें. अवर्जनं = अवर्जणें ] अवर्जून म्ह.

त्याग न करतां, न वगळतां, मुद्दाम. (धा. सा. श. व भा. इ. १८३३)

अवा [ अवावा (ब्राह्मणाची बायको) = अवा] अवावा ब्राह्मणी. (भा. इ. १८३४)

अवाच्या सवा १ [ अमात्यसमं = अवाच्यसवं = अवाच्या सवा. हें क्रियाविशेषण आहे.)

स क्षुद्रः अमात्यसमं ब्रूते = तो क्षुद्र अवाच्या सवा बोलतो. अवाच्या सवा म्हणजे थोर प्रधानासारखें, आपल्या तोलाहून जास्त. स अमात्यसमं मूल्यं ब्रूते = तो अवाच्या सवा किंमत सांगतो; जशी थोर अमात्य मोठी किंमत सांगेल तशी तो सांगतो. (भा. इ. १८३५) (२) [ सपाद = सवाअ = सवा अपाद = अवाअ = अवा स्यः = त्यः = च्या

अपादः स्यः सपादः = अवा च्या सवा ] पाव नसलेला सवा = पावाखेरीज सवा = म्हणजे अशक्य; एकावर पाव असल्याखेरीज सवा होत नाहीं. सबब, कोणी मनुष्य कांहीं अशक्य कोटींतील गोष्ट बोलूं लागला म्हणजे पावाखेरीज सवा करूं जाणाऱ्याच्या कोटींत त्याची गणना करण्याचा प्रघात महाराष्ट्रांत आहे. (भा. इ. १८३४)

अवीट [ इष् ९ भृशार्थे, आभीक्ष्ये । इष्णाति. अवेष् = अवीट ] अवीट म्हणजे अतिशयित, अतोनात. (धा. सा. श.)

अवो [ (प्रा.) अव्वो = (म.) अवो ] निमंत्रणार्थी अवो शब्द दासोपंताच्या पदांत फार येतो. (ग्रंथमाला)

अव्हेरणें [ अवधीरणं = अवहीरणँ = अव्हेरणें ] (भा. इ. १८३४).

अशी [ ईषदीषद् = ईसीसि = अशीशी, अशी, असासा, असा ] अशी इकडे वळ turn hither a little.

अशीच १ [ अशिश्वी (जीस मूळबाळ नाहीं ती बायको) = अशीच ] अशिश्वी म्हणजे मूलबाळ नाहीं ती स्त्री हा पहिला अर्थ. नंतर बेफिकीर, बेजबाब, अस्तव्यस्त स्त्री असा दुसरा अर्थ.

ती बाई अशीच आहे, येथें अशीच म्हणजे अव्यवस्थ. अशीच या शब्दाचें पुल्लिंग असाच. अस या सर्वनामाचा येथें कांहींएक संबंध नाहीं. (भा. इ. १८३६) (२) [ अशिश्वी = अशीस = अशीच ] ती बाई अशीच आहे म्हणजे तिला मुलेंबाळें नाहींत. मुलेंबाळें न होणें हा स्त्रियांत दोष गणतात.

अशीशी १ [ अशिश्वी childless woman = अशीशी ] ती अशीशीच आहे = a childless luckless barren woman (२) [ ईषदीषद् ] (*अशी पहा*)

असच [ असत्यं = असच्च = असच ]

तो असच बोलतो = सः असत्यं वल्हति येथें असच म्हणजे ईदृक् असा अर्थ करण्याचा मोह होऊं देणें योग्य नाहीं.

असन (वृक्षविशेष) [ असनकः = असन ]

असा [ ईषदीषद् ] (*अशी पहा*)

असाच [ अशीच १ पहा)

असासा [ ईषदीषद् ] (*अशी पहा*)

असूक [ असृक् = असूक Moenorrhagia]

असो [ अस्तु = अस्सु = असो (निपात)] (भा. इ. १८३३)

अस्तमान (संध्याकाळ) [ अस्तमयन = अस्तमअन = अस्तमान ] (भा. इ.

१८३६)

अस्ताव्यस्त [ अस्तव्यस्त = अस्ताव्यस्त. स्त चा स्ता उच्चारसुखार्थ ] (भा. इ. १८३६)

अस्वल (पशुविशेष) [ ऋक्ष + ल (स्वार्थक) = अक्षल = अस्वल. क्ष = स्व. ऋ = अ] (भा. इ. १८३४)

अस्सँ [ अंजसा = अँस्सा = अस्सँ (Really, in fact) ] कोणी कांहीं विधान केलें असतां खरेंच कीं काय, या अर्थी अस्सँ हा निपात मराठींत योजतात. तो अंजसा या संस्कृत निपातापासून निघाला आहे. अस्सँ म्हणजे खरेंच कीं काय? अस्साँ असा उच्चार अशिष्ट लोक करतात. (भा. इ. १८३३)

अहा ! [ अह ! पूजायां निपातः) = अहा! ] अहा ! हा निपात मराठींत पूजा दाखवितो. (भा. इ. १८३६)

अहेवपण [ अवैधव्य = अहेवपण ] (सरस्वतीमंदिर - गोतवळा - आश्विन शके १८२७)

अळँ [ अलम् (निषेधार्थे) = अळँ ] विद्येच्या नांवानें अळँ म्हणजे निषेध, नास्तित्व.

अळंकारणें [ अलंकृ = अलंकार (णें) ] (भा. इ. १८३६)

अळकुडी - डें [ अलुककूटं = अळुअकूडं = अळकुडें - डी ]

अळवणी [ आलवण्यं = अळवणी ] बाया चातुर्मासाचें अळवणी म्हणजे मीठ न खाण्याचें व्रत धरितात.

अळवणें [ अलयति = अळवणें. अल् भूषणपर्याप्तिवारणेषु ] अळवणें म्हणजे सांतवणें. (धा. सा. श.)

अळणी [ अलवण = अळण (णा - णी - णें)] मीठ नसलेला किंवा कमी पडलेला पदार्थ. (भा. इ. १८३२)

अळशी [ अतसी = अडशी = अळसी, अळशी ] (भा. इ. १८३२)

अळा [ अल् to prevent निवारणें = अळा] अळा घालणें. to put an obstacle in the way.

अळुकी [ आर्तिका = आळिकी = आळुकी = अळुकी ] आर्ति म्हणजे अत्युत्कट इच्छा, संकट. (ज्ञा. अ. ९ पृ. ९)

## आ

आ [ आ (आकारावरून) (कोळ लोकांच्या भाषेंत हा शब्द तोंड या अर्थी आहे ] (स. मं.)

आइकविणें [ आविकर्णनं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ११)

आइकां [ आकर्णयत (कर्तरि आज्ञायां लोट् द्वितीय पुरुष बहुवचन) ] (ज्ञा. अ. ९ पृ. २)

आइत्या पीठावर रेघा [ अतिथे पीठेः रेषा = अइतिया पीठावर रेघा = आइत्या पिठावर रेघा = ऐत्या पिठावर रेघा माध्यानसमयीं अतिथीची मार्गप्रतीक्षा करीत यजमान बसे. त्यापूर्वी आगंतुक अतिथीकरितां पाट किंवा पीठ मांडून त्यावर रेषा ओढीत. अशा करतां कीं, हें रेषाचिह्नित स्थान अतिथीकरितां आहे हें समजावें. अतिथीला ह्या रेघा काढिलेल्या पाटावर येऊन बसण्याचें व जेवण्याचें च तेवढें काम उरे. अर्थात् कांहीं श्रम न करतां अन्न मिळे. त्यावरून श्रमाविणें अन्न खाणाऱ्या आळशाला ऐत्या पिठावर रेघा ओढणारा हें विशेषण लावीत.

धान्याच्या पिठाशीं वगैरे ह्या वाक्यांत कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३६)

**आई** [ आत्री = अप्पी = अव्वी = आई, आईस, आया ] जीव मिळविणारी. (स. मं. गोतावळा)

**आईच्यान्** [ आईची + आण् ] (*देवाच्यान् शब्द पहा)*

**आईबाप** [ अति + व्याप्तिः = अतिव्याप्तिः = अइबाप = आइबाप ] ह्या बोलण्याचे कांहीं आईबाप पाहिले पाहिजेत ना म्हणजे अतिव्याप्ति अव्याप्ति पाहिली पाहिजे ना?

**आईस** [ आत्री ] *(आई पहा)*

**आउक्ष** [ आयुष्य = आउक्ष ] (भा. इ. १८३२)

**आउक्षवन्त** [ आयुष्यमान् = आउक्षवन्त ] (भा. इ. १८३४)

**आउट** [ अध्युष्ट = coiled up three and a half times = आउट, औट ]

**आउति** [ आहुति offering = आहूत, आऊत, औत, औति, आउति, आवति, आवती ]

**आउतें** [ आयुधानि = आउतें ]

**आऊत** [ आहुति ] (*आउति पहा)*

**आंक** [ अंक् १ लक्षणे. अंक - आंक - आंख (आंखणें. अंकनं (मोजणें) = आंकणें, आंखणें.) ] (धा. सा. श.)

**आकडी १** [ आकृति ] (*अक्कड पहा)* (२) [ कृष् १ विलेखने. आकृष्टिः = आकट्टि = आकडी (फुलें काढण्याची काठी) ] (धा. सा. श.)

**आंकडी १** [ आखंडिका = आंखडी = आंकडी ] फुलें, फळें तोडण्याची काठी. (२) [ आकृत्तिः = आंकडी (from कृत् to cut) फुलें तोडावयाची आंकडी.

**आकराळविकराळ** [ आकरालविकराल = आकराळ-विकराळ, आक्राळविक्राळ ]

**आकसाबोकशीं** [ आक्रोशव्यवक्रोशेन = आकसाबोकशीं ] Violently wailing and wrangling.

**आकांडतांडव** [ आक्रंद = अक्कंद = आकांड. (आ + क्रंदः) ]

**आकांत** [ आक्रंदः, आकंदः = आकांत. क्रदि, ऋदि रोदने । ] आकांत म्ह. रडणें.

**आकान्त** [ क्रद् १ रोदने आक्रन्दः = आकान्द = आकान्त ] (धा. सा. श.)

**आकार** [ वणिक्पशुपालकर्षकादिभ्यां राजग्राह्यो भागः करः । स एव कारः । कर म्हणजे च कार ]

शेतकऱ्याला जमिनीचा आकार चार रुपये पडतो. या वाक्यांत वस्तुतः कार हा शब्द आहे. उच्चार सौकर्यार्थ आ लावून कार या शब्दाचा आकार असा उच्चार मराठींत झाला आहे.

आकार म्हणजे कर (Tax, Rent) कारनाम्नि च प्राचां हलादौ (६-३-१०) ह्या पाणिनिसूत्रांत कार शब्द सरकार - देणें या अर्थी योजिलेला आहे. ह्या पाणिनीय कार शब्दापासूनच आकार Tax हा मराठी शब्द निघाला आहे. (भा. इ. १८३६)

**आकाळी १** [ आकालिकः मृत्युः = आकाळी मृत्यू ] आकालिक म्हणजे instantaneous (२) [ आकालिकः = आकाळी, अकाळी. समानकालौ आद्यन्तौ यस्य आकालिकः ] आकालिक म्हणजे क्षणिक. आकाळी पाऊस म्ह० क्षणिक पाऊस.

**आक्राळविक्राळ १** [ आकरालविकराल ]

(*आकराळविकराळ पहा*) (२) [ आकरालविकराल = अक्राळविक्राळ (कराल म्हणजे वांकडें) ] वांकडीतिकडी. (भा. इ. १८३४)

आख, आंख १ [ अक्षि = आखि = आंख, आख ] (स. मं.)

आंख २ [ अंक ] (*आंक पहा*)

आखाडसासू [ आस्कंदिकाश्वश्रूः = आखाडसासू ] आंगावर चालून येणारी सासू.

आखें १ [ अक्ष्णं ] (*अख्खें २ पहा*) (२) [ अक्षयं ] (*अखें पहा*)

आंग [ अंग = आंग ] (स.मं.)

आगखाडा [ अग्निखदा = अग्गिखडा = आगखाडा = आखाडा; कारंडव्यूह ] (भा. इ. १८३४)

आंगचोर १ [ अंगचोरः = आंगचोर. अंगं नाम साहाय्यं ] ह्या कामांत त्याचें आंग आहे म्हणजे साहाय्य आहे. (२) [ अंगत्सरः = आंगचोर. त्सर् छद्मगतौ ] आंगचोर म्ह० छद्मी. (धा. सा. श.)

आंगठा [ अंगुष्ठक = अगुट्ठअ = अंगुठा = आंगठा ] (स.मं.)

आगटी - टी [ अग्निस्थिति = अग्गिठिइ = आगिठी = आगठी = आगटी ] शेगडी वगैरे. (ग्रंथमाला)

आंगठी [ अंगुलिस्थ (रत्न) = आंगुट्ठी = आंगठी. लचा लोप. अंगना + उपस्त्रि या शब्दांतला ना प्राकृतांत येतांना जसा नाहींसा होतो तशी च अंगुलि शब्दांतील लि प्राकृतांत येतांना लुप्त होते ] (आंगवस्त्र शब्द पहा)

आंगलग [ लग् १० श्लेषणे. अंग + लग् अंगलग्नः = आंगलग) (धा. सा. श.)

आंगलोट [ अंग + लोट (लुट्) ] (स. मं.)

आंगवस्त्र [ उपस्त्रि = उवस्त्रि = वस्त्रि = वस्त्र. अंगना + उपस्त्रि = आंगोवस्त्रि = आंगोवस्त्र = आंगवस्त्र ] मुख्य स्त्री खेरीज अवांतर जी बाळगलेली अंगना ती आंगोवस्त्रि ऊर्फ आंगवस्त्र. ह्या शब्दाचा वस्त्र ऊर्फ कपडा या शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं. उच्चारसाम्यामुळें इतकें मात्र झालें कीं वस्त्र शब्द मराठींत नपुंसकलिंगी असल्यामुळें आंगवस्त्र (उपस्त्रि) हा हि शब्द नपुंसकलिंगी योजला जाऊं लागला. उपस्त्रि = उपस्त्र = उपवस्त्र. उपवस्त्र (कपडा) ह्या शब्दाच्या अनुकरणानें व मध्यें च आगंतुक दिला आहे. (भा. इ. १८३३)

आगस्ता [ आगस्तिकः = आगस्ता ] (भा. इ. १८३४)

आगळीक [ आगोलीक (आगस् + अलीक) = आगळीक ] अपराध व खोटें यांचा संगम.

आंगाई [ आ + गै to sing to ] to sing to a child to sleep.

आगाऊ १ [ आगामी = आगाऊ ] (२) [ आगामुकम् = आगाऊ. गम् १ गतौ ] (धा. सा. श.)

आगाऊ [ आगामुकं (प्रतिपालनपूर्वकं) = आगाऊं ] Previously.

आगाशी [ काश् १ दीप्तौ. आकाशिका = आगाशी = घराचा अत्युच्च भाग आकाशाकडील. काश्य = खास. हें खास आहे = स्पष्ट आहे ] (धा. सा. श.)

आगीचा छरा [ आग्नेयः शरः = आगीचा छरा ]

आगेंमागें [ अग्रे माग्रे = आगेंमागें ] (भा.

इ. १८३६)

आग्यारी [ आग्नीध्र्या = आग्यारी ] पारश्यांचें होमाग्निस्थल.

आघवें [ अग्रिमं ] (ज्ञा. अ. ९ पृ १२)

आघळपघळ [ गल्भ् १ धाष्टर्ये. आगल्भप्रगल्भम् = आघळपघळ ] (धा. सा. श.)

आंच [ अञ्चु याचने. अंचा = आंच] संसाराची आंच लागली म्ह० याचना लागली. (धा.सा.श.)

आचकट विचकट [ आचक्ष + विचक्ष = आचकट विचकट (बोलणें). चक्ष् to speak, व्यक्तायां वाचि ]

आंचणें, आंचवणें [ असु उपतापे. अस्यति = आंचतो. असूयति = आंचवतो ] लोखंड आंचवणें म्ह० किंचित् तापवणें. (धा. सा. श.)

आचंबा [ आस्मयः (आ + स्मि १ हसने)] (*धातुकोश - आचंब १ पहा*)

आचवणें, आचँवणें [ आच्यवनं = आचवणें. आचमनं = आचँवणें. ] आचँवणें म्हणजे पाणी तोंडांत घेणें. आचवणें म्ह० मुकणें. स प्राणान् आच्यवते = तो प्राणांस आचवतो म्ह० मुकतो. स आचमते = तो आचँवतो (पाण्यानें). (भा. इ. १८३४)

आंचवणें [ असूयति ] (*आंचणें पहा*)

आचारी - आर्यवैद्यकांत आचारिकं म्ह० आरोग्यरक्षणार्थ अन्नपाण्याच्या ग्रहणाचे नियम ज्यांत सांगितले आहेत तें प्रकरण. ह्या प्रकरणांतील नियमाप्रमाणे जो अन्नादि पदार्थ तयार करण्याची कला उत्तम जाणतो तो आचारिकिकः; त्यापासून मराठी आचारी. आचारिन् या शब्दाशीं मराठी आचारी या शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३७)

आचुक [ आशकु (अकच्क) = आचकु ] आचुक म्हणजे ताबडतोब. (भा. इ. १८३४)

आज [ अद्य = अज्ज = आज. कल्य = कल्ल = काल. उदये = उदयां = उद्यां परवासर = परवा (सरचा लोप) उद्यांच्या पुढल्या व कालच्या मागल्या दिवशीं. तृतीयवासर = तेरवा (सरचा लोप)] (ग्रंथमाला) आजकालचें [ आद्यकालीयं = आजकालचें ]

आजा [ आर्यक = अज्जअ = आजा ] (सरस्वती मंदिर)

आजोळ [ आर्यालय = आज्जालअ = आजोळ ] (सरस्वती मंदिर)

आटणें [ अट्ट् कमी होणें, शुष्क होणें. अट्टन = आटणँ = आटणें ] तळें आटतें = तडागः अट्टते. गाय अटते = गौः अट्टते. (भा. इ. १८३३)

आटपाटनगर [ अट् गमने व पट् गमने. आटपाटनगर = आलें गेलें नगर ] कोणतें तरी निनांवी रहदारीचें गांव म्ह० आटपाट नगर. (ग्रंथमाला)

आटोका १ [ आ + तुज् (Vaidik) to bring near : आतोजः, आतोकः = आटोका, अटोका ] nearness, compass माझ्या आटोक्यांत आलें come within my proximity, compass. (२) आ + टौक् to approach नाम आटौकः approach = आटोका approach ] तें माझ्या आटोक्यांत आहे. it is within approach of my efforts.

आठवडा हा शब्द अशिष्ट लोक अठावडा असा उच्चारतात व तोच उच्चार व्युत्पत्तिदृष्ट्या युक्त आहे. अष्टावर्त

(स्वार्थे क) = अट्ठावडअ = अठावडा = आठवडा. आठव्या दिवशीं ज्या कालमानांत त्याच वाराची आवृत्ति अथवा आवर्त होतो तो आठवडा. दुधाचा आठवडा = दुग्धस्य अष्टदिवसावृत्तिः (भा. इ. १८३३)

**आठवण** [ अर्थ् १० याचने. अर्थापन = आठवण ] संकटीं देवाची आठवण करितो. (धा. सा. श.)

**आंठवण, आठवण** [ आस्थापन = आट्ठावण = आठवण, आंठवण ] (भा. इ. १८३२)

**आठवणें** [ अर्थ् १० उपयाञ्चायाम्. अर्थय = आठवण. अर्थयति = आठवणें ] देवं अर्थयति = देवाला आठवतो. (धा. सा. श.)

**आठी** [ *पांची पहा*]

**आड** [ अंतर् = आड. तस्य अंतर् = त्याच्या आड. द्विदिवसांतरित = दोदिवसाड हींव ]

**आड (विहीर)** [ अवट = अअड = आड] (ग्रंथमाला)

**आँड, आड** [ अंधूः = आँड, आड ] विहीर.

**आंड काढणें.** [ अंडकर्षण = आंडकाढणें ] बडवणें. (भा. इ. १८३६)

**आडकी** [ अर्द्धिकी = (a small coin) ] गुरू आडकीचे तीन.

**आंडकुली** [ अंड + क + ल = आंडकुल (लें, ली) ] पोराचें लहान अंड.

**आडखळणें** [ अंतःस्खलनं = आँडखळणें = आडखळणें. ह्या खळण्याचा (स्कंदनं = खळणें) शीं संबंध नाहीं. ] (भा. इ. १८३६)

**आडगांव** [ अंतर्ग्राम = आँडगांव = आडगाव = आडगांव = उपग्राम. ] (भा. इ. १८३३)

**आडत** [ आट्टपात्य (अट्टपति = बाजारचा मुकदम = आडआती = आडती = आडत ] आडत म्ह. बाजारच्या मुख्याला व्यवहारार्थ द्यावें लागणारें द्रव्य. (भा. इ. १८३६)

**आडदीठ** [ दृश् १ प्रेक्षणे. अर्धदृष्टि = आडदृष्टी = आडदीठ. दृक = डक = टक. भषकदृश - भसकंदिशी ] (धा. सा. श.)

**आडदृष्टि** [ अर्धदृष्टिः = आडदृष्टी, आडदीठ ]

**आडनांव** [ अंतर्नाम = आँडनांव = आडनाव = आण्नाव = आण्णाव. आडनांव म्ह. उपनाम. अंतर् = उप. (भा. इ. १८३३)

**आडनीड १** [ अर्धस्निग्ध = अड्ढनिड्ढ = आडनीड ] तो आडनीड वागतो = सः अर्धस्निग्धं वर्तते (भा. इ. १८३४)
(२) [ ऋध् ४ वृद्धौ. अर्धन्यर्ध = आडनीड ] (धा. सा. श.)

**आडबाप्या** [ अर्धवप्तृकः = आडबाप्या] आडबूड (वृध् १ वृद्धौ. अर्धवृद्ध = आडबुड) (धा. सा. श.) लहान तरुणाला आडबाप्या म्हणतात.

**आडमाप** [ अर्धमापन = आडमाप. अर्ध म्ह० दीड (निम्मा नव्हे) ] आडमाप म्हणजे दिडकें माप. (भा. इ. १८३३)

**आडमार्ग १** [ मृग् १० अन्वेषणे. अर्धमार्गः = आडमार्ग ] (धा. सा. श.)
(२) [ अंतर्मार्ग = आडमार्ग ] (भा. इ. १८३३)

**आडमुठ** [ अर्धमुष्टि = आडमुठ, आडमुठ्या (मुष्टिक) ] (भा. इ. १८३३)

**आडमूठ १** [ मुह् ४ वैचित्ये. अर्धमूढः =

आडमूढ = आडमूठ ] (धा. सा. श.) (२) [ अनेडमूक = अडमूठ (क स्थाने ड) ] मूळ अनेडमूक म्ह० बहिरा असून मुका तो. नंतर अडाणी असा अर्थ पडला. (भा. इ. १८३६)

आडरात [ अर्धरात्र = आडरात ] (भा. इ. १८३३)

आडवंगी [ अन्तरंगता interiorness, private intertainment = आडवंगी] गुप्त स्वीकार. उ. - वांचौनि आपुलेया काजा लागि।प्राणिजाताचां हित भागीं । संकल्पाची ही आडवंगी । न करणें जें।। ज्ञा. १६-२०१

आडवस्त्र [ अर्धवस्त्र किंवा अंतर्वस्त्र = आडवस्त्र ] (भा. इ. १८३३)

आडवा [ अर्वाच् = आडवा - वी - वें ] hitherwards.

आडवाट [ अंतर्वाट: = आँडवाट = आडवाट ] (भा. इ. १८३३)

आंडिल (बैल) [ अंडीर = आंडील, आंडिल] (भा. इ. १८३६)

आंडील (बैल) [ आंडीर = आंडील ]

आडुळसा (वनस्पति) [ आटरूषक = आडळूसअ = आडुळसा ] (भा. इ. १८३४)

आढी [ धि ६ धारणे. आधि (ठेव) = आढी (आंब्याची) ] (धा. सा. श.)

आणखी [ अन्यत् + एक ] (*आणीक २ पहा*)

आण ने [ आनयनं नयनं = आणने ]

आणा १ [ (कार्ष) आपणक = आअणअ = आणा ] (भा. इ. १८३२) (२) [ अंकनक = अँअणअ = आणा] (भा. इ. १८३२) आणि - आण् - आन् - न - नि १

मराठींत कित्येक वक्ते असे प्रयोग करितात:-

(१) अश्या प्रकारची व्यवस्था आणि सरकारनें केली.

(२) तो आणि तसा वागेल, हें संभवत नाहीं.

(३) ब्राह्मण नि दारू पिईल, हें होणार नाही.

ह्या स्थलीं आणि, नि हे शब्द हन्त, हान या शब्दांचे अपभ्रंश आहेत.

(सं) हन्त = (ज्ञानेश्वर) हान = हानि = आणि = णि = आन् = न = नि; हान शब्द ज्ञानेश्वर असाच योजतो :-

उ. - म्हणौनि उदकीं हान रसु । कां पवनीं जो स्पुर्श ।। शशिसूर्यां जो प्रकाशु। तो मी चि जाण ।। ज्ञा. अ. ७-३२ (भा. इ. १८३२) (२) [ अन्यत्] (*न पहा*) (३) [ अणि boundary, limit = आणि = (limit) ≐ लयनि resting place = लणि = (resting place) ]

उ. ह्मणोनि समर्थु जो एथें । आणि लणि सर्वज्ञते । तेणें सविशेष कर्मातें। त्यजावें ना ।। ज्ञा. ३-१६६. (४) [ अन्] (५) [ अन्या = आणिआ = आणि ] (ज्ञा. अ. ९)

आणिक [ अन्यकत् ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३७)

आणीक १ सेतुबंध काव्याच्या नवव्या आश्वासकाच्या ८६ व्या पद्याच्या टिकेंत रामसेतुप्रदीपकार येणेंप्रमाणें लिहितो :– "आणिक्क तिर्यगर्थे देशी" मराठींत हि आणीक ह्या शब्दाचा प्रयोग तिरकें, वाकडें, कांहींच्या बाहीं, ह्या अर्थी करतात; उदाहरणार्थ, त्याचें तर पहाणें आणिकच आहे.

[ आँणिक्क = आणीक, आणिक ] (भा. इ. १८३२) (२) [ अन्यत् + एक = आण + एक = आणेक = आणीक = आणिकु = आणीकु (ज्ञानेश्वरी) = आणखी ] (ग्रंथमाला)

आणीकु [ अन्यत् + एक ] (*आणीक २ पहा*)

आणीबाणी [ आ + अन् = नाम आनिः breathing in व्या + अन् = नाम वाणिः breathing out आणिबाणिः = आणीबाणी in - breath and out - breath ] सर्वव्यापी प्रसंग.

आण्णाव [ अंतर्नाम ] (*आडनांव पहा*)

आत [ आप्तका ] (*आत्या पहा*)

आंतकुडा [ अंतःकुटिल = आंतकुडा ] (भा. इ. १८३६)

आंतडें [ अंत्रं (सं.) = आंतडें ] (स. मं.)

आतबट्टा [ आत्तवटः = आतबट्टा stripped of, destitute of बट्टा the price of exchange. आत्त stripped off, destitute आत्तलक्ष्मी :stripped of wealth. आंत in ह्या क्रियाविशेषणाशी संबंध नाहीं. ]

आंतबट्टा [ भ्रश् ४ अधःपतने. अंतर्भ्रंशः (अंतर्भ्रष्टः) = आंतबट्टा ] आंतुन नाश (धा. सा. श.)

आता ? १ [ तो आला नाहीं, आता ? आदह (अव्ययप्रकरणम्, कुत्सने) ] (भा. इ. १८३४) (२) [ अद्धा evidently = आता ]

आतां [ आतः इतोपीत्यर्थे (तत्त्वबोधिनी) ] आतां काय म्हणतोस = इतोपि किं भणसि, आतः किं भणसि. आतः = आता, आतां. अनुनासिक वैकल्पिक. (भा. इ. १८३४)

आतॉं - धर्मपालकृत पाइअलच्छी नांवाच्या प्राकृत कोशांत खालील शब्द आता ह्या अर्थी आहेत :-

इहइँ संपइ इर्णिह इत्ताहे संपयं दाणिं ॥६७॥ पैकीं इत्ताहे हें आतां ह्या अर्वाचीन शब्दाचें प्राकृत रूप होय. इत्ताहे = इत्ता = आत्ता = आतां. रोजच्या बोलण्यांत लोक आत्ता असा उच्चार करतात. आतां ह्या अर्थी दाणिं शब्द ज्ञानेश्वरकालीन मराठींत येतो, त्याचें मूळ इदानीम्. (स.मं.)

आंता ! [ हन्त (come !) = आंता ! ] आंता कसें करूं = हन्त किं करवाणि.

आतां कीं [ अथ कीं = आतां कीं (How else?) ] (भा.इ. १८३३)

आते [ आप्तका ] (आत्या पहा)

आतें [ असत् = आत (ता - ती - तें) असणारें. अस्‌चें वर्तमान धातुसाधित असत् = (अ लोप) सत्. मराठींत अ राहिला आहे. ]

आंतौरिया [ अंतःपुरिका ] अंतःपुरांतील स्त्री. (ज्ञा. अ. ९ पृ. १२८)

आत्या १ [ आप्तका = अत्तिका = अत्तिआ = अत्या = आत्या, आत, आते ] बापाची वडील किंवा धाकटी बहीण. (स. मं.) (२) [ आप् व्याप्तौ. आप्तिका (आप्तचें स्त्रीलिंग) = आत्तिका = आत्या ] आत्या म्ह० आप्त स्त्री, बापाची बहीण, वडील बहीण इ. इ. (धा. सा. श.)

आथिला [ आप्रथित + ल ] (*धातुकोश - आथ १ पहा*)

आदळणें [ आ + दल् (हापटणें) = आदळ] (भा. इ. १८३४)

आदा [ आदा (स्त्री) = आदा (घेणें.) ]

आंदू - हात्तीच्या पायांत तो स्थिर उभा राहावा म्हणून आंदू घालतात - अदि

बंधने । अदित आंदः बंधनकर्ता. तीर्थेभ्य आन्दं. (मां. वा. सं. - ३०-१६) (भा. इ. १८३३)

**आदोगर** [ आदावग्रे = आदोगर ] आदौ म्ह० अग्रे, पहिल्याप्रथम. आदावग्रे हे शब्द संस्कृतांत जोड योजतात. (भा. इ. १८३६)

**आधमणी** [ अर्धमानिका = आधमणी (स्त्री)] माप, वजन. (भा. इ. १८३४)

**आधव्याचा** [ आदिद्यवीयः = आधव्याचा ] आधव्याचा माणूस म्ह० कालचा माणूस, आदल्या दिवसाचा माणूस.

**आंधळी कोशिंबीर** - "अंधा कौशांबी" नांवाचा खेळ कौशांबी नामक शहरांत खेळत. कौशांबी शब्दाला र जोडला आहे. असा र लंडनांतील कनिष्ठ लोक शब्दाच्या शेवटीं जोडतात. कोशिंबीर हा वनस्पतीचा वाचक शब्द हि सुचला.

(१) इटीदांडू, (२) लगोऱ्या, (३) मलखांब, (४) जोडी, (५) चाक, (६) गदगाफरी, (७) दंड, (८) नमस्कार, (९) उठाबाशा, (१०) घोडी, (११) पाळणा, (१२) झोंबी, (१३) जेठी, (१४) कुरघोडी, (१५) आट्यापाट्या, (१६) आंधळी कोशिंबीर, (१७) हुतूतू, (१८) हमामा, (१९) झिम्मा, (२०) फुगडी (२१) कोंबडा, (२२) गोट्या, (२३) गल, (२४) सागरगोटे, (२५) टिपरी, (२६) फांसा, (२७) सोकटी किंवा सोंगटी, (२८) चिंचोके, (२९) खडे, (३०) कानीं खडा, (३१) वाघमेंढ्या, (३२) टाळी, (३३) लेण वगैरे शेंकडों शब्द प्राकृतांतून मराठींत आले आहेत. (भा. इ. १८३२)

**आंधळी कोशिंबीर (खेळ)** [ अंधिका (खेळ) + (स्वार्थे ल) = आंधळी कोशिंबीर ] (भा. इ. १८३६)

**आधीं** [ आदिची सप्तमी आदि*, आदी*, त्याचा कठोर उच्चार आधीं. आदी* शब्द ज्ञानेश्वरींत येतो. ] (स. मं.)

**आनाठाईं** [ अन्यस्मिन् स्थात्रि = आना (सप्तमी) ठाईं (सप्तमी) ] (भा. इ. १८३६)

**आपटणें** [ आपट् - फोडणें (चुरादि) आपटनं = आपटणें, हापटणें. ] (भा. इ. १८३३)

**आपटशील-बिपटशील** [ आपत्विपत् = आपटबिपट ] (भा. इ. १८३४)

**आपरूप** [ आपर्तुक (अप + ऋतु = अपर्तु) = आपरुक = आपरूप. क - स्थाने अज्ञानेन पः ] आपरूप म्हणजे विलक्षण. हें फळ या दिवसांत आपरूप आहे म्ह. आपर्तुक आहे. (भा. इ. १८३४)

**आपलपोट्या** [ पुष् ४ पुष्टौ. आत्मपुष्ट = आपलपोट्या ] (धा. सा. श.)

**आपसुक-का** [ अम् शुकं (अम् शैघ्र्ये, शुकं शैघ्र्ये) = आमसुक = आपसुक (शीघ्र निपात)] आपसुक म्हणजे अति शीघ्र. आपसुक या सर्वनामाहून निराळा. (भा.इ. १८३४)

**आपसुक, आपसुका** [आत्मसुखेन = आपसुक. आत्मसुखात् = आपसुका]

**आपा** [ आत्मा = अप्पा = आपा (मुख्य जीव) ] (स.मं.)

**आपैतें** [ आत्म्यायत्तं = आपैतें ] dependent on oneself, controlled by one's self.

**आपैसा** [ अल्पायासः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३४)

आप्कारा [ अप् + करकः ] (*अप्कारा पहा*)

आब १ [ आवः (अव् स्वाम्यर्थे) = आब] आब राखणें. to keep one's position of superiority. (२) [ आभा appearance = आब ] appearance. आब राखणें. to keep up appearances.

आंबट [ अंबष्ठ = आंबट [ ब्राह्मणात् वैश्यायां जातः) ] कनिष्ठ जातींत आंबट, गोड, कडू असे भेद सध्यां हि आहेत. (भा. इ. १८३२)

आंबटवेल [ अंबष्टवल्ली = आंबटवेल ] (भा. इ. १८३४)

आंबट्या [ *दह्या पहा*)

आबण बाबण [ आत्मन् = आप्पण = आपण = आबण. पाप्मन् = पापण = वावण = बाबण (विशेषनाम) ]

आंबणें [ अमनं ] (*आमणें पहा*)

आबद [ आपद्, आपदा = आबद, आब्दा, अब्दा ]

आंबवणी [ आम्लपानीयं = आंबवणी ] (भा. इ. १८३२)

आबळ १ [ अबल्यं (weakness) = आबळ (बृहदारण्यकोपनिषद्)] (२) [ बाध् १ लोडने - आबाधा ] (*वाभाडा पहा*)

आबाळ [ बाध् १ लोडने - आबाधा ] (*वाभाड पहा*)

आंबिल [ आम्ल = आंबिल (पाली) ] (भा. इ. १८३२)

आबू [ आवुक = आबुअ = आबू - अबु] बापाचें किंवा वडील पुल्लिंगी माणसाचें नाव. संस्कृत नाटकांत हा संस्कृत शब्द बोलण्याच्या भाषेंत येतो. तसा मराठींत हि तो बोलण्याच्या भाषेंत येतो. (भा. इ. १८३३)

आबोली [ म्लै १ हर्षक्षये. अम्लाना = आमोली = आबोली ] एक फुलझाड आहे. (धा. सा. श.)

आंबोळी [ आम्लवोलिका = आमबोळी = आंबोळी ] (भा. इ. १८३६)

आब्दा [ आपद्, आपदा ] (*आबद पहा*)

आभाव [ आभास semblance = आभाह = आभाव ] semblance, appearance केवळ आभाव आहे. its mere appearance.

आभ्रा १ [ अंबरकः ] (*अभ्रा पहा*) (२) [ आभरः = आभ्रा (आ + भृ ३ धारणे) ] (*धातुकोश - आभर पहा*)

आमणें [ अम् १ रोगे, गतौ. अमनं = आमणें, आंबणें ] (धा. सा. श.)

आमिकलेलें [ आमिक्षित ] (*आविकलेलें पहा*)

आयजी बायजी [ अतिजातिः = अइजाइ = आयजी (स्थानांगसूत्र). व्यतिजातिः = बइजाइ = बायजी ]

पितुः संपदं अतिलंघ्य जातः अतिजातः समृद्धतरः । पितुः ईषद्धीनगुणः व्यतिजातः । श्रीमंत बापाच्या जोरावर गुणहीन मुलगा उदार. आयजीच्या जीवावर बायजी उदार.

आयत [ ता - ती - तें ] [ संस्कृत आयत् वर्तमानकालवाचक धातुसाधित. त्यापासून मराठी आयत. आयत् = आयत (ता - ती - तें ) ] आयत् म्ह० चालून येणारें. आयतें अन्न म्ह० श्रम न करतां चालून येणारें अन्न. आयती सोय म्ह० श्रम न करतां होणारी सोय. आयतखाऊ म्ह. श्रम न करतां होणारी सोय. आयतखाऊ म्ह० श्रम न करतां

चालून येणारें अन्न खाऊ पहाणारा. (भा. इ. १८३३)

आयतें [ आयत (आकस्मिक) = आयतें ] तत्रायतं बोधयेदित्याहुः (बृहदारण्यकोपनिषद्, तृतीय ब्राह्मण, १४)

आया [ आत्री ] (*आई पहा*) {प्रयस्}

आयास प्रयास {आयस्} to exert to excess यासयति जाचणें.

आरण [ आरण्यक = आरण ] आरण्यक म्हणून जो वेदाचा भाग आहे त्याला भिक्षुक आरण म्हणतात. (भा. इ. १८३४)

आरत [ आर्ति = आरत ] पुरासंवत्सरादार्त्तिमाकृष्यसि । गोपथब्राह्मण, प्रथम प्रपाठक ।।३१।। (भा. इ. १८३४)

आरपार [ अवारपारं (अलीकडून पलीकडे) = आरपार. अवार this side = आर; पार that side of river = पार ] आरपार from this side to that side.

आरबट (माणूस) [ आरभट (हिय्येबाज) = लक्षणेनें) आरबट (आरंभशूर) ] (भा. इ. १८३४)

आरसा [ आदर्श = आदरस = आयरिस = आरस = आरसा. हा शब्द फारसी नाहीं. ] (स. मं.)

आरसेंपारसें [ रस् १० आस्वादने. अरसंप्रारसं = आरसें पारसें, अरस म्ह० रसहीन, चवहीन; प्रारस म्ह० अतिशय बेचव ] (धा. सा. श.)

आराणुक [ आ + राध् ५ संसिद्धौ. आराधनिका ] (*धातुकोश - आराअ पहा*)

आराधी [ आराधिन् (देवपूजकः) = आराधी ]

आरोगणें [ आरोचनं ] to be agreeable रुचूं लागणें. (ज्ञा. अ. ९ पृ. १४५)

आरोळी [ रु २ शब्दे. आरावालिः = आरौळी = आरोळी ] लांब हाक. (धा. सा. श.)

आऱ्ये ! [ शाकटायनस्तु आर्य इति प्रतिबंधे (अष्टाध्यायी - तत्त्वबोधिनी - अव्ययप्रकरणम्) ] आऱ्ये, अऱ्ये हे निपात मराठींत प्रतिबंधार्थक आहेत. अऱ्ये ! अथवा अरे ! गप्प बैस. किंवा नुसतें अरे ! आऱ्ये ! (भा. इ. १८३४)

आलमाल [ *आलुमालु पहा*)

आलाडपालाड [ आरात्तात्परात्तात् = आलाडपालाड, अल्याडपल्याड ] जवळून आणि दुरून. (भा. इ. १८३४)

आवई [ आह्वय (currency, news) = आवई ] आवई उठली म्ह. लोकप्रवाद उठला.

आवकजावक [ आयक + व्ययक = आवकजावक credit and debit. य = व; व्य = ज. आय income, व्यय expenditure ] आवक जावक म्ह० income व expenditure

आवणी [ अव् १ वृद्धौ. अवनिः = आवणी = धान्यवृद्धि ] (धा. सा. शब्द)

आवंतणें [ आमंत्रणं = आवंतणें ] (भा. इ. १८३४)

आवति, आवती [ आहुती ] (*आउति पहा*)

आवत्या [ आहूतयः = आवत्या. हु अदने ] आवत्या म्ह० लहान घास.

आवत्याजिवत्या [ आहूतयः = आवत्या ] आवत्याजिवत्यांची महाराष्ट्रांत

चातुर्मासांत पूजा करतात.

आंवदा [ आइंदह् (फा.) ] (*यंदा पहा*)

आवरण [ आपारणम् ] (*धातुकोश - आवर १ पहा*)

आवर्जून [ वृज् १० वर्जने. आवर्जिताः = संमानिताः एते जामातरः परमगौरवेण आवर्जिताः स्वानि गृहाणि न गच्छंति । पंचतंत्र - चतुर्थतंत्र - कथा ६ ] आवर्जून सांगणें म्ह० सन्मान करून सांगणें, मुद्दाम आग्रह करून सांगणें इ. इ. इ. (धा. सा. श.)

आवल [ आमूलम् ] (*आवलात पहा*)

आवलात [ आमूलम् = आवल, आव्वल. आमूलात् = आवलात. आमूले = आवलीं] हें आवल, आवलात, आवलीं खोटें आहे म्हणजे मूळांत खोटें आहे.

आवलीं [ आमूले ] (*आवलात पहा*)

आवशीं [ आवसतिः night = आवशीं, औशीं at night]

आवळ १ [ आकुलम् ] (धातुकोश - *आवळ १ पहा*) (२) [ वल् १ वेष्टने, संवरणे आवलनं ] (धा. सा. श.)

आवा १ [ आहावः (पाणिनि) a tough for watering cattle etc.= आवा - कुंभाराचा पाण्याचा ] (२) [ आतापकः = आआवआ = आवा (भट्टी) आवा (कुंभाराचा). (३) [ तप् १ सन्तापे. आतापक = आआवआ = आवा (कुंभाराचा) तप्त्वाशूलाकृत्य = तावूनसुलाकून. तपकः = तवा. निस्ताप = निताव ] (धा. सा. श.)

आवाइ, आवाई १ [ ह्वे १ शब्दे. आह्वायिका = आवाई (बातमी, वार्ता). आह्वायक म्ह० जासूद, बातमीदार ] (धा. सा.श.) (२) [ आह्वयः = आवाई ] आह्वयः म्ह० वार्ता, बात, लोकवार्ता.

आवांका १ [ वंक् १ कौटिल्ये, आवंकः = आवांका, आंवाकणें ] (धा. सा. श.१) (२) [ आ + वक्ष् १ रोषे ] (धातुकोश - *आवांक १ पहा*)

आविक [ आमिक्षा ]

आविकलेलें १ [ आमिक्षा (curd दहीं) अमिक्षित = आविकलेलें, आविखलेलें, आमिकलेलें (दहीं) ] (२) [ आमिक्षा ११. आमिक्ष्य = आविक. अमिक्षितं = आविकलेलें. क्षीरे दधियोगतः या विकृतिः सा आमिक्षा ] आविकलेलें दहीं म्ह० बिघडलेलें, फुटलेलें दहीं. (धा. सा. श.)

आविखलेलें [ आमिक्षित ] (*आविकलेलें १ पहा*)

आवुत्त [ आर्यपुत्र = अज्जउत्त = आउत्त = आवुत्त ]

आंव्या [ आमयावी = आंव्या ] आंव ज्याला झाली आहे तो आंव्या.

आशावणें [ आशाय ११ इच्छायाम्. आशाय = आशाव (णें.) ] (धा. सा. श.)

आंस [ अक्ष = आंस ]

आसगंध [ अश्वगंधा = आसगंध ]

आसणा (वनस्पतिविशेष) [ असनः = आसणा ]

आसपास [ आचोपच towards and away from. (वैदिक) आच towards, उपच away from] (घरास = गृहं आच. स हा प्रत्यय आच ह्या पूर्ववैदिक विरळ अव्ययापासून निघालेला समजणें युक्त.)

आसलग [ आशालग्न = आसलग (आशाळभूत, ज्ञानेश्वरी) ]

आंसूं [ अश्रु = आंसूं ] (स. मं.)
आस्थावाईक [ आस्थापातिक ]
आस्थावाईक, आस्थेवाइक [ पत् १० गतौ. आस्थापातिक = आस्थावाईक. आस्थाप्रायिक = आस्थावाइक = आस्थेवायिक ] (*वाईक पहा*) (धा. सा. श.)
आस्र (घराचा) [ अश्रि (घराचा कोपरा) = आस्री = आस्रा ] घराचा आस्र्याला म्ह० घराच्या कोपऱ्याला. (भा. इ. १८३४)
आस्राप [ आश्रावः = आस्राप. आश्रापः म्ह० विनयशील. स्रु १ गतौ ] मुलेगी आस्राप आहे म्ह. विनयशील आहे. (धा. सा. श.)
आस्वल १ [ अच्छभल्ल = अस्सव्हल = आसवल = आस्वल (ऋक्षाच्छभल्लभालूकाः । अमर) ] (भा. इ. १८३४) (२) [ अच्छभल्ल = आसहल = आसअल = आसवल, आस्वल ]
आंहां ! [ अहं (अव्यय) = आंहां ! ]
आहाच (ज्ञानेश्वरी) [ आहत्य (कदाचित्) = आहच्च = आहाच (जैनमहाराष्ट्री)] (भा. इ. १८३६)
आहाण [ आघातन Slaughter-house = आहाण Slaughter-house] उ. - यन्हवि यागादिकीं क्रिया । आहाण ते चि धनंजया । परि विपलांति आचरौनियां । नाटकी जैसे ॥ ज्ञा. १६-३७४
आंहूत [ आहुति ] (*आउति पहा*)
आहे [ अस्ति ] (ज्ञा. अ. ९)
आहेर [ आभर (ण) = आहर = आहेर] मंगलकार्यसमयीं दिलेले वस्त्रालंकार. (भा. इ. १८३२)
आहो [ आ + अव् अवाप्तौ = आवणें to be accomplished. आवः (अवाप्तिः) = आवो = आहो ] accomplishment.
उ. - म्हणोनि हा काव्यां रावो । ग्रंथ गरुवतीचा ठावो । एथौनि रसां जाला आवो । रसाळपणाचा ॥ माडगांवकर ज्ञानदेवी १-३३
आळ [ अलीक = अलीअ = अळी = आळी = आळ ] (भा. इ. १८३२)
आळ (प्रत्यय) - हेळणं, हेडनं = हेळणें = हेटाळणें, पिटनं = पिटणें = पिटाळणें, कंठनं = कंठणें = कंटाळणें, स्फिटनं = फेडणें = फेटाळणें, वेष्टनं = वेट्टणँ = वेटाळणें, मोटनं = मोडणें = मोटाळणें. (भा. इ. १८३७)
आळण [ आलेहन = आळण ] चाटतां येण्यासारखें पातळ पिठलें.
आळवणें १ [ आलपनं = आळवणं (णें) ] (भा. इ. १८३२) (२) [ आलप् = आळव ] बोलून तृप्त करणें. (भा. इ. १८३३)
आळसबिळस [ आळसविळस = आळसबिळस ] (भा. इ. १८३४)
आळा १ [ अलं = आळा, अलकम् (साकचू) = आळा ] आळा म्हणजे पुरे, मर्यादा. (भा. इ. १८३४) (२) अलं (enough, पुरे) = आळा (पुल्लिंग) ] आळा घालणें = पुरें म्हणून थांबवणें. (भा. इ. १८३४)
आळाण [ आ + ली - आलयन ] घट्ट पिठलें सोलापूरकडील.
आळिवणें [ आलिप् = आळिव . ] घोटून रबडी करणें. (भा. इ. १८३३)
आळी [ ली ९ श्लेषणे. आली (आवलि) = आळी ] घरांची ओळ. (धा.सा.श.)

आळुमाळु [ अलंअलं = अलमल = आलुमालु = आळुमाळु = आलमाल ] (भा. इ. १८३२)

आळू (वृक्ष) [ आरुकं = आळू ]

आळें (किड्यांचें) [ आलं = आळें ] आलं म्ह० कृमी व कीटक यांच्या अंड्यांचा समुदाय. (भा. इ. १८३४)

आळोकापिळोका [ आपुलकःपुलकः = आळोकापिळोका ] अलकपुलक = केसांचें थरारणें.

## इ

इखीविखी [ ईक्ष् १ दर्शने. ईक्षावीक्षा = इखीविखी ] हा शब्द जुन्या मराठी ग्रंथांत येतो. (धा. सा. श.)

इंगा [ इंग् १ गतौ. इंगः = इंगा ] इंगः म्हणजे अभिनयानें हेतू कळविणें. शनीचा इंगा म्ह० शनीच्या येण्याचा हेतू. (धा. सा. श.)

इचणें [ एज् १ कम्पने = इचणें ] असा इचूं नको म्ह० कांपूं नको. (धा. सा. श.)

इछित [ ईप्सित = इछित; इष्ट = इष्ट ] इष्ट आणि इछित असे दोन्ही शब्द मराठींत आहेत व त्यांचे उगम भिन्नभिन्न आहेत. ईप्सितं अभीप्सितं = इच्छिलेंबिछिलें (अ लोप व स्वार्थे ल) (धा. सा. श.)

इछित [ ईप्सितं = इच्छित (प्राकृत) = इच्छित (मराठी) चंडस्य प्राकृतव्याकरणं P. 14 text, Hoerule ]

इजर १ [ इज्जर = इज्जर = इजर ] एका प्रकारचा बेत. (भा. इ. १८३६) (२) [ हिज्जलः = इजर ]

इजा [ ईज् कुत्सने. ईजा = इजा = विजा] इजा म्ह० निंदा, शब्दानें दुखवणें, (नंतर) शरीरदुःख. (धा. सा. श.)

इतकुलीमितकुली [ इतुक (ल स्वार्थे) = इतुकल (ला - ली - लें) इतुकल = इतकुल. मित (क स्वार्थे व ल स्वार्थे) = मितकल (ला - ली - लें) (इतकुलच्या अनुकरणानें) = मितुकल] मित म्ह० मोजकें, अल्प. इतकु म्ह० एवढें. इतकुलीमितकुली गोष्ट = एवढी लहान गोष्ट. पोरांच्या बालकथांत हे शब्द येतात. (भा. इ. १८३३)

इटीदांडू [ यष्टिदंड = इट्टिदंडु = इटीदाँडू ] (भा. इ. १८३२)

इटेकरी [ यष्टिकर = इष्टिकर = इट्टिकर = इटीकर = इटेकर - री. ] (भा. इ. १८३२)

इतक ( का - की - कें) [इयत्तक (वैदिक) = इतक (का - की - कें) ] (भा. इ. १८३६)

इतिश्री [ विश्रि (मृत्यु) = इश्री = इतिश्री इतिश्री (म्हणजे समाप्ति) या शब्दाच्या धर्तीवर ति मध्यें घुसडली. 'विश्रि' पासून निघालेली इतिश्री म्हणजे मृत्यू. इति + श्री म्हणजे समाप्ति. (भा. इ. १८३४)

इत्सा [ आदित्सा (घेण्याची इच्छा) = आइत्सा = इत्सा ] वस्तूची इत्सा = वस्तु मिळविण्याची इच्छा. इत्सा आणि इछा हे मराठींत दोन भिन्न शब्द आहेत. (भा. इ. १८३४)

इथंतथं [ आयथातथ्यं = इथंतथं ]
इथंतथं करूं नको म्ह० खोटे करूं नको.

इंद्रावण [ इंद्रवारुणी = इंद्रावण (वनस्पति)] (भा. इ. १८३७)

इन् मिन् तिन् [ इँ, मीँ, तीँ = हीं, मीं, आणि तीं ]
अनुनासिकाचा अनुस्वार उच्चारिला. तीन ह्या संख्यावाचक शब्दाशीं तीं या सानुनासिक शब्दाचा घोंटाळा करून अर्थनिष्पत्ति केली आहे. (भा. इ. १८३२)

इरीरी [ ईर् गतौ कंपने. ईरईर (आज्ञार्थ द्वितीय पुरुष अनेकवचन) = इरीरी ] इरीरी म्ह० चल चल, चलाव चलाव. (ध. सा. श.)

इवलेंसें [ एतादृश = एआलिस = इवलेंसें]

इशी, इश्श् - लहान मूल शौच्याला जावयाचें असल्यास त्याला इशीला जावयाचें का, म्हणून विचारतात. विशि विष्टायां (माध्यंदिनीय वाजसनेय संहिता - महीधरकृत वेददीप २५-७). विश् म्हणजे विष्टा. विश् = इश् (स्त्र) = इश. बायका घाणेरडा पदार्थ पाहिला असतां इश्श/ मेलं असे शब्द उच्चारितात. त्यांतील इश्श् ह्या शब्दाचा अर्थ विष्टा असा आहे. (भा. इ. १८३३)

इश्श् [ ह्रीच्छ् लज्जायां. ह्रीच्छ् = ईच्छ् = इश्श् ] (ग्रंथमाला)

इश्शरें - [ विस्रं = इश्शरँ = इश्शरें ] विस्रं आमगंधिः (अमर) = दुर्गंध, वाईट, मलिन, दुष्ट. इश्शरें भांडें म्ह० मलिन भांडें. इश्शरे माणूस म्ह० मलिन माणूस. इश्शरे बायको म्ह० मलिन बायको. तात्पर्य, इश्शरें हा शब्द मराठींत एकारान्त आहे. (भा. इ. १८३४)

इष् ! [ इस् ! = इष् ! ] इस् हा रागाचा, दुःखाचा उद्गार आहे.

इष्षु [ इस् ! (क्रोध, दुःख, इत्यादि दर्शक अव्यय) = इष्षु !, इश्श् ! ]

इसब [ विसर्प = इसब (गर्दे - वाग्भट) = विसाप ] (भा. इ. १८३४)

इसाड [ ईशा (नांगराचा दांडा = इसा + आड = इसाड ] (भा. इ. १८३४)

इसोण [ ईषदुष्णं = इसोण, विसोण = विसावण ] थोडेसें विसावण घाल म्ह० ईषदुष्ण पाणी घाल.

इळा, इळी [ इली ] (*विळा ३ पहा*)

इळेपिळे [ इल् ६ स्वप्ने, क्षेपणे, इल् गतौ निद्रायाम्. इल् + प्रेल् = इळेपिळे ] इळेपिळे देणें म्ह० झोपेंतून उठतांना अंगाला वांकडीतिकडी गति देणें. (धा. सा. श.)

## ई

ईट घे, मार [ यष्टिग्राहं हंति = इटघे, हणतो ] इटघे हें अव्यय आहे.
ईर - हा मराठींतील शब्द वेदकालीन आहे. ह्याचा संबंध कंड्वादिकांतील इरस् (इरस्यति) ईर्ष्यायां ह्या धातूशीं येतो. इरेस पडला = ईर्ष्येस पडला. प्यादा इरेंत पडला = प्यादा ईर्ष्येंत पडला. त्त्व. (भा. इ. १८३२)

## उ

उकडणें [ उत्क्वथनं = उक्कढणँ = उकडणें] (भा. इ. १८३७)

उकलणें [ उत्कलनं = उकलणें ] (भा. इ. १८३७)

उकलीव, उकलींव [ कल् १० क्षेपे.

उत्क्लिम = उकलीव, उकलींव (उकललेलें) ] (धा. सा. श.)

उकळणें [ अवक्षल् = ओखळ = उखळ = उकळणें ] अवक्षल् म्ह. बडवून धुणें. (भा. इ. १८३६)

उकळी [ उत्कलिका = उक्कळिआ = उकळी ] उत्कलिका म्ह० उत्कंठा. (भा. इ. १८३७)

उकळींव १ [ उत्क्वथिम = उकळींव = (उकळलेलें) ] (२) [ क्वथ् १ निष्पाके. उत्क्वथिम = उकळींव = (उकळलेलें) क्वथ = कट (वरणाचा कट) क्वाथपानीयं = कटवणी क्वाथःनिक्वाथ = काढानिकाढा ] (धा. सा. श.)

उकिडव (वा - वी - वें) १ [ उत्कुटुकः = उक्कुडुआ = उकुडवा = उकिडवा ] उत्कुटुकासन नांवाचे एक आसन आहे (जैनग्रंथ). पादाभ्यां अवस्थितः उत्कुटुकः (२) [ उत्कटक = उक्वडअ = उकडव = उकिडव (वा - वी - वें) नासीतोत्कटकस्थितः । वाग्भट - अष्टांगहृदय - सूत्रस्थान - द्वितीयाध्याय श्लोक ३६. उत्किटक = उक्कडिअ = उकिडव. डवरील इ क वर नेली. ] (भा. इ. १८३४)

उकिडवा [ कुट् ६ कौटिल्ये. उत्कुटक = उकिडवा उ = इ) ] (धा. सा. श.)

उकिरडा - ह्या शब्दावरून असें दिसतें कीं दारिल व केशव हे दोघे हि secondary प्राकृत म्हणजे प्राकृतिक, मराठी वगैरे भाषा बोलणारे होते. कौशिक सूत्र २८।२ दारिलः - अवकर = उकुरटिकातृणानि केशवः - उकरिडिका मार्जनिकातृणं अर्थात् केशव हा महाराष्ट्रब्राह्मण आहे. (भा. इ. १८३२)

उक्ते [ अवक्रयः = मोल (अमर, द्वितीयकांड; ७९ वैश्यवर्गः) अवक्रीत = ओकत = ओक्त = उक्त ] साक्षात् मोल देऊन आयतें तयार केलेलें द्रव्य. (भा. इ. १८३२)

उक्राविक्रा [ उत्क्रयविक्रय = उक्राविक्रा. विक्रय to sell and उत्क्रय to buy ]

उखळ [(उद्) लिख्]

उखळणें [ लिख् ६ अक्षरविन्यासे. उल्लिख = उखळणें. (वर्णविपर्यय) ] उल्लिखनं म्ह० उकरणें. (धा. सा. श.)

उखाणा १ [ उद्ग्राहणिका ] (उगाणा पहा) (२) [ उत्खननः = उखाणा] उत्खातं उक्खाणिदं (उत्तररामचरितं - तृतीयांकः सीतावचनं.) (३) [ उहाप्रश्नः = उघाणा = उखाणा. उहा filling up an ellipsis उहाप्रश्नः = question in order to supply an ellipsis ] (४) [ ऊह् १ वितर्के. ऊहाप्रश्न = उखाणा. ऊहा (तर्कवितर्क) = ऊय, उवा (अनेकवचन) ] त्याच्या डोक्यांत उवा पिकल्याहेत म्हणजे तर्कवितर्क माजले आहेत. (धा. सा. श.)

उखित [ वस् निष्ठा उषित (प्रोषित traveller) = उखित (ता - ती - तें) sojourner ] थोडा काल राहणारा.

उखिता [ उषितः = rested, inhabited उखिता (वसणारा, राहिलेला) sojourning ] वस् (उषित) ]

उग (गा - गी - गें) [ युग, जुग् ]

उगंडु [ उद्गन्तु a way out = उगंडु a way out ]

उ. - पडलेयां तिये ठांइं । कल्पांतीं हीं उगंडु नाहिं ।

एसणें पतन कुलक्षयिं । अर्जुनु म्हणे ॥ ज्ञा. १-२६०

उगमणें - उमगणें [ अवगमनं = उगमणें, उमगणें (वर्णविपर्यय) ] (भा. इ. १८३४)

उगलणें [ उद्गृ (उत् + गृ दान करणें । गरति) = उगलणें ] दान करणें.

उगळणें, उगळी [ उत् + गृ ६ निगरणे ] (उगळी म्ह० ओकारी, अमृतानुभव). उ. -आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिती आंगें ।
कीं द्वैताचेनि पांगें । उगळिते आहाति ॥ ज्ञानेश्वर - अमृतानुभव ३. (धातुकोश - उगळ ३ पहा)

उगा, उगी, उगें (उग) [ वुंग् १ वर्जने = उग्ग = उग्गा = गी = गें ] उगा (आज्ञार्थ) म्ह० रडणें सोड. (धा. सा. श.)

उगा [ युगि, जुगि, वुगि वर्जने. वुगः = उगा. वुगित = उगला ] उगा म्ह० भयापासून वर्जित. उग (गा - गी - गें), उगला. (धा. सा. श.)

उगांच [ उकञ् + च = उगांच. उकञ् (अप्रयोजने निपातः) ] (भा. इ. १८३४)

उगाणा [ उद्ग्राहणिका (वादांत उत्तरपक्ष करणें) = उगाणा, उखाणा ]

उगारणी [ उद्ग्राहणिका = उगारणी, उग्राणी gathering of monies due]

उग्राणी १ [ उद्ग्राहणिका ] (*उगारणी पहा*) (२) [ अवक्रेणी ] (जवकिरा २ पहा) (३) [ अवक्रयणी debts standing out = उग्राणी] revenue to be collected ]

उग्राणी बिग्राणी [ अवक्रेणी = उग्रेणी = उग्राणी buying. विक्रेणी = बिग्रेणी = बिग्राणी selling विक्रीः = विक्री]

उघड १ [ उद्गाढ = उग्घाड = उघड. उद्गाढमूर्खः = उघडमूर्ख ] उद्गाढ म्हणजे अतिशय, उघडमूर्ख म्ह० अतिशय मूर्ख (भा. इ. १८३६) (२) [ उद्घट = उग्घट = ऊघड = उघड ] (ज्ञा. अ. ९ पृ. २)

उंच [ उदञ्च् = उंच ] turned upwards.

उचकट [ उत्कट = उचकट ]

उचकणें [ उत्खननं = उचखणें = उचकणें = हुचकणें ] हुचकून मारणें. (भा. इ. १८३४)

उचकावणें [ उत्सुकायते = उच्चुकाए = उचकावतो ] (भा. इ. १८३३)

उचकी १ [ कास् १ शब्दकुत्सायाम्. उत् + कासिका = उत्कासिका = उचकी ] उत्कासिका म्ह० बेडका बाहेर टाकण्याची क्रिया. (धा. सा. श.) (२) [ उत् + हिक्क् उचकी येणें freq जिहिक्क् नाम उज्जिहिका = उचकी ] to be included in the verbs.

उचकून [ उच्चक् पहाणें ] दुसरा शब्द - हुचकून.

उचंबा [ उत्स्मयः ] (धातुकोश - *उचंब १ पहा*)

उचलणें [ उच्छ्रयणं = उच्चलणं = उचलणें] (भा. इ. १८३४)

उचल्या [ ग्लुचकः = उचल्या (ग्लुच् १ स्तेयकारणे) ] (धातुकोश - *उचल २ पहा*)

उच्च [ उत् + च = उच्च. उत् + च् + अ + इ + स् = उच्चैः ]

उच्छाद [ उत्सादः = उच्छाद ] उत्साद म्ह० नाश करणें. (भा. इ. १८३७)

उछाव [ उत्सव = उछाव ] उत्सव शब्दाचा उछाव असा उच्चार अशिष्ट करतात.

(भा. इ. १८३७)

उछाह [ उत्साह = उछाह ] (भा. इ. १८३७)

उच्छाद [ उत्साद = उछछाद ] उछछाद म्ह० दांडगाई. पोरांनी उछछाद मांडला आहे. (भा. इ. १८३३)

उजदार [ ऋजुद्वारं = उजदार ] पुढचें दार.

उजरी [ उर्जित strength, power, virility = उजरी. virility ]
उ. - वालभाचिया उजरिया। आपणेयां प्रति कुस्त्रिया।
जोडूनि तोखविति जैसिया। ऐहेवपणें ॥ ज्ञा. १६-३७५

उजवणें १ [ उपयमनं = उअजवणँ = उजवणें ] आमच्या दोन मुली उजवल्या म्हं० दोन मुलींचीं लग्नें झालीं. (भा. इ. १८३६) (२) [ उद्यापन = उज्जावण = उजावणें - उजवणें ] (भा. इ. १८३२)

उजवा १ [ ऋज् १ गतौ. ऋजीयान् = उजवा ] (*उजु पहा*) (२) [ ऋज्वञ्च् = उजवा ] moving straight forward. (३) [ उद्यतः = उजवा. उद्यतहस्तः = उजवा हात ] भांडण्याला त्याचा उजवा हात. (४) [ उद्यतः = उजवा. ] खेळण्याला उजवा पाय. ready and raised foot.

उजवें [ ऊर्जव्य (वैदिक) = उजवें ] त्या शेताहून हें शेत उजवें आहे म्हणजे पिकाला सरस आहे. ऊर्जव्य म्ह० अन्नादींनीं संपन्न. ऋजु पासूनचा उजवा निराळा.

उजळण [ उज्ज्वलन = उज्जळण = उजळण ] (भा. इ. १८३२)

उजाड १ [ झट् १ संघाते. उज्झटं = उजाड] परित्यक्त, उत्सृष्ट. (धा. सा. श.) (२) [ उद्यात्र = उज्जाड = उजाड ] (भा. इ. १८३२)

उजावणें १ [ उद्यापन ] (*उजवणें २ पहा*) (२) [ उज्जापनं = उजावणें = उजवणें] सोंगटी उजवली म्ह० जय पावून गेली. (भा. इ. १८३७)

उजियड [ उद्यत् (rising star) ] उद्यत् हें विशेषण आहे पण त्याचा अपभ्रंश मराठींत नाम झाला आहे. उद्योतपासून उजोड. (ज्ञा. अ. ९ पृ. ७२)

उजु [ ऋज् १ गतौ. ऋजु = उजू. (ऋजीयस्) ऋजीयान् = उजवा (तरभावदर्शक) ] (धा. सा. श.)

उजेड [ उदयित = उजइड = उजेड ] (भा. इ. १८३२)

उजेड, उजेडणें [ युत् जुत् भासने। उत् + युत् वा उत् + जुत् = उज्युत् उज्जुत्। नाम उद्योत वा उज्जोत। उज्जोत = उज्जोड = उजोड। ओ स्थाने ए होऊन उजेड। (भा. इ. १८३२)

उजोड [ उद्योत ] (*उजियड पहा*)

उटंगळ [ उत्तुंग + ल (स्वार्थक) = उटुंगळ = उटंगळ ] उटंगळ म्ह. उंचनिंच.

उटणें १ [ उद्वर्तन ] (*उटी पहा*)
(२) [ उपदेहनं, उद्वर्तनं ]

उंटाड [ उष्ट्राढ्यः = उंटाड, गृध्राढ्यः = गिधाड, महिषाढ्यः = म्हैसाड, व्याघ्राढ्यः = वाघाड, बष्काढ्या = भाकाढ (विऊन फार महिने झालेली) स्थूराढ्य = थोराड इ. इ. इ. ] येथें आड प्रत्यय संस्कृत आढ्यापासून निघाला आहे. (भा. इ. १७३४)

उटी [ उद्वर्तन = उवट्टण = ऊटणें = उटणें; उद्वर्ति = उवट्टी = ऊट्टी = उटी] (भा. इ. १८३२)

उट्टें १ [ अवत्त (अव + दा to cut) = उट्ट (कापलेला अंगाचा भाग) ] तुझें उट्टें काढतों म्ह० तुझ्या अंगाचा कापलेला भाग काढतों. (२) [ उठ् प्रतिघाते = उट्टें (प्रतिघात करणें) ] (३) [ उपस्थं = उट्टें (गांड इ.) ] तुझें उट्टें काढतों = तव उपस्थं क्राथयामि. (४) [ जुष्टं = युट्ट = उट्टें (eaten etc.) ]

उठणें १ [ उत्तिष्ठ = उठ्ठ = ऊठ ] (ग्रंथमाला) (२) [ उठ् अपघाते ] उठणें (गांव वगैरे) (ग्रंथमाला) (३) [ वंठ (वठि एकचर्यायां) to be alone = उठणें, वठणें ] गांव उठला म्ह० माणसाखेरीज एकाकी झाला. (धा. सा. श.)

उठबशी [ स्था १ स्थाने. उत्तिष्टोपवेशिका = उठबशी ]

उठल (ला) [ स्था १ स्थाने. उपस्थित = उवट्ठिअ = उठ + ल = उठल (ला) ] (धा. सा. श.)

उठवणी [ युट्ट् कमी होणें. युट्टापयति = उठवणें ] उठवणीस येणें म्ह० क्षीण होणें.

उठवणें [ उत्थापन = उठ्ठावण = उठावणँ - णें ] (भा. इ. १८३२)

उठाणू [ उथास्नु = उठाणू ] वर येणारे गळू वगैरे. (भा. इ. १८३४)

उठाव [ स्था १ स्थाने. उत्थापः = उठाव ] (धा. सा. श.)

उडकी [ उदंचिका, उदंकिका = उडकी, हुडकी. उदच्यते पानीयं यस्याः सा उदंकिका ] उडकी, हुडकी म्ह० उथळ विहीर. (धा. सा. श.)

उंडगा १ [ उदग्रः = उडग्गा = उंडगा (उच्चारसुखार्थ अनुस्वार) ]

(२) [ उत्पथगः = उंडगा ]

उडचणें १ [ अस् १ गतौ, ४ क्षेपणे. उदसनं = उडचणें ] पाणी वर फेंकणें. (धा. सा. श.) (२) [ अच् १ गतौ. उदंच = उडच, उदंचनं = उडचणें ] उडचणें म्हणजे पाणी वर काढणें - ओढणें. (धा. सा. श.)

उडणें [ अन् २ प्राणने उदन् (उद् + अन्) = उडणें ] प्राण उडाला = प्राणः उदानत् प्राण breathed up छाती उडणें = छाती वर येणें. breathes up so that the chest rises. (धा. सा. श.)

उडत (ता - ती - तें) [ उदयत् = उडअत = उडत ] उडतें ऊन म्ह० उदयत् सूर्योष्णं. (भा. इ. १८३४)

उडवणें १ [ उर्वणं = उडवणें. उर्व् हिंसायाम्] त्याला उडवा, त्याचें डोकें उडवा म्ह० त्याचा नाश करा. उड्डी धातूपासून निघालेल्या णिजर्थक उडवणें म्ह० वरती उड्डाण करवणें ह्या धातूहून हा हिंसार्थक उडवणें हा धातू निराळा. हा उडवणें (हिंसार्थक) णिजर्थक मूळांत नाहीं. (भा. इ. १८३६) (२) [ वह् १ प्रापणे. उद्वह = उडव. उद्वहनं = उडवणें ] उपरणें उडवीत जातो = उत्तरीयं उद्वहन् याति. (धा. सा. श.) (३) [ लू ९ छेदने. उल्लवनं = उडवणें] तरवारीनें डोकें उडविलें म्ह.० कापलें. (धा. सा. श.) (४) [ उल्लापयति] (*उडावणें पहा*)

उडवाउडव [ वप् १ छेदने. उद्वाप (ejection) = उडव. उद्वपनं = उडवणें ] चार छेदांनीं चार अंश उडवले म्हणजे ejected.(धा. सा. श.)

उडाऊ [ डी १ विहायसा गतौ. उड्डायक =

उडाऊ ] (धा. सा. श.)

उडावणें [ ली ९ श्लेषणे. उल्लापयति (णिच् ली) = उड्डावतो = उडावतो = उडवतो] बालं उल्लापयति = पोराला उडवतो म्हणजे फसवतो. त्याला उडवायला किती वेळ म्ह० फसवावयाला किती वेळ. (धा. सा. श.)

उतरणें (पलीकडे जाणें) [ नदीं उत्तरति = नदी उतरणें ]

उतरणें (खालीं) [ अवतरणं = उतरणें ] जिना उतरणें = सोपानं अवतरति. (भा. इ. १८३५)

उतार वयांत [ उत्तरे वयसि = उतर वयांत, उत्तरति वयसि = उतार वयांत, उत्तरे वयसि = उत्तर विशींत ] (भा. इ. १८३४)

उतराणी [ उत्तमारणिका = उत्तराणी ] (भा. इ. १८३४)

उताणसा (सा - सी - सें) [ उत्तानशयः = उताणसा ] तो उताणसा निजतो = स उत्तानशयः शेते. (भा. इ. १८३४)

उतावळ (ळा - ळी - ळें) [ उत्तापकः = उत्तावलः (मृच्छकटिक) = उतावळा (ळा-ळी-ळें)]

उतावळा [तप् १ संतापे. उपतापिलः = उताविळा = उतावळा ] उपताप म्ह० घाई.

उत्छाद [ उत्सेध (voilence) = उच्छाद ] पोरांनीं काय उत्छाद मांडला आहे ! उत्सेधजीविनः ५-३-११३ पाणिनि.

उत्छाद, उच्छाद [ उत्सादः = उच्छाद ]

उत्फुल्ल [ फुल् संचलने ] (*फुलें पहा*)

उथळ [ उत्स्थल = उथ्थल = उथळ ] (ग्रंथमाला)

उदंड [ उद्दंड (formidable, great) = उदंड ]

उदवाउडव [ उद् + वप् ]

उंदीरकानी [ (आखुकर्णिका) उंदूरकर्णिका = उंदीरकानी (वनस्पति) ] (भा. इ. १८३७)

उदेल [ उपदेह + तैल = उदेल. उपदेह (उटणें) ]

उदेल (ला - ली - लें) [ (वद्) उदित + ल = उदिअल = उदेल (ला-ली-लें)] अशी वाचा उदेली = ईदृशा वाक् उदिता (उदेली म्ह० बोलिली गेली) (वद्) वद् + ल = वदल (ला - ली - लें)

उदो [ हु ३ दानादानयोः. उद्धव = उधो = उदो ] खंडोबाचा उदो म्ह. सण. (धा. सा. श.)

उदो उदो [ उद्धव sacrificial fire, festival = उधो = उदो ] खंडोबाचा उदो म्ह० खंडोबाचा festival

उद्या, उद्यां [ उदये ] (*आज पहा*)

उद्वस [ उद्वसं (ओसाड) = उद्वस ] उद्ध्वस्त शब्द निराळा.

उधई [ उपदेहिका (मुंगी) = उधई; उद्देहिका (ant) = उधई ]

उधान [ उद्धान उत् + हा = उधान ]

उधार [ — स्यादृणं पर्युदंचनं ॥२॥ उद्धारः — ॥३॥ (द्वितीयकांड - अमर - वैश्यवर्ग) ] ऋण, पयुदंचन व उद्धार हे तीन शब्द ऋणाला आहेत. उद्धार = उधार. उधार म्ह० ऋण. ऋणानें आणिलेली म्ह० रोख पैसे न देतां आणिलेली जी वस्तु ती उधार आणिलेली वस्तु. (भा. इ. १८३३)

उधोळणें [ उद्धूलन = उधोळणें = उधळणें (गुलाल, माती, राख) ] (भा.

इ. १८३३)

उन्हुन्हीत [ उष्णउष्णित = उन्हुन्हीत (ऊनऊन) भात वगैरे.]

उन्हून [ उष् दाहे. उष्णोष्ण = उन्हून ] (धा. सा. श.)

उपखा [ उपक्रयः purchase = उपखा] खर्च.

उपजनिपज [उत्पचनिपचा (मयूरव्यंसकादि) = उपजनिपज ]

उपजलें [ उत् + पद् ४ गतौ. उप्पज्ज + ल = उपजलें ] (धातुकोश - *उपज १ पहा*)

उपटसुंभ [ उत्पथशुंभः = उपटसुंभ ]

उपटसंभ, उपटसूळ [ पथ् १० प्रक्षेपे. उत्पथ = उपट ] (धा. सा. श.)

उपट्या [ औपस्थिक = उपट्या living by princation ] शेटउपट्या.

उपडा [ उपावृत्त = उपावड्ड = उपाड = उपड (डा - डी - डें) ] (भा. इ. १८३६)

उपडा - डें - डी [ उत्पाटित = उप्पाडिअ = उपाड = उपड = उपडें - डा - डी] (ग्रंथमाला)

उपडा १ [ उत्पादः = उप्पाडा = उपडा ] उत्पादः म्ह० वर पाय केलेला. उपडा म्ह० वर पाय करून पडलेला. (भा. इ. १८३७) (२) [ पद् १० गतौ. उत्पादः (उत्पद्) = उपडा. ऊर्ध्वं पादौ यस्य ] तो उपडा जन्मला = सः उत्पादः जन्म आप. (धा. सा. श.)

उपनलें [ उत्पन्न + ल ] (धातुकोश - *उपज १ पहा*)

उपरणें १ [ उपाभरणं = उपाहरणँ = उपारणँ = उपरणें ] उपारणें असा उच्चार गांवढे करतात. (भा. इ. १८३३) (२) [ उपवरणं = उपारणें = उपरणें ] (भा. इ. १८३३)

(३) [ उपारंधनि ] (उपेरणें पहा)

उपराट [ उत्स्फारयत् = उप्फराट = उपराट (टा - टी - टें) सुस्फारयत् = सुफराटें ] (ज्ञा. अ. ९ पृ. १७८)

उपरी, उपऱ्या [ उपरिकः = उपरी, उपऱ्या] उपरिक म्ह० बाहेरचा माणूस.

उपलाणा [ उत् + पल्ययनः = उपलाणा ] बिन खोगरी घोडा, बैल इ.

उपवेढ [ उत् + प्रस्वापः ] जागरण. (धातुकोश - उपहुड २ पहा)

उपस [ उपसह् १ मर्षणे ] उ. - नाना दुःखे उपसली. to tear.

उपहुढ [ उत् + प्रस्वापः ] (धातुकोश - *उपहुड २ पहा*)

उपळसरी १ [ उत्पलशारिवा = उपळसरी] (२) [ उत्पलसारिवा = उपळसरी ] (भा. इ. १८३६)

उपळा [ उत्प्लवः = उपळा ] उत्प्लव म्हणजे वर तरंगणे, येणें, पाण्याचा उपळा म्ह० वर येणें. (भा. इ. १८३७)

उपाइल (ला - ली - लें) १ [ (वैदिक) उपम excellent, best + ल (स्वार्थे) = उपाइल (ला - ली - लें) ] उत्कृष्ट, मोठें. (२) [ उत् + प्री to love णिच् प्राययति (बोपदेव) निष्ठा उत्प्रायित + ल = उपाइल (ला - ली - लें) ] आवडतें.

उपाई [ उत्पादः = उपाई ] पुढले दोन पाय उभारून मागल्या पायांवर घोड्यानें उभें रहाणें.

उपास १ [ उप + अश् ९ भोजने ] (*धातुकोश उपास १ पहा*)

(२) [ उपवासः, उपवासनं - भोजननिवृत्तिः उपान्वध्याङ्वसः, (१-

४-४८) या सूत्रावर कात्यायनानें खालील वार्तिक रचिलें आहे. वसे रश्यर्थस्य प्रतिषेधो वक्तव्यः ग्रामे उपवासति = भोजननिवृत्तिं करोति । उपवास = उपआस = उपास उपोषण (भोजननिवृत्तिः) ] (भा. इ. १८३३)

उपाहाणौ - हा द्विवचनान्त शब्द ऊर्फ हें द्विवचनान्त रूप मानभावांच्या (लीळाचरित्र नामक) ग्रंथाच्या ७ सातव्या लीलेंत आलें आहे, तें असें :- श्रीचरणीं उपाहाणौ घातलींयां ॥ मूळ संस्कृत रूप उपानहौ. अक्षर विपर्ययानें उपाहाणौ असा अपभ्रंश सहाशें वर्षांपूर्वीच्या मराठींत झाला. द्विवचनें मराठी अपभ्रंशांत हि कायमच होत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. उपाहाणौचा अपभ्रंश वर्तमान मराठींत वाहाणा. तात्पर्य, वाहाणा हें रूप स्वरूपतः द्विवचनी आहे. आणि ज्या अर्थी उपाहाणौ हा कर्ता द्विवचनी आहे, त्या अर्थी घातलींयां हें क्रियारूप हि द्विवचनीच आहे. ग्राहिते असें मूळ संस्कृत द्विवचनी रूप. ग्राहिताचें मराठी घातली (स्वार्थक ल प्रत्यय). घातलीचें द्विवचन घातलीया. मराठींत द्विवचनी व बहुवचनी रूपें एकसारखींच असतात. सबब, द्विवचनी रूप कोणतें व बहुवचनी रूप कोणतें तें कर्त्याच्या रूपावरून ओळखावयाचें असतें. मानभावी ग्रंथांत प्रस्तुत द्विवचनी रूप साक्षात् असल्यामुळे, जुन्या मराठींत द्विवचनी शब्दांचा व धातूंचा उपयोग क्वचित् होत असे, असें जें विधान मीं आपल्या ज्ञानेश्वरी - व्याकरणांत केलें आहे त्याला बळकटी येते.

२ वाहाणा रूप संस्कृत उपानहौ या रूपावरून निघालेलें नाहीं. अक्षरविपर्यास झालेल्या जुन्या मराठी उपाहाणौ या रूपावरून झालेलें आहे. संस्कृत उपानहौ पासून अपभ्रंश येणेंप्रमाणें होतील :-

उपानहौ - (उ लोप) वाणहौ = वाणहा जुन्या मराठींत उपानहौ हें संस्कृत रूप येतांना प्रथम अक्षरविपर्यास होऊन उपाहाणौ असें रूप झालें व त्याचे वर्तमान मराठींत अपभ्रंश येणेंप्रमाणें झाले :-

उपाहाणौ = (उ लोप) वाहाणौ = वाहाणा

उघड आहे कीं वाहाणा हें रूप अपभ्रष्ट उपाहाणौ या रूपापासून निघालें आहे.

३ मराठींत आद्य उ चा लोप होण्याची लकब आहे. उदाहरणार्थ - १ उपास्थापनं = (उलोप) पाठावणें = पाठवणें. उपास्था म्ह. (कोणत्याहि वस्तूकडे) जाणें. उपास्थापन (णिच्) म्ह० जाववणें. (२) उपोहनं = पोहणें. (३) उपाध्याय = पाध्या (४) उपविश् = बइस = बैस (५) उपवादः = पवाडा (निंदा) (हा अर्थ ज्ञानेश्वरींत येतो) (६) उपनमनं = वणवणें = ओणवणें. (७) उपधारणं = पधारणें (गुजराथी) (भा. इ. १८३७ पृ. '८५)

उपेरणें [ उपारंधनि = उपेऱ्हाणँ = उपेराणँ = उपेरणें, उपरणें ] उपेरणें असा उच्चार करतात व तो शुद्ध आहे. (भा. इ. १८३३)

ळणें [ फुल् संचलने ] (*फुलें पहा*)

उफाडा १ [ उत्फालः = उफाडा ] उत्फाल म्ह० जोराने विकास पावणें. (भा. इ. १८३७) (२) [ फल् १ निष्पत्तौ. उत्फालः = उफाडा ]

उत्फालय् = उफाडणें (to expand by splitting). उ. - मुलगी उफाड्यानें वाढते आहे म्ह० grow as it splitting like a शिताफळ. (धा. सा. श.)

उफ्राटें [ अवभ्रट a turned up flat nose = उफ्राटें ] उलटें बसकें फेफटें नाक.

उबगणें [ उपगमन = उबगअण = उबगण = उबगणें ] (भा. इ. १८३२)

उंबरठा [ औदुंबर प्रकोष्ठः = उंबरठा ] ह्या ठिकाणीं उंबराच्या लांकडाचा उपयोग करीत.

उंबरा [ उंबरक (दाराच्या वरची फळी) = उंबरा ] (भा. इ. १८३४)

उभ [ उर्द्धव = उब्भ (पाली) = उभ (भा - भी - भें) ] (भा. इ. १८३२)

उभट [ अवभ्रट = उभट ]

उभा १ [ उद्बाहुः = उभा ] तो मुलाला घ्यायला उभा आहे. तो खायला उभा आहे. (२) [ ऊर्ध्वः = उब्भा = उभा] ऊर्ध्वरोमन् = केंस उभे राहिलेला. (३) [ भा २ दीप्तौ. उद्भा = उभा ] शत्रू उभा करणें म्हणजे to make an enemy visible. उद्ध्र्वः पासूनचा उभा निराळा. (धा. सा. श.) (४) [ उद्भा to become visible = उभा visible. ] माझ्यापुढें भय उभें राहिलें. catastrophe became visible.

उभें [ ऊर्ध्वं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३७)

उभ्या पिकाची जमीन - यद् एकस्मिन् संवत्सरे द्विः फलति तद् उभयतः सस्यं क्षेत्रं ।
(आश्वलायनगृह्यसूत्रगार्ग्यनारायणीयवृत्ति - १-५-६) उभ्या पिकाची जमीन म्हणजे ज्या जमिनींत वर्षांतून दोनदा पीक येतें. (भा. इ. १८३६)

उमगणें [ *उगमणें पहा* ]

उमळा [ ह्मलः, ह्यालः = उमाळा, उमळा. ह्मल् चलने ] उमाळा म्ह. हळहळ, मनःक्षोभ.

उमाठा १ [ (उद्) मंथ् ] (२) [ उन्माठः = उमाठा. उत् म्ह० वर व माठ म्ह० रस्ता ] उमाठा म्ह० ऊर्ध्व रस्ता, अंतरिक्ष.

उमासा [ उत् + मश् १ रोषकृते, क्रोधे ] तिटकारा. (*धातुकोश - उमस ६ पहा*)

उमाळा [ ह्यालः ] (*उमळा पहा*)

उमेठा [ उन्मेथः ] जमाव. (*धातुकोश - उमेठ पहा)*

उरदाणा [ उर्वरित धान्यं = उरदाणा ]

उरफोड १ [ उरस्फोटः = उरस्फोड, उरफोड स्फुट् १० भेदने ] (२) [ परिस्फुटता = उरस्फोड complete explanation ]

उरस्फोड [ उरस्फोटः ] (उरफोड १ पहा)

उराड [ उरस्तट = उरअड = उराड breck (slightingly) ]

उरूस [ उत् + हर्ष = उद्धर्ष. उद्धर्ष = उरूस] उद्धर्ष म्ह० महोत्सव, धार्मिक उत्सव. (धा. सा. श.)

उलटसुलट [उच्छिल्ष्टं = उलट. सुश्लिष्टं = सुलट]

उलथा [ अस् १ गतौ, ४ क्षेपणे. उदस्तः = उडत्थो = उलथा ] (धा. सा. श.)

उलिसें [ हा शब्द अल्पीयस् पासून निघाला आहे. .आदेश ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. अ = उ; ल्प = ल. अल्पीयस् = उलिअस = उलिसें ] अति थोडें (भा. इ. १८३२)

उलुली [ हुलहुली a sound made by women when in coes उलुली]

उल्लस, उल्लास [ उत् + लस् १

क्रीडायाम्] ( *धातुकोश - उल्लस पहा)*
उल्लू [ उलु (howling) = उल्लू ] उल्लू माणूस म्ह० वृथा आरडाओरडा करणारा माणूस.
उल्हस, उल्हास [ उत् + लस् १ क्रीडायाम्] *(धातुकोश - उल्लस पहा)*
उवळणें [ वल् १ वेष्टने, संवरणे. उद्वलनं = उवळणें ] (धा. सा. शा.)
उवा [ यूका = ऊ = आ = ऊ ] (भा. इ. १८३३)
उवाइला [ उपाहित (संयोजित) = उवाइअ + ल = उवाइल (ला - ली - लें) ] (भा. इ. १८३५)
उवावो [ उपव्यापः = उवावो ] प्रसार, विस्तार, व्याप.
उशी १ [ उत् + श्रय = ] उशी (spring up)] चेंडूनें उशी घेतली. (२) [ उच्छ्री (उत् + श्रि) = उशी (उंच फेकणें) ]
उशीर १ [ उत्सूरः (संध्याकाळ) = उशीर. उ = ई ] (२) [ उच्चिरं (अतिशय कालातिपात) = उशीर ] (भा. इ. १८३४)
उष्टें [ जुष् ६ सेवने. जुष्टं = युष्टं = उष्टें] (धा. सा. श.)
उसट [ उत्सृष्ट ] *(धातुकोश - उसट २ पहा)*
उसण [ ऊष् १ रुजायाम्. ऊषणा = उसण] एक दुखणें. (धा. सा. श.)
उसंत १ [ उपशांतिः = उवसंति = ओसंत = उसंत. शम् ४ शमने ] (२) [ उपशान्ति = उसंत cessation] त्याच्या उद्योगाला उसंत नाही.
उसन (ना - नी - नें) [ वस्नं = उस्नें = उसनें ] वस्न म्ह. मूल्य.
उसना - नी - नें [ वस्न hire = उसनें anything taken on hire ]
उसना (ना - नी - नें ) [ मूल्यं वस्नोऽप्यवक्रयः (अमरद्वितीयकांड वैश्यवर्ग - ७९) वसत्यस्मिन्वस्तुप्राप्तिरिति । स्नतः वस्न = उस्न = उसन (ना - नी - नें ) ] पै उसनी घेणें = पै मूल्य घेणें. दूध उसनें घेणें = दूध मूल्य घेणें. दूध उसनें घेणें म्ह० दूध मूळ परत देण्याच्या इच्छेनें किंवा वायद्यानें आणणें. (भा. इ. १८३३)
उसवणें [ उत्सो ] *(शिवणें पहा)*
उसासणें [ उष् दाहे. ओषिष = उसास. ओषिषिषति = उसासणें ] अधणाचें पाणी उसासलें आहे म्ह. अति च अति तापलें आहे. (धा. सा. श.)
उसें [ उच्छीर्षक = ऊसीसं = उसँ = उसें] (ग्रंथमाला)
उस्तें [ उषस् = उस्तें ] Morning dawn.
उंहूं ! [ उहूः ! (दुःखदर्शक अव्यय) = उंहूं]

## ऊ

ऊ [ यूका ] *(उवा पहा)*
ऊज [ ऊर्ज् (स्त्रीलिंगी) = ऊज ] ऊज म्ह० तेज, शक्ति.
ऊठि [ अवशिष्टि, उच्छिष्टि remuant = ऊठि ] बाकी, अवशेष.
ऊत [ अव् to promote, animate = ऊति animation, exhilaration = ऊत ] animation, uncommon exhilaration.
उत् + तप् पासून निघालेला ऊत

floodover, overflooding शब्द निराळा.

ऊद [ उद्रः = उद्द = ऊद ]

ऊर १ [ उदर = उयर = ऊर. ऊर म्ह० पोट ] देवकीच्या उरीं कृष्ण झाला. (२) [ उरस् = ऊर; ऊर म्ह० छाती] ऊर बडविणें. (भा. इ. १८३५)

ऊरचा [ उरस्यः = ऊरचा ] माझा ऊरचा मुलगा = मदीयः उरस्यः पुत्रः

ऊरपूर (जेवतो) [ उदरपूरं भुक्ते = ऊरपूर जेवतो ]

उर्मट [ ऊर्मिमत् = ऊर्मट ]

ऊसकुट्या [ इक्षुकुट्टकः ऊंसकुट्टा इ. इ. उणादिसूत्र २०० भट्टोजी ] (भा. इ. १८३३)

## ऋ

ऋणको [ ऋणकामः ] *(धनको पहा)*

ऋषि [ ऋष् + इ. ऋष् धातूचा मूळार्थ rush असा आहे. ] दैवी स्फूर्ति झालेली प्रतिभावंत व्यक्ति असा ऋषि शब्दाचा अर्थ दहाव्या मंडळांतील "य कामये तमृषिं कृणो मि" या वाक्यांत आहे. (संशोधक त्रैमासिक वर्ष ५ अं. १)

## ए

ए [ अयि = अइ = ए (संभावनायां) ] ए बाई ! (भा. इ. १८३२)

एः [ एः = एः (आमंत्रणे, गऱ्हायां इ. इ.)]

एकक [ एककः = एकक; एकैक = एकेक. एकाकिन् = एकाकी ]

एकजम् [ ऐकद्यं = एकजम्, एकदम. एकपदं = एकदम् ]

एकजात [ एकजातीयः = एकजात. प्रकारवचने जातीयर् (५-३-६९) ] एकजात म्ह० एका च प्रकारचें.

एकजूट [ एकजुष्टं = एकजूट. जुष् ६ सेवने ]

एकटा [ एकस्थः = एकटा. द्विकस्थः = दुकटा ]

एकदम् १ [ एकपदम् = एकदम् (अकस्मात्) (तत्त्वबोधिनी)] तो एकदम आला म्ह० अकस्मात् आला. (भा. इ. १८३४) (२) [ ऐकध्यम् = (at once) = एकदम् ] (३) [ ऐकद्यं] *(एकजम् पहा)*

एकदम [ एकपदम् = एकअदम् = एकदम् (at once) (निपात)] (भा.इ. १८३३)

एकमेक [एक + म् + एक = एकेक] म् अक्षर प्राकृतांत येतें मध्येंच, तें मराठींत उतरलें आहे.

एकल [ एक + ल (स्वार्थक) (ला - ली - लें) ] (ज्ञा. अ. ९ पृ. १)

एकवटूनि [ एकवतित्वा (एकवत् पासून नामधातु) ] (ज्ञा. अ. ९)

एकसरा [ एकस्वरा ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६७)

एकाकी [ एकाकिन् ] *(एकक पहा)*

एकांगणें [ अगि गतौ - एकांगनं = एकांगणें] एकीकडे गति होणें, कलांडणें. (धा. सा. श.)

एकांडा [ एककांडः ] *(धातुकोश - हेंगाड पहा)*

एकी - एकी म्हणती काय जालें? असा प्रयोग मराठी पद्यांतून येतो. तेथें एके या संस्कृत अनेकवचनाचें एकी, येकी,

हें मराठी रूप आहे. (ग्रंथमाला)

एकेक [ एकैक ] *(एकक पहा)*

एकेरी (नाम) [ ऐकागारिका = एकाआरिआ = एकेरी ] एकागारिक चोर - एकेरी म्ह० चोराप्रमाणें अंगावर प्रसंगीं तुटून पडण्याचा स्वभाव.

एकेरी (विशेषण) [ एकप्रदर = एकेर (रा - री - रें) ] एकेरी धोतर म्ह० एकपदरी स्वभाव.

एकोपा १ [ एकात्मता = एकाप्पआ = एकापा = एकोपा ] (भा. इ. १८३४)
(२) [ ऐकात्म्य = एकोपा. त्म्य = प]

एटालें [ इष्टकालयं a brick-house = एटालें ] a brick house ] (चिति चेत्य)

उ. - ऐसें अभिचारा वेगलें ।
विपायें जें अवगले ।
ते टाकीति एटालें । पैशून्याचिं ॥
ज्ञा. १६-३९९

एडका [ इडिक्क a wild goat = एडका]

एणें [ एनेन (एन ची तृतीया) = एणें, येणें.
अनेन = आणें = याणें
लक्ष्मी + एनया = लक्ष्मीएनें
त् + एनेन = तेणें सीता + एनया = सीतेनें
त्य + अनेन = त्याणें, त्येणें सीता + अनया = सीतानें
राम + अनेन = रामानें लक्ष्मी + अनया = लक्ष्मीनें
य + एनेन = जेणें य + अनेन = जाणें, ज्याणें
क अन्य + अनेन = कोणें. ]

एथ [ अत्र ] (ज्ञा. अ. ९ पृ. ७)

ए म्हणे १ [ (एहि) मन् ] ए म्हणे.
(२) [ मन् ४ ज्ञाने. एहि मन्ये (प्रहासे) = ए म्हणे ] ए म्हणे ! टोणगा व्याला, अश्या हास्यकारक वाक्यांत ए म्हणे चा उपयोग करितात. (धा. सा. श.)

एरणी [ अरणी = एरणी (वनस्पति) ] (भा. इ. १८३७)

एरें [ इतराणि ] (ज्ञा. अ. ९ पृ. १०४)

एसण (णा - णी - णें ) [ इदृङ्निभ = एसणा suchlike ]

## ऐ

ऐक ! [ अतिगमय् (to patiently let pass, to wait) = अइक अँ = ऐकें = ऐके = ऐक ] wait, bepatient. क्षणभर ऐक म्ह. थांब.

ऐट, ऐटा १ [ अतिष्ठा = अइष्ठा = अइट्टा = ऐट. एटा = सर्वश्रेष्ठपणा ] *(धातुकोश - ऐट १ पहा)* ऐटा २ [ अट्टा ] *(धातुकोश - ऐट २ पहा)*
(३) [ अट्टा (उद्दाम वर्तन) = ऐटा ]
(४) [ अट्टा overbearing conduct = एटा ] मोनियर वुइल्यम् अट्टा या शब्दाचा अर्थ overbearing conduct असा प्रश्नचिन्ह करून भीत भीत च देतो. परंतु तसा त्याचा अर्थ आहे हें मराठी अर्थावरून स्पष्ट आहे. (भा. इ. १८३६)

ऐतोजी [ अतिति (ऋषिनाम, क्षत्रियनाम) = ऐतोजी - बा ]

ऐरणी [ अर्याणी = अयरणी = ऐरणी (पूजन) = अहिरणी (महीरणी) किंवा आचार्याणी = आयरणी = ऐरणी ]
मातुलानी = माउलाणी = मावळाणी = मावळाण = मावळण
मातुलः = माउळा = मावळा.

मातुली = माउली = मावली, माउली.

शक लोकांत मंद म्हणून एक वर्ण होता. त्या शब्दाचें स्त्रीलिंग मंदानी. mandane हा शब्द ग्रीक इतिहासकार जो Herodotus तो देतो. ही मंद लोकांची राणी, हिनें Kyrus ऊर्फ कुरुस्, पर्शु लोकांचा राजा, ह्याचा पराभव केला. ह्या पराभवांत कुरुस वारला.

शेटाणी हा शब्द इंद्राणी शब्दासारखा आहे. इंद्र, इंद्राणी; तसें शेट, शेटाणी. श्रेष्ठिन्चें स्त्रीलिंग श्रेष्ठिनी. त्याचें मराठी (सेट्टिणी) शेटिणी, शेटीण असें व्हावे व होतें. परंतु शेटाणी हें रूप कांहीं श्रेष्ठिनीपासून निर्वचतां येत नाहीं. हा आनी प्रत्यय संस्कृतांत तरी आला कोठून! वैदिक भाषेंत इंद्राणी हा शब्द आहे. वैदिक भाषेंत तरी हा प्रत्यय आला कोठून? हा पूर्ववैदिक स्त्रीलिंगाचा प्रत्यय आहे. महार्याणी = महीरणी. (भा. इ. १८३२)

ऐशी - तो आला म्हणजे त्याची ऐशी पूजा करतों = यदा स आयास्यति तदा तस्य अतिश्वीं पूजां करिष्ये. श्वानं अति अतिश्वी = कुत्र्याहून हि जास्त. ऐशी ह्या शब्दाचा ईदृशी या शब्दाशीं येथें कांहींएक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

ऐस (सा - सी - सें) [ अतिशय = ऐस (सा - सी - सें) ] ऐसा बडवला = अतिशयितं वधितः ऐशी दारू प्यालों = अतिशयितां मदिरां पीतवान्.

ऐस (सा - सी - से) [ अतिशयित greatly excessive = अइस (सा - सी - सें) ऐशी खोड काढली म्ह० अतिशयित खोड काढली. अतिश्वी lower than a dog. ऐशी फजिती. contempt lower than that shown to a dog.

ऐंसा [ अंजसा (शीघ्रे) = अंयसा = ऐंसा] तो ऐंसा पळाला = सः अंजसा पलायितः (भा. इ. १८३४)

ऐसीं [ इदृशानि किंवा एतादृशानि ] (ज्ञा. अ. ९ पृ.५)

## ओ

ओकणें [ आवच् = आऊक = ओक. आवचनं ओकणें ] बोलणें. (भा. इ. १८३४)

ओकल (ला - ली - लें) [ उक्त वच् निष्ठा + ल (स्वार्थक) = उक्क + ल = ओकल (ला - ली - लें) ] ओकला म्हणजे बोलला. तो काय काय ओकला? म्हणजे तो काय काय बोलला? (भा. इ. १८३४)

ओकसा बोकशी [ बुक्क् कुत्र्याप्रमाणें शब्द करणें ] *(भोकणें पहा)*

ओ का टो [ उ ११ शब्दे (आवाज करणें) + टः किंवा ठः (एक प्रकारचा आवाज) = ओ का टो ] अजून त्याला ओ का टो करतां येत नाहीं म्हणजे नीट शब्दही उच्चारतां येत नाहीं. (धा. सा. श.)

ओकारा [ गॄ ६ निगरणे. उद्गार = ओकारा; उद्गारिका = ओकारी. उद्गरणे वमने उद्गारः (अमरकोश) ] (धा. सा. श.)

ओकारी १ [ उद्गारिका ] *(ओकार पहा)* (२) [ अवक्रिया = ओकारी.

अवक्रिया नाम तिरस्कार ] मला त्या गोष्टीची ओकारी आली. (३) [ वमकारः - रिः = ओंकारी, ओकारी ] Making Vomiting

ओंकारी १ [ ओंकारिका = ओंकारी. ओंकार म्ह० कुरकुर करणें ] मला त्या माणसाची ओंकारी आली म्ह० त्याजबद्दल मी कुरकुर करूं लागलों. (२) [ वमूकारः - रिः ] (ओकारी ३ पहा)

ओकें १ [ ओख् १ शोषणे. ओख्यं = ओकें] नाक नथेवांचून ओकें दिसतें म्ह० शुष्क दिसतें. (धा. सा. श.) (२) [ अवमुक्त = taking off of garments, ornaments etc. ओकें = ओकें ] नाक ओकें दिसतें म्हणजे नथ काढून ठेवून नाक मोकळें दिसतें.

ओक्सावोक्षी, ओक्साबोक्षीं [ उक्ष् १ सेचने (आ + उक्ष्) ओक्ष् to sprinkle. ओक्षव्योक्षम् crying so as to sprinkle the chest with tears ] ओक्साबोक्षीं रडणें. (धा. सा. श.)

ओंगण, ओंगणें [ अंज् १० आप्यायने. अंज = ओंग. अंजनं = ओंगण, ओंगणें] ओंगणें म्ह० वंगण लावणें. (धा. सा. श.)

ओंगळ [ वि + अमंगल = व्यमंगल = ओंगळ ] *(धातुकोश - ओंगळ पहा)*

ओंगळवाणा [ अमंगलवर्णः = ओंगळवाणा]

ओंगाई [ उप + गै to sing to] आंगाई, ओंगाई बाळाची मंगाई.

ओचकारा १ [ अव + स्करः = ओचकारा] *(धातुकोश ओचकार २ पहा)* (२) [ व्रश्च् + कृ = ओचकारा] *(धातुकोश - ओचकार ३ पहा)*

ओचा १ [ उत्संगः = ओचा. स = च ] (२) [ उच्चय = उच्चअ = ओचा = ओंचा ] (ग्रंथमाला) (३) [ अवचय = ओचअ = ओचा ] अवचय म्ह० वस्त्राचा पायघोळ. ओचा खोवणें म्ह० पायघोळ वर बांधणें. (भा. इ. १८३३)

ओच्या [ आहोस्वित् = होच्चिअ = होच्या = ओच्या (निपात) ] (भा. इ. १८३४)

ओज [ ऊर्जा = ओज ] घराची ओज आंगण सांगतें.

ओजवणें [ ओज् १ सामर्थ्ये ] ती मुलगी ओजवत् चालली आहे म्ह० तिला तजेला येत चालला आहे. (धा. सा. श.)

ओंजळ १ [ उदञ्जलि (the hollow palms raised up) = ओंजळी, ओंजळ ] (२) [ अंजलि = ओंजळ] (स. मं.)

ओझरतें [ उपसरत् = ओझरतें ]

ओझें [ वाह्य = वज्झ = ओझ्झ = ओझं = ओझें ] (ग्रंथमाला)

ओटा १ [ उपष्टंभ = ओटा ] *(ओथंबा पहा)* (२) [ पोटः = ओटा. उपष्टंभः = ओटा ] (३) [ प्रकोष्ठः ] *(वोटा पहा)*

ओटी १ [ उधस् = ओढी = ओटी (बायकांची किंवा गाईची) ] (भा. इ. १८३४) (२) [ उपस्थ = उवट्ठ = ओट्ठ = ओठि = ओटी ] (स. मं.)

ओंठ [ ओष्ठ = ओठ = ओंठ ] (स. मं.)

ओटंगण [अवष्टंभन] *(ओठंबा पहा)*

ओटंबणें [ उत्तंभनं = ओठंबणें ] (भा. इ. १८३७)

ओटंबा [ अवष्टंभ (टेंकू) = ओठंबा. अवष्टंभन = ओठंगण ]

ओंडा [ उद्घनः = ओठा = ओडा = ओंडा. निधाय तक्ष्यते यत्र काष्टे काष्टं स उद्घनः । (अमरकोश) ] ज्या लांकडावर लांकूड ठेवून फोडलें जातें तें लांकूड म्हणजे ओंडा.

ओढ १ [ अवकर्ष = अउअढ = ओढ. अवकर्षक = अउअढअ = ओढा ] (ग्रंथमाला) (२) [ उदन्या (तृष्णा) = उडण्णा = ओढणी = ओढ ] पाण्याची ओढ लागली आहे, येथें ओढ शब्द उदन्या शब्दापासुन निघालेला आहे. (भा. इ. १८३४)

ओढगस्त १ [ उपधाग्रस्त (ना.) = ओढगस्त ] उपधा म्ह० खोटेपणा. त्यानें ग्रस्त जो तो. (भा. इ. १८३४) (२) [ अपकृष्टावस्था = ओढवस्त, ओढगस्त ] (३) अपकर्षग्रस्त = ओढग्रस्त = ओढगस्त. ग्रस् १ अदने ]

ओढणी [ उदन्या ] *(ओढ २ पहा)*

ओढल [ आकृष्ट = आउड्ढ = ओढ. ओढ + ल (स्वार्थक) = ओढल (ला - ली - लें) ] आवह् धातूपासून हि ओढल शब्द निघतो, परंतु त्याचा अर्थ निराळा. (भा. इ. १८३४)

ओढवस्त [ अपकृष्टावस्था ] *(ओढगस्त २ पहा)*

ओढा १ [ उद्ध्यः (a river) = ओढा ] (२) [ अवकर्षक ] *(ओढ १ पहा)* (३) [ व्यवधा (आच्छादन) = ओढा (औषधाचा) ] (४) [ उपधा (वर ठेवणें) = ओढा (औषधाचा) ] (भा. इ. १८३४)

ओढावणें [ उपधावन = ओढावणें ] जवळ येणें. (भा. इ. १८३४)

ओढाळ [ होड (a naughty child) = होडाळ = ओढाळ ] मन हें ओढाळ the mind is like a naughty child. ओढणें ह्या क्रियापदाशीं संबंध नाहीं.

ओणवणें [ उपनमन = ओणवणें ] (भा. इ. १८३४)

ओतारा, ओतारी [ अवतापयितृ one who heats mettles = ओतारा, ओतारी ] a founder.

ओथंबा [ उत् + स्तंभः = ओथंबा ] ओथंबा म्ह० वेलींना उभ्या करण्याची काठी.

ओप [ अव + पर्ण ]

ओपणें [ अर्पणं = ओप्पणँ = ओपणें ] (भा. इ. १८३२)

ओंफस [ पंपस् = वंफस = ओंफस. पंपस् दुःखे ] ओंफस झालें म्ह० दुःख झालें, काम दुखावलें, काम फसलें.

ओंबण [ उल्ब = ओब्ब = ओंबण, उल्बण असा शब्द असावा ] घराचें जें पांघरूण तें उल्ब. पोटांतील गर्भाचें जें वेष्टण तें उल्ब. गवताचें ओंबण म्ह. गवताचें पांघरूण घराकरितां. (भा. इ. १८३४)

ओंबी [ उम्बी = ओंबी ] गव्हाचें कणीस, गवताचें कणीस. (भा. इ. १८३४)

ओभड [ उद्बद्ध = उब्बड = ओबड = ओभड. प्रोद्बद्ध = फार ओभड ] उद्बद्ध म्ह. लठ्ठ, बेसुमार आकाराचा. वाग्भट - अष्टांगहृदय - अध्याय ३ - श्लोक ८९. (भा. इ. १८३४)

ओभड, धोभड [ उद्भट = उब्भड = ओभड. आवृत्तीने धोभड ] (ग्रंथमाला)

ओरपणें [ वल्भ् to eat, to devour ] *(वरपणें पहा)*

ओरफडा १ [ रंफ् १ गतौ - ओरंफः = ओरफा = ओरफडा (अल्पीभावदर्शक

ट = ड) ] (धा. सा. श.) (२) [ उद् + रंफ् ]

**ओरबडणें** [ व्रश्च् ६ छेदने वरीवृश्च्यते ] *(वोरबाडणें पहा)*

**ओलाणी** [ लब् १ अवस्रंसने. अवलंबिनी = ओलाणी ] दिव्या टांगण्याची दोरी, सांखळी. (धा. सा. श.)

**ओलें** [ उन्दी क्लेदने । उन्नं = ओलें. न चा ल होतो ] (धा. सा. श.)

**ओलें चिंब** [ आर्द्रं स्तिमितं = ओल्लँच्चिंयिअँ = ओलेंचिंब. स्तिम् ४ आर्द्रीभावे ] ओलें व चिंब या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच. वैपुल्यार्थक द्विरुक्ति.

**ओलेलें** [ आर्द्रार्द्रं = ओलेलें पतितपतितं = पडलेलें गतगतं = गेलेलें शुष्कशुष्कं = सुकलेलें मृतमृतं = मेलेलें पक्वपक्वं = पिकलेलें ] ज्वलितज्वलितं = जळलेलें.]

**ओवरी** [ अपवरक = ओवरअ = ओवरा = ओवरी.

अपसरक = ओसरअ = ओसरा = ओसरी] (ग्रंथमाला)

**ओंवळें** [ औमदुकूलं. औम (ताग, सण यांचें) ] *(सोंवळें २ पहा)*

**ओवा १** [ उपाय = उवाअ = ओवा ] ओव्यानें रोग जातो आहे तेथें मंत्र कशाला? असा प्रयोग मराठींत हरहमेश करितात. येथें ओव्यानें म्ह० औषधोपायानें. ओवा नामक तिक्त वनस्पतिबीजाचा येथें कांहींएक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४) (२) [ यवानः = ओवा ] (भा.इ. १८३४) (३) [ ओतुः = ओउ = ओवा (सुईचा टांचा) ] चोळीच्या बाहीला किती ओवे घेतले (४) [ ओतु (वै to weave) weft = ओतुक = ओवा ] stitch

**ओवाळ** [ उपालंभस्य = उयालह = ओवाळ (दोष दे) ] आपल्या कर्माला ओवाळ (अत्तणो जोवणं उवालह). (भा. इ. १८३२)

**ओवाळणें** [ वल् फिरविणें णिच्. उपवालनं = ओवाळणें ] दिवे ओवाळणें म्ह० तोंडाभोंवतीं फिरविणें. (धा. सा. श.)

**ओशट्** [ वषट् (अग्नींत टाकावयाचें आज्य) = ओशट् ] ओशट् म्ह० तुपट.

**ओशट, ओशेट** [ अवशिष्ट = ओशिट्ठ = ओशेट = ओशट ] (भा. इ. १८३२)

**ओस** [ अ + उषित = ओसिअ = ओस. अयस = ओस (निर्जन) ] (भा. इ. १८३४)

**ओसंग, ओसंगा** [ उत्संगः = ओसंग, ओसंगा ]

**ओसरणें** [ अवसरणं = ओसरणं = ओसरणँ = ओसरणें ] (ग्रंथमाला)

**ओसरी** [ अपसरक = ओसरअ = ओसरा = ओसरी ] *(ओवरी पहा)*

**ओसाड** [ सृज् ४ विसर्गे, उत्सृष्ट = ओसाड, उद्धरोत्सृजा = धरसोड, निसृष्ट = निसट ] (धा. सा. श.)

**ओसाणें** [ उत्सन्न decayed matter = ओसाणें ] कुजलेलें कसपट.

**ओहर** - नव्या नवरीला व नवऱ्याला कुळदेवतेच्या स्थानाला नेण्याची चाल महाराष्ट्रांत सार्वत्रिक आहे. वधूवर = वहूअर = वोहर = ओहर, अशा पायऱ्यांनी हा शब्द साधलेला आहे. ओहरें म्हणजे वधूवरांना कुळदेवतेला नेण्याचा सांप्रदाय. (सरस्वती मंदिर श्रावण १८२६)

**ओहोटी** [ अवमृष्टिः = ओहोटी ] *(धातुकोश - आहोट पहा)*

ओहोबाप [ वोढृवृप्तृ = ओहोबाप ] वराचा बाप.

ओहोमाय [ वोढृमाता = ओहोमाय ] वराची आई.

ओळ [ आवलि = ओळ ]

ओळख [ उल्लेख = ओळेख = ओळख (आठवण) ] वस्तुतः पूर्वगोष्टीची आठवण या अर्थी ओळख असा मूळ शब्द. परंतु अवलक्ष म्हणजे पहाणें या अर्थी जो ओळख शब्द आहे त्याच्यासारखाच ह्या ओळेख शब्दाचा उच्चार सध्यां मराठींत झालेला दिसतो. त्यानें सूर्य, गुरु, बुध हे तारे ओळखले म्हणजे चांगले स्पष्ट पाहिले. (भा. इ. १८३४)

ओळखून [ लक्ष् १० अङ्कने. उपलक्ष्य = ओळखून ] राज्ञा तु तत्फलं उपलक्ष्य तत्पारंपर्यं विचार्य । (सिंहासनद्वात्रिंशतिका) (धा. सा. श.)

ओळंबा [ वलंबः ] *(वळंबा पहा)*

ओळें [ अशुक्ल = असुकल = अहुअल = अउअळ = ओअळ, ओवळ, ओळ (ळा - ळी - ळें) ] अशुक्ल वस्त्र म्हणजे ओळें वस्त्र. मी इतक्या दिवस ह्या शब्दाचें व्युत्पन्न नानाप्रकारें करून पाहिलें; परंतु खरी व्युत्पत्ति सांपडावयाला हा काल लागला. (भा. इ. १८३४)

## औ

औट १ [ अध्युष्ट ] *(आउट पहा)*

(२) [ अर्धचतुर्थ = अर्धं च तत् चतुर्थं च, एक दोन तीन असे पदार्थ मोजून चवथा पदार्थ जो होता तो अर्धा होता. तेव्हां अर्ध चतुर्थ म्हणजे तीन आणि चवथा जो अर्ध तो म्हणजे औट. अर्धचतुर्थ = अद्धट्ट = अउट्ट = औट] अर्धचतुर्थी मात्रा (गोपथब्राह्मण - पूर्व - प्रथमप्रपाठक) = औटावी मात्रा, साडेतीन मात्रा. (भा. इ. १८३४)

औत [ आवप्त = आउत्त = आउत = औत] आउत म्हणजे पेरलेलें. त्यावरून पेरण्याचें यंत्र, क्रिया. आउताचा नांगर, आउताचा बैल, असा बोलण्याचा व्यवहार आहे. (भा. इ. १८३३)

औत, औति [ आहुति ] *(आउति पहा)*

औदसा [ अपसदा ] *(अवदसा पहा)*

औशीं [ आवसतिः ] *(आवशीं पहा)*

औंदा [ आइंदह् (फ़ारसी) ] *(यंदा पहा)*

औस [ उषस् ]

औळून [ आकुलीकृत्य = आउळून = औळून, आवळून ] नयने आकुलीकृत्य = डोळे औळून.

## क

कई [ कदाचित् = कयाँई = कई sometimes ]

कंकुष्ट [ काककुष्ट ] (भा. इ. १८३४)

कंगणी [ कंकणी ] अलंकार आहे.

कंगाल [ कंकालः ] कंकाल म्ह० हाडांचा सांपळा. कंगाल म्हणजे केवळ अस्थिचर्म राहिलेला माणूस.

कचकरा [ कचग्रहः ]

कचकावून [ कचक (ना.) ] *( धातुकोश - कचकाव २ पहा)*

कचक्या [ करीषंकषः वायुः (३-२-४२) = कचक्या वारा ]

कचमणें [ कश्मलं प्रबलो मोहः ।। कश्मल

= कसमल = कचमण ] मरणाऱ्याचा जीव कचमतो म्ह० प्रबळ मोह पावतो. (भा. इ. १८३४)

कचरा १ [ कच्वरं = कचरा (पु.) ] (भा. इ. १८३५) (२) [ मलीमसं तु मलिनं कच्चरं मलदूषितं । (अमरः) कच्चरक = कच्चरा = कचरा ] कचरा म्हणजे मळदूषित पदार्थ. [ भा. इ. १८३३ ] (३) [ कच्चरा (dirty वैजयंती कोश) = कचरा ] (४) [ कच्चरः = कचरा] कच्चर म्ह० नीच, टाकाऊ

कचून मारणें [ कच् बंधने. बांधून मारणें. कांचणें = बांधून करकोचा पाडणें. कांच = बंध ] (ग्रंथमाला)

कचोरा [ कर्चूरः ]

कच्चा १ [ कंसः (a coin) = कच्चा ] हिशेबांत कच्चे करतात - तेच पुरातन कंस. (२) [ कश्यः worthy of being beaten with a whip = कच्चा ] कच्चा चेला.

कच्चें [ कथ्य (खोटें) = कच्च = कच्चं = कच्चें = चा - ची ] (ग्रंथमाला)

कट [ क्वथः = कठ = कट (वरणाचा कट) ] वरान्नस्य क्वथः क्वाथः वा = वरणाचा कट.

कटकट [ कट् १ गतौ. कटकटिका = कटकट ] कटकटिका म्ह० कल्होळ.

कटकन्, कटदिनि *(चटकर पहा)*

कटमिती [ कृत्तमित्यक deduction of debt = कटमिती. अपमित्यक (मे - debt)] a transaction wherein a debt is deducted in proportion to payment.

कटवणी [ क्वाथपानीयं ] *(उकळींव २ पहा)*

कटाकटा [ (सं) कटकटा (घासण्याचा आवाज), कटकटा = कटाकटा ] (भा. इ. १८३३)

कटाकटा! [ कष्टं कष्टं = कटाकटा! (अव्यय) ] कटाकटा हा दुःखोद्गारवाचक शब्द मराठी काव्यांत येतो.

कटाकटी [ कष्टकष्टेन = कटाकटी ] with extreme difficulty.

कंटाळणें [ कठ् कृच्छ्रजीवने कठ = कट = कटाळणें, कंटाळणें (पीडित होणें) ] कटाळणें असा निरनुस्वार प्रयोग अशिष्ट करतात. (भा. इ. १८३३)

कट्टा (पक्का) [ कटखादक = कट्टा खादाड. कट म्हणजे अति, पुष्कळ (उत्कट) ] (भा. इ. १८३४)

कट्टा [ कट्ट to appear, to become manifest. कट्ट - (धातुसाधित) = कट्टा manifest ] कट्टा लुच्चा manifest liar.

कटुबाण [ कृष्टवाणिज्यं = कटुबाण ] नांगरलेल्या जमिनींतला वाणजिन्नस.

कटोरा १ [ कटोरा (पात्रविशेष) ] (२) [ कटकोलः = कटोरा (भांडे) ]

कट्यार [ कटीतल (एक प्रकारची तरवार) = कटीअर = कट्यार, कटीतर असेंही रूप असावें ] (भा. इ. १८३३)

कंठ [ कंठ = कंठ ] (स. मं.)

कंठणें [ कंठ् to remember with regret] आयुष्य कंठणें.

कंठणें, कठणें [ कठ् कृच्छ्रजीवने । कठन = कठणें, कंठणें ] (भा. इ. १८३३)

कंठनाळ [ कंठनाल = कंठनाळ ] (स. मं.)

कंठाळ १ [ कंथालिः ] (२) [ कंठतलासिका = कंठअल = कंठाळ. असिका हें पद गळालें ] (भा.

इ. १८३३)

कड [ कटि = कड ] (स. मं.)

कंड १ [ कड् मदे. कंडः = कंड ] (२) [ कडि मदे = कंडा = कंड ] कंड सुटणें म्ह० माद चढणें. (३) [ कंडूय्] (४) [ कंडू = कंड] (भा.इ. १८३४)

कडक १ [ कर्कर (hard) = कडक (र लोप) ] (भा. इ. १८३६) (२) [ कडुक = कडक. कडु कार्कश्ये] कडक म्ह० कर्कश. तो कडक मनुष्य आहे म्ह० कर्कश माणूस आहे.

कडकड [ कर्द् १ कुत्सिते शब्द. प्रकर्द = पकपक आवाज करणें. द्विरुक्ति = कडकड. वीज कडकडली. कर्दट = कडाड. वीज कडाडली ]

कडकडित १ [ कड् to separate, tear = काढणें ] चिरटोळा काढणें to tear a leaf. (२) [ क्वथ् = कडकडित पाणी boiling water ] (३) [ कड् to be rough कडकडित पापड rough पापड ] (४) [ कड् to be elated and intoxicated = कड्कडून भेटणें to warmly receive].

कडकडीत [ कड् १ मदे, वैक्लव्ये (द्वित) ] *(धातुकोश - कडकड ३ पहा)*

कडकडून [कड् ] *(कडकडित ४ पहा)*

कडकन् [ कड् १० भेदने ] *(धातुकोश - कडक ३ पहा)*

कडंगर [ (सं.) कडंकर किंवा कडंगर (पेंढा वगैरे) ] (भा. इ. १८३३)

कडगुलं [ कटक + (स्वार्थक) ल = कडगुल] कडगुल म्ह० लहानसें कडें.

कडदर - कडदोर - कडदोरा [ कटित्र = कडतर = कडदर - दोर = दोरा ] कटित्र म्हणजे कटीचें रक्षण करणारी वस्तु. (भा. इ. १८३४)

कडदोरा [ कटित्रं = कडितर = कडदर = कडदोरा ]

कडधान्य [ कृष्टधान्यं ]

कडबू [ करंभः = कडंबो = कडबू ] पक्वान्नविशेष.

कडबोळें [ कटकवलयं = कडअबळअँ = कडबोळें. अ = ओ ] हातांतील कड्याच्या वळ्यासारखा खाद्य पदार्थ.

कंडरा [ कंधरा = कंडरा (गळ्याचा दोरा)] कंधरा = कंडरा (मान) (भा. इ. १८३६)

कडवट [ कद् + वद् १ व्यक्तायां वाचि. कद्वदः = कडवट ] तो मुलगा कडवट आहे म्ह० कुत्सितभाषाक आहे. (धा. सा. श.)

कडा [ कटक = कडअ = कडा (डोंगराचा)] (भा. इ. १८३३)

कडाड [ कर्दट = कडाड ] वीज कडाडली *(कडकड पहा)*

कडाका [ कटाक्ष शब्दाचें प्राकृत कडक्ख, त्याचें मराठी कडाखा, कडाका] ज्या लावणींत किंवा पद्यांत कोणत्याहि विषयावर विशेष कटाक्षानें बोलणें असतें त्या लावणीला कडाख्याची लावणी म्हणतात. (स. मं)

कडियाळ [ कटकालयं = कडियाळ, कड्याळें (कडें) ornament]

कडी १ [ काष्टिका = काडी = कडी ] (२) [ कटिः = कडी, कड ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६४)

कडीपाट [ काष्टिकापट्टः ]

कडे [ कक्ष = कड = कडे (चतुर्थी, सप्तमी) कडून, कडचा, कडां ] (ग्रंथमाला)

कडें [ कडकं (वर्तुल) = कडअँ = कडँ =

कडें (सोन्यारुप्याचें वगैरे) ] (भा. इ. १८३३)
कडेपोट [ कटिप्रोथ = कडेपोट ]
कडेवर [ कटिः ककुद्मती श्रोणी नितंबश्च कटीरकं ॥ राजनिघंटुः ॥ कटीरक कटीकर (वर्णविपर्यास) = कडीअर = कडीवर, कडेवर. कटीरके गृह् = कडेवरी घे, कडेवर घे, येथें कडेवर ही सप्तमी आहे] कडेवर घेणें म्हणजे नितंबावर घेणें. (भा. इ. १८३७)
कडेसर, कडोसर [ कटिशीर्षक (hollow above the hips or loins वैजयंती कोश) = कडेसर ] कडस्रीला, कडोस्रीला सुपारी खोवणें.
कडोसी [ कटिवस्त्र ] कडोस्रीस पैसा = कटिवस्त्रे द्रव्यं.
कड्याळ [ कटकालयं ] *(कडियाळ पहा)*
कढकढीत [ क्वथ् १ निष्पाके (द्विरुक्त) ] *(धातुकोश कढकढ पहा)*
कढी [ क्वथिका = कढिआ = कढी ]
कणकण [ कण् शब्दे ] (ग्रंथमाला)
कणगा - गी - गें [ कणग्राहः = कणगा (धान्यसंग्रहाचें पात्र). कणग्राहिणी = कणगी. कणग्रहं = कणगें.]
कणगा [ कनकस्य अयं) कानकः = काणगा, कणगा ] कणगा म्ह० सुवर्णाची ठेव, कुणगा असा हि उच्चार आहे. (भा. इ. १८३६)
कणगुलें, कणगोली, कणगा [ कंडोलः = कणगोळा, कणगा, कणगुलें इ. इ. ]
कणवटी, कनवटी, कन्हवटी [ कटिपट्टिका = कडिवाटिआ = कडवटी = कणवटी = कनवटी = कन्होटी = कन्हवटी. ड = न ]
कणा [ कर्णक = कण्णअ = कणा ] (स. मं.)
कणीक १ [ कणिक (दळलेलें गव्हाचें पीठ = कणीक ] (भा. इ. १८३३) (२) [ कणिका (दळलेलें पीठ) = कणीक ]
कणीस १ [ कणिश (ear of corn वैजयंती) = कणीस ] (२) [ कणिसं सस्यशीर्षकं (हेमचंद्र - नि. शे.) ] (ग्रंथमाला)
कणेकड [ कर्णिकाकाष्टिका = कणेकड ] रहाटाच्या कण्याची कडी.
कण्हेर [ कर्णिकार = कणिआर = कण्हेर]
कंथडी [ कंथटिका = कंथडी (नाथ) वैजयंती कोश ]
कथील [ कस्तीर = कत्थिल = कथिल, कथील ] (भा. इ. १८३३)
कद १ [ कदक (छताचें कापड) = कदअ = कद ] (२) [ कदः (मेघ) = कद] मेघाच्या रंगासारखें निळें रेशमी वस्त्र.
कदरू [ कर्दयः = कदरू ]
कंदोरी [ कंदु + आहार्य = कंदोरी ] पक्व शिजविलेलें अन्न.
कद्रू [ कर्दयः कृपण (अमरः) कदर्यः = कदरो = कदरू = कद्रू ] कद्रू म्ह० कृपण. (भा. इ. १८३३)
कनवटी [ कटिपट्टिका = कडवटी = कनवटी ] कनवटीस रुपया = कटिपट्टिकायां रूप्यकः
कपट्या [ कर्पटिक = कपट्या ] जा रे कपट्या = याहि रे कर्पटक (भिकारी).
कपडालत्ता [ कर्पटलक्तकः = कपडालत्ता]
कपळा [ कपालः = कपळा (दाताचा). शातयत्यणुशो दंतात्कपालानि कपालिका. वाग्भट - उत्तरस्थान - अध्याय २१ ] (भा. इ. १८३४)

कपाळ [ कपाल = कपाळ ] (स. मं.)

कप्पा [ कल्पः = कप्पः = कप्पा ] (भा. इ. १८३६)

कफल्लक १ [ कफेलक (शुनकफेलक) = कफल्लक (लुच्चा) ] (२) [ कपालक] *(कभिन्न पहा)*

कबर १ [ कपर्द = कबर्र = कबर ] कबर व कदर्प दोन्ही शब्द संस्कृत कोशांत संस्कृत म्हणून दिलेले असतात; परंतु कबर हा कपर्द शब्दाचा अपभ्रंश स्पष्ट दिसतो. (२) [ कपिल = कपिर. ल = र. कपिर = कविर = कबिर = कबर (रा - री - रें) ] (भा. इ. १८३३)

कंबर [ कमर (फारसी) ] (स. मं.)

कबूतर [ कपोतक = कबूतर (र adventitious by the Persians ]

कभिन्न [ कपालक = कभल्लक (अर्धमागधी) = कफल्लक. कभल्ल = कभिल्ल = कभिन्न ] काळाकभिन्न म्ह० कापालिका. सारखा काळा (भा. इ. १८३२)

कमन [ कमनं = कमन, कमान ] कमन म्ह० वेळू. तिरकमट्याची कमन म्हणजे तिरकामट्याचा बांकदार वेळू.

कमर [ क्रम = करम = कमर (विपर्यय)] क्रमं बबंध = कमर बांधिली.

कमावणें [ कामय् = कामव = कमाव ] कमावणें म्ह० मिळवणें, पाहिजे असणें, हवें असणें. आयुः कामयमानेन = आयुष्य कमाविणाऱ्यानें. द्रव्यं कामयमानेन उद्योगः कर्तव्यः = द्रव्य कमावणाऱ्यानें उद्योग करावा. (भा. इ. १८३४)

कर (प्रत्यय) - नगरकर, पुणेंकर, इंदूरकर, वऱ्हाडकर, काश्मीरकर इ. इ. इ.

हा कर प्रत्यय कोठून आला? करणें या धातूपासून कर आला नाहीं हें निश्चित. आला म्हणावा, तर नगर करणारा तो नगरकर असा अर्थ होऊं लागेल. तो अनिष्ट. सबब, कर धातूपासून हा कर प्रत्यय आला नाहीं. हा कर प्रत्यय तेथें राहणारा या अर्थी आहे. संस्कृतांत असा प्रत्यय म्हणजे तास्थ्यार्थी प्रत्यय वुञ् होय. पाटलिपुत्रकः, कांपिल्यकः, नांदीपुरकः इ. इ. इ. ह्या वुञ् प्रत्ययापासून मराठी कर प्रत्यय आलेला आहे. वुञ् (क) च्या पुढें र मराठींत केवळ आगन्तुक आहे; परंतु तो महाराष्ट्रीद्वारा आला आहे. अस्मत्क, युष्मत्क यांबद्दल प्राकृतांत अम्हकेर, तुम्हकेर अशीं रूपें येतात. म्हणजे संस्कृत क बद्दल प्राकृत केर होतो. त्या केर चें मराठी कर. (सं.) पाटलिपुत्रक = (प्रा.) पाडलिपुत्तकेर = (म.) पाडलिपुत्रकर. नांदीपुरकः = नांदूरकेर = नांदूरकर. इ. इ. इ. (भा. इ. १८३३)

करकचून [ क्रकचायते ] *(धातुकोश - करकच पहा)*

करकर [ कर्करिका (बारीक खडा) = करकर ] भातांत करकर लागते म्ह० बारीक खडे लागतात.

करकरित [ कर्करित = करकरित ] कर्कर म्ह० स्वच्छ आरसा.

करकरीत [ कर्कर (कठिण) पासून निष्ठा कर्करित = करकरीत ] कोराकर्करीत = कोराकठीण. (भा. इ. १८३३)

करंगळी [ करांगुलि = करंगळी ] (स. मं.)

करगोटा [ करकग्रंथिः = करगोटा.

करकः = श्रोणी ]

कर जा [ कुर्याः ] *(करूं ये पहा)*

करटी [ करोटि = करोटी, करटी, करवंटी] नारळाची, डोक्याची वाटी, पात्रविशेष. (भा. इ. १८३४)

करडई [ करटिका = करडई ] करटः म्ह० कुसुंबा.

करडणें [ क्रथनं = करडणें ] (भा. इ. १८३४)

करडा १ [ करटः = करडा ] करटः म्ह० खाष्ट पुरुष. (२) [ करटः = करडा] करट म्ह० नीच जातीचा माणूस, नीच, दुष्ट, निर्दय. (३) [ करटक = करडा] करटक हें पंचतंत्रांत शृगालाचें नांव आहे. तें त्याच्या करड्या रंगावरून दिलेलें आहे. करटक म्ह० करडा हा शब्द पंचतंत्रकालीं करड्या रंगाला संस्कृतांत लावीत असें दिसतें. (४) [ कद्रु (tawny) = कडरु - करुड, करड (डा - डी - डें) ] करडा घोडा म्हणजे कद्रु रंगाचा घोडा. (भा. इ. १८३६)

करडुवा [ कारंडव = करडुवा (पक्षिविशेष)] (भा. इ. १८३६)

करणी १ [ अकरणि failure = करणी (अ लोप) ] करणी करणें म्हणजे failure आणणें कोणालाही मंत्रानें. (२) [ अकरणिः = करणी (अ लोप)] अकरणिः हा एक शापशब्द आहे. कथं अकरण्या न लज्जसे = ह्या करणीची तुला लाज कशी वाटत नाहीं. अकरणिः म्हणजे नाश, आंतपाय, ह्रास. त्यानें आपल्या भावाला करणी केली म्हणजे मंत्रादींनीं नाश केला.

करणें [ कल = कर ] कलयति धरित्रीं तृणसमां = पृथ्वीला तृणवत् करतो. तो मला तुछ करतो = स मां तुछं कलयति. तो मला मूर्ख करतो = स मां मूर्खं कलयति. (भा. इ. १८३४)

करणें (नखें) अयं नापिकः नखानि करोति = हा न्हावी चांगलीं नखें करतो, म्हणजे नखें काढतो. हा प्रकार मराठीनें संस्कृतांतून वंशपरंपरेनें घेतला आहे. (भा. इ. १८३५)

करतां [ कृते ] *(तां पहा)*

करताळ [ करतालिका = करताळ (वाद्यविशेष) ]

करतील जा [ कुर्युः ] *(करूं ये पहा)*

करतो बिरतो [ कुरुते विकुरुते = करतो बिरतो. विकृ = बिकर = बिअर = बिर इ. इ. ] बिरतो हा कांहीं तरी जोड शब्द नाहीं. करतो बिरतो म्हणजे बरें करतो वाईट करतो. (भा. इ. १८३४)

करपणें [ कृप् दौर्बल्ये, कर्पते, कृपयति. कृप् = करप ] माझें हृदय करपलें - मे हृदयं कर्पते. (भा. इ. १८३३)

करमर [ करमर्दिका = करमर (केयदेव - पथ्यापथ्यविबोध) ] (भा. इ. १८३४)

करवंटी [ करोटि ] *(करटी पहा)*

करवत [ क्रकचोऽस्त्री करपत्रं (अमर - द्वितीयकांड - शूद्रवर्ग ३५) करपत्र = करवत्त = करवत. क्रकच = करकच = करकोचा. क्रपत्र = करपत्र (?) ] (भा. इ. १८३३)

करळी [ करालिता(fringed with) करालि = करळी ] धोत्राची करळी म्हणजे धोत्राची दशा.

करा जा [ कुर्यात् ] *(करूं ये पहा)*

करि [ करि हि ] *(येइ पहा)*

करी [ करीहि ] *(एई पहा)*

करील जा [ कुर्यात् ] *(करूं ये पहा)*

करीवँ [ कुत्रिम = करीवँ ]

करूं या [ कुर्याम ] *(करूं ये पहा)*
करूं ये [ कुर्याम्. करूं ये = कुर्याम्, होऊये
करूं या = कुर्याम, होऊं या
कर जा = कुर्याः व्हा जा
करा जा = कुर्यात् व्हा जा
करील जा = कुर्यात् होईल जा
करतील जा = कुर्युः होतील जा ]
करोटी [ करोटि ] *(करटी पहा)*
करोल १ [ क्रूर = करूर = करोर = करोल ] करोल म्हणजे क्रूरकर्मा, साहसी, त्याचा कोठा करोल आहे, पांच शेर दूध पचवितो = तस्य कोष्ठः क्रूरः, पंच पलान् पयसः पाचयति । (भा. इ. १८३४) (२) [ करवालिन् = करोली = करोल ] करोल म्हणजे तरवार जवळ असलेला, शस्त्रास्त्रयुक्त. पांचशें करोल शिपाई म्हणजे शस्त्रास्त्रयुक्त शिपाई.
कर्णफूल [ कर्णोत्पल = कर्णफूल. र्णो चा ओ प च्या फ ला ऊ होऊन लागला. ]
कर्णोकर्णी [ कर्णाकर्णि (अव्यय) = कर्णोकर्णी (अव्यय व विशेषण) ]
कर्तब [ कलतात्म्य = करतव = करतब] करतब म्हo स्वरमाधुर्य.
कऱ्ह (ऱ्हा - ऱ्ही - ऱ्हें) [ (हत्तीण) करेणु = कऱ्हें (उंट) ] हत्तीचा वाचक शब्द उंटाला लावूं लागेल. कदाचित्, पूर्वी हा शब्द दोन्हींला लावीत असतील. (भा. इ. १८३२)
कऱ्हा - ऱ्हें [ करभः - करहः = कऱ्हा, कऱ्हें (उंट) ] उष्ट्रः क्रमेलको धूम्रः करभः दीर्घमार्गगः ॥ कऱ्हा, कऱ्हें हे उंटवाचक शब्द जुन्या मराठींत फार येतात. (भा. इ. १८३७)
कलकल, कलकलाट [ कल्लकल्लः ] (धातुकोश - कलकल पहा)
कलगी [ कलिंगी = कलगी (स्त्रीविषय लावणी) ]
कलडणें, कलंडणें, कलथणें, कलथनें [ क्लथ (उलटें फिरविणें) = कलथ. क्लथनं = कलथणें, कलथनें, कलंडणें, कलडणें ] (भा. इ. १८३४)
कलनी [ कल् १० संख्याने (मोजणें) कलनी = कलनी (मोजणी, एक, दोन, तीन अशी) ] (धा. सा. श.)
कलागत [ कलहगतिः = कलागत ]
कलाबूत [ कालाभृतं = कलाबूत ] कलाभृत् म्हo कलावंत. कलाभृतानें विणलेलें वस्त्र तें कलाबूत.
कलाल १ [ कल्लपाल (सीयडोणी शिलालेख) = कल्लवाल = कल्लआल = कलाल ] (भा. इ. १८३२) (२) [ कल्कपालः = कलाल ] (३) [ कल्यापालः = कलाल ] कल्या spirituous liguear.
कल्ला १ [ कलापः = कल्ला ] गालावरील मिशांचा जुडगा. (२) [ कल्ला (फारसी) ] (सं. मं.)
कल्होळ १ [ कल्लोल = कल्होळ ] (२) [ कोलाहल = कोल्हाल = कल्होळ]
कव [ क्रम = कव (spring)]
कँव [ क्रम = कंव ] क्रमं बबंध = कंव बांधली (तयारी केली)
कवचा [ कवचक = कवचा ] कवचा म्हo बाहेरील पातळ तुकडा. (भा. इ. १८३४)
कवटी [ करोटी = कवोटी = कवटी ] (सं. मं.)
कवठ [ कपिथ्थ = कविठ्ठ = कवीठ = कवठ ] (ग्रंथमाला)
कवडा १ [कापटिकः = कवडा

(deceitful)] तो मोठा कवडा आहे म्ह० लुच्चा आहे. (२) [ कपटक = कवडअ = कवडा ] (ग्रंथमाला) (३) [ कपोतः ] (कवोडा पहा)

कवडी [ कौमुदी = कोवुडी = कवडी ] दह्याची कवडी = दध्नः कौमुदी.

कवणु १ [ क:नु = कवणु ] (भा. इ. १८३३) (२) [ कः अन्यः = कवणुः; क:नु = कोणु, कवणु ] (ज्ञा. अ. ९)

कवला [ कलायः = कलावा = कवला ] कवला म्ह० एका प्रकारचें द्विदल धान्य.

कवलार १ [ कपालगृहं = कवलार ] कपाल म्ह० झांकण, मातीच्या भाजलेल्या तुकड्यांचें झांकण. (२) [ कवलागार = कवलार ] कवलानें शाकारलेलें घर. *(धवलार पहा)*

कवळी १ [ कवलिः = कवळी ] पानांची कवळी. (२) [ क्रोडा (भुजांतरं) = कोला = कौळी = कवळी ] कवळी भर लांकडांची मोळी म्ह. भुजान्तरांत मावणारी लांकडांची मोळी. (३) [ कवली = कवळी (दांतांची) ] (स. मं.)

कवोडा [ कपोतः dove = कवोडा, कवडा]

कसकन् [ कष् १ हिंसार्थः ] *(धातुकोश - कसास पहा)*

कसच (चा - ची - चें) [ कद्यच् turned towards what? = कसच (चा = ची = चें) turned towards what? तो कसचा येतो wondering he comes turned as he is towards something else. कसचें काय आणि कसचें काय?

कसचँ [ कथंचन with great difficulty = कसचँ थ = स] तो कसचा येतो he may come with great difficulty. It will be greatly difficult for him to come.

कसणें [ कस् गतौ ] कसून काम करणारा = मुद्दाम जाऊन काम करणारा. (ग्रंथमाला)

कसवटी [ कषपट्टिका ] *(कसोटी पहा)*

कसुराई [ कुसृति ] *(कुसुर पहा)*

कसूर १ [ कुसृतिः = कुसूर (cheating, fraudulence) कौसृतिकः = कुसुऱ्या. कसर (फारसी शब्द) निराळा ] (२) [ कुसृति ] (कुसूर पहा)

कसेंबसें [ कीदृग्द्वयसं = कइसंबइसं = कसेंबसें. कीदृग् एव कीदृग्द्वयसं । असेंबसें = ईदृग्द्वयसं । ] तो असाबसा मनुष्य नाहीं म्हणजे असा च मनुष्य नाहीं.

कसोटी [ कषपट्टिका = कसवट्टिआ = कसवटी, कसोटी ]

कहारी [ खारी (a coin) = कहारी. लोहिताखारी = लारी a coin in the cokans (कोंकण) ]

कहाळ, कहाळा [ कहाला horn for blowing formed like the धत्तूर flower (वैजयंती) = कहाळ, कहाळा]

कळ [ कलिः = कळ. कल् शब्दे ] कळ वाजली म्हणजे शब्द ज्यांतून होतो तें यंत्र वाजलें.

कळ (भांडण) [ कलह = कळा = कळ. कलि = कळ ]

कळक [ (कट = बांबू) कटक = कडक = कळक. कटकी = कळकी ]

कळकळित [ कल week, - crude =

कळकळित ] weak water.

कळप [ कलापः = कळप ] कळप म्ह० समूह. (भा. इ. १८३४)

कळमणें [ क्लमनं ] *(कळमळणें पहा)*

कळमळ [ क्लामम्लानि = कळमळ (स्त्री) ] (भा. इ. १८३४)

कळमळणें [ क्लम् = कळम. क्लमनं = कळमणें. क्लम् + म्लै = कळमळणें ] अहं क्लाम्यामि = म्लामि = मी कळमळतों. मला कळमळतें = मया क्लम्यते म्लायते. (भा. इ. १८३४)

कळलाव्या [ लप् १ व्यक्तायांवाचि. कलहालापकः = कळलावा = कळलाव्या] कळलाव्या म्ह० कलह लावून देणारा. (धा. सा. श.)

कळवळणें [ क्लवनं = कळवळणें. दुसरा ळ आगंतुक ] (भा. इ. १८३४)

कळवी [ कलंबी = कळंबी = कळवी (शाकविशेष) (अनुस्वार लोप) ] (भा. इ. १८३६)

कळशी [ कलशिः = कळशी. दृतिकुक्षिकलशि ]

कळसूत, कळसूत्र [ कल्पसूत्रं = कळसूत्र, कळसूत ]

कळा [ M. कलापः tail, ornament वैजयंती = कळा ] मुगुटाचा कळा M.

कां १ [ कामं (अकामानुमतौ) = कां ] येस ना कां = आगमिष्यसि नाम कामं. (२) [ कम् (enclitic)= का ] येइ ना का = आयातु नाम कम् may he come. (३) [ कामं = कावँ = काअँ = काँ ] बरें तें काँ होईना = वरं तत् कामं भवतु नाम. (भा. इ. १८३३) (४) [ किंवा = कँवा = कँआ = काँ = कां ] (ज्ञा. अ. ९ पृ ८.) (५) [ किल चा अपभ्रंश ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३०)

काइ [ किं = कांहीं, काइ. (अकच्क) ककिम् = कांहींक, कांहींएक. ककिमपि = कांहींएक = कांहींएक हि.] (ज्ञा. अ. ९पृ. ६६)

काँइ [ किमिति = काँ इइ = काँइ = काय (why) ] (भा. इ. १८३३)

काऊ [ काकः = काऊ ]

काकडआर्ती [कर्कटआरतिः= काकडआरती]

काकडशिंगी [ कर्कटशृंगी = काकडशिंगी ] (भा. इ. १८३७)

काकडा [ कर्कटः (अग्नि) = काकडा ]

कांकडा [ कंकटः = कांकडा ]

काकण १ [ काकिणी (a coin) = काकण F.] काकणभर by a much as a coin (२) [ काकणी (a coin) - काकण F. ( a small insignificant coin) कंकण = कांकण N. ] (३) [ काकिणी (दमडी = २० कवड्या) = काकण ] तो त्याच्याहून काकणभर ज्यास्त च द्वाड भरेल, येथें काकण म्हणजे क्षुद्र लहान नाणें. कंकण शब्दाशीं संबंध नाहीं.

काकण, काकणी [ काकणी ( a cowrie वैजयंती) = काकण ] काकणभर = काकणीं परि. कंकण = कांकण a different word.

काकळुकी [ काकरुक (दरिद्री, भित्रा) = काकलुक = काकळुक. काकळुकपासून नाम काकळुकी ] काकळुकीचें दुसरें रूप काकुळती. तो काकळुकीस किंवा काकुळतीस आला म्हणजे तो भिऊन किंवा दमून किंवा हरून गयावया करूं लागला. (भा. इ. १८३३)

काकळुती [ काकुरुति = काकळूत. काकरूकता = काकळुती ] काकरूक. म्ह० दीन, भित्रा, पंगू. काकळुती म्ह० दैन्य, पंगूपणा.

काकाजी [ कृतकार्यः = कअकज्जो = काकाजी ] तो काय मोठा काकाजी लागला आहे = स किं महान् कृतकार्यो वर्तते?

कांकी [ किं किल = कॉं किर = कॉं कीं (the reason why) ] (भा. इ. १८३३)

काख [ कक्षा = काख ] (स. मं.)

काखी [ काषाय = काखाइ = काखी. ] काखी म्ह० काळा तांबूस रंगाचा. (भा.इ. १८३३)

काखोटी [ कक्षुपटी ] *(खाकोटी पहा)*

कागद [ कार्पास = काप्पास = कव्वाज = काआज = कागाज = कागज = कागद (मराठी) ] (संशोधक वर्ष १, अंक ३)

कागदी [ वाईट रोग तो कागदः । कागदः यस्य अस्तीति कागदी ] कागदी जवान म्ह० कागदी युवा. (भा. इ. १८३४)

कॉं गा [ किं अंग = कॉं गा ] wherefore then? (भा. इ. १८३३)

कागाळी १ [ काकलीकः (a sweet tone) = कागाळी ] a complent against (२) [ कागालि bad cursing = कागाळी ]

कांगो वाहमणी [ कानून गोय = कायदा सांगणारा गांवचा अधिकारी. कानून + गोय = कानूनगोय = कानगो = कांगो] (ग्रंथमाला)

काच १ [ कच् बंधने = काच (जाच) ] काच म्ह० चोहोंकडून अटकाव करणें. (भा. इ. १८३७) (२) [ काचन = काचणें. कच् बांधणें, जखडणें ]

कांच, कांचणें [ *कचून मारणें पहा* ]

काचा [ काक्ष्यः = काच्या, काचा (कमरेस बांधण्याचा). कचकः = काचा (कच् to bind) ]

कांचोळी १ [ कंचुलिका = कांचोळी ] (२) [ कंचूली = कॉंचोळी ] वस्त्रविशेष. (भा. इ. १८३३)

कॉंच्या [ कंचुकः (चोळणा) = कॉंचुआ = कांच्या ] (भा. इ. १८३३)

काजवा १ [ खद्योत (fire-fly) = कज्जोअ = काजोवा = काजवा. द्युत् १ दीप्तौ ] (२) [ कायोद्योतः = काओज्जोआ = काजोवा = काजुवा = काजवा ] शरीरांतुन उज्जेड पाडतो तो किडा.

काट (देणें) [ कात् (कृ) अपमान करणें. कात् (निपात). कात् = काट ] काट देणें म्ह. ओळख तोडणें, अपमान करणें. मी त्याला काट दिला म्हणजे त्याचा अपमान केला. (भा. इ. १८३३)

काटकळ [ काष्ठकल्प = काटकळ ]

कांटा [ कंटकितं = कांटें. कंटकः = कांटा (शहारा) ]

कांटार [ कांतारं = कांटार - रें ] वेळूचें कांटार म्ह० वेळूचें बन.

कांटारें [ कांतारं = कांटारें, कांटारी ] कंटकादि उपद्रवयुक्तं वर्त्म कांतारं.

काटुकडें [ काष्टकिष्टं ] *(मरतुकडें पहा)*

कांटे [ कंटकितं ] *(कांटा पहा)*

कांटेतोल [ कंटकतोल्यं खादनं = कांटेतोल खाणें. (कृत्यैः अधिकार्थवचने २-१-३३ पाणिनी) ] कांट्यानें तोलून खाण्याइतकें नाजूक.

कांटेमोड [ कांटकमर्दनिका an act in

which there is much running through thorns etc. = कांटेमोड F.] ही कांटेमोड नको, सरळ रस्ता बरा.

कांटेरान [ कंटकारण्यं = कांटेरान ]

काठखुठ [ काष्ठकुट्ट = काठखुठ, काठखुट (भा. इ. १८३३)

काडकन् [ कड् १० भेदने ] *(धातुकोश कडक ३ पहा)*

काडवात, काडसूत [ करसूत्रं = कडसूत = काडसूत. करवर्तिका = कडवात = काडवात ] केवळ हाताच्या बोटांनी बनविलेल्या कापसाच्या वाती.

काडी मोडणें [ मुट् १० संचूर्णने (दार) कारिमोटनं = काडी मोडणें. कार्यं = कारिः. दारकार्यं, दारकारिः म्हणजे लग्न, बायको करणें. (लग्न) कारिमोटनं = काडी मोडणें ] काडी मोडणें म्हणजे केलेलें लग्न मोडणें. कां त्वं कारिकां क्रियां कृत्यां कृतिं वाकार्षीः। (धा. सा.श.)

कांडेचोर [ खंडचौरः = खांडेचोर = कांडेचोर ] कांडेचोर म्ह. गूळ चोरून खाणारा प्राणी, ऊद. खंड, खंडिका म्हo गूळ.

काढ [ कड् ] *(कडकडित पहा)*

काढणें [ कृष् = काढ ] पुरा संवत्सराद् आर्तिं आकृष्यसि = पुरें वर्ष दुःख काढशील. मीं वर्षभर ताप काढला, वगैरे वाक्यांतील दुःख काढणें, ताप काढणें हा संप्रदाय वैदिक कालापासून आहे. (भा.इ. १८३४)

काढणें (तुझें) [ क्राथनं = काढणें ] थांब, तुझें काढतों = स्तभ्यस्व, तव क्राथयामि = संस्कृतांत षष्ठि, सबब मराठींत षष्ठि. (भा. इ. १८३४)

कांढर [ कंधरा (ग्रीवा) = कांढर = कांढरा]

काढानिकाढा [ क्वाथः निक्वाथः = काढानिकाढा ] *(उकळींव २ पहा)*

काढून लावणें [ क्राथयित्वा लापयते = काढून लावतो (हकालतो). लापयते is defeated]

काणेली [ कन्या = कण्णा = काणा = काणेली ] काणेलीमातर् म्हo तो ज्याची आई कन्या आहे. (भा. इ. १८३२)

कात [ कर्त् १० शैथिल्ये. कर्तय = कात] (धा. सा. श.)

कात (सापाची) १ [ कृत्ति = कत्ति = काति = कात ] डें - डी प्रत्यय लागून कातडें - डी. (भा. इ. १८३२) (२) [ कृत्ति = कत्ती = कांती = कात (स्त्रीलिंगी) ] कृत्ति शब्दाचा मूळ अर्थ कातडें कोणत्याहि जनावराचें. मराठींत साप वगैरे प्राण्यांच्या कातड्याला कात म्हणतात. (ग्रंथमाला)

कांतडें [ कृत्ति = कात्ति = कात = कातडें = कांतडें ] (स. मं.)

कातकरी [ कात्कृ to insult कात्करिः = कातकरी ] a low tribe of savages to be insulted unceremoniously.

कातर [ कत्र् १० शैथिल्ये. कत्रय = कातर] (धा. सा. श.)

काथवट [ काष्टपात्र, काष्टपात्री = काथवट, काठवट ]

कांदळ १ [ कंदर (गुहांतील मूर्ति) = कांदळ] महाराष्ट्रांत मोडक्या देवळांच्या पुढें हे दगड असतात. यांवर लिंग व त्याचे उपासक कोरलेले असतात. (२) [ कंदल = कांदळ ] महाराष्ट्रांत

जुन्या देवालयांभोंवतीं लढाईचीं चित्रें दगडावर कोरून मांडलेलीं असतात. त्या दगडी चित्रांना कांदळाचे दगड म्हणतात. हीं चित्रें वीर, सती, घोडेस्वार, भालेवाले इत्यादींचीं असतात. कंदल म्ह० लढाई, कांदळ म्ह० लढाईसंबंधीं.

कांदा (अकलेचा) [ कंद = कॉंदा. कंद म्ह० गड्डा ] (भा. इ. १८३४)

कान [ कर्ण्ण = कान ] (स. मं.)

कानकीट [ कर्णकिट्ट = कानकीट (कानांतला मळ) ] (भा. इ. १८३६)

कानकुडें [ कर्णकुंडलं = कण्णकुड्डळ = कानकुडें ] (भा. इ. १८३४)

कानटाळ [ कर्णताळ = कण्णटाल = कानटाळ ] (भा. इ. १८३६)

कानड (डा - डी - डें) [ कर्णकटु = कण्णअड्डु = काणाड्डु = कानाड = कानड (डा - डी - डें) ] कानडें म्हणजे कर्णकटु. (भा. इ. १८३६)

कानपिडा [ पीड् १० क्लेशे. पीड = पीळ. कर्णपीडकः = कानपिडा (मेव्हणा) (लग्नाच्या वेळीं मेव्हणे कान पिळतात)] (धा. सा. श.)

कानपुड, कानपुडी [ कर्णपुट-टी = कानपुड = कानपुड-डी ] (भा. इ. १८३६)

कानफाट्या १ [ कांडपृष्ठः = कानफाट्या. one who leaves his family and joins another वैजयंती] नांव कानफाट्या पडलें! (२) [ कांडस्पृष्टः a low vile fellow = कानफाट्या ] a torm of reproach. एकदां कानफाट्या नांव पडलें म्हणजे आटोपलें. (३) [ कांडपृष्टः = कानपाट्या = कानफाट्या ] क्रांडपृष्ट म्ह० शस्त्रोपजीवी हिंस्र मनुष्य, जातिभ्रष्ट, कानफाट्या म्ह० बेलगाम माणूस.

कानवेढें [ वेष्ट् १ वेष्टने. कर्णवेष्टकं = कानवेढें (अलंकार विशेष) ] (धा. सा. श.)

कानशील १ [ कर्णशिरस् = कानशील. शिरस् = शिल (मागधी)] कानशिलांत मारली म्ह० he struck on the head near the ears. (२) [कर्णशिरस् = कण्णशील = कानशील] (स. मं.) (३) [ कर्णशिरस् कानशील the part of the head near the ear = कानशील ] कानशिलांत मारणें म्ह० कानाच्या जवळच्या भागावर मारणें. (४) [ कर्णशष्कुली ] *(कानसूल पहा)*

कानसूल [ कर्णशष्कुली = कानसुल = कानशील. उ. = इ. कर्णशष्कुली म्ह० कानाचा बहिर्भाग. ] कानसुलांत मारली म्ह० कानाच्या पाळीवर आघात केला.

कानांत सांगणें [ कर्णांतिकं = कानांत ]

कानीं येणें, कानीं लागणें [ कर्णे लगति = कानीं लागणें. कर्णं आगम् = कानीं येणें]

काप [ कल्पः = कप्पा = काप ] काप म्ह० कापलेले तुकडे काकडी वगैरेंचे.

कापर ( रा - री - रें) [कंप् १ कंपने चलने. कंप्र = कांपर (रा - री - रें) ] (धा. सा. श.)

कांपर ( रा - री - रें) [ कंप्र = कांपर (रा - री - रें) ]

कापशी [ कर्पासी = कपाशी. कार्पासी = कापशी. आ = अ ]

काफर [ खर्पर (लुच्चा) = खापर = काफर (लुच्चा, चोर) ] (भा. इ. १८३६)

कांब [ कंविः (spoon) = कांब ]
कांब [ कंबि branch of बांबू = कांब, कांबीट a splinte of बांबू ]
कांबळ [ कंबल = कांबळ ] कंबल म्ह० बैलाच्या मानेखालील पोळी. मराठींत तिला कांबळ म्हणतात.
कांबळ्या [ कांबलिकः = कांबळ्या ] कांबळ्या म्ह० घोंगड्या.
काबाडकष्ट [ कर्वतकष्ट = कब्बटकष्ट = काबाडकष्ट ] (भा. इ. १८३२)
कांबीट [ कंबि ] *(कांब पहा)*
काबू १ [ कंबूः a thief, a mean fellow] (२) [ कंबुक a mean fellow ] (३) [ कामुक - की = कावुअ = काबू (मतलबी) द्याश्रयमहाकाव्य-४-५१ ] (४) [ कमेर्बुक् (उणादि ९८) कंबूः परद्रव्यापहारी. कंबू = कॉंबू = काबू ] तो मोठा काबू आहे म्ह० परद्रव्यापहारी आहे. (भा. इ. १८३३)
कामकरी १ [ कर्मकरः = कामकर - री (मजूर) ] (भा. इ. १८३३, १८३६) (२) [ कर्मकरः = कामकरी. भृत्याजीवः ] (भा. इ. १८३४)
कामगार १ [ कर्मकारः = कामगार (शिल्पी, वरिष्ठ प्रतीचा मजूर) ] (भा. इ. १८३३, १८३६) (२) [ कर्मकारः = कामगार. विना भृतिं कर्मसंपादकः (क्षीरस्वामी - अमर)] (भा. इ. १८३४)
कामसू [ कर्मशूर = कामसूअ = कामसू (र = अ) ] काम करण्यांत पटाईत. मुलगी कामसू आहे म्ह० मोठी मेहनती आहे. (भा. इ. १८३४, १८३६)
कामाटी १ [ कर्मयष्टिं = कामाटी (लेखनकामासाटी - एकनाथ) ] (भा. इ. १८३४) (२) [ कर्मवाटी (चांदण्याचा दिवस) = कामाटी ]

लेखनकामाटी पूर्ण जाली म्हणजे लेखनरूप चांदण्याचा दिवस पूर्ण जाला म्हणजे तो चांदण्याचा दिवस वाढत वाढत पूर्णिमेप्रत प्राप्त झाला. लेखन शब्दावरहि श्लेष आहे. लेखा किंवा लेखन म्ह० चंद्राची कला. तसेंच लेखन किंवा लेखा म्हणजे लिहिणें. कामाटी शब्दांत हि श्लेष आहे. कामाटी म्ह० काबाडकष्ट व चांदण्याचा दिवस.

कॉंय [ किमिति ] *(कॉंइ पहा)*
कायकिर !, कायकिरे ! [ किंकिल! what a pity! = कायकिर ! कायकिरे! ] कायकिर कोठें गेला न कळे what a pity! don't know where gone.
कायकीं [ किंकिल = कायकी ] किंकिल शूद्रान्नं भोक्ष्यसे = शूद्राचें अन्न खाशील कायकी!
कारट (टा - टी - टें) १ [ कृतकः एव कार्तकः . कार्तकः = कारटअ = कारटा. कार्तकी = कारटी. कार्तकं = कारटें ] मानीव पुत्र तो कृतक - निंदार्थी मराठींत कारटा. (भा. इ. १८३४) (२) [ करट = कारट (ब्राह्मणब्रुव) टा - टें - टी. ] (स. मं.)
कारटा १ [ एकादशादिश्राद्धे करटः । (अमरकोशटीका)करटं एकादशादिश्राद्धं करोतीति कारटः । कारटः = कारटा ] स्मशानांतील कारटा. (२) [ (संस्कृत) करटः म्ह० अकराव्या दिवसाचें भोजन. त्या भोजनाला जाणारा तो कारटा ] (भा. इ. १८३६) (३) [ करटो वाद्यभांडकुविप्रयोः (त्रि. शे.). करट = कारट = कारटें - टा - टी ]

(ग्रंथमाला)

कारटीचिरटी [ करंटीचिरंटी = कारटीचिरटी ] (भा. इ. १८३३)

कारण [ करणं = कारण (करण म्ह० व्रतबंधादि कार्य) ] आमच्या घरीं कारण निघालें म्ह० व्रतबंधादि कार्य निघालें.

कारभार [ कार्यभारः = कारभार ] कारबार ह्या फारशी शब्दाशीं कांहींएक संबंध नाहीं. स्वतः कारबार हा शब्द संस्कृत कार्यभार ह्या शब्दापासुन निघालेला आहे. कारभार हा शब्द नामयाच्या जनीच्या अभंगांत येतो. (भा. इ. १८३४)

कारली [ कारवल्ली = कारली ] (भा. इ. १८३७)

कारवई [ कार्मता ] *(कारवाई १ पहा)*

कारवाई १ [ कार्मता = कार्वई = कार्वाई. कार्मः कर्मशीलः (अमर) ] (भा. इ. १८३४) (२) [ कार्यवाहकता = कारवाई ] skillful management.

काल १ [ कल्य = कल्ल = काल ] *(आज पहा)* (२) [ कल्लि = काल (आजच्या पाठीमागील दिवशीं) ] (भा. इ. १८३६)

कालथा [ क्लथकः = कालथा ] (भा. इ. १८३४)

कालवड [ कलभटी = कलहडी = कलअडी = कलवडी = कालवड. येथें ल चा ळ झाला नाहीं ] (भा. इ. १८३२)

कालवण [ कल्यपानं, कल्यपानीयं = कालवण. कल् १० क्षेपे; पा १ पाने ] न्याहारी सोबत पातळ पदार्थ. (धा. सा. श.)

काला [ कल्यः - काला ] काला म्ह० सकाळचा फराळ. उत्सवांत उपासानंतर दुसऱ्या दिवशी सकाळीं जो फराळ किंवा जेवण करतात तें. गोपाळकाला.

काव [ कायः. कै १ शब्दे ] (धा. सा. श.)

कावकाव [ कायः ] *(काव पहा)*

कावड १ [ कंबिकाष्टिका = कामीट = कावीड = कावड ] कावड बांबूच्या कामटीची करतात. (२) [ क + विवध = कावड ] क म्हणजे पाणी व विवध म्हणजे तें नेण्याचें एक साधन. विवधवीवधशब्दौ उभयतो बद्धशिक्ये स्कंधवाह्ये काष्टे वर्तेते ।

कावडी [ कापर्टिक = कावडी ]

कावळा [ काकोलः = काओळा = कावळा]

कावळी १ [ काकवल्ली = कावळी ] (२) [ काकांगी = कावळी (काकवल्ली) ]

कावा [ कामः = कावा. कम् १ इच्छायाम्] गुप्त इच्छा.

काशा [ कंशः = काशा ] काशा म्ह० पाणी पिण्याचें एक भांडें.

काष्ट [ काष्ठ म्हणजे उंच लुकडा मनुष्य ] (भा. इ. १८३३)

कास १ [ कक्ष्या = कास ] (२) [ कर्षू (नांगरटी खालची जमीन) = कास ] कास बिघा शब्द जुन्या मराठी लेखांत येतो.

कासंडी १ [ कंशभांडिका = कासंडी ] एक प्रकारचें पाणी पिण्याचें भांडें. (२) [ कांस्यकुंडिका = कासंडी ]

काँसंडी, काँसांडी [ कांस्यहंडि = काँसअंडी = कासांडी = कासंडी ] (भा. इ. १८३३)

काँसार [ कांस्यकार = कांसआर =

कॉंसार] (भा. इ. १८३३)
कासोटा [ कक्षापटः, कच्छपटः = कासोटा]
कास्त [ कास्तीरः = कस्तीरकारः. कस्तीर म्ह० कथिल, कथलाचें काम करणारा जो तो कास्तीर-कास्तीरः = कास्त ] (भा. इ. १८३३)
काहल [ कलाहकः, कलाहिका = काहल (वर्णविपर्यय) ] काहल एक वाद्य आहे.
काहाली [ कारिका = कालीआ = काहाली. कारिका यातनायां (अमरकोश) ] काहाली म्ह० यातना.
कॉं हि [ किम् अपि = कॉं भि = कॉं हि (some what) ] (भा. इ. १८३३)
कांहिच [ किमपिचित् ] (भा. इ. १८३३)
कां होई नां [ कां भवतु नाम. कामं = कां. नाम = नां. ] (भा. इ. १८३४)
काळा तीळ [ तिलकालकः = तीळ काळा] तोंडावरल्या काळ्या तिळाला संस्कृतांत तिलकालक म्हणत.
कालुसलेलें [ कलुषायितं = कालुसलेलें (स्वार्थे ल) ] कालुसलेलें म्ह० गढूळ. (भा. इ. १८३४)
काळेंकाळें [ कालकालं (ईषत्कालं) = काळेंकाळें ] पांढरेंपांढरें, तांबडेंतांबडें इत्यादि स्थळीं द्विरुक्ति ईषद्भाव दाखविते. (अष्टाध्यायी ८-१-१२)
काळेंकुट्ट [ कालं कृष्णं = काळें कुट्ट. कृष्ण = कुट्ठ = कुट्ट. जसें, विष्णु = विठ्ठु ] (भा. इ. १८३४)
काळेंनिळें [ कालनील (अमर) = काळेंनिळें] (भा. इ. १८३४)
काळेंबेरें [ कालिकं वैरं= काळें बेरें ] प्रकृष्टो दीर्घः कालः अस्य इति कालिकं वैरं । (अष्टाध्यायी ५-१-१०८) काळें बेरें म्हणजे फार दिवसांचें वैर.
काळेंभोर [ कालं बहुलं = काळेंभोर बहुल (कृष्ण) = भउर = भोर. भोर म्ह० काळें. र = ल ] कपिल = कबिर; किल - कीर (ज्ञानेश्वर-अव्यय) या दोन ठिकाणीं ल चा र होतो. (भा. इ. १८३४)
काळेला [ कालिलः = काळेला. जटाघटाकालाः क्षेपे ]
काळेंसांवळें [ कालश्यामल (अमर) = काळेंसावळें ] (भा. इ. १८३४)
काळोख [ कालाक्ष्यं (काल + अक्ष eye) = काळोख ] ज्यांत नेत्रांना काळें दिसतें.
काळोखी [ कलुषता = कळूखी = काळोखी]
किउत (ता - ती - तें) [ किमुत = किवुत = किउत (ता - ती - तें) (भा. इ. १८३३)
किंकाळी [ किंकलिः ] *(धातुकोश - किंकाळ पहा)*
किचकट १ [ कृछ्रकटं = किच्चकटं = किचकट ] (२) [ कृछ्रकष्टं = किचकट. कृछ्रकष्टं कलाकुलं । ]
किचका [ किष्कु (नीच) = किचका ]
किचट १ [ कृछ्र = किच + ट = किचट (कठीण, अडचणीचें) ] (भा. इ. १८३३) (२) [ कृछ्रिष्ट = किचिट = किचट ] कृछ्रिष्ट म्हणजे अति कृछ्र, अति बिकट
किचाट [ कृछ्रकटं = किच्चअट = किचाट]
किंजळ [ किंजल = किंजळ, केंजळ. किंजलः किंजल्कः पुष्परेणू ] डोळ्यांत किंजळ गेलें आहे म्हणजे धुळीचा कण गेला आहे.
किटकिट १ [ किट् त्रास पावणें, देणें.

द्विरुक्तीनें किटकिट ] किटकिट म्ह० कटु व कर्कश भाषणापासून होणारा त्रास. (२) [ किट् त्रासे. किट् किट् (आभीक्ष्ण्यं) = किट्किट् ] किट्किट् म्ह० त्रास, पीडा.

किटकिटणें [ कीर्त् = किट्ट; द्विरुक्तीनें किटकिटणें ] उ. - कान किटणें. (भा. इ. १८३२)

किडवळ [ कीटवर्धनं ] *(धातुकोश - किडवळ पहा)*

किडा १ [ किदः = किडा. किद् ज्ञाने । ] तो गणितांतला किडा आहे म्ह० ज्ञाता आहे. (२) [ (स्त्री) क्रीडा (मस्करी, थट्टा) = कीडा = किडा (पु. आकारामुळें) ] त्याला किडा आला आहे = तस्मै क्रीडा आगता, प्राप्ता, स क्रीडितुं इच्छति. पीडा = पिडा (इडापिडा) (भा. इ. १८३२)

किडाळ [ कीट = किडाळ (आळ प्रत्यय)] (भा. इ. १८३४)

किंतान [ क्रिमितान = किंतान ] a China cloth made of silk of a worm in China. कौटिलीय अर्थशास्त्र 2nd Edi-P. 112 line 17.

किंतु [ किंतु (नाम) अव्यय ]

किनरी [ किन्नरी (वाद्यविशेष) = किन्नरी] हस्तकिन्नरी = हातकिनरी.

किनी [ किणो प्रश्ने प्राकृते. किंनु = किणो = किण = किणी = किनी = कनी ] मी किनी (अगर कनी) तेथें गेलों होतों. प्रश्नशक्ति जाऊन केवळ पादपूरकता आली. (भा. इ. १८३२)

किर [ किल चा अपभ्रंश ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३०)

किरकिरें [ कर्करि = किरकिरें (वाद्य) ] यदुत्पतन्वदसि कर्करिर्यथा (ऋग्वेद मं. २-४-४२-३). किरकिरें हें वाद्य वेदकालीन आहे.

किरटें [ कर्तितं (कृत् कापणें) = किरटें ]

किरडूं [ किटकतर = किडअअर = किडरूं = किरडूं (अल्पकृमि) ] (भा. इ. १८३३)

किरमिजा, किरमिजी [ कृमिज = किरमिज (रंगविशेष) ] हा रंग कृमिज आहे.

किरसाण [ कृषाणः = शेतकरी. कृषाण = किरसाण ] हा शब्द Early History of the Kokan P. 19 note मध्ये आला आहे. (भा. इ. १८३२)

किरीम [ कृमि = किरीम ] (भा. इ. १८३४)

किरु [ किल चा अपभ्रंश ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३०)

किलाटी [ किलाटिन् (वेळू) = किलाटी ] किलाटी म्ह० पेंच, पांचर.

किल्मिष [ कल्मषं = किल्मिष ]

किल्ली [ कीलिका ] (कीली पहा)

किंवणा [ कृपणः = किंवणा ] (भा. इ. १८३४)

किशोरी [ कृशोदरी = किशोरी (बाला) ]

किसणी [ कृष् १ विलेखने. कृषणिः = किसणी ]

किसोरी [ कृशोदरी = किसोअरी = किसोरी ] पातळपोटी स्त्री. (भा. इ. १८३४)

किळस १ [ क्लिश् ४ उपतापे - चिक्लिश = चिळस = किळस ] (धा. सा. श.) (२) [ किलास = किळस (त्वग्रोग) ] (भा. इ. १८३४)

किळसे, किळसणें [ क्लिश् ४ उपतापे- क्लिश = किळस. क्लिश्यते = किळस्सए = किळसे ] (भा. इ.

१८३३)

की १ तो आला कीं; मी चाललों कीं; तू नीट वाटतोस कीं; असे प्रयोग की चे मराठींत हमेश होतात. रामदासाच्या बखरींत तर हा की शब्द फार आढळतो. पुणें प्रांतांत व देशावर हा की फार योजतात. कोंकणांत की चा प्रचार कमी. हा की संस्कृत किल चा अपभ्रंश आहे. किल = किर = की.

मराठीच्या पिढीजाद स्वभावाप्रमाणें ह्या की वर अनुनासिक विकल्पानें घावा. (सं.) स आगतः किल = (म) तो आला की. (२) [ क्रिया ]

सुतारकी = सूत्रकारक्रिया the business or occupation of a carpenter.

वाणकी = वणिक्क्रिया

लोहारकी = लोहकारक्रिया

माणुसकी = मनुष्यक्रिया

कीं [ किल चा अपभ्रंश ] (ज्ञा. अ. ९ पृ.३०)

कीरु [ किल चा अपभ्रंश ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३०)

कीली [ कीलिका = कीली, किल्ली ] कीलिकां दत्वा (पूर्णभद्र पंचतंत्र प्रथमतंत्र, कथा ८) = किल्ली देऊन.

कींव [ कृपा = कींवा = कींव ] (भा. इ. १८३३)

कुई [ कुतिः = कुई. कु अस्पष्टे शब्दे ] कोल्हेकुई = क्रोष्टूकुतिः

कुकडा [ कौक्कुटिक = कुकडा ] कुकडा म्ह० ढोंगीं, लुच्चा.

कुकरा [ कुकरः = कुकरा ] आखूड हाताचा मनुष्य.

कुकवाकू [ कृकवाकु = कुकवाकू कृकवाकू, म्ह० मोर ] गांडींत नाहीं गू आणि कावळा करतो कुकवाकू म्हणजे अंगांत तें सामर्थ्य नसतांना कावळा मोराचा शब्द जो कृकवाकू तो काढूं पहातो. (भा. इ. १८३२)

कुचकट [ कुचकः = कुचक + ट = कुचकट. कुचु, खुजु स्तेयकारणे ] कुचकट म्ह० चोर.

कुचका १ [ कुच् कौटिल्ये. कुचकः = कुचका ] (२) [ कुशिकः = कुचिका, कुचका ] मुली ह्राड मुलांना कुचका वगैरे शब्द लावतात. येथें कुचका म्ह० चकणा असा अर्थ असतो. (भा. इ. १८३५)

कुचकुच [ कुच् शब्दे (तक्रारीचा अस्पष्ट शब्द) द्विरुक्तीनें कुचकुच ] अस्पष्ट रीतीनें तक्रार करणें.

कुचर [ कुचर (वाईट चालीचा) = कुचर ] (भा. इ. १८३३)

कुचरट [ कूचिर्थिन् = कुचरट ] having errands every where म्हणजे कोठें च कांहीं काम न करणारा.

कुचराई [ कुसृति ] *(कुसूर पहा)*

कुंचा [ कूर्चः = कुंचा ] डोक्याच्या केसाला हजामानें काढलेला.

कुचाळी [ कुत्स् १० अवक्षेपणे. कुत्सालुता = कुचाळी ]

कुचिद्य [ कुश्चितं = कुचिद्य ] निवृत्तिराम - १५ वा समास ओंवी २४.

(गल्ली) कुच्ची [ कुत्सित = कुच्चिअ = कुच्ची ] गल्ली कुच्ची = कुत्सित, घाणेरडी गल्ली. (भा. इ. १८३२)

कुटाळ [ कूट = खोटा; आळ हा प्रत्यय लागून कूटाळ. त्याचें ऱ्हस्व उकार होऊन कुटाळ ] (भा. इ. १८३२)

कुंठणें [ कुंठनं ] *(धातुकोश - कुंठ पहा)*

कुटून [ *कुठ्ण कुठ्ण पहा)*

कुठ्ण कुठ्ण [ कुत्स्न = कुठ्दण ] कुठ्ण

कुठ्ण प्रश्न विचारतो = कृत्स्नकृत्स्नप्रश्नान् अनुयुंक्ते. (भा. इ. १८३४)

कुंड (डा - डी) [ कुंडक = कुडा. कुंडिका = कुंडी ] घटिका कृतिमुपमृघ कुंडिकाः क्रियंते। (पतंजलि - महाभाष्य - Vol. I. P. 7. Keilhorn (भा. इ. १८३३)

कुडकुडणें १ [ कुड् बाल्ये ] बालाप्रमाणें कांपणें, अंगविक्षेप करणें. (ग्रंथमाला) (२) [ कुड् वैकल्ये ] (ग्रंथमाला)

कुंडगुळें [ कुंडगोलकत्वं = कुंडगुळें or कोंडगोळें ] an act irregular like the descent of a कुंडगोळक who is the son of an adulteress कुंडा adulteress.

कुंडगोळक [ कुंडा (an adulteress) son of an adulteress, while the husband is living. कुंडागोपालक = कुंडगोळक.रंडा (a widow) son of a widow after husband's death. रंडागोपालक = रंडगोळक ]

कुडबुड्या १ [ कूटबुद्धिः = कुडबुड्या ] लुच्चा. कुडबुड्या जोशी. (२) [ क्षुद्रबुद्धिः = खुड्डबुड्डि = कुडबुडी. क्षुद्रबुद्धिकः = कुडबुड्या ] कुडबुड्या जोशी म्ह. क्षुद्रबुद्धि ज्योतिषी. (भा. इ. १८३४)

कुंडली [ कमंडलु = कोंडली = कुंडली ] लहान तांब्या.

कुडव [ कुटप ] *(कुडो पहा)*

कुडा [ कुंद्रकः = कुडा, कूड. कुद्रि - कुन्द्र् १० अनृतभाषणे ] कुडा म्ह० खोटा.

कुडी [ कुडिर्देहः (उणादि ५९३) ] (भा. इ. १८३३)

कुडुक [ कुड्डप (दागिन्यांचें पेचकट) = कुड्डुक ] अलंकार विशेष. आडकावयाचा दागिना. (भा. इ. १८३३)

कुडूकुडू [ कूडंकूडं = कुडूकुडू (हरभरे खाणें) कुड् to eat ]

कुडें १ [ कूटं (शृंगं) = कुडें ] सुंठीचें कुडें. (२) [ कुट्टप = कुडें ] कानावरील अलंकार.

कुडो [ कुटप = कुडव, कुडो ] माप धान्याचें. (भा. इ. १८३३)

कुढा [ कुधीः (दुष्टबुद्धिः, अजाणता) = कुढी, कुढा ] ill-disposed (भा. इ. १८३४)

कुणकुण [ कुण् शब्दे ] (ग्रंथमाला)

कुणा १ [ कुणिः = कुणा ] आखूड हाताचा मनुष्य. (२) [ कुणारु (वैदिक) = कुणा ] having a withered arm.

कुतरूं [ कुक्कुरतर ] *(रूं पहा)*

कुत्रा, कुत्री, कुत्रें - संस्कृतांत कुक्कुरः (रः, री, रें) असा शब्द उपलब्ध आहे. त्यापासून कुकरा, कुक्रा असा अपभ्रंश मराठींत व्हावा परंतु कुत्रा असा अपभ्रंश मराठींत रूढ आहे. हिंदींत कुत्ता असा अपभ्रंश आहे. ह्या वरून एक च अनुमान करावें लागतें. तें हें कीं संस्कृतसमकालीन प्रांतिक संस्कृतसम भाषांत कुत्तुरः किंवा कुत्तरः असा शब्द रूढ असावा. बहुशः संस्कृतांतच कुत्तरः असा शब्द असावा. कुत्र्यांचीं पिलें कु कु असा शब्द करतात त्यावरून त्यांना हाका मारतांना कु कु अशी हाक आपण मराठे मारतों. ही कु कु हाक मराठ्यांनीं अलीकडे नव्यानेंच उत्पन्न केली व प्रचारांत आणिली असें म्हणण्यास कांहींच पुरावा नाहीं. ही हाक आपण महाराष्ट्रींतून व

महाराष्ट्रीनें संस्कृतांतून वंशपरंपरेनें घेतली असली पाहिजे, हें निश्चित आहे. कां कीं कुक्कुर शब्दांत हि पहिला अवयव कु आहे व दुसरा अवयव हि कु च आहे. हा कुक्कुर शब्द संस्कृतांत हि अपभ्रंश च आहे. मुळांत हा शब्द कुकुकरः असा होता. त्याचा संक्षिप्त उच्चार कुक्करः असा संस्कृतांत रूढ झाला इतकें च. वैदिक पूर्वभाषेंत हा कुकुकरः शब्द असावा व त्या पूर्वीच्या भाषेंत नुसत्या कु ह्या शब्दानेंच श्वन् या अर्थाचा बोध होत असावा. तो कु शब्द प्रांतिक संस्कृत भाषांत राहिला. ज्याप्रमाणें अश्व पासून अश्वतर, गु पासून गुतर (गुरूं), महिष पासून महिषतर (म्हसरूं) हे शब्द ऱ्हस्वत्वदर्शक होतात, त्याप्रमाणें च कु शब्दापासून ऱ्हस्वत्वदर्शक शब्द कुतर हा होतो. त्या कुतरः ह्या प्रांतिक संस्कृत शब्दापासून मराठी कुतरा, कुत्रा हा शब्द निष्पन्न होतो. कुत्र, कुतर हें मूळ रूप - त्याचीं तिन्हीं लिंगीं कुत्रा, कुत्री, कुत्रें अशीं मराठींत रूपें होतात व प्रांतिक संस्कृतांत कुतर, कुतरी,कुतरं अशी रूपें होतात.. कोशांत कुतर, कुत्र असा अकारांत शब्द दिला पाहिजे व त्याचीं तिन्हीं लिंगीं कुत्रा, कुत्री, कुत्रें अशीं रूपें होतात असें दर्शविलें पाहिजे. (भा. इ. १८३६)

कुथणें [ कुथ् पूतीभावे, दौर्गंध्ये ] शरीरांत दौर्गंध्य होतांना जो शब्द मनुष्य करतें ते. (ग्रंथमाला)

कुंदा [ स्कुदः (स्कुंन्द् to jump स्कुंदते) = कुंदा] कुस्तींतील एक पकड (पेच) आहे.

कुन्हा १ [ क्रस् ४ ह्वरणे ] *(धातुकोश - खुनस २ पहा)* (२) [ कुहना (मिथ्येर्यापथकल्पना) = कुन्हा]

कुपी [ कूपी (a bottle) = कुपी ] (भा. इ. १८३६)

कुबड [ कुब्ज + अस्थि = कुब्ब + हाड = कुबाड = कुबड ] (स. मं.)

कुबडा १ [ कूबरः (कुब्जः) = कुबडा ] कुब्जपासून कुबडा निष्पादण्याची जरूर नाहीं. (२) [ कुब्जटः = कुबडा ] *(खुजा १ पहा)*

कुबडी [ कुब्जयष्टि = कुबडी ] कुबड्याची काठी.

कुंबा [ कुंभः a pot = कुंबा = (चांभाराचा) ]

कुंभा [ कुंभ (योनिः) = कुंभा (देवकुंभा)] (भा. इ. १८३४)

कुंभांड [ कुष्मांडं (खोटी कल्पना) = कुष्मांड = कुभांड ]

कुंभारमाशी, कुंभारीण [ कुंभीरमक्षिका ]

कुयाड [ कुयं ह वै नाम कुत्सितं भवति । उत्तरगोपथब्राह्मणषष्ठः प्रपाठकः । ] कुयाड या शब्दांतील आड प्रत्यय आढ्यदर्शक आहे. हें कुयाड काय आहे? म्हणजे ही कुत्सित अनिष्ट गोष्ट काय आहे? (भा. इ. १८३४)

कुरकुर [ कुर (आवाज करणें) (पुनरुक्त) कुरकुर. कुर म्हणजे शोकाचा, तक्रारीचा आवाज करणें. कुर शब्दे असा पाणिनि सामान्य अर्थ देईल. परंतु मराठी अर्थावरून दिसतें कीं, मूळ संस्कृत अर्थ शोकस्वर असा होता. ] (भा. इ. १८३५)

कुरकुरणें [ कुर शब्दे. कुरकुर (द्वित्व). ] 'कुर शब्दे' असा सामान्य अर्थ पाणिनिधातुपाठांत दिलेला आहे; परंतु मराठींत कुरकुरणें म्ह० तक्रारीचा

किंवा नापसंतीचा शब्द काढणें असा ज्या अर्थी अर्थ प्रचलित आहे, त्या अर्थी संस्कृतांत कुर म्हणजे तक्रारीचा शब्द करणें असा अर्थ असावा, नव्हे होता, असें म्हणावें लागतें. कुररी हा शब्द कुर ह्या धातूपासून संस्कृतांत निघाला आहे. कुररीप्रमाणें शब्द करणें म्हणजे दुःखाचा, नापसंतीचा शब्द करणें. (भा. इ. १८३५)

कुरकुली [ कर्करी = करकली = कुरकुली] संस्कृतांत कर्करी म्ह० रोंवळी. रोंवळीसारखें वेळूंच्या पत्र्यांचें बनविलेलें जें पात्र तें कुरकुली. लहानगी फुलांची टोपली. (भा. इ. १८३६)

कुरघोडी [ कुमारघोटिका = कुंवरघोडी = कुरघोडी ] कुमारघोटिका हा पाणिनिकालीन आर्यांत मुलांचा खेळ असे. त्यांत ज्या मुलावर डाव येई त्याला घोडा करीत व त्याच्या पाठीवर घोड्यावर बसतात तसें बसून विजयी पक्षांतील मुलें विवक्षित मर्यादेपर्यंत फिरत.

कुरड, कुरडणें [ कृड् (खाणें) = कुरड, कुरडणें.] (भा. इ. १८३३)

कुरडणें [ क्रुथनं ] (भा. इ. १८३४)

कुरंडी [ कुरंटिका = कुरंडी ] (भा. इ. १८३४)

कुरडू [ कुरंटी = कुरडी, कुरडू ]

कुरळ [ कुरल किंवा कुरुल (curly hair) = कुरळ (केंस) (ळा, ळी, ळें) किंवा कुरुळ (ळा, ळी, ळें)] (भा. इ. १८३५)

कुरुठा [ कुरोधस् ] रोधस् म्हणजे बांध embankment किंवा कुरोधः रोधः म्हणजे बांध, वेढा, अडचण. (ज्ञा. अ. ९ पृ. १५२)

कुरुंद १ [ कुरुविंद = कुरुंद ] शिलाविशेष. कुरुविंदास्तु कुल्माषाः (वैजयंती, पृ. ४४) (२) [ कुरुंब (सिंदुवारपुष्पवर्णदृषद्) = कुरुंद ] कुरुंदाचा दगड प्रसिद्ध आहे. जातीं करतात. हा शब्द कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या Book 2 Chap. 12 मध्यें आला आहे.

कुर् ह्या [ कुर् + ह्यु गतौ = कुर् ह्या (get on) ] कुर् sound of friendship.

कुऱ्हाडफोडी [ परशुस्फोटितानि दारूणि = फरसफोडा कुठारस्फोटितानि = कुऱ्हाडफोडी (पाणिनी २-१-३२)

कुलुंगा (कुत्रा) [ कुलुंग (एक प्रकारची हरीण) = कुलुंग (गा - गी - गें ] कुलुंग हरणासारखें बारीक आकाराचें कुत्रें. (भा. इ. १८३५)

कुलुली [ (नपुं.) कुरीरं (स्त्रीभोग) = कुलील = कुलुली (स्त्री.) ] कुलुली म्ह० स्त्रीभोगेच्छा. संस्कृतांत कुरीरी किंवा कुरुरी असा शब्द असावा. (भा. इ. १८३५)

कुल्ला [ कोल = कोला = कुल्ला ] अवयवविशेष. (भा. इ. १८३५)

कुल्हार [ कुलागार family-house = कुल्हार ]

जें भूलिचें कुल्हार । वायुतत्त्वांचें अंतर ।
बुद्धिचें द्वार । झांकललें जेणें ॥ ज्ञा. १३-११५

कुंवार, कुंवारी [ कुमारी = कुंवारी, कुंवार, कोंवार ] (स. मंदिर)

कुशळ [ कुशल = कुशळ. ल = ळ. ल्य = ल ]

कुशी [ कुशी ] *(कुसा पहा)*

कुसरूड [ कोशकारकीटः = कोसरूड =

कुसरूड ] सुरवंट
कुसळ [ कुशल्य = कुसळ. शल् १ गतौ ] तो काय माझें कुसळ उपटतो आहे? येथें कुसळ म्ह० वाईट शल्य.
कुसळ करणें [ कुशलीकरणं नाम वपनं । ] (आश्वलायन गृह्यसूत्र १-७-१६) कुसळें काढणें, उपटणें म्ह० हजामत करणें, केंस उपटणें. तूं माझें काय कुसळ करतोहेस? म्हणजे तूं माझी काय हजामत करतोहेस? (भा. इ. १८३६)
कुसा [ (अयोविकारे) कुशी = कुशी (स्त्री.), कुसा (पुं.) ] कुसा म्ह० पहार. खानदेशांत रूढ आहे.
कुसुऱ्या [ कौसृतिकः ] *(कसूर १ पहा)*
कुसूं [ कुशा (a wooden peg) = कुसूं ]
कुसूर [ कुसृतिः निकृतिः शाठ्यं (अमर - प्रथमकांड - नाट्यवर्ग ३०) कुसृति म्ह. लुच्चेगिरी. कुसृति = कुसूर, कसूर, कुचराई, कसुराई ] (भा. इ. १८३४)
कुहा - हा शब्द ज्ञानेश्वरींत (मुकुंद. ज्ञा. १४-३८७; १५-४५५) येतो. तेथें त्याचा अर्थ कूप, विहीर असा करतात. खरा अर्थ धुकें असा आहे. (सं) कूहा (स्त्री.) किंवा कुहक, कुहअ, कुहा. राजवाडे ज्ञानेश्वरी - कां कुहेंसि आकाशा । तोंडिं सांदा नाहिं जैसा । तो परमरसु तैसा । एकवटे ॥ १४-३८७; जैसा कुहां आपणचि बिंबे । सींहु प्रतिबिंब पांतां खोभे । खोभला समारंभे। घली तेथ ॥ १५-४५४. (भा. इ. १८३२)
कुहू [ कुहू (कोकिल) कुहू ] (भा. इ. १८३६)
कुळकुळणें [ कूल = जळणें (पौनःपुन्य) कूलकूल = कुळकुळ ] कुळकुळणें म्ह० जळजळीत होणें. विस्तव कुळकुळला. (भा. इ. १८३३)
कुळकुळित [ कुलिशा (कोळसा) = कुळकुळित ]
कुळकुळीत [ कूल = जळणें ] जळून निवालेल्या कोळशाच्या रंगाचा काळा. (भा. इ. १८३३)
कुळंगार [ कुलांगार = कुळंगार ]
कू (हिंदी प्रत्यय) [ गृहस्य आके (वैदिक) = घरकूं ] हिंदी कू प्रत्यय वैदिक आके पासून निघाला आहे. अ + अकच् = आक, सप्तमी आके. आके ही अ सर्वनामाची अकच् समाप्ती आहे.
कूड [ कुंद्रकः ] (कुडा पहा)
कूस [ कुक्षि = कूस ] (स. मं.)
कृत्या [ कृत्यका (चेटकी) = कृत्या ]
कें [ क सर्वनामाची तृतीया एकवचन ] (ज्ञा. अ. ९ पृ ७)
केकती [ कंकतिका (वृक्षविशेष) = केकती]
केंजळ १ [ किंजल ] *(किंजळ पहा)* (२) [ किंजल्क = केजळ (वनस्पतिविशेष) ]
केरसुणी १ [ कर्षणी (पुंश्चली) - करसणी = केरसुणी. कं चा के ] (भा. इ. १८३३) (२) [ कर्शणी = करसणी = केरसुणी ] कर्शणी = वाईट चालीची स्त्री. झाडणीशीं कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३५) (३) [ कर्षणि = करसुणा = केरसुणी ] अपशब्द — व्यभिचारिणी स्त्री. (भा. इ. १८३६)
केला [ क्री - क्रीत + ल = केला (bought) ] मी तुमचा केलाँ I am bought by you. क्रीत पुत्राला अनुलक्षून.
केवडा [ केयूरः = केउडा = केवडा ] केयूरं

शिरोभूषणं. केवडा हा स्त्रियांचा डोक्यांतला दागिना आहे.

**केविलवाणा १** [ क्लीब् to be impotent] (२) [ क्लीबवत् den ] (३) [ कृप् १ अवकल्कने. कृपणवर्ण = केविलवाणा. कृपा = कींवा. कृपण = कृपिल = केंविल ] (धा. सा. श.)

**केंविलवाणा** [ कृपणवर्णः = केंविलवाणा. कृपा = कींवा, कृपण - कृपिल = केंविल. कृप् १ अवकल्कने ]

**केस** [ केश = केस ] (स. मं.)

**केळवणी** [ केलायनी ] *(धातुकोश - केळव १ पहा)*

**कैंचीं** [ कानिचित् ] (ज्ञा. अ. ९ पृ. ११)

**कैच्या** [ कैशिकं = कैचिअ = कैच्या ] कैच्या धरून द्रौपदीला दुःशासनानें ओढली, या वाक्यांत कैच्या म्ह० केशसमूह, वेणी. कैशिक म्ह० केशसमूह, वेणी.

**कैंपक्ष** [ कृपापक्ष = कींवपक्ष = कइँपक्ष = कैंपक्ष ] हा शब्द रामदास योजतात. (भा. इ. १८३३)

**कैरा** [ केकरः = कैरा ] काणा, तिरळा.

**कैंवार** [ कृपाकर = कींवा अर = कींवार. कींवारस्य भाव. कैंवार ] (भा. इ. १८३३)

**कैसेनि** [ कीदृशेण ] (ज्ञा. अ. ९ पृ. ९)

**कोकणें** [ (कू = आवाज करणें) कोकूय (क्रियासमभिहारं) = कोकणें ] कोकणें म्हणजे फार वेळ आवाज करणें. (भा. इ. १८३६)

**कोंकलणें** [ (कल्) चाकल्यते = कोंकलणें] (भा. इ. १८३६)

**कोकाटू** [ कर्कटुः = कोकाटू ] पक्षिविशेष.

**कोक्या १** [ ककः ] *(कावळा पहा)* (२) [ कक लौल्ये गर्वेच । ककः = कोक्या ] तो कोक्या आहे म्ह० गर्विष्ठ, अभिमानी आहे, लुच्चा आहे. कोंकणस्थ शब्दापासून निंदार्थक झालेल्या कोंक्या शब्द निराळा.

**कोंगाडा** [ (कुह् to deceive) कोहटः किंवा कुहटः = कोघडा = कोगाडा = कोंगडा ] deceitful.

**कोंच** [ कूर्च = कोंच ] (स. मं.)

**कोटिंबें** [ कुटाबुकं = कोटंबें, कोटिंबें ] कुट म्ह० घडा, त्यांतली पाणी पडण्याची नाळी.

**कोठचा** [ क्वत्य = कोठच (चा - ची - चें)

**कोठचें** - कुतस्त्यं = कोठचें.अंतस्त्यं = आंतचें.

अत्रत्यं = एथचें. बहिस्त्यं = बाहेरचें. तत्रत्यं = तेथचें. गृहस्थं = घरचें. मध्यस्थं = मधचें.

**कोठार** [ कूटागार = कोठार ] कूटागाराः सुवर्णखचिता दृश्यन्ते स्म । (कारंडव्यूह) (भा. इ. १८३४)

**कोठावणें** [ कुत्रापयति = कुठ्ठावे = कोठावे. कुत्रापनं = कोठावणें ] कोठावणें म्ह० कोठें जातोस म्हणून विचारणें. कथादीनां सर्वेषां पुकं आह शाकटायनः (भा. इ. १८३३)

**कोठी** [ कुटिः (सभा) = कोठी ] संस्थानांतून office या अर्थी कोठी शब्द योजतात.

**कोड १** [ कोट = कोड ] त्वक्पुष्पं कोटस्तुमंडलं ॥ (केयदेव - पथ्यापथ्याविबोध). (२) [ कुड्यं curiosity = कोड ] कोड पुरविणें. to satisfy curiosity. (३) [ कौतुक = कोडुअ = कोड ] कोड पुरविणें म्ह० कौतुक पुरविणें. कोडकौतुक असा जोड शब्द हि आहे. फारसी व मराठी

असे जोड शब्द मराठींत पुष्कळ आहेत. परंतु प्राकृत व संस्कृत असे जोड शब्द मराठींत विरळा सांपडतात. पैकीं हा एक आहे. (भा. इ. १८३५)

कोंड [ कुंड् रक्षणे. कुंड्य = कोंड ] दक्षणेकरितां ब्राह्मण कोंडणें म्ह० बंदोबस्तानें राखून ठेवणें. (धा. सा. श.)

कोडगा १ [ कूटकः = कोडगा ] (२) [ कृतघ्नः = कडगा = कोडगा ]

कोंडगोळें [ कुंडगोलकत्वं ] *(कुंडगुळें पहा)*

कोंडवाडा [ कुंडवाट ] गुरें राखण्याची जागा. *(धातुकोश - कोंड ६ पहा)*

कोंडा [ कुट्टः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३४)

कोंडाळें १ [ कुंडलं = कोंडळें = कोंडाळें] (२) [ कुंडालयं = कोंडाळें ]

कोंडी [ कुंडिका = कोंडी ] कोंडी फोडणें - रक्षिलेली जागा भेदणे. *(धातुकोश कोंड ६ पहा)*

कोडीस (वाणा) [कपोतवर्ण = कवोडवण्ण = कओडवाण = कोडवाण. कपोत = कपोतीयस् (तरभाव) = कोडीअस = कोडीस. कोडीस + वाण = कोडीसवाण (णा - णी - णें) ] कोडीसवाणा म्ह० कपोतवर्णाचा. (भा. इ. १८३३)

कोडें [ कुड्यं (जिज्ञासा) = कोडें (आहे) कुट्टकं (समीकरण) = कोडें सोडवा) ]

कोंढा [ कोयष्टिकः = कोढा = कोंढा ] एक पाखरूं आहे.

कोणु [ कः अन्यः = कवणु, कःनु = कोणु, कवणु ] (ज्ञा. अ. ९)

कोणें [ क अन्य + अनेन ] *(एणें पहा)*

कोतवाल [ कोट्टपाल = कोटवाल = कोतवाल ] (भा. इ. १८३२)

कोंदी - धी [ कुसंधि = कुहंधि = कोंधी, कोंदी ] सांदीकोंदींत बसूं नको म्हणजे भिंतीच्या सांधींत किंवा कुसंधींत बसूं नको. कोंदी म्ह० वाईट संधि, सांदी. (भा. इ. १८३६)

कोन [ कोण = कोन ] angle, corner of house.

कोंपर [ कूर्पर = कोंपर ] (स. मं.)

कोपरखळी [ कूर्परखनि = कोपरखळी ] कोपरानें खणणारा अवयव. (स. मं.)

कोंबडा [ कुक्कुटः = कोउडा = कोवडा = कोंबडा ]

कोंबडी [ कुंभपदी (a woman having pitcher like feet) = कोंबडी ] हा ममतादर्शक अपशब्द आहे. ही कोबडी आली. कोंबडिच्या.

कोंभैल [ कुड्मलित = कोंभैल (ला - ली - लें) ] *(धातुकोश - कोंभ पहा)*

कोमट [ कवोष्ण ] *(सोमट पहा)*

कोयंडा [ कुंचिकादंडः = कोयंडा ]

कोरा [ कर्करः = कोरा ] आरशासारखा स्वच्छ.

कोरान्न [ कूर (शिजवलेला भात) + अन्न = कोरान्न ]

कोरीवँ [ कृ ६ हिंसायाम्. कुरेलिम = कोरीवँ ] (धा. सा. श.)

कोलती, कोलीत [ (वैदिक) कूल् = जळणें, कूलित = कोलीत (जळकें लांकूड). कूलिता = कोलती ] (भा. इ. १८३३)

कोल्हेकुई [ क्रोष्टुकूति = कोल्हेकुई. कु to sound, sing ]

कोल्हेभूक, कोल्हेहूक [ बुक्क् १ भषणे (भषणं - श्वरवः ) क्रोष्टुबुक्कनं = कोल्हेभूक, कोल्हेहूक. (भ = ह) ] (धा. सा. श.)

कोल्हैर [ कुलालगृहः ] (ज्ञा. अ. ९

पृ. ८४)

**कोवळें** [ कोमल = कोंवळ = कोंवळं = कोवळें - ळा - ळी ] (ग्रंथमाला)

**कोंवार** [ कुमारी ] *(कुंवारी पहा)*

**कोवारीण** [ कौमारिणी = कोवारीण (५-१-१२९) ]

**कोशिंबीर १** [ कौक्षिंभरिका = कोशिंबरी = कोशिंबीर ] कुक्षिंभर म्ह० पोटाची कूस भरणारा - री - रें. कोशिंबरी म्हणजे पोटाच्या कुशींत कोठें तरी अल्पस्वल्प स्वादार्थ भरलेलें अन्न. (२) [ कुक्षिंभरिः=कोशिंबीर ] पोटांत मजेखातर भरण्याचें अन्न.

**कोशींबीर** [ कुक्षिंभरिः (भाजी) = कोशींबरी = कोशिंबीर ] पक्वान्न खाऊन तुटुंब पोट भरल्यावर कुशी भरण्यास साधनं होणारे चविष्ण पदार्थ.

**कोशेटा** [ कोशकीटक = कोशइटअ = कोशेटा ] (भा. इ. १८३३)

**कोहळा** [ कुंभफला = कंहअळा = कोहळा. कुष्मांडिका कुंभफला ॥ राजनिघंटुः ॥ ] (भा. इ. १८३७)

**कोळ** [ कुल् १ संघाते ] कोळ. चिंचेचा कोळ म्ह० चिंचेचा एके ठिकाणीं जमविलेला गीर. (धा. सा. श.)

**कोळपाणी** [ कल्पनी (कात्री) = कळपणी = कोळपाणी ]

**कोळसा** [ (वैद्दक) कूल् = जळणें. कूलिश = कुलिशः = कोलिसा = कोळसा ] कोळसा म्ह० जळणारा लांकडाचा विकार. (भा. इ. १८३३)

**कोक्स्तिा** [ कोकिलाक्षः = कोइलाक्सा = कोलिक्सा = कोलिस्ता ]

**कौटाळीण** [ कौटिल्यः = कोटिला = कौटाळ ] कौटाळचें स्त्रीलिंग कौटाळीण.

**कौळी** [ क्रोडा ] *(कवळी २ पहा)*

## ख

**खइ** [ क्षति ] तुला खइ लागली. *(खय पहा)*

**खंगणें** [ क्षंजनं = खँगणें. क्षंजनं = खँचणें. ज = ग. ज = च] (भा. इ. १८३५)

**खचणें** [ क्षंजनं = खँचणें ] *(खंगणें पहा)*

**खचित् १** [ खलुचित = खल्चित् = खचित् (खरोखर) (अव्यय) ] (भा. इ. १८३६) (२) [ खलुचित् = खचित्]

**खचून** [ खच् (बांधणें, एकावर एक जडवणें). खचित्वा = खचून ] खचून भरणें, खचून मारणें, जेवणें इ. इ. इ. शेवटीं खचून म्हणजे अति पुष्कळ.

**खच्ची** [ क्षय्यः (शक्य क्षेतुं) = खच्ची ] क्षय करण्यास शक्य.

**खंजीर** [ खड्गजीरः = खज्जीरः = खंजीर] खड्गविशेष. जीरखड्गे वणिग्भेदे (विश्वकोश).

**खट १** [ क्षतं = खट (न.) ] खट म्ह० खवडा, क्षत. खट झालें म्हणजे खवडा, क्षत. डोईला खटें झालीं म्हणजे क्षतें झालीं. (२) [ क्षत wound = खट wound ] डोक्याला खटें पडलीं.

**खटरूट** [ खट्वारूढः (जाल्मः) = खटरूट ] निंद्य माणूस.

**खटकन्, खटदिनि** [ *चटकर पहा)*

**खटनट** [ खट कांक्षायां व नट नृतौ ] हा शब्द महाराष्ट्रांत सामान्य स्त्रीपुरुषांच्या बोलण्यांत हमेश येतो. (भा. इ. १८३२)

खटपट [ खाट् कृत्य प्याट् किंवा पाट् कृत्य. ह्या शब्दांत खाट् व पाट् हे अवयवशब्द आहेत. ह्यापासून खाटपाट = खटपट हा मराठी शब्द निघाला आहे. ] (भा. इ. १८३६)

खटारा [ हा शब्द पुष्कळ वर्षे व पुष्कळांनीं भोगून खिळखिळी झालेल्या बायकोला लावतात. क्षत्ता स्यात् सारथौ दाःस्थे वैश्यायामपि शूद्रजे (भट्टोजी, उणादि २५९) क्षत्तृ = क्षत्तार = खट्टार (खटारा) क प्रत्यय = अ. आपल्या म्हाताऱ्या बायकोला विनोदानें खटारा म्हणण्याची चाल महाराष्ट्रांत अशिष्ट ब्राह्मणांत आहे. (भा. इ. १८३३)

खट्याळ १ [ खट + आल = खटाळ = खट्याळ ] (भा. इ. १८३२) (२) [ खट्वारूढः = खट्यालू = खट्याळ. खट्वाक्षेपे २-१-२६) going astray.

खंड [ स्कन्ध् १ संचये ] *(धातुकोश - खंड २ पहा)*

खडखडणें [ खड् मंथे घुसळण्यासारखा हलवून नाद करणें ] (ग्रंथमाला)

खडखडून १ [ खटखटयित्वा = खडखडून] खटखटाय म्हणजे शब्द करून उठणें. खडखडून जागें होणें म्हणजे शब्द करून व उठून जागें होणें. (भा. इ. १८३६) (२) [ खटखटायते ] *(धातुकोश - खडखड २ पहा)*

खंडलमंडल [ खंडल (खंड् to break) खु (to construct) म्हणजे मोडतोड, मोडजोड. Distruction and construction ]

खडा १ [ कठक = खडा ] (२) [ खट (hard stone) = खडा. खटी = खडी. चूर्णखटी = चुनखडी ] (३) [ खदः = खडा ] *(खाडा ५ पहा)*

खडा (डा-डी-डें) [ खद् to be firm. खदःfirm = खडा ] firm, fixed. खडें सैन्य reguler fixed army खडा उभा fixedly or firmly erect.

खडा-डें-डी [ खदः = खडा. खद् स्थैर्ये ] खडा पहारा म्ह० स्थिर पहारा. खडें सैन्य म्ह० स्थिर कायमचें सैन्य. खडा उभा म्ह० fixedly or firmly erect. *(खाड ५ पहा)*

खडी १ [ खटी = खडी. खटी धवलमृत्तिका। ॥ राजनिघंटुः ॥ ] (२) [ खड्गिका = खडी ] एक प्रकारची तलवार. (३) [ कठिका = खडी ]

खडें मीठ [ कटकं salt by evaporation = खडें मीठ as opposed to mine-salt ]

खडें सैन्य [ कटकं सैन्यं ] army in camp established for years as opposed to temporarily raised army.

खड्डा १ [ खातः ] *(खाडा ४ पहा)* (२) [ वर्षपरीतः प्रतिलोमकर्षितस्त्रिः परिक्रम्य खदायामर्कं क्षिप्रं संवपति ॥ ७॥ (कौशिकसूत ३८ पृष्ठ १०८ Bloomfield) ]

दारिलनामक टीकाकार म्हणतो : खदा नाम स्वभावजः गर्तः । केशवनामक टीकाकार म्हणतो : खदां खात्वा .......

खदा या शब्दाचा खद्दा असा द्वित्त उच्चार करून व द स्थानीं डादेश करून खड्डा असा मराठी शब्द निष्पन्न झाला आहे. संस्कृत स्त्रीलिंगाचें मराठी पुल्लिंग आकारान्तास्तव केलें आहे.

ह्या शब्दावरून असें दिसतें कीं, प्राकृत भाषेंतील म्हणून मानलेले देशी शब्द मूळ संस्कृतांतून घेतले आहेत. आणि अशी जर गोष्ट आहे तर प्राकृत व प्राकृतिक भाषा संस्कृतापासुन निघालेल्या आहेत. स्वतंत्र नाहींत. (भा. इ. १८३२)

खण [ क्षणः (centre, middle) = खण] खण म्ह० चार खांबांमधला अवकाश.

खंत [ क्षांति = खंति = खंत ] (भा. इ. १८३६)

खतरूड [ खट्वारूढः (मुर्ख) = खटरूड = खतरूड ]

खंतावणें [ खंत - ती den मराठी ]

खतैल (ला-ली-लें) [ क्षताविल = खतैल (ला - ली - लें ) ] covered with wounds.

खत्रूड [ क्षत्रगंडः = खत्रूड ] a bad क्षत्रिय

खंदक [ स्कंधक = खंदक ] (भा. इ. १८३४)

खंदा [ स्कंदक (शूर) = खंदा ] खंदा वीर.

खंद्य (द्या-द्यी-द्यें) [ महोक्षः स्यादुक्षतरः स्कांधिकः स्कंधवाहकः (अमर - द्वितीयकांड - वैश्यवर्ग - ६१ टीका अमरविवेक) स्कांधिक = खंदिअ = खंद्य (द्या - द्यी - द्यें) ] खंद्य म्ह. खांद्यानें ओढण्याला समर्थ, कर्ता, समर्थ. खंद्या माणूस = समर्थ माणूस. (भा. इ. १८३३)

खंद्या [ स्कंधिकः (गाडी ओढणारा बैल) = खंद्या (efficient) ]

खनाळें [ खनि + लयनं = खणाळें, खनाळें] a cave dug out or scooped out in the rock.

खपणें १ [ क्षपण = खपण = खपणें ] मरणें, मरे तो काम करून दमणें. (ग्रंथमाला) (२) [ क्षपणं = खपणं] मरणें. (भा. इ. १८३४)

खपरेल [ खर्परगृहं = खपरार = खपरेल] थाप्या कौलांचें घर.

खप्पा [ खप्प = खप्प (पा - पी - पें) उणादि ३१५ खप्पौ क्रोधबलात्कारौ ] (भा. इ. १८३३)

खप्पी १ [ खप्पौ क्रोधबलात्कारौ (उणादि ३१५) खप्पिन् = खप्पी ] बलात्कारानें वर्तणारा. (भा. इ. १८३३) (२) [ ख्याप्यः = खप्पा ] Notorious मला खप्पी आहे. is altogether a notorious man.

खबूतर [ कपोतक ] *(कबूतर पहा)*

खमकावणें [ कार्यक्षम = खमक्या able खमक्या den खमकावून ]

खमक्या १ [ क्षमकः able, efficient = खमक्य ] able efficient. (२) [ कर्मक्षमः = कमखा = खमक्या] कोणतेंहि जोखमींचें काम करण्यास योग्य.

खय १ [ क्षय = खय. क्षति = खइ. क्षेय = खेच ] (धा. सा. श.) (२) [ क्षय = खय. क्षाय = खाय. क्षति = खइ, खय ] तुला खइ लागली = ते क्षयः लग्नः (३) [ क्षितिः = खइ = खय = खै ]

खरकटणें, खटरकाटणें, खरकुटणें [ खरकटें den मराठी ] to be fould with खरकटें.

खरखरित [ खर (harsh, rough) = (द्विरुक्त) खरखरित ]

खरखरीत [ खरखरित = खरखरित - रीत. स्वरः सूक्ष्मश्चलोऽनिलः । वाग्भट - सूत्रस्थान ] खर म्हणजे खडबडित. (भा. इ. १८३४)

खरडपट्टी [ खर्दपट्टिका = खरडपट्टी ] खरडपट्टी म्ह० कठोर बोलणें. मूळ अर्थ दंश करून कातडीचा टवका काढणें.

खरपूस १ [ खलपूः (खलं पुनाति) = खरपूस समाचार, मार (असा मार कीं मारलेल्याचा दुष्टपणा नाहींसा होईल) ] (२) [ खलपूः (खले पूयते) = खरपूस धिरडें (खलांत म्हणजे तव्यांत पूर्ण भाजलेलें धिरडें) ]

खरपें [ खरत्व roughness, harshness = खरपें ] रूक्षपणा.

खरांटणें [ खरांटा den मराठी ] to become like a खराटा, a tree etc.

खराटी [ क्षरयष्टि = खराटी (स्त्री.) खराटा (पु.) ] स्त्रीलिंगापासुन पुल्लिंग निघालें आहे. (भा. इ. १८३४)

खराब [ खर्वः mutilated = खराब ] dwarfed, low. तो खराब माणूस आहे, he is a crippled, low fellow.

खरारा [ खरालिकः razor = खरारा ]

खरूज १ [ खर्जू = खरूज ] (भा. इ. १८३४) (२) [ खरु (द्वाड माणूस, मूर्ख) + ज = खरूज ] ही खरूज कोठून आणलीस? म्हणजे हा मूर्ख किंवा द्वाड माणूस कोठून आणलास? (भा. इ. १८३६)

खरूखटें [ कुर्कुटः (केरकचरा) = खुर्खुटें = खर्खटें. उ = अ ] एकदां खर्खटें काढून टाका म्ह० केरकचरा काढून टाका.

खर्डा [ खर्दः = खर्डा. खर्द् हिंसायां ] खर्डा म्ह० हिंस्र वाघ.

खल [ खल्लः = खल (दगडाचा) ]

खलक १ [ खलुंकः (जैनग्रंथ) = खलक, खळक, खलुंकः अविनीतः ] (२) [ खल एव खलकः खल = कर्णेजपेऽधमे (हेमचंद्र १२०८) ] खलक म्ह० फितुरी, असा शब्द व अर्थ मराठ्यांच्या इतिहासाच्या आठव्या खंडांतील २८ व्या लेखांत आला आहे. हा २८ वा लेख शिवाजीचा आहे. (ग्रंथमाला) (३) [ खल इव खलकः = खल्क (a bad nian) कलहकः = खल्क (a quarrelsome man)] a thief, a highway robber, enemy.

खलाटी [ खल्तिक (mountain) = खलटी = खलाटी ] कोंकणाच्या सह्याद्रीकडील भागाला खलाटी म्हणतात.

खवखव [ क्षवथुः क्षवः ॥ क्षव = खव ] (भा. इ. १८३४)

खवखवणें [ क्षव (खोकला) = खव. द्वित्वानें खवखवणें ] (भा. इ. १८३२)

खवडा १ [ क्ष्वेलः = खवेडा = खवडा. क्ष्वेल् १ संचलने. क्ष्वेलातु = खवडाव ] संसाराचा खवडा करूं नको म्ह. खेळ करूं नको. (धा. सा. श.) (२) [ क्ष्वेल् - क्ष्वेड् थट्टा करणें. क्ष्वेलिका - क्ष्वेडिका = खवेडिआ = खवेडी = खवडी. क्ष्वेडित = खवेडिअ = खवडा. क्ष्वेलित म्हणजे थट्टा, मस्करी ]

खवडाव [ क्ष्वेलातुः = खवडाव ] खवडाव म्ह० खेळखंडोबा.

खवणा [ क्षपणक = खवणअ = खवणा (क्षौरी) ] (ग्रंथमाला)

खवणी [ क्षपणिः = खवणी ]

खवंद, खवंदळ, [ क्षतबंध = खवंद = खवंद (खट), खवंदळ, खौंदळ. ]

खवळणें [ क्ष्विड् = खिवळ = खवळणें. क्ष्विड् to roar to growl ] समुद्र

खवळला म्ह० रागानें ओरडूं लागला.

खवा १ [ क्षपः = खवा ] दुग्धस्य क्षपः = दुधाचा खवा. (२) [ खव् to purity खवा ]

खसकन् [ खष् १ हिंसायां ] खसकन् म्ह० क्रूरपणें मारून. *(धातुकोश - खसास २ पहा)*

खसखशित [ खष् १ हिंसायाम् ] Pert, dry,

खळ १ [ स्खलः = खळ. स्खल् संचलने ] खळ पडणें, म्हणजे चळणें, रिकामें पडणें (२) [ खलिः (गाळ, बेरी) = खळ (तांदुळांची) ] (३) [ खलिः = खळ. खल् संचये ] खळ म्हणजे पातळ शिजविलेल्या पिठाचा संचय. (४) [ खल pastry, thick part of curds = खळ. खलि ]

खळक [ खलुंकः ] *(खल्क १ पहा)*

खळखळ [ अख्खलीकृ ] *(खळखळ करणें पहा)*

खळखळ करणें [ (वैदिक) अख्खलीकृ = खळखळ करणें. (अलोप) खळखळणें, खळखळाविणें. अख्खलीकृ to shout ] खळखळ करतो म्हणजे ओरडतो, रडतो, अडथळा करतो.

खळखळणें, खळखळाविणें [ अख्खलीकृ ] *(खळखळ करणें पहा)*

खळणें [ स्कंदनं = ख्खडणँ = खळणें ] वीर्यं स्कन्नं = वीर्य खळलें. घोटकः स्कन्नः = घोडा खळला. (भा. इ. १८३६)

खळबळ [ स्खल् १ संचलने. स्खलनवलन = खळबळ ] (धा. सा. श.)

खळमळ [ खलं (dross) मलं (dross) = खळमळ ]

खाई १ [ क्षाति (वैदिक heat, singeing) = खाई, खाय ] आगीची खाय लागली was singed by fire आगीच्या खाईत पडला fell into the heat of the fire. (२) [ क्ष्माया = खाई (नाश.) क्ष्माय् विधूनने ] (३) [ खादिका = खाई ] (भा. इ. १८३६)

खाऊ [ खादुका = खाऊ (विशेषण, खादाड, लुच्चा) ] (भा. इ. १८३६)

खाक [ कक्षाग्निः (कक्षः शुष्ककाननं) = खाक (शुष्क आग) ] घर जळून खाक झालें = गृहं ज्वलित्वा कक्षाग्निकं भूतं .

खाकटी [ कक्षास्थि = खाकटी ]

खाकरणें १ [ कख् हसने ] (ग्रंथमाला) (२) [ खात्कृ = खाकर (णें) ] (भा. इ. १८३६)

खाकी [ काषाय = काखाई = खाकी ]

खाकोटी [ कक्षपुटी = काखोटी, खाकोटी]

खागें १ [ कक्ष्यम् inner appartment = खागें ] अंतर्गृह. उ - आणि हें चि वायप्रसंगे । मरणाचें जरि खागें । तरि तेतुलेन हीं निगे । तमेंसिं तो ॥ ज्ञा. १४-२५३ (२) [ कक्ष्यम् gate = खागें ] दरवाजा. (ज्ञानेश्वर) (३) [ कक्ष्यम् similarity, effort, object =खागें ] object, विषय. (ज्ञानेश्वर)

खाच [ खातः (पु.), खाता (स्त्री.) = खाच. त = च ]

खाचरा [ कर्षुः a furrow, trench = खाचरा ] a furrow, trench नांगरानें खाचरे पाडणें.

खाजण [ क्षयणं = (a bay or harbour) खाजण ]

खाटिक [ खट्टिक = खाटिक ] (भा. इ. १८३६)

खांड [ खंडः, खंडिका = खांड, खांडी ]

खाडा १ [ खातकः = खाडा (a pond square and large) खातिका = खाडी (a hollow of salt water) ] (२) [ स्खद् to stop खाडा म्ह० to stop. ] दुधाचा खाडा म्ह० stop of milk (३) [ खाडः = खाडा. खडि भेदने ] (४) [ खातः (खणलेला चर) = खाडा, खड्डा ] (भा. इ. १८३६) (५) [ खद् स्थैर्ये. खादः = खाडा. खदः = खडा ] दुधाच्या रतिबाचा खाडा पडला म्हणजे रतिबाची गती बंद पडली. कानीं खडा म्हणजे आवाजाची गती बंद पडणें.

खाडी [ खातिका ] *(खाडा १ पहा)*

खांडी [ खंडः, खंडिका ] *(खांड पहा)*

खाडू [ षंढः = खाडू (diminution ऊ) ]

खाणें १ [ खै - खायति = खातें. खानं = खाणें ] खाणें म्ह० दुःख देणें, पीडा करणें. (भा. इ. १८३६) (२) [ क्षम् = खावं. क्षांत्वा = खाऊन ] राग खाऊन = रागं क्षांत्वा. खाणें म्ह. राग, क्रोध, गम वगैरे. (भा. इ. १८३४)

खांणें (मन) [ माझें मन मला खांतें, या वाक्यांत खाणें हा धातु संस्कृत क्षण् पासून निघाला आहे. क्षणणं = खणणं = खांणें ] खांतें म्हणजे इजा करतें. (भा. इ. १८३४)

खात [ ख्याति = खात ]

खातापिता [ ख्यातापत्यः = खातापता = खातापिता ] खातापिता माणूस म्हणजे पोरेंबाळें झालेला मनुष्य. खाण्यापिण्याशीं मूलतः कांहींएक संबंध नाही.

खांदणें [ खांदा den मराठी ]

खांदा [ स्कंधक = स्कंधअ = स्कंदअ = खांदा ] (स.मं.)

खादी १ [ खादिका = खादी (वस्त्रविशेष). खद् आच्छादने ] आच्छादण्याचें वस्त्र. (२) [ खाद् ]

खांधटी [ स्कंधास्थि ] *(खामटा पहा)*

खापरतोंड्या [ खर्परतुंडः = खापरतोंड्या ]

खांब १ [ खांब हा शब्द स्कंभ या शब्दापासून निघाला आहे; स्तंभ या शब्दापासून निघाला नाहीं. कुठरो दंडविष्कंभः (अमर - द्वितीयकांड - वैश्यवर्ग - ७४) विष्कंभ = स्तंभ ] (भा. इ. १८३३) (२) [ हा मराठी शब्द संस्कृत स्तंभ, महाराष्ट्री खंब्भ, अशा परंपरेनें निष्पन्न झाला, म्हणून प्राकृत वैय्याकरण समजतात; परंतु ती चूक आहे. स्तचा महाराष्ट्रींत त्थ, थ, थ्थ होईल. क्ख, ख होणार नाहीं. पुण्यस्तंभ = पुणथंब; रणस्तंभोर्वी = रणथंबोर; या स्थलीं स्तचा थ यथार्थ झालेला आहे. खांब या मराठी व क्खंभ या महाराष्ट्री शब्दांतील ख स्तपासून निघालेला नाहीं; स्कपासून निघालेला आहे. पाणिनीय स्कंभ् धातूपासून महाराष्ट्री क्खंभ व मराठी खांब निघालेला समजणें युक्त आहे. ] (भा. इ. १८३२)

खांबटी [ कक्षापुटी, स्कंधपुटी, स्कंधास्थि = खांबटी, खामटी the part of body near the shoulder blade above or under ] खांबटीला धरून ओढणें.

खांबुल्यो [ खाबुल्लो (खांब, स्तंभ) ] हा हि शब्द खेळांत योजतात. प्राकृत आहे. (भा. इ. १८३२)

खामटा [ स्कंधास्थि = खांधटी, खामटी, खामटा ]

खामटी [ कक्षापुटी, स्कंधपुटी, स्कंधास्थि ]

(खांबटी पहा)
खाय [ क्षाति ] (खाई पहा)
खार १ [ क्षारितं = खार ] क्षारित म्हणजे अपराध, दोष. पदराला खार लावणें म्हणजे अपराध, दोष पदरीं बांधणें. (२) [ क्षार = खार. क्षारः म्हणजे रस] लोणच्याचा खार म्हणजे रस.
खारट [ क्षारिष्ट = खारिट = खारट ] (भा. इ. १८३२)
खारिक [ खर्जूरिका = खारिक ]
खाल (लीं) [ खतल = खअल = खाल ] ख म्हणजे खळगा, रिकामी जागा. (भा. इ. १८३४)
खालीं [ खात = खाल = खालीं (सप्तमी)] संस्कृत भूतकालवाचक धातुसाधिताच्या तचा प्राकृतांत व मराठींत ल होतो. खात म्ह० खणलेलें, खड्डा; त्यावरून अधोभागींची जागा. घर खाली करणें, ह्या वाक्यांतील खाली शब्द फारशी आहे. त्याचा अर्थ रिकामें. ह्या फारशी खाली शब्दाच्या ईकारावर अनुनासिकाचा बिंदु नाहीं. (ग्रंथमाला)
खास [ काश्यं = खास ] काश्य म्ह० दृश्य, स्पष्ट. हे खास आहे म्ह० स्पष्ट आहे. (आगाशी पहा)
खिख्या [ किखिता = खिखिआ = खिख्या] किखि म्ह० माकड. किखिता म्ह० मर्कटपणा. खिख्या म्ह. माकडचेष्टा, थट्टा.
खिचडी १ [ कृसरं, कृसरिका = खिचडी. कृ = खि. स = च. र = ड. ] (२) [ कृशरः = किचडा = खिचडा. (स्त्री.) खिचडी ] तांदूळ व डाळ यांचें अन्न म्हणजे कृशर. (भा. इ. १८३५) (३) [ कृशरा = किचडी = खिचडी ]
खिजे [ खिद्यते = खिज्जए = खिजे ] (भा. इ. १८३३)
खिटखिट [ खिट् त्रासे (द्विरुक्ति) ] (ग्रंथमाला)
खिण [ क्षणं = खिण ] खिण असा उच्चार अशिष्ट करतात.
खितपड [ क्षिति + पत् ]
खितपणें १ [ पत् १० गतौ. क्षितिपतनं = खितपणें ] खितपणें म्ह० खालीं जमिनीवर पडणें. (धा. सा. श.) (२) [ क्षि + तप् = खितप + णें = खितपणें. क्षि (क्षय पावणें, खंगणें) व तप् (तापणें) या दोन संस्कृत धातूंच्या जोडापासून हा मराठी धातू निघाला आहे. ] (भा. इ. १८३५)
खितपत [ क्षिप्त = खिपत = खितपत. क्षिप् ४ प्रेरणे ] खितपत पडला आहे = क्षिप्तः पतितोस्ति. क्षिप्त म्ह. टाकलेला, लोटून दिलेला.
खिरा [ क्षीरकः = खिरा ] water-melon.
खुजट [ क्षोदिष्टः = खुजिट = खुजट ] (खुजा २ पहा)
खुजा १ [ कुब्जः = खुजा. कुब्जटः = कुबडा ] (२) [ क्षुद्रः = खुज्जा = खुजा. क्षोदिष्टः = खुजिट = खुजट. खुजिट + ल = खुजिटला ] (३) [ (क्षोदस् = पाणी ) क्षौदसः = खोजा, खुजा (पाण्याचा) ] खोजा, खुजा म्हणजे मातीचें पाणी ठेवण्याचें विशिष्ट भांडें.
खुजी [ खुज् १ स्तेयकरणे ] (धातुकोश खुज पहा)
खुटणें, खुंटणें, खुडणें, खुंडणें [ खुड् to break in pieces ] (खोडणें पहा)
खुडवा [ क्षुद्रवापः = खुडवा ] (मूळवा पहा)

खुतकन् हसणें [ क्षुत् (शिंकणें) = खुत् ] शिंकण्यासारखें अल्प हसणें. (भा. इ. १८३२)

खुनशी १ [ क्नसिन्, क्नसिकः ] *(धातुकोश - खुनस १ पहा)* (२) [ कुहनशील = खुनशी ] कुहन म्ह. मत्सरी. फारसी शब्दाशीं संबंध नाहीं. खुनी शब्द निराळा. (भा. इ. १८३६)

खुनस [ क्नसः ] *(धातुकोश - खुनस १ पहा)*

खुनी [ कुहनिकः (कपटी) = खुनी. कुहनं = खून ] खूनकपट असा जोड शब्द च आहे.

खुपस (दशमी) [ घृतस्पृश् touched with ghee = खुपस (दशमी) ] a cake, the flour of which has been just touched with a little ghee.

खुवा १ [ कूपक = कुवा= कुबा = खुबा] (स.मं.) (२) [ गुल्फ = गुप्फ, गुप्फा (अनेकवचन). हकाराचा फेरबदल होऊन व वर्णविपर्यय होऊन खुबा ] (ग्रंथमाला)

खुरकूत [ खोरकः = खुरकूत ] गुरांचा रोग.

खुरखुरणें [ खुर् ६ to scratch, to itch खुरति ] to itch, to long.

खुर्खुर् [ खरुः (दर्पः) = खुर्खुर ] द्याश्रयकाव्य -४-५४

खुर्दा [ कूर्दः = खुर्दा. कूर्द् खुर्द् to jump] खेळ, उड्या. खुर्दा फार झाला आहे, असें दांडगाई करणाऱ्या मुलांना म्हणतात. येथें खुर्दा म्ह० दांडगाई, उड्या.

खुशाल [ कुशल = खुशल = खुशाल ]

खुष [ घृष् to be joyful = खुष ] ह्या घृष् पासून फारसी खुष शब्द निघाला आहे. फारसी खुष आणि मराठी खुष एकार्थक आहेत.

खुळा [ कुणि having a withered arm वैजयंति = खुळा ] खुळा हात.

खुळी [ क्षुद्रा = खुळी ] wretched, insignificant.

खूण [ क्षुद् ४ संपेषणे. क्षुण्ण = खूण ] क्षुण्ण म्ह० जखम लागली, चेचलेलें. दगडाची खूण म्ह० दगडानें चेचलेल्याचें चिन्ह.

खून [ कुपिनी (मासे धरण्याचें बांबूचें यंत्र) = खून (स्त्री.) ] मासे धरण्याचें बांबूचें यंत्र.

खेॐ [ क्षिप्रम् ] *(खेवों पहा)*

खेच [ क्षेय = खेच ] *(खय पहा)*

खेचर [ खेचराचें संस्कृत नांव अश्वखरजः अश्वखरज म्ह० घोडें व गाढव यांजपासून झालेला. पैकीं अश्व शब्द जाऊन नुसता खरज शब्द या प्राण्याला लागूं लागला. गाढवाला खर हा शब्द आहे. तेव्हां खरज हा शब्द घोडा व गाढव यांच्या संकराला लागूं लागला. वर्णविपर्यास होऊन खरज = खजर. ज चा च होऊन खजर = खचर. उच्चार सौकर्यार्थ अ बद्दल ए होऊन खचर = खेचर ] (भा. इ. १८३७)

खेटऱ्या [ क्षेत्रियः committing adultery with the wife of another वैजयंती = खेटऱ्या ] खेटऱ्या ही मराठींत शिवी आहे.

खेटी [ खे + अट् (noun) खेऽटिका = खेटी - plural खेट्या ] खेट्या घालणें. to come and go uselessly.

खेटून (बसणें) [ खेट् १ भये ] *(धातुकोश - खेट ३ पहा)*

खेट्या १ [ क्षेत्रज्ञः (प्रवीणः) = खेटज्ञा =

खेटया = खेट्या ] त्यांतला खेट्या पाहिजे म्हणजे प्रवीण पाहिजे. (२) [ क्षेत्रियः = खेट्या. क्षेत्रियः अप्रतीकार्यः (५-२-९२) ] खेट्या रोग म्ह० बरा न होणारा रोग.

खेती [ क्षेत्रपत्यं = खेती ] खेती म्ह. शेती.

खेप १ [ क्षेप leaping across (वैजयंती) = खेप ] (२) [ केप् to go = खेप ] *(धातुकोश - खेप २ पहा)*

खेव [ (व्या) क्षेप = खेव ] खेव म्ह० अडथळा.

खेवों [ क्षिप्रम् immediately = खेॐ, खेवों] (ज्ञानेश्वरी) immediately, as soon as.

खेळणें [ क्रीडनकं = कीळणअ = खेळणें किंवा क्रीडनकं = कीळणँ = केळणें = खेळणें ]

खेळीमेळी [ क्ष्वेल्य sport, joke + म्लेव्य sociableness = खेळीमेळी ] sport of sociability. खेळीमेळीनें रहाणें.

खेळ्या १ [ क्लीव् १ सामर्थ्ये ] खेळ्या म्ह० महत्त्वाकांक्षी. *(धातुकोश - खेळव ३ पहा)*

खै [ क्षितिः ] *(खय ३ पहा)*

खैर [ क्षेमतरं = खैर ] क्षेमतरं भवेत् = खैर होईल.

खो १ [ खोर् गतिप्रतिघाते नाम खोर् = खो] stop. (२) [ क्षयः = खो ] stop (३) [ स्कुंभ् to stop, hinder स्कुंभः = खे ] stop, hindrance. (४) [ क्षोभ = खोह = खोअ = खो ] अडथळा, उत्पात, खीळ. (भा. इ. १८३२) (५) [ क्षोभः = खोह = खो]

खो देणें [ (स्कु to lift) स्कवः = खव् = खो ] lift. खो देणें म्हणजे उचलून टाकणें.

खोकड [ कोक + ट (स्वार्थक) = खोकड] कोक म्ह० वृक. खोकड म्ह० बोक्यासारखा एक हिंस्र वन्य पशु आहे.

खो (घालणें) [ खोर् गतिप्रतिघाते ]

खो खो [ खोखू ]

खो खो (चा डाव) [ स्कु to go by leaps = खो खो ] a game of leaps.

खो खो (हसणें) [ खुड् शब्दे = खो खो (हसणें) ]

खोंच [ कूर्चः hypocracy, deceit = खोंच ]

खोजा [ क्षौदसः ] *(खुजा ३ पहा)*

खोट १ [ घुंटिः, घुटिः = खोट, घोटा ] (२) [ घोट शब्दाचें दुसरें रूप ] (स. मं.) (३) [ क्षोट ] *(खोटें १ पहा)* (४) [ (कूट) कौट = खोट (टा - टी - टें) (भा. इ. १८३५)

खोटें १ [ क्षोट (क्षये) = खोट = खोटँ = खोटें (क्षय पावणारें) खोट = नुकसान] (ग्रंथमाला) (२) [ कूट = खूट = खोट (टें, टा, टी) (असत्य) ] (भा. इ. १८३२)

खोटें - टा - टी [ खरेंकुडें असा जोडशब्द मजजवळील मुकुंदराजी ज्ञानेश्वरींत येतो. कचा ख होऊन व डचा ट होऊन कुड = खुट = खोट (टा - टी - टें). ड चा र होऊन खुर (रा - री - रें) खरेंखुरें ] (भा. इ. १८३२)

खोड १ [ खोड् to be lame, खोडिः lameness, fault, failing = खोड ] (२) [ खोडता = खोडी, खोड (व्यंगता)] a fault, a bad habit. (३) [ कुड् to play like a child, कुडी N. = खोड, खोडकर, खोडी ]

खोंड १ [ षोडन् = खोड = खोंड ] सहा

दांत ज्याला आले आहेत तो बैल म्ह. खोंड. (२) [ षंड = खोंड (तरुण बैल). षंडः स्मृतो बलीवर्दे ]

खोडकर [ कुड् to play like a child, कुडी N. ] (खोड ३ पहा)

खोडणें [ खुड् to break in pieces = खोडणें. खुंड् to break in pieces = खुडणें, खुडंणें, खुंटणें, खुटणें ]

खोडसाळ [ कूटशालः ] खोट्या शाळेचा, चालीचा. (भा. इ. १८३५ व चिट्ठी)

खोडा [ खोरः, खोलः = खोडा ] खोडा म्ह० प्रतिबंध.

खोडाखोड [ खोराखोरिः = खोडाखोड. खोर् गतिप्रतिघाते ] खोडाखोड म्ह० लिहिण्याच्या गतींत प्रतिघात.

खोडी [ कुड्, खुडी N ] *(खोड ३ पहा)*

खोड्याळ [ कुटिल = खोडिल = खोड्याळ]

खोत [ क्ष्मापतिः ] *(खोती पहा)*

खोती [ क्ष्मापत्यं = खोती. खोती म्ह० भूमीची मालकी. क्ष्मापतिः = खोत ]

खोबण [ स्कुंभनं = खोबण. स्कुंभ् आधारे] खिळा, बिजागर फिरण्याला आधार म्हणजे खोबण. (डाव) खोरा हात [ खोर् ]

खोरें (डोंगराचें) [ कुहरं = खुअरँ = खोरें (भा. इ. १८३३)

खोली १ [ क्रोडः = खोला. क्रोडा, क्रोडिका = खोली ] क्रोड म्ह० मधला भाग, चार भिंतींमधला घराचा भाग. (२) [क्रोड, क्रोडा, क्रोडिका = खोली] क्रोट म्ह० निम्नप्रदेश. खोली म्ह० निम्नप्रदेश.

खोळ १ [ खल्ल = खोळ ] (भा. इ. १८३६) (२) [ खोलि helmet, helmet - like pot, armour for the head = खोळ ] घोंगडीची खोळ helmet - like fold of a घोंगडी to wear on the head. (३) [ (खोलिः (बाण ठेवण्याचा भाता) = खोळ ] एक प्रकारची पिशवी. (४) [ खोलक (शिरस्त्राण) = खोळ (धोत्राची) ] (५) [ (कादंबर्यां) खोलः = खोळ; खोलिका = खोळ ] (६) [ खोल म्ह० शिरस्त्राण. खोल = खोळ (घोंगडीची डोक्यावरून घेण्याची) ] (भा. इ. १८३३)

खोळ (धोगटी) [ खोलि म्ह० भाता, बाण ठेवण्याची पिशवी. खोलि = खोळ (स्त्रि)] (भा. इ. १८३३)

खोळंबणें १ [ लब् १ अवस्रंसने. खोल्लंबनं = खोळंबणें. ] आकाशांत लोंबत रहाणें. (धा. सा. श.) (२) [ लब् १ अवस्रंसने. क्षणावलंबनं = खणोलंबणँ = खओळंबणें = खोळंबणें ] क्षण म्ह० रिकामा वेळ, त्याचें अवलंबन करणें म्ह० खोळंबणें. (धा. सा. श.)

खौंदळ [ क्षतबंध ] *(खवंद पहा)*

## ग

गंकार (गकाराची बाधा) [ गमकार (अविचार) = गंकार ] गकाराची बाधा म्हणजे अविचाराची बाधा. गकाराची बाधा म्ह० गर्वाची बाधा म्हणून समजतात, परंतु तें निराधार आहे. (भा. इ. १८३४)

गंगावण [ डु नादे ] *(गोंगावणें पहा)*

गचकन् [ (गम्) गच्छ् १ गतौ ] *(धातुकोश - गच १ पहा)*

गच्च [ गृध्य = गज्झ = गज्ज = गच्च.

गर्धः अभिलाषातिशयः ] गच्च म्हणजे सडकून. (भा. इ. १८३४)

गज (माप) [ गजः (दोन हात लांबीचें माप) = गज ] माप.

गजबजाट [ गज् + बद् ] *(धातुकोश - गजबज पहा)*

गजर [ गज् = नाद करणें, ह्या धातूपासून गजर = महाध्वनि, हा शब्द निघाला आहे. अर्थात् हा शब्द फारसीं नाहीं. ] (स. मं.)

गंजी [ गंजा (कोशगृहं) = गंजी ] गवताची गंजी म्ह० गवत साठवून ठेवण्याची इमारत.

गट १ [ ग्रथ् १० बंधने ] *(धातुकोश गट १ पहा)* (२) [ ग्रंथः = गट. ग्रंथः class, arrangement.]

गटकन्, गटदिनी [ *चटकर पहा* ]

गटगट, गटागटा [ गॄ to swallow = गरगर = गटगट, गट्गट्, गटागटा ] पाणी गटगटा पितो.

गटार [ गत्वर transient = गटार transient ] गटार बातमी = उडत बातमी flying news.

गट्गट् [ *गटागट पहा* ]

गट्टी [ ग्रंथि ] *(धातुकोश - गट १ पहा)*

गंठिसोड [ ग्रंथिचुट्, ग्रंथिछुट् = गंठिसोड ] cut-purse, pick pocket.

गडदी [ गुड ६ रक्षायाम्. गुड + धि = गुडदी ] (धा. सा. श.)

गंडस्थळ [ गंडस्थल = गंडस्थळ ] (स. मं.)

गंडा [ गंडक (अडथळा) = गंडा ]

गडू [ गडुः = गडू = घटकः = घटुकः ]

गंडेरी [ इक्षु रसालो गंडीरी (हेमचंद्र-निघंटुशेष) ] (ग्रंथमाला)

गड्डा [ (स्त्री.) गर्ता = गड्डा (पु.) ] (भा. इ. १८३२)

गढूळ १ [ गडुल = गढूळ ] (२) [ गोधूल = गढूळ ] dusty.

गणेरी [ गणकारिका = गणेरी ] गणेरीला थोरीली ऐरण म्हणतात.

गताड [ गर्ततटः = गताड ] खोल खड्डा.

गदगदा [ गदगदं = गदगदा (हसतो) ]

गंध - गंध या शब्दाचा मराठींत लेशमात्र असा एक अर्थ प्रसिद्ध आहे. तो च अर्थ पाणिनीच्या कालीं हि होता. तत्संबंधानें पाणिनीनें अल्पाख्यायाम् (५-४-१३६) असें सूत्र रचिलें. सूपगंधि भोजनं, घृतगंधि भोजनं, घृताचा लेशमात्र ज्यांत आहे तें भोजन. गंधो गंधक आमोदे लेशे संबंधगर्वयोरिति विश्वः। पैकीं आमोद, लेश, संबंध हे तीन अर्थ मराठींत प्रचलित आहेत. (भा. इ. १८३६)

गंध ( अल्पार्थक) [ अल्पाख्यायां (५-४-१३६ पाणिनि) गंधः = गंध ] त्याला अक्षराचा गंध नाहीं म्हणजे अक्षराचें अल्प ज्ञान नाहीं. हा शब्द पाणिनीय कालापासूनचा आहे.

गधडा [ गेहेधृष्टः bold at home, coward = गधडा ] a boastful, useless child.

गंधवाटी [ गंधवर्ति = गंधवट्टी = गंधवाटी] (भा. इ. १८३२)

गपकन् १ [ गृभ् clasp = गपकन् ] graspingly. (२) [ गृभ् = गप् ] गपकन् धरणें.

गफलत [ ग्लपतिः = गळपत = गपळत, गफलत ] फसवणूक, चूक.

गबर [ गव्हर = गब्भर (पाली) = गब्बर = गबर ] (भा. इ. १८३२)

गबरू [ गर्भरूपक (पोर, मुलगा) = गबरू]

ए गबरू! कोठें गेला होतास, येथें लेका! पोरा! या अर्थी गबरू शब्द योजलेला आहे.

गबाळ [ गोवाल (गाईचे केस) = गबाळ ]

गम् [ अगमत् = गमणें. अगछत = गचणें.] (भा.इ. १८३४)

गम १ [ गम (अविचार) = गम ] (भा. इ. १८३४) (२) [ आ + गम् (आगमेः क्षमायां) ] आगमयस्व तावत् = गम तर खा थोडी. गम म्हणजे क्षमा. मी थोडीशी गम खाल्ली म्हणजे क्षमा केली.

गमणें [ गम्ब् = गम्बति. गम्बन = गम्मण = गमणें ] वेळ घालवणें. (भा. इ. १८३४)

गमे [ गम्यते = गमे (कर्मणि) ] गमे म्ह० समजे. मज गमे = मे गम्यते. (भा. इ. १८३४)

गयावया - गयावया हा शब्द प्राकृत गअवइ शब्दापासून निघाला आहे. गयावया ह्या शब्दाचा मराठींत अर्थ निराश्रित असा आहे. प्राकृत गअवइ शब्दाचें संस्कृत रूप गतपतिका आहे. ज्या स्त्रीचा नवरा गेला आहे तिला प्राकृतांत गअवइ म्हणत. गतपतिकेप्रमाणें दिसणाऱ्या व वावरणाऱ्या निराश्रित माणसाच्या कृतीला अनुलक्षून गयावया हा शब्द योजतात. ( स. मं. श्रावण १८२६)

गयावळ [ गयापालकः = गयावळ ] प्रयागपालकः = प्रयागवळ. ]

गर [ गरः that which can be swallowed, eaten = गर. गॄ to swallow ] कोणत्या हि फळांतला खाण्यासारखा मऊ भाग.

गरज १ [ गृध = गरज. गृध्य = गरज्ज = गरज. गृध इच्छा, वांछा करणें ] गरज म्ह० इच्छा, वांछा. (भा. इ. १८३३) (२) [ गृध्र = गरज्ज = गरज ] (भा. इ. १८३४)

गरजू १ [ गृधु = गरजू ] इच्छा करणारा. (भा. इ. १८३३) (२) [ गृह्यक = गरज्जअ = गरजू ] (भा. इ. १८३४)

गरती १ [ गृहपत्नी = घरअत्ती = घरत्ती = गरती ] (भा. इ. १८३४) (२) [ गृहस्था = घरता = गरत = गरती ] (स. मं. गोतावळा) गरवस, गरवा [ गरीयस् = गरवस, गरवा] उशीरां येणारें भात, पीक.

गरवें [ (गुरू) गरीयस् = गरवें (भात) ] तयार होण्याला फार काल लागणारें भात. (भा. इ. १८३४)

गरा [ ग्रहः – घरा = गरा ] गरा हा मुखरोग आहे. (घरा पहा)

गर्दन १ [ गर्द् १ शब्दे. गर्दनिः = गर्दन ] गर्दन म्ह० शब्द करण्याचा अवयव. (२) [ हा फारसी शब्द आहे. ] (स. मं.)

गर्बा [ गर्भः = गर्बा ]

गर्मी - ह्या रोगाचा उल्लेख कौशिकसूत्रांत २७।३२ त केला आहे :- मुंचामि त्वेति ग्राम्ये पूतिशफरीभिरोदनम् । दारिलः, ग्राम्यो व्याधिः मिथुनसंयोगात् पितादूरति प्रसिद्धाभिधानः । (भा. इ. १८३२)

गलतान १ [ गलस्तनी = गलतान ] शेळीच्या गळ्यावरील थानाप्रमाणें निरुपयोगी माणसाला गलतान म्हणतात. (२) [ गलस्तनः (बकरें) = गलतन = गलतान ] गलस्तन म्हणजे निरुपयोगी स्तनाकृति अवयव ज्याच्या गळ्याला आहेत तो प्राणी; निरुपयोगी प्राणी. (भा. इ. १८३७)

गलबत्या [ गलवार्ताः = गलवत्ये ] दृश्यन्ते

चैव तीर्थेषु गलवार्ता: तपस्विनः (पंचतंत्र - तृतीयतंत्र - कथा ३)

गल्बल [ कल् + वल्ह् किंवा वल् = गलबल; गल् + वल्, कल् to make noise, वल्ह् to speak ]

गलेलट्ठ [ गल अदने. लष् सुखी असणें. गलल्ष्ठ = गलल्ठ = गलेलट्ठ ] (ग्रंथमाला)

गवई [ गोपति ] *(गोवई पहा)*

गवगवा १ [ गवगवः ] *(धातुकोश - गवगव पहा)* (२) [ गु to sound]

गवत १ [ गो + अत्तम् = गवत्तम् = गवतँ = गवत ] (स. मं.) (२) [ गोअत्तं = गवत्तं = गवत ] *(रोशे गवत पहा)*

गवसणी १ [ गवाक्षन् = गवासण = गवसण (णी) ] छिद्रें किंवा जाळी असलेलें वस्त्र, पिशवी, दोरा. (भा. इ. १८३३) (२) [ गवाक्षायनं ] (ज्ञा. अ. ९ पृ. १९)

गवसणें [ गेषण ] *(वेसण दहा)*

गवा [ गमः (march) = गवा ] त्याच्या गव्यांत तो आला पाहिजे.

गव्हला [ गोधूमवल्लः = गोहूअँवल = गोहूला = गव्हला ] गव्हले वळणें असा बोलण्याचा संप्रदाय आहे. वल् या क्रियापदापासून वल, वल्ल हे शब्द निघाले आहेत.

गहाण [ अवगाहनं = गाहाण = गहाण ] अवगाहनं नाम आश्रयभूमिः क्षेत्रावगाहनं = शेतगहाण.

गहिरा [ गभीरः = गहिरा ] हिरवा गहिरा म्हणजे अति हिरवा.

गळ [ गलः = गळ ]

गळचेपी [ गलेचोपिका = गळचेपी ] (कर्तृकरणे कृता बहुलं २-१-३२)

गळणें [ ग्लै = गळ (णें) ] गळणें म्ह० म्लान होणें. (भा. इ. १८३६)

गळपणें [ ग्लपनं = गळपणें ] (भा. इ. १८३४)

गळा [ गलक = गलअ = गला = गळा ] (स. मं.)

गळूं १ [ ग्लौ (excrescence) = गळूं] (२) [(वैदिक) ग्लौ = गळौ = गळूं ] (भा. इ. १८३६)

गाउंडा [ ग्रामकूटः (शूद्र, noblest man in the village) = गाउंडा, गावुंडा, गावंडा ]

गागज १ [ (गद्) गागद्यते = गागजणें ] (भा. इ. १८३६) (२) [ गागर्ज् (क्रियासमभिहार) = गागज्ज = गागज] जोरानें ओरडणें. (भा. इ. १८३३)

गागणें [ घग्घ् हंसणें, रागावून बोलणें. घग्घ् = गग्ग = गाग्. घग्घन = गागणें ] (भा.इ. १८३३)

गागोडें [ गर्गपद्र = गागोडें ] (भा. इ. १८३६)

गाजरपारखी [ गर्ह्यपरीक्षी = गज्झापारखी. गर्ह्यतरपरीक्षी = गज्झअरपारिखी = गाजारपारखी = गाजरपारखी ] गाजर या पदार्थाशीं कांहीं संबंध नाहीं. अति वाईट परीक्षक, अधम परीक्षक तो गाजरपारखी. (भा. इ. १८३३)

गाठ [ ग्रंथि = गांठि = गाठ ] (स. मं.)

गांठ [ ग्रंथिः purse = गांठ ] गांठ म्ह० द्रव्याचा कसा. गांठीला पैसा नाहीं.

गांठण [ ग्रंथ् १ कौटिल्ये, ग्रंथनि = गांठण, गांथण ] (धा. सा. श.)

गांठळ [ ग्रंथिल = गांठिल = गांठळ ]

गांठोडी [ ग्रंथकूटी = गांठऊडि = गांठोडी] (भा. इ. १८३४)

गांठोडी - डें [ ग्रंथकूटी = गांठोडी - डें ]
गाडगें [ घटकं = गडगें = गाडगें ]
गाडिच्या [ गर्ध्य = गाडिच (निंद्य). गर्दभीय = गाढविच्या ] गाडिच्या शब्द गाढविच्या शब्दाहून निराळा.
गाडी [ गंत्री = गँडी = गाडी ] (ग्रंथमाला)
गांडू [पोगंडः = गांडू (diminutive ऊ) (loss of पो) ]
गांडूळ [ गंडूपद = गांडूअड = गांडूल = गांडूळ ] (वाग्भट = यंत्रविध्यध्याय) (भा. इ. १८३४)
गांडोळ [ गंडूपद = गांडोड = गांडोळ, गांडवळ. (द = ड = ळ ]
गांथण [ ग्रंथनिः = गांठण, गांथण ] *(गांठण पहा)*
गांध [ (गंध् हिंसा करणें) गंधः = गांध ]
गांधिल [ गंधिल = गाँधिल = गांधिल (हिंस्र, दंशक) गंधाला = गांधील माशी]
गांधिल (माशी) [ गंधाली = गांधाल = गांधिल ] गंधाली म्ह० गांधिलमाशी. गंध् म्हणजे पीडा करणें. (भा. इ. १८३३)
गांधील माशी [ गंधोल wash = गांधील माशी ]
गाभडी [ गर्भधि = गाभडी. गर्भिणी = गाभण ] कपोत इव गर्भधिम् ( ऋग्वेद - अ. १ - अ. ६ - सू. ३० ऋ ४ )
गाभसरा [ गर्भस्रावः = गाभसरा ] falling of the foetus.
गाभाट [ हन् २ घाते. गर्भघात = गाभाट] (धा. सा. श.)
गाभार १ [ N. गर्भगृहं = गाभारा M. ] (२) [(न.) गर्भागारं = गाभारा (पुं.)]
गाय [ गावी ] *(गायी पहा)*
गायन [ गै १ शब्दे. गायनं = गायन ] (धा. सा. श.)
गायमान्या [ गांमन्यः = गायमान्या ] अति नम्र. (भा. इ. १८३४)
गायी [ गावी = गाई = गाय. गौरित्यस्य शब्दस्य गावी गोणी गोता गोपोतलिकेत्येवमादयोऽपभ्रंशाः। (पतंजलिमहाभाष्य Vol. I. P. 2-Keilhorn) ] गाई हा शब्द पतंजलीनें उल्लेखिलेल्या गावी ह्या अपभ्रष्ट शब्दापासून निघाला आहे. (भा. इ. १८३३)
गार १ [ निगारयति swallows, eats = गार, (नि + गृ) त्यानें चार भाकरी गार केल्या म्हणजे खाल्ल्या, निगरणचलनार्थेभ्यश्च १-३-८७ पाणिनी. (२) [ (गृ सिंचने) गारा = गार ] गार म्ह० पाण्याचे कठिण बिंदू. (३) [ कर्करः - री (एक प्रकारचा दगड) = गअर = गार ] (भा. इ. १८३६) (४) [ गौरवाय = गारवाअ. गुरु = गार (स्तब्ध, थंड) ] (भा. इ. १८३२)
गारा १ [ करकाः = गरआ = गारा ] (ज्ञा. अ. ९ पृ. ७८) (२) [ (गृ सिंचने) गारः = गारा ] भिजलेली माती.
गारुडी [ गारुडिकः = गारुडी. गारुडिकः अहितुंडिकः ]
गार्‍हाणें [ गर्ह् १ निंदायाम् - कुत्सायाम्. गर्हणं = गार्‍हाणें = तक्रार ]
गाल [ गल्ल ] (स. मं.)
गालगुंड १ [ गलगुंडिका ] (भा. इ. १८३७) (२) [ गलगंड ] (भा. इ. १८३४)
गालगुद [ गलगदः = गालगुद. कंठरोगः

गलगदः ॥ ( केयदेव - पथ्यापथ्यविबोध)] (भा. इ. १८३४)

गालफड [ गल्लफलकः = गालफडा = गालफड ] (स. मं.)

गालमिशी [ गल्लस्मश्रु = गालमिशी ] (स. मं.)

गांवकी [ ग्रामिक्यं = गांवकी ]

गांवगन्ना [ ग्रामोपघ्नः = गांवगन्ना (bordering on every village).). उपघ्न. vicinity, proximity. घ्नः = गन्ना. दुर्गोपघ्नः = डोंगरगन्ना ]

गावंडा [ ग्रामकूटः ] *(गाउंडा पहा)*

गावडी १ [ गोवधूटी (a bull's wife) = गावडी ] (२) [ गौर्गडिः = गावडी] lazy cow. a young lazy ox.

गांवडें, गांवढें [ ग्रामटिका = गांवडें - ढें ] लहान गांव.

गावँढ (ढा - ढी - ढें) [ ग्रामड (ग्रामषंड) = गावँढ ] ग्रामड असा शब्द पाणिनीयांत आहे. (भा. इ. १८३६)

गांवढें [ ग्रामटिका = गांवडी = गांवढें. ग्रामटिकिकः = गांवढ्या ]

गावण [ गवीनं = गावण (गुरांची) ] गवत खाण्याची जागा.

गावुंडा १ [ ग्रामकूटः ] *(गाउंडा पहा)* (२) [ ग्रामषंडः = गावुंडा ]

गावोगाव [ गामाओ गामो = ग्रामात् ग्रामः = गावोगाव. गावो ही पंचमी आहे व गाव प्रथमा किंवा द्वितीया आहे. घरोघर, दारोदार इत्यादि. ग्राम व ग्राम असा समास नाहीं. ]

गाहाण [ अवगाहनं ] *(गहाण पहा)*

गाळण [ ग्लै १ हर्षक्षये. ग्लानि = गाळण (स्त्री.) ग्लै = ग्रै = गेरे = घेरी (अत्यंत ग्लान होणें) ] (धा. सा. श.)

गाळणमाळण [ ग्लानिः म्लानिः = गाळणमाळण ]

गाळा [ अगारः = (अ लोप) गाळा ] a set of rooms more long than short.

गाळी [ गल्हिका = गल्हिका = गाळ्ही = गाळी (निंदा) ] (भा. इ. १८३२)

गिट्टा [ गृष्टिः = गिट्टा ] आर्य गृष्टे (उत्तरामचरित)

गिधाड [ गृध्राढ्यः ] *(उंटाड पहा)*

गिरणी १ [ गृहिणी = गिरणी ] वृद्धलोक स्वस्त्रीला उद्देशून विनोदानें म्हणतात, आमची गिरणी आतां थकली. येथें गिरणी म्हणजे स्त्री, गृहिणी. दळण्याची गिरणी उच्चारसाम्यामुळें ध्यानांत येऊन चमत्कृति वाटते इतकेंच. (२) [ गीर्णिः (swallowing) = गिरणी ] तोंडाची गिरणी चालली आहे continuing eating.

गिरा [ ग्रहः (ग्रहणं) = गिरा ] गिरा आला म्हणजे ग्रहण आलें.

गिराशी [ गिर्याश्रयी = गिराशी ] डोंगराच्या आश्रयानें रहाणारा.

गिऱ्हाईक [ क्रायक a purchaser = किराईक = गिऱ्हाईक ] a purchaser.

गुज [ गुह्य = गुज्झ = गुज, हितगुज ] (स. मं.)

गुंठाळणें [ *घोंटाळणें पहा* ]

गुडगुड [ गुडगुडायनं = गुडगुड (घरघर) ] पोटांत गुडगुडतें म्हणजे गुडगुड आवाज होतो.

गुडगुडी [ गुडगुडिका = गुडगुडी ] गुडगुड आवाज ज्या नळींतून येतो ती.

गुडदाणी [ गुडधाना (गुडमिश्राः धानाः) = गुडधाणी = गुडदाणी ] एक प्रकारचा गूळ व दाणे यांचा मेवा. (भा. इ.

१८३३)

गुडदी [ गुडधिः = गुडदी. गुड रक्षायां + धि] भांड्याचें तोंड रक्षण करणारें धि म्हणजे झांकण.

गुंडा १ [ गुंडः ] *(धातुकोश - गुंड २ पहा)* (२) [ गुंडकः = गुंडा (पात्रविशेष), गुंडी ]

गुडाकू - खू [ गुडाका (निद्रा, तंद्रा) = गुडाकू - खू ] गुडाकू म्हणजे निद्रा, तंद्रा आणणारा एक धूम्रपानाचा पदार्थ.

गुंडाळलें [ गुंड (गुंडयति) आच्छादने, वेष्टने] माथें वस्त्रानें गुंडाळतो = वस्त्रेण मस्तकं गुंडयति. (भा. इ. १८३३)

गुंडाळा [ गुंडः ] (धातुकोश - गुंड २ पहा)

गुडी [ गुरिका = गुडी, गुढ. गुर ६ उद्यमने]

गुंडी १ [ गुंडिका ] *(धातुकोश - गुंड २ पहा)* (२) [ कुंडिका (कमंडलू, घागर) = गुंडी ]

गुढघा [ टघु + घा = ढोंपराचा संधि ] (स.मं.)

गुढी १ [ गुरिका ] (गुडी पहा) (२) [ घृष्टिः = गुढी ] गुढी पाडवा म्हणजे ती प्रतिपदा ज्या प्रतिपदेस वराहध्वज उभारतात. घृष्टि = वराह. घृष्टिध्वज म्हणजे वराहाचें लांछन ज्या ध्वजावर आहे तो. तदनंतर घृष्टिध्वजाबद्दल नुसता घृष्टि शब्द ध्वजार्थी लावूं लागले. (ज्ञा. अ. ९ पृ. १७७)

गुणाचा (गुण्यः = गुणिज्जा = गुणाचा ] प्रशस्ताः गुणाः यस्य गुण्यः । गुणाचा मुलगा म्हणजे प्रशस्त गुण आहेत असा मुलगा.

गुंतलेलें [ गुंथ ११ गुंथने. गुंथित = गुंतलेलें] (धा. सा. श.)

गुंतवळ १ [ कुंतलावलि = गुंतवळ ] (२) [ कुंतलवलयं = गुंतअवळअ = गुंतवळ] भातांत गुंतवळ सांपडला म्हणजे केस सांपडला (३) [ कुंतल] *(गुंतळ पहा)*

गुंतळ [ कुंतल = गुंतळ, गुंतोळ, गुंतवळ ] भातांत गुंतवळ सांपडला.

गुंतोळ [ कुंतल ] *(गुंतळ पहा)*

गुदखीळ [ प्रायुजो गुदकीलः स्यात् ॥ (केयदेव - पथ्यापथ्यविबोध). गुदकील = गुदखीळ ] (भा. इ. १८३४)

गुदगुदली १ [ गुद गुर्द क्रीडायाम्. गुदगुर्दिका = गुदगुली ] तो मला गुदगुल्या करतो म्हणजे खेळानें खाकेंत हास्योत्पादक स्पर्श करतो. (२) [ गुदगूर्दिका = गुदगुली. गुर्द, and गुर्द to play, to sport] पोराला गुदगुल्या करणें.

गुपचुप [ गुप रक्षणे व चुप मंदायां गतौ ] (ग्रंथमाला)

गुप्चुप् [ गुप् ] *(धातुकोश - गुप पहा)*

गुबा [ गुर्बः = गुब्बा = गुबा. गुर्व उद्यमने] पोटांत गुबा धरला आहे म्हणजे पोट उंच झालें आहे, फुगलें आहे.

गुब्बा [ गुर्वः ] *(गुबा पहा)*

गुरगुज [ (गृज् शब्दे) गुर्गृज् = गुर्गुज, गुरगुज (वाद्यविशेष) ] गृचा अभ्यास ज व्हावयाचा परंतु एथें ज न होतां ग च अभ्यास झाला आहे. मराठींत अभ्यासाचीं अशीं उदाहरणें आहेत.

गुरगुरित् [ गुर्व् to be elevated = गुरगुरित (पोळी वगैरे) ]

गुरम्यांव् [ गुर् शब्दे + मीम् शब्दे = घुरम्यांव, गुरम्यांव ] the purring mew of a cat.

गुरूं १ [ नव्या व जुन्या मराठींत रूं प्रत्यय

ऱ्हस्वत्वदर्शक आहे. जसें : - वत्स = वास = वासरूं (लहानगें वत्स.) महिषी = म्हैस = म्हसरूं (लहानगी म्हैस). तसें :- गौ = गु = गुरूं (लहानगें जनावर). संस्कृत समासांत गु हें रूप येतें. ] (स. मं.) (२) [ गुतर = गुअर = गुरुं = गोरूं (ज्ञानेश्वरी) = गुरूं ] (रूं पहा)

गुर्गुज [ गृज् १ शब्दे. गुरगृज = गुर्गुज (वाद्यविशेष) ] (धा. सा. श.)

गुर्मी [ कु + ऊर्मिः = गुर्मी ] वाईट ऊर्मी. ऊर्मीगुर्मी म्हणजे चांगले वाईट विकार.

गुलकंद [ गुल + कंद = गुलकंद ] गुल म्हणजे गूळ व कंद म्हणजे गोळा, फुगलेला पदार्थ. (भा. इ. १८३४)

गुलफणें [ लुप् ४ विमोहने ] गो (भाषा) व लुंपन म्ह० लोप होणें. गुलफणें म्हणजे तोतरें बोलणें. (धा. सा. श.)

गुवेलें [ गूथचेलं = गुएलें = गुवेलें ]

गुवेलें - रें [ गूथवस्त्रं = गुवेरें - लें ]

गुळगुळित [ गोलगोलित = गुळगुळित ] (भा. इ. १८३४)

गुळचट १ [ ग्लुच् १ स्तेयकरणे. ग्लुच + ट = गुळचट ] तो गुळचट माणूस आहे म्हणजे चोर आहे. (धा. सा. श.) (२) [ ग्लोचट = गुळचट ग्लुच् to steal] गुळचट थापा म्ह. चोराच्या थापा. (३) [ ग्लुच् किंवा ग्रुच् to role, ग्लोचट = गुळचट ] गुळचट म्ह० falsely enticing, falsely captivating. गुळचट थापा falsely captivating talk. येथें च चा उच्चार संस्कृत च मराठी च असा दोन्ही आहे. (४) [ ग्लुच् = गुळच + (ट) = गुळचट. ग्रुचु, ग्लुचु स्तेयकारणे । ] तो गुळचट माणूस आहे म्हणजे चोर आहे.

गुळाशीं कांहीं एक संबंध नाहीं.

गुळणी १ [ गूर्णिः ] *(धातुकोश - गुळगुळ पहा)* (या ठिकाणीं गुळगुळ धातु पहा असें राजवाड्यांनीं लिहिलें आहे परंतु धातुकोशांत गुळगुळ धातूची चिठ्ठी आढळत नाहीं. ] (२) [ गृ to sprinkle, to wet = गुळणी ] पाण्याची गुळणी भरणें म्हणजे पाण्यानें तोंड भिजवणें.

गुळपापडी [ गुडपर्प्पटिका = गुळपापडी ]

गुळपीठ [ गुडपीष्ट = गुळपीट ] (भा. इ. १८३६)

गुळमुळित [ गूढमूढित = गूळमुळित. गूढमूढायते ]

गुळुंब, गुळूम [ गुल्म = गुळूम, गुळुंब ]

गू १ [ गु पुरीषोत्सर्गे ] (ग्रंथमाला) (२) [ गूः (ordure) = गू ]

गूल [ गुल (बारीक गोळी) = गूल ] आगकाडीच्या शेवटाची गोळी. (भा. इ. १८३४)

गूळपोहे [ गुडपृथुकाः = गूळपोहे ] (भक्ष्येण मिश्रीकरणं २-१-३५ अंजनेन व्यक्तं २-१-३४ पाणिनि) दूधभात, दहीभात, ताकभात, गुडदाणी इ. इ.

गेंठी [ गृष्टिः = गेठी (वनस्पती) ]

गेलेलें [ गतगतं ] *(ओलेलें पहा)*

गोखरूं [ गोक्षुरः = गोखुर = गोखरूं ] (भा. इ. १८३४)

गोगलगाय [ गौर्गलिः गौः = गोगलगाय ] दिसण्याला मंद माणूस, मंद बैलाप्रमाणें.

गोंगाट [ जोङ्य ] *(गोंगाव पहा)*

गोंगाव [ ङु १ शब्दे. जोङ्य = गोंगाव, गोंगाट ] (धा. सा. श.)

गोंगावणें [ (पौनःपुन्य) जोङ्यते = गोंगावतो. ङू नादे ] दुसरा शब्द - गंगावण. (भा. इ. १८३६)

गोचीड [ गोक्ष्वेड = गोचेड = गोचीड ] (भा. इ. १८३४)

गोजर ( रा - री - रें) [ गोजरः (old bull) = गोजर (रा - री - रें) ] गोजरा म्हणजे मृदु, मऊ गरीब.

गोजरा [ गोचरः (frequented by cows) = गोजरा. गोजरः (old bull) = गोजरा ] साजरागोजरा हे पर्वत - नांव आहे.

गोजरी [ गोजरः (old bull ) = गोजरी F.] an old cow.

गोजीरवाण (णा - णी - णें) [ गोजरवर्णः = गोजीरवाणा ] of the kind of a soft old bull.

गोट १ [ गोधा = गोढ = गोट ] गोधा म्हणजे मनगटावर बांधण्याचा कातड्याचा पट्टा. हा शब्द हरिवंशांत आला आहे. (२) [ कोटः = गोट (camp) ]

गोठण [ गोष्टीनं = गोठण ] जुना गोठा. गोठणें हें ग्रामनाम आहे.

गोठणें [ गोष्ट् (संघाते) = गोठते ] पानीयं गोष्टते = पाणी गोठतें (भा. इ. १८३६)

गोठा (सं.) गोष्ठी म्हणजे शाला, पडवी, गोठा. प्रथम, गाई, बैल वगैरे जनावरें बांधण्याचा विस्तीर्ण सोपा म्हणजे गोष्टी, गोठा. गोष्ठः = गोठा. नंतर, कोणताही सभा वगैरे भरविण्याचा विस्तीर्ण सोपा, दिवाणखाना वगैरे. (भा. इ. १८३३)

गोंड [ गोवंटः = गोंड ] चरावयाला जाण्याकरितां गुरें एके ठिकाणीं जमविण्याची जागा.

गोडंबें-बी [ गवीधुमत् - मती = गोडंबें - बी]

गोंडा (घोळणें) [ गुंडिकः = गुंडिआ = गोंडा] गुंडिक म्हणजे कणीक, पीठ. कुत्रें गोंडा घोळतें म्हणजे कुत्रें कणीक खाऊन मिटक्या मारतें. (भा. इ. १८३३)

गोडाजी [ गोध्वजिन् (शिव) = गोडाजी ] हे कोण गोडाजी आले म्हणजे (थट्टेनें) परमेश्वर शिव आले.

गोंडाळ [ गंडोलः ]

गोड्या [ गौतम = गोडअँ = गोड्या = घोड्या ] संस्कृत नाटकांत राजा विदूषकाला या नांवानें संबोधतो. खालच्या दर्जाच्या मित्राला हा शब्द लावीत. सध्यां मराठींत उपहास व तिरस्कार या अर्थी गोड्या व घोड्या हीं संबोधनें योजतात.

गोण [ गोणी ] *(गोणी पहा)*

गोणपाट १ [ गोणीतर = गोणताट ] गोणीतर म्हणजे लहान गोणी. (भा. इ. १८३४) (२) [ गोणीतरी a small sack = गोणताट ]

गोणी [ गोणी a sack = गोणी, गोण ] sack.

गोतपत [ गोत्रपटः (geneology) = गोतपट. ट = त ]

गोतावळा [ गोत्रावलि = गोतावळी = गोतावळ = गोतावळा ] (स. मं.)

गोथवड [ गोत्रवाटिका = गोथवड ] गोथवड म्ह० गोठा.

गोधडी [ गुध् परिवेष्टने ] (ग्रंथमाला)

गोंधळ १ [ गुंदल (एका वाद्याचा आवाज) = गोंदल = गोंधळ ] एक प्रकारचें विशिष्ट वाद्य ज्या गाण्यांत असतें तें. (भा. इ. १८३३) (२) [ गुध् खेळणें. गोधळ = गोधळ = गोंधळ ] खेळ, पोरखेळ, गडबड. (भा. इ. १८३३)

(३) [ गुंदल (वाद्यविशेष) = गोंधळ ] गुंदल नांवाचें वाद्य ज्यांत वाजवतात तो गोंधळ. (भा. इ. १८३७) (४) [ गुंदिल = गोंधळ. गुंदिलो मद्दलध्वनौ (वैजयंती) ]

गोफ [ गुफ् ग्रंथे ] (ग्रंथमाला)

गोफण [ गोफणा = गोफण ]

गोफा, गोंफा [ गुंफकः = गोंफा, गोफा ] वेणाची गोफा.

गोम [ गामारिक (कौटिल्य) = गोम ] an insect dangerous to cows.

गोमटें [ गोमत् (भाववाचक नाम) गौमत्यं] गोमत् म्हणजे (वैदिक कालीं) श्रीमंत, अतएव उत्तम श्रेष्ठ. (ज्ञा. अ. ९ पृ. १३२)

गोमा [ गोमान् गोमी (अमर - द्वितीयकांड - वैश्यवर्ग - ५८) गोमान्= गोमा ] गोमाजी बिन तिमाजी, व गोमा गणेश ह्या शब्दांतील गोमा हा शब्द गोमान् ह्या संस्कृत शब्दापासून निघाला आहे. (भा. इ. १८३३)

गोमाशी [ गोमक्षिका = गोमाशी ]

गोरा गोरा पाक [ येथें पाक हा शब्द फारसी आहे ]

गोरा गोरा पान [ (गौरक गौरक) पांडर = पाणअ = पाण = पान. गौर = पांडर = पान ] पाण असा हि उच्चार कोणी करतात. (भा. इ. १८३२)

गोरापान [ गौरः पाण्डुः = गोरापाण = गोरापान. पाण्डु = पाण्ड = पाण = पान ] (भा. इ. १८३४)

गोरामोरा [ गौरमुखरः = गोरामोरा, गोरीमोरी, गोरमोरें ] ती गोरीमोरी झाली म्हणजे तिचा चेहरा पोढरा फटफटित झाला.

गोरालख्ख [ गौरः अवलक्षः = गोरालख्ख. अवलक्ष = (अव लोप) = लख्ख ] (भा. इ. १८३४)

गोरी - पी हळद आणि हो गोरी, या वाक्यांत गोरी ह्या शब्दाचा अर्थ पिवळी असा आहे. पीतो गौरो हरिद्राभः (अमर) गौर - गोर (रा - री - रें) (भा. इ. १८३४)

गोऱ्हा [ गौः + उह्रः = गोऱ्हा ] गौः म्हणजे बैल व उह्रः म्हणजे बैल. गोऱ्हा म्ह० तरुण बैल.

गोवई [ गोपति = गोवई, गवई ] गवई गो (असें एक गाणें आहे)

गोवण [ गोपनी = गोवण ]

गोवरी [ गोपुरीषं = गोउरी = गोवरी ]

गोष्ट [ गोष्ठी (संस्कृत) = गोष्ट ] गोष्ठी या संस्कृत शब्दांत धातु गोष्ठ्. गोष्ठ् म्हणजे बोलणें. आवेस्ती, झंद, फारसीं वगैरे भाषांत गोफन् ह्या धातूचा अर्थ बोलणें असा आहे (सं.) ष्ठ = (फा.) फ्त. संस्कृतांत गौः म्हणजे वाणी, भाषा. (भा. इ. १८३३)

गोष्ठी करणें [ गोष्ठीं करोति (पंचतंत्र) ]

गोहो - ना पुमान् पुरुषो गोधो धवः स्यात् ॥२८॥ धनंजय कोश. (भा. इ. १८३३)

गोळा १ [ गुल्म = गोळा ] त्याला गोळा आला म्हणजे गुल्म झालें. (२) [ गुल्मस्तु जाठरो ग्रन्थिः ॥ (केयदेव - पथ्यापथ्या विचार) पोटांत गोळा झाला आहे म्हणजे गुल्म झाला आहे. गुल्मः = गुल्ला = गोळा ] (भा. इ. १८३४)

गोळी [ गुटी = गुली = गुळी ] (ग्रंथमाला)

ग्रंथ [ ग्रंथ् १ कौटिल्ये ] वांकडा तिकडा सांचलेला पुंजका. हा ग्रंथ कसा उकलायचा.

**घ**

घई [ घाति = घाई = घै = घइ ] घाति म्हणजे पट. तिघई घर म्हणजे तिप्पट घर. पांचघई घर म्ह० पांचपट घर. ओसरी, माजघर, स्वयंपाकघर मिळून तीन घाति म्हणजे घई.

घंगाळ [ गंगाधरं = घंघाळ ] a bucket of गंगा water.

घघ (हसणें) [ घग्घ् = घघ्घ = घघ ] घघ हसतो. (भा. इ. १८३३)

घट्ट १ [ घट् to collect, to gather= घट्ट] (२) [ घृष्ट = घट्ट ] (भा. इ. १८३२)

घटमुट [ घृष्टमृष्ट = घटमुट ] मुलगी चांगली घटमुट आहे = कन्या चार्वंगी घृष्टा मृष्टा च । म्हणजे घासली पुसलेली आहे.

घंटा [ F घंटा pit with the thumb in the middle of the forefingers वैजयंती = घंटा masc. ] घंटा घ्या म्हणजे आघातक्रियादर्शक मूठ घ्या, असा अर्थ आहे.

घंटू, घंट्या [ घंटुः (हत्तीचें अवजड कर्णभूषण) = घंटू, घंट्या ] घ्या घंट्या, घंटू म्हणजे वागवावयाला अवजड अलंकार.

घठार [ घट + आगार = घठार ] a room where vessels of oil, ghee are kept. उ - तेथ उन्हाला आगि पुरा । तेलातुपाचेया घठारा । लागला आणि वारा । सुटला जैसा ॥ ज्ञा. १६-३९३

घड १ [ घट् १० संघाते. घटा = घड, संघट्टिः = सांगड ] (धा. सा. श.) (२) [ घटा (झुंबका, जमाव) = घड ] अंब्यांचा घड म्हणजे जमाव.

घडघड १ [ गद्गद = घडघड ] गद्गदं वाचयति = घडघड वाचतो. (२) [ घट् भाषायां ] *(घडाघडा १ पहा)*

घडमाळ [ घटमाला = घडमाळ ]

घडवंची १ [ घाटमंचिका = घडवंची ] वर चढावयाचा माचा. (२) [ घोटमंचिका = घोडवंचिआ = घडवंची ] घडवंची म्ह० मोठा थोरला माचा.

घडाघडा १ [ घट् भाषायां = घडाघडा, घडघड ] घडघड म्हणजे स्पष्ट उच्चार करून एकसारखें बिनतुट बोलणें. (२) [ घटघटं = घडाघडा (वाचतो) ]

घडीवँ [ घटेलिंम = घडीवँ ]

घणघणित [ घन thick ] thick

घणाघण [ हन् desid. घनीघन् = घणाघण ] to beat intensely घणाघण घाव मारतो.

घन [ गहन = घन ] एक घन रान होतें = आसीत् एकं गहनं अरण्यं.

घनदाट १ [ गहनदृढं = घनदाट ] (२) [ घनंदृढं = घनदाट ]

घबघबित [ गह् ] *(घवघवित पहा)*

घबाड [ गर्भध = घबाड ] घबाड म्हणजे गर्भ धारण करण्याचा अवयव. (राधामाधवविलासचंपू पृ. १७२)

घमघमाट [ घ्राण smell घ्राणघ्राणाढ्यत्वम् = घमघमाट ] extreme smell of ghee, flowers etc.

घर [ गृहाः (क प्रत्यय) = घर ] घर म्ह० बायको, स्वस्त्री. नवरा म्हणतो :- घरांत विचारा म्हणजे बायकोस विचारा. गृहाः म्हणजे बायको. गृहान्

अन्तिकं = घरांत.

घरगस्त [ ग्रहग्रस्त = घरगस्त ]

घरगुती [ गृहगुप्त = घरगुत्त = घरगुत (ता - ती - तें) ] घरांतल्या घरांत गुप्त ठेवावयाचे बोलणें वगैरे. (भा. इ. १८३४)

घरघर [ हृद् ग्रह = घरघर ] हृद् ग्रह म्हणजे हृदयाचा प्रतिष्टंभ. मुमूर्षूच्या हृदयाचा जो प्रतिष्टंभ होतो त्याला घरघर म्हणतात. लक्षणेनें अवष्टंभानंतर होणाऱ्या आवाजाला हि घरघर म्हणतात. (भा. इ. १८३६)

घरचें [ गृहस्थं ] *(कोठचें पहा)*

घरटी १ [ गृहवाटी = घरटी ] (स. मं.) (२) [ गृहस्थिति = घरठिइ = घरटी (घराची जागा) ] (३) [ घृष्टिः = घरट्टि = घरटी (दळण्याची) ]

घरटी, घरोटा, घरटें [ गृहकोष्टकं - कंः - ष्टिका = घरोटा, घरटी, घरटें ]

घरत [ गृहस्थ = घरत ] (स. मं.)

घरपांड्या [ गृहे पंडितः = घरपांड्या ] घरांत बाता मारणारा. (भा. इ. १८३३)

घरमेढी [ गृहमेधिन् = घरमेढी ] (भा. इ. १८३४)

घरवाल (ला - ली - लें) [ गृहपालः = घरवाला ]

घरा [ ग्रहः = घरा = गरा (मुखरोग) ] ग्रह म्हणजे धरणें, रोगविशेष. (भा. इ. १८३३)

घराणें १ [ गृहज्ञातेयं = घरआएँ = घराणें] (२) [ गृहराजय = गृहराण = घरराण = घराण = घराणें ] (स. मं.)

घरांत १ - गृह = घर. गृहशब्दो भार्यायां वर्तते (आश्वलायनगृह्यसूत्र - गार्ग्यनारायणीयवृत्ति, १-१-१) घरांत काय बोलली म्हणजे भार्या काय बोलली. घरांत बरें वाटत नाहीं म्हणजे भार्येला इ. इ. इ. घरांत काय म्हटलें म्हणजे भार्येनें इ. इ. इ. तात्पर्य, घरांत हा शब्द अव्यय आहे. (भा. इ. १८३६) (२) [ गृहान्ते (गृह + अन्त सप्तमी) = घरांत (समास आहे.) गृहस्मिन् = घरीं (स्मिन् पासून इं)

घरी [ गृहपति = घरवइ = घरी ] घरी आले म्हणजे विचारा, येथें घरी म्हणजे नवरा (प्रथमा एकवचन). घरी सर्व कारभार स्वतः पहातात म्हणजे गृहपति ऊर्फ नवरा सर्व कारभार पहातो.

घरीं १ [ गृहस्मिन् ] *(घरांत २ पहा)* (२) [ गृहासु = घरीं (बायकोला अनुलक्षून) (स.मं.)

घरोटा १ [ गृहकोष्टकः ] *(घरटी ४ पहा)* (२) [ गृहपोतकः (the ground on which house stands and surronnds घर) = घरोटा ]

घवघवित [ गृह् to be thick = घवघवित, घबघबित ]

घसघशित [ घंस् ]

घसघशीत [ घंृ to stream = घसघशित,घसघशीत ] streamingly, copiously.

घसघषित [ घंस् to diffuse, lustre द्वित्त = घसघशित, घसघषित ] very evident.

घसट [ घृष्टिः = घसट ]

घसणी [ घर्षणी = घसणी ] (भा.इ. १८३६)

घसरा [ घर्षः = घसरा ] औषधि घासून केलेलें औषध.

घसवट [ घर्षपट्टिका = घसवटी = घसवट]

घसा १ [ घसः (खाणारें इंद्रिय) = घसा ]

(२) [ घसक = घसअ = घसा (घस् = खाणें) ] (स. मं.)

घसाघसा [ घर्षघर्षं = घसाघसा (ओढतो)]

घळ [ गुहिल ] *(घोळ १ पहा)*

घाइ [ हन् २ घाते. घाति = घाइ. घातिताप = घायताव ] (धा. सा. श.)

घाइकूत [ घातिकूर्दा ] *(घायकूत २ पहा)*

घाइकूद [ घातिकूर्दा ] *(घायकूत २ पहा)*

घाई [ घातिः = घाई ] घाई करूं नको म्हणजे मारामारीसारखी लगबग करूं नको.

घागर [ कलसी गर्गरी तुल्ये (त्रिकांडशेष)] (ग्रंथमाला)

घाटणी [ घट्टना = घाटणी ]

घांटा १ [ घंटः (कालवण) = घांटा ] (२) [ घंटः (a sauce of vegetable etc) = घांटा ] घांटा एक खाण्याचा पदार्थ आहे.

घाटाघाट [ घट् घाटयति भाषार्थः ] Parleys बोलणीं घाटाघाट करणें. to parley.

घाटी [ घाटा = घाटी (घाटिका) ] मानेचा बट्टू.

घाण १ [ सिंघाणक स्तु नासोत्थः ॥ ] सिंघाणक = घाण. नाकांतली घाण म्हणजे सिंघाणक ऊर्फ शेंबूड. मुलाचें नाक पुसतांना घाण पुसली म्हणून शब्द योजतात. तेथें घाण हा शब्द सिंघाणक शब्दाचा अपभ्रंश होय. (भा. इ. १८३४) (२) [ घ्राण = घाण ] घ्रा म्हणजे वास घेणें (नाम) घ्राण म्हणजे वास घेणें. घाण या शब्दाचा धात्वर्थ वास, मराठींत वाईट वास या अर्थी रूढ. (भा. इ. १८३६) (३) [ हानिः = घाण. ह = घ ] संसाराची सगळी घाण करून टाकली = संसारस्य सकला हानिः कृता.

घाण्या [ हानकः, घ्न = घाणा, घाण्या. हन् २ घाते ] स्त्रीघ्नः = स्त्रीघाण्या, महिलाघ्नः = बाइलघाण्या. मनुष्यघ्नः = माणूसघाण्या.

घातलें [ ग्रह् ] *(धातुकोश - घाल ७ पहा)*

घाबरा [ ग्रहव्यग्रः = घाबिरा = घाबरा ] घाबरा म्हणजे ग्रहांनें व्यग्र झालेला. ग्रह म्हणजे राहू इत्यादि दुष्ट ग्रह.

घाम्या [ गेहेमेहिन् (घरांत मुतणारा) = घाम्या ]

घायकूत १ [ घातिकुथ् ] *(घायकूथ पहा)* (२) [ घातिकूर्दा = घाइकूद = घाइकूत, घायकूत ] घाति (killing) + कूर्द to play = जीवघेण्या खेळ, प्राणघेण्या हट्ट, कृति इ. इ.

घायकूथ [घातिकुथ् = घायकूथ - त ] घाति म्हणजे घाई व कुथ् म्हणजे दुःख देणें. घायकूत म्हणजे अतिशय दुःख देणें, पीडा करणें.

घायकूद [ घातिकूर्दा ] *(घायकूत २ पहा)*

घायताव [ घातिताप ] *(घाइ पहा)*

घायपात [ कक्खटपत्रक = खाअपात = घायपात ] ह्याच्या दोऱ्या करितात.

घारगा [ घार्तिकः (भोकें पाडलेलें एक खाद्य, पक्वान्न) = घारिगा = घारगा (पंचतंत्र)] एक खाद्य आहे. (भा. इ. १८३६)

घारवड [ गारुत्मतं = घारवड ] घारवड म्हणजे घारींचा कळप.

घारूड [ गारुतं = घारूड ] घारूड म्ह० घारींचा जमाव.

घालून पाडून (बोलणें) [ गल्हित्वा (गल्ह्, गर्ह् to censure) = घालून. प्रत्यह्य (प्रति + अह् to reply) = पाडून. ] पाडून म्हणजे उलट सुलट बोलून. अह्

हा पूर्ववैदिक धातु आत्य, आहुः इत्यादि रूपांत दिसतो.

घास [ तृणं स्यादर्जुनं घासे (हेमचंद्र - निघंटुशेष - संवत् १२०८ ] (ग्रंथमाला)

घासनिघास [ घासः निघासः = घासनिघाट]

घासाघीस १ [ (हन्) जिघांसा जिघृक्षा (ग्रह्) = जिघांसा = जिघीषा = घाँसाघीस ] slaying and clasping. (२) [ जिघांसा (हन् desi.) + जिघीषा (हि to throw) = घासाघीस] killing and throwing.

घासारी [ घर्षणकारिन् = घासारी ] रत्नें घासणारा.

घिवर [ घृतपूर = घिअऊर = घिऊर = घिवर ] घिवर किंवा घृतपूर हें एक पक्वान्न असे. घृतपूरो गुरुः वृष्यो (शार्ङ्गधरसंहिता)

घीवर [ घृतपूर (वैजयंती कोश) = घिऊर = घिवर ]

घुंघुर्डा [ घुंङ्घुंङ्कीटकः = घुंघुर्डा ]

घुटी [ घृष्टिः = घुटी ] साहाणेवर घासून केलेलें औषध.

घुरम्याव् [ गुर् + मीम् ] *(गुरम्यांव् पहा)*

घुस्सा १ [ गुध् - घुत्सा = घुस्सा. गुध् to be angry ) ] (२) [ गुत्सः (रोषः) हेमचंद्र - उणादिगणविवृत्तिः ] घुस्सा आला म्ह० रोष झाला.

घूस [ गुहाशया = घूस ] बिळांत राहणारी.

घृतकल्या मधुकल्या - हे शब्द छांदस आहेत. त्यांचीं मूळ रूपें घृतकुल्या मधुकुल्या. कुल्या नाम नदी. घृतकुल्या म्हणजे तुपाची नदी, सडकून तूप. मधुकुल्या म्हणजे मधूची नदी, पुष्कळ मधु. घृतस्य कुल्या. माध्यंदिनीय वाजसनेयसंहिता ६-१२ (भा. इ. १८३३)

घेइजे [ गृण्हीयाम् किंवा गृह्येयम् (कर्तरि किंवा कर्मणि विधिलिङ्) ] (ज्ञा. अ. ९ पृ १)

घेओं ये, घेइजे, घेइज = घेववें = गृह्येत (लिङ्चा इ मराठींत ये होतो व आज्ञार्थक घेओंच्या पुढें तो येतो. ह्याचा अर्थ असा कीं, वैदिक Injunctive ला इ हें शक्यार्थक क्रियापद जोडलें जातें. म्हणजे लिङ् हा injunctive + इ धातु यांचा जोड आहे.

घेघे, घेघे मारणें [ हन् हन् =घे घे मार ] to strike and beat vigorously and violently.

घेरा [ गृहीतक = घेरअ = घेरा ] घेरलेला भाग. (स. मं.)

घेरी १ [ ग्राहिः ] *(धातुकोश - घेर ४ पहा)* (२) [ ग्लै = ग्रै = गेरे = घेरी) घेरी म्हणजे अत्यंत म्लान होऊन जाणें. *(गाळण पहा)*

घेरू [ गृहधूम = घेरहूअँ = घेरूअँ = घेरू] घेरोसा असा हि शब्द आहे.

घेलचोद्या १ [ ग्रहिलचोदकः = घेलचोद्या ] (२) [ गृहयालुचोदकः = घेलचोद्या ] बळजबरीनें संभोग करणारा.

घेवड [ ग्रह्पदं = घेवड ]

घो [ गुह् (वस्त्रादिकांनीं आच्छादन करणें) धातूपासून गोहः = गोहो (आच्छादन करणारा, संरक्षक, नवरा, पुरस्कर्ता) = घो = घोव ] (स. मं.)

घोगरा, घोघरा [ घर्घरः = घोगरा, घोघरा]

घोघाव, घोघो [ घुङ् ] *(धातुकोश - घोघाव २ पहा)*

घोटणें १ [ घृष् = घोटणें ] उगाळून बारीक करणें. औषध घोटणें. (भा. इ.

१८३६) (२) [ घुष् (घुष्ट) =घोटणें (बोलणें) ] तेंच तें घोटणें म्हणजे तें च तें मोठ्यानें प्रसिद्धपणें सांगत बसणें. (भा. इ. १८३६)

घोंट, घोंदु [ घुटः, घोटः (घुट् प्रतिघाते) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६९)

घोटा [ घुंटिः, घुटिः ] *(खोट १ पहा)*

घोंटा [ घोंटा (सुपारीचें झाड) = घोंटा ] घोंटा ही एक प्रकारची उत्तम सुपारी आहे.

घोंटाळणें [ गुंठ = घोंट, घोंटाळणें, गुंठाळणें] लपणें, आंत ओढणें. (भा. इ. १८३३)

घोटून [(गाणें) [ घुष्ट = घुट्ट = घोट ] घोटून म्ह० घोष करकरून. (भा. इ. १८३४)

घोडक्यां [ घोटकिकः = घोडक्या. घोटकेन चरति घोटकिकः । चरति (४-४-८) ] घोड्यानें प्रवास करणारा.

घोड्या १ [ गौतम ] *(गोड्या पहा)* (२) [ गवोद्ध = घोडा ] घोडा म्ह० उत्तम बैल. प्रमादी मुलांना बैला म्हणून म्हणण्याच्याऐवजीं घोड्या म्हणून म्हणतात. अर्थ एकच.

घोण [ घुणः (कीटकविशेष) = घोण ]

घोणा १ [ घ्राणं गंधवहा घोणा । राजनिघंटुः ।। (स्त्री.) घोणा = घोणा (पु.) ] नाकाचा घोणा फुटणें म्हणजे नाकाच्या आंतील दांड्याजवळील शीर फुटणें. (भा. इ. १८३७) (२) [ घोणा = घोणा ] (स. मं.)

घोर १ [ घोरः = घोर ] मरणाच्या वेळचा शब्द - नाम. (२) [ घोर = घोर (विशेषण) ] घोर ताप, संकट. (३) [ घोरः = घोर ] घोरः म्हणजे भय. (४) [ घुर् भीमार्थशब्दयोः ] (घोरणें पहा)

घोरणें [ घुर् भीमार्थशब्दयोः = घोरणें, घोर, अघोर ] (ग्रंथमाला)

घोरांदर [ घोरंदरं (च) = घोरांदर ]

घोव [ गुह् - गोहः ] *(घो पहा)*

घोसबाळी [ गुत्सवलयिका = घोसबाळी ] एका कानांतला दागिना.

घोसाळी [ घोषवल्ली = घोसाळी ] वनस्पतिविशेष, घोसाळीचा वेल.

घोळ १ [ गुहिल (अरणय) = घोळ, घळ] अरणयांतील गुहा किंवा गृहाकृति रान. (२) [ गूढा = गोळ्हा = घोळ. ढ = ळ्ह ] Vegetable. (३) [ गव्हरी = घवली = घोळ, घळ ]

घ्या [ घ (प्रातिलोम्ये निपातः) = घ्य = घ्या] (भा. इ. १८३४)

## च

च १ - त्याचें च काम झालें = तस्यैव कर्म जातं ।

त्याचें काम च झालें = तस्या कर्मैव जातं ।

त्याचें काम झालें च = तस्य मेव कर्म जातमेव ।

बरें च काम झालें = वर मेव कर्म अभूत् ।

असें च झालें पाहिजे = ईदृशमेवं वृत्तं पार्थ्यते ।

महाराष्ट्रींत संस्कृत एव बद्दल च्चिअ आदेश होतो. च्चिअ = चि = च एव निश्चयार्थे । हा महाराष्ट्री च्चिय निपात वैदिक चित् पासून निघाला आहे हें स्पष्ट आहे. प्राकृत वैय्याकरण एव

बद्दल च्चिअ आदेश होतो, असें जें म्हणतात, त्या ऐवजीं एव बद्दल वैदिक च्चिअ पासून निघालेला च्चिअ निपात महाराष्ट्रींत योजतात, असें सांगते तर तें शास्त्रशुद्ध झालें असतें. (भा. इ. १८३३. बरेंच, असेंच इ. इ. इ. शब्द) (२) [ त्यत् = च्चअ = च (चा - ची - चें) ] चां - च या सर्वनामाची सप्तमी एकवचन. (ज्ञा. अ. ९)

चकण (णा - णी - णें) [चक्षुष्काण = चक्कआण = चक्काण = चकण (णा - णी - णें) ] (भा. इ. १८३२)

चकणा [ चक्षुष्काणः (चक्षुषा काणः) = चकणा ]

चकती [ चक्रवृत्तं - चक्रवर्तिका = चकोती = चकती ] वाटोळी पट्टी.

चकली १ [ चष = चख = चक. चक + ली = चकली चष् चाखणें ] चकली हें रुचकर पक्वान्न आहे. (२) [(चक्कल) चक्रल = चकली ] a round eatable (३) शष्कुलि = चख्खुली = चखली = चकली ] एका प्रकारचें पक्वान्न. (भा. इ. १८३६) (४) [ शष्कुली = चकुली = चकली ] शष्कुली म्हणून एक पक्वान्न होतें.

चकवा [ चक्रवाकः = चक्कवाअ = चकवा]

चकाकणें [ (कथ्) चाकथ्यते = चाकटणें, चकाटणें ] (भा. इ. १८२६)

चकाट्या १ [ कत्थ् १ श्लाघायाम्. चाकत्थ्य = चकाट ] *(धातुकोश - चाकाट २ पहा)* (२) [ चक्राट (लुच्चा, सोदा) = चकाट ] (भा. इ. १८३२)

चकारी १ [ चक्रांगी (दीनार नाणें) = चकारी ] भिक्षुकाला एक चकारी मिळाली म्हणजे एक दीनार मिळाला. दीनार ज्या वेळीं प्रचारांत होते त्या कालपासून चकारी हा शब्द भिक्षुक व सराफ यांच्यांत प्रचलित झाला. (२) [ चक्राट (दीनार रुप्याचा) चक्राटिका = चकारी ] चकारी दक्षिणा मिळाली म्हणजे एक रुप्याचा दीनार बक्षीस मिळाला, सध्या चवली.

चक्क १ [ चक्क् दुःखे ] चक्क फिरले (डोळे) इंगा फिरला म्हणजे. (धा. सा. श.) (२) [ प्रत्यक्ष = फार चक्ख = फार चक्क = चक्क ] प्रत्यक्षं ब्रूते म्हणजे चक्क बोलतो. चक्क म्हणजे डोळ्यासमोर. (भा. इ. १८३४)

चक्का [ चाषकिकं दधि = चक्का दहीं ] चषक म्हणजे लहान पेल्यांत घट्ट विरजलेलें दहीं.

चखाळ [ खल् १ संचये. चाखल्य = चखाळ, चोखाळ ] (धा. सा. श.)

चंग [ संगः = चंग (कंबर बांधणें) स = च]

चंगळ [ चंगलता = चंगळ, चंगळाई ] चंगळ म्हणजे श्रेष्ठपणा, चांगलेपणा, सुकाळ.

चघळणें १ [ (गॄ) जिगल् (सन्नत) = चिघल = चघळ (णें) गॄ (गिळणें) ] (भा. इ. १८३३) (२) [ (गॄ) जीगीर्यते = जिगिळणें = चिघिळणें = चघळणें ] (भा. इ. १८३६)

चंची [ चंच (पांच बोटें रुंदीचें माप) भर लांब पिशवी ] चंची (स्त्रीलिंग) भा. इ. १८३२)

चच्या [ चंच्या (a straw-man, an effigy in straw) = चच्या ] मूल अति च चिमुकलें जन्मलें म्हणजे त्याला मराठींत चच्या म्हणतात.

चट १ [ चटु (स्तुति) = चट ] (भा. इ. १८३६) (२) [ चटु (प्रिये निपातः) = चट ] चट काम करतो म्हणजे आनंदानें काम करितो. (भा. इ. १८३४)

चटकर - चटकर, चटकन् चटदिनि ,
खटकन्, खटदिनी,
झटकर - रि झटकन्, झटदिनि,
सटकन्, सटदिनि, कटकन्, कटदिनि, ताडकन्, ताडदिनि, भाडकन्, भाडदिनि.
पटकन् - र, पटदिनी,
मटकन्, मटदिनी,
फटकन् फटदिनि,
लटकन्, लटदिनि,
गटकन्, गटदिनि,
थाडकन्, थाडदिनि,
हटकन्, हटदिनी.
न्यधादुत्क्षिप्य समरभटं चटदिति क्षितौ ॥ ५२ ॥
कथासरित्सागर -तरंग ७४ निर्णयसागर
चट्कृत्वा = चट्करूनु = चटकन्
चट्कृत्य = चटकरि, चटकर
चटदिति = चटदिनि
त चा न झाला आहे.
करि, कर, करून, कन् (कुन असें पूर्वीचें मधलें रूप). (भा. इ. १८३२)

चटका [ चटका, (तिखट, मिरें, मिरची) = चटका ] चटका, तिखट म्हणजे मिऱ्याचें किंवा मिरचीचें तिखट. (भा. इ. १८३६)

चटणी १ [ चट् (फोडणें) पासून चटनं, चटणी = चटणी ] चटणी म्हणजे कोणचाही पदार्थ फोडून बारीक केलेला तिखट पदार्थ. (भा. इ. १८३६) (२) [ चर्तनिः = चटणी. चृत् हिंसायां।] वाघानें करडाची चटणी उडवली म्हणजे हिंसा केली.

चटणी करणें [ चृत् हिंसायां. चर्तनिः = चटणी करणें ] to pound down. तुझी चटणी करून टाकीन shall annihilate you.

चटपट [ चाटुपटु = चटपट ] (भा. इ. १८३६)

चटवंच [ चट् to cheat (चाट cheat) + वंच् to cheat = चटवंच ] villain.

चट सारें [ शिष्टं सर्वं = चिट सारें = चट सारें ] चट सारें म्हणजे उरलेलें सर्व.

चटोर [ चाटुतर = चाटुअर = चाटोर = चटोर ]

चट्टामट्टा [ मंथ् ]

चंडोली [ चंडालवल्लिका (चंडालाची वीणा) = चंडोली ]

चड्डी [ चंडातिका (चंडातकः) = चंडाइआ = चंड्डी = चड्डी ] अधोरुकं चंडातकं । अर्ध्या मांड्या झांकणारें वस्त्र.

चढणें [ चड् कोपे ] *(चिडणें पहा)*

चतुरस, चतुरस्र [ चतुरीयस् = चतुरस, चतरस, चतरस्र, चतुसस्र ] चतुरस म्हणजे अधिक चतुर. चतुरस्र हा चतुरस शब्दाचा अपभ्रंश आहे.

चंद्रकोर [ चंद्रकेयूर = चंद्रकोर (अलंकार विशेष) ] (भा. इ. १८३४)

चपट (टा - टी - टें) [ चिपिट flat = चिपट (टा - टी - टें) ] flat.

चपाती [ (चप् to grind, परिकल्कने) चप्तिः = चपाती ] चपाती is a cake made of ground corn.

चंबळ [ शंबल ] *(सांबळ पहा)*

चंबू १ [ शंबूकः = चंबू (गळ्याचा) ] (२) [ शंबु (शंख) = चंबू ] शंखाकृति पात्रविशेष. (भा. इ. १८३६)

चमक [ चंक्मा (वक्रता) = चमक ] पाठींत चमक मारती.

चमकणें १ [ मस्क् १गतौ. मस्कनं = मचकणें = चमकणें (अक्षरविपर्यय) ] आज इकडें कोठें स्वारी चमकली म्हणजे आली. (धा. सा. श.) (२) [ (क्रम्) चंक्रम्यते = चमकणें, चँमकणें म्हणजे वारंवार येणें ] (भा. इ. १८३६)

चमचमित [ चम् अदने. चंचम्य = चमचमित. चंचम्यते = चमचमित. ] चमचमित अन्न = खाण्यास रुचकर अन्न. (ग्रंथमाला)

चमचा [ चमस = चमच = चमचा (पुल्लिंग) ] (भा. इ. १८३२)

चमन [ चमनं = चमन ] चमन म्ह० विलासी खाणें.

चम्मत [ छद्मन् = चम्मत ] ठकविणारा खेळ, युक्ति.

चम्मा [ जम् अदने. जमः = चम्मा ]

चरक १ [ स्रक्व = चरक्क = चरक ] स्रक्व (वैदिक) म्हणजे जाभाड. तोंडाचा चरक या वाक्यखंडांत स्रक्व शब्दापासून निघालेला चरक शब्द येतो. वैदिक स्रक्वपासून संस्कृत स्रक्किणी (द्विवचन). स्रक्किणी म्हणजे खालच्या व वरच्या दातांच्या कवळ्या. (भा. इ. १८३५) (२) [ चारकं (बंधनालयं) = चरक ] तुरुंग.

चरचर [ चर्च् हिंसायां, चर्चर = चरचर ] चरचर कापणें, चराचरा कापणें.

चरचरित [ चर्च्य ६ निन्दायां, तर्जने, भर्त्सने. censure चाचर्च्यते - चाचर्च्यित = चरचरित (टीका इ. इ.)]

चरणें [ शॄ ९ हिंसायाम् = शर = सर = चर ] चरणें. (गळू वगैरे) व्रण चरत चालला = व्रणः शीर्यमाणः वर्तते. (भा. इ. १८३४)

चरत [ चरत् = चरत ] चरणारी, चरत जाणारी जखम म्हणजे पसरत जाणारी जखम.

चरा [ चरक = चरअ = चरा ] (ग्रंथमाला)

चराचरा १ [ चर्वंचर्वं ] *(चर्बट पहा)* (२) [ चर्वंचर्वं = चराचरा (खातो) ]

चराट [ चृत् (गुंफणें, बांधणें) = चरट = चराट, चऱ्हाट ] चऱ्हाट म्हणजे गुंफलेला जाडाभरडा दोर.

चर्बट [ चर्व् १० अदने. चर्वटं = चर्बट; चर्वंचर्वं = चराचरा ] (धा. सा. श.)

चर्या [ चरितानि = चरिआइँ = चर्या ] अनेकवनाचें एकवचन झालें आहे व नपुंसकलिंगाचें स्त्रीलिंग झालें आहे. (भा. इ. १८३२)

चऱ्हाट १ [ चृत् = चरट = चऱ्हाट ] *(चराट पहा)* (२) [ मराठींत चरहाट = चऱ्हाट असा दोराला शब्द आहे. अमरांत वराटक असा शब्द आहे. हा अमरांतील शब्द चराटक असा मूळ असावा. 'व' च्या स्थली 'च' चुकून पडला असावा. (भा. इ. १८३३)

चलन चलनी [ चल् गतौ ] *(भ्रम्म पहा)*

चव १ [ चम् १ अदने. चंचम्य = चमचमित. चम = चव ] (धा. सा. श.) (२) [ चम् to drink, to eat = चव्. चम = चव ] taste of eating or drinking.

चवकशी [ ईक्ष् १ दर्शने. सम् + ईक्षा = समीक्षा = चवीकशा = चवकशी. समीक्षाकरणं = चवकशी करणें. *(धातुकोश - चवकस पहा)*

चवकस [ समीक्षक = चवकस ]

चवडा १ [ चपटक, चपेटक = चवडअ = चवडा (हाताच्या किंवा पायाचा) [(स. मं.) (२) [ चतुष्पदः = चउवडः = चौवडा = चवडा ] प्रपद म्हणजे पायाचा पुढचा भाग. चतुष्पद म्हणजे पायाच्या चार बोटांचा भाग.

चवढाळ १ [ समर्द्धक = चवड्डअ = चवढ + (स्वार्थे आल) = चवढाळ ] समर्द्धक म्हणजे वरद कर्ता.चवढाळ म्हणजे निंघकर्ता. (भा. इ. १८३६) (२) [ स्वदालुः = चवढाळ ] expert in testing.

चवल, चवला, चवली [ चतुर्थ + ल = चउ + ल = चवल, चवला, चवली ] अर्ध्या रुपयाचा चतुर्थांश.

चवाठा [ चतुष्पथः = चउअठा = चवाठा ] (भा. इ. १८३६)

चवाळें १ [ शंबल ] *(सांबळ पहा)* (२) [ चतुष्पल्लवकं = चवाळें ]

चविष्ण [ चमिष्णु = चविष्ण ]

चहाटळ १ [ चाट + ल (स्वार्थक) = चाटळ = चहाटळ ] चाट म्ह. लुच्चा. (२) [ चाटुल = चहाटळ ] वावदूक. (३) [ चटुल = चहटळ = चाहाटळ = चहाटळ ]

काढणें = काहाडणें. लोढणें = लोहोडणें
वाढणें = वाहाडणें. चढणें = चहडणें
पढणें = पहडणें. धाडणें = दाहाडणें.

चहाडी [ चह् १० शाठ्ये ] *(धातुकोश - चहाड पहा)*

चळ [ चल् to frolic = चळ ]

चळकांप [ चलत्कंपः = चळकांप ]

चळचळ [ चलाचलं = चळचळ ] चळचळ कांपणारें = चलाचलं कंप्रं

चळाचळ [ (वैदिक) चलाचल = चळाचळ] unsteady trembling चल् चें Reduplicated रूप. झटाझट, पटापट, धपधप हीं reduplicated रूपें आहेत.

चळोकापळो कर [ चलीकल्प्य = चळोकापळो. क्लप्चें पौनःपु पुन्यदर्शक रूप चालीकल्प्य - त्यापासून मराठी चळोकापळो. क्लप् म्ह० कल्पना करणें. चलीकल्प्य किंवा चल्कल्प्य म्हणजे नाना संकल्पविकल्प प्रकर्षानें करणें. चलीकल्प् पासून नाम चलीकल्पनं चलीकल्पनं. करोति = चळोकापळो करतो - चळणें आणि पळणें या क्रियापदांशीं येथें कांहीं एक कर्तव्य नाहीं. ] (भा. इ. १८३६)

चळोकापळो करणें [ (क्लृप्) चलीक्लृप् = चलीकलप = चळोकापळो ] चळोकापळो करणें म्हणजें वारंवार कल्पना करून घाबरविणें. (भा. इ. १८३६)

चाकी [ जाक्षिः ] *(चाखी पहा)*

चाकु, चाकू [ कृ ९ हिंसायाम्. चुर्कः = चाकु, चाकू (Knife) हिंसेचें उत्कृष्ट शस्त्र. (धा. सा. श.)

चाखणें [ चष (ख) भक्षणें ] (ग्रंथमाला)

चाखंदळ १ [ खाद red चाखाद + ल (स्वार्थक) = चाखंदळ ] given up to eating. जीभ चाखंदळ झाली आहे. (२) [ चष् भक्षणे चषंदरः = चाखंदळ] खाण्यांत पटाईत. (भा. इ. १८३३)

चाखी [ जक्षिः = जाखी = चाखी, चाकी] त्या पोरट्याची एकसारखी चाकी चालू आहे. येथें चाकी म्हणजे खाणें.

चांग भल [ (वैदिक) भल indeed, certainly! (interjection)

चांग भल = certainly propitious.

चाचणी १ [ चर्चना = चाचणी ] चाचणी म्हणजे वरवर परीक्षा. चाचणी म्हणजे वरवर वाटलेल्या डाळीचें भरड ओलें पीठ. (२) [ चर्चणिः = चाचणी ] (३) [ शास् = to cut, Whitney चाचणी ] डाळ फोडून केलेलें बेसन.

चाचपणें [ चाचप्यते (चप् सांत्वने) (पौनःपुन्य) = चाचपणें ] चाचपणें म्हणजे हातानें सांत्वन करणें, नंतर हातानें शोधणें. (भा. इ. १८३६)

चांचरणें [ (चर) चाचर्यते = चाचरणें ] चाचरणें म्ह० वांकडें तिकडें चालणें. (भा. इ. १८३६)

चांचरा [ चंचरीक = चांचरा ] (भा. इ. १८३३)

चांचरी [ चंचूर्या = चांचरी ] वाईट चालीची.

चाँचा [ चंचा (पाणिनी १-२-५२) = चाँचा] चंचा म्हणजे कुपुरुष. चच्या हें नांव मराठींत आहे. सिंध प्रांतात चचनामा म्हणून एक फारसी तवारीख आहे. तेथें चच या शब्दाचा चंचा या शब्दाशीं कांहीं संबंध असेल काय? (भा. इ. १८३३)

चांचोड १ [ चंचूपुटं = चांचोड ] (२) चञ्चूकोटिः = चांचोड ] चांचोड म्हणजे चोंचेचें अग्र.

चाट १ [ चट् to injure = चाट ] चाट लागला = नुकसान झालें. (२) [ चृष्टिः = चाट ] इजा, नुकसान. (३) [चातयति. चातयतिर्नाशने इति यास्कः (६-३०) = चाट ] नाश, तोटा.

चाटणें [ चटनं = चाटणें ] स्पर्श करणें. अत्र पूर्णिमादिने समुद्रवेला चटति । पंचतंत्र - प्रथमतंत्र - कथा १२. (भा. इ. १८३५)

चाटळ [ चाटुलोल = चाटोळ = चाटळ = चाहाटळ ] चाटुलोल म्ह. थट्टेबाज. (भा. इ १८३६)

चाड १ [ चते, चदे याचने. चतिः, चदिः = चाड ] त्याला संसाराची चाड असेल म्हणजे विवंचना असेल. (२) [चातिः, चादिः = चाड. चत्, चद् याच्ञायां ] चाड म्ह० यांचा, गरज. (३) [ चत्ति चत् याच्ञायां = चाड ] (ज्ञा. अ. ९) (४) [चाटु (स्तुतीची इच्छा) = चाड ] (भा. इ. १८३६)

चातुर - (सं.) चातुर म्हणजे शहाणा - हा शब्द मराठी लावण्यांत प्रियकरार्थक आहे. (भा. इ. १८३४)

चांदकी [ चंद्रिका = चांदकी ] ऱ्हस्वत्वदर्शक चांदुकली. चांदवा [ चंद्रा, चंद्रिमा = चांदवा. चंद्रा canopy छत ]

चांदी [ चांद्री (Moonlight पूर्णिमा) = चांदी ] ह्या दिवशीं मुसुलमानी अमलांत पगार वांटीत. चांदोबा दाखविणें - दामोदरकराघातविव्हलीकृतचेसा । दृष्टं चाणूरमल्लेन शतचंद्रं नभस्तलं ॥ चांदोबा दाखविणें म्हणजे उताणा पाडून मनुष्याच्या कानशिलांत अशी चपराक मारणें कीं, त्याला शंभर चंद्र दिसूं लागावे, तिरमिरी येऊन. (भा. इ. १८३४)

चांधई [ चंद्रभित्तिः = चांदहिइ = चांधई ] चंद्रशाला शिरोग्रहं । घराच्या माथ्यापर्यंत जाणारी जी भिंत ती चंद्रिका. चंद्रभित्ति, चंद्रिकाभित्ति म्हणजे चांधई.

चापट [ चपेट = चापट ] (स. मं.)

चापणें १ [ (जि) जापयति (णिच्) =

चापणें. ज = च ] जापयति म्ह० जिंकवितो चापतो म्ह. जिंकवितो. (भा. इ. १८३६) (२) [ चप् सांत्वने ] चापणें = सांत्वन करणें = स्तब्ध करणें = दाबणें. (ग्रंथमाला)

चापटपोळी [ चिपिट (थापटलेली) पोली = चापटपोळी चि बद्दल चा ] (भा. इ. १८३३)

चामट पोळी [ जम् अदने. जमट पोलिका = खायची, खाण्यायोग्य पोळी ] चामट म्हणजे कातडयासारखी चिवट, ह्या शब्दावर कोटी आहे.

चामडें [ चर्म्म = चाम = चामडें (ऱ्हस्वत्वदर्शक) ] (स. मं.)

चामुंडा [ चर्ममुंडा = चामुंडा ] चामुंडा हा शब्द संस्कृत समजला जातो; वस्तुतः अपभ्रंश आहे.

चार १ [ चर् १ संशये = चार करणें ] to behave suspiciously उ० - वेडे चार करणें. (२) [ शार = चार ] हिरवा चार. = हरित् शारः. शाण = साण, साहाण. (३) [शाद (हरित) - (हिरवा) चार, द = ड = ल = र ] चार म्हणजे हिरवा. चाराचें गवत म्हणजे हिरवें गवत.

चारगट [ चारभट (हिय्येबाज) = चारहट = चारगट ] चारगट म्ह० चावट. (भा. इ. १८३४)

चारा [ यवसं चारि इत्यपि (हेमचंद्र - निघंटुशेष) ] (ग्रंथमाला)

चारी, चाऱ्ही [ चत्वारि = चआरि = चारि = चाऱ्ही ] (ग्रंथमाला)

चालीचा [ शालेयः = सालिज्जा = साळेचा = चालीचा ]

चावळणें [ वल् १ वेष्टने, संवरणे. अत्यावलनं = (अलोप) च्यावळणें = चावळणें. (धा.सा.श.) (२) [ श्वलनं = सवळणँ = चवळणँ = चावळणें ] झोपेंत चलन करणें. स्वप् + चल् = श्वल् हा धातू झाला आहे. (भा. इ. १८३५)

चाव्या [ चामः = चावा, चाव्या ] चाव्या म्हणजे खाणें (बदाम, पिस्ते इ. इ.)

चाहा [ श्लाघ्, श्लाघा = चाहा ] गोपी कृष्णाय श्लाघते = गोपी कृष्णातें चाहते. (धा. सा. श.)

चाळ [ शाला = साळ = चाळ ] (भा. इ. १८३२, १८३६)

चाळणें (कौलें) [ चाळ (घराच्या पिंजरीवरील भाग) तो नीट करणें म्हणजे चाळणें. ] (भा. इ. १८३४)

चाळवणी [ चलापनी = चाळवणी ] (चाळा पहा)

चाळा [ चालः (चल् 6 P. विलसने) = चाळा. चलापनी = चाळवणी. चलापनं = चाळवणें.]

चाळीस [ चत्वारिंशत् ] *(विंशति पहा)*

चाळें [ चलिः = चाळें ] चलि म्हणजे आस्तर. चाळें म्हणजे घोंगडीचें पांघरूण.

चिक [ जिष् १ सेचने. जिष = चिक ] चिकाचा पडदा म्हणजे पाणी शिंपून हवा गार करण्याचा पडदा. (धा. सा. श.)

चिकट १ [ किल् ६ बन्धने. चेकिल्य = चिकट ] (धा. सा. श.) (२) घासाघीस करून थोड्या पैशांत उत्तम माल घेणारें जें गिऱ्हाईक त्याला महाराष्ट्रांत चिकट गिऱ्हाईक म्हणतात. चीक शब्दापासून निघालेला जो चिकट शब्द त्याशीं ह्या चिकट (गिऱ्हाईक) शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. हा

शब्द निराळ्याच एका शब्दापासून निघालेला आहे. (चिकित्सक = चिकिट्टअ = चिकिट = चिकट ] चिकित्सा करणारें गिऱ्हाईक ते चिकट गिऱ्हाईक. (भा. इ. १८३३)

चिकण [ श्लक्ष्ण = चिक्वण = चिकण ]

चिकणी (सुपारी) [ श्लक्ष्णिका = चिक्वणीआ = चिकणी ]

चिकार [ चिकृ (Frequentative of कृ) कृ ६ विक्षेपे = चिकार. (crowded, densely) संकृ to crowd ]

चिखल [ क्लिद् ४ आर्द्रीभावे. चिक्लिन्न = चिखिल्ल = चिखल ] चिखिल्ल हा शब्द प्राकृत वैय्याकरण देशी म्हणजे अव्युत्पाद्य मानतात. परंतु निश्चित आहे कीं, हा शब्द संस्कृतोत्पन्न आहे. चिक्लिन्न म्हणजे अतिशय ओलें. अतिशय पाण्यानें बरबटलेली माती म्हणजे चिखल.

चिखलू [ चिखलः, चिकिलः, इचिकिलः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४१)

चिघळणें १ [जागल्य = जिगल = चिघळ (चिघळणें) ] अतिशय गळणें. (भा. इ. १८३६) (२) [ (गल्) जागल्यते = चाघळणें = चिघळणें)] (भा.इ. १८३६)

चिच्या [ शिशुकः = चिचुआ = चिच्या ] लहान मुलाला चिच्या हें नांव महाराष्ट्रांत देतात.

चिचुंदरी [ छछुंदुर (छुछु + उंदुरः) = चिंचुदर - री ] (भा. इ. १८३३)

चिचुंद्री [ चंद्र नामधातू Freq. चिचंद्रः नाम चिचंद्रिः = चिचुंद्री ] A shining firework like the moon. चिचुंद्री ह्या शब्दावरून दिसतें कीं, दारू करण्याची कला frequentative रूपें भाषेंत चालू असतांना प्रचलित होती म्हणजे ही कला भारतवर्षात फार जुनी आहे.

चिट पाखरूं [ चटकः, चिटिकः = चिडी = चिट ] चिट पाखरूं म्हणजे चिमणीसारखें क्षुद्र पाखरूं

चिट्टी [ चिट् निरोप घेऊन पाठवणें. चिट्टिका = चिट्टी ] (भा. इ. १८३३)

चिडणें [ चड् कोपे. डोकें चढणें = डोक्याचा कोप होणें = चिडणें, चढणें.] (ग्रंथमाला)

चित् [ स्वित् = चित् (हा अपभ्रंश जुना आहे) ]

चिताड १ [ चित्रान्नं = चिताण = चिताड] सगळें पान चिताड करून उठला म्हणजे सर्व अन्नें चित्रविचित्र मिसळून उठला. (२) [ चित्रं = चितरं = चितड = चिताड ]

चित्ताथिला [ चित्तान्वित + ल = चित्ताथिला] विचारी.

चित्ता वाघ १ [ चित्रकः व्याघ्रः = चित्ता वाघ ] चित्रकः चित्रकायः स्यात् उपव्याघ्रो मृगान्तकः ॥ राजनिघंटु ॥ (भा. इ. १८३७) (२) [ चित्रकः = चित्तओ = चित्तो. चित्रक = चित्तअ = चित्ता ] चित्ता = चित्रविचित्र कातडें ज्याचें तो. (ग्रंथमाला)

चिंधी [ चिन्ह (पताका) = चिंध. लहान चिंध = चिंधी ] (ग्रंथमाला)

चिंब [ श्विद् १ to be wet = चिंब ]

चिबूड १ [ चिर्भिट = चिब्भिड = चिबीड = चिबूड = फलविशेष ] (ग्रंथमाला) (२) [ चिर्भटिका = चिबूड ] (३) [ चिर्भटं = चिबूड ]

चिमकणें [ श्मीलनं = शिमळणँ = चिमळणँ = (वर्ण विपर्ययानें) मिचळणें

= चिमकणें ( ळ बद्दल क) मिचकणें, मिचकावणें ] (भा. इ. १८३७)

चिमणी [ चीव् पासून चीवणी = चिमणी - णा - णें ] (ग्रंथमाला)

चिमुटी [ मुचुटी = चुमुटी = चिमटी ] मुचुटी म्हणजे दोन किंवा तीन बोटांची मुद्रा.

चिमूट [ मुचुट्यंगुलिमोटनं (त्रिकांड शेष) मुचुटि = चुमुटि = चिमूट ] (ग्रंथमाला)

चिरटी [ चिरंटी (मुलगी) = चिरटी ] मुली लाडानें एकमेकीला अपशब्द बोलतांना हा शब्द योजतात.

चिरटी - टा - टें [ चीर (लांब टुकडा) = चिरटा - टी - टें, चिरफळी ] (भा. इ. १८३३)

चिरडणें १ [ अर्द् १० हिंसायाम् - अत्यर्दनं = (अलोप) चिरडणें ] अत्यर्दन म्ह० सडकून दाबणें. (धा. सा. श.) (२) [ स्निध् = चिरड + णें = चिरडणें. स्निध् (वैदिक) ठार मारणें ]

चिरफळी [ चीर (लांब टुकडा) = चिरटा - टी - टें, चिरफळी ] (भा. इ. १८३३)

चिरा [ चीवर = चीरा ] चिराबादली. (भा. इ। १८३४)

चिराचोळी [ चिल् (वस्त्रें घेणें) = चिरा cloth ] चिराबादली.

चिरी १ [ चीवर (री) = चिअरी = चिरी] लहान मुलीचें लहान लुगडें म्हणजे चिरी + (भा. इ. १८३४) (२) [ चिर a stripe of cloth = चिरी. चिरपत्रिका a stripe of cloth = चिरोटी a scrap of paper etc.]

चिरेबंद [ शिलाबद्ध = सिराबद = चिराबंद = चिरेबंद ] चिरेबंदी वाडा = शिलाबद्धः वाटः

चिरोटी [ चिरपत्रिका ] *(चिरी २ पहा)*

चिलट [ झिल्ली = चिली. झिल्लीटं = चिलीट = चिलट ] चिलीट असा उच्चार अशिष्ट करतात.

चिलया [ चेलयः = चिलया ]

चिल्लर, चिल्हर [ क्षीणतर = चीणअर = चिण्णर = चिल्लर = चिल्हर ] चिल्लर म्हणजे अति सूक्ष्म, सटर फटर.

क्षुल्ल = चुल्ल.

क्षुल्लतात = चुलता.

क्षुल्लतर = चुल्लर = चिल्लर ( क्ष = च).

चिव्चिव् [ चीव् भाषार्थे ] चिमणीसारखा शब्द करणें. (ग्रंथमाला)

चिवचिव [ स्यम् १ शब्दे. द्विरुक्ति चिवचिव] *(झमझम पहा)*

चिवडा १ [ चिपिट ११. चिपिटः = चिविडा = चिवडा ] (धा. सा. श.) (२) [ चिपिटकः = चिवडा ] चिपिटक म्ह० पोहे.

चिवा [ चिमिय = चिवा a kind of Bamboo ] कौटिलीय अर्थशास्त्र पृ. १०० ओळ ३.

चीक [ जिष् = चीक. जिष् to sprinkle जेषति ] चिकाचा पडदा म्हणजे पाणी शिंपडून हवा गार करण्याचा पडदा.

चीत [ जी १ जये. जित = चीत (जिंकलेला) ] (धा. सा. श.)

चीप [ क्षिप्रं = चिप्पँ = चीप ] चीप येतोहे = क्षिप्रं आयाति . (भा. इ. १८३४)

चुई [ सूचि = चूई = चुई ] (भा. इ. १८३२)

चुकचुक [ कुच् १ अव्यक्तायां वाचि ] चोकुज्य = चुकचुक. कुचकुच (द्विरुक्त) (धा. सा. श.)

चुकणें [ स्कु = चुक + णें = चुकणें ] स्कु म्हणजे उडी मारणें, गति करणें. करून

चुकणें म्हणजे करून पुढें जाणें, करून दुसरें काहीं जल्दीनें काम करणें. (भा. इ. १८३५)

चुकार (तट्टू) [ शूकलः = चूकर = चुकार (तट्टू) ] शूकल म्हणजे अडेल घोडा.

चुटकन कांपणें [ चुट्, छुट् छेदने ] चुटकन कांपणें. (ग्रंथमाला)

चुटका १ [ चुट्टकः = चुटका (लहान) ] (२) [ सुट्ट् to be small. सुट्टकः = चुटका ] a small portion of anything.

चुटकी [ छोटिका = चोटकी = चुटकी ]

चुटपुटता [ चुट्ट् अल्पीभावे + स्फुट् to break = चुटपुटता ] small and broken.

चुट्टा [ चुट्ट् १० अल्पीभावे. चुट्टः = चुट्टा] चुट्टा म्हणजे वाटून बारीक केलेलें धान्य. (धा. सा. श.)

चुट्टाचुर्मा [ चुट्टः = चुट्टा. चुट्टा अल्पीभावे ] चुट्टा म्हणजे वाटून बारीक केलेलें धान्य. [ चूर्णिमन् = चुरमा = चुर्मा ] चुर्मा म्हणजे चूर.

चुडा [ चूडा = चुडा ] (स. मं.)

चुडेल [ चूडालः = चुडेल (पाखरूं) ]

चुणी [ चूर्णिका = चुणी ] धोत्राच्या उभ्या घड्या.

चुनखडा [ चूर्णखंडः = चुनखडा ]

चुनखडी [ चूर्णखटी ] *(खडा २ पहा)*

चुप् [ सुषुप् (स्वप्) = चुप् ] be sleepy, silent. चुप बैस = stand silent, sit silent.

चूप बसणें [ चुप् मंदायां गतौ ] (ग्रंथमाला)

चुंबत १ [ चुंब् इजा करणें, मारणें. चुंबत् = चुंबत ] चुंबत येईल म्ह० त्रास झाला तरी येईल. (२) [ चुप् - चुंप् ] (३) [(गुप) चुप, चुप (imp. second singular) चुप to move slowly = चुप (move slowly) चुप् चुंप् = चुंबत बसणें to sit idly unoccupied]

चुरकन् [ चूर् - चूर्यते ] *(धातुकोश - चुरचुर २ पहा)*

चुरगळ [ चूर्णकला = चूरगळ ] (भा. इ. १८३६)

चुरचुरणें [ चुरि दाहे ] (ग्रंथमाला)

चुरचूरणें [ चूरी दाहे. द्वित्वेन चुरचूर ] चुरचुरणें म्ह० दाह होणें. (भा. इ. १८३३)

चुरणें [ छुरणं (घासणें) = चुरणें (पाय वगैरे) ] (भा. इ. १८३३)

चुरा १ [ छुरा = चुरा (चुन्याचा वगैरे) ] (भा. इ. १८३३) (२) [ छुरः = चुरा. छुर् कापणें ] कापून बारीक केलेला भुगा तो चुरा.

चुलत - ता - ती [ चुल्लस्थ = चुल्लत्त = चुलत - ता - ती ] निराळी चूल करून राहणारा. (स. मं.)

चुलता [ क्षुल्लतात = चुल्लताअ = चूलता = चुलता ] क्षुल्लतात म्हणजे बापाचा धाकटा भाऊ (स्त्री.) चुलती. (भा. इ. १८३३)

चुळचुळ [ चुल्ल् १ भावकरणे = चुळ, (द्विरुक्ति) चुळचुळ ] चुळचुळ (मुंगळा) म्हणजे हावभाव करणारा.

चूक [ शूकः, शूका (कांटा, अग्र) = चूक] कांट्यासारखा लोखंडाचा पदार्थ

चूण [ चूर्णिका = चूण ]

चूत १ [ च्युतिः (योनि) = चूत. चूतिः (गुदद्वार) =चूत ] (२) [ च्युतिः = चूत vulva वैजयंती ]

चूत्या १ [ चूतिकः = चूत्या (गांडू) ] (२) [ चौतिकः (चूतिः) = चूत्या]

born from the anus instead of from vulva. (३) - चोत्ता, चोत्तओ, ह्या शब्दांचा अर्थ प्राकृतांत 'चांगला' असा आहे. तो चूत्या आहे, म्हणजे तो चांगला आहे, असा मूळ अर्थ. विपरीत लक्षणेनें पाजी असा अर्थ सध्यां बनला आहे. (ग्रंथमाला)

चूप [ चुप् मंदायां गतौ ] चूप बैस = मंद बैस, स्वस्थ बैस, उगा रहा. (भा. इ. १८३३)

चूरण [ चूर्णि (small cowrie) = चूरण (खुर्दा) गुजराथी ]

चूल [ चुलुकः ] (ज्ञा. अ. ९ पृ. १०५)

चूलभाणवश्या [ चूलिकाभहानसिकः = चूलभाणवश्या ]

चेंगट [ उच्चिंगट (तामसी माणूस) = चेंगट] दिरंगाई करणारा माणूस. (भा. इ. १८३४)

चेटका [ चाटुकारिन् = चेटका ] चेटका म्हणजे मिठें भाषण करणारा. (भा. इ. १८३६)

चेटुक [ चाटुक (मिठें भाषण) = चेटुक ] (भा. इ. १८३६)

चेडा - गोमांतकांत लहान मुलाला चेडा व लहान मुलीला चेडी म्हणतात. चेटः = चेडा व चेटी = चेडी. महाराष्ट्रांत एका समंधाचें नांव चेडा आहे. ब्राह्मणाच्या मुंज झालेल्या पोराच्या भुताला मुंजा म्हणतात. इतर जातींतील पोराच्या भुताला चेडा म्हणतात. (स. मं. १८२६)

चेंदामेंदा १ [ छिद् + मिद् ] (२) [चिंद्धि भिंद्धि ] (धातुकोश - चेंदमेंद पहा)

चेव १ [ चि ५, १ द्वेषे. चय = चेव ] (धातुकोश - चेव २ पहा) (२) [ चेतन = चेअँ = चेवँ = चेव ] (स. मं.)

चेंव [ चितिः (पुल्लिंगी) = चेऊँ = चेव ] चेव म्हणजे जागेपणा. (भा. इ. १८३६)

चेहरा (फारसी) (स.मं.)

चोकस [ चोक्रुश्य ] *(चौकस पहा)*

चोख [चोक्ष = चोख्ख = चोख ] (भा. इ. १८३२)

चोखटेल [ चोक्षतैलं = चोखटेल ]

चोखंदळ [ चोक्ष + चोकुख = चोख ] (भा. इ. १८३३)

चोखाळ [ चाखल्य ] *(चखाळ पहा)*

चोचा [ चुच्यः = चोचा. चुच्य अवयवानां शिथिलीकरणं ।] चोचा म्हणजे डाग देऊन अवयव सैल करणें.

चोज [ चोद्यं (आश्चर्य, कौतुक, चमत्कार) = चोज्ज = चोज ] (ज्ञा. अ. ९ पृ. ८ व भा. इ. १८३६)

चोतकर [ चतुः कृत्वा = चतकुर = चतकोर = चोतकोर ] अचा उच्चार ओं होऊन चोतकोर झालें. (भा. इ. १८३३)

चोथा १ [ चोतः = चोथा (भिजलेलें फडकें वगैरे) चुत् भिजणें ] (२) [ (कोंडा, धूळ) तुस्तः = चुत्थः = चोथा ] (३) [ श्चोतः = चोथा ] (४) [ चुस्त chaff = चोथा ] (५) [ चुस्तः = चुथ्या = चोथा ] (भा. इ. १८३६)

चोदणें [ चोदन ] *(चोलणें पहा)*

चोपडें [ चतुःपत्र = चउपडें = चोपडें ] (भा. इ. १८३६)

चोमडा चोमडी [ चुंदा (Procuress) = चोमडा, चोमडी ]

चोर [ चतुर = चउर = चोर ] चोर म्ह० शहाणा अरे चोरा ! कोठें लपला होतास? असें लहान मुलाला प्रेमानें बोलण्यांत चोर ह्या शब्दाचा अर्थ चतुर

असा आहे. (ग्रंथमाला)

**चोरा वर मोर १** [ चतुरं परि मुखरः ] चतुर परंतु मुखदुर्बळ मनुष्यावर वक्तृत्वसंपन्न मनुष्याचा पगडा बसतो. (२) [ चतुरस्य उपरि मधुरः = (चउर) चोर व (महुर) मोर ] चोरा वर मोर म्हणजे चतुरा हून मधुर व्यक्ति श्रेष्ठ. चतुर इष्ट पण मधुर इष्टतर.

**चोरी** [ चौरिका (पंचतंत्र) = चोरी ]

**चोलणें** [ चोदन = चोदणें = चोलणें ] (भा. इ. १८३२)

**चोळखण** [ चुल्लिक्षणः = चोळखण ] चुल्लि म्हणजे मोठा दिवाणखाना. चोळखण म्हणजे मोठा खण.

**चौकडी** [ चतुष्कटिः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६४)

**चौकस** [ क्रुश् १ आव्हाने, रोदने. चोक्रुश्य = चौकस, चोकस ] (धा. सा. श.)

**चौचाल** [ चतुःशाला = चउचाल = चौचाल] एक शाला म्हणजे घर धरून न राहतां, चार घरें जी स्त्री हिंडते ती चवचाल स्त्री.

**चौरस** [ चतुरस्र = चउरंस = चौरस ] all-round.

**चौवड** [ चतुष्पदा ] *(दुवड पहा)*

**चौसा** [ चतुर्वर्षीयः = चौसा ]

**च्छू !** [ श्वन् ! = च्छूं = च्छू ] कुत्र्याला बोलवितांना किंवा पाठवितांना श्वन् म्हणून संबोधन संस्कृतांत करीत. त्या संबोधनाचें मराठी अपभ्रष्ट संबोधन च्छू आहे. संबोधनाखेरीज मराठींत च्छू या शब्दाची दुसरी विभक्ति नाहीं.

## छ

**छइल्ल** [ शैलीविदः = छइल्ला (कपूर्रमंजरी)] हा शब्द संस्कृतोत्पन्नच आहे. केवळ बिलकुल देशी नव्हे.

**छकडा** [ शकटः = छकडा (यानविशेष) ] (भा. इ. १८३३)

**छकड्या** [ शाकटिकः = छकडया ] छकडयानें प्रवास करणारा. (४-४-८)

**छलक १** [ शल्कलं = छकल ] (२) [ शकल = छकल ] (भा. इ. १८३६)

**छकुली** [ शिशुल - ली = छकुली ] child endearing term for a child. ये माझी छकुली.

**छक्का** [ षट्कः = छक्का (पत्त्यांच्या डावांतील) ]

**छक्कापंजा १** [ षट्कः पंचकः = छक्कापंजा ] (२) [ छेकपंजक = छक्कपंजअ = छक्कापंजा. छेकोक्तिर्वक्रभणितं ] (ग्रंथमाला)

**छक्कित १** [ शक् - शंक् १ शंकायाम् ] *(धातुकोश - छक ४ पहा)* (२) [ स्थग् ४ गोपने ] *(धातुकोश - छक ६ पहा)*

**छकुडी** [ शक्वरी = छकुडी ] भली बळकट मुलगी.

**छकुली** [ छेक (पाळलेलें प्रिय पांखरूं) + स्वार्थे ल = छकुली ] लहान मुलाला किंवा स्त्रीला प्रेमानें हा शब्द लावतात.

**छचोर** [ छित्वर = छित्तर = छिच्चर = छिचोर. छित्वरो धूर्तः (उणादि २८८)] (भा. इ. १८३३)

**छट्** [ षाट्! = छाट् !, छट् ! ]

**छट** [ शठ = छट ] तो मोठा छट आहे म्ह० शठ आहे.

छडी १ [ छेदकः छेदिका (वेत) = छेडी = छडी ] (२) [ छैदिकः (वेत) ] *(छेडी २ पहा)*.

छत् [ शिट् अनादरे ] *(शिट् पहा)*

छत [ छद (आच्छादणारें) = छत ]

छत्तरी [ छत्वर ] *(छप्पर पहा)*

छप्पर १ [ छत्वर = छत्तर = छप्पर छत्तरी (स्त्री). छत्वरो गृहकुंजयो (उणादि २८८) ] (भा. इ. १८३३) (२) [ छत्वरकं (लतागृह) = छप्पर. त्व = प्प ]

छप्पापाणी १ [ शप्तकपाणि = छप्पअपाणि = छप्पापाणी ] (भा. इ. १८३२) (२) [ छुप् ६ स्पर्शे ] *(छुप्यो पहा)*

छप्पो पाणी १ [ छुप् to touch = छुपो पाणी = छप्पो पाणी. छुपः पाणिः = छुपोपाणी ] (२) [ छुप् ६ स्पर्शे] *(छुप्यो पहा)* (३) [ छुपः पाणिः)

छब [ छविस्तुरुचिशोभायां (अनेकार्थसंग्रह संवत् १२०८) = छब,छबि, छबिला, छबुकडी, छबडी ] (ग्रंथमाला)

छबडी, छबि [ *(छब पहा)*

छबिना [ शिबिकायानकं = छिबियाना = छबिना ] देवाची पालखी.

छबिला [ *छबल पहा* ]

छबी [ छविः = छबी (रंग, वर्ण) ]

छबुकडी [ *(छब पहा)*

छर्रा [ शरः = छरा = छर्रा ] बंदुकींतून सुटणारा बाण.

छाकछुक [ संकसुक (अस्थिर) = छंकछुक = छकछुक = छाकछुक ] (भा . इ. १८३४)

छा छू [ चहः चहुः = छाछू. चह् शाठ्ये, फसवणें ] छाछू म्ह० शाठ्य, लुच्चेगिरी, फसवाफसवी.

छांडणें [ स्यन्द् = छंड = छांड + णें =छांडणें ] पाणी छांडणें म्ह. पाणी वर काढून वाहातें करणें. (भा. इ. १८३५)

छाटणें [ शासनं = छाटणें ] (भा. इ. १८३४)

छाताड १ [ छाती + हाड (अस्थि) = छाताड ] (स. मं.) (२) [ वक्षस्तटी = (व लोप, छाताड ]

छाती १ [ वक्षतिः = (व लोप) छाती ] (२) [ वक्षःस्थिति = वच्छत्ति = छाती] (स. मं.)

छान् [ सांद्र = चान् = छान ] सांद्रशीतल = छान श्याळू.

छानदार १ [ सांद्रं = छांदर = छानदार ] सांद्रछाया = छांनदार साउंली. (२) [ सान्द्रं = छानदार = छानदार, शानदार ] सांद्र म्हणजे नीट, सुंदर, दाट विणलेलें; त्यावरून नीट, सुंदर, सुरेख. (भा. इ. १८३५) (३) [ सांद्र = सानदार = शानदार, छानदार, छांदार, शांदार ] (भा. इ. १८३४)

छाननें [ क्षालनं = छाननें (परटाची भाषा)] (भा. इ. १८३४)

छापा [ श्वापः = छापा ]

छाया (घर) [ छाया । शर्म । अज्म । इति द्वाविंशतिः गृहनामानि ॥ (निघंटु) ] बसायला कुठें तरी छाया पाहिजे, ह्या वाक्यांत छाया या शब्दाचा अर्थ गृह असा आहे व तो प्रथमतः वैदिकांनीं निघंटूतुन वापरलेला असुन नंतर सामान्य लोकांत पसरला. (भा. इ. १८३४)

छावणी [ छादनी roof = छावणी ] छप्पर.

छावा १ [ शावः = छावा ] (२) [ शावक

= छावा. शावकः शिशुः । (अमर) ] (भा. इ. १८३४)

छिचोर [ छित्वर = छिच्चुर = छित्चोर ] छित्वर म्ह० कपटी, धूर्त.

छित् [ शिट् अनादरे ] *(शिट् पहा)*

छिपटी [ शिफा ] *(शेपाटी पहा)*

छीः [ शिट् अनादरे ] *(शिट् पहा)*

छीथू [ छिः + थुत् = छीथूअ = छीथू ] छिः म्हणजे निंदा आणि थुत् म्हणजे थुंकणें.

छुप्पापाणी [ छुप् ] *(छुप्यो पहा)*

छुप्यो [ छुप् ६ स्पर्शे = छुप्यो, छुप्पापाणी, छप्पापाणी, छप्पोपाणी ] हातानें स्पर्श करून खेळण्याच्या खेळाला छुप्पोपाणी म्हणतात.

छुमकत [ शुन् + मक्क् गतौ ] *(धातुकोश - छुमक पहा)*

छू, छ्यू [ छ्यु गतौ छ्यवति = छ्यू, छू (लोट् मध्यम पु. १) (जा, पळ)] जा, पळ म्हणून कुत्र्याला सांगणें. कुत्र्याच्या गतीला छ्यु म्हणून उत्तेजन देतात.

छे [ शिट् अनादरे ] *(शिट् पहा)*

छे! छेच्छेः !!! [ चेच्चेत् hush, be quiet, by no means, not at all = छेच्छेः, छेः, छेह् ]

छेडी १ [ छिदिः = छेडिः = छेडी ] छेडी म्हणजे लहान कुऱ्हाड. (२) [ छैदिकः (वेत) = छेडी, छडी ]

छेह् [ छे ! पहा ]

छोटें [ क्षुद्र = छुट्ट = छोटँ = छोटें - टा - टी ] (ग्रंथमाला)

छ्यु, छ्यू [ छ्यु १ गतौ ]

## ज

जखड [ जाघट्य ] *(झागड पहा)*

जखम [ यक्ष्मन् = जख्खम = जखम ] भयंकर आघात. (भा. इ. १८३४)

जंग (लढाई), जंगजंग [ जंज् युद्धे (ज् = ग्) = जंग (लढाई) ] जंगजंग पछाडले.

फारसी जंग संस्कृत जंज् पासून निघाला आहे किंवा त्याचें रुपानतर आहे किंवा सहोदर आहे.

जगडंबर [ जगदंबर = जगडंबर ]

जगणें [ (गम्) जंगम् = जगणें ] जंगम् म्हणजे सातत्यानें जाणें. जगणें म्हणजे सातत्यानें जगांत असणें. (भा. इ. १८३६)

जघन्य [ जघन्यं (नीचतमं) = जघन्य ] त्यानें जघन्य शिव्याशाप दिले म्हणजे नीचतम शिव्या दिल्या.

जंघी [ जघ्निः = जंघी ] हत्यारविशेष.

जंजाळ [ जंज् १ युद्धे ] ती अगदीं आगजंजाळ आहे, म्हणजे लढाऊ भांडखोर आहे. जंजाळ हा शब्द जंज्वल् या क्रियापदापासून हि निघतो.

जजु [ यज्यु (यजुर्वेदज्ञ) = जज्यु, जजु ] (भा. इ. १८३६)

जटा [ जटा = जटा ] (स. मं.)

जड [ संहत (घट्ट) = जड ] weighty, thick.

जडाव [ (जतु) जातव = जाडव = जडाव] जडावाचा दागिना म्हणजे लाखेनें मिश्र असा सोन्याचा दागिना. (भा. इ. १८३४)

जणु १ [ जणु इवार्थे अपभ्रंशे ] उ. - तो जणु आला. (भा. इ. १८३२) (२) [ यथा + नु ] (जाणो पहा)

जती [ यांत्रिकः = जत्तिअ = जती. यति = जती ] महायांत्रिक म्हणजे ज्योतिषी. जती या शब्दाचे मराठींत दोन अर्थ आहेत. (१) यति व (२) ज्योतिषी. व दोन अर्थ दोन निरनिराळ्या संस्कृत शब्दांपासून आलेले आहेत. (भा. इ. १८३४)

जनाँत [ जनान्त (भोंवतालचा देश) = जनाँत ] जनाँत काय म्हणतील म्हणजे प्रांतांतील लोक काय म्हणतील. जनाँत हें येथें अनेकवचनी नाम आहे.

जनू [ जन्य (कर्तरि, कर्मणि ३-४-६८ = जनू ] what is born.जनू म्हणजे बालक.

जंत्री [ यंत्री = जंत्री ] कोणत्या हि व्यवहारांत वाट दाखविणारी ती जंत्री.

जप, जप्ति [ ज्ञप्, ज्ञाने, ज्ञापने ] मी त्याची मर्जी फार जपतों म्हणजे खुष करतों. ज्ञप्ति = जप्ति. (धा. सा. श.)

जप्ती [ ज्ञप्ति (वध करणें) = जप्ती ] पहिला अर्थ वध करणें, दुसरा अर्थ धनादिकांचा बंध करणें.

जंबाड १ [ बध् १० संयमने. संबाधः = जंबाड ] जंबाड म्हणजे गुंतलेले केस, वेली इ. (धा. सा. श.) (२) [ जंबाल = जंबाड ] जंबाड म्ह. शेवाळाची जूड, चोथा. (भा. इ. १८३५)

जम [ यमः = जम ]

जमदाड [ यमदंष्ट्रा = जमदाड ] शस्त्रविशेष.

जमनीक [ जवनिका = जमनीक ]

जमविणें [ समवे = जमवि (णें) ] (भा. इ. १८३५)

जमाव १ [ समवाय = जमआय = जमाय = जमाव ] (भा. इ. १८३५) (२) [ सम् + अव + इ २ गतौ ] *(धातुकोश - जम २ पहा)*

जयजय [ जेजेति, जेजय = जयजय (Freq - Imp- 2nd-sing.) ].

जरा [ अचिरात् = जिरा = जरा ] जरा म्ह० थोडें, अल्प, अव्यय. अचिरात् गत्वा प्रत्यागच्छामि = जरा जाऊन येतों. (भा. इ. १८३६)

जरि [ जव्हि ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४)

जरीपटका [ जर्जरीक पटकः = जरीपटका] जर्झरं म्हणजे इंद्रध्वज.

जर्जर [ झर्झर = जर्जर ] रे रे गुर्जर झर्झरोसि समरे - (प्रतापरुद्रीयम्) (भा. इ. १८३४)

जव्हैं [ जव्हि अपि ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४)

जवकिरा १ [ यव + क्रयः. यवक्रयः = जवकिरा ] धान्य वगैरे विकत घेणें. (२) [ क्र ९ द्रव्यविनिमये. यवक्रय = जवकिरा. अवक्रेणी = उग्रेणी = उग्राणी. विक्रेणी = बिग्रेणी = बिग्राणी] (धा. सा. श.)

जवळ - ज्ञानेश्वरींत जावळिक म्हणजे जोडींतला, सोदर, अशा अर्थाचा शब्द आहे. हा जावळिक शब्द = युगल, युगलक, ह्या संस्कृत शब्दापासून आला आहे. जुळें, जावळें हे शब्द मराठींत प्रसिद्ध आहेत. हा मूल त्या मुलाच्या जावळिकेंतील आहे, असा प्रयोग पूर्वी होत असे. जावळिकेंतील म्हणजे एकाच उदरांतील. समानोदरत्वावरून जावळिक म्हणजे निकटसंबंधी असा अर्थ होऊन व शेवटीं मराठींत छाटाछाट होऊन जवळ याचें शब्दयोगी अव्यय निष्पन्न झालें. (स. मं.)

जवान [ युवन् = जुवन् = जवान ] जवान् म्हणजे तरुण. जवान हा शब्द फारशींतहि आहे; परंतु तो त्या भाषेंत

संस्कृततुल्य किंवा पूर्ववैदिक भाषेंतून गेलेला आहे. (भा. इ. १८३४)

जहांबाज [ साहसभाज् = जहांबाज ] साहसी.

जळण [ ज्वलन = जलण = जळण ] (ग्रंथमाला)

जळपळणें [ जाजल्पनं = जळपळणें ] बरळणें. (भा. इ. १८३४)

जळलेलें [ ज्वलितज्वलितं ] (ओलेलें पहा)

जळल्या [जाल्म = जाळ्ळ = जाळल = जळल (ला - ली - लें) ] इदानीं ज्ञास्यसि जाल्म = समजेल आतां जळल्या मेल्या. पाणिनि ८-२-९६

जाइ [ याहि ] *(येइ पहा)*

जाऊ १ [ यात्ता = जाआ = जावा = जाऊ] (स.मं.) (२) [ यातृ = जाऊ. जाया स्तु भ्रातृवर्गस्य यातरः स्युः परस्परं (भट्टोजी, उणादि २६२) ] (भा. इ. १८३३)

जाऊं देणें - "एक्को वि कालसारो ण देइ गन्तुं" - गाथासप्तशती १-२५ (भा. इ. १८३२)

जाग [ यागः = जाग ] खंडोबाचा जाग = षडाननस्य यागः = खंडोबाप्रीत्यर्थ केलेला याग ऊर्फ यज्ञ. (भा. इ. १८३६)

जागड, जांगड [ ग्रंथ् ९ संघाते. जाग्रथ्य = जागड, जागड ] (धा. सा. श.)

जागर [ जागरीति (गृ ९ स्तुतौ) = जागर] आमच्या घरीं खंडोबाचा जागर आहे म्हणजे स्तवनाकरितां घरांतील मंडळी जमणार आहे.

जागल [ जागरः = जागल (पुं.). जागृति = जागल (स्त्री) ]

जागल्या [ जागृ २ निद्राक्षये. जागरिकः = जागल्या ]

जागृती [ जागर्तिः = जागृती ] (भा. इ. १८३६)

जाच [ यासः (यस्) = जाच ] (भा. इ. १८३६)

जाचक [ यासक = जाचक ] (भा. इ. १८३६)

जाचणी [ यातना ] *(धातुकोश - जाच ६ पहा)*

जाचणें [ (जसु ताडने) जासयति = जाचणें] सासू सुनेस जाचते = श्वश्रूः स्नुषां जासयति. जाच (नाम) = जासः (भा. इ. १८३७)

जा जा [ धै १ न्यक्करणे. ध्यायाः = जाजा] जा जा, गरज नाहीं जा = ध्यायाः, कारणं न वर्तते.

जाजू [ जायुः (औषधं) = जाजू ] तो कांहीं तरी जाजू करून, रोग बरा करतो. जाजू म्हणजे औषध.

जाड [ जड एव जाडः = (हलक्याच्या उलट) ] (भा. इ. १८३२)

जाण [ जज्ञान = जणाण = जाण ] जाण म्हणजे ज्याला ज्ञान होऊन गेलें आहे तो. हा शब्द जुन्या मराठींत व सध्यांच्या बोलण्यांत येतो.

जाणता [ जानत् ] *(सुजाण पहा)*

जाणावणें [ (ज्ञा) जाज्ञायते = जाणावणें ] वारंवार समजाविणें. (भा. इ. १८३६)

जाणो [ (जानु + उ) जानू = जाणो (आश्चर्यप्रश्ने) यथानु = जणु (औपम्ये) व्याश्रय - १-३२ ]

जातर [ जातु = जातर् ] जात दुग्धं पिब = जातर् दूध पी. जातु नाम एकवारम्. (भा. इ. १८३४)

जातीचें-चा-ची [ जात्य = जातिज = जातीच (चा - ची - चें) ] जात्य म्हणजे

कुलिन.

जातें [ यंत्रं = जंतं = जातें ]

जादू [ यातु (जादू) = जादू ] यातुधान म्हणजे जादूगार (ऋग्वेद १-७-३५-१०) शंकर पंडित यानें हीच व्युत्पत्ति दिली आहे.

जानपछान १ [ ज्ञानप्रत्याज्ञान = जानपच्चाजान = जानपछान ] (भा. इ. १८३४) (२) [ ज्ञानप्रज्ञान = जानपजाण = जानपछाण-न ]

जानवसा [ यज्ञवास्तु = जञ्ञवासा = जानवसा ] वऱ्हाडी लग्नरूपी यज्ञ करण्यास ज्या घरांत उतरतात तें घर. (भा. इ. १८३४)

जानोसा [ यानवासक = जानवसक = जानोसअ = जानोसा ] प्रवासांत व्याह्यांना रहावयाला दिलेली जागा. (स.मं.)

जाब [जल्प् १ व्यक्तायांवाचि. जल्प = जाब ] (धा. सा. श.)

जाभाड [ जृंभा + अस्थि = जांभा + अट्ठि = जांभा + हड्डि = जांभा + हाड = जांभाड = जाभाड ] (स. मं.)

जांभूळ [ जंबूफल = जांभूळ ]

जायजाणा [ याच्त्राजन्यः = जात्रजाणा = जायजाणा ] जायजाणा जिन्नस म्हणजे यांचा करून आणिलेला जिन्नस.

जा ये [ याहि रे आयाहि रे = जारे येरे ]

जाये [ येयायेय = याये (पहिलें व चवथें अक्षर लुप्त) = जाये ] जाये करतो म्हणजे येयायेयं करोति. जाये नाम आहे. (भा. इ. १८३६)

जाल (ला - ली - लें) - ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांत जन् जात पासून (जात + ल = जाअल = जाहल अथवा जाल = झाल ) जाल व्युत्पादिलें होतें. परंतु हा शब्द अथवा उच्चार दुसऱ्या एका तऱ्हेनें उत्पन्न झाला आहे, असें दिसतें. तिला पुत्र झाला, येथें जन् धातूत्पत्ति आहे; परंतु एक राजा झाला, येथें जन् धातू नाहीं. येथें झाला हें अस् भावे पासून निघालें आहे. अस् (निष्ठा) - स्त. स्त + ल = स त ल = झअल = झाल = जाल. स्त हें निष्ठारूप लुप्त वैदिककालीं हि झाललें होतें. पण प्रांतिक भाषांत प्रचारांत होतें. त्याला प्रत्यंतरपुरावा जाल हा मराठी शब्द आहे. भू - भूत - पासून ज्ञानेश्वरींत भूतल असें रूप येतें. होल, असें रूप कांहीं कनिष्ठ जातींत आढळतें. राजा झाला म्हणजे जन्मला असा अर्थ नाहीं; अभूत्, अभवत्, आसीत् असा अर्थ आहे. तेव्हां अस् च्या निष्ठारूपांपासून हा जाल शब्द निघाला आहे. (भा. इ. १८३२)

जावई शोध [ जातवेद = जाअवेअ = जावई शोध ] जातवेदस् म्हणजे सर्व जाणणारा. जावई शोध म्हणजे सर्व कांहीं जाणण्याचा आव घालणाऱ्याचा शोध. विपरीत लक्षणा आहे.

जावपें १ [ जातापत्यं = जावपें, जोपें. जातं च तत् अपत्यं। ] नवीन जन्मलेलें अर्भक. (२) [ जातपीतं = जाअपिअँ = जावपें, जोपें ] जन्मून नुकतें च प्यायला लागलेलें पोर, पिल्लूं

जावयी [ जामातृ = जावांअ = जावांय = जावायी = जावयी ] (स. मं.)

जावळ (ळा - ळी - ळें) [ जामि (सोदरसंबंधी = जावि. जामल = जावळ (ळा - ळी - ळें) ] जावळे भाऊ म्ह. एकाच वेळीं जन्मलेले सोदर भाऊ. (भा. इ. १८३३)

जांवेई [ जामेय (बहिणीचा मुलगा) = जांवेय = जांवेई. जामातृ = जांवाय = जांवाई] जांवाई व जांवेई या दोन शब्दांचा उच्चार सारखा असल्यामुळें भाचा म्हणजे बहिणीचा मुलगा तोच जांवाई झाला. (भा. इ. १८३३)

जाळीकाम [ जालकर्मन् = जाळकाम, जाळीकाम ]

जाळीवँ [ ज्वलेलिम = जाळीवँ ]

जिए [ जीवति ] *(धातुकोश - जि ३ पहा)*

जिकीर १ [ जिगीर्षा = जिगीर = जिकीर] पदार्थ गिळण्याची इच्छा. (भा. इ. १८३४) (२) [ चिक्रीषा = चिर्कीर = जिकीर ] पदार्थ विकत घेण्याच्या वेळीं दाखविलेली कचाटी. (भा. इ. १८३४) (३) [ जिघृषा = जिघीर = जिगीर = जिकीर ] पदार्थ घेण्याची इच्छा. (भा. इ. १८३४)

जिज्जिज्जि [ *(जेव्कार पहा)*

जिणिजे [ ज्या जिनाति to overpower, conquer लिङ् with विकरण = जिणिजे may overpower]

जिरणें [ ष्ठिव् ४ ष्ठीव्यति (शुष्क होणें, शोषिणें) = जिरणें ] टीपकागदांत वस्त्रांत पाणी जिरतें. (भा. इ. १८३३)

जिवट [ जीवथ (दीर्घायुः) = जिवट ]

जिवाणू [ जीविष्णु = जिवाणू ] (भा. इ. १८३४)

जिवापाड [ जीवपातं (adverb) = जिवापाड, जीवापाड ]

जी १ [ *जेव्कार पहा* ] (२) [ जय, जयतु = जी ] (ज्ञा. अ. ९) (३) [ आर्याः = जी ] (ज्ञा.अ. ९) (४) [ आर्य ! = जी ] (५) [ (लोट्) जय = जी] (६) [ (लोट्) जीव = जी]

जीभ [ जिव्हा = जीभ ] (स. मं.)

जीवापाड [ जीवपातं ] *(जिवापाड पहा)*

जी हा [ चीभ् (स्तुति करणें) चीभति; चीभा = जी हा ] जी हा करणें म्हणजे स्तुती करणें. जी ! हा ! या अव्ययांशीं संबंध नाहीं.

जी हा करणें [ चीभ् स्तुति करणें ] *(जी हा पहा)*

जुगारी [ युगहारी = जुगहारी = जुघआरी = जुघारी = जुगारी. द्यूतकारी = जुअआरी = जुआरी = जुवारी ] हीं दोन्हीं रूपें मराठींत प्रचलित आहेत. युग हा शब्द फांसा ह्या अर्थी संस्कृतांत फार जुना आहे. (भा. इ. १८३२)

जुडी [ जुड् बंधने = जुडी, जोड ] (ग्रंथमाला)

जुणट, जुनट, जुनाट [ जूर्णिष्ठ = जुणट, जुनट, जुनाट ] जुनाट म्ह० अति जुनें. (भा. इ. १८३७)

जुनेरें [ जूर्णवस्त्रं = जुनेरें ]

जुवा [ द्यूतः = जुआ = जुवा ]

जुवारी [ द्यूतकारी ] *(जुगारी पहा)*

जुळणें [ युगलनं = जुळणें ] (धा. सा. श.)

जुळें [ युगलं = जुअलं = जुळें ]

जूग [ युग्मं = जुग्ग = जूग ] स्त्रीपुरुषयुग्मं = स्त्रीपुरुषांचें जूग. सर्पयुग्मं = सापाचें जूग.

जूट [ यूथ = जूट ] (भा. इ. १८३६)

जेजे [ जै क्षये द्विरुक्ति = जेजे ] vexation.

जेठा [ जानुष्टयम् = जेठा ] a position in which the kness are bound with the धोतर.

जेठी १ [ योधिष्ठः = जेहिट्ठ = जेठ. यौधिष्ठियन् = जेठी ] a wrestler.

(२) [ याष्टीक warrior armed with a club = जेठी ] a warrior armed with a club. (३) [ युद्धिष्ठिर = जहिठ्ठिल = जेठिल = जेठी. जगयुधिष्ठिर = जगजेठी ] (भा. इ. १८३२) (४) [ ज्येष्ठिकः ] *(ज्येठी पहा)*

जेणें [ य + एनेन ] *(एणें पहा)*

जेरी १ [ जिरी - जिरीणोति. तनादि गण. जिरी नाश करणें, जखम करणें. जिरी = जेरी (थकवा, नाश). जेरीस चतुर्थी.] (भा. इ. १८३३) (२) [ जिरि = जेरी. जिरी = जिरिणाति (found only in the Vedas. जिरि to kill)

जेवणी [ जेम् १ भोजने. जेमनी = जेवणी] त्याच्या तोंडाची जेवणी लहान आहे. दोन्ही ओठ मिळून जें जेवण्याचें इंद्रिय होतें त्याला जेवणी म्हणतात.

जेवणें [ ज्यायान् (nomination of ज्यायस्) = जेवणें ] first, excellent, right. जेवणें आंग = right side.

जेवि [ यद्वत् ] (ज्ञा. अ. ९ पृ. ८)

जेव्कार - ब्राह्मणेतर लोक लावण्या गातांना कडव्याच्या शेवटीं तुणतुण्याच्या स्वरावर जिज्जिज्जिज्जि - असें एक पद सातत्यानें म्हणत असतात; आणि थोर लोकांच्या हांकेला होकार देतांना हे लोक जी असा दीर्घ उच्चाराचा शब्द उच्चारितात. हा दीर्घ जी शब्द आर्य, अज्ज, अशा परंपरेनें मराठींत साधला आहे, असें बहुतेक वैय्याकरणांचें मत आहे. आर्य, अज्ज शब्दापासून अजा व आर्या शब्दापासून अजी शब्द हे मराठींत आले आहेत हें स्पष्ट आहे. अज्ज शब्दाचा मराठींत दुसरा अपभ्रंश फार झालें तर, ज्ज असा होईल; परंतु जी असा दीर्घ ईकरांत होणार नाहीं. माझ्या मतें, होकारार्थी जी हा मराठी शब्द जय, जे ह्या परंपरेनें साधलेला आहे. जय हा शब्द मराठी व संस्कृत कवितेंत नमस्कारार्थी येतो. जे हा शब्द प्राकृतांत ही नमस्कारार्थी योजीत. गाथासप्तशतीच्या चवथ्या शतकाच्या ३२ व्या गाथेंत हा शब्द योजिला आहेः-

सूरच्छलेण पुतअ कस्स तुमं अञ्जलिं पणामेसि ।
हासकडक्खुम्मिस्सा ण होन्ति देवाणँ जेक्कारा ॥ ३२ ॥

जेक्कारो नमस्कारे देशी, असा टीकेंत जेव्कार म्हणजे जे ह्या शब्दाचा अर्थ दिला आहे. ह्या प्राकृत जे शब्दाचा लावणींतील जिज्जिज्जि हा अपभ्रंश आहे. (सरस्वती मंदिर, श्रावण १८२६)

जेव्हां [ यदा वा ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६२)

जेष्ठमध [ यष्टीमधु = जेष्ठमध ] (भा. इ. १८३४)

जोकड [ योक्त्र ] *(जोखड पहा)*

जोखड १ [ योक्त्र = जोकड, जोखड ] (भा. इ. १८३६) (२) [ योक्त्रं = जोखड. यूपकटकं = जोखड ] (३) [ योक्त्रदंड = जोखड ]

जोखा (बाई) [ योषा = जोखा ] (भा. इ. १८३६)

जोखीम [ योगक्षेम = जोगखेम = जोखेम = जोखीम ] योगक्षेम म्हणजे जोखीम. पैशाची जोखीम म्हणजे the security of money. (भा. इ. १८३६)

जोगता [ युक्तः = युगता = जोगता ]

जोगमेढी [ योगमेधिन् = जोगमेढी ] (भा. इ. १८३४)

जोगवण [ योगापनं = जोगवण ] (भा. इ. १८३६)

जोगवा १ [ जोहूया = जोघुवा = जोगवा. हु to sacrifice ] जोगवा म्हणजे उत्कट यज्ञ. (२) [ जोगवः = जोगवा [beggary with singing aloud (Vaidik) जोगृ to sing aloud from गु to sound ] (३) [ योगोपायन = जोगोवाअण = जोगोवा = जोगवा ] काहीं योग चालविण्याकरितां जें वाण मागणें तो जोगवा. (भा. इ. १८३६)

जोगा [ योग्यः = जोगा ]

जो जो [ द्रै (स्वपने, निद्रायाम्) द्राय द्राय = जाव् जाव् = जो जो ] बाळा ! जो जो रे म्हणजे लाडक्या ! नीज नीज.

जो जो जो जो [ ज्योक् (शीघ्रार्थे) = जो] बाण जो जो जो सुटला तो रावणाच्या उरांत घुसला. येथें जो जो जो याचा अर्थ शीघ्रता, त्वरा असा आहे. तो जो निघाला तो एकदम खड्डयांत पडला, एथें जो म्हणजे शीघ्रत्वानें.

जोड १ [ जुड् बंधने ] (जुडी पहा) (२) [ योध = जोढ = जोड (कुस्तीचा)] मला कुस्तीला जोड द्या = युद्धार्थं योधं ददत. (भा. इ. १८३४) (३) [ जोगोधः = जोओढा = जोडा, जोड, जोडी. गोध् to play, sport.जोडा playmate ]

जोडणें [ यौट् १ बंधने. यौटनं = जोडणें ] (धा. सा. श.)

जोडवें [ यौतकं (dowry) = जोडवें ] Ornament given by the husband to wear on the fingers of the foot at marriage.

जोडा १ [ जोगोधः ] *(जोड ३ पहा)* (२) [ युतयोः वधूवरयोः इदं यौतकम्। युतौ म्हणजे वधूवर, नवराबायको. यौतक = जौडअ = जोडा ] (भा. इ. १८३४)

जोडी १ [ जोगोधः = जोडी ] *(जोड ३ पहा)* (२) [जुड् + ति = जुट्टिः = जोडी ] (ज्ञा. अ. ९)

जोडीचें [ यौतवीयं = जोडीजें = जोडीचें ] यौतवं मानं = जोडीचें माप. यौतवं द्रुवयं पाय्यं (अमर, द्वितीय कांड, वैश्य वर्ग ८५)

जोडीवँ [ जुडेलिम = जोडीवँ. त्रुटेलिम = तोडीवँ ]

जोतें [ युत् १ बंधने. युतं = जोतें ] पायाचें दगडी बांधकाम तें जोतें. (धा. सा. श.)

जोंधळा, जोन्हळा [ योनलः, (यवनालः) = जोनळा = जोन्हळा = जोंधळा ] (भा. इ. १८३६)

जोपें [ जातापत्यं, जातपीतं ] *(जावपें १, २ पहा)*

जोम [ द्युम्न (जोर, शक्ति) = जोम ]

जोव [ द्युत् १० प्रकाशे. द्योतिनी = जोईण = जोवी = जोव ] जोव म्हणजे विद्युत्. (धा. सा. श.)

जोहर १ [ जतुग्रह = जोहर (लाखेचें घर)] जोतिर्धर म्हणून माडगांवकर देतो तें चूक. (२) [ जतुगृह = जोहर. जतुकारिन् = जोहारी (लाखकाम करणारा) ]

जोहारा [ घोकारः = जोआरा = जोहारा] प्रासादादि बांधणारा शिल्पी.

जोहारी [ जतुकारिन् ] *(जोहार २ पहा)*

ज्या [ ज्यु गतौ ] ज्या रे, तुझ्यानें काय होणार आहे? येथें ज्या म्हणजे नीच

असा अर्थ आहे.

ज्या, ज्याव [ज्यव = ज्याव, ज्या. ज्यु गतौ] ज्या, ज्याव म्हणजे जा, निध.

ज्याव, ज्या रे ! [ ज्यु ज्ववति to go = ज्याव, ज्या]

ज्येठी [ ज्या to oppress + इष्ठ (primary affix) = ज्येष्ठ. oppressor ज्येष्ठिकः = जेठी ] oppressor, a wrestler - employed to oppress and beat people. जगजेठी = जगज्जेष्ट the greatest of the universe.

## झ

झक [ सहः = सघः = झग = झक (समर्थ) हा माणूस लढण्याला झक आहे = अयं नरः योद्धुः सहः।

झकत [ धतिक् ] *(झकीत पहा)*

झकाकणें [ चकास्ट् दीप्तौ ] *(चकाकणें पहा)*

झकास [ चकास (चकाकणारें) = झकास] हें काम झकास झालें म्हणजे स्पष्ट, चकचकित, नामी झालें. (भा. इ. १८३६)

झकीत [ धकित् धिगर्थे. धकित् = झकित् = झकत (निपात) ] तो झकत् येईल म्ह० तो अपमान होऊन येईल.

झखझखीत, झगझगीत [झष् संवरणे ] (ग्रंथमाला)

झंगट [ संगतम् = झंगट, झेंगट ] झंगट म्हणजे सोबत, सोबती.

झगड [ जाघट्य ] *(झागड पहा)*

झगडा [ संग्रामः ] *(धातुकोश - झगड २ पहा)*

झगा १ [ झष् संवरणे ] पायघोळ वस्त्र. (झखझखीत पहा) (२) [ षगे संवरणे. सगः = झगा ] झगा म्ह० पायघोळ आंगरखा. (३) [ सग् (झांकणें, आछादणें) = झगा, झाकणें ]

झट् [ हेठ् (शाठ्ये) जिहेठ् = झेट्, झ्याट्, झट् किंवा जहट् (to run, to leap) = झट् (मागें हो) ]

झट [ संयन्त्रित fastened = झट ] fastened, obliged, forced.

झटका १ [ झटकः = झटका. झट् गोंधळणें] (२) [ स्यन्दकः = झटका. स्यन्द् to run स्यन्दते ] एक प्रकारचें वहान. (३) [ जीर्विका ] *(झिरका पहा)*

झटणें [ झट् (संघाते) = झटणें ] तो मला झटला म्हणजे येऊन गच्च भिडला. झटून काम करणें म्हणजे भिडून काम करणें. (भा.इ. १८३६)

झट्ट झट्ट [ संयत्त ready = झट्ट ] ready

झट { झटी झटा (झट्पासून) = झड } झडीनें झडेनें पावसाच्या झडीनें किंवा झडेनें पिछा पुरविला आहे. (भा. इ. १८३६)

झटकर - रि, झटकन्, झटदिनि [ *(चटकर पहा)*

झणीं १ [ शनैः = सणी = झणी, झणीं ] हळूहळू. (२) [ शनैः = सणै = झणै, झणे, झणीं ] झणीं म्ह० शीघ्र. (भा. इ. १८३४)

झणे, झणे [ शनैः ] *(झणीं २ पहा)*

झपकन् [ जवं कृत्वा = झपकन् ] quick.

झपाझप् [ सर्पं सर्पं ] *(सप् सप् १ पहा)*

झपाझप [ क्षिप्रं क्षिप्रं ] *(सप् सप् १ पहा)*

झपाटा [ संपातः ] *(सपाटा पहा)*

झपाटिका [ सृपाटिका. सृ १ गतौ *(झुरका*

२ पहा)

झपाटी [ सृपाटिका (पक्ष्याची चोंच) = झपाटी ] साप गरुडाच्या झपाटींत सांपडला म्हणजे चोंचींत सांपडला.

झपेट [ संस्फेट ] *(धातुकोश - झपेट ३ पहा)*

झप् झप् १ [ क्षिप्रं क्षिप्रं ] *(सप् सप् १ पहा)* (२) [ सर्पं सर्पं ] *(सप् सप् पहा)*

झंबट [ यमव्रत (पक्षपात न करतां जें शासन तें) = जम्बट = झंबट = संकट]

झबलें [ यमलं (आंगरखा) = जवळें = झबलें. यम् to find ]

झमझम [ स्यम् १ शब्दे. (वीप्सा) स्यमस्यम = झमझम. द्विरुक्ति चिवचिव ] (धा. सा. श.)

झरझर [ अजिरं अजिरं = झरझर. अजिर quick ] (२) [ स्राक् स्राक्]

झरझर, झराझर [ निर्झरं त्वरितं ह्यांतील झर पासून झरझर ]

झराझरा [ स्राक स्राक = झराझरा (त्वरेनें). = झारझार झरझर ]

झरी [ सरित् ] (धातुकोश - झिरप पहा)

झर्झर् [ सृ सरणें. सरं सरं ] *(सर् सर् पहा)*

झव, झवणें [ धव (पुमान्) = झव. धवति = झवे ] तुझ्या आईचा मी झव = तव मातुः अहं धवः (भा.इ. १८३३)

झवणें [ (वि) धुवनं = झुवणँ = झुवणें. धवनं = झवणँ = झवणें धव म्ह० नवरा, पति. त्याचें मुख्य कर्म धवन अथवा (वि) धुवन (रतं) त्याचा अपभ्रंश झवणें ] (भा. इ. १८३३)

झंवाडा [ संमादकः = झंवाडा ] झंवाडा माणूस आहे = संमादकः मनुष्यः संमादकः = Frenzied, mad, intoxicated. यांत बीभत्स असें कांहीं नाहीं.

झळ १ [ झल्लिका = झळी = झळ ] उन्हाची झळ. (२) [ झल्का = झळ] झल्का तु महाज्वाला (वैजंयती, पृ. ११, ओपर्ट) ज्वल्का = झल्का (अपभ्रंश संस्कृत)

झांकणें [ झष् to cover = झाँख = झाँक] झष् बद्दल झंष् किंवा झाष् असा धातु असावा. (भा. इ. १८३४)

झाखड [ जाघट्य ] *(झागड पहा)*

झागड [ घट् १ चेष्टायां संघाते. जाघट्य = झागड, झगड, झाखड, जखड ] (धा. सा. श.)

झांगड १ [ हन् २ घाते. संघातः = झांगड] (धा. सा. श.) (२) [ झर्झरी = झांजड = झांगड. झ = ज = ग ] वाद्यविशेष.

झाँटं [ शांतं ! (अव्यय) = झाँटं! ] झिटकारार्थक अव्यय.

झाड १ [ छृष् to kindle. छृष्टं = झाड (दारूचें झाड म्हणजे पेटवून जळणारा पदार्थ) ] झाड (वृक्ष) हा शब्द निराळा. (२) [ (पुं.) झटिः = झाड (नपुं) ] (ज्ञा. अ. ९ पृ. १४२)

झाडणी [ साधारणी (कुंचिका) = झाहारणी = झाडणी ] झाडणी म्ह० केरसुणी (भा. इ. १८३४)

झाडणें [ (स्वठ्) स्वाठ् = झ्वाड = झाड (णें) ] संपविणें. झाडून सगळें काम केलें = स्वाठयित्वा सर्वं कर्म कृतं । (भा. इ. १८३४)

झाडा १ [ जाहत्ति हद् १ पुरीषोत्सर्गे ] *(धातुकोश - झाड ११ पहा)* (२) [ सादः ] *(धातुकोश - झड १०*

*पहा)* (३) [ हद् (हगणें), जहद् = झाडा ] हगणें. (४) [ जाहद्यते = झाडा ] अतिशय निकडीनें हगावयाला होणें. झाडू म्हणजे गू काढून नेणारा scavenger. (५) [ सातिः (मिळकत) = झाडा ] मिळकतीचा हिशेब. (६) [ जाहद् frequentative of हद् हगणें ] = झाडा (हगणें), झाडू] मला झाड्याला जावयाचें आहे म्हणजे हगावयास जावयाचें आहे.

झाडू १ [ हद् १ पुरीषोत्सर्गे ] *(धातुकोश - झाड ११, १२ पहा)* (२) [ जाहद्] *(झाडा ४ पहा)* (३) [ शाड् श्लाघायां हाजी हाजी करणें = झाडू ] शाडुः = झाडू a low flatterer.

झांप १ [ झंप (jump) = झांप ह (भा. इ. १८३५) (२) [ झंपा = झांप] झंपा म्ह. उडी. (३) [ स्वाप = झ्वाप = झाप = झाँप = (डोळे) झांप, झांपड] डोळे झांप = नेत्रस्वाप. झ्वाप असा उच्चार अशिष्ट अद्याप करतात. (भा. इ. १८३४)

झापड १ [ स्वापः = झापड ] डोळ्यावर झापड आली. *(धातुकोश - झापड पहा)* (२) [ स्वपथुः = झापड (निद्रा). स्वप् २ स्वप्ने ] झापड म्ह० निद्रा.

झांपड १ [ स्वाप ] *(झांप ३ पहा)* (२) [ श्वापहेतिः ] *(धातुकोश - झांपड पहा)*

झांपा [ झंपः = झांपा ]

झांबट [ संवर्तः = झांबट ] आभाळांत मोठें झांबट आलें आहे म्हणजे मेघांचा समूह आला आहे.

झालँ [ जाल्म = झालँ ] झालं ! एथें काय करावें ? = जाल्म ! किमत्र कार्यं ?

(भा. इ. १८३५)

झालर १ [ झल्लरी = झालर ] (भा. इ. १८३४) (२) [ झल्लरी = झालर] झल्लरी म्हणजे कुरळे केस. झालर म्हणजे कुरळ्या केसासारखें कापड.

झाला १ [ जै to decay. ज = झ ] हा मनुष्य झाला आहे म्हणजे क्षीण आहे. (२) [ यातः = जाअ + ल = जाला = झाला ] मे ग्रामः यातः = माझा गांव झाला (पाणिनि ३-४-७६)

माझा हा गांव झाला म्हणजे मी ह्या गांवाला गेलों. *(धातुकोश - झा पहा)*

झाला - ली - लें - कृ, अस्, भू या तीन क्रियापदांच्या पाठीमागें कोणता ही शब्द लागून संयुक्त क्रियापद संस्कृतांत तयार होतें. तो च प्रकार मराठींत होतो.

सः गंगीभूतः = तो गंगा झाला. सः ब्रह्मीभूतः = तो ब्रह्म झाला. ब्रह्म झालेल्याला संसार कोठचा? = ब्रह्मीभूतस्य कुतः संसारः येथें मराठी वैय्याकरणंमन्य ब्रह्म याचें व्याकरण करूं जातात व त्या प्रयत्नांत गडबडतात. वस्तुतः ब्रह्म झालेल्याला हा एक शब्द आहे व तो संस्कृतापासून मराठींने घेतला आहे. ब्रह्मीभूतः या शब्दांत ब्रह्मी या शब्दाचें जसें निराळें व्याकरण नाहीं, तसें च ब्रह्मझालेल्याला ह्या शब्दांत ब्रह्म या शब्दाला निराळें व्याकरण नाहीं.

ती स्त्री राजा झाली = सा स्त्री राजीभूता.

राजा झालेल्या स्त्रीस मुगुट घातला = राजीभूतायै स्त्रियै मुकुटः दत्तः

येथें राजा हा शब्द निराळा करून व्याकरूं नये. गाय झालेल्या लोकांस छळू नये = गौभूतान् जनान् मा छलत । येथें गाय

झालेल्या हा एक शब्द आहे. गाय आणि झालेल्या असे निराळे शब्द करून परिस्फोट करूं गेल्यास घोंटाळा होऊन वाट सांपडणार नाहीं. (भा. इ. १८३६)

झालें १ [ (जन) जात + ल = जाल = झाल ] हें याचें झालें. (२) [ सो (to bring to an end) - सित = झिअ + ल = झिअल = झ्याल = झालें ] त्याचा धडा झाला he has ended his lesson.

झालेला [ ज्या ] *(धातुकोश - झा पहा)*

झिंगा [ चिंगेटः = झिंगा ] a kind of fish.

झिटकारणें [ हट् निंदायां ] *(हटकारणें पहा)*

झिटी [ झिंटि (झुडुप) = झिटी, झिपरी ] (भा. इ. १८३३)

झिपरी १ [ झिंटि ] *(झिटी पहा)* (२) [ झंपटिः unbound mass of hair = झपरी = झिपरी (वैजयंती कोश) ]

झिमझिम [ जिह्मजिह्मं = झिमझिम ] जिह्म म्हणजे मंद. झिमझिम म्हणजे मंदमंद.

झिम्मा [ हम्म् गतौ Freq जिहम्म् = झिम्मा] a sport.

झिरका [ जीर्विका = झिरका. झिरका = झिडका = झिटका = झटका ] झिरका व झटका हीं एक वाहनाचीं नांवें आहेत. जीर्वि म्हणजे गाडी.

झिरझिरीत [ झृष् वयोहानौ ] झिरझिरीत वस्त्र म्हणजे कालान्तरानें जीर्ण झालेलें वस्त्र. (भा. इ. १८३३)

झिरझिरें [ झर्झरीकं (शरीरं) = झिरझिरें शरीर (कृश शरीर) उणादि सूत्राणि ]

झिरा [ सरित् ] *(धातुकोश - झिरप पहा)*

झिळमिळ्या [ चिल्मीलिका a kind of necklace like a luminous flying insect = झिळमिळ्या ] एक दागिना.

झुंजूमुंजू [ संध्यामंदसंध्या = झंज्यामंझ्या = झुंजूमुंजू ] किंचित् दिसावयाला लागतें इतकी संध्यावेळा.

झुट् (निपात) [ युत् (कुत्सने निपातः) = जुट् = झुट्, छुट्, छट, हुट् ] (भा. इ. १८३४)

झुपका, झुबका [ स्तबकः (पुष्पांचा घोस)]

झुरका १ [ सरकः = झरका = झुरका ] सरक म्हणजे दारूचा घोट. झुरका म्हणजे तंबाखूच्या धुराचा घोट.मूल शब्द झरका असा होता, त्याचा अपभ्रंश झुरका. (२) [ सृ १ गतौ. सृक = झुक = झुरका = झुळूक. सृपाटिका = झपाटिका ] (धा. सा. श.) (३) [ सृकः (वाऱ्याची झुळूक) = झुरका. सृकः = झुका = झुरुका = झुळूक, झुरका ] (४) [ सरकः (दारू पिण्याचें कृत्य) = झरका, झुरका (तंबाखूचा, दारूचा, विडीचा) ] (भा.इ. १८३४)

झुरणें १ [ शृ = झुरणें ] शीर्यते वन एव वा = वनांत झुरतो. (भा. इ. १८३४) (२) [ जूरि वयोहान्यां ] (ग्रंथमाला)

झुलणें, झुलवणें, झुलावणें [ धूलति = झुलणें. धूलयति = झुलवणें, धूलापयति = झुलावणें ] (भा. इ. १८३६)

झुलवा [ अध्युह्यहः marriage = (अलोप) झुलवा ] रंडीचा झुलवा.

झुळझुळ वाहणें [ श्वल् आशुगमने = झुळझुळ ]

झुळूक [ सृकः ] *(झुरका ३ पहा)*

झूल [ हुल् आच्छादने होलति, जुहुल् = झूल] coverlet of an ox, horse,

elephant.

झेंगट [ संगतम् = झंगट, झेंगट ] *(झंगट पहा)*

झेट् [ जिहेठ् ] *(झट् पहा)*

झेंडा [ ध्वजदंडः = झयअंडा = झेंडा ] प्राकृतांत ध्वज चा अपभ्रंश झय होतो.

झोका [ धक्कः, धक्क् नाशने ] (धकाधकी पहा)

झोट १ [ जूटः = झोट ] (२) [ सुभटः = झोट ]

झोटिंग [ जेटिंगस्तु महाव्रतिः (त्रिकांडशेष)] (ग्रंथमाला)

झोड १ [ संप्रवृत्तिः set about vigorously = झोड ] कामाची झोड उडवून देणें. (२) [ संप्रवृष्टिः to be continuously raining = झोड ] पावसाची झोड. (३) [ हुड् to go जुहुड = झोड ] to approach assiduously anything. वर झोड उडवून देणें, झोडणें. (४) [ समृद्धि = झोड ] plenty. पैश्याची, कामाची झोड उठविली. acquired plenty of money.

झोंड १ [ जोहुंड्य = झोंड. हुंड् १ संघाते] झोंड म्ह० गर्दी करणारा. (धा. सा. श.) (२) [ यवीयुध् eager to fight, warlike = झोंड ] warlike, eager to fight.

झोत १ [ स्रोतः (निम्नगा - रये) = झोत = धोत ] (२) [ श्रोतस् = सोत्त = झोत, धोत ]

झोपा, झोंपा [ यूपः = जोपा = झोपा, झोंपा ] वईच्या दाराला झोंपा म्हणतात.

झोल [ हुल् १ सरणे. जोहुल्य = झोल ] (धा. सा. श.)

झ्या [ झ्यावस्व = झ्या. झ्यु गतौ ] झ्या म्हणजे चल, निघ, चाल.

झ्या ! झ्या ! [ झ्यु to move, to go झ्याव, झ्याव imp. second, sing.) = झ्या ! झ्या !]

झ्याट् १ [ (निपात) स्यात् न गमिष्यामि = झ्याट् ! नाहीं जाणार = may be, I wont go ] झ्याट् = काय होईल तें होवो. झ्याट् हा शब्द शिवी नाहीं. शिवी असती तर लोक सररहा घरांत बायकापोरांदेखत तो उच्चारतो ना. (भा. इ. १८३४) (२) [ जिहेठ् ] *(झट् पहा)*

झ्याट् मारी [ स्यात् मारी = झ्याट् मारी ] मारी म्हणजे दुर्गादेवी (स्मशानांतील) स्यात् मारी म्हणजे मारी असेना. हे दोन शब्द हि गाळी नाहींत. (भा. इ. १८३४)

## ट

टक [ (दृश् १ प्रेक्षणे) दृक् = डक् = टक] टक लावणें म्हणजे दृष्टि लावून बसणें.

टकलें [ ताल - तालक ] *(टाळकें ३ पहा)*

टका [ टंकक = टकअ = टका. टंक = टांक ] येथें पहिल्या उदाहरणांत अपभ्रंश होतांना अनुस्वाराचा लोप झाला आहे, व दुसऱ्या उदाहरणांत अनुस्वाराचा अनुनासिक झाला आहे. (भा. इ. १८३३)

टक्कर [ (स्त्री) टक्करा (blow on the head) = टक्कर (स्त्री) ] (भा. इ. १८३५)

टक्कल [ ताल - तालक ] *(टाळकें ३ पहा)*

टंगडी [ टंगा ] (टांग पहा)

टंगळमंगळ १ [ तङ्गनं मङ्गनं = टंगळमंगळ. तङ्ग् स्खलने व मङ्ग् गतौ ] टंगळमंगळ म्ह० स्खलन, चुकारपणा. (भा. इ. १८३६) (२) [ तग् (तंग्) अडखळणें व मंघ् फसविणें. तंग् + मंघ्] टंगळमंगळ म्ह० अडवणूक व फसवणूक करणें.

टचकारा [ त्वचाग्रहः = टचकारा ]

टंचाई १ [ तंच् संकोचने. तंचतिः = टंचाई] संकोच, अल्पीभाव.

टचूकन् [ तस् ४ उपक्षये ] *(धातुकोश - टचक पहा)*

टणक [ तर्णक = टणक ] तर्णक = वत्स young.

टणका [ तर्णकः (वत्सः young one) = टणका ]

टपाल [ तल्प = टप्प (ल स्वार्थक) = टपाल ] बरें टपाल हंटलें. = वरं तल्पं साधितं. टपाल म्हणजे बीभत्स मराठींत स्त्री. तल्प म्हणजे मंचक, खाटलें. त्यावरून खाटल्यावरील स्त्री. टपाल वाजविणें असाही प्रयाग आहे. टपाल वाजविणें म्हणजे बाज वाजवणें.

टप्पा [ अष्टपदी = अठ्ठपई = ठ्ठपी = टप्पा असा परंपरेनें हा शब्द आला आहे ] (स. मं.)

टमकी [ स्थंभकिन् = टंम्हकि = टमकी = टिमकी ] स्थंभकिन् म्हणजे दोन्ही बाजूंनी कातड्यानें मढविलेलें वाद्य.

टरकणें [ तर्क = टरक ] टरकणें म्ह० बुद्धि चंचळ होणें. (भा. इ. १८३४)

टरकन् पाद [ तर्क् ] *(धातुकोश - टरक १ पहा)*

टरकन् फाड [ तर्क् ] *(धातुकोश - टरक १ पहा)*

टरबुज [ तरंबुज =टरबुज तरत् अंबु - तरंबु (कर्कंधुवत् समास) तरंबुनि जातं तरंबुजं ] (भा. इ. १८३४)

टरारणें [ तरुणयति = टरारणें ] तरुणयति म्हणजे अतिशयें करून होणें. पुरी टरारून फुगली म्हणजे अतिशयें करून फुगली. (भा. इ. १८३७)

टरांव [ तरन्त = टरांव (बेडकाचें ओरडणें)] (भा. इ. १८३४)

टवका १ [ त्वचकः = टवका. त्वच् ६ संवरणे ] (२) त्वक् = टवक. त्वचा (का) = टवका ] टवका म्ह० बाहेरील पापुद्रा. (भा. इ. १८३४)

टवचणें [ त्वचय = टवच. त्वचं गृह्णाति - त्वचयति ]

टवटवीत [ तु २ गतिवृद्धिहिंसासु ] *(धातुकोश - टवटव पहा)*

टवळी [ तपनी ] *(तपेली पहा)*

टळटळित, टळटळी, टळटळीत [ तल् १० तपने द्वित्त ] *(धातुकोश - टळटळ पहा)*

टाऊक १ [ टौक to go = टाऊक. टौकते] (२) [ तावत्क = टाउक्क = टाऊक ] तावत्क म्हणजे अमुक थोड्या किंमतीस घेतलेला पदार्थ.

टांक [ टंक छाप मारणें. टंक = टांक (देवांतला) ] टंक या क्रियापदाचें टंच असें हि एक रूप असावें. टंच हें रूप संस्कृत कोशांत नाहीं; परंतु तदुत्पन्न टांच हा धातू मराठींत आहे. त्यावरून अनुमान होतें कीं, संस्कृतांत जरी नाहीं, तरी तत्कालीन प्रांतिक भाषांत टंच, टॉंच हा धातू असावा. (भा. इ. १८३३)

टाकणें [ त्याग = टाक ] टाकणें म्ह०

त्यजणें, सोडून देणें. (भा. इ. १८३४)

टांकणें [ स्तक् = टकणें. टाकणें (प्रयोजक) ] हात टाकतो = हस्तं स्तकयति. (भा. इ. १८३३)

टाकला [ तर्क् - तर्कितः ] तो कसा अगदीं टाकलेला आला म्ह० तर्क केल्याप्रमाणें हुबेहूब आला. *(धातुकोश - टाक ३ पहा)*

टाकळा १ [ तर्कारी = टक्वाली = टाकळी. तर्कारः = टक्काला = टाकळा ] (२) [ तर्करी वैजयंतिका ।] टाकळा (वनस्पति). (केयदेव - पथ्यापथ्य विबोध) (भा. इ. १८३४)

टांका (चोईचा, दोऱ्याचा) [ टंक् बांधणें. टंकक = टाँकअ =टाँका ] (भा. इ. १८३३)

टांकारी [ टंकाहारी = टांकारी ]

टांकी [ टंकिका = टांकी ]

टाकीव [ त्यागिमं = टाकीव ] त्यागेन निवृत्तं त्यागिमं (४-४-२०)

टाकोटाक [ त्राक् वा टाक् = द्राक् वा टाक् = टाकोटाक ] टाकोटाक म्हणजे ताबडतोब. (भा. इ. १८३३)

टांग १ [ टंग, टंक = टांग ] (स. मं.) (२) [ टंगा = टांग, तंगडी, टंगडी ] (भा. इ. १८३३)

टांगें [ शिक्षा देतांना शेंडीनें जो अवयव टांगतात तो ] (स. मं.)

टांच १ [ तञ्च् १ संकोचने. तंचा = टांच] सरकारनें टांच देणें. तंचतिः = टंचाई. (धा. सा. श.) (२) [ तञ्च् क्षीण करणें. तंच = टांच ]

सावकारानें टांच देणें म्हणजे कर्जाच्या उगवणीकरितां ऋणकोला क्षीण करणें. टांच आणणें असा हि प्रयोग आहे. (३) [ ज्या अवयवानें पाखरे किंवा पशु शत्रूला टांचतात म्हणजे मारतात तो ] (स. मं.)

टांच आण [ तञ्च् १ गतौ ] *(धातुकोश - टांच २ पहा)*

टांचण [ तञ्च् १ गतौ तञ्चनं ] *(धातुकोश - टांच २ पहा)*

टांच दे [ तञ्च् १ गतौ ] *(धातुकोश - टांच २ पहा)*

टारगा १ [ (नारी) तरंगक - टरंगा = टारगा ] (२) [ टार एव टारकः. टारकः (गांडू) = टारगा ] (३) [ (टारः) टारकः (catamite) = टारगा ] (कुत्सितार्थी) टारगट. (भा. इ. १८३७)

टाळ [ ताली time beating instrument वैजयंती कोश = टाळ ]

टाळकें १ [ तालूषकं = टाळकें ] (२) [ तालकं = टाळकं = टाळकें. (स.मं.) (३) [ ताल = तालक = टाळक = टाळकें. टाळक = टाकल = टक्कल = टकलें. ताल = डोक्याची कवटी. ] (ग्रंथमाला)

टाळू [ तालु = ताळू = टाळू ] (स. मं.)

टाळें १ [ तालम् = टाळँ = टाळें (कुलूप)] (ग्रंथमाला) (२) [ तालकं = टाळें (कुलूप) ]

टिकणें [ टिक् गतौ ] माझ्या बरोबर टिकतो = माझ्याबरोबर चालतो, दम धरतो. लुगडें टिकलें = गेलें. (ग्रंथमाला)

टिकला [ तिलकः = (वर्णविपर्यय) टिकला]

टिकली [ तिलकिका = टिकली ]

टिकाउ [ तितिक्षु = टिखाउ = टिकाउ ] टिकाउ म्हणजे दमदार. नाम टिकाव. (भा. इ. १८३५)

टिकाव धर [ तक् १ कृच्छ्रजीवने (तितक)] *(धातुकोश - टिक २ पहा)*

टिकें [ त्रिकं (तीन रस्ते मिळण्याची जागा) = टिकें ] टिक्या वर भाजी मिळते म्हणजे तीन रस्ते मिळण्याच्या जागीं भाजी मिळते.

टिक्का [ तिलककः = टिक्का ]

टिपण [ तिप् १ क्षेपे ] (धा. सा. श.)

टिंब १ [ डिंब egg= टिंब (अंड्यासारखें वाटोळें) ] (२) [ डिंब = टिंब (शाईच्या लेखणीनें काढलेलें सूक्ष्म वर्तुळ, ठिपका) ] डिंब म्हणजे लहान गोळी.

टिमकी [ स्थंमकिन् ] *(टमकी पहा)*

टिरी १ [ त्रिका, त्रिकं = टिरी (वंशान्धः)] (२) [ त्रिक = टिरिअ = टीर - री ] (भा. इ. १८३४)

टिळा [ तिलक = टिळअ = टिळा ]

टीर [ त्रिक ] *(टिरी २ पहा)*

टुक [ त्वकः (एकः अन्यतरः) = टुक ] टुकटुक माकड (म्हणजे तें तें माकड) असें म्हणून पोरें एकमेकांना वेडावतात.

टुकटुक [ दृश् = टुकटुकणें to look wistfully ]

टुकटुकणें [ दृश् = टुकटुकणें to look wistfully]

टुकटुक माकड [ तक् हसने । तकतकं = टकटक = टुकटुक ] बोटानें वेडावून पोरें कांहीं पदार्थ खात खात एकमेकांना हंसतात तें.

टुकडा [ त्यक्षः = टुकडा ]

टुचकन् [ तुद् to wound = टुच् ]

टुणकन् १ [ तुर्ण ] (२) [ तुण् to curve] (३) [ त्वङ्ग् (Gallop) = टुण (कन्) ] (भा. इ. १८३५) (४) [ त्वङ्ग् to leap Whitney ]

टुणटुण [ तुर्णतूर्णं = टुणटुण (उडतो) ]

टू [ टुः (रूप बदलणारा प्राणी) = टू ] एक होती ऊ, तिला झाली टू.

टूरटूर [ तुः तुः (त्वर् गतौ) = टूरटूर ] अतिघाई, तातड, टूरटूर नको म्हणजे घाई नको.

टेंटू १ [ टिंटुकः = टेंटू (वनस्पति) ] (२) [ टुंटुकः = टेंटू (वनस्पति) ]

टेर [ टट्टरी = टेर. टट्टरी मृषवादः ] टेर उडवणें म्ह० थट्टा करणें.

टेवण [ टेवण (अपभ्रष्ट ठेवण) = ठेव (रूप, नखरा) ] (स. मं.)

टोक, टोंक [ तोक्म = टोक्क = टोक टोक,] मनुष्यान् रसान् रागान् गंधान् अन्नं चर्म गवां वशां श्लेष्मोदके तीक्मकिण्वे पिप्पलीमरीचे धान्यं मांसं आयुधं सुकृताशां च ॥ १२ ॥ आपस्तंबीयधर्मसूत्रं १-७-२०-१२ हरदत्तः उज्ज्वलायां: -

तोक्मानि ईषदंकुरितानि व्रीह्यादीनि.

तोक्मन् = मोड, त्यावरून टोंक.

तोक्म = टोक्क = टोक, टोक (भा. इ. १८३२)

टोकडा [ तोक (पोर) = टोक, टोकडा (लघुत्वदर्शक) ] टोकडा म्ह० पोरगा. (भा. इ. १८३५)

टोकडें [ स्तोक + ट ] *(तोकडें पहा)*

टोंग १ [ तौंग्यं (तुंगिमा) = टोंग ] एका बाजूचा फुगारा. (२) [ तौंग्यं (तुंगत्व) टोंग ] उंचवटा. पागोट्याचें टोंग म्हणजे अस्थानीं उंचवटा. (३) [ तुंगः = टोंग] उंचवटा. (४) [ तौंग्यं = टोंग ] उंचटपणा. (५) [ तौंग्यम् = टौंग ] Prohiberance

टोंच [ त्रोटि = टोंटि = टोंच ] पक्ष्याचें

तोंड. (भा. इ. १८३७)

टोचणें [ तोदन = टोचणें. द = च ] (भा. इ. १८३४)

टोणगा [ १ तर्णकः = टोणगा. अ = ओ] तर्णक = टणक. (२) [ स्तुनकः (बोकड) = टोणगा ] (३) [ तर्णकः (young one) = टोणगा. अ = ओ ] a young of buffalo.

टोणपा [ स्थूलात्मा = टोलप्पा = टोणपा ] स्थूल मनाचा, मूढ.

टोणा [ स्थूणा = ठोणा = टोणा ]

टोप [ स्तूप उच्छ्राये । स्तूप म्हणजे उंच बांधलेली इमारत. स्तूप एव स्तोपः । स्तोप = टोप ] टोप म्हणजे बौद्धांचे उंच देऊळ. स्तुपः उछ्रितं शिखाभूत अंगं (माध्यंदिनीय वाजसनेयसंहिता, महीधरकृत वेददीप २५-२) मस्तकावर ठेवण्याचे वस्त्रविशेष. टोप शब्दाचें स्त्रीलिंग टोपी. (भा. इ. १८३३)

टोपरा [ तूपरः = टोपरा ] बिनशिंग्या बैल.

टोपी [ *टोप पहा* ]

टोलवणें [ तर्जनं = टलअणं = टोलवणं ] (भा. इ. १८३४)

टोलवाटोलव १ [ तुल् १ संभ्रमे ] *(धातुकोश - टोलव १ पहा)* (२) [ तुलिमन् = टोलव. द्विरुक्तीनें टोलवाटोलव ] टोलवाटोलव म्हणजे आंगाबाहेर टाकणें.

टोला [ तूलः = टोला ] टोला काठीनें लांब फेंकणें.

# ठ

ठग [ स्थग (लुच्चा, भामट्या) = ठग ] (भा. इ. १८३३)

ठणठण, ठणाठणा [ स्त्यानं स्त्यानं = ठाणँ ठाणँ = ठाणठाण = ठणठण = ठणाठणा ] स्त्यानं नाम शब्दायमानं. (भा. इ. १८३४)

ठण् ठण् ठण् [ स्तनूस्तनूस्तनू = ठण्ठण्ठण्]

ठंठणाट [ तंस्तनायते ] (धातुकोश = ठंठण १ पहा)

ठणाणा [ स्तननं = ठणण (णा - णी - णें)] (भा. इ. १८३३)

ठसा [ स्थासकः = ठासा = ठसा ] स्थासकः देहविलेपनं

ठळठळित १ [ स्थल् १ स्थाने ] *(धातुकोश - ठळ पहा)* (२) [ तलतलित = ठळठळित ]

ठळठळीत [ स्थल् १ स्थाने ] *(धातुकोश - ठळ पहा)*

ठाउक [ स्तावुक = ठाउक ] Known

ठाओ [ स्थामन् = ठाव = ठाओ ] स्थामन् म्हणजे शक्ति, प्राबल्य, अहंकार. उ. - जेणें निवातकवचाचा ठाओ फेडिला (ज्ञानेश्वरी)

ठाणदिवी [ स्थानदीपिका = ठाणदिवी = ठाणवी = ठाणवई ]

ठाणबंद [ स्थाणुबद्धः = ठाणबंद ] fixed to a permanent post.

ठाणवी [ स्थाणुबद्ध ] *(ठाणदिवी पहा)*

ठाणसुध [ स्थानशुद्ध = ठाणसुध. शालाशुद्ध = साळसुध ]

ठाणाईत [ स्थानायत, स्थानायत्त = ठाणाईत, ठाणाइत ]

ठाणांतरी [ स्थानान्तरिक one who changes place everyday, a traverller (नित्य प्रवाशी) ]

नित्य प्रवाशला दिवसा लंगडत चालावें लागतें व रात्रीं बोचकें संभाळीत जागावें लागतें तसें -

उ. - दिहा खोलणें रात्रीं जागोवा ।
ठाणांतरिया जैसा पांडवा ।।
अहोरात्रि विसांवां । भेटे चि ना।।

ज्ञाने. १६-३३८ पाहारेकरी इ. अर्थ बाष्कळ.

ठाणें [ स्थानीयं = ठाणें ] स्थानीय म्हणजे नगर, शहर.

ठाम १ [ स्तामं = ठाम. स्तम् अवैक्लव्ये ] ठाम सांगतों म्हणजे अवैक्लव्यानें सांगतों. (२) [ स्थाम्ना = ठाम ]

ए १ ठाय [ स्था १ स्थायति, स्थाति (ठाए।] स्था हा धातू पूर्ववैदिककालीं स्थाति, स्थायति असा साधा चाले. ती चाल मराठींत राहिली आहे ।

पाय (ए) हृदय गवसूनि ठाय (ए) य चा उच्चार ए ।

श्रीगुरूचे पाए । हृदय गवसूनि ठाए ।
तैं एवडें भाग्य होए । उन्मेषासि ।। ५ ।।

ज्ञा. १३-५.

ठार १ [ स्तृह् = ठरह् = ठार. स्तृह् इजा करणें ] (भा. इ. १८३४) (२) [ स्तृह् ६ हिंसायाम् ] *(धातुकोश ठार पहा)*

ठाव १ [ स्त्यै १ शब्दे. स्ठ्याय स्त्याय = ठाव, ठोठाव. ष्ट्यायः = स्त्यायः = ठावा, ठो ] ठोठो करणें = शब्द करणें. (धा. सा. श.) (२) [ स्थामन् = ठाव ] मला ठाव द्यावा पायीं ।

ठावा [ ष्ट्यायः स्त्यायः = ठावा ] *(ठावा पहा)*

ठावें [ स्ताव्यं = ठावें ] known. मला ठावें नाहीं.

ठासून [ स्थास्नु = ठासून ] त्यानें ठासून भाषण केलें. तेन स्थास्नु भाषणं कृतम्. येथें ठासून हें विशेषण आहे. (भा. इ. १८३३)

ठाळ [ स्थाल = ठाळ ] जेवायचें पात्र. (भा. इ. १८३४)

ठिकडें [ स्त्री = ठी ] प्रेमदर्शक कडें प्रत्यय लागून ठिकडें. स्त्रीला प्रेमानें ठिकडें म्हणतात. माझी ठिकुडी, माझें ठिकडें, असा प्रयोग स्वस्त्री संबंधानें नवरा करतो.

ठिकाण १ [ त्रिकस्थान = ठिकाण = ठिकाणा ] (२) [ स्थितिकर्णः = ठिकाण, ठिकाणा ]

ठिक्कर [ तिग्मतर = ठिक्कर ] काळा ठिक्कर.

ठिपका [ स्तिप् गळणें ] *(थिबकणें पहा)*

ठी १ [ स्थिति = ठिइ = ठी ] (भा. इ. १८३२) (२) [ स्थितिः = ठिइ = ठी]

ठीक [ स्थाने (युक्ते) = ठीक ] (भा. इ. १८३४)

ठुलमांडी [ स्थूलमंडिका = ठुलमांडी ] ठुलमांडी म्हणजे पायाची जुडी करून चौक्या वर स्थिर बसणें.

ठेच [ हेठ् प्रतिघाते. जेहेठ्य = ठेच ] (धा. सा. श.)

ठेण्या [ स्तेनकः = ठेण्या thief ]

ठेण्या पळाला. thief has run away applied to a bug running away.

ठेप [ टिप् पाठवणें धाडणें. टेप = ठेप ]

जन्मठेप = जन्मभर पाठवणें. (भा. इ. १८३४)

ठेला [ अति + स्था ] *(धातुकोश -*

*ठे १ पहा)*

ठेली [ स्था १ गतिनिवृत्तौ ] *(धातुकोश - ठे २ पहा)*

ठेव १ [ स्थेमन् = ठेवं = ठेंव ] कायम ठेवलेला पदार्थ. (भा. इ. १८३३) (२) [ स्थेय = ठेव ] (ज्ञा. अ. ९ पृ. १७९)

ठेवणाईत [ स्थापनायत्त = ठवणायत = ठेवणाईत ]

ठेवणें [ स्तेपनं = ठेवणें. स्तेप = फेंकणें ] त्यानें एक ऐसा चेंडू ठेवून दिलान् म्हणजे फेंकलान् (भा. इ. १८३५)

ठेवाठेवी [ स्थेयास्थेयता. स्थेयः म्हणजे दोन पक्षकारांत निवाडा करणारा न्यायाधीश. कायद्यांतील पारिभाषिक शब्द आहे. स्थेय + अस्थेयः, तस्य भावः स्थेयास्थेयता ] (ज्ञा. अ. ९ पृ. २६)

ठोकणें (धूम) [ त्वंगति (उड्या मारीत पळणें) = ठोकतो ] धूम ठोकतो म्हणजे धूम पळतो. (भा. इ. १८३६)

ठोकणें (लांकूड) [ त्वक्षति (कापणें) = ठोखणें = ठोकणें ] सुतार लांकूड ठोकीत बसला आहे = सूत्रधारः लकुटं त्वक्षति. (भा. इ. १८३६)

ठोठाव [ स्त्याय स्त्याय = ठोठाव ] *(ठाव पहा)*

ठो [ तु हिंसायां = ठो देणें. तुः = ठो ] to strike the head against a stone.

ठोठो [ ष्ट्यायः स्त्यायः = ठावा = ठो. ष्ट्यै स्त्यै शब्दे ] ठो ठो करणें म्हणजे शब्द करणें.

ठोणा [ स्थूणः = ठोणा (खांब) ]

ठोंब १ [ स्तुंभ = ठुंब = ठोंब, ठोंब्या ] (भा. इ. १८३३) (२) [ स्तंबः (मूर्ख) = ठोंब, ठोंब्या ]

ठोंब्या [ स्तुंभ = ठुंब = ठोंब, ठोंब्या ] ठोंब म्हणजे बुद्धीनें थांबलेला, स्तब्ध, मूर्ख. (भा.इ. १८३५)

ठोला [ स्थूल ] *(ठोल्या पहा)*

ठोल्या [ स्थूल = ड्डोल = ठोल (ला - ली - लें ) स्थूलिक = ड्डोल्लिअ = ठोल्य (ल्या, ल्यी, ल्यें) ] (भा. इ. १८३३)

## ड

डंका [ दंडढक्का = डंका ] वाद्यविशेष.

डगलें १ [ दुकूलं = डुगूलँ = डगलें ] (भा. इ. १८३३) (२) [ दुकूल = दुगुल्ल डुगुल्ल = डगलं = डगलें - ला - ली ] वस्त्रविशेष. (ग्रंथमाला)

डग्गा [ (स्त्री) ढक्का = डग्गा (पुल्लिंग) ] वाद्यविशेष. (भा. इ. १८३४)

डचणें १ [ दश् = डस् = डच् (डचणें) ] (भा. इ. १८३२) (२) [ दय्यते = डचतें ]

डबा १ [ दृब्धः = डबा, डबी ] डबी म्हणजे लांकडाची, धातूची किंवा दगडाची पेटी सारखी वस्तू, इमारत, हौद वगैरे. दृब्धं गुंफितं. (२) [ द्रव्यकं = डब्बअ = डब्बा = डबा, डबोले ] बापानें डबा पुरून ठेवला आहे, येथें डबा म्हणजे द्रव्य. ( भा. इ. १८३४)

डबी [दृब्धः] *(डबा १ पहा)*

डबू [ (वैदिक) दभ्र (अल्प) = डब (अल्पदर्शक) डबू ] (भा.इ. १८३४)

डबोले [ द्रव्यकं ] *(डबा २ पहा)*

डबोलें १ [ द्रव्यमूलं = डबोलें ] (२) [ द्रव्यबलं = डब्बबलं = डबोलें ]

डब्ब १ [ स्तब्ध ] (दब्ब पहा)

(२) [ दृब्धं = डब्ब ] पोट डब्ब झालें आहे म्हणजे डब्यासारखें फुगीर झालें आहे.

डर [ दर (भय) = डर ] (भा. इ. १८३६, १८३७)

डरणें १ [ द्रु - द्रव = डरणें ] पळणें. (भा. इ. १८३४) (२) [ दर = डरणें] भिणें. (भा. इ. १८३४)

डवली [ दर्वी ] *(डावली पहा)*

डाक [ दग्ध ] *(डाग पहा)*

डाकिणी, डाकीण [ मूळ संस्कृत दक्षायणी; त्याचे प्राकृत दख्खायणी; त्याचें डखाअणी; त्याचें डाकिणी, त्याचें डाकीण ] (स. मं.)

डाग १ [दग्ध = डग्घ = डाग, डाक ] डाग + ल (स्वार्थक) = डागलेला, डाकलेला. (२) [ द्राख् to adorn द्रखः ornament = डाग ] ornament.

डांबरट १ [ डंब् = उपहास करणें. डंब =डँब. डँबर = डँबर. डांबर म्हणजे उपहासास्पदीभूत इसम, त्याचें लघुत्वदर्शक रूप डांबरट (बहिरट, हगरट, मुत्रटप्रमाणें) डांबरट. ] (भा. इ. १८३३) (२) [ डामर (अतिशयार्थक ट ) = डामरट, डांबरट] डामर म्हणजे दंगेखोर. (३) [ डंबरिष्ठः = डांबरट, डामरट ]

डांबीस [ दांभिकीयस् = डांबीस ]

डाभ [ दर्भ = डब्भ = डाभ ] गवताचे तुकडे.

डामरट १ [ दस्म (लुच्चा) = डाम्ह = डाम. दस्मतर = डामअर = डामर. (क्षुद्रभावदर्शक) डामरट ] डामरट म्ह० अति लुच्चा. (२) [ डामर ] *(डांबरट २ पहा)* (३) [ डंबरिष्ठः] *(डांबरट ३ पहा)*

डाराडूर [ द्रा to sleep = डार + ध्रु to be fixed ) = डूर = डाराडूर, डाराढूर ] गाढ निजणें.

डाल, डाली [ डल्लकं = डाल (वंशपात्रं) ] (भा. इ. १८३४)

डाव १ [ दात्रं = डाव. दो to cut. दातृ असा शब्द, त्याचें डाउ = डाव ] डाव] डाव म्ह० हत्यार. (२) [ दाय share = डाव ] मिळकतींत माझा चौथा डाव म्हणजे हिस्सा. (३) [ दावः (दुनोतीति दावः) = डाव ] डाव धरणें म्हणजे दुःख देण्याची इच्छा धरणें. (४) [ द्रम्म = दाम = डावँ = डाव ] पैसे लाऊन खेलणें = डाव खेलणें. पैसे टाकून खेलणें = डाव टाकणें. (भा. इ. १८३२) (५) [ दात्रम्, दात्रः, दात्री = डव a weapen to cut डावली nails to cut, as of a cat ] मांजर डावली मारतें.

डावखोरा हात [ खोर् to be lame. खो रः a lame man, hand etc. डावखोरा one lame in the left hand असा मूळ अर्थ. नंतर one using the left hand as a fault.

डावली १ [ दात्रम्, दात्रः, दात्री ] *(डाव ५ पहा)* (२) [ दर्वी = डवली, डावली] दर्वी म्हणजे लाकडी पळी. मांजराच्या पंज्याला हि साम्यानें डावली म्हणतात. रेफाचा विपर्यय. (३) [ ड्डालिः (ड्डल् १० मिश्रीकरणे) = डावली ]

डाह [ दाहः = दाहा, दहा, धा. दाह = डाह] (भा. इ. १८३४)

डाहद [ दात्यूह = डाहद ] जलकाक. (भा. इ. १८३७)

डाहळा [ लाङ्गलः = डागळा = डाअळा =

डाहळा ] नालिकेरस्तु लाङ्गली (अमर.) लांगलवत् शाखा अस्य लांगली (क्षीरस्वामी). डाहळी म्हणजे लहान फांदी. (भा. इ. १८३४)

डाळ, डाळें [ दाल = डाळ, डाळें ] (भा. इ. १८३२)

डिंक [ दिग्ध ] *(डीक पहा)*

डिघी [ दीर्घिका = डिघिआ = डिघी ] विहीर

डिचका [ डित्थकः = डिचका ]
श्यामरूपो युवा विद्वान्सुंदरः
प्रियदर्शनः ।
सर्वशास्त्रार्थवेत्ता च डित्थ
इत्यभिधीयते॥
मराठींत डिचका म्हणजे शहाणा.
(भा. इ. १८३४)

डिच्या [ डित्थ = डिच्च = डिच्या (लघुत्वदर्शक, अल्पीभावदर्शक) ] डिच्या हें लहान मुलाचें आवडतें नाव. (भा. इ. १८३३)

डियो ! [ दृिष्ट्या ! = डियो ! ] डियो हा हर्षदर्शक उद्गार आहे.

डिवडिव करणें [ दिव् to lament देवति = डिवडिव करणें ] to be vexed.

डीक [ दिह् - दिग्ध unguent = डीक, डिंक ]

डुक [ द्रुह् (ध्रुक् = द्वेष) = डुक ] त्याच्या पोटांत माझ्याविषयीं डुक आहे म्हणजे द्वेष आहे.

डुकर [ डुःकर = डुकर ] डुः डुः शब्द करणारा प्राणी. (भा. इ. १८३२)

डुक्का [ दौष्कः (दोश्चरति दौष्कः) = डुक्का] दौष्क म्हणजे रात्रिंचर, लक्षणेनें चोरून काम करणारा, लुच्चा.

डुचक [ दुष्कृत = डुसुकिअ = डुचकिअ = डुचक (का - की - कें) ] (भा. इ. १८३४)

डुडळ [ डुंडुलः = डुडुळ, डुडळ ] घुबड. (भा. इ. १८३४)

डुरकणें [ द्रेकृ शब्दे । द्रेक् = डिरक्. धातू द्रोकृ असा असावा. द्रोक् = डुरक् ] डुरकणें म्हणजे बैलाचा शब्द. (भा. इ. १८३४)

डुरवणें [ अय् १ गतौ. दुर् + अय् = दुरयति = डुरवतो ] (धा. सा. श.)

डूक [ दूष् = डूख = डूक. दुःख = डुक्ख = डुक ] डुक म्हणजे दुःख.

डोकें १ [ बोडकें (बुड् = हजामत करणें) = हजामत ज्याची करतात तो अवयव = डोकें ] (स. मं.) (२) [ डुक् (झोंपतांना जो अवयव विशेषतः डुकलतो तो). याचे एक रूप = डोसकें. डोसकें याचें रूपांतर = डोचकें] (स. मं.) (३) [ स्तोमकं ] *(डोंबल पहा)*

डोचके १ [ स्तोमकं ] *(डोंबल पहा)* (२) [ डुक् ] *(डोकें २ पहा)*

डोचणें [ द्रुह - द्रुह्यति = डुज्जे = डोचे ] द्वेष करणें. (भा.इ. १८३३)

डोंबल १ [ स्तोमकं (head) = डोकें, डोचकें, डोंबल (occiput) ] (२) [ पाण्यांत बुडतांना प्रथम भाग बुडवितात तो = डुंब् = डुबणें ] (स. मं.) (३) [ दौर्बल्य = डोब्बल = डोंबल ] उ - डोंबल तुझें = दौर्बल्य तुझें. मराठींत लहान माणसावर रागावून हे शब्द मोठीं माणसें योजतात. (भा. इ. १८३२)

डोमकावळा [ द्रोणकाकः = डोणकावळा = डोमकावळा ] डोमकावळा म्हणजे कृष्णकाक.

डोरली [ दुष्प्रधर्षिणी = डोरिणी =

डोरली]

डोल [ दोला = डोल ] डोलानें म्हणजे दोलायंत्रासारख्या भांड्यानें विहिरींतून पाणी काढतात.

डोला १ [ F दोला = डोला M. in Marathi ] दोला procession in हस्तिनापूर was very ancient adopted by the Mahomedans. (२) [ दृष्टि = दुट्टि = दोडा = डोला, डोळा. द्योतः = डोला, डोळा ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४३)

डोली [ दोली = डोली ]

डोसकें [ डुक् ] *(डोकें २ पहा)*

डोह [ द्रह, द्रुह a deep lake डोह ] - हद पासूनच निर्वचिलें पाहिजे असें नाहीं.

डोहणा १ [ द्रोहणः = डोहणा. द्रुह् to hate] hatred. (२) [ द्रोहणा = डोहणा ] डोहणा म्हणजे खुनस. (३) [ द्रोहना = डोहणा ] hatred.

डोहो [ द्रुह = डोह, डोहो. बहुवचन ] द्रुह म्हणजे तडाग. (ज्ञा. अ. ९ पृ. ७)

डोळ [ दुर्लु = डोळ ] वाईट रीतीनें फोडलेले, न फोडलेले द्विदल दाणे. सुलुः चांगले फोडलेले दाणे = सोले.

डोळा १ [ लोचनक = लोअणअ = डोअलअ = डोळा. ल = ड; न = ण; ल = ळ] डोळा या शब्दाची ही व्युत्पत्ति खरी. (२) [ डोल हलणें (ज्ञानेश्वरी) जो अवयव पाहाण्यासाठीं हलतो तो = डोला = डोळा ] (स. मं.) (३) [ दृष्टि, द्योतः ] *(डोला २ पहा)*

डौर [ डमरु = डवँरु = डौरु = डौर ] एक वाद्य आहे. डौराचीं गाणीं म्हणजे डमरूच्या नादावर म्हणण्याचीं गाणीं.

## ढ

ढ१ [ ढः (कुतरा) = ढ ] मराठींत ढ म्हणजे मंदबुद्धि (२) [ ढः निर्गुणः इति एकाक्षर कोशः] (भा. इ. १८३४)

ढकणें [ दक्ष् १ वृद्धौ ] *(धकणें पहा)*

ढकलणें १ [ अधःकलनं = ढकलणें ] (भा. इ. १८३६) (२) [ अधिकृ = (अ लोप) ढिकरणें = ढिकलणें = ढकलणें] त्याला त्यांनीं न्यायाधिशापुढे ढकलला = तैः सः न्यायाध्यक्षस्य पुरतः अधिकृतः (भा. इ. १८३४)

ढक्का [ धक्कः ] *(धक्का पहा)*

ढंढण [ ध्वन् १ शब्दे - दंध्वन्य = ढंढण (धा. सा. श.)

ढण् ढण् ढण् [ ध्वन् ध्वन् ध्वन् ]

ढप्सें [ द्रप्स (ताक) = ढपसें ] (भा. इ. १८३३)

ढब्बू १ [ अधिभूः (स्वामी, नायक) = (अलोप) ढिबू = ढबू ] पुढारी माणूस. (२) [ अधिभू = (अ लोप) ढिबू = ढबू = ढब्बू ] ढब्बू म्हणजे मोठा माणूस, त्यावरून लठ्ठ, आयदी. (भा. इ. १८३४) (३) [ अधिभू master, superior = ढब्बू ] अधिकारी वरिष्ठ म्हणविणारा. (४) [ लठ्ठ पैसा तो ढब्बू (पैसा) ] (भा. इ. १८३४)

ढमण्णा [ अधमर्णः = (अ लोप) ढमण्णा म्ह. दरिद्री, गरीब, देणेदार. (भा. इ. १८३४)

ढवळ [ द्वृ अंगीकारे. द्वर = ढवळ. द्वराद्वर = ढवळ ] (धा. सा. श.)

ढवळाढवळ [ द्वृ to appropriate अंगीकारे. द्वरः = ढवळ. द्वराद्वर = ढवळाढवळ ] appropriation and

nonappropriation meddling.
ढवळार [ धवलगृहं (राजवाडा) = ढवळार]
ढस [ धासस् ] *(धस पहा)*
ढांचेंढुचें [ ध्वस्तंध्वस्तं = ढाचेंढुचें ] ढाचेंढुचें म्हणजे मोडकें, अव्यातव्या.
ढापण १ [ धापनं = ढापण ] (२) [ अर्प् १० अध्यर्पण = ढप्पण = ढापण = मडक्यावर ठेवावयाचें झांकण ] (धा. सा. श.)
ढाराढूर १ [ द्रायंध्रायं = ढाराढूर. द्रै स्वप्ने व ध्रै तृप्तौ ] ढाराढूर म्हणजे निद्रेंत तृप्त असणें अशा प्रकारें (क्रियाविशेषण). (२) [ द्रै + ध्रु किंवा द्रा + ध्रु. द्रै - द्रा (निजणें) ध्रु (स्थैर्य, निश्चळ असणें) = ढाराढूर ] to be fast sleeping
ढाल [ दारु ] *(दाल पहा)*
ढालगज [ (द्राघीयस् + जंघी ) = दीर्घजंघी = ढालजँग = ढालगज = ढालजग ] जिच्या जंघा लांब आहेत अशी स्त्री - अशा बाईसारखी वागणारी मुलगी. द्राघ = ढाल. (भा. इ. १८३४)
ढास [ ऊर्ध्वश्वास = ढास. उड्ढआस = ढ्ढास = ढास ] (भा. इ. १८३४)
ढासण १ [ अध्यासन seat = ढासण ] (२) [ ध्वंसनं ] *(निर्धास्त पहा)*
ढाळक [ ध्वल. ध्वालक = ढाळक ] (धा. सा. श.)
ढाळणें [ द्राह् = द्राह्र = ढाल = ढाळ. द्राह् थकणें ] ढाळणें म्ह. थकणें. (भा. इ. १८३४)
ढीग [ दिह् २ उपचये, to increase दिह् = ढीग ] [ दिह् to increase = डिघ् = ढीग ] रास.
ढुंगण १ [ ढु + अंगण (अवयव) (ढु = ढोपर शब्दांतील ढुर्) ] (स. मं.) (२) [ अधोंऽग = ढोंग = ढुंग = ढुंगण (+ण) ] (भा. इ. १८३६) (३) [ अधोंगम् = ढुंगण ] ढुंगण म्ह० गुह्यांग, गांड. ढुंगण धुणें हें वाक्य गांड धुणें याबद्दल संभावित बोलतात. (४) [ दृंहण (दृढीकरण) = ढुंगण ] शरीराला दृढ करणारें अंग.
ढुस्स [ धूश् १० कांतिकरणे to burn shiningly - चकाकणें = ढुस्स ] काळा ढु स्स shinig black. *(धुश्श् पहा)* (काळें) ढूस १ [ धूसर = ढूसअ = ढूस] (भा. इ. १८३४) (२) [ दूषिः (कृत्या) = ढूस ] काळी ढूस म्हणजे कृत्येसारखी काळी (अथर्व वेद)
ढेकर [ द्रेक् १ शब्दे ] *(धातुकोश - ढेकर पहा)*
ढेंकुण [ दंशकृमि = डंखकुण = डंखुण = ढेंकुण ] (भा. इ. १८३२)
ढेप [ डिप् गोळा करणें. डेप = ढेप ] गुळाचा गोळा. (भा. इ. १८३४)
ढेपसा [ द्रप्सः lower thin part of curds = ढेपसा ]
ढेरणें [ ध्रेक् शब्दे । ध्रेक् = ढेर् = ढेरणें किंवा ढोरणें ] गुरूं ढोरतें म्हणजे झोंपतांना विशिष्ट शब्द करतें. मूळ धातू ध्रोक् असा हि असावा. (भा. इ. १८३४)
ढोंपर ['कूर्पर' शब्दाप्रमाणे 'ढुर्पर' शब्द असावा व तो पायाच्या त्या भागाला लागत असावा. सध्यां संस्कृतांत हा शब्द लुप्त आहे. (स. मं.)
ढोर [ धुर्यः (beast of burden) = ढोर ]
ढोरणें [ धेक् शब्दे ] *(ढेरणें पहा)*
ढोल [ ढोलः वाद्यविशेष. ढक्का ढोलप्रिया

(रुद्रयामल) ] (भा. इ. १८३४)

ढोसणें १ [ अध्यसनं = ढोसणें ] ढोसणें म्ह. अति भरणें. पानीयं अध्यस्यति = पाणी ढोसतो. (२) [ अध्यशनं = ढोसणें ] ढोसणें म्ह० अति खाणें. (भा. इ. १८३६) (३) [ अध्यशन = ( अ लोप) ढोसणें] अध्यशन म्हणजे भरल्या पोटीं खाणें. दारू ढोसणें म्हणजे वाजवीपेक्षां जास्त दारू पिणें.

## [ण]

णक्षा [ णक्ष् गतौ - नक्षः ] *(नक्षा २ पहा)*

णंदा [ ननांदृ = नणांद = नणंद = नंदा = णंदा. (स.मं.)

णिचरा [ निःस्रावः ] हा शब्द मराठींत णादि आहे. *(निचरा ३ पहा)*

णारें [ ज्वलनार्हं लकुटं = जळणारें लांकूड. मरणारा अपराधी = मरणार्हः अपराधी. शिक्षणार्हः पुत्रकः = शिकणारा पोर इ. इ. इ. ]

णूक [ ० निका = ० णीक = ० णूक ]
वर्तनिका = वर्तणूक
सर्जनिका = सोडवणूक
वगनिका = वागणूक
छलनिका = छळणूक
क्रमणिका = करमणूक. इ. इ. इ.

## [त]

त [ तद् = तअ = त. तद् माङ् = त मग] हें अव्यय मराठींत तर ह्या अर्थी योजतात. येतो त ऊठ = यामिः; तद् उत्तिष्ठ.

तकलादू, तकलुफी - पी [ तकिल (खोटें) = तकल. तकिल + आदः = तकिलादू = तकलादू ]

तकलादू [ तकिल = fraudulent तकलादु] superficial, fraudulent.

तकलुपी, तकलुफी [ *तकलादू पहा* ]

तग १ [ तक् (सोसणें) पासुन तकः = तग] तग लागणार नाहीं म्हणजे सोशीकपणा टिकणार नाहीं. (२) [ तक् १ सहने. तक = तग ] सोशीकपणानें उरून रहाणें. (धा. सा. श.)

तंग [ तंच् to contract = तंग ] आंगरखा तंग झाला म्हणजे got contracted.

तंगडी [ टंगा ] *(टांग २ पहा)*

तगादणें [ तकाजा (आरबी) नामधातू = तगादणें ] तगादा करणें.

तज [ त्वचं = तज ] दालचिनी.

तटबंद [ तटबंध = तटबंद (नाम) तटबद्धः = तटबंद (विशेषण) ]

तंटा [ तंडा = तंटा ]

तट्ट [ तट् १ उच्छ्राये, फुगणें. तटित अथवा तट्ट (प्रांतिक) = तट्ट ] जेवून तट्ट झाला म्हणजे फुगला. तटतटून फुगला, तट्ट फुगला अशी द्विरुक्ति मराठींत आहे.

तट्टू [ तस्थृ (standing erect) = तट्टू, टट्टू ] stud, a young horse very erect and untamed.

तडक १ [ त्वरकम् swiftly, straight = तडक] swiftly, straight. (२) [ तथका (अकच्) = तढका = तडक ] बरें म्हणून, तसाच, थेट.

तंडणें [ तंड मारणें ] (भा. इ. १८३३)

तडतडणें [ तड् भाषार्थे ] (ग्रंथमाला)

तडतड, तडातडा [ तड् भाषायां ] तडातडा शिव्या देणें, तडातडा म्हणजे कर्कश बोलणें.

तडस [ त्रसः = तडस ] दुःख.

तडा [ तर्द्मन् scratch ] चिरा, भिंती यांना तडा पडला.

तडाका १ [ तडाकः = तडाका ] (२) [ तटाघातः; तडाघातः = तडाखा, तडाका ] तडाघात म्हणजे हत्तीच्या सोंडेचें मारणें. त्यावरून सामान्यतः जोरानें मारणें ह्या अर्थी मराठींत तडाका शब्द योजतात. (भा. इ. १८३७)

तडातडा [ तड् भाषायाम् ] *(तडतड पहा)*

तणाणा [ तानगुणः = तणाणा ] ताण देणारा वेलाचा तुकडा. tendril.

तणार [ तृणागार ] (धवलार पहा)

तंतोतंत [ अत्यन्तात्यन्तं = (अ लोप) तंतोतंत ] भांडें तंतोतंत भरलें म्हणजे अत्यन्त भरलें म्हणजे अंतापर्यंत भरलें.

तनसडी [ तृणसटा a braid of grass = तनसड ]

तपकीर [ तपकक्षिरिः = तपअखीर = तपखीर = तपकीर ] तंबाखूचें अति प्राचीन नांव तफक असें होतें. अमेरिकन इंडियन्स तंबाखूला तपक स्वभाषेंत म्हणत.

तपली [ तपनी ] *(तपेली पहा)*

तपेली [ तपनी = तपली, तपेली, तवली, टवळी ]

त मग [ तद् माङ् ] *(त पहा)*

तमण्णा [ उत्तमर्णः = तमण्णा (उ लोप) तमण्णा म्हणजे धनिक, धनवान्.

प्रश्न - तूं कोण तमण्णा लागून गेला आहेस?

उत्तर - मी तमण्णा नाहीं; ढमण्णा आहें. (भा. इ. १८३४)

तमुक [ तत् + अमुष्य + तमुक ] that one. अमुकच्या धर्तीवर.

तरणें [ तृ = तरणें. तरय् - तारय् = तरविणें ] तरणें व तारणें हीं दोन अगदीं भिन्न क्रियापदें आहेत. (भा. इ. १८३६)

तरतर [ त्वरं त्वरं = तरतर चालणें to walk quaveringly ]

तरतरित [ तृ to be young = तरतरित denominative from a lost root meaning to be young - to be seen तरुण young. my own guess; no other authority.

तरम [ तर्मन् (वर्ष) = तरम ] तरम म्हणजे वर्षाचें देणें शेतकऱ्यांचें.

तर मग [ तर्हि मक् = तरी मग, तर मग] (भा. इ. १८३३)

तरवणी [ तरत् पानीयं = तरावणीअँ = तरावणी = तरवणी ] ताकाचें तरवणीं. (भा. इ. १८३४)

तरवळा [ तृपला (लता) = तरवळा (उणादि १०९) ] तरवळा म्हणजे दाढी भाजण्याकरितां जमविलेला पालापाचोळा, वेली वगैरे. (भा. इ. १८३३)

हा शब्द कोंकणप्रांतीं रूढ आहे. धान्याचे रोप तयार करण्यासाठीं शेताच्या कांहीं जमिनीवर गोवऱ्या, पालापाचोळा, गवत वगैरे पदार्थ पसरून व ते पेटवून ती जागा भाजून काढतात; या प्रकाराला दाढ भाजणें म्हणतात. दाढ (स्त्री) याचें अनेकवचन दाढी. (संयोजक)

तरांडें १ [ (पुं) तरांधुः = तरांडे (न.) ]

a boat. (२) [ तरन्ती = तरांडी, तरांडें ] (भा. इ. १८३३)
तरि [ तऱ्हि ] (ज्ञा. अ. ९ पृ. १)
तर्कारी [ तर्कारी (टांकळा) = तर्कारी (भाजी) ]
तर्र [ तरल = तर्र tremulous with intoxication ] *(धातुकोश - तरार २ पहा)*
तऱ्हा [ त्र्यहः = तऱ्हा ] त्याची तऱ्हा झाली म्हणजे तो तीन दिवस कंठत बसला. (भा. इ. १८३५)
तऱ्हीं [ तऱ्हि अपि ] (ज्ञा. अ. ९ पृ. ९) कोशांत हा शब्द तर्हिं असा लिहिलेला सांपडतो. (संयोजक)
तऱ्हेवायिक [ त्र्यैहिकः । ईहा चेष्टा तस्यां भवं ऐहिकं । त्र्यहपर्याप्तं ऐहिकं धनं अस्य अस्ति इति त्र्यैहिकः ॥ (मनुचतुर्थाध्याय ७, कुल्लूक) त्र्यैहिक = तऱ्हैहिक = तऱ्हेवाइक ] तऱ्हेवाईक म्हणजे तीन दिवसांपुरतें धान्य ठेवणारा, निरिच्छ, बेफिकीर. (भा. इ. १८३४)
तऱ्हें [ तऱ्हि + अपि ] (ज्ञा. अ. ९ पृ. १)
तलवट [ तलपथ = तलवट ] level, lowest level.
तवकीर [ त्वक्क्षीरी क्षीरिका शुभा॥ केयदेव-पथ्यापथ्य-विबोध). त्वक्क्षीरी = तवखार = तवकीर ] (भा. इ. १८३४)
तवखीर [ त्वक्क्षीरिः = तवखीर ] एका झाडाच्या त्वचेपासून काढलेलें पीठ.
तवंग [ तरंगः = तवंग ] पाण्याचा तवंग म्हणजे वर तरंगणारा मळाचा भाग.
तवर [ तमरं = तवर (कानडींत कथील)]
तवली [ तपनी ] *(तपेली पहा)*
तवँ [ त्मन् (वैदिक even etc. = तवँ] (भा. इ. १८३५)
तवंसें [ त्रपुसं = तउसँ = तवंसें, तौसें ] एक प्रकारची कांकडी. (भा. इ. १८३७)
तवा १ [ तपकः = तवआ = तवा ] (२) [ तपः, तापकः = तवा (लोखंडाचा) ] (भा. इ. १८३६)
तवाका [ तु वृद्धौ ]
तवाना (ताजा) [ तवीयान् (powerful) = तवाना (ना-नी-नें); तवानः (तु to be able, powerful) = तवाना ] powerful ताजातवाना - फारसी तवाना संस्कृत तु पासून निघालेल्या तवान चें च अपभ्रष्ट रूप आहे.
तसनस [ तस् (क्षीण होणें) + नस् (अपव्यय करणें - वैदिक) = तसनस ] तसनस म्ह० नासधूस. (भा. इ. १८३७)
तसर १ [ त्रसर (कोळ्याचें सूत) = तसर] (भा. इ. १८३७) (२) [ त्रसर (रेशीम) = तसर ] (३) [ तिसृक् = तसर ] a kind of silk worm.
तळपट - हा मराठींत अपशब्द आहे. तालपट्टः = टालपट्ट = तलपट = तळपट ] डोक्याच्या किंवा माथ्याच्या कातडीच्या खालील सपाट हाड. तुझें तळपट होवो, म्हणजे तूं मरून, तुझ्या डोक्याच्या करवंटीवरील कातडें कुजून जावो. (स. मं.)
तळवट [ तलपट्ट = तळवट ] औदुंबर तळवटीं.
तळवा [ तलपाद = तळपाअ = तळवाअ = तळवा ] (स. मं.)
तळहात [ तलहस्त = तळहात ] (स. मं.)
तळी [ (वैदिक) तळित् इति अंतिक नाम (निघंटु) तळित् = तळिअ = तळी ]

तळी म्हणजे जवळ. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायांत, भीष्मा तळी, असे शब्द येतात; तेथें तळी या शब्दाचा अर्थ जवळ असा आहे. (भा. इ. १८३४)

तां [ कृत्वा = करतां. एतत् कृत्वा हानिः भवति = हें करतां हानि होते. कृते = करतां. तस्य कृते = त्या करतां.

ताकतय [ (स्त्री) तक्रत्वच् = ताकतय (स्त्री) ] ताकाची साल म्हणजे तापवलेलें अति पातळ ताक.

ताकतोय [ तक्रतोयः = ताकतोय, ताकतय] (भा. इ. १८३४)

तागडी [ तर्कुयष्टि = तागडी ]

ताजी [ ताजिकः = ताजी (अरब घोडा) अरबांना पूर्वी ताजिक ही संज्ञा असे व ते जे घोडे विकावयास आणीत त्यांना ताजिक संस्कृतांत म्हणत.

ताटी १ [ त्वष्टिका = ताटी ] बांबूची ताटी (२) [ तंत्रिका (अलंकृत मखर) = तांटी, ताटी.

तांटी [ तंत्रिका ] *(ताटी २ पहा)*

ए १ ताठ तास्था (यङ्लुक्) । तास्थाति = ताठे ।

ताठ १ [ स्था = तास्था ] (२) [ तस्थु stationary, immovable = ताठ ] (३) [ दृढ = तड्ढ = ताठ. दृढतर = तड्ढअर ताठार = ताठर ] (भा. इ. १८३२)

ताठर [ दृढतर ] *(ताठ ३ पहा)*

ताठा [ तास्था ] *(धातुकोश ताठ १ पहा)*

ताड [ ताल span between end of thumb and end of middle fingure = ताड ] सीता चौदा ताल किंवा ताड उंच होती म्हणजे चौदा विती उंच होती. (वैजयंती कोश)

ताडकन्, ताडदिनि [ *चटकर पहा* ]

तांडा [ तंडकः (संघात, मेळा) = तांडा (समास) ] शब्दसमासाला तंडक म्हणतात. त्यावरून सादृश्यानें बैलांच्या व माणसांच्या एका प्रकारच्या समुदायाला तांडा म्हणतात.

ताडी [ ताली = ताडी ]

ताण [ तान (thread) = ताण ] (भा. इ. १८३५) ताणा - (प्र) तानक = ताणा) वेलीचा शेवटला भाग

तांतड [ तंति = तांत + ड = तांतड ] गाथासप्तशतींत ३-७३ त तंति शब्द आला आहे. (भा. इ. १८३२)

तातल ( ला-ली-लें) [ तप्त + ल = तातल (heated) ] तातणें असें क्रियापद माडगांवकर धरतो तें चूक. तापणें या धातूची निष्ठा जुनी तातल.

ताता, ताती, [ तात ] *(तात्या २ पहा)*

तातू [ ततगु ] *(तात्या १ पहा)*

तात्या १ [ ततगु = तातऊ = तातू. ततिकः = तातिआ = तात्या. ततगु म्हणजे धाकटा किंवा वडील चुलता. (भा. इ. १८३३) (२) [ तात = तात्या, ताता (आर्य, श्रेष्ठ, प्रिय), ताती] (स. मं.)

तांदुळजा १ [ तंडुलीयः = तांदुळीजा = तांदुळजा ] एक भाजी. (भा. इ. १८३७) (२) [ तंडुलीयः = तांदुळजा] (भा. इ. १८३४)

तांदूळजा [तंदुलीयः = तंदुलिजा = तांदूळजा]

तानगाभी [ स्तन्यगर्भिणी = तानगाभी ] दूध देत असतां गाभण होणारी गाय, बायको इ.

तानमान [ यथा तानं विना रागो यथा मानं विना नृपः (भामिनीविलास - जगन्नाथ)] तानमान पाहून बोलावें.

तानवट [ तानपट्ट = तानवटा, तानवट ] कोष्ट्याचा माग.

तानवड [ तालपत्रं = ताणवड = तानवड ] अलंकारविशेष.

तान्हें १ [ स्तनंधयं = थानहअँ = थान्हें = तान्हें ] (२) स्तन्य = थन्न = तन्ह = तान्हँ = तान्हें बाळ ] (ग्रंथमाला)

ताफा [ तल्प = तप्प = ताप = ताफ = ताफा ] (भा. इ. १८३३)

तांबूस [ ताम्रश = तांबूस ] किंचित् तांबडें.

ताम्हण [ ताम्रभांड = तामहाण = ताम्हाण = ताम्हण ] ताम्हाण असें रूप जुन्या ग्रंथांत व अद्यापि अशिष्ट लोकांत सांपडतें. (भा. इ. १८३६)

तायघाट [ तायु (वैदिक) = ताय. तायुः (चोरः, स्तेनः) ] चोरांचा घाट म्हणजे तायघाट.

तायित १ [ ताय् to protect तायित = तायित ] तायित is a talisman which protects from evil. (२) [ ताय् to stretch ] तायित म्हणजे ताणलेला दोरा.

तारणें [ त्रै = तारणें ] देवः त्रायति = देव तारतो. (भा. इ. १८३६)

तारा [ तारा = तारा ] (स. मं)

ताली [ तल्लिका = ताली ] किल्ली.

ताव [ तापः = ताव. तप् ऐश्वर्ये ] किती जरी ताव आणलास म्हणजे ऐश्वर्य आणलेंस.

तावून सुलाकून, तावून सुलाखून [ तप्त्वा शूलाकृत्य ] तावून सुलाखून म्हणजे तापवून व सुळावर भाजून. *(आवा ३ पहा)*

तासडपट्टी १ [ त्रस् + पट् ] *(धातुकोश - तासड २ पहा)* (२) [ तृस (बोलणें) व पट (बोलणें). तृस + पट = तस + पट = तासट + पट्टी = तासडपट्टी ] (ग्रंथमाला)

तिउड [ त्रिवृत = तिउड, तेड ] (भा. इ. १८३४)

तिखें [ तीक्ष्ण = तिखें (लोखंडाची जात) ] (भा. इ. १८३४)

तिटकारा [ तिरस्कारः = तिटकारा. र = ट] (भा. इ. १८३३, ३७)

तिडवा [ तिर्यञ्च् = तिडवा - वी - वें ] going across.

तिढा [ तिरस् = तिळ्ह् = तिळा. र = ढ] तिळा म्हणजे तिरका. (भा. इ. १८३६)

तिढें [ तिरस् = तिढ (ढा - ढी - ढें) जसें पुरस् पासून पुढें तसें तिरस् पासून तिढें. तिढें बोलूं नको म्हणजे वांकडें बोलूं नको. (भा. इ. १८३६)

तिनसांज [ त्रिसंध्या = तिनसांज ]

तिन्ही [ त्रीणि = तिनि = तिन्ही (जोरदार व कठोर) ] 'तिनि' हें रूप जुन्नर येथील नंबर १४ च्या शिलालेखांत आलें आहे. तीन व हि यांचा संधि होऊन तिन्ही शब्द साधला अशी सर्वत्र समजूत आहे; पण चुकीची दिसते. (ग्रंथमाला)

तिंबणें, तिमणें [ तिम् आर्द्रीभावे ] (ग्रंथमाला)

तिरक [ त्रिक = तिरक ] एक तिरक तीन, या वाक्यांत तिरक शब्द येतो. (ग्रंथमाला)

तिरकून [ तिर्यवक्कृत = तिरकून ] तो तिरकून वागतो म्हणजे वाकून वागतो. (भा. इ. १८३६)

तिरकें [ तिर्यक् = तिरक् = तिरकें - का - की ] (ग्रंथमाला)

तिरपें (वाईट) [ तृप्र = तिरप ( पा - पी

- पें) ] तृप्र म्हणजे दुःख. (भा. इ. १८३४)

तिरमिर १ [ तैमिर्यं. तिमिर (अंधेरी) = तिरमिर. र inserted sympathetically ] डोळ्यापुढें तिरमिर आली म्हणजे अंधेरी आली. (२) [ तिमिर = तिरमिर ] ति पुढील र केवळ दुसऱ्या रच्या अनुषंगानें उच्चारलेला आहे. नेत्रयोः पुरतः तिमिरं यातं = डोळ्यापुढें तिरमिर आली. (भा. इ. १८३४) (३) [ तैमिर्य = तिरमिर (darkening). पहिला र आगंतुक. ] (भा. इ. १८३५)

तिरसट [ त्रस् १० धारणे. त्रसिष्ट = तिरसट ] (धा. सा. श.)

तिरळ (ळा - ळी - ळें) [ टेर + ल (स्वार्थे) = तेरळ = तिरळ (ळा - ळी - ळें) ] टेर म्हणजे चकणा. (भा. इ. १८३५)

तिरीप [ तृप = तिरीप ] (भा. इ. १८३४)

तिर्री [ त्रयी = तिरी = तिर्री ]

तिऱ्हाइत [ त्रयस्थ = तिराइत = तिऱ्हाइत] त्रयायत्त = तिऱ्हाइत ]

तिवई [ त्रिपदी = तिवई ]

तिवट [ तिरीटं (शिरोवेष्टनं) = तिवीट = तिवट ] तिवट म्हणजे पागोटें.

तिवटी [ त्रिवर्तुलि = तिवट्ठुली = तिवाटी = तिवटी - टें ] (ग्रंथमाला)

तिवठा [ अतिपथिन् a good road = तिवठा (अलोप) ]

तिवड १ [ त्रिवर्त = तिउड = तिवड ] (ग्रंथमाला) (२) [ त्रिवृत् = तिवड] (३) [ त्रिपदा = तिवड ] *(दुवड पहा)*

तिवंधा [ अतिपथः = (अ लोप) तिवंधा ] अतिपथ म्हणजे सत्पथ, चांगला राजमार्ग.

तिवँधा [ त्रिपंथा = तिवँधा ] तीन रस्ते मिळण्याची जागा. (भा. इ. १८३५)

तिवस १ [ तिमसः, तिनसः = तिवस ] वृक्षविशेष. (२) [ तिमिश = तिविस = तिवस ] तिनिश असा शब्द अमरकोशांत दिला आहे. परंतु मराठी तिवस हा अपभ्रंश तिनिश शब्दाचा होत नाहीं. न चा व प्रायः होत नाहीं; म चा व हमेश होतो. तेव्हां, मूळ संस्कृत शब्द तिमिश असावा.

तिवाशी [ त्रिवंशिका = तिवाशी, तिवासें ] तिवाशी म्हणजे तीन पायांची लहान घडवंची.

तिसा [ त्रिवर्षीयः = तिसा ] तिसा जत्रा, उत्सव.

तिसावा [ त्रिंशत्तमः = तिसावा ] *(दहावा पहा)*

तिळतिळ मुंगळा [ तिल् गतौ, द्विरुक्त = तिळतिळ मुंगळा ] like an ant which moves quick.

तिळतिळीत [ तिल् ६ स्नेहने (द्वि.) ] *(धातुकोश - तिळतिळ पहा)*

तिळप [ तिलपातः ] *(तेलप पहा)*

तिळवा [ तिलकः = तिळवा ]

तिळेल [ तिलतैलं = तिळैल = तिळेल ] स्नेहे तैलच् (५-२-२८ वार्तिक) रोहिशतैलं = रोशेल. दीपोच्छिष्ट तैल = दीपोष्टेल. मोगरेल, उंडेल, खोबरेल, एरंडेल, इ. इ. इ.

ती १ [ स्त्री = ती wife ] ती आली का? ह्या मराठी प्रश्नांत नवरा मराठींत बायकोला ती म्हणून संबोधितो. (२) [ स्त्री = थी (Hoernle प्राकृतलक्षण) P. 48 text = ती] आमची ती कोठें गेली, तिला विचारा, इत्यादि वाक्यांत ती म्हणजे स्त्री या शब्दाचा अपभ्रंश आहे, सर्वनाम नाहीं.

तीट [ त्विट् = तीट. त्विट् शोभा (अमर)]

ती ती [ त्वं त्वं वस्तु = ती ती वस्तु ] ती ती म्हणजे निरनिराळी. त्व या शब्दाचा अर्थ निरनिराळा, भिन्न असा आहे.

तीरकमान [ तीरकमनं = तीरकमान ] तीरकामटा. तीर म्हणजे बाण व कमन म्हणजे बांबू.

तीस [ त्रिंशत् = तीस ] (विंशति पहा)

तीळ [ तिल = तीळ ] (स. मं.)

तुख्खारा [ तुषाराः तुखाराः Venereal disease very common amongst the तुख्खार i.e. तुर्कS or Turks. ]

तुझ्या बापाच्यान् मी झवं - हा प्रयोग गांवढे हमेश करतात व हे अपशब्द आहेत अशी सामान्य समजूत आहे. परंतु पुष्कळ सामान्य समजुतींप्रमाणे हीहि समजूत चुकलेली आहे. वरील प्रयोगाची फोड येणेंप्रमाणें :-

देवस्य आज्ञां अहं यावत् त्वा ग्राहयिष्यामि = देवाच्यान मी झवं तुला घालीन = देवाची आण मी तुला घालीन यावत् = जावं = जवं = झवं.

तुला तुझ्या बापाची आज्ञा ऊर्फ आण ऊर्फ शफथ मी घालीन, असा ह्या प्रयोगाचा अर्थ आहे. ह्या प्रयोगांत बाष्कळपणा बिलकुल नाहीं. संस्कृत यावत्चा जो मराठी अपभ्रंश होतो त्याचा उच्चार दुसऱ्या एका मराठी क्रियापदासारखा होतो, त्यामुळे स्वरूपसाम्याच्या अपराधास्तव हा प्रयोग अपशब्दांत चुकीनें गणला गेला आहे. आग्रहानें व जोरानें बोलतांना महाराष्ट्रांतील ब्राह्मणादि सर्व लोक हा प्रयोग हरघडीस करतात. हा प्रयोग मूळचा अपशब्द असता तर स्त्रिया, मुलें व शिष्ट यांच्या समोर हा योजला गेला नसता. (भा. इ. १८३३)

तुटकें [ त्रुटत्कं = तुटकें ]

तुडवणें [ तुर्वणं = तुडवणें. तुर्व् हिंसार्थे ] तुडवणें म्हणजे नष्ट करणें, नाश करणें. (भा. इ. १८३६)

तुणतुणें [ तुण् कौटिल्ये ] (ग्रंथमाला)

तुणीची शिवण [ तुन्नसेवनी ] *(तूण पहा)*

तुथें [ तुत्थ (मोरचूत) = तुथें ]

तुथ्थ [ तुष्ट = तुट्ठ = तुथ्थ ] मंद (भा. इ. १८३२)

तुप [ तुप् हिंसायां ] मारलेल्या पशूची चर्बी हा तुप ह्या शब्दाचा मूलार्थ. नंतर, हिंसा बंद झाल्यावर दुधांतून घुसळून काढिलेल्या चर्बीला तुप म्हणूं लागले. दुधांतल्या चर्बीला घृत शब्द पूर्वी होता. (ग्रंथमाला)

तुफान [ तुफ् १ हिंसायां. तुफाना = तुफान] तुफान बायको म्हणजे उन्मत्त स्त्री. तुफा = तोफ. तोफ आली = भांडखोर बाई आली. (धा. सा. श.)

तुंबळ [ तुमुल = तुंबुळ ]

तुम्हां [ युष्माकं = तुम्हँ = तुम्हहँ = तुम्हाँ] (ज्ञा. अ. ९ पृ.३)

तुरट [ तुवरिष्ट = तुअरिट्ट = तुरिट = तुरट. तुवर स्तु कषायः (अमर) ] (भा. इ. १८३४)

तुरटी [ तुवरिष्टा = तुरटी ]

तुराटी [ तूर यष्टि = तुराटी ] (भा. इ. १८३४)

तुरी [ आढक्यां तुवरी वर्णा (हेमचंद्र - निघंटुशेष = संवत् १२०८) ] (ग्रंथमाला)

तुरुत् [ तूर्त ] *(तूर्त पहा)*

तुलटी [ तुलायष्टि ] *(भा.इ. १८३४)*

तुळई [ तुला (खांबावरचें आडवें लांकूड)

= तुळी = तुळई ]
तुळतुळित [ तूल (कापूस) नामधातू = तुळतुळित ] as soft and glossy as cotton. तुळतुळित केस.
तू कां दुखतोस ? [ कंड्वादि गणांत दुःख (दुःख्यति) दुःख अनुभवित धातु आहे] तू कां दुखतोस? तू कां दुःख अनुभवतोस? (भा. इ. १८३२)
तूण [ तुन्नसेवनी = तुणीची शिवण (गर्दे - वाग्भट) तुन्न = तूण ] (भा. इ. १८३४)
तून [ अन्तितः ] *(तें पहा)*
तूप [ त्मूत (वैदिक) = तूप ] त्मूत म्हणजे चर्बीनें माखलेलें. (भा. इ. १८३४)
तूर्त [ तूर्तं (जल्द) = तूर्त. (ताबडतोब, सध्यां), तुरुत (त्वरेनें) ]
तूसधान्य [ तुच्छधान्य = तूसधान्य स्यात्पुलाकस्तुच्छधान्ये (अमरकोश) तुष = तूस ]
ते १ [ ती म्हणजे स्त्री व ते म्हणजे नवरा. स्त्री = ती. पस्तृ = पस्त्या = स्त्या = तो sing - ते plural in honour. ] (२) (चतुर्थीचा प्रत्यय) [ कुमारस्य अन्ते = कुमारा ते बृहदारण्यक, षष्ठोध्यायः, द्वितीयं ब्राह्मण, ५ वाक्य]
तें [ (Vaidik) गृहस्य अन्तितः = घरा तें (Vaidik) गृहस्य अन्तिः = घरा तून ] प्रति पेक्षां अन्ति पासून तें निर्वचिणें युक्ततर.
तेगा १ [ तेगः (तिग् वधे) = तेगा ] एक हत्यार. (२) [ अतिघः (bludgeon, weapon) = तेगा ] a weapon.
तेज [ तेजस् = तेज ] (स. मं.)
तेड १ [ त्रिकूत ] *(तिउड पहा)* (२) [ त्रिवृत् = तिंअड् = तेड (वनस्पति) ] (भा. इ. १८३७)
तेंडू १ [ त्रिभंडी = तिहंडी = तेंडी, तेंडू (श्वेतनिशोत्तर) ] (भा. इ. १८३७) (२) [ त्रिपुटा = तिउडा = तेढा = तेंडू (श्वेतनिशोत्तर) ] (भा. इ. १८३७)
तेढ [ त्रिजटा = तिअडा = तेढ. त्रिजटाका = तेढी ] तेढी वेणी a वेणी having three braids.
तेढी [ त्रिजटाका ] *(तेढ पहा)*
तेणें [ तृ + अनेन ] *(एणें पहा)*
तेथचें [ तत्रत्यं ] *(कोठचें पहा)*
तेरवा [ तृतीयवासर ] *(आज पहा)*
तेरा [ त्र्यपरदशन् ] *(अकरा २ पहा)*
तेलप [ तिलपातः = तिळप, तेलप ] तिळाच्या तळणाला तिळप किंवा तेलप म्हणतात.
तेलवण १ [ तिल to eat friendly with] (२) [ तेलपानीयं = तेलवण ] to eat and drink friendly with.
तेवणें [ तेजनं = तेवणें ] दिवा जळणें. (भा. इ. १८३६)
तेवि, तेविं [तद्वत् ] (ज्ञा. अ. ९ पृ. ९,३५)
तैं [ तदि ] (ज्ञा. अ. ९ पृ. २७)
तोकडें [ स्तोक + ट = थोकडें, तोकडें, टोकडें ]
तोटी [ त्रोटिः (चोंच) = तोटी. त्रोटिः चंचूः (वैजयंती कोश पृ. ३०) ] पक्ष्याच्या चोंचीसारखा नळ. झारीची तोटी = झर्झरिकात्रोटिः
तोंड [ तुंड = तोंड ] (स.मं.)
तोंडखीळ [ तुंडकीलिका = तोंडखीळ ]
तोडणें १ [ तुड् फोडणें, फाडणें ] फोडणें. (भा. इ. १८३३) (२) [ तुड्ड अवमाने. तुड्डन = तोडणें ] त्याला तोडूं नको = त्याचा अपमान करूं नको. (भा. इ. १८३३)

तोंडली १ [ तुण्डिकेरी = तोंडएली = तोंडेली = तोंडली ] (२) [ तुण्डिकावल्ली = तोंडली ] (भा. इ. १८३७)

तोडा [ तोडर = तोडअ = तोडा ] पायांत घालावयाचा अलंकार विशेष. (भा. इ. १८३७)

तोंडाळ [ तुंडिलः = तोंडाळ (मुखर) ]

तोफ [ तुफा = तोफ. तुफ् हिंसायां ] तोफ आली म्हणजे क्रूर भांडखोर बाई आली. *(तुफान पहा)*

तोबरा [ (खादाड) तुबरः = तोबरा ]

तौसें [ त्रपुसं ] *(तवसें पहा)*

त्येणें [ त्य + अनेन ] *(एणें पहा)*

त्यो [ सः = तो; स्यः = त्यो ] त्यत् या सर्वनामाची एकवचनी प्रथमा स्यः म्हणून देतात; परंतु त्यः असें हि रूप असावें. त्यः = त्यो. हा त्यो हा शब्द अशिष्ट लोक सध्यां योजतात. (भा. इ. १८३४)

त्रयस्थ [ तीरस्थ = तरस्थ = त्रयस्थ ]

त्रा - कित्येक जुन्या लेखांत गुर्जरत्रा असा शब्द येतो. ह्याचा अर्थ कित्येकांनीं गुर्जर लोकांनी जिंकलेला किंवा वसाहत केलेला प्रांत असा केला आहे. त्याला सबळ आधार ते म्हणण्यासारखा काहींच देत नाहींत. माझ्या मतें गुर्जरत्रा या शब्दाचा अर्थ गुर्जर लोकांतून किंवा गुर्जर लोकांत. गुर्जरत्रा हें नाम नाहीं, अव्यय आहे, किंवा क्रियाविशेषण आहे. अर्थात् गुर्जरत्रा या अव्ययापासून गुजराथ, गुजरात, हें नाम निघणें अशक्य आहे. शिवाय या व्युत्पत्तीला दुसरी एक अडचण आहे. त्रा चें प्राकृत त्ता, ता होईल; त, थ होणार नाहीं. गुर्जरत्रासारखा च कुरुपंचालत्रा असा वेदभाषेंत एक प्रयोग आढळतो; त्याचा अर्थ कुरू व पंचालांतून किंवा कुरू व पंचालांत असा होतो. तो च प्रकार गुर्जरत्रा या अव्ययाचा आहे. (भा. इ. १८३५)

त्रेधा [ त्रेधा = त्रेधा ] त्याची त्रेधा उडाली म्हणजे त्याला हें करूं कां तें करूं कां असें करूं, असे तीन प्रकार झाले. (भा. इ. १८३७)

## थ

थंड [ स्तब्ध = थड्ड = थंड. थचें दैर्घ्य आकारानें होण्याच्या ऐवजीं अनुस्वारानें झालें. थंडगार म्हणजे स्तब्ध गुरु. ] (भा. इ. १८३३)

थना [ स्तनः = थना ] गाईच्या आचुळाला थना म्हणतात.

थबकन् [ स्तब्ध = थब्ब = थब. स्तब्धकारं = थबकन् ] (भा. इ. १८३४)

थबूकन् [ स्तब्ध् ] *(धातुकोश - थबक १ पहा)*

थयथय [ तय् १ गतौ. द्विरुक्तीनें तयतय = थयथय ] थयथय नाचणें.

थरूं [ त्सरु, त्सुरु = थरूँ ] सुरीची मूठ. (भा. इ. १८३७)

थवा १ [ स्तबक = थवअ = थवा ] (भा. इ. १८३३) (२) [ स्तवकः = थवा] स्तबक असा बकारयुक्त शब्द मूळ नसून स्तवक असा वकारयुक्त शब्द महाराष्ट्रींतून मराठींत आला.

थळ [ स्थळ a place, थळ a field ]

**थांग** [ स्थानांक (स्थान + अंक) = थांग] the marking of the exact spot.

**थाट** [ स्थातिः = थाट ] थाट म्ह. व्यवस्था.

**थाटूनमाटून** [ तट् १ उच्छ्राये + मड् १ मंडने ] *(धातुकोश - थाटमाट पहा)*

**थाडकन्, थाडदिनि** [ *चटकर पहा* ]

**थातुर् मातुर्** [ तंत्रं मंत्रश्च = थातुर् मातुर]

**थान** [ स्तन = थान ] (स.मं.)

**थाप १** [ स्त्यै संघाते. स्त्याययति, स्त्यापयति = थाप ] श्रोत्यांची थाप म्हणजे गर्दी. (२) [ (praise) स्ताव = थाप (lie, canard.) व = प.]

**थापटणें** [ हस्तस्फटनं = हत्थ्यापटणँ = अत्थ्यापटणँ = थापटणें (अ लोप) (भा. इ. १८३५)

**थापट्या** [ स्थापत्यः = थापट्या ] थापट्या म्ह० गांडू.

**थारा १** [ त्रै १ पालने. त्राय : = थारा. पादत्रा = पायजारा = पैजारा ] (धा. सा. श.) (२) [ (स्तृ to protect) स्तारः = थारा ] (३) [ स्तृ ५ आच्छादने. स्तारः = थारा. विस्तार = बिस्तारा ] (धा. सा. श.)

**थालीपिट्या १** [ स्थलपथिकः = थालपिठ्या. प = पि ] थालपिठ्या माणूस म्हणजे सामान्य गांवोगांव स्थलमार्गानें जाणारा क्षुद्र माणूस. तुलना कांतारपथिक, जलपथिक इत्यादींशीं आहे. (२) [ स्थालीपीठं अर्हति इति स्थालीपीठीयः । स्थालीपीठीयः = थालीपीट्या ] थालीपिठें पागोटें म्हणजे थालीच्या पृष्ठासारखें पागोटें. ]

**थाळें** [ स्थालं भाजनभेदे स्यात् (अनेकार्थसंग्रह संवत् १२०८) स्थाल = थाळ = थाळँ = थाळें ] (ग्रंथमाला)

**थिजणें** [ (स्त्यै) स्त्यायति = थिजते स्त्यै संघाते जलस्य. ] (भा. इ. १८३६)

**थिनलें** [ (स्त्यै) स्त्यानं = थिनलें (स्वार्थक ल) ] (भा. इ. १८३६)

**थिबकणें** [ स्तिप् (गळणें) = थिब, थिबकणें, ठिपका ] (भा. इ. १८३३)

**थिल्लर** [ शिथिलतर = थिलअर = थिलर = थिल्लर ] (भा. इ. १८३२)

**थीत** [ स्थिति = थीत ]

**थुः** [ स्थिवः ] *(धातुकोश - थु पहा)*

**थुई** [ स्थूति ] *(धातुकोश - थु पहा)*

**थुक, थुंक** [ ष्ठिव् १ निरसने. तुष्ट्यूष = ठुख = थुक, थुंक ] (धा. सा. श.)

**थुकर, थुंकर, थुकरा, थुंकरा** [ *धातुकोश - थु पहा* ]

**थुका, थुंका, थुकी, थुंकी** [ स्थ्युका ] [*धातुकोश - थु पहा* ]

**थुत्** [ *धातुकोश - थु पहा* ]

**थुलथुलीत** [ स्थूल् (द्वित्व) ] *(धातुकोश - थुलथुल १ पहा)*

**थुय्यो** [ स्थ्यूतु Imp. 3rd. per. sing. ] *(धातुकोश - थु पहा)*

**थेट** [ स्थेष्ठ = थेठ्ठ = थेट ] थेट म्हणजे अति स्थिर, कायमचा. थेट रस्ता म्हणजे कायमचा सरळ रस्ता. (भा. इ. १८३३)

**थेंब** [ स्तेम = थेवँ = थेवँ ] स्तेम म्हणजे ओल. (भा. इ. १८३३)

**थेर** [ स्थाविरम् = थाइर = थेर - स्थविरस्य भावः स्थाविरम् ] थेरडेपणाचा भाव किंवा कर्म म्हणजे थेर = म्हातारचळ.

**थेरडा १** [ स्थविर = थइर = थेर = थेरड = थेरडा = डी - डें

(ऱ्हस्वत्वदर्शक) ] (ग्रथमाला) (२) [ स्थविर = थेर (जुन्नर शिलालेख नं. २२) = थेरड (ममतादर्शक) = थेरडँ - डा - डी ] (ग्रंथमाला)

थैथै [ थैथै (वाद्यध्वनि) = थैथै ]

थोकडें [ स्तोक + ट ] *(तोकडें पहा)*

थोटा १ [ स्थूणमुष्टिक = थोट्टिअ = थोटा] (२) [ स्थपुटः (unevenly raised) = थोट = थोटा ] ज्याचा हात लांबींत विषम म्हणजे आंखूड आहे तो.

थोडक्यात् सांवरला [ स्तोकात् संवारितः = थोडक्यात् सांवरला. स्तोकात् मुक्तः = थोडक्यात् मोकलला. स्तोकिष्ट = थोकिट = थोकड = थोडक (का - की - कें). येथें थोडक्यात् पंचमी आहे. ] (भा. इ. १८३३)

थोडें [ स्तोक = थोक = थोकडे (ऱ्हस्वत्वदर्शक) = थोडकें (वर्णविपर्ययानें) = थोडें. ] (ग्रंथमाला)

थोपटणें [ अत्यास्फोटनं = थोपटणें (अ लोप) ] (भा. इ. १८३५)

थोपणें १ [ स्तुंभ् (थांबणें) = थोप + णें = थोपणें ] (भा. इ. १८३७) (२) [ स्तुभ = थोब = थोप + णें = थोपणें. स्तुभ् थांबणें ] (भा. इ. १८३७)

थोंब [ स्तंब cluster = थोंब, ठोंब ] cluster, crowd, multitude.

थोबाड [ स्तम + अस्ति = थोब + हड्डि = थोब + हाड = थोबाड ] (स. मं)

थोबाडणें [ स्तुब्धापनं = थोबाड अणं = थोबाडणें. स्तुभ् रोधने ] थोबाडणें म्हणजे अवरोध, अटक करणें. (भा. इ. १८३६)

थोर १ [ स्थूल = स्थूर = थ्थोर = थोर] (ग्रंथमाला) (२) [ स्थूल = स्थूर = थोर आक्रमणं स्थूराभ्यां (वाजसनेयसंहिता २५-२) ] स्थविरपासुन थेर, थेरडा हे शब्द निघाले आहेत. स्थूल, स्थूरपासून थोर (मोठा, अवजड, अगडबंब, दांडगा) हा शब्द निघाला आहे. थोर दगड, थोर, इमारत, थोर वासा इ. इ. इ. (भा. इ. १८३३)

थोराड १ [ स्थूराढ्य ] (उंटाड पहा) (२) [ स्थविराढ्यः = थोराड ]

## द

दगड (निपात) १ [ धगित् = दगिड = दगड] तो काय दगड काम करतो? (भा. इ. १८३४) (२) [ दग्धः = दगड, दगड्या ] दग्ध म्हणजे निंद्य. तूं दगड आहेस म्हणजे निंद्य आहेस.

दगदग [ दघ् ८ घातने. दघदघ = दगदग ] दगदग म्ह० घात, नुकसान, आयास. (धा. सा. श.)

दंड [ दंड (प्रणाम) = दंड ] फारसींत ज्यांना जोर म्हणतात त्यांना च मराठींत दंड म्हणतात. दंड काढले म्हणजे जोर काढले. दंडप्रणाम म्हणजे काठीसारखं जमिनीवर पडून नमस्कार करणें.

दडपणें [ दर्भयति (दृभी भये) = दरभ = दडब = दडप + णें = दडपणें (अकर्मक, भिणें या अर्थी) ] माझी छाती दडपली म्हणजे भ्याली. (भा. इ. १८३७)

दडप्या १ [ दर्पयति = दडपणें. दर्पकः = दडप्या ] (२) [ दृढपतिः = दडपइ = दडप्या ] तिचा दडप्या म्ह० धणधाकट नवरा.

दंडवत [ दंडवत् पतनं असा संस्कृत प्रयोग. पैकीं प्रथमार्धक जो दंडवत् शब्द तोच मराठींत रूढ झाला आहे ] दंडवत् म्हणजे मूळार्थ दंडाप्रमाणें, लाकडाप्रमाणें. दुसरा अर्थ शूद्रादिकांचा प्रणिपात.

दंडुक्या १ [ ढंढुकः (wicked वैजयंती) = दंडुक्या ] (२) [ (सं) दुंडुंक (लुच्या, अप्रमाणिक) = दंडुक; दुंडुकिक = दंडुक्या ] मूळचा अर्थ लुच्चा; दुसरा अर्थ शिरजोर. (भा. इ. १८३३) $\frac{१}{२}$

दणका [ दंडढक्का = दणका ] दणक्याचें (दंडढक्कीय) लग्न.

दणकाव [ धृष् १० प्रहसने. धृष्णज्काम्य = दणकाव ] (धा. सा. श.)

दणक्या [ धृष्णक् = दणक्या ] धृष्णक् म्हणजे अविनीत, उद्धट, इ. इ.

दंताळें [ दात्रालि = दाताळें = दंताळें ] शेतकऱ्याच्या औतांपैकीं एक.

दंताळ्या [ दंतिलः = दंताळ्या ]

ददात [ दद् १ दाने. ददतिः = ददात ] दध् १ दाने. दधतिः = दधात ] हे दोन्ही उच्चार आहेत व दोन्ही निरनिराळ्या धातूंपासून निघाले आहेत. (धा. सा. श.)

दधात १ [ दध् १ दाने ] *(ददात पहा)* (२) [ दद्यात् = दधात ] (ग्रंथमाला)

दध्या [ (दध्ना भक्षयति) दाधिकः = दध्या] *(दह्या पहा)*

दबदबा [ दरीदर्पः = दबदबा. दृप् to pride ] magesty, awefulness.

दब्ब [ स्तब्ध = थब्ब = डब्ब = दब्ब ] wellstuffed

दमट [ द्रविष्ट ] *(धातुकोश - दमट २ पहा)*

दमडी [ द्रम्म ] *(द्रम्म पहा)*

दमदमित [ दंदम्यित = दमदमित. दम् ४ उपशमे ] दमदमित जेवण झालें = भूक शमेलसें जेवण झालें.

दमा [ ध्मा ] *(धातुकोश - दम ३ पहा)*

दयाळ (प्रिय) [ दयित + ल (स्वार्थक) = दइअल = दयाळ (ळा - ळी - ळें) ] लावण्यांत व कवितेंत दयाळा (संबोधन, पुल्लिंग) दयाळे (संबोधन, स्त्रीलिंग) हे शब्द येतात व त्यांचा अर्थ प्रिया, प्रिये असा आहे. दयाळु (मायाळु) या शब्दाशीं या शब्दाशीं या दयाळ शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

दरद १ [ दरत्स्त्रियां प्रपाते च भयपर्वतयोरपि (मेदिनी) दरत् (पर्वत) = दरड ] (भा. इ. १८३३) (२) [ दलाढ्या = दलड = दरड = दलद ] नदीच्या तीरावरील चिखली जमीन.

दरदरून १ [ दृ to split ] दरदरून घाम आला. (२) [ दर्दर्त्वा (दृ vedik) to kill, hurt) = दरदरून ] दर्दरून घाम सुटला म्हणजे वाजवीपेक्षां फाजील इजा करणारा घाम सुटला. (३) [ दृ ९ विदारणे - दर्दरीति ] *(धातुकोश - दरदर १ पहा)*

दर्शन [ दर्शनं नयनस्वप्नबुद्धिधर्मोपलब्धिषु इति मेदिनी ] रामदासांना रामाचें दर्शन झालें, या वाक्यांत दर्शन याचा अर्थ स्वप्न असा करणें उचित आहे.

दलद [ दलाढ्या ] *(दरद २ पहा)*

दंव [ द्रव = दव = दँव ] (भा. इ. १८३२)

दवडत [ द्रवत् (पळत, झटकर) = दवडत] स आ वह देवान् द्रवत् (१-९-४४-७)

दवली [ दार्विकावल्ली = दवली ] पायरी.

दस्त १ [ दस् - दस्त (दस् नाश करणें) ] त्यानें त्याला दस्त केलें म्हणजे त्याचा नाश केला. फारसी दस्त शब्दाहून हा संस्कृत दस्त शब्द निराळा. (भा. इ. १८३४) (२) [ फारसी ] (स. मं.)

दहा पांच वर्षें - दहा पांच वर्षे हे शब्द कालासंबंधानें योजतात. ही योजना मराठीनें संस्कृतांतून घेतली आहे, व ती पंचतंत्राच्या कालाइतकी जुनी आहे :-

शिथिलौ च सुबद्धौ च पततः पततो न वा ।
निरीक्षितौ मया भद्रे दशवर्षाणि पंच च ॥
१४६ ॥ पंचतंत्र - द्वितीय तंत्र कथा ६ (भा. इ. १८३५)

दहावा [ *शंभरावा पहा* ]

दह्या [ दध्ना भक्षयति) दाधिकः = दध्या. दध्या, दुध्या, साखऱ्या, आंबट्या, इत्यादि शब्द चरति (४-४-८) या पाणिनीय सूत्राप्रमाणें झाले आहेत.

दळिद्र [ दारिद्र ]

दळ्या [ दरिद्रः = दलिद्दो, दळिओ = दळिया = दळ्या ] दळ्या म्हणजे भिकार.

दा [ अदात् = देणें. अयछत् = एचणें, वेचणें ] (भा. इ. १८३४)

दाई [ धात्री = धाई = दाई ] (स. मं.)

दागिना [ आध्यग्रेय property given to bride at wedding = दागिना ] ornament.

दाघ [ द्राघ् सामर्थ्ये. द्राघः = दाघ ] सामर्थ्य.

उ. - जेणें प्रकाशा कांति चढे । ब्रह्मानंदाचा दाघु मोडे ॥
जें ब्रह्माचेनि जीवन सौरभ्यें जोडे। वेधवतिये ॥ ज्ञा. अ. ११-२२०

दाठर [ दृढतर = दढअर = दढार = दाठर] (भा. इ. १८३२)

दांड [ दंडक = दांड, दांडगा ] दंड म्हणजे धृष्ट, गर्विष्ट.

दाडकन् [ द्राड् विशरणे ]

दांडगा [ दंडक ] *(दांड पहा)*

दाडदाड १ [ द्राड् विशरणे ] (२) [ द्राड् १ अवयवे, विशरणे. द्राडंद्राडं ] *(धाडधाड पहा)*

दांडपट्टा [ दंडपट्टिश ] (भा. इ. १८३७)

दांडा [ दंडक = दंडअ = दांडा (नाकाचा)] (स.मं.)

दांडी १ [ दंडिका (काठी) = दांडी ] धोत्रें वाळत घालण्याची आडवी काठी किंवा तागडीची काठी. (२) [ दंडिका = दांडी ] दंड, दंडिका म्हणजे निमुळता कोन, कोपरा. कुलाबदांडी म्हणजे कुलाब नांवाचा मुंबई बेटाचा कोपरा.

दाढ, दाढी [ दंष्ट्रा = दढ्ढा = दाढ. दाढेच्या बाहेरी केस = दाढी ] (ग्रंथमाला)

दाढी (भाजणें) [ दग्धि = दढ्ढि = दाढी = भाजावयाकरितां जमवलेला पाचोळा] (ग्रंथमाला)

दाणा [ धाणिका = दाणा (स्त्री - इंद्रिय) तैत्तिरीय संहिता ]

दाणादाण १ [ द्राणं + आद्राणं = दाणादाण] द्राण म्हणजे पळणें. दाणादाण म्हणजे पळापळ. (२) [ द्रा २ कुत्सितायां गतौ ] द्राणंआद्राणं = दाणादाण (पळापळ) (धा. सा. श.)

दार्णि [ इदानीम् ] *(आताँ पहा)*

दांत १ [ दंत = दांत ] (स. मं.) (२) [ द्वंद्व = दंद = दंद किंवा दांत ] त्यानें माझ्या वर दांत धरला म्हणजे वैर धरलें. दंद धरला असा हि प्रयोग आहे. द्वंद्व म्हणजे वैर, भांडण, युद्ध.

दांतखीळ [ दंतकील = दांतखीळ ] (भा. इ. १८३४)

दांतरा [ दंतुरः = दांतरा (री - रें) ] (भा. इ. १८३६)

दाता [ दात्रः = दाता ] शेतकऱ्याचें औत.

दाँता [ दंतक = दांता ] चाकाचा दांता.

दातार [ दातृक ] *(दादला २ पहा)*

दांती [ दंतिका = दांती (वनस्पतिविशेष) ] (भा. इ. १८३७)

दांतेकड [ दंतकाष्टिका = दांतेकड ] रहाटाच्या चाकाच्या दांत्याच्या कड्या.

दांतोडी [ दंतकोटिः = दांतोडीं ]

दाद १ [ दै, दे to take compassion on Freq दादेति. (नाम) दादा (स्त्री) = दाद compassion ] दाद मागणें. to ask protection, mercy, compassion (२) [ दय् पौनः पुन्य ). दादय्य = दाद (संरक्षण, दया) ] दाद मागणें म्हणजे संरक्षण, दया sympathty मागणें. (भा. इ. १८३४) (३) [ दद्रु = दाद (रोगविशेष) ] (भा. इ. १८३४) (४) [ ध्यै Freq. दाध्याति, दाध्येति noun दाध्या = दाद] attention, minding. त्याला त्याची दाद नाहीं. he had no knowledge of it. (५) [ दे to protect Freq noun दादिः = दाद ] protection. दाद मागणें to ask protection. (६) [ दे to protect: दाति protection = दाद ] protection, दाद मागणें. to ask for protection.

दादला १ [ दादः ] *(दादुला २ पहा)* (२) [ दातृक = दातरअ = दादलअ = दादला, दादा (जीव देणारा, अन्न देणारा), दातार (ज्ञानेश्वर) दादुला ]. (स. मं.) (३) [ दयितः ] *(दादा ४ पहा)*

दादा १ [ दातृक ] *(दादला २ पहा)* (२) [ दवदव (imperative)= दादा. द्रु - दवति to go ] दादा म्हणजे चलचल, चलाचलाव. (३) [ दादः (donor) = दादा ] father (४) [ दयितः = दाइदा = दादा. दादा + ल (स्वार्थक) = दादला ] दयित म्हणजे नवरा, प्रिय.

दादुला १ [ दातृक ] (दादला २ पहा) (२) [ दादः (donor) + स्वार्थक ल = दादला, दादुला ] husband.

दाम [ द्रम्म ] *(द्रम्म पहा)*

दामाडू [ द्रम्म ] *(द्रम्म पहा)*

दार [ दारु (दा + रु) one who gives = दार ] one capable of giving or spending. नादार not capable of giving or paying.

दारकुसूं [ द्वारकुशी = दारकुसूं ] कुशी म्हणजे लोखंडाचा फाळ.

दारवटा [ द्वारकोष्ठ, द्वारप्रकोष्ठः ] *(दारोट १, २ पहा)*

दारूहळद १ [ दारुहरिद्रा = दारूहळद ] (भा. इ. १८३७) (२) [ दार्वी हरद्रुः = दारूहळद ] दार्वी व हरद्रु हीं दोन नांवें दारु हळदीचीं च आहेत. दोन्ही नांवांचें मराठींत एक नाव झालें आहे.

दारोटा १ [ द्वारकोष्ठ = दारओट्ठ = दारोटा, दारवटा ] द्वारकोष्ठे च मुक्तापटकलापप्रलंबितानि।

(कारंडव्यूह) (भा. इ. १८३४) (२) [ द्वारप्रकोष्ठः = दारोटा, दारोठा, दारवटा ]

दारोठा [ द्वारप्रकोष्ठः ] *(दारोट २ पहा)*

दार्वटेकार [ दार्वटकारः = दार्वटेकार ] दार्वट म्हणजे सभास्थान. दार्वटेकार म्हणजे सभास्थानीय वेत्रकार किंवा सभासद.

दाल [ दारु = दाल, ढाल, दाल म्हणजे शिपतर ] अति पुरातनकालीं ढाला लांकडाच्या होत्या असें दिसतें.

दावण [ दामनी = दावणी = दावण (गुरांची) ] ज्या लांब दोरीनें गुरांना एका ठिकाणीं ओळीनें बांधतात ती दोरी, लक्षणेनें जेथें बांधतात त्या जागेला हि दावण म्हणतात. (भा. इ. १८३६)

दावें [ दामन् = दावें ] (भा. इ. १८३७)

दास [ दस्युः = दासः ] दास शब्द दस्यु शब्दाचा जुनाट वैदिक अपभ्रंश आहे व तो संस्कृत म्हणून गणला गेला आहे.

दासट [ दश्, दंश् : दंसक superl दंसकिष्ट = दासट ] biting.

उ. - तरि मारें उणे कालकूट । तेणें मानें कडुवट ।
कां चूनेयांहुनु दासट । अम्लीं हान ॥ ज्ञा. १७-१३८

चूनेयाहुनि दासट more biting than chunem.

दाह [ दाहः ] *(डाह पहा)*

दाही [ *पाची पहा* ]

दिखत [ दृश् १ प्रेक्षणे ] *(धातुकोश - दिख पहा)*

दिठा [ द्विपथ = दिठा ]

दिठिवा [ दृष्टिपातः = दिट्ठिवाआ = दिठिवा] हा शब्द ज्ञानेश्वरींत येतो.

दिपुष्ठाण [ दीपोच्छिष्ठ = दिपुष्ठ. दिपुष्ठ + घाण = दिपुष्ठाण ] दिव्याची घाण.

दिमाख [ ध्मांक्षा = दिमाख ] ध्मांक्षा म्हणजे कावळ्यासारखें कावकाव करणें, जबर इच्छा, इ. इ.

दिमाख काढीन म्हणजे तुझी महत्त्वाकांक्षा मारून टाकीन.

दिलँ, दिलें - ला - ली [ दत्त = दिन = दिलँ = दिलें - ला - ली ] (ग्रंथमाला)

दिवटा [ दीपवर्तिका = दिवटी. द्विष्टः = दिवटा ] दिवटें पोर = द्विष्टः पुत्रकः

दिवटा, दिवटी [ दिविष्ठ heavenly = दिवटा - टी - टें ] divine दिवटें पोर (लाक्षणिक) worthless, chap.

दिवटी १ [ दिव्यस्त्री divine female = दिवटी ] any vagrant woman. (२) [ दीपवर्तुलि = दीववाटुली = दिवाटली = दिवाटी, दिवटी ] (ग्रंथमाला)

दिवड [ द्विपद = दिवड ] (भा. इ. १८३२)

दिवसपट्टी [ दिनपट्टिका = दिनपट्टी, दिवसपट्टी ] रोजचें वेतन. मासपट्टिका = मासपट्टी, महिनेपट्टी. वर्षपट्टिका = वरीसपट्टी.

दीठ [ दृष्टि = दीठी = दीठ ] (स. मं.)

दीठिवा [ दृष्टिपात = दीठिवाअ = दीठिवा] (ज्ञा. अ. ९ पृ. ५)

दीड १ [ द्व्यर्धम् = दीडँ = दीड ] (ग्रंथमाला) (२) [ अध्यर्ध = (अ लोप) दिड्ढ = दीड ] ज्ञानेश्वरी व्याकरणांत द्व्यर्ध या शब्दापासून दीड या शब्दाची व्युत्पत्ति कशी तरी केली आहे. परंतु ती समाधानकारक नाहीं. दीड ह्या अर्थी अध्यर्ध हा शब्द संस्कृतांत योजतात :- तद्वदंतर्मुखं तस्य

फलं अध्यर्धं अंगुलम् ॥ १० ॥ (वाग्भट - सूत्रस्थान - षड्विंशोध्यायः।) येथें अध्यर्ध म्हणजे १ ऊर्फ दीड. अर्थात् दीड या शब्दाची ही व्युत्पत्ति खरी. (भा. इ. १८३४)

दीडगांठ [ दृढग्रंथिः = दिढगंठि = दीडगांठ] दीडगांठ म्हणजे घट्टगांठ.

दीडमिश्या १ [ दृढस्मश्रूकः = दिढ = दीड] दीडमिश्या म्हणजे बळकट आहेत मिश्या ज्याच्या. (२) [ दीर्घश्मश्रुः = दीरमिश्या = दीडमिश्या ] दीडमिश्या म्हणजे लांब आहे मिशी ज्याची तो. (गोपथब्राह्मण = द्वितीयप्रपाठक पूर्वभागः । ) (भा. इ. १८३४)

दीड शहाणा १ [ दीर्घचक्षणः = दिड्ढ सहण्णः = दीड शहाणा ] (भा. इ. १८३४) (२) [ दृढविचक्षणः = दीड शहाणा ] दीड शहाणा म्हणजे दृढ, पूर्ण शहाणा.

दीपोष्टेल [ दीपोच्छिष्ट तैल ] *(तिळेल पहा)*

दीर [ देवर = दिअर = दीर ] (स. मं.)

दुकटा [ द्विकस्थः ] *(एकटा पहा)*

दुखवटा [ दुःखपाटः = दुखवटा ] (तुलना) आषाढपाटी, श्रावणपाटी.

दुखापत [ दुःखापत्ति = दुखापत ]

दुख्खारा, दुख्खेरा [ तुषाराः तुखाराः ] *(तुख्खारा पहा)*

दुगाणी [ द्वि + आणिका = दु + आणी = (दुवाणी) = दुगाणी ] अर्धा आणा. (भा. इ. १८३२)

दुट्ट [ (ट्टा - ट्टी - ट्टें) द्विष्ठ = दुठ्ठ = दुट्ट] दुट्ट म्हणजे दोन ठिकाणीं राहणारें. वाक्यान्यपि द्विष्ठानि भवंति । (पातंजल महाभाष्यं।) (भा. इ. १८३४)

दुट्टें १ [ दुष्ट = दुट्ठ = दुट्ट (ट्टा - ट्टी - ट्टें)] (भा. इ. १८३२) (२) [ दुष्टं = दुट्टें] दुष्टे दुष्टं आचरेत् । तुझें दुट्टें काढतों म्हणजे दुष्ट काढतों.

दुडकी [ द्रुतका = दुडकी (चाल) ] दुडकी चाल म्हणजे दुडदुड चाल. (भा. इ. १८३४)

दुडदुड [ द्रुतंद्रुतं = दुडदुड, दुड्डुड्डु ]

दुंडा १ [ द्विकांडः = दुंडा ] द्विकांडी रज्जुः = दुंडा दोरा = द्विकांडः दोरकः (२) [ दुंदुभिः (अक्षेषु) = दुंडा ] दुंडा फासा पडला - एक दान आहे.

दुड्डुड्डु १ [ द्रुद्रु = दुड्डुड्डु running धावणें (२) [ द्रुतंद्रुतं ] *(दुडदुड पहा)*

दुडुम् [ द्रुम्म् ] *(धुडुम् पहा)*

दुढ्ढी [ द्वैध्यं = दुढ्ढी division into two.] दुढ्ढी बिराजा = द्विधाभाव म्हणजे विभक्त राज्य.

दुध [ दुह् ]

दुधार [ द्विधाकार = दोधार = दुधार (रा - री - रें) ] (भा. इ. १८३२)

दुधारी [ द्विधाकारिन् = दोधाआरी = दोधारी = दुधारी (निवडुंग) ]

दुधी [ दुग्धिका ] (भा. इ. १८३४)

दुध्या १ [ *दह्या पहा* ] (२) [ दुग्धिका = दुद्धिया = दुध्या (भोपळा) ] (ग्रंथमाला)

दुपट्टा १ [ दुकूलपट्ट = दुपट्टा ] (२) [ द्विपटवानम् (कौटिल्य, weavers) = दुपट्टा, दुपेटा ]

दुपारी [ द्विप्रहरिका = दुपहरिआ = दुपारी] (भा. इ. १८३४)

दुपेटा [ द्विपटवानम् ] *(दुपट्टा पहा)*

दुबेळकें [ द्विबिलकं = दुबेळकें ] दोन बिलें आहेत ज्यांत तें. बिलं म्हणजे splitting, opening, aperture तोंड.

(भा. इ. १८३६)

दुभ [ दुह् ] दुभणें (ह = भ)

दुहणें (ह = ह)

दुघणें (ह = घ)

दुमडणें, दुमोडणें [ मुट् १० संचूर्णने. द्विमोटनं = दुमोडणें = दुमडणें ] (धा. सा. श.)

दुरक [ द्विक = दुक = दुरक (तिरकच्या धर्तीवर) एक दुरक दोन. (ग्रंथमाला)

दुरडी [ दृतिः = दुरडी ] दुरडी म्हणजे वेळू वगैरेंचें एक पात्रविशेष. दृति म्हणजे पखाल, बुधली असा एक अर्थ व वेळूचें पात्र असा दुसरा अर्थ.

दुराप [ दुराप = दुराप ] यश येणें दुराप आहे.

दुर्भर [ दुः स्मरः = दुर्भर. स्मर = भर (प्राकृत) ]

दुलई [ दुकूलं, दुकूली = दुऊळी = दुलई, दूल, दुली ] (ग्रंथमाला)

दुलदुलित [ दुल् १ गतौ ] *(धातुकोश - दुल्दुल पहा)*

दुवड [ द्विपदा = दुवड. त्रिपदा = तिवड. चतुष्पदा = चौवड (Sans) F पंचपदा = पाचुंदा M. (in मराठी) ]

दुवाड [ दुर्विदग्ध ] *(द्वाड पहा)*

दुह [ दुह् ]

दूण [ (सं.) द्विगुण = (महाराष्ट्री) दुउण = (मराठी) दूण ] एक दूण दोन, बे दूण चार. (भा. इ. १८३२)

दूणी बीणी [ द्वि ह्या संस्कृत शब्दाचीं दुण्णि व बिण्णी अशीं नपुंसकलिंगी प्रथमेचीं व द्वितीयेचीं रूपें महाराष्ट्रींत होतात ] (भा. इ. १८३२)

दूम [ लूम = डूम = दूम ] दूम म्हणजे शेंपूट.

देइजे [ कर्तरि विधिलिङ् किंवा कर्मणि विधिलिङ् दद्यात किंवा दीयेत. देइजे = दीजे ] (ज्ञा. अ. ९ पृ. १)

देखत - चोर [ (पश्यतो हरः ] पश्यश्चौरः = देखतचोर. देखत षष्ठी आहे] (भा.इ. १८३३)

देणा [ ददानः = देणा] तो माझा देणा होता = सः मे ददानः आसीत्. गृहाणः = घेणा.

देंट, देंठ [ दण्ड = देंट, देंठ, stem ] (ज्ञा. अ. ९ पृ. १४४)

देदेदेणें [ (दा) ददाति = देदेदेणें ] (भा. इ. १८३६)

देवघेव [ देयग्राह्य = देवघेव ] देणें घेणें.

देवचार [ *देवाचार पहा* ]

देवड [ दा - पदं = देवड ] घेवडदेवड = घेणेंदेणें, मोबदला.

देवाचार [ देवाप्सरसः = देवअच्चार = देवाचार = देवचार ] कोंकणांत हा शब्द फार ऐकूं येतो. (भा. इ. १८३२)

देवाच्यान् [ देवाच्यान्, आईच्यान्, बापाच्यान्, गुरुच्यान् वगैरे शब्द महाराष्ट्रांत जोरानें व आग्रहानें बोलतांना उच्चारितात. ह्या शब्दांचा विग्रह असा - देवाची + आण = देवाच्याण = देवाच्यान्. आईची + आण = आईच्याण = आईच्यान् इ. इ. इ. ] संस्कृतांतल्याप्रमाणें मराठींत संधी ज्या कांहीं थोड्या स्थलीं होतात त्यांपैकीं हें एक स्थळ आहे. (भा. इ. १८३३)

देवाण घेवाण [ देहिवाणिजा गृहाणवाणिजा = देवाण घेवाण ] (मयूर व्यंसकादयः)

देव्हारा १ [ देवागारः = देवांआरा = देव्हारा] (२) [ देवतागाराः = देवआआरा = देवारा = देव्हारा ] (भा. इ. १८३४)

देशावरावर [ देशांतरं उपरि = देशावरा वर
स देशं उपरि गतः = तो देशा वर गेला.
स देशांतरं गतः = तो देशावर गेला.
दुसऱ्या वाक्याचा अर्थ, तो दुसऱ्या देशांत गेला, असा होतो. ग्रामान्तरं गतः = गांवावर गेला.

देसावर [ देशांतरं = देसाअर = देसावर ] सः देशांतरं गतः = तो देशावर गेला. येथें देशावर ही द्वितीया आहे.

दोढ्ढाचार्य [ दोग्धृ + आचार्य = दोढ्ढाचार्य] दोग्धृ म्हणजे वेतन घेऊन काव्य करणारा, स्वार्थी. दोढ्ढाचार्य म्हणजे स्वार्थी, आपमतलबी माणूस.

दोंदिल, दोंद्या [ तुंदिलः = दोंदिल. तुंदिकः = दोंद्या ]

दोन्ही [ द्वीनि = दोनि = दोन्ही ] प्राकृतांत व मराठींत द्विवचन नाहीं. सबब द्वि हा शब्द प्राकृतांत अनेकवचनी चालवून द्वीनि असें रूप साधलें. (ग्रंथमाला)

दोभ [ दोग्धृ = दोभ ] गाईच्या थानाला दोभ म्हणतात.

दोसण [ दोषज्ञ = दोसण्णु = दोसण (णा - णी - णें) ] सिहाण व दोसण हे दोन शब्द ज्ञानेश्वर व दासोपंत योजतात. (भा. इ. १८३२)

दोस्त [ दोः स्थ (हातांतला, सेवक, विश्वास्य) = दोस्त ] हा शब्द फारशींत हि आहे पण तो हि संस्कृतांतून च फारशींत गेलेला आहे. (भा. इ. १८३३)

दौड [ धौर्य धोरित } दौड. धौर्य - धोरित म्हणजे अश्वगतिविशेष. (भा. इ. १८३६)

द्रम्म - हा शब्द ग्रीक drachm या शब्दापासून निघाला आहे किंवा असावा असा आग्रहपूर्वक तर्क कित्येक युरोपीयन शब्दविद किंवा शाब्दिक करतात. परंतु तें म्हणणें सशास्त्र दिसत नाहीं. कारण (१) ग्रीक drachm ह्या शब्दाची ग्रीक भाषेंत व्युत्पत्ति कोणीं दाखविलेली नाहीं. (२) ग्रीक भाषेंतील ग्रंथांत किंवा नाण्यावर हा शब्द संस्कृत भाषेंतील ग्रंथांतल्यापेक्षां किंवा नाण्यांपेक्षां पुरातन कालीं येतो, असें हि कोणीं दाखविलेलें, नाहीं.

द्रम्म हा शब्द प्राकृत आहे. द्रम् धातूपासून द्रम्य कृदन्त होतें. द्रम् गतौ. द्रम्य म्हणजे That which wanders circulates, द्रु धातूपासून द्रव्य कृदन्त होतें. त्याचा हि अर्थ That which moves, wanders, circulates असाच आहे. सारांश द्रव्य व द्रम्य हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत. द्रम्य ह्याचें प्राकृत द्रम्म. द्रम्म याचें प्राकृत दाम. द्रम्म म्हणजे circulating money असा मूळ अर्थ. नंतर तो शब्द एका विशिष्ट नाण्याला लावूं लागले. द्रम्म सोन्याचे, रुप्याचे किंवा तांब्याचे असत.

तात्पर्य, हा शब्द मुळीं ग्रीक भाषेंतील नाहीं; संस्कृत भाषेंतील आहे. विशेष प्रचार प्राकृत भाषेंत आढळतो. मुळीं हा शब्द पंजाबापासून असुर्या देशांतील प्राकृत भाषांत प्रचलित असावा व तेथून ग्रीक ऊर्फ हेलेनिक लोकांनी तो उचलला असावा.

चलन, चलनी हे शब्द हि चल् गतौपासून च निघाले आहेत. currency, circulation हे हि शब्द गत्यर्थक धातूंपासून च निघाले आहेत.

द्रु = द्रव्य, द्रविण. दाम याचें क्षुद्रत्व दर्शक रूप दमडी, दामाडू. (भा. इ. १८३२)

द्रव्य [ द्रु गतौ ] *(द्रम्म पहा)*

द्रग् (कानडी) [ दुर्ग = द्रुग् (कानडी) ]

द्वाड १ [ दुर्वाट = दुवाड = द्वाड ] दुवाड रूप ज्ञानेश्वरींत येतें. (स.मं.) (२) [ दुर्विदग्ध = दुवाड, द्वाड ] slow, sluggish.

## [ध]

धकणें [ दक्ष् १ वृद्धौ = धकणें, ढकणें ] धकणें म्हणजे निभणें, योग्य ठरणें. गोष्ट धकली पाहिजे म्हणजे निभली पाहिजे. (भा. इ. १८३६)

धकाधकी [ धक्कः धक्किः = धकाधकी. धक्क् १० नाशने ] धकाधकी म्हणजे पीडा, नाश, नुकसान. धक्कः = धोका = झोका (पीडा, नाश) (धा. सा. श.)

धक्का १ [ धक्क् नाशने धक्कः = धक्का, ढक्का ] (२) [ धाकः (ओझें ठेवावयाचा खांब; तक्ता वगैरे) = धक्का ] धक्का म्हणजे माल, माणसें उतरावयाचा मातीचा, दगडाचा किंवा लांकडाचा ताफा वगैरे. (भा. इ. १८३६)

धग १ [ इंधनाग्नि =धग्गि = धग ] रसरसणाऱ्या कोळशाचा ताव. (स. मं.) (२) [ दग्ध = धग्ग = धग ] (भा. इ. १८३४)

धग्धग् [ धकक् (अकच्) = धग्धग् (अव्यय) ] घर धगधग जळूं लागलें.

धजणें [ धृज् गतौ ] धजणें = जाणें, जाववणें. (ग्रंथमाला)

धट १ [ धृष्ट ] (धट्ट पहा) (२) [ धट (तुला) = धट] धट म्हणजे परीक्षा. काम धटाला लागलें म्हणजे परीक्षेला लागलें, खरें का खोटें याच्या निर्णयाला लागलें. (भा. इ. १८३६)

धटाई [ धृष्टता = धटाई, धिटाई ]

धटिंगण [ धटिगणः = धटिंगण ] धटिन् म्हणजे शंकर, त्याचे गण ते धटिंगण. मराठींत धटिंगण म्हणजे बेपर्वा पुरुष किंवा स्त्री.

धट्ट [ धृष्ट = धट्ट = धट ]

धड [ दृढ = दढ = धड ] धड हें नाहीं आणि धड तें हि नाहीं.

धडक [ धृष् १० प्रहसने. दधृश = दधृक = धडक (धाष्टर्यानें). दार्धर्ष = धाडस] (धा. सा. श.)

धडपड [ घटधटं ] *(धडाधड पहा)*

धडपडणें [ अधउत्पतनं = धउंडपडणं = धोडपडणें = धडपडणें ] धडपडणें म्हणजे वर खालीं हालचाल करणें. (भा. इ. १८३५)

धडस [ द्रढीयस् comparative = धडस ]

धडाधड, धडाडा [ धटधटं] *(धडाधडा पहा)*

धडाधडा [ धटधटं = धडाधडा, धडाडा (हापटतो), धडाधड, धडधड ]

धडी [ धटी (जीर्णवस्त्र, वस्त्रविशेष) = धडी (पगडी) ] धडी म्हणजे जुनेरें, जुनें वस्त्र. (भा. इ. १८३३)

धडौतें [ धड + ओत = धट + ओत. धट = दांडगें व ओत = विणलेलें ] दांडग्या विणकरीचें लुगडें म्हणजे धडौतें. (स. मं.)

धण (धाकट) [ धणियबंधणबद्धाओ (भगवतीशतकजैन ग्रंथ) ] धनिय म्हणजे निबिड, चिक्कण, धणिय = धण धणधाकट या जोडशब्दांत हा धण शब्द आढळतो. (भा. इ. १८३६)

धणगट [ धष्णज् + ट = धणगट ]

धणंतर [ धन्वंतरी = धणंतरी = धणंतर = धनत्तर ] धणंतर, धनत्तर ह्या शब्दाचा अर्थ सध्यां मराठींत समर्थ असा आहे. (भा. इ. १८३२)

धंदा [ धनदा = धन्दा = धंदा ] धनदा (वैदिक) म्हणजे धन देणारा. धन देणारा उद्योग तो धंदा, काम (कर्म), धाम (धर्म), आणि धंदा (धनदा) किंवा काम (इच्छा), धाम (घर), आणि धंदा (रोजगार). धंदा म्हणजे रोजगार. धंदा मराठी शब्द व रोजगार फारसी शब्द. शब्दांच्या अशा जोडया मुसलमानांच्या रियासतीं प्रचारांत फार आल्या. कारण फारसी शब्द समजून घ्यावे लागत. त्यामुळें मराठी शब्द व फारसी प्रतिशब्द एकदम बोलत. (भा. इ. १८३३)

धन - फांसे, कवडया वगैरे टाकून जें दान घेतात त्याला धन म्हणतात. वेदांत धन हा शब्द फांशांच्या दानाला लावलेला आढळतो. धन = धन

तुला चांगलें धन पडलें, तूं चांगलें धन घेतलेंस, असे प्रयोग होतात. धनचाच अपभ्रंश दान. धन = धान = दान. (भा. इ. १८३६)

धनको [ धनकामः (धने कामः यस्य) = धनको. ऋणकामः (ऋणे कामः यस्य) = रिणको, ऋणको ] धनको नाम विष्णु, रिणको नाम हरि.

धनत्तर [ धन्वंतरी ] *(धणंतर पहा)*

धपाटणें, धपाटा [ पट् १० ग्रंथे. अधःपाटन = धपाटणें, धपाटा ] धपाटा म्हणजे खालीं पडेसें मारणें. (भा. इ. १८३६)

धबका [ स्तंबघातः ] (धातुकोश - धबक पहा)

धबधबा [ दवीधू ५ चलने. दवीधावः = धबधबा ] *(धातुकोश - धबधब पहा)*

धमक [ ध्मांक्ष् १ इच्छायाम्. ध्मांक्षा = धमक ] (धा. सा. श.)

धमनी १ [ धमनी = धमनी (सं.) (स.मं.)] (२) गुजराथेंत दमणी म्हणून एक बैलांची चलाख जात आहे. दमणी बैलांच्या गाड्या दगडगोटे यांच्या वरून इतक्या जलद जातात कीं, त्या घोड्याला हि आटपत नाहींत. धरमपूरचे राजे ह्या गाड्या ठेवतात. ह्या दमणी शब्दावरून मराठी धमनी शब्द झाला आहे. (भा. इ. १८३२)

धमासा १ [ धन्वयासः = धमासा (वनस्पति) ] (भा. इ. १८३७) (२) [ धन्वयवासः = धमासा ]

धरण [ धरणः (बांध) = धरण ] बिनकमानीचा बांध. (भा. इ. १८३६)

धरती कांप [ धरित्रीकंप = धरतीकंप ]

धरपकड [ धृ + प्रकट् = धरपकड ]

धरधरून [ धृ to hold ]

धरम वाढा [ धर्म उपपादय = धरम वाढ ] धर्म उपपादय याचा अर्थ धर्म मिळवा, धर्म जोडा, पुण्य मिळवा, असा मूळचा आहे. आतां धर्म, धरम म्हणजे दान, भिक्षा असा अर्थ होऊन धरम वाढा म्हणजे दान, भिक्षा वाढा असा अर्थ झाला आहे. (धा. सा. श.)

धरसणें [ धृष् ५ प्रागल्भ्ये. धर्षणं = धरसणें ] (भा. इ. १८३४)

धरसोड १ [ उद्धरोत्सृजा (मयूरव्यंसकादि) = धरसोड ] (ओसाड पहा) (२) [ धृतिसृष्टि = धरसोड ]

धर्मलंड [ लण्ड् उत्क्षेपणे ] धर्माचें उत्क्षेपण

करतो तो. (ग्रंथमाला)
धवलार [ धवलागार = धवलार (चुनेगच्ची घर)
कवलागार = कवलार (कवलानें शाकारलेलें घर)
तृणागार = तणार (गवतानें पांजरलेलें घर)] धवलार व तणार हे शब्द ज्ञानेश्वरींत येतात. (ग्रंथमाला)
धवलारें [ धवलगृहं (राजवाडा) = धवलारें, ढवलारें ]
धश्चोट [ अधश्चोदक = धश्चोडअ = धश्चोट] खालीं पाडून मारणारा. (भा. इ. १८३६)
धस [ धासस् = धस, ढस ] डोंगराची धस, ढस.
धस्स [ साध्वसं = धस्स (सा लोप) ] माझ्या हृदयांत धस्स झालें = मे हृदि साध्वसं समभवत्. (भा. इ. १८३५)
धा [ दाहः ] *(डाह पहा)*
धाक [ ध्राघ् १ सामर्थ्ये. ध्राघः = धाक ] सामर्थ्य, दरारा. (धा. सा. श.)
धाकधुक [ संकसुक (अस्वस्थ, चंचल) = झांकझुक = धाकधुक. वसिष्ठ संहिता - दहावा अध्याय शेवटील कलम ]
धांगडी [ ध्वांक्षी a begger, outcaste woman + ट (diminutive) धांगडी] a low woman.
उ. - परि धर्मपत्नी कां धांगडि । पोसितां जरि एकि वेढि ।
तरि कां अपखडि । आणावी आंगां ॥ ज्ञा. १८-९३६
धाड १ [ धाटी (दरवडा, हल्ला) = धाडी = धाड ] (भा. इ. १८३३)
(२) [ धाटी = धाड ] अस्माकमग्रे धाटी निपतिता (धर्मदत्तचरितम्)
धाडकन् १ [ ध्राड विशरणे ] (२) [ द्राड् to break to pieces = धाडकन् ] धाडकन् हापटणें. to let fall so as to break to pieces.
धाडधाड [ द्राड १ अवयवे, विशरणे (द्विरुक्ति) द्राडंद्राडं = धाडधाड किंवा दाडदाड भांडीं आपटलीं. ] (धा. सा. श.)
धाडस १ [ धाष्टर्य = धाडस ] (२) [ दार्घर्ष = धाडस ] *(धडक पहा)*
धांदल [ द्रा २ गतौ ] *(धातुकोश - धांदल पहा)*
धांदळ [ द्रा २ धावने. दाद्राय = दादल = धांदळ ] (धा. सा. श.)
धाबें [ धामन् = धाबें ] घराचा वरचा उघडा भाग.
धाम [ धर्म = धम्म = धाम (कामधाम) ] (भा. इ. १८३२)
धामण [ धन्वनः = धामन (वृक्ष) ]
धाम्या १ [ ध्यामः (काळें, मलिन) = धाम्या (black, dirty) ] धाम्या माणूस म्हणजे मलिन माणूस. देशस्थ माध्यंदिनांना धाम्या हें विशेषण कोठें कोठें लावतात. कारण त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक घामट असतात. (२) [ धाममोहिन् (घरांत मुतणारा) = धाम्या ] धाम्या देशस्थ आहे म्हणजे आळशी गलिच्छ आहे.
धायटी [ धातकी = धायटी ]
धायरी [ धातकीपुरी = धायइउरी = धायरी]
धार १ [ धारा (शस्त्राची) = धार ] (२) [ धारु sucking = धार milk-suck ] धार काढणें म्हणजे दूध काढणें. धृ पासून धार निराळा. (३) [ धारुः (स्तनपानं कुर्वन् धे) = धार ] दुधाची धार - अथर्ववेद -

चतुर्थकांड - अनुवाक ४ - सूक्त १८ - ऋच् २.

**धारजिणा** [ धृज् गतौ धृंजति to glide smoothly धृजानः one gliding smoothly = धारजिणा ] one with whom dealings could be transacted smoothly and favourably.

**धारजिणें** [ धार्यजीवनं (धार्यं जीवनं यस्य) = धारजिणें ]

**धारा** [ धारा (रीतभात) = धारा ] शिरस्ता.

**धारिष्ट** [ धाष्टर्यं = धारिष्ट ]

**धाला** [ समा + धा ] *(धातुकोश - धा ७ पहा)*

**धावडा** [ धवटः = धावडा (वृक्ष) ]

**धावा १** [ (ध्यै) ध्यायः = धावा ] (२) [ ध्यै - ध्यामन् - धावा ] to prayer. (३) [ उपधाव् to pray, to praise, स्तवणें = (उपलोप) धावा ]. उपधावः = धावा. (prayer to approach)

**धांवा** [ (ध्यै) ध्यापः = धावा = धांवा ] धांवा म्हणजे वारंवार त्या च त्या गोष्टीचा उच्चार. (भा. इ. १८३६) (२) [ ध्यामन् = धांवा ]

**धाविन्नल** [ धाव् गतौ : धाविन्न + ल = धाविन्नल (ला - ली - लें) ] धाविन्नणें असा धातु गोडबोले देतो तें चूक. धावणें ची जुनी निष्ठा धाविन्नल.

**धास्ती १** [ ध्वस्ति ] *(धातुकोश धास्त पहा)* (२) [ ध्वस्ति ] *(निर्धास्त पहा)*

**धिटाई** [ धृष्टता ] *(धटाई पहा)*

**धिंड, धिंडका** [ हिंडी = धिंड, धिंडका. हिंडी name of दुर्गा ] भटक्या स्त्रीला उद्देशून "ही धिंड, धिंडका कोठून आली," असा प्रयोग करतात.

**धिमा, धिम्मा** [ धीमत् = धिमा, धिम्मा ] धिमा म्हणजे विचारपूर्वक वागणारा. (भा. इ. १८३४)

**धिम्मा २** [ धृतिमान् = धिइमा = धिम्मा ] bold. (३) [ स्तिमित = थिमिअ = धिमिअ = धिम्म = धिम्मा, धिम्मी, धिम्में ] (ग्रंथमाला)

**धिवसा** [ अध्यवस्या = (अ लोप) धिवसा, धिंवसा ] (भा. इ. १८३४)

**धिवसा, धिंवसा** [ अध्यवसाय (उत्साह) = धिंवसाअ (अ लोप) = धिंवसा ] (भा. इ. १८३६)

**धीट** [ धीष्टित = धीट्टिअ = धीट ]

**धुई १** [ द्रुही (daughter) = धुई ] (२) [ दूति = दूइ = धुइ ] कामकरीण. (भा. इ. १८३४) (३) [ दुहितृ = धुइऊ = धुई ] मुलगी. (भा. इ. १८३३) (४) [ दुहितृ = धुई, धुव] daughter. बोले सुने आणि लागे धुवे.

**धुकें १** [ धुको वायुः (उणादि ३३४) ] वायूसारखें पातळ अभ्र. (भा. इ. १८३३) (२) [ धूम + कं ] *(धातुकोश - धुकट पहा)*

**धुगधुगणें** [ धुक्ष् कृछ्जीवने = धुगधुगणें ]

**धुगधुगी** [ धुक्षिका = धुगी, (द्विरुक्त) धुगधुगी. धुक्ष् जीवने ] धुगधुगी म्हणजे क्षीणपणें जीवंत असणें.

**धुडुम्** [ द्रुम्म (vedik to go गतौ) = दुडुम् धुडुम् ] धुडुम् दिशी चालता झाला.

**धुणावळ** [ धावनमूल्यं = धौणोळ = धुणोळ = धुणावळ ] हा वळ प्रत्यय मूल्य या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. आवली - लि या ओळवाचक संस्कृत शब्दापासून हा शब्द व्युत्पादणें अनुचित होय.

जेवणावळ म्हणजे जेवणाचें मूल्य
खाणावळ म्हणजे खाण्याचें मूल्य
लिहिणावळ म्हणजे लिहिण्याचें मूल्य
घडणावळ म्हणजे घडण्याचें मूल्य
खोदणावळ म्हणजे खोदण्याचें मूल्य
जेव्हां जेवणावळ व खाणावळ ह्या शब्दांचा अर्थ जेवण्याच्या व खाण्याच्या पंक्ति असा असतो, तेव्हां आवलि शब्दापासून निघालेला आवळ प्रत्यय आहे असें समजणें रास्त आहे. (भा. इ. १८३५)

धुंद [ धूमगंध = धुंद ] धुंद म्हणजे धुरकट.

धुपारा [ धूपराग = धुपारा ]

धुमी १ [ धूमिका = धुमी ] (२) [ धूम्या a dense mass of smoke = धुमी ]

धुरवणी [ धूम्रपानीयं = धुरवणी ]

धुराडें [ धूम्ररंध्रं = धुराडें ]

धुराळा [ धूम्रालिः = धुराळा, धुरोळा ]

धुरु [ ध्रुवं = धुरु ] (भा. इ. १८३४)

धुरोळा [ धूम्रालिः ] *(धुराळा पहा)*

धुवण [ धूतपानीयं ] *(धूण २ पहा)*

धुव्वा १ [ धुर्व् (हिंसार्थे) = धुव्वा ] समूळ नाश. (भा. इ. १८३६) (२) [ धू ९ कंपने ] (धातुकोश - धुव ३ पहा)

धुश्श [ धृष्‌ to burn shiningly चकाकणें = धुश्श, ढुस्स ] काळा धुश्श shining black.

धुळवड [ धूल्यावृत्ति (वर्त) = धूळवड (स्त्री)]

धूड १ [ धोडः (डुंडुभ, सर्पविशेष) = धूड] जाड्या अवजड सापाला मराठींत धूड म्हणतात. त्यावरून अवजड माणसाला अगर प्राण्याला हि धूड हा शब्द लावतात. (भा. इ. १८३६) (२) [ हुड् to collect, हुडः = धूड ] a bulky fellow, serpent etc. a collection of flesh. (३) [ उदूढ fat = धूड ] (४) [ अध्यूढ = धूढ, धूड] धूड म्हणजे शरीरानें अति पुष्ट, लठ्ठ. (भा. इ. १८३६) (५) [ अध्यूढ = धूड (अ लोप) ] अध्यूढ म्हणजे संपन्न. शरीरानें व मेदानें संपन्न तो धूड. (भा. इ. १८३७)

धूढ [ अध्यूढ ] *(धूड ४ पहा)*

धूण १ [ धावन = धोन = धूण ] (भा. इ. १८३२) (२) [ धूतपानीयं = धुअवण = धुवण, धूण ]

धूत् [ धूर्त = धुत्त = धूत् ! ] हा मराठींत उद्गारवाचक शब्द झाला आहे. (भा.इ. १८३२)

धूम [ वैदिक) द्रुम्म् गतौ = धूम ] to step in hurry and bustle. धूम ठोकणें, धूमधडाका.

धूम ठोक, धूम धडाका [ द्रुम्म् गतौ ] *(धूम पहा)*

धूर [ धूम्रः ]

धूव [ दुहितृ ] *(धुई ४ पहा)*

(नास) धूस [ ध्वंस = धूँस = धूस ] (भा. इ. १८३५)

धूळपाटी [ धूलिपाटी = धूळपाटी ]

धूळवड [ धूलिपाता = धूळवड ] the day on which धूळ is thrown.
शकपाता = शेणवड the day of फाल्गुन on which dung is thrown.
दांडपाता = दांडवड the day on which sticks are thrown. वैजयंती, अष्टाध्यायी ]

धेंड [ अध्येद्ध = धेड्ड, धेंड ]
अति वाढलेला, अति मोठा माणूस, पदार्थ, पशु वगैरे. (भा. इ. १८३६)

धेंडसें [ डिंडिशः = धेंडसें ] (भा. इ. १८३४)

धोका १ [ धुक्ष् १ क्लेशने. धोक्षः = धोका] क्लेश, संकट. (२) [ द्रुह जिघांसायाम् Aorist स् ध्रोक्षः = धोका] danger. (३) [ धक्कः ] *(धकाधकी पहा)* (४) [ धक्कः = धोका (नाश, नाशाचा संभव). अ घा ओ ] (भा. इ. १८३६) (५) [ धक्कः = धोका = झोका. धक्क् नाशने ] धोका - झोका देणें म्हणजे नाश, नुकसान करणें.

धोत १ [ धौतिः a stream = धोत ] (२) [ श्रोतस् ] *(झोत २ पहा)* (३) [ स्रोतः ] *(झोत १ पहा)*

धोतर [ धौतवस्त्र = धोतअर = धोतर ] (भा. इ. १८३४)

धोतरजोडा [ धौतवस्त्रयुग = धोतअरजोडा = धोतरजोडा ] (भा. इ. १८३४)

धोपट १ [ अधःपट्ट = धोपड = धोपट ] धोपटमार्ग म्हणजे पायाखालचा मार्ग. (भा. इ. १८३५) (२) [ ऊर्ध्वपथः = (उ लोप) धोपट ] धोपट मार्ग म्हणजे सरळ पुढला मार्ग.

धोपटणें [ अधः स्फोटनं = धोफोटणें = धोपटणें ] (भा. इ. १८३५)

धोशा [ अध्यवसायः great effort (mental) = धोशा ]

ध्यास १ [ अध्यासा = ध्यास ] आसक्ति. (भा. इ. १८३६) (२) [ ध्यै १ चिंतायाम् - दिध्यासः = ध्यास ] *(धातुकोश - ध्यास पहा)*

ध्येन [ अध्ययन = (अ लोप) ध्येन ] गीतेचें ध्येन करतो म्हणजे अध्ययन करतो. हा ध्येन शब्द सध्यां देशस्थांत, बायकांत व अशिष्टांत हमेश ऐकूं येतो. हा ध्यान शब्दाहून निराळा. (भा. इ. १८३४)

## न

न [ अन्यत् = आणि, नि - नी - न ] मी आलों न, नि, नी, आणि तो गेला.

नस्य विभाषा - गुफ, लिप, फुक, सोप, कुप, लुट, सिव, सिप इत्यादि धातूंपासून (१) गुफणें, गुंफणें; (२) लिपणें, लिंपणें; (३) फुकणें, फुंकणें; (४) सोपणें, सोंपणें; (५) कुपण, कुंपण; (६) लोटणें, लोंटणें; (७) सिंवणें, सिवणें, (८) सिंपणें, सिपणें; अशीं नोपध व अनोपध अशीं दोन रूपें मराठींत होतात. पैकीं नोपध रूपें पुणेरी भाषेंत शिष्ट समजलीं जातात व अनोपध रूपें देसोर भाषेंत हमेषा योजिलेलीं आढळतात. हा उच्चारभेद सकृद्दर्शनीं आपातिकसा भासण्याचा संभव आहे, परंतु तसा प्रकार नाहीं. भेद परंपरित आहे. पाणिनीय अष्टाध्यायी अध्याय १, पाद २, सूत्र २३ येणेंप्रमाणें आहे :- "नोपधात्थफान्ताद्वा" १-२-२३ या सूत्रांत (१) ग्रथ्, ग्रन्थ्, (२) श्रथ्, श्रन्थ्, (३) गुफ्, गुम्फ् वगैरे धातूंचीं नोपध व अनोपध अशीं दोन रूपें दिलीं आहेत. तींच वंशपरंपरेनें आपण मराठींत उच्चारतों. (भा. इ. १८३३)

नकका [ (नकिः अकच्क) नककिः = नककी, नकका ] नककी जाऊं = जाऊं नको नकि = वर्जने निपातः (भा. इ. १८३६)

नका, नको १ [ न + कग् नोच्यते ] *(धातुकोश - नक पहा)* नको २ [ नकिः = नको ] जाऊं नको = नकि याहि. बोलूं नको = नकि वेद. तात्पर्य,

नको हें अव्यय आहे. (भा. इ. १८३६)
(३) [ १ न्यक्कृ, २ नक्क, ३ नकृ, ४ नकम्, ५ नकिः निपात, ६ नकं (अकच्क) = नको ] (भा. इ. १८३४)

नकों, नकोत [ न + कग् ] *(धातुकोश - नक पहा)*

नकोरे [ न खलु = न करु = नकोर = नकोरे ] (न) खलु पीत्वा = नकोरे पीऊं = मा पिब (न) खलु गत्वा = नकोरे जाऊं = मा गमः

प्रथम खलु पीत्वा, खलु गत्वा असा न खेरीज प्रयोग पाणिनि व यास्क यांच्या काळीं होत असे. पुढें पुढें पाठीमागें न लावूं लागले. त्यापासून मराठी नकोरे निघाला आहे. (भा. इ. १८३७)

नकोस [ न + कग् ] *(धातुकोश - नक पहा)*

नक्कल [ (सं) नक्कणं = नक्कल. ण = ल] नक्क् म्हणजे निर्मूल करणें. त्याचें नक्कल झालें म्हणजे त्याचें निर्मूल झालें. (भा. इ. १८३७)

नक्की १ [ निष्क् ] *(निकें २ पहा)* (२) [ *निक २ पहा* ]

नक्षा १ [ नक्ष् १ गतौ. नक्षः ] (२) [ णक्ष् गतौ. नक्षः = णक्षा, नक्षा] नक्षा, णक्षा, उतरणें म्हणजे गति, उत्कर्ष बंद करणें. (धा. सा. श.)

नख १ [ नख = नख ] (स. मं.) (२) [ नखं (छुरिका) = नख ] पोराचा नख लावून जीव घेतला, येथें नख म्हणजे सुरी असा अर्थ आहे.

नखरा [ फारसी ] (स. मं.)

नखरुख [ नखवृक्ष = नखरुख (वृक्षविशेष)] (भा. इ. १८३७)

नखरूड [ नखरुज् = नखरुड (रोगविशेष) ज =ड ] (भा. इ. १८३७)

नखला १ [ नखरः = नखला ] (२) [ (व्याघ्र) नखवल्ली = नखली = नखला ]

नखुरडें [ नखर + ट = नखुरडें ]

नखुर्डे [ नख शब्दाचें ऱ्हस्वत्वदर्शक रूप ] (स. मं.)

नखोली [ नखगूलिका = नखोली ] गव्हाच्या भिजवलेल्या कणिकेच्या नखानें केलेल्या गोळ्या.

नग १ [ न + कग् ] *(धातुकोश - नक पहा)* (२) [ नकिः (वर्जने निपातः) = नगि = नग (अव्यय) ] (भा. इ. १८३४)

नंगा [ न्यंगः = नंगा. कौटिल्य अर्थशास्त्र ] नंगा नाच = न्यंगं नर्तनं. न्यंग म्हणजे कुरूप. नागा = नग्न पासून निघाला आहे.

नंगा नाच १ [ अनंग (नृत्यं) = नंगा (नाच)] (२) [ अनंग नर्तन = नंगनाच = नंगानाच ] (भा. इ. १८३६)

नगे, नगेत [ न + कग् ] *(धातुकोश - नक पहा)*

नजर [ फारसी ] (स. मं.)

नटू बाई नटू [ नट् १ नतौ ] *(धातुकोश - नट ३ पहा)*

नडणें, नाडणें [ नडनं = नडणें. नाडयति (णिच्) = नाडणें.] नडणें म्हणजे पडणें व नाडणें म्हणजे पाडणें. मी नडलों म्हणजे संकटांत पडलों. (भा. इ. १८३७)

नंतर [ अनंतर = नंतर. येथें प्रारंभींच्या अचा मराठींत येतांना लोप होतो ] (भा. इ. १८३२)

**नथ १** [ नस्तिका = नथ्थिआ = नथ ] (भा. इ. १८३६) (२) [ नाथः नासारज्जुः (सिद्धांतकौमुदी ३-२-२४) नाथिका = नथ (अलंकारविशेष) ]

**नथ्या** [ नस्तितः = नथ्थिआ = नथ्या ] मराठींत नाक टोंचलेल्या मुलाला नथ्या म्हणतात. मूल जगावें म्हणून नाक टोंचतात. (भा. इ. १८३६)

**नना** [ (वैदिक) नना (आई) = नना ] मराठींत आईला मुलें नना, नानी या शब्दांनीं हाका मारतात. (भा. इ. १८३७)

**नन्नाचा पाडा** [ अनन्वयस्य पाठः = नन्नाचा पाडा ] ज्यांत अन्वय नाहीं तो अनन्वय पाठ. (भा. इ. १८३६)

**नपेक्षां** [ अनपेक्षा = नपेक्षा. तृतीया नपेक्षां] गोविंदा आला तर बरें; नपेक्षां तूं निघून जा. येथें नपेक्षां हें अव्यय आहे; व त्याचा अर्थ त्याच्या येण्याची अपेक्षा न धरतां, असा आहे. (भा. इ. १८३४)

**नरडी** [ नर्दी (नर्द् = शब्द करणें, ज्या अवयवाच्या द्वारें शब्द होतो तो) ] (स. मं.)

**नर्डी** [ नर्द् १ शब्दे. नर्दिः = नर्डी ] शब्द करण्याचा अवयव.

**नवट** [ नविष्ठ = नवट (तमभाव) ] नवट म्ह० अति नवें. (भा. इ. १८३७)

**नवती १** [ नव्यता = नवती ] तारुण्य. (२) [ नवजातिः = नवआति = नवाति = नवती ] नवतीचीं पानें म्हणजे नूतन फुटीचीं कोवळीं विडयाचीं पानें.

**नवथर** [ नवतरं = नवथर (क्रियाविशेषण) त = थ ]

**नवरी** [ नववरिका a newly married girl = नवरी ]

**नवानवश्याचा** [ नमस्यति Freq. नंनमस्यतिः नंनमस्यः = नवानवश्याचा] one obtained through excessive prayer. nothing to do with नवा new.

**नवाळी** [ नवकालता = नवआली = नव्हाळी, नवाळी ] नव्हाळी म्हणजे तारुण्य.

**नवीनवाळ** [ नवनवकालः = नवनवाळ = नवीनवाळ ] नवीनवाळ म्ह० पहिला हंगाम.

**नव्हाळी** [ नवकालता ] *(नवाळी पहा)*

**नव्हे** [ नभ् १ अभावे. नभ = नव्ह = नाह] मी नव्हे, मी नाहीं = अहं नभामि. *(धातुकोश नह १ पहा)*

**नवस** [ (सं) नमसित = (प्रा.) नवसिय = (म.) नवस ] नवस ह्या शब्दाचा मूळ अर्थ प्रार्थना. नंतर हेतुगर्भित प्रार्थना. नंतर प्रार्थनेंत देवाजवळ मागितलेला हेतू. (स. मं.)

**नस्** [ स्नस् १ निरासे ] *(धातुकोश - नसनस पहा)*

**नस १** [स्नसा (a tendon) = न्हस, नस, नसा ] (भा. इ. १८३३) (२) [ फारसी ] (स. मं.)

**ना १** [ नाना (विनार्थे) = ना (विना) ] ना घर ना दार म्हणजे घरा विणें व दारा विणें. (२) [ नाना (without) = ना ] ना स्त्री ना घर = नाना नारीं नाना गृहं संसारयात्रा विफला.

**नाँ** [ नाम = नावँ = नाँ ] उ. - बाजारांत जावयाचें नाँ? (हाटं प्रति गम्यते नाम.) येथें नामपासून नाँ निघाला आहे. (भा. इ. १८३२)

**नाइनसूक** [ नातिसूक्ष्मा = नाइसुक्र =

नाइनसूक ] येक कापडाची जात.

नाक १ [ नास = नासक = नाहक = नाअक = नाक ] (स. मं.) (२) [ नायक = नाक ] तो मनुष्य समाजाचें नाक आहे म्हणजे नायक आहे. हा नायक शब्दोत्पन्न नाक शब्द नासिकार्थक नाक शब्दाच्या सारखा उच्चारांत असल्यामुळें शेजारधर्मास्तव नपुंसकत्व पावला आहे.

नाकझरी [ निर्झरी = नाकझरी. नगझरी = नाकझरी (mountain torrent) ]

नाकट [ नर्कुटकं (नाक) = नाकट ] निंदार्थी नाकाला नाकट म्हणतात.

नाकडा [ नासिकंधयः (३-२-२९) = नाकडा ] नाकडें पोर म्हणजे थानाला तोंड लावावयाच्या ऐवजीं नाक लावणारें कुकुलें बाळ.

नाकपुडी [ नासकपुटी = नाअकपुडी = नाकपुडी ] (स. मं.)

नाकाड [ नासक + अस्थि = नाक + हाड = नाकाड ] (स. मं.)

नाकें [ नामकं (स्थानं) = नाअकँ = नाकें]

नाक्याचें ठिकाण [ नायकीयं (स्थानं) = नाअकिज्जं = नाकेचे = नाक्याचें ]

नागडा [ नग्नः = नागा. नग्नाटः = नागाडा = नागडा ] संस्कृतांत नग्नाट म्हणजे नागवा हिंडणारा यति. (भा. इ. १८३७)

नागदवणा [ नागदमनी = नागदवणा ] (भा. इ. १८३४)

नांगरटी [ लांगल पद्धति = नांगरवढ्ढई = नांगरोटी = नांगरटी ]

नांगऱ्या १ [ लांगलग्रहः (वार्तिक ३-२-९) = नांगऱ्या ] one who works with the plough. (२) [ लांगलिकः = नांगरिआ = नांगऱ्या ] (३) [ लांगलग्रहः = नांगरआ = नांगऱ्या (शेतकरी) ]

नागा [ नह + गा (जाणें) = नागा ] नागा म्हणजे जाण्यास प्रतिबंध, खाडा, खळ.

नाचण [स्नसनः = न्हाचण = नाचण. स्नसस् निरसने, to eject ] नाचण म्ह० न्हाव्याचें कांटा काढण्याचें यंत्र.

नाट १ [ नष्ट = नाट ] हरवलेली वस्तु. (२) [ नष्टिः, नष्टं = नाट ] नाट लागला म्हणजे हेतु नष्ट झाला. (३) [ नाष्ट्यं = नाट ] नाट म्हणजे अदर्शन, लोप. नाट लावूं नको म्हणजे वस्तूचा अभाव होईल असें बोलूं, करूं नको.

नाटकी [ नाटकीयः = नाटकी ] नाटकीयो नृत्तकरः इति अजयः ।

नाट्या [ नाष्टिकः = नाट्टिआ = नाट्या ] नाष्टिक म्हणजे हरवलेल्या वस्तूचा धनी, अपेशी माणूस. नाट्याचें तोंड सकाळीं पाहूं नये म्हणजे अपेशी माणसाचें तोंड सकाळीं पाहूं नये.

नाठाळ १ [ अनास्थालु = नाठ्ठालु = नाटाळ, नाठाळ ] (भा. इ. १८३६) (२) [ अनास्था = अनाठ्ठ + आल = नाठाळ. प्रारंभींच्या अचा लोप ] (भा. इ. १८३२) (३) [ नाथालु ] *(नाद पहा)*

नाडणें १ [ नाडयति ] *(नडणें पहा)* (२) [ नाथ्, नाध् उपतापे = नाडणें ] (भा. इ. १८३६)

नाडा १ [ नद्धिः = नाडा ] (२) [ नध्री] *(नाडी १ पहा)*

नाडी १ [ नध्री = नाडी, नाडा ] (२) [ नद्ध्री = नाडी (दोरी) ]

नाणें १ [ नामांकन ] (आडनांवें =

नाणवटी शब्द पहा) (२) [ ज्ञानम् = नाणँ = नाणें ] knowledge. खरें नाणें झांकत नाहीं. (३) [ नामांकनकं = णाआँअणअँ = णाँणँ = नाणँ = नाणें] नाण हा शब्द शुद्ध प्राकृतिक आहे. त्याचें पुन्हा संस्कृत नाणकं. हा शब्द मृच्छकटिकांत येतो. (भा. इ. १८३२)

ना तरि [ नह तर्हि ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४२)

नातलग [ ज्ञातिलग्नः = नातलग ]

नातवंड [ नप्तृगंडः = नातोंड, नातवंड ] excellent grandson.

नातु [ नप्तु = नत्तु = नातु - ती - त ] (स. मं.)

नातें [ ज्ञातेयं = आतेअँ = नातें ] तुमचें नातें सांगा = युष्मदीयं ज्ञातेयं संख्यात.

नातेवाईक [ ज्ञातिपातिकः = नातेवाईक ] *(वाईक पहा)*

नातोंडा [ नप्तृगुंड = नत्तुअंड = नातोंड ] गंड हा शब्द प्रशंसार्थी संस्कृतांत योजीत. (भा. इ. १८३३)

नाद [ नाथ् १ याच्चायां. नाथः = नाद ] त्याचा नाद सोडा. नाथालु = नाठाळ (धा.सा.श.)

नांदरुख १ [ नंदवृक्ष = नांदरुख्ख = नांदरुख ] (स. मं.) (२) [ नंदिवृक्षः = नांदरुख ] (भा. इ. १८३४)

नादार [ दारु ] *(दार पहा)*

नाना १ [ नाना (खेरीज) = नाना (ज्ञानेश्वरी)

ना-ना [ ना ना without = ना ] ना घर ना दार = नाना गृहान् नाना दाराः गृह म्हणजे बायको. दाराः म्हणजे उपस्त्रिया.

नांनूं [ ननु (शंका, वितर्क) नांनूं ] नांनूं करतां करतां म्हणजे शंका तर्क करतां करतां.

नापत् [ नाप्तिः (unattainment) = नापत् ] आमची बाजारांत नापत झाली = पदार्थ मिळेतनासे झाले.

नामर्द [ नामर्द, नाहक्क, नापास वगैरे शब्दांतील ना नकारार्थी फारसी आहे.] (भा. इ. १८३२)

नामाथिला १ [ नामप्रथित = नामाथिला ] Famous by name. गुणप्रथित = गुणाथिला. (२) [ नामान्वित + ल] (सत्त्वाथिला पहा)

नामी [ नाम्य = नामी ] स्तुत्य, नांव घेण्याजोगें.

नारिंग १ [ नरंग, नरांग = नारिंग (शिल्न)] नारिंग या फलशब्दाच्या साम्यानें किंवा उपमानानें नरांग चा नारिंग उच्चार झाला आहे. (२) [ नारंको योगसारो (वै) नारंगो योगिको मतः ॥ (केयदेव-पथ्यापथ्यविबोध) नारंक = नारिंग ] (भा. इ. १८३४)

नारू [ नहारु (पाली) + ण्हारू (जैनमहाराष्ट्री) = नारू (रोगविशेष) पालींत नहारू = स्नायु ] स्नायूच्या वेटाळ्यासारख्या ज्या कृमीचा आकार तो नारू. (भा. इ. १८३२)

नाला [ नालः = नाला ]

नावारूपाला येणें - "तो मनुष्य नावारूपाला आला" ह्या वाक्यांत नावारूपाला म्हणजे योग्यतेला असा अर्थ आहे. हा अर्थ नावारूपाला येणेंप्रमाणें आला. प्रशंसायां रूपं (४-२-६६) असें पाणिनीचें सूत्र आहे. सुबंत किंवा तिङन्त शब्दापुढें रूप हें पद लागून तो शब्द प्राशस्त्यार्थी होतो. जसें, पटरूपः म्हणजे प्रशस्तपणें पटु - चांगला

कर्तबगार. तसेंच, नाम ह्या शब्दाला रूप लागून नामरूप शब्द झाला. अर्थ चांगलें, प्रशस्त, स्तुत्य नांव ऊर्फ कीर्ति. नामरूप ह्याचें मराठी नावरूप. चतुर्थीचा ला प्रत्यय लागतांना नांव हा शब्द तसाच रहातो किंवा रूपशब्दाप्रमाणें आकार घेतो. नावरूपाला किंवा नावारूपाला. (भा. इ. १८३२)

नावेक १ [ अन्हायक (अकच्) नावक = नावेक ] नावेक म्हणजे लौकर. (भा. इ. १८३६) (२) [ नव्यकं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४९) हा शब्द जुन्या मराठी ग्रंथांत फार येतो. अन्हाय म्हणजे लौकर. (भा. इ. १८३६)

नासका [ नासकः = नासका. नस् कौटिल्ये] तो नासका माणूस आहे म्हणजे कुटिल, वक्र आहे. नासका कुचका असे शब्द मुली उच्चारितात.

नासा [ स्नासा ] *(धातुकोश - नसनस पहा)*

नासिका [ स्नासिका ] *(धातुकोश - नसनस पहा)*

नाहक १ [ अनागस् = अनाकह = नाहक (निरपराधी) ]

त्यानें त्याला नाहक मारिलें = तेन सः अनागास् मारितः ।

क व ह याचा विपर्यय. फारसी नाहक्क शब्द निराळा. (भा. इ. १८३४) (२) [ अनाहतकः = ( अ लोप) नाहअक = नाहक ] अनाहतोऽपि विदीर्णहृदयः = नाहक दुःखी.

नाहि [ ननु हि = नाहि ] नाहि, असें पहा, ह्या वाक्यांत नाहि हें अव्यय संशय किंवा प्रश्न किंवा अवधारणा दाखवितें.

नाही १ [ नभ् ] (धातुकोश - नह पहा) (२) [ नहि = नाही ]

मी गेलों नाहीं = अहं नहि गतः अस्मि

मी जाणार नाही = अहं नहि गंतास्मि

तो जाणार नाही = सः नहि गंता

ते जाणार नाही = ते नहि गंतारः

मराठींत ते जाणार नाहीत, असें हि म्हणतात. परंतु, तें एका प्रकारें अशुद्ध आहे. तात्पर्य, नाही हें अव्यय आहे. (भा. इ. १८३६) (३) *[नव्हे पहा]*

नाळ १ [ नाल = नाळ ] (२) [ (नाभि) नाडी = नाली = नाळी = नाळ ]

नाळगुद [ नालगदः = नाळगुद ] (भा. इ. १८३४)

नि १ [ *न पहा* ] (२) [ (वैदिक) न्वै = नि - नी ] Indeed, verily मी आलों नि or नी I have come indeed.

निक (का - की - कें) १ निष्क (मापणें, वजन करणें) = निख्क = निक्क = नीक = निक (का - की - कें) नीकें, निकें म्हणजे बराबर वजन केलेलें, कांटेतोल, ठरीव मापलेलें, खरें. (भा. इ. १८३३) (२) [ निकामम् = निकावं = निकें ] निकामम् = इच्छेप्रमाणें, यथेष्ट, पुष्कळ. निक = निक्क = नक्की. (भा. इ. १८३४)

निंकर १ [ निग्रह = निघर = निकर ] (२) [ नैकर्य = निकर ] निकर म्ह. आग्रह. (३) [ निकार (इजा, प्रतिबंध, दुष्टपणा) = निकर ] निकराचें बोलणें, निकराची लढाई, म्हणजे अत्यन्त दुष्टपणाचें व प्रतिबंधाचें व अडवणुकीचें बोलणें इ. इ. (४) [ निकरः, निकारः = निकर, निकार ] निकार म्हणजे पराकाष्ठेची मानहानि. (भा. इ. १८३६)

निकाढा [ निष्क्वाथः = निकाढा ]
निकाम्या [ अकर्मिक = नकर्मिक = निकाम्या. नकारार्थी नि ] (भा. इ. १८३२)
निकार [ *निकर ४ पहा* ]
निकें १ [ न्यक्षं = निकें. न्यक्षं कात्स्र्त्यनिकृष्टयोः (अमर) ] (२) [ निष्क् to measure निष्कं = निकें, निक्की = नक्की ]
निक्षून १ [ निर् + चि ५ चयने ] *(धातुकोश - निक्ष पहा)* (२) [ निक्ष् भोसकणें. निक्षित्वा = निक्षून ] निक्षून सांगणें म्हणजे सुरी भोसकतात त्याप्रमाणें मनांत बिंबेल असें सांगणें.
निखळ [ निष्कलं = निखळ ] अगदीं, निरुपाधिक.
निःखळ [ निष्कल indivisible = निःखळ] indivisible, entire.
निखिलें [ निशित + ल ] *(धातुकोश - निस ३ पहा)*
निगरट्ट १ [ निररघट्ट = निगरगट्ट. नकारार्थी नि. र बद्दल ग. ] (भा. इ. १८३२) (२) [ निगर्हगर्ड ] *(निगरघर्ड पहा)*
निगरघट्ट [ नि + गर्ह् to dopise गर्ह् + त = गर्ह्ड = घट्ट despised. निगर्हगर्ड्ड = निगरघट्ट, निगरगट्ट ] Impervious to shame, very shameless.
निगर्गट [ निर्ग्रंथिक ] *(निर्गट पहा)*
निगर्गट्ट [ निगर्हगर्हित । अत्यन्त निंद्य । ]
निगळता [ निर् + गल् १० स्रवणे ] *(धातुकोश - निगळ पहा)*
निंच १ [ न्यञ्च् = निंच ] Turned down. (२) [ अनुच्चं, नोच्चं = निंच ]
निचरा १ [ निःस्रावः, निस्रवः = निचरा. स्रु गतौ ] पुवाचा निचरा. (२) [ निःस्रावः ] *(धातुकोश - निचर ६ पहा)* (३) [ निःस्रावः = निचराअ = निचरा, णिचरा ] हा शब्द मराठींत णादि आहे. (भा. इ. १८३७)
निढळ [ निटिल = निढळ ] (स. मं.)
निढळाचा घाम [(सं.) निटाल = (प्रा.) निडाल = निढाळ ] मस्तकाचा घाम म्हणजे निढळाचा घाम. (स. मं.)
नितकोर [ न्यंङ्कृत्वा = निगकोर = नितकोर. न्यंच् = क्षुल्लक, बारीक, भिकार ] (भा. इ. १८३३)
निताव [ निस्ताप ] *(आवा ३ पहा)*
निदला [ नि + द्रा ] *(धातुकोश - निद २ पहा)*
निदान [ निदाने = निदानीं, निदान (क्रियाविशेषण) ] निदान म्ह. सरते शेवटी.
निदानीचें [ निदानं (शेवट) निदानीयं = निदानिज्जं = निदानीचें ] शेवटचें.
निदेला [ नि + द्रा ] *(धातुकोश - निदे पहा)*
निधड, निधडा [ निर्दटः (निर्दय, मदोन्मत्त) निधड, निधडा ]
निनावी [ निर्नामिक = निनाव्य ] (भा. इ. १८३२)
निपक [ निष्पक्वं = निपक ] निपक म्ह० फाजील पिकलेलें. (भा. इ. १८३५)
निपचित [ निःप्रचित्त = निपचित ] unconscious.
निपजे [ निपद्यते = निपज्जए = निपजे ] (भा. इ. १८३२)
निपट [ निःस्पष्ट = निप्पट = निपट ] अति स्पष्ट तें निपट (भा. इ. १८३४)
निपटनिरंजन [ निःस्पष्टनिरंजन = निपटनिरंजन ] (भा. इ. १८३४)

निपटून [ पत्र ११. निस् + पत्र. निष्पत्रं = निपट ] निपटून खातो म्हणजे अति खातो, शीत देखील ठेवीत नाहीं. (अष्टाध्यायी ५-४-६१) (धा. सा. श.)

निपुत्रिक [ अपुत्रक = नपुत्रक = निपुत्रिका. नकारार्थी नि ] (भा. इ. १८३२).

निंपुसक [ बायका असा उच्चार करतात. नकारार्थी नि ] (भा. इ. १८३२)

निपेटारा [ निस् + पिठ् to hurt, harm णिच्. निष्पेठयितृ harmless = निपेटारा ] harmless. उ. - आतां हे तेयां निपेटारे जाले । निवटि वहिला रणिं सांपडलें । घेइं यश रिपु जींतले । एकलेनि पैं ॥ ज्ञा. ११-४६५

निबर [ निर्भर = निब्मर = निब्बर = निबर - रा - रें ] (ग्रंथमाला)

निबाप्या [ अवप्तक = नवप्तृक = निबप्पक = निबाप्या. नकारार्थी नि ] (भा. इ. १८३२)

निबिड [ निविड (अप्रवेश्य) = निबिड ] निबिड अरण्य.

निंबोळ्या [ निंबगूलिका = निंबऊलिआ = निंबोळ्या ] (भा. इ. १८३२)

निब्बर [ निर्भट (कठिन) = निब्बर ] आंबा निब्बर आहे = आम्रः निर्भटः आभाति

निभाव [ वह् १ सहने. निर्वाहः = निब्बाअ = निभाव ] निभाव कसा लागेल म्ह० निर्वाह कसा लागेल? (धा. सा. श.)

निमाला [ नि + मा ] *(धातुकोश - निम ४ पहा)*

निमुळतें [ नम् १ प्रह्वत्वे. निम्नोन्नमत् = निमुळतें ] (धा. सा. श.)

निमूट १ [ भृ १ भरणे. निभृतं = निबूट = निमूट ] ती निमूट बसली म्हणजे एकाकी, कोण्हाशीं न बोलतां बसली. ती निमूट गेली म्हणजे एकाकी एकटी गेली. (धा. सा. श.) (२) [ निभृतम् secretly = निमूट. secretly भ = म. ऋ = ऊ (भण् = म्हण्) ] secretly. noiselessly, unperceived, hiddenly. (३) [ निभृतं = निभूट = निमूट. भ = म. भण् = म्हण]

नियत [ नियति = नियत, नेत ]

निरख [ निः + क्रय ] *(धातुकोश - निरख ३ पहा)*

निरखणें [ निरीक्षणं ] *(निरेखणें पहा)*

निरण [ निर्याणभाग = निराण = निरण ] अपांगदेशो निर्याणः

निरपणें [ निर्वपनं = निरपणें ] निरपणें म्ह० चाटून पुसून खाणें. (भा. इ. १८३४)

निरर्गट [ निर्ग्रंथिक, निर्ग्रंथ ] (निर्गट पहा)

निरवणें १ [ अय् १ गतौ. निर् + अय् (निरयति). निरयनं = निरवणें ] (धा सा. श.) (२) [ निर्वहणं = निरवणें] (भा. इ. १८३५) (३) [ वप् १ बीजसंताने. निर्वपनं (अर्पणं) = निरवणें ] (धा. सा. श.) (४) [ निर्वर्तनं = निरवअणँ = निरवणें] संसार निर्वर्त्य, संन्यास कुरु = संसार निरवून संन्यास कर. (भा. इ. १८३४)

निरवानिरव [ निर् + वप् ]

निरसें १ [ नीरसं (शुष्कं) = निरसें ] ज्यांती पाणी नाहीं तें. (२) [ नीरसं = निरसें (बेचव, बेस्वाद) ] रस म्हणजे स्वाद.

निरांजन १ [ नीराजनं = निरांजन. रा

वरील अनुस्वार आगंतुक ] (भा. इ. १८३४) (२) [ राज् प्रकाशित करणें. निर् + राज् = नीराज = निरांजन ] (धा. सा. श.)

निराळ [ अन्यतर = अन्यअर = न्यार. स्वार्थी ल प्रत्यय लागून, न्यार + ल = न्यारल = निराळ (ळा - ळी - ळें) ] (भा. इ. १८३३)

निराळा [ (निर्गतः आलेः) = निरालिः = निराळा. (निर्गतः आलयात्) = निरालयः = निराळा ]

निराळें [ (अन्यतरक + (स्वार्थे ल) = (अ लोप) न्यअरअळ = निराळ (ळा - ळी - ळें) ]

निरी [ नीवि = नीरी = निरी. व = र ] हा बदल अपूर्व आहे.

निरुत [ निरुक्त = निरुत्त = निरुत (स्पष्ट).

निः + ऋत = निरुत (खरें) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ५७)

निरुतें [ निरुक्तं (स्पष्टं) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ५७)

निरुंद [ निर्वृंद = निवुंद = नीरुंद = निरुंद] (भा. इ. १८३२)

निरेखणें [ ईक्ष् १ दर्शने. निरीक्षणं = निरेखणें, निरखणें ] (धा. सा. श.)

निरोप १ [ निर् + रु गतौ णिच् रोपय् to send = निरोप ] sending, dispatching. निरोप देणें म्हणजे जा म्हणून सांगणें. (२) [ निरोपः = निरोप ]

निर्गट [ निर्ग्रंथिक, निर्ग्रंथ (भिकारी, मूर्ख) = निर्गट, निरर्गट, निगर्गट.]

निर्गांठ [ निर्ग्रंथि = निर्गांठ = निर्गाठ. सुग्रंथि = सुगांठ = सुगाठ = सुर्गाठ (निर्गाठींतील रकाराच्या धर्तीवर) ] (ग्रंथमाला)

निर्ढावणें [ निरूढायते = निर्ढावतो. नीरूढ म्हणजे निःशेष रूढ ] निर्ढावणें म्हणजे अतिशय रूढ किंवा संवयीचा होणें. (धा. सा. श.)

निर्धास [ निर्ध्वस्त ] *(निर्धास्त पहा)*

निर्धास्त [ ध्वंस् १ नाशे. निर्ध्वस्त = निर्धास्त, निर्धास. ध्वस्ति = धास्ती. ध्वंस्तध्वंस्त = ढाचेंढुचें. ध्वंसनं = ढासण ] (धा. सा. श.)

निर्वानिरव १ [ वप् १ बीजसंताने. निर्वापानिर्वाप = निरवानिरव ] निर्वाप म्ह० देणें, अनिर्वाप म्हणजे न देणें. त्यानें निरवानिरव केली म्हणजे देणें न देणे याची व्यवस्था केली. (धा. सा. श.) (२) [ निर्वाह अनिर्वाह = निर्वाअनिर्वा = निर्वानिरव] (भा.इ. १८३५)

निर्वाळा [ निर् + वह् ] *(धातुकोश - निर्वाळ ३ पहा)*

निर्शन [ निर् + अश् = निरशनं = निर्शन. अश् ९ भोजने. ]

निऱ्हां [ नितराम् = निऱ्हां ] completely, अगदीं, निखालस.

निलाजिर [ णिल्लज्जिरं = निलाजिर (रा - री - रें), निलाजर नकारार्थी नि ] (भा. इ. १८३२)

निवडुंग [ स्नुहिदंडवृक्षः = निवडंडवृक्ष = निवडंग, निवडुंग ] दंड मधील डच्याबद्दल ग झालेला आहे. (भा. इ. १८३७)

निवणें १ [ निपानं (पेला) = निवाणें = निवणें ] पंतीचें निवणें म्हणजे पंतीच्या खालील पेल्यासारखें शेणाचें किंवा मातीचें बसकट. (२) [ वा. निर्वाणं = निवणें. निर्वा (क्रियापद) ] निवणें म्ह०

थंड होणें. (भा. इ. १८३६)

निवर्तणें [ वृत् १. निर्वर्तनं = निवर्तणें ] मरणें. (भा. इ. १८३६)

निववणें [ वप् १ बीजसंताने. निर्वापणं = निवावणें = निववणें ] डोळे निवव = चक्षुषी निर्वापय. (धा. सा. श.)

निवळ १ [ मल् ११. निर्मलनं = निवळणें. निर्मल = णिम्मल = निव्वळ, निवळ, निवळणें ] (धा. सा. श.)

(२) [ निर्मलं = निव्वळ = निवळ ] निर्मलं वारि = निव्वळ पाणी.

निवाड [ निर्वादक = निवाड (निवडणारा)] (ज्ञा. अ. ९ पृ. १८२)

निवाडा १ [ निर्णयपादः (फैसल्ला) = निवाडा ] Final Judgement.

(२) [ निर्वादः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३३)

निवांत [निवातं] (ज्ञा. अ. ९ पृ. २०)

निवेद १ [ (न्यदः) निध्यद = निवेद (अन्न)] (भा. इ. १८३४)

(२) [ नैवेद्य offering of food to God = निवेद ]

निव्वळ [ निर् + मल् ]

निशणा [ निकषनः = निहसणः = निसणा, निशणा ]

निशाण - दुंदुभि [ निःसाण = निशाण ] ज्ञानेश्वरींत निशाण शब्द येतो. त्याचा अर्थ नगारा, दुंदुभि. हा निशाण शब्द निःसाण शब्दाचा अपभ्रंश आहे. पताका या अर्थी फारशी निशान, निशाण म्हणून जो शब्द आहे त्याचा नगारा ह्या अर्थाच्या निशाण शब्दांशी कांहीं एक संबंध नाहीं. मराठी पोवाड्यांत "धाव घाला निशाणा" असें एक वाक्य येतें, येथें "नगाऱ्यावर टिपरू मारा" असा अर्थ विवक्षित आहे. (स. मं.)

निशिलें [ निशित + ल ] *(धातुकोश - निस ३ पहा)*

निष्क [ निष्क् १० परिमाणे, to weigh] (१) निष्क = (२) सुवर्ण (३) कर्ष (१६ मासे = माषाः) (४) कार्षापण = १६ मासे. (५) सुवर्ण कार्षापण = (६) रौप्य कार्षापण (७) टंक. (८) द्रम्म (द्रम् to go). (९) पण, पाण, पाणक (आणक). (१०) नाणक. (११) काकिणी. (१२) कपर्दिका. (१३) बदाम = २ दाम. (१४) गद्यान.

दक्षिणा चात्र देया वै निष्कत्रयसुवर्णकं (हरिवंशः अन्त्य अध्यायः ७ श्लोक)

निष्कत्रयसुवर्णक = तीन निष्क सुवर्ण. १५ विश्वा, विस्वा (विंशक) अठरा विश्वे दरिद्र. (अमरकोश - द्वि. कां. वैश्य वर्ग ८५-९० श्लोक).

रुप्याचें नाणें

५ गुंज = आद्यमाषक

१६ माष = कर्ष, अक्ष, (रुप्याचा) (तोळा).

४ कर्ष = पल

सोन्याचें नाणें

८० गुंजा = सुवर्ण, बिस्त (हेम्नोऽक्षे)

४ सुवर्ण = कुरुबिस्त, सुवर्णपल.

१०० सुवर्णपल = तुला.

२० तुला = भार

१० भार = अचित (शाकटो भारः)

रुप्याचें नाणें

कार्षापण, कार्षिक (रौप्य).

ताम्रिके कार्षिके = पणः

रूप्यं = मुद्रितं

रूप्यकः = रुपिया = रुपया

नाणक हा शब्द अमरांत नाहीं.

नामांकण = नावांवण = नाण
नाण = नाणावलेला, नांवाजलेला
नामार्चित = नावाजलेला.
नामांकनं = नावांअण = नाण (भा. इ. १८३२)
निश्चक्र (निःशेष) उपास म्हणजे पूर्ण पक्का उपास.
निश्णा [ निशाणः = निश्णा ] न्हाव्याचा वस्तारे पाजवण्याचा दगड.
निसट [ निसृष्ट = निसट ] *(ओसाड पहा)*
निसटणें १ [ निस्सृष्ट = निसट्ट = निसट] (ग्रंथमाला) (२) [ निसृष्ट = निसट्ट = निसट ] निसट + णें = निसटणें. निसृज् पासुन न निघतां, निस्टष्ट पासून निसटणें शब्द निघाला आहे. किंवा निसृज् यांतील ज चा ट होऊन त्यापासून हा शब्द निघाला आहे. (भा. इ. १८३६)
निसणा [ निश्राणः = निसणा ]
निसते (समयीं) [ निशीथे = निसीते = निसते ]
निसते समयीं म्हणजे निशीथ समये.
निजते हा ज मध्य शब्द निराळा.
निशीथ ह्या शब्दांत शी शयन करणें हा धातू आहे. निशीथ म्हणजे शयन करण्याचा वेळ. (भा. इ. १८३४)
निसरडें १ [ निषद्वरं = निसरडें (चिखल)] निसरड्यावर चालूं नको म्हणजे पातळ चिखलावर चालूं नको.
(२) [ निःसरत् = निसरड (डा - डी - डें) ] (भा. इ. १८३२)
निसुक [ निःस्वक = निसुक ] दरिद्री. (भा. इ. १८३४)
निसूर १ [ नि + शूर (शूर स्तंभने, वेड्यासारखें स्तब्ध होणें, to be senseless) = निसूर ] senseless, idle. (२) [ निस् + स्मृ = निसूर] without memory, forgetfully.
निस्तोष [ निस्तुषं = निस्तोष ] ज्यांत तूस राहिलें नाहीं तें, लाक्षणिक निर्दोष.
तूस काढलेले तांदूळ ते निस्तुष.
निस्तोष म्हणजे व्यंग, उणेपणा नसलेलें.
निहाळणें [ नि + भाल् = निहाळ (णें.) न्याभाल् = न्याहाळ (णें) ] निहाळणें हा शब्द न्याहाळणें असा हि उच्चारितात. भल (भालयति, चुरादि), पहाणें, निरीक्षणें. (भा. इ. १८३२)
नी १ [ अन्यत् ] (न पहा) (२) [ न्यै] (नि २ पहा)
नीक (का - की - कें) [ लीक (कं - का - कः ) ] अलीक = खोटें. लीक = खरें.
इतकेंच कीं हा लीक शब्द ग्रांथिक संस्कृतांत नाहीं. ज्ञानेश्वरींतील उपयोगावरून असें दिसतें कीं, हा शब्द प्रांतिक भाषेंत प्रचलित होता. (ज्ञा. अ. ९ पृ. ६०)
नीचनवा [ नित्यनवः = निच्च = नीच ]
नीचनवा म्हणजे नित्यनवा हा शब्द मराठी काव्यांत येतो.
नीट १ [ स्निग्ध ] *(नीड पहा)* (२) [स्निह् स्नीढ kind = नीट kind] तो माझ्याशीं नीट आहे he is well desposed towards me.
नीड [ स्निग्ध = निढ्ढ = नीड = नीट ] नीट बोल = स्निग्धं वद. (भा. इ. १८३४)
(आड) नीड [ नि + अर्ध ]
नीत [ नीतिः = नीत ]
नीपरकापण [ निस् + परकत्वं = नीपरकापण ] the state of being without another.

उ. - नीपरीकापणी आपुलां ।
आकासाचा संचु वीराला ।
तो स्वयं असे पुढैला । कांहीं नाहीं की॥
२१५ ॥ अमृतानुभव जुनी पोथी.

नीम [ नेम (अर्धा) = नीम ] (भा. इ. १८३४)

नुगमणें [ अनुगमनं ] *(नुगमणें पहा)*

नुमगणें [ अनुगमनं = नुगमणें = नुमगणें] नुमगणें म्हणजे जाणणें. (भा. इ. १८३६)

ने आण [ नय आनय = ने आण ]

नेचा [ नेजक (तंबाखूचा धूर पाण्यानें धुवून ज्या पात्रांतून जातो तें पात्र) = नेचा ]

नेट १ [ नैष्ट्यं = नेट ] (२) [ (स्त्री) निष्ठा = नेट (पुं.) ] नेंट म्हणजे निश्चय. (३) [ नेत्रः = नेट ] (४) [ नेत्र = नेट्ट = नेट ] (भा. इ. १८३२)

नेटक (का - की - कें) [ नैष्ठिकं (निश्चित) = नेटिकें = नेटकें ] नेटकें म्हणजें निश्चित.

नेटकी [ नेचकी (सर्वांगसुंदर गाय) = नेटकी ] नेटकी नार म्हणजे सर्वांग सुंदर स्त्री.

नेटकें [ नेपथ्य + अकच् = नेटक (का - की - कें) ] well-attired. साडीचोळी नीटनेटकी नेस.

नेडें [ नीध्रं edge = नेडें (सुईचें) ]

नेत [ नियति ] *(नियत पहा)*

नेभळा [ निर्बलः = नेबळा = नेभळा. इ = ए, रेफामुळें ]

नेभळ (ळा - ळी - ळें) नाभिल = नेभळ. भि मधील इ ना कडे नेऊन ने ] नाभिल म्हणजे नाभि संबंधानें, फुटल्या बेंबीचा. नेभळें नेसूं नकोस म्हणजे नाभीच्या खालती नेसूं नकोस. हा मनुष्य नेभळा आहे म्हणजे (मूळार्थ) हा मनुष्य बेंबट्या आहे. बेंबट्या मनुष्य दिसावयाला ओंगळ व हास्यकारक दिसतो; सबब नेभळा म्हणजे भोळसर, हास्यकारक, ओंगळ इ. इ. इ. (भा. इ. १८३७)

नेम १ [ नेम (वेळ) = नेम ( वेळ) ] तो नेमाला आला म्हणजे वेळेला आला. (२) [ नेमिः वज्रः । (निघंटु ।) त्यानें नेम मारला, या वाक्यांत नेम हा शब्द हत्यार या अर्थी वापरलेला आहे.

नेमि = नेम. त्यानें नेम मारिला म्हणजे त्यानें हत्यार मारिलें. (भा. इ. १८३४)

नेमके [ नेम (कांहीं) कक = नेमका ] some few. (भा. इ. १८३४)

नेमकें १ [ नियमिकं = नेमकें (नि + यम्)] restrained, confined, limited. (२) [ निमितकं = नेमकें (नि + मे to measure) ] measured.

नेमाळी [ नवमल्लिका = नोमाली = नेमाळी] पुष्पलतिकाविशेष ] (ग्रंथमाला)

नेवाणें [ न्यग्भू (णिच्) to humiliate न्यग्भवनम् न्यग्भावनम् = नेवाणें ] humiliation

उ. - आहो रानिचेयां पालेखाइरां ।
नेवाणें करविलें लंकेश्वरा ।
एकला अर्जुनु परि अकरा ।
न जीणे क्षौणी ॥ ज्ञा. ११-२३

नेवाळ - ळी [ नैपाली = नेवाळी - ळ ] फुलझाड आहे.

नेवाळी [ नेपाली = नेवाळी ] वनस्पति.

नेस, नेसणें [ निवस् = निअस् = न्येस = नेस ] आभरणानि निवसति = वस्त्रें

नेसतो. (भा. इ. १८३३)

नेसणेंबिसणें [ वस् आच्छादने. निवास् = नेसणें. निवसनंविवसनं = नेसणेंबिसणें] (धा. सा. श.)

नोक [ अनूकं = नोक ] अनूकं तु कुले शीले (अमरे मेदिनी) नोक म्हणजे शील, स्वभाव. त्याचा नोक झोक पहा, म्हणजे शील स्वभाव पहा.

नोर [ नौ + आतर = नोवार = नोर. नौ + तार्यं = नोर ] fare.

नोवरा - री रें [ नववरक = नोवरअ = नोवरा - री - रें ] नुकतेंच लग्न झालेली व्यक्ति ] (स. मं.)

न्यह्य (सं) (Noon) [closing day = noon ] the advanced day.

न्यारें १ [ अन्यतर = अन्यअर = न्यारें - रें ] (भा. इ. १८३२)

(२) [ अन्यतर = (अ लोप) न्यअर = न्यारें ]

न्याहारी [ अह्नाहारी = न्हाआरी = न्याहारी.

अहन् = दिवस, अह्ना = दिवसां (त्रि) आहारी म्हणजे जेवण, अन्न घेणें, न्याहारी म्हणजे दिवसाचें जेवण.

न्हावगंड [ स्नापिकगंडः ] *(शेणगंड पहा)*

## प

पकपक आवाज करणें [ प्रकर्द. कर्द् १ कुत्सिते शब्दे ] (कडकड पहा)

पंकीं [ पंक्ति = पंक्कि = पंकीं किंवा पांकी] ही वस्तु कोणत्या पंकीं पडतें? असा प्रश्न मुलें खेळाच्या प्रश्नोत्तरांत करतात; त्यांतील पंकीं हा शब्द संस्कृत पंक्ति या शब्दापासून निघाला आहे. (भा. इ. १८३३)

पक्कड १ [ प्रस्कंदिः = पक्कड. स्कद्, स्कंद् to leap ] उडीचा प्रकार. (२) [ प्रस्कंदिका = पक्कड. स्कंद् ] (धा. सा. श.)

पक्कें [ पक्व = पक्क = पक्कं = पक्कें - क्का - क्की ] (ग्रंथमाला)

पंक्तिपठाण [ पंक्तिप्रष्ठः = पंक्तिपट्ठः = पंक्तिपठाण ] पटाण या शब्दाशीं काही एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३३)

पंक्ति बारगीर [ वारकीरः (a wife's brother) = बारगीर (पंक्तीला जेवणारा मेव्हणा) वारकीरः (a courser, horse) = बारगीर (घोडेस्वार) ]

पखवाज [ पक्षवाद = पक्खवाज = पखवाज. द चा ज ] (भा. इ. १८३३)

पखळण [ प्रक्षलन = पक्खलन = पखळण] (भा. इ. १८३२)

पंखा [ इख्, इंख् १ गतौ. प्रेंखा = पंखा. इख्, इंख् मागें पुढें हलवणें.] (धा. सा. श.)

पखाल [ प्राघारिका = पखाल ] मुतणारी मुलगी.

पग १ [ पद = पअ = पग ] (स. मं.) (२) [ प्रक्रम = पगवँ = पगअँ = पग. प्रकृति = पगइ ] पग म्हणजे पुढें पाऊल टाकण्याची जागा. (भा. इ. १८३६)

पगड [ प्रकृति ] *(पगडी २ पहा)*

पगडी १ [ प्रकृति = पगडी ] *(अठरा पगड जात पहा)* (२) [ प्रकृति = पगडि, पगड ] बारा पगड, अठरा पगड जात म्हणजे अठरा प्रकृतीचीं माणसें. पगड म्हणजे प्रकृति. प्रकृति ह्या शब्दाचा पगडि असा अपभ्रंश जैनमहाराष्ट्रींत

होतो. (भा. इ. १८३६)

**पघळणें** [ प्रगलनं ] (भा. इ. १८३६)

**पचका** [ प्रचक् भिवविणें. प्रचकः = पचका] पचका उडाला म्हणजे भेदरून गेला. *(धातुकोश - पचक ५ पहा)*

**पचखालणें** [ अक्ष् १ व्याप्तौ. प्रत्यक्षीकरणं = पचखालणें. अन्वक्ष् = नोख (अ लोप) ] (धा. सा. श.)

**पचणें** [ प्रत्ययनं = पच्चअणं = पचणें ] यत्प्रत्येष्यते तत्ब्रूहि = जें पचेल तें बोल. पचेल म्हणजे प्रत्ययास येईल. पच जिरणें या धातूहून हा पच प्रत्ययास येणें हा धातू निराळा. (भा. इ. १८३५)

**पचपचीत** [ पृषृ सेचने (द्विरुक्त) पृषत्पृषत् = पचपचीत ] पचपचीत म्ह० पाण्यानें पाणचट झालेला पदार्थ. *(धातुकोश - पचपच पहा)*

**पचंबा** [ प्र + समः (घोटाळा) ] पचंबा उडाला म्हणजे घोटाळा उडाला.

**पंचा** [ (फारसी) पंज = (मराठी) पंच. पंचह् = पंचा ] पांच हात लांब वस्त्र. (भा. इ. १८३३)

**पचाडा** [ प्रत्यादेशः = पच्चाडा, पचाडा (निंदा) ] (भा. इ. १८३४)

**पचापचा** [ प्सा प्सा (प्सा to eat, devour) = पचापचा, पसा पसा ] पसा पसा डाळ खातो devours डाळ. पचापचा थुंकतो. उपसणें = उप्सा. भात उपसतो to devours

**पच्चा १** [ भर्त्सा = पच्चा ] फजिती. to censure (२) [ प्रत्यूहः = पच्चा] प्रत्यूह म्हणजे विघ्न. पच्चा उडाला म्हणजे विघ्न झालें. (३) [ प्रत्ययः = पच्चअ = पच्चा ] त्याचा पच्चा झाला = तस्य प्रत्ययः जातः. स्त्रीलिंग पच्ची (प्रतीति). (भा. इ. १८३४)

**पच्ची** [ अपश्री = पश्शी = पच्ची ] सौंदर्यनाश. (भा. इ. १८३६)

**पच्या** [ अपच्यवः = पच्या discomfiture. अपजयः = पज्या, फज्या defeat, discomfiture ]

**पच्च्या** [ प्र + च्यु (प्रच्यावः) ] *(फजिती पहा)*

**पछाडणें** [ पश्चादयनं = पच्छाडअण = पछाडणें ] (भा. इ. १८३४)

**पंजा** [ फारसी ] (स. मं.)

**पंजाबी** [ पंचातपिन् = doing austerities under the five fires = पंजाबी] one thoroughly initiated in any art, science etc.

**पंजी** [ पांचि = पंजी ] (भा. इ. १८३५)

**पंजोळ** [ प्रार्यालय = पाज्जालअ = पंजोळ] (स. मं.)

**पज्या** [ अपजयः ] *(पच्या पहा)*

**पटकन्, पटकर, पटदिनि** [ *चटकर पहा*)

**पटकन्, झटकन्** [ पटिति झटिति = पटकन् झटकन् ]

**पटका १** [ पटकः a cotton cloth = पटका ] (२) [ पट्टकः = पटका ]

**पटकुर** [ पट्टकुल = पटकूर (दासोपंत) ] (भा. इ. १८३२)

**पटणें** [ प्रतिभानं = परिहाणँ = पडणँ = पटणें ] यत्ते प्रतिभाति तत्कुरुष्व = जें तुला पटेल तें कर. (भा. इ. १८३५)

**पटपट** [ पटुपटु (sharply, quickly) = पटपट (काम करणें) ]

**पटवणें** [ (पटु) पटयति = पटवतो ] सः तं पटयति (पटुं आचष्टे) = तो त्याला पटवतो म्हणजे कुशल आहे म्हणून दुसऱ्याची खात्री करतो. (भा. इ. १८३६)

पटवणें, पटविणें (गळेसरी, अनंत वगैरे)- पट विणणें, बांधणें. पटापनं = पटावणें = पटवणें. (भा.इ. १८३३)

पटवा [ पट्टवायक ] *(पटव्या पहा)*

पटवेगार [ पट्टवायकारः = पटवइगार = पटवेगार. पट्टिकावायकार = पटवेगार] रेशमाच्या पट्ट्या विणणारा. पटवणें = पट्टवायनं = पटावणें. पट्ट्या विणणें. (भा. इ. १८३३)

पटव्या [ पट्टवायक = पटवा, पटव्या ] रेशमी वस्त्र विणणारा.

पटाइत वाघ [ पट्टायत = पाटाइत = पटाइत ] एक पट्टा लांब असणारा. (ग्रंथमाला)

पटाईत [ पटीयस् = पटाईत. स् = त् ] पटाइत म्हणजे युक्तिवान् skillful.

पट्ट [ पट्ट हा शब्द प्राकृत आहे, संस्कृत नाहीं; प्राकृतांतून संस्कृतांत घेतलेला आहे. मूळ शब्द पत्र. त्याचें प्राकृत पट्ट. पत्र शब्द पुल्लिंगी किंवा नपुंसकलिंगी. पैकीं पुल्लिंग पट्ट या शब्दाच्या वांट्यास आलें. ]

ताम्रपत्र = ताम्रपट्ट. पत्रवर्धन = पट्टवर्धन. पत्राभिषेक = पट्टाभिषेक. पत्रराज्ञी = पट्टराणी. पत्र = पत्त = पात (एक प्राकृत रूप). पत्र = पट्ट (दुसरें प्राकृत रूप); पैकीं दुसरें रूप पुन्हा संस्कृतांत घेतलें गेलें. (भा. इ. १८३३)

पट्टा [ प्रत्यायः tax, revenue, toll = पट्टा] tax. पट्टा भरणें. to pay tax.

पट्पट् [ पट् शब्द करणें. द्विरुक्तीनें पटपट. बोलण्याप्रमाणें जलद ] (ग्रंथमाला)

पटार १ [ प्रस्तार (forest abounding in grass) = पठार ] (२) [ प्रस्थाहार = पट्ठाआर = पठार ] table - land प्रस्थे सानौ (क्षीरस्वामी - अमर - द्वितीयकांड - वनौषधिवर्ग - श्लोक ७९ टीका). पठार म्हणजे डोंगराच्या माथ्यावरील प्रदेश. (भा. इ. १८३४) (३) [ पृष्ठ ह्याचें प्राकृत व मराठी पाठ. विस्तीर्ण पाठ म्हणजे पाठार = पठर ] डोंगराची विस्तीर्ण पाठ म्हणजे डोंगरपठार. (स. मं.)

पठ्ठा [ स्था १ स्थाने. प्रतिष्ठापकः = पडिठ्ठावअ = पठ्ठा ] आमचा पठ्ठ्या = अस्मत्प्रतिष्ठापकः

पठ्ठ्या १ [ पटिष्टः (अतिशय पटु) = पठ्ठ्या ] (२) [ पष्टवाह् = पठ्ठ्या = पठ्ठ्या. षष्टवाह् (वैदिक) म्हणजे चार वर्षांचा बैल ] षष्टवाह् म्हणजे ओझें वाहून नेण्याला किंवा नांगर ओढण्याला योग्य असा चार वर्षांचा बैल. त्यावरून कामकर्त्या तरुण माणसाला लक्षणेनें पठ्ठ्या म्हणतात. (भा. इ. १८३५)

पडखाणें [ ईक्ष् १ दर्शने. प्रतीक्षा = पडिखा = पडखा ] प्रतीक्षस्व क्षणं = क्षणभर पडखा.

पडखा म्हणजे वाट पहा. पड आणि खा असे दोन शब्द नाहींत. पडखा असा एक शब्द आहे. पडखाणें हें सबंद क्रियापद आहे. प्रतीक्षणं = पडिखाणें = पडखाणें. (धा. सा. श.)

पडगें [ परिघः = पडिघ = पडगें ] परिघ म्हणजे खळें, कुंपण.

पडघम [ पटहं = पडघम. ं = म ] म. धा. १५

पडघा १ [ पतद्ग्रह = पंडघर = पडघा = पिकदाणी किंवा पिकदाणी सारखें लहान पात्र ] (स. मं.) (२) [ पलिघः = पडघा ]

पडघें [ परिग्राहः (enclosure) = पडघें ] enclosed ground near the house.

पडजीभ [ पतजिव्हा = पडजीभ ] (स. मं.)

पडतू [ प्रति हस्त substitute = पडतू ] substitute

पडदणी [ परिधानी = पडिदाणी= पडदाणी = पडदणी ] सोवळें नेसतांना बायका मध्यें एक आडवस्त्र घेतात तें. (भा. इ. १८३३, ३४)

पडदा १ [ पटान्तः = पटंतो = पडदा ] (२) [ परिधा = पडिधा = पडदा ] (भा. इ. १८३४)

पडदी [ परिधिः wall = पडदी ] wall.

पडलेलें [ पतितपतितं ] *(ओलेलें पहा)*

पडवळ १ [ पटोल = पडवळ ] (भा. इ. १८३७) (२) [ प्रतिबल = पडवळ]

पडसर [ पत्सर = पडसर ]

पडसें [ (पु.) प्रतिश्यायस्तुः पीनसः । प्रतिश्याय = पडिसाअ = पडसें ] (भा. इ. १८३४)

पडळ १ [ पटलं त्वंधता स्मृता ॥ (केयदेव - पथ्यापथ्यविबोध) ] डोळ्यावर पडळ आलें आहे म्हणजे अंधता आली आहे. (भा. इ. १८३४) (२) [ प्रदर = पडळ ] प्रदरः गर्तः (आचारमयूख)

पंडा, पंड्या [ प्रणिधिः (निगा राखणारा) = पंडा, पंड्या ] गंगेचा पंड्या म्हणजे गंगेवरची निगा राखणारा, गंगेवरचा परिचारक.

पडाव [ प्लवः = पडव = पडाव ] एक प्रकारचें तारूं.

पडिपाडु [ परि + पृ to fill up completely = परिपारः = पडिपाडु ] पूर्णता.

पडिभर [ परि + बर्हः परिबर्हः = पडिभर] अतिशय, आधिक्य.

पडियन्ता [ प्रीयमाणः = प्रीयन्तः = पढियंता ] favoured, loving, being loved.(ज्ञा. अ. ९)

पडिसाई [ प्रतिछाया = पडिसाई ] shadow.

पडू [ प्रतिभू (surety) = पडू (खेळांतला)]

पडेल [ पतयालु disposed so fall. = पडआल = पड्याल, पडेल ] तो पहिलवान पडेल आहे. कुस्तींत हार खातो त्याला पडेल, पड्याल म्हणतात. (भा. इ. १८३४)

पडोशी [ प्रत्यूषे = पडूसी = पडोषी, पडोशी ] (भा. इ. १८३४)

पड्या [ प्रतीपः = पडिआ = पड्या ] मित्रः प्रतीपः = पड्या स्नेही म्हणजे उलट जाणारा मित्र.

पड्याल [ पतयालुः ] *(पडेल पहा)* + खेडवळ भाषेंत पलीकडे अशा अर्थाचा पड्याल शब्द आहे, तो निराळा. (संयोजक)

पढतमूर्ख [ प्रति (नि) विष्ट = पडि (णि) इट्ट = पडि (णि) ट्ट = पडिट्ट = पडट्ट = पढत ] पढत हा शब्द प्रतिविष्ट किंवा प्रतिनिविष्ट शब्दापासुन निघालेला आहे. पठ धातूशीं कांहीं एक संबंध दिसत नाहीं. (भा. इ. १८३४)

पढिअ [ प्रिय = परिअ = पढिअ. प्रियः = पढिओ ]

पढियंता [ प्री संतुष्ट होणें. प्रीयमाण = परीयन्त = पढियन्त (ता - ती - तें) loving, loved.

पढियो [ प्रतिग्रहः = पडिओ = पडिहो = पढियो ] प्रतिग्रह म्हणजे प्रेम, मर्जी,

प्रथमा एकवचन. (ज्ञा. अ. ९ पृ. ९)

पढीक [ प्रधी + क very intelligent. = पढीक ] very intelligent naturally. पढीक वैद्य a medical practitioner who is very intelligent but not regularly educated in the profession.

पण [ पणः (प्रतिज्ञा) = पण ] पणबंधः = पण बांधणें.

पणजा [ आर्यक = अज्जअ = आजा. प्रार्यक = पज्जअ; पणतोंड शब्दांतील णच्या धर्तीवर = पणज्जअ पणाजा = पणजा ] (भा. इ. १८३३)

पणजा - जी - ज [ प्रार्य्यक ] *(पाणजा पहा)*

पणती [ पण्यस्त्री = पणती ] दिवटी, रांड.

पणतु - ती - त [ प्रणप्तृ = पणत्तु = पणतु - ती - त ] (स. मं.)

पणतोंड [ पणप्तृगंड पणत्तुअंड = पणातोंड = पणतोंड] (भा. इ. १८३३)

पणा, पण [प्रणय = पणअ = पण, पणा] ती आपल्या पणांत आली = सा प्रणये प्रविष्टा.)

पत [ प्रत्ययः (वचन Credit) = पत = प्रतीति ] प्राणदपि प्रत्यतो रक्षितव्यः (कौटिल्य)

पतंग [ पत्रांग = पतंग (रक्तचंदन) ] वृक्षविशेष. (भा. इ. १८३७)

पंती [ पणस्त्री harlot = पंती ] ही पंती दिवे लावणार. this harlot will make a mess.

पत्तन [ पत्तन हा शब्द संस्कृत नाहीं. प्राकृत आहे. प्रस्थान ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश पट्टण व त्याचा अपभ्रंश पत्तन असावा. पट्टण व पत्तन हे दोन्ही अपभ्रष्ट प्राकृत शब्द पुढें संस्कृतांत जसेच्या तसे घेतले गेले, असें दिसतें. ] (भा. इ. १८३२)

पत्ती [ पक्तिः = पत्ती ] पत्तीचीं पानें म्हणजे विड्याचीं चांगली पक्कीं पिकविलेलीं पानें.

पत्नी - येथें नी हा स्त्रीलिंगी प्रत्यय लागला आहे. इंद्र ह्याचें स्त्रीलिंग इंद्राणी. येथें नी प्रत्यय आहे. तो च नी प्रत्यय पति या शब्दाला लागून पतिनी असे पूर्ववैदिक रूप होत होतें. ह्या पतिनी शब्दाचा वैदिक अपभ्रंश पत्नी. इंद्रभर्व. इत्यादि सूत्राच्या पुढें पाणिनीनें पत्नी हा शब्द साधण्यास, खरें म्हटलें असतां, एक सूत्र द्यावयाचें होतें व तेथें असें सांगावयाचें होतें कीं, पति ह्या शब्दाला नी हा स्त्रीप्रत्यय लागतांना त्याच्या टि चा लोप होतो. (भा. इ. १८३४)

पत्राज, पत्राजा [ प्रत्रसा = पत्रझा = पत्राजा = पत्राज ] पत्राज म्हणजे भय. (भा. इ. १८३४)

पथक [ पत्तीनां समूहः पत्तं । पत्तमेव पत्तकं. पत्तकं = पथक ] पथक म्हणजे पाइकांचा समूह.

पथारी [ प्रस्तारी ] *(धातुकोश - पथार पहा)*

पदर [ प्रदर (प्रदृ म्हणजे प्रकर्षानें फुटणें) = पदर ] मुलीला पदर आला म्हणजे प्रदर आला म्हणजे रजःस्राव झाला. (भा. इ. १८३६)

पदोपदीं [ पदे पदे = पदोपदीं ]

पंधरवडा [ पंचादशावर्त (क) = पन्हरावडअ = पंधरावडा = पंधरवडा. पंधराव्या दिवशीं ज्या कालमानांत त्याच दिवसाची आवृत्ति होते तो पंधरावडा. अशिष्ट लोक पंधरवडा असा उच्चार करतात. (भा. इ.

१८३३)

**पंधरा** [ पंचापरदशन् ] *(अकरा २ पहा)*

**पंनास** [ पंचाशत् ] *(विंशति पहा)*

**पन्हाळ १** [ प्रनाळ = पन्हळ ] (भा. इ. १८३७) (२) [ प्रणालः = पन्हळ] (३) [ प्रनालः ] *(पन्हाळ पहा)*

**पन्हा (कापडाचा)** [ परिणाह = पनाह = पन्हा (रुंदी) ] (भा. इ. १८३३)

**पन्हळ** [ प्रनालः = पन्हाळ, पन्हळ ]

**पन्हें** [ पानकं = पानें = पन्हें ] पानकं मूत्रलं हृद्यं (शार्ङ्धर संहिता) (भा. इ. १८३४)

**पन्हेरी** [पानीयनालिः = पन्हेरी ] पाणी काढून दिलेली मोरी. प्रणालिः = पन्हळ; प्रणालिका = पन्हळी.

**पर** [ अय् १ गतौ. परि + अय्. पर्यायः किंवा परीतिः = पर, परी ] ही पर आम्हांस मान्य नाहीं म्हणजे हा पर्याय मान्य नाहीं. (धा. सा. श.)

**परकर** [ परिकरः = परकर. परिकर (सन्नाह) ] पूर्वी पुरुषांच्या सन्नाहाला परिकर म्हणत.

**परका भाव** [ पृथक् भावः = परका भाव]

**परकें** [ पारक्यं = परकें ]

**परगणा** [ प्रघणः (part of a house, country) = परगणा (पाणिनि ३-३-७९). प्रघाणः = परगाणा ] पंढरपूर, परगाणा, असा पाठ गांवढे म्हणतात.

**परचक्र** [ प्रचक्रं = परचक्र ] प्रचक्र म्हणजे स्वारी वर निघालेलें सैन्य. शत्रूचें सैन्य ह्या अर्थाचा (पर + चक्र) परचक्र शब्द निराळा. स्वारीवर निघालेल्या स्वकीय सैन्याला हि परचक्र म्हणत.

**परज** [ परंज (तेलाचा घाणा, चरक) = परज ] परजांत टाकणें म्हणजे चरकांत घालणें, तुरुंगांत घालणें.

**परजळणें** [ परिजल्पनं = परजळणें, परचळणें ] (भा. इ. १८३४)

**परटी** [ परिमृष्टि = परिटी = परटी ] परिटाचें कर्म. (भा. इ. १८३५)

**परडी - डें** [ प्रधिः the periphery of a wheel = परडी -डें ] hence ground round about a house.

**परडें १** [ परिधिः a fence, ground within a fence = परडें ] (२) [ परिधि = परिडि = परडा, परडें, ] घरामागील कुंपण घातलेलें परसूं, जमीन. (भा. इ. १८३६)

**परत** [ प्रत्यक् = परत ] प्रत्यगानयत् = परत आणिलें. प्रत्यक् म्हणजे उलट. (२) [ Vaidik प्रत्तीत (प्रति + दत्त) given back =परत) प्रतीत्तं करोति = परत करतो ]

**परत उत्तर** [ प्रत्युत्तर = परत उत्तर ] (भा. इ. १८३४)

**परत जाणें** [ प्रतियानं = परत जाणें ] (भा. इ. १८३४)

**परतणें १** [ प्रति + ई = परत + णें = परतणें (अकर्मक) ] परतणें म्हणजे उलट निघून जाणें. तो परतला म्हणजे उलट फिरला. (भा. इ. १८३५) (२) [ प्रति + आयय् = परतणें (सकर्मक) ] परतणें म्हणजे उलट फिरविणें. भाकरी परतणें, भाजी परतणें म्हणजे भाकरी किंवा भाजी तव्यावर उलटसुलट फिरविणें. (भा. इ. १८३५) (३) [ प्रत्त = परत (परतणें) ] परतणें म्हणजे परत देणें. ही वस्तू परतून ये. (भा. इ. १८३६) (४) [ प्रती (प्रति + इ) = परतणें ] परतणें म्हणजे उलट येणें. तो परतला म्हणजे उलटा आला. (भा. इ.

१८३६) (५) [ प्रत्ययनं = परतअण = परतणें] (भा. इ. १८३४) (६) [ वृत्त १. परावृत्तं = परातलें, परतलें, परातणें (अशिष्ट) ] (७) [ अय् १ गतौ. प्रति + अय् (प्रत्ययते) प्रत्ययते = परततो ] (धा. सा. श.)

**परत भेट** [ प्रत्यभ्यटनं = परत भेट ] (भा. इ. १८३४)

**परता** [ प्रताम् (ग्लानौ निपातः) = परता] (भा. इ. १८३४)

**परभारा १** [ भृ १ भरणें. परं बिभर्ति इति परंभरः तस्य भावः पारंभर्यं - पारंभर्येण = परभारा ] परभारा म्हणजे दुसऱ्याकडून, परस्पर. (धा. सा. श.) (२) [ ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायांत परबाहिर शब्द आला आहे. तो परबहिः ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. परबहिः = परबहिर = परबाहिर = परभारा ] (स. मं.)

**परभारें** [ परिबर्हेण = परिभारें = परभारें] परिबर्ह म्हणजे परिवार, सेवकजन. परभारें काम होईल म्हणजे खुद्द मालकाकडून नव्हे, तर सेवकजनाकडून काम होईल म्हणजे परस्पर इतरांकडून काम होईल.

**परमा** [ ह्या रोगाचा उल्लेख कौशिक सूत्रांत २७।३२ त केला आहे. मुंचामि त्वेति ग्राम्ये पूतिशफरीभिरोदनम् । दारिलः, ग्राम्यो व्याधिः मिथुनसंयोगात् पितादुरिति प्रसिद्धाभिधानः। ] (भा. इ. १८३२) *(गर्मी पहा)*

**परमित** [ परिमित ] Moderate, measured.

**परमेसर** [परमेश्वर = परमेसर (अशिष्ट भाषा); पण ईश्वर = इस्वर = विस्वर]

**परवड १** [ प्रपत्ति = परबडी = परवडी = परवड ] (भा. इ. १८३२) (२) [ प्रवृत्तिः = परवडि = परवड ] सुखार्थाः सर्वाः प्रवृत्तयः = सुखाच्या सगळ्या परवडी. (भा. इ. १८३४)

**परवडणें** [ वर्ध् १ वृद्धौ. प्रवर्धनं = परवडणें ] परवडणें म्ह० सुखास सोईस पडणें. (धा. सा. श.)

**परवा १** [ परवासर ] *(आज पहा)* (२) [ परेद्यवि = परवा, परवां ] the other day, the day before yesterday, and day before today, the day after tomorrow. (३) [ परश्वः = परवां ] the day after tomorrow परवां ह्या शब्दाचे दोन अर्थ संस्कृतांतल्याप्रमाणेंच होतात. (४) [ परवत्ता (submissiveness to others) = परवआ, परवा ] (५) [ परुत् (मागलें वर्ष) = परवा ]

**परवां** [ परेद्यवि ]

**परवाचा १** [ परिव्राजः (सिद्धि, तयारी) = परवाचा ] परवाचा म्हणणें म्हणजे धड्याची सिद्धी दाखविणें. (२) [ प्रतिवाच् crying out to in answer to the master. = परवाचा] पंतोजीच्या उपदेशाप्रमाणें उलट उत्तर म्हणून तेच शब्द म्हणणें. (३) [ बादशाही फर्मानाचा जो संक्षेप त्याला तालीक म्हणतात; व तालिकेंत किंचित् फरक करून जें राजपत्र तयार करतात त्याला परवांचा म्हणतात. म्हणजे परवांचा या शब्दाचा अर्थ संक्षिप्त उजळणी असा आहे. त्यावरून, रोजच्या धड्यांची जी संध्याकाळीं तोंडी संक्षिप्त उजळणी

पंतोजी मुलांकडून करून घेतो तिला परवाचा म्हणतात. हा शब्द संस्कृतोद्भव नाही. ] (ग्रंथमाला)

परवाना [ परिवाहन (परवाणा {बौद्ध}) = परवाना ]

परव्हाण [ प्रवहन (carriage) = परव्हाण] carriage.

परसदार [ पार्श्वद्वारं = परसदार ]

परसा-कडे [ परिश्रय fence, enclosure = परस, परूस ] परसाकडे म्हणजे कुंपणा कडे. परसाकडे, परसाकडेस, परसाकुडे [ पुरीषाकुष्टि to void excrement, to expel faeces = परसाकुडे, परसाकडे (एकारान्त नाम स्त्रीलिंगी), परसाकडेस] taking off excrement. पुरीषाचुकुषिषा = desire to expel faeces. परसाकडे किंवा कडेस लागली. आ + कुष् to expel. परसाकुडे व परसाकडे असे दोन्ही उच्चार ऐकू येतात.

परसांकडे [ परसंकटं = परसांकडे ] वाघ पाहून परसांकडेस झालें म्हणजे परम संकट झालें. शौचाचा संबंध नाहीं.

परसूं १ [ परिसरकं = परसूं ]
उद्यानपरिसरकं = बागेचें परसूं
गृहपरिसरकं = घराचें परसूं
परसाकडे म्ह० परिसराच्या शेवटी.

(२) [ (पुं) परिसर = परिस = परसु (नपुं.) मला परसकडेच जावयाचें आहे म्हणजे घराच्या परिसरा कडे शौचार्थ जावयाचें आहे. परसाकडे हा शब्द मराठींत एकारान्त स्त्रीलिंगी नाम आहे. (भा. इ. १८३५)

पराणा [ प्राजनः = पराणा ] प्राजन म्हणजे चाबूक.

पराणी १ [ प्राजनी (टोचणी) = पराणी ] a goad. (२) [ प्रवयणी = पराणी (शस्त्रविशेष) ]

परातणें (१) [ ऋज्जि १ भर्जने. प्राज्र्जनं = परांजणें = परातणें ] परातणें म्हणजे तव्यावर भाजून काढणें. (धा. सा. श.) (२) [ परावृत्तं ] *(परतणें ६ पहा)*

परि [ परं अपि = परं मि = परं हि = परं इ = परिं = परि. ] (ज्ञा. अ. ९ पृ. २)

परिपाठ [ परिपाटि = परिपाट, परिपाठ ] पठ् ह्या धातूशीं कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३६)

परिमंद [ परिमंदः ] फार मंद.

परिवर १ [ परिग्रह house, abode = परिअर = परिवर ] house, abode. (२) [ परिवृत्ति (परिसर, कुंपणांतील सर्व जागा, लपण्याचें गुह्य स्थान) = परिवर. परि + वृ to conceal ] कुंपणाच्या आंतील जागा, कुंपण. उ. - दीप ठेविला परिवरीं, कवणातें नियमी ना निवारी lamp placed in a covered place does not direct nor caution anybody.माडगांवकर - ज्ञानदेवी - ९-१२८.

परिवाण [ परिवारण train, retinue = परिवाण ] retinue. उ० - पैं राॐ परिवाण नेणे । आज्ञा चि परचक्र जीणे। कां चंद्राचेनि परिपूर्णे । सिंधु भरती ॥ ज्ञा. १३-१३८

परी [ पर्यायः किंवा परीतिः ] *(पर पहा)*

परीट [ (परिभृज्) परिमृट् = परिड्ट् = परीट ] (भा. इ. १८३५)

परुस, परसाकडे [ परिसरः = परिसरओ = परसो = परस = परुस. शब्दयोगियुक्त = परसाकडे.

परिसर = घराभोवतालील जमीन.
परसाकडे = बहिर्दिशा.
परसाकडेस लागली, ह्या वाक्यांत परसाकडे हें मराठीत नाम बनलें आहे.
परसाकडे, परसाकडेहून, परसाकडेत, परसाकडेचा. (ग्रंथमाला)

**परेड** [ अट् १ गतौ. पर्यटिः = परेड ] Parade शीं कांहीं एक संबंध नाहीं. (धा. सा. श.)

**पर्या** [ परीवाह = परीआअ = पर्या ] परीवाह म्हणजे ओहोळ किंवा वहाळ. हा शब्द रत्नागिरीच्या बाजूस आढळतो. (भा. इ. १८३५)

**पऱ्हिव** [ परीवाह = पऱ्हिव, पर्या ] ओहोळ, मोरी.

**पलख** [ प्लक्ष = पलक्ख = पलख ] वृक्षनाम. (भा.इ. १८३३)

**पलंगपोस** [ पर्यंकस्पृश् = पलंगपोस ]

**पलाटण** [ अट् १ गतौ. पर्याटन = पलाटण] (धा. सा. श.)

**पलिता** १ [ प्रज्वलितः = पलित्ता = पलिता] जळणारी दिवटी. (भा. इ. १८३६) (२) [ प्रदीप्त = पलित्त (महाराष्ट्री) = पलिता = पळिता ]

**पल्ला** [ पल्यः = पल्ला ] पल्य a sack for corn (probably containing a certain measure, Vedic) पल्य हे वैदिककालीं माप होतें, व सध्यां हि महाराष्ट्रांत माप च आहे. महाराष्ट्रांतील पल्ल्यावरून वैदिक पल्ल्याचें मान कळून येण्यासारखें आहे. (भा. इ. १८३५)

**पवई** [ प्रपीति (cistern) = पवीइ = पवई व पोई ] सातान्यांत एका नाक्याला पवईचें नाकें म्हणतात. पूर्वी तेथें पाणपोई होती.

**पवनविजय** [ प्रमाण = पवँण. प्रमाणविजय = पवँणविजय = पवनविजय ] जुन्या मराठींत पवनविजय नामें ग्रंथ आहे. त्याचें मूळचें नांव पवँणविजय असें आहे. (भा. इ. १८३२)

**पवाडा** १ [ अपवादः = (अ लोप) पवाडा] पवाडा म्ह० निंदा. अपवाद म्हणजे निंदा.
ज्ञानेश्वरींत निंदार्थक पवाडा शब्द येतो. अनिंदार्थक पवाडा शब्द प्रवाद ह्या शब्दापासुन निघाला आहे. (भा. इ. १८३७) (२) [ प्रवादः = पवाडा] कीर्ति, प्रसिद्धि. (भा. इ. १८३६)

**पवारी** [ प्रवालवल्ली (विद्रुमलता) = पवारी] एक सुगंधि द्रव्य.

**पसरणी** १ [ प्रसारिणी = पसरणी ] वनस्पतिविशेष. (भा. इ. १८३४) (२) [ स्रु १ गतौ. प्रास्रवणिका = पसरणी ] (धा. सा. श.)

**पसरणें** १ [ अपसरणें = (अ लोप) पसरणें (अकर्मक) ] लोक पसरले म्हणजे जनाः अपासरन् परंतु लोकांनीं पाय पसरले = जनाः पादान् प्रासरन्. (भा. इ. १८३७) (२) [ प्रसरण = पसरणें] अंथरूण परसणें = आस्तरणप्रसरणं. (भा. इ. १८३५)

**पसा** [ प्रसरक = पसअअ = पसा ] (स. मं.)

**पसार** १ [ अपसारः ] *(धातुकोश - पसार १ पहा)* (२) [ सृ १ सरणे. अपसारः = पसार. प्रसारः = पसारा. सरसरं = सरसर = सरसरा = सरासरा ] (धा. सा. श.)

**पसार होणें** [ अपसारं भू = पसार होणें ] पसार होणें म्हणजे निघून जाणें. (भा. इ. १८३५)

पसारा [ प्रसारः = पसारा ]
पसीना [ प्रस्विन्नः = पसीना ] पसीना म्ह. घाम.
पहचणें [ प्रस्थानं = पहचणं = पहचणें = पोहोचणें ] ग्रामंप्रति प्रस्थाति = गावातें पोहोचतो. (भा. इ. १८३४)
पहणें, पाहणें, बघणें - दृश् असा एक धातु संस्कृतांत आहे. त्याचीं कांहीं रूपें पश्, पश्य ह्या लुप्त धातूपासून होतात. हा पश् धातु स्पश् to spy ह्याचेंच एक रूप आहे. पश् म्हणजे पाहाणें. श् चा ह् होऊन, पश् चें पह् बनलें. पचा ब व हचा घ होऊन, बघ् बनलें. पह व बघ अशीं ही दोन्ही रूपें पश् धातूपासून निघालीं आहेत. पह् पासून पाहणें असें अनिश्चितार्थी रूप जुन्या मराठींत करीत. पहचें पाह हें प्रयोजक रूप आहे. ह्या प्रयोजक रूपापासून पाहिजे हें रूप निघालें आहे. मी ती वस्तु पाहतों म्हणजे बघतों. मला ती वस्तु पाहिजे, म्हणजे मला ती वस्तु दाखवावी, दाखविली जावी. पाहिजे हें रूप पह् ह्या धातूचें causal passive आहे. पघ रूप अडाणी लोक योजतात व तें बघ इतकेंच शुद्ध आहे. (स.मं.)
पहा - धान्यदर्शं भक्षते = धान्यपहा खातो.
कन्यादर्शं वरयति = मुलगीपहा लग्न करतो.
पादुकादर्शं गृण्हाति = जोडापहा घालतो.
वस्त्रदर्शं क्रीणाति = वस्त्रपहा विकत घेतो.
वस्तुदर्शं चोरयति = वस्तुपहा चोरतो.
धान्यपहा हें णमुल् आहे.
पहाट - [ प्रातः + तट = पाअह् + अट = पाह् + अट = पाहट = पहाट ] प्रातःकाळच्या तीराजवळचा जो काळ तो पहाट. (स. मं.)
पहारा - [ प्रहर = पहरो = पहर = पहारा] दिवसांतील दर २॥ घटकेला बदलणारें संरक्षक सैनिकांचें काम. हा शब्द फारशी नाहीं. (स. मं.)
पहिले छूट (हिंदी) [ प्रथमस्यां सृष्टौ = पहिले छूट ] पहिले छूट म्हणजे कोणत्याहि कर्माची प्रथम निर्मिति करण्याच्या वेळेस.
पहिल्या विशींत - प्रथमे वयसि = पहिल्या विशींत (सप्तमी). विंशति या संख्यावाचक शब्दाचा येथें कांहींएक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)
पही [ पथिक = पही ] पंथानं गच्छतीति पथिकः,
पही (पाहुणा) [ पथिन् = पहि = पही ] (भा. इ. १८३४)
पळकट [ पलंकट = पळकट ]
पळकुटा [ भीरुस्तु भेलो हरिणहृदयः स्यात्पलंकटः (त्रिकांडशेष). पलंकट = पळंकट = पळकट = पळकुट = पळकुटा ] (ग्रंथमाला)
पळणें [ ली - द्रवीकरणे. प्रलयनं (प्रलयः) = पलणें ] नाश पावणें.
द्रव्य पळालें = द्रव्यं प्रलयितं.
धान्य पळालें = सस्यं प्रलयं गतं
सैन्य पळालें = सैन्यं प्रलयं गतं (नष्ट झालें)
दृष्टि पळाली = दृष्टिः प्रलयं गता. (धा. सा. श.)
पळपळीत [ पल straw = पळपळीत ] हलकें, बेचव.
पळवापळवी [ प्रलपना = अपलपनी = पळवापळवी ] (भा. इ. १८३६)

पळापळ [ पलायना = आपलायना = पळापळ ] (भा. इ. १८३६)
पळिता [ प्रदीप्त ] *(पलिता २ पहा.)*
पां [ त्वै = प्तइ = पैं, पां (निपात) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ७)
पांई [ उपाय (Proximity, nearness) उपायीं = पायीं, पाई ] through proximity of, through contact of. विद्येपाई खर्चांत आलों.
पाउट [ पादपीठं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३६)
पाउटी [ प्रवृत्ति = practice पाउटी ] Practice.
उ. - पैं अभ्यासाची पाउटी । करुनि टाकिजे किरीटि ।
ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥
ज्ञा. १२-१२६
पाउंड [ प्रोत् + डी १ विहायसागतौ - डयनम् ] *(धातुकोश - पौंड पहा)*
पाउण [ पादोन = पाउन (जुन्नर शिलालेख) = पाऊण ] (ग्रंथमाला)
पाउल १ [ पाद + वली = पाउली = पाउल] (स. मं.) (२) [ पादतलं = पाउल ] (३) [ पाद + ल = पाअल = पाउल ] (ज्ञा. अ. ९ पृ. ८)
पाऊसबिऊस [ प्रावृष् विप्रुष् = पाऊसबिऊस विप्रुष् (थेंब) ] (भा. इ. १८३४)
पाकुळकी [ अपाकुलकता = ( अ लोप) पाकुळकी ] अपाकुल म्हणजे विकृत, विकारग्रस्त.
पाखटी [ पक्षति = पांखटी ] पाखटी म्हणजे पाखराच्या पांखांचें मूळ.
पाखर [ प्रक्षरिका, प्रखरिका armour to protect a horse, elephant = पाखर, पांखर ] armour. कृपेची पाखर armour in the shape of good will.
पाखरूं [ पक्षितर = पक्खिअर = पक्खिरुं = पाखिरुं (ज्ञानेश्वरी) = पाखरूं ] *(रूं पहा)*
पागल १ [ पागल (संस्कृत) = पागळ ] वेडा, व्यंग, दुबळा. (भा. इ. १८३२) (२) [ प्रग्लः exhausted = पागल ] exhausted, weak.
पागळी [ प्रागलिका ] *(धातुकोश - पघळ २ पहा)*
पाग्या १ [ प्राग्र्यः (मुख्य, पुढारी) = पाग्या. घरचा पाग्या, बाहेरचा गांड्या. (२) [ प्राग्र्यः foremost, chief = पाग्या ] chief. बायकोचा पाग्या chief with his wife. बाहेरचा माग्या. mudmost outside.
पांघरणें, पांघरूण [ प्रघृण्ण् = पाघरण = पांघरणें. घृण्ण् धरणें घेणें ] (भा. इ. १८३३)
पाघळ [ प्राघारः, प्राघाराः ] *(धातुकोश - पाघळ २ पहा)*
पाच [ स्पृच् = पाच (वनस्पति) ]
पाचकळ [ स्खल् १ खनने. प्रस्खल = पाचकळ ] (धा. सा. श.)
पाचर [ प्राचर, प्रचर = पाचर ]
पाची, आठी, दाही - येथें ई हा प्रत्यय जोर दाखवितो. (ग्रंथमाला)
पाचुंदा १ [ पंचपदा ] *(दुवड पहा)* (२) [ पंचतयः = पांचुंदा ] पांच पेंढ्यांचा समुदाय.
पाजणें [ आप्यायनं = पाजणँ (आ लोप) = पाजणें ] आप्यायन म्हणजे संतुष्ट करणें. पितरांना पाणी पाजणें म्ह० उदकानें संतुष्ट करणें. (भा. इ. १८३६)
पांजरपोळ [ पंजरप्रतोलः = पांजरपोळ ]

पंजरं पशुपक्ष्यादि बंधनगृहं व प्रतोलः मार्गः रत्था.

**पाजी १** [ पाय्यः पाजी (तिन्ही लिंगी य अक्षरामुळें) ] पाय्य म्हणजे निंद्य किंवा नीच, हलकट. (२) [ पज्जः = पाजा = पाजी ] पज्जः म्हणजे शूद्र. तूं पाजी आहेस म्हणजे तूं शूद्र आहेस. प्राचीनकाळीं ब्राह्मणाला शूद्र म्हणणें अपशब्द समजत. (भा. इ. १८३७)

**पाटा** [ पाटक = पाटा ] पाटक म्हणजे वांटावयाचा दगड. (भा. इ. १८३५)

**पाटाउ** [ प्रत्यायः toll, tax = पाटाउ ] toll, tax.

उ. - कैवल्य कनंकाचेया दाना । नकडसी थोरुसाना ।
द्रष्टे याचे या दर्सना । पाटाउ जो॥
ज्ञानेश्वर अमृतानुभव ६९ - जुनी पोथी.

**पाटीवर बसणें** [ पाटी (Arithmetic) पाटीवर बसणें म्हणजे अंकगणिताला प्रारंभ करणें. ]

**पाठ** [ पृष्ठ = पाठ ]

**पाठचा १** [ शी २ स्वप्ने. पृष्ठशयः = पाठचा. पृष्ठशयः भ्राता = पाठचा भाऊ. (श = स = च) ] (धा. सा. श.) (२) [ प्रातस्त्य = पाटच = पाठच ( चा - ची - चें) पाठचा (सूर्य), पाठचें (ऊन) ] पाठचें ऊन्ह म्हणजे सकाळचें ऊन; पाठीवरचें ऊन नव्हे. (भा. इ. १८३४)

**पाठनिपाठ** [ पाठः निपाठः = पाठनिपाठ ] पुस्तक पाठनिपाठ केलें = पुस्तकं पाठनिपाठं कृतं.

**पाटराखी, पाटराखणी** [ प्रतीहार रक्षी (a female doorkeeper) = पाठराखी. प्रतीहाररक्षण = पाठराखण ]

**पाठलाग** [ लग् १ सङ्गे, गतौ. पृष्ठलागः = पाठलाग ] (धा. सा.श.)

**पाठवणें** [ पाथयति (पच् णिच्) = पाठवणें (धाडणें) ] (भा. इ. १८३६)

**पाठस (सा-सी-सें)** [ पृष्टशय = पाठस (सा-सी-सें) ] (भा. इ. १८३४)

**पाठाड - ण** [ पृष्ठ + अस्थि = पाठ + हाड = पाठाड = पाठाण ] (स.मं.)

**पाठार** [ *पठार ३ पहा)*

**पाठि** [ प्रस्थिति march = पाठि ] march, progress.

उ. - म्हणौनि यया वाखाणा ।
पाठि सेइली चौगुणा ।
ना म्हणों न येंसि देखणा ।
होंसि ज्ञानी ॥ ज्ञा. १३-६४४

**पाठिंबा** [ पृष्ठिस्तंभः = पाठिंबा ] पृष्ठिस्तंभ म्हणजे पाठीमागचा खांब.

**पाड १** [ पारः ability = पाड ] सामर्थ्य. त्याचा पाड किती? What is his powers? (२) [ प्र + अट्ट अतिक्रमणे to exceed. प्राट्टः = पाड] excelling, overriding. तूझेनि पाडें. overbearing thee disparating thee. (३) [ प्र + अड्ड to meditate. प्राड्डः thought, meditation = पाड ] thought. द्रोणाचा पाडु न करी Don't think of द्रोण.

**पाडणें** [ पट् १० ग्रंथे. पाटनं = पाडणें ] काकडीच्या फाकी पाडणें, लाकडाच्या फळ्या पाडणें म्हणजे कापणें.

पत् पासून निघालेल्या पड धातूंचे प्रयोजक रूप पाडणें होतें तें निराळें. (धा. सा. श.)

**पाडा १** [ पद्रक = पड्डअ = पाडा (लहान गांव) ] गुजराथेंत व कोंकणात क्षुद्र

गांवांना पाडा म्हणतात. जांबुळपाडा वगैरे. (भा. इ. १८३३) (२) [ पाटक = पाडअ = पाडा ] पाटक म्हणजे गांवाचा एक लहान भाग.

कोणत्या हि गांवा खालचा किंचित् दूर असलेला जो लहानगा पांचदहा घरांचा समूह त्याला पाडा म्हणतात. (भा. इ. १८३५) (३) [ पटकः half a village = पाडा ] a hamlet.

**पाडा-डे** [ पाटी, पाटः (अंकगणित). पाटः = पाडा-डे (अंकगणित) ] (भा. इ. १८३२)

**पाडाव १** [ प्रत्यवाय reverse = पाडाव ] reverse, defeat. (२) [ प्र + दम् णिच्ः प्रदाम्, प्रदान् = पाडाव ] one who is subdued in a battle, one who is a prisoner of war.

**पाडु** [ पारः (पारय् सामर्थ्ये) ] (ज्ञा. अ. ९ पृ. २०)

**पाडून १** [ प्राध्वंकृत्य = पाडून ] प्राध्वंकृत्य बंधनेन अनुकूलं कृत्वा। प्राध्वं बंधने (१-४-७८)

पाडून मागणें म्हणजे वचनानें बांधून खरेदी करणें. (२) [ अह् शब्दे पूर्ववैदिक धातु. प्रत्यह्य = पाडून ] उ. - घालून पाडून बोलणें. (धा. सा. श.)

**पांढरपेशा** [ पांडुरः + पेशः यस्य = पांडुरपेषः = पांडुरपेशः = पांढरपेशा ] पांडुर म्हणजे श्वेत व पेश म्हणजे रूप. पांढरपेशा म्हणजे ज्याचा वर्ण श्वेत गोरा आहे तो ब्राह्मणादि.

**पांढरेंफेक** [ पांडुरश्वेतं = पांढरेंफेक ] (भा. इ. १८३४)

**पांढरें शुभ्र** [ पांडुरं शुभ्रं = पांढरें शुभ्र ] (भा. इ. १८३४)

**पांढरें सफेत** [ पांडुरश्वेतं = पांढरें सफेत ] (भा. इ. १८३४)

**पाणक्या** [ पानीयकक = पाणकअ = पाणका = पाणक्या ] (ग्रंथमाला)

**पाणचेट** [ पाणचेट हा शब्द पण्यचेट या संस्कृत शब्दापासून निघाला आहे. पण्य म्हणजे विकावयाला काढलेला; आणि चेट म्हणजे दास, गुलाम. पण्यचेट = पानचेट किंवा पाणचेट; येथें ण्य चा न किंवा ण होतो. पाणचेटबद्दल पानचट असा हि उच्चार ऐकूं येतो. परंतु, पानचट म्हणजे पाण्याच्या चवीसारखें असा अर्थ आहे. चवट म्हणजे चवीचा. पाण्याच्या चवीचा जो पदार्थ तो पानचट पदार्थ. (भा. इ. १८३३)

**पाणजा** [ प्रार्य्यक = प्राज्जअ = पाजअ = पाजा = (पणतु शब्दाच्या संसर्गानें) पाणजा, पणजा-जी-ज ] (स. मं.)

**पाणथळ** [ पानीयस्थलं = पाणथळ ]

**पाणंद १** [ पाणिंधमः (मार्गः) = पाणंद ] पाणिंधम म्हणजे अंधेरा मार्ग. पाणंद म्हणजे दोन शेतांमधील अंधेरा मार्ग. (२) [ पाणिंधम (रत्थ्या) = पाणंद ] पाणिंधम म्हणजे असा अंधुक रस्ता कीं ज्याच्यांतुन हातानें वेली एकीकडे सारून वाट काढावी लागत्ये.

**पाणसळ १** [ पर्णशाला = पाणसळ ] (२) [ पानीयशलाका = पाणसळ ]

**पाणसळ** [ पानीयशलाका = पाणसळ ]

**पाणसाळ** [ पानीयशाला = पाणसाळ ]

**पाणारी** [ पानीयहारिकः = पाणारी ]

**पाणी १** [ पू ९ शोधने. पावनीयं = पाणी] तरवारीला पाणी देणें म्हणजे घासून शुद्ध करणें. (धा. सा. श.) (२) [ प्राणित्त animation (प्र + अन् animate) = पाणी ] त्याच्या आंगांत पाणी आहे he has ardour or ani-

mation in him.

पाणेरें [ पानीयगृहं = पाणेरें ]

पातडी [ पाटलिका = पातडिआ = पातडी] पिशवी. (भा. इ. १८३४)

पातवडी [ पत्रवाटिका = पातवडी ] पक्वान्न.

पातळ १ [ प्रतल = पातळ ] (भा. इ. १८३५) (२) [ पत्रल = पत्तल = पातळ ] पाना इतकें जाड म्हणजें पातळ. (भा. इ. १८३६) (३) [ प्रतनु = पतलु = पातलु = पातळ ] (भा. इ. १८३६)

पातळी [ प्रतलिम = पातळी ] superticies. (भा. इ. १८३५)

पाताळूं [ पत्रालु = पाताळूं ] एक प्रकारचें अळूं (भा. इ. १८३६)

पातें [ पत्रं = पत्तं = पातं = पातें ] (स. मं.)

पातेजणें [ अय् १ गतौ. प्रत्ययनं = पातजणें ] (धा. सा. श.)

पातेली [ पातिली = पातेली ] हा शब्द Monier Williams देतो परंतु प्राकृत दिसतो Williams यानें तें नीट संस्कृत आहे किंवा नाहीं तें तपासलेलें नाहीं. (भा. इ. १८३५)

पात्यवणें [ अय् १ गतौ. प्रत्ययनं = पात्यवणें ] (धा. सा. श.)

पात्र [ पत्रं (नौः) = पात्र ] पात्र म्ह. होडी.

पाथरवट [ प्रस्तरकुट्ट = पाथरवुट = पाथरवट = पाथरट ] (भा. इ. १८३२)

पाद, पादणें [ पर्द् कुत्सिते शब्दे । गुदरवे इत्यर्थः । तिङन्ते भ्वादयः । पर्द = पाद (पादणें, पाद) ] गुदं पर्दते = गांड पादते. (भा. इ. १८३२)

पादरपुचका [ पर्दपृश्निकः = पादरपुचका ] पर्दः म्हणजे पादरा, पादणारा; आणि पृश्निकः म्हणजे दुर्बल. पादरपुचका म्हणजे पादरा आणि दुर्बळ.

पादरफुसका [ पर्द्, स्फुर्ज् १ कुत्सिते शब्दे. पर्दस्फुर्जकः = पादरफुसका ] स्फुर्जक म्हणजे मेघनाद करणारा. पादरफुसका म्हणजे पादून मोठा आवाज करणारा. [ धा. सा. श.]

पादेंलोण [ पर्दक (पर्द पादणें) + लवण = पद्दअलोण = पादलोण = पादेंलोण ] पादाच्या रूपानें नळांतील वात काढून लावणारें जें लवण तें पादेंलोण. (भा. इ. १८३३)

पाद्रा १ [ पर्दकः (पादणारा) = पाद्रा ] (२) [ प्रा + द्रु to fly away from: प्राद्रावक = पाद्रा ] पळकुटा. (३) [ पद्रक = पद्रा = पाद्रा ] *(स्थलनामकोश - भडोच पहा)*

पान १ [ उपाभरणं = उपाहरणँ = उपारणँ = उपरणें = पर्णे = पर्ण = पान ] सरदारांना पानें व लुगडीं दिलीं म्हणजे सरदारांना उपरणीं व वस्त्रें दिलीं (भा. इ. १८३३) (२) [ साप चावला म्हणजे पान लागलें असा प्रयोग महाराष्ट्रांत करितात. येथें पान म्हणजे साप असा अर्थ आहे, झाडाचें पत्र असा अर्थ नाहीं. साप हा अर्थ कसा आला तर असा :- (सं.) पन्नग = (महा.) पण्णअ = (जु. म.) पाण = (ना. म.) पान. (१) पुष्कळ शब्दांचीं लिंगें मराठींत बदलतात म्हणून व (२) पान (पत्र) ह्या मराठी शब्दाच्या लिंगाचें अनुकरण करून, पान (सर्प) हा शब्द मराठींत नपुंसकलिंगी बनला आहे. पान लागलें = साप (पायाला वगैरे) लागला ] (भा. इ. १८३२)

पानवेल [ पन्नगवल्ली [ (नागवल्ली) = पानवेल ]

पान्हा [ प्रस्नावः ] *(धातुकोश - पान्ह पहा)*

पापणी १ [ पक्ष्मणी (द्विवचन) = पक्कणी = पाकणी = पापणी (डोळ्याची) ] मराठींत पापणी एकवचनी आहे. अनेकवचन पापण्या. पक्ष्मणी क्ष्म = प = पापणी. आत्मन् त्म = प = आपण आत्म्यं त्म्य = प आपें. (ग्रंथमाला) (२) [ पक्ष्मिणी (द्विवचन) = पापणी ] (स. मं.)

पापरा [ पर्परिक = पापरिअ = पापऱ्या, पापरा. येन पीठेन पंगवः चरंति स पर्पः। पर्पेण चरति पर्पिकः । ] गाडींत बसून जो पांगळा भिक्षा मागतो तो. गाडींत बसून भिक्षा मागणाऱ्यांची ही परंपरा पाणिनीच्या वेळेपासून आहे ! (भा. इ. १८३४)

पापरा, पापरी [ पादप्रहारः = पापरा. पादप्रहारिका = पापरी ] लाथ.

पापा १ [ प्रपा = पपा = पापा ] प्रपा म्हणजे पाणपोई. मुलाच्या मुखाचें औत्कट्यानें चुंबन घेणें म्हणजे पापा घेणें. नंतर पापा म्हणजे मुका, असा अर्थ झाला. (२) [ पपा (पा to drink) = पापा ] Great drink. पापा देणें म्हणजे मुलाला पिण्यास मामू देणें.

पापिटल [ पापिष्ट = पापिट्ट = पापीट. पापीट + ल = पापिटल (ला-ली-लें) ] (भा. इ. १८३२)

पापुद्रा, पापोटा [ पल्पूलः ] *(पापोडा पहा)*

पापोडा [ पल्पूल १० लवने छेदने. पल्पूलः = पापोला = पापोडा, पापोटा, पापुद्रा, पापोद्रा, पोपडा ] पापोडा, पापुद्रा, पोपडा म्हणजे कापून काढलेलें सालपट. (धा. सा. श.)

पापोद्रा [ पल्पूलः ] *(पापोडा पहा)*

पाप्या १ [ पापक (contemptible) = पाप्या (पापाणके कुत्सितैः) ] पाप्याचा पितर = Father of a contemptible man worthless. (२) [ पापात्मा = पाप्या ]

पांबरी [ प्रावारी, प्रवरी ] *(पामरी पहा)*

पाभर [ प्राग्भार = पाभर ] पाभर म्ह० तीर.

पामरी १ [ प्रावारी, प्रवरी (पाणिनि ३-३-५४) = पामरी, पांबरी ] पांघरावयाचें रेशमी वस्त्र. (२) [ प्रावारी = पामारी = पामरी ] पांघरावयाच्या उपरण्यादाखल लहान पीतांबरास पामरी म्हणतात. किंवा पीतांबरी = पिआंमरी = पामरी (लहान पीतांबर).

पाय १ [ पाद = पाअ = पाय ] (स. मं.) (२) [ अपाय = पाय (इजा) ] रांडेच्या पायीं बुडाला, येथें पायीं म्हणजे अपायीं. (भा. इ. १८३६)

पायकडी [ पादकटिका anklet = पायकडी]

पायका [ पादिका temporary pillar for support वैजयंती = पायका, पावका ]

पायखाना [ पायुखनिः = पायखाना ]

पायखीळ [ पादकीलिका = पायखीळ ]

पायंडा [ पाददंडः = पायंडा ]

पायपोस १ [ पादपोषक = पायपोस ] Foot preserver. (२) [ पादस्पृश् = पायपोस ]

पायली [ पाय्या = पाय + (स्वार्थे) ली = पायली ] यौतवं द्रुवयं पाय्यं (अमर, द्वितीय कांड, वैश्यवर्ग ८५) पायली हें जोडीचें माप आहे.

पायवणी [ पादपानीयं = पायवणी ]

पाया पडतो [ पादयोः पतति = पाया पडतो] येथें पाया हें पाय ह्या शब्दाचें सप्तमींचे द्विवचन आहे.

पायाळू १ [ स्पृहयालुः = पायाळू ] one longing for wealth. पाय ह्या शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं. (२) [पाताल = पायाल = पायाळ = पायाळु = पायाळू ] ज्याला पाताळांतील वस्तू दिसतात तो. (स. मं.)

पायी [ उपाय ]

पार १ [ प्राय ] (२) [ प्रकरः (चव्हाटा) = पार ] चव्हाटा. (३) [ पार (अत्यन्त, पलीकडील तीर) = पार (सफ्फा) ] पार खाऊन टाकलें = संपेपर्यंत खाऊन टाकलें. इ. इ. इ. पार हें संस्कृतांत नाम आहे; मराठींत निपात आहे. (भा. इ. १८३३) (४) [ पर, परम = पार ] आंबा पार सारा खाल्ला = आम्रः परमसर्वः खादितः किंवा आम्र प्रायः सर्वः खादितः

पार हें अव्यय पर, परम पासून व प्रायस् पासून, अश्या दोन मूळांपासून निघालें आहे. (५) [ प्रायः = पार (अव्यय)] तो पार मरून गेला = स प्रायः मृतः. वाघ पार पळून गेला = व्याघ्रः प्रायः पलायितः पार म्हणजे बाहुल्यानें, फार करून.

पारखणें [ ईक्ष् १ दर्शने. परीक्षणं = पारखणें ] (धा. सा. श.)

पारठी १ [ परेष्टुका (पुष्कळदा व्यालेली गाय ) = पारठी ] (२) [ प्रष्टौही गर्भिणी गौः प्रष्टौही = पारठाइ = पारठी ] पाठी गाय म्हणजे गाभणी गाय. (भा. इ. १८३४)

पारडी [ पाड + तरी ] *(रुं पहा)*

पारडूं [ पाड + तर ] *(रुं पहा)*

पारडें [ पाड + तरी ] *(रुं पहा)*

पारणें [ प्रार्णं (chief debt) = पारणें ] कृष्णाला पाहून, डोळ्याचें पारणें फिटलें = Discharged the debt of the eyes.

पारध १ [ पराधिः = पारध ] (२) [ प्रार्थन = पारधन = पारध ] भा. इ. १८३२)

पारपाडणें [ परिपारणं = पारपाडणें ] एवं कुलपुत्रावलोकितश्वरो बोधिसत्वो महासत्वः सत्वान् धर्मं देशयति, परिपारयति, निर्वाणभूमिमुपदर्शयति । (कारंडव्यूह - अष्टमप्रकरणम्) (भा. इ. १८३४)

पारंबी १ [ प्रालंबिका = पालंबी = पारंबी] (२) [ प्रालंब = पालंब = पारंब = पारंबी ] (स. मं.) (३) [ प्रालंब (Pendent) प्रालंबिका = पारंबी ] Pendent roots of the banian tree.

पारसा [ परिश्रय = परिस्सअ = पारिसा = पारसा (पिंपळ) ] त्याखालीं बसण्यास योग्य असा पिंपळ.

पारोशाप्रहरीं [ प्रत्यूषप्रहरे = पारोशाप्रहरीं] प्रत्यूष म्हणजे सकाळ. पारोशाप्रहरीं म्हणजे अगदीं सकाळच्या वेळीं.

पारोस [ पर्युषितं = पर्उसिअ = पारुस = पारोस (सा-सी-सें) ] पारोसें म्हणजे शिळें. (भा. इ. १८३४)

पारोसा पिंपळ [ पार्श्वपिप्पली = पारोसापिंपळ ]

पाल १ [ पळली (दुकान) = पाल ] (२) [ प्लवः = पाल ] एक प्रकारचें तारुं

पालक १ [ पालक्या = पालक ] (भा. इ. १८३४) (२) [ पालंकी = पालक]

**पालथा** [ अस् १ गतौ ४ क्षेपणे. पर्यस्त = पल्लत्थो = पालथा ] (धा. सा. श.)

**पालव १** [ प्लावः = पालवः. प्लवाका = पालवा ] एक प्रकारचें तारूं. (२) [ पल्लवः = पालव ] (ज्ञा. अ. ९ पृ। ६७)

**पालवणी** [ पल्लवपानीयं = पालवणी ] निंब वगैरेंचा पाला टाकून कढविलेलें पाणी.

**पाल्हाळ** [ पल्लवित = पालइअ + ल (स्वार्थक) = पालाल = पाल्हाळ ] अलं पल्लवितेन = पाल्हाळाला आळा घाला. (भा. इ. १८३४)

**पाव** [ निष्पू पासून निष्पावः ] पाव म्हणजे पाखडून नीट केलेलें धान्यादि, नंतर शुद्ध व स्वच्छ अन्न.

**पावका १** [ पादिका ] *(पायका पहा)* (२) [ पादुकः = पावका ] घटवंचीचा पावका.

**पावटा १** [ प्रवटक = पवटा = पावटा ] प्रवटक म्हणजे गहूं, एक प्रकारचें धान्य. (भा. इ. १८३२) (२) [ (पाट्ट) प्रवर्तः = पवट्टा = पावटा (पायाचा). प्रवृत्तिः = पवट्टि = पाउटी, पावटी ] (३) [ प्रावटः = पावटा (धान्यविशेष) ]

**पावडें** [ प्रावणं = पावणें = पावडें ]

**पावल** [ पाद + ल = पाअ + ल = पावल] पावला रुपया म्हणजे पाव रुपया, पावली. (भा. इ. १८३२)

**पाशीं** [ पार्श्व = पारस = पास = पासीं = पाशीं (सप्तमी), पासून, पासचा, पासाव ] (ग्रंथमाला)

**पासंग १** [ प्रासंगः = पासंग ] वत्सानां दमनकाले स्कंधे काष्टं आसज्यते स प्रासंगः तागडीच्या आडव्या दांड्याला प्रासंग म्हणत. तो सरळ होण्याला कमीजास्त वजनें पारड्यांत घालीत त्यांना पासंगाचीं वजनें म्हणत. (२) [ प्रासंग (separate yoke वैजयंती ) = पासंग ] (३) [ पार्श्वंगः = पासंग] हा मनुष्य त्या मनुष्याच्या पासंगालाही यावयाचा नाहीं, म्हणजे त्याच्या जवळजवळ हि यावयाचा नाहीं. (४) [ उपासंग Proximity = पासंग] Proximity. त्याच्या पासंगाला हि तो लागणार नाहीं. he cannot come even to his proximity.

**पासाव** [ पार्श्वात् = पास्साअ = पासाव. पाश्वार्त् = पासून ] जसें गृहात् = घरून. नगरपार्श्वात् = नगरपासून, नगरस्य पार्श्वात् = नगरापासून. (भा.इ. १८३४)

**पासीं** [ पश्च या शब्दाची पंचमी पश्चात् व सप्तमी पश्चे. पश्चे = पासीं - शीं. पश्चात् = पासोनि, पासून ] पश्च म्हणजे शेजार. पाशीं म्हणजे शेजारीं. पासून म्हणजे जवळून, शेजारून. घरापासीं (येथें घरा ही षष्ठी) = घराशेजारीं. घरापासून = घरा शेजारून. (भा. इ. १८३६)

**पासून** [*पासाव व पासीं पहा)*

**पासोडा - डी** [ प्रच्छदपटः = पासोडा ] प्रच्छदपट्टिका = पासोडी ]

**पासोडी १** [ प्रछुडिका (छुड्, थुड् to cover ) = पासोडी ] a coverlet. (२) [ प्रच्छादनपटी = पासोडी ]

**पांसोडी** [ पांसुकूल = पांसुऊड = पांसूड = पांसोडी ] पांसुकूल म्हणजे चिंध्यांचा ढीग. ह्या चिंध्या एकत्र शिवून बुद्धभिक्षु पांघरण्यास गोधडी करीत.

(भा. इ. १८३५)

पाहणें [ *पहणें पहा* ]

पाहतो [ स्पृहयति = पाहे, पाही ] स्पृहयति यवानां प्रसृतये = जवांचा पश्याला पाहातो. स्पृहयति = वांछति = पाहातो. (भा. इ. १८३४)

पाहाटे, औषीस, औषीं [ प्रभाते उषसि = पाहाटे, औषीस, औषीं ]

पाहाड (मूळ) [ पाठा = पाआडा = पाहाड (वनस्पति) ] (भा. इ. १८३७)

पाहाडमूळ [ पाठामूलं = पाहाडमूळ ] वनस्पति.

पाहाल १ [ प्रभातकाल = पाहाल (प्रातःकाल) ] (२) [ प्रातःकाल = पाहाल ] पाहालें पाही रे Oh! look at the dawn.

पाहूणचार [ प्राघूर्णिकोपचारः = पाहूणचार]

पाळ १ [ पाली = पाळ ] (२) [ पालिः = पाळ ] परिघ, कांठ. (३) [ पालिः (अश्रि, कोण) = पाळ ] घराची पाळ म्हणजे कोपरा, कोण.

पाळत-द [ पाल् १० वाट पाहाणें, प्रतीक्षणें. पाल + क्तिन् = पालतिः = पाळत-द ] (धा. सा. श.)

पिकदाणी [ पिकादिनी = पिकदाणी ] (भा. इ. १८३४)

पिकलेलें [ पक्वपक्वं ] *(ओलेलें पहा)*

पिंगूळ [ (कु) भृंगकः = बिंगल = पिंगुल = पिंगूळ ] पिंगूळ म्हणजे घाणेरडें पादणारा किडा.

पिचकट [ पिच्चट (नेत्ररोग) = पिचकट ] (भा. इ. १८३३)

पिचकणें [ उपस्कृ = (उ लोप) पचक = पिचक.

पस्करणं = पिचकणें, पुचकणें ] दहीं पिचकलें म्हणजे दहीं कुजून नासून बिघडलें. उपस्कृतं पूतिगंधादियुक्तं. (भा. इ. १८३४)

पिचकारी [ अपस्किरी = पिसकरी = पिचकारी = पिचकारी. स चा च झाला] (भा. इ. १८३२)

पिचडी [ पिच्चटी, पिच्छटी ] *(धातुकोश - पिचकार पहा)*

पिचणें [ पिष् = पिस् = पिच् = पिचणें वा पिसणें ] (भा. इ. १८३२)

पिचलेलें [ पिच्छिलं = पिचलें. पिचल + ल (स्वार्थक) = पिचलेलें (दहीं वगैरे) ] (भा. इ. १८३४)

पिच्छा १ [ पिपृक्षा F = पिच्छा M. ] The wish to be asked.

विचारून विचारून पोरानें पिच्छा पुरविलान्. The lad tired and exhausted my wish to reply by asking question after question. (२) [ (पद = पित्सा = पिच्छा ] पित्सा म्हणजे मिळविण्याची इच्छा. त्यानें पिच्छा घेतला म्हणजे कांहीं एक वस्तु मिळविण्याची इच्छा घेतली. (भा. इ. १८३६)

पिछाडी [ पश्चार्द = पिछाड - डी. अ = इ]

पिंजणें [ पिंज् १० हिंसायाम् = पिंजणें ] तो माझीं हाडें पिंजतो म्हणजे क्षीण करतो. (धा. सा. श.)

पिंजर [ पिंजरं (पिंजरिका) = पिंजर ] पिंजर म्हणजे हरताळ.

पिंजरणें [ पिंज् १० हिंसायाम्. पिंजरितं = पिंजरलें ] पिंजरणें म्हणजे बारीक धून पिस्कारणें. (धा. सा. श.)

पिंजरा [ पंजर = पिंजरा ] (स. मं.)

पिंजळी [ पिंजूल = पिंजळी ] एकविशत्यादर्भपिजूलैः पावयंति ।

(ऐतरेय ब्राह्मण) पिंजूलि असा हि संस्कृत शब्द असावा. (भा. इ. १८३४)

पिंजारणें [ पिच्छ् १० कुट्टने. पिच्छलायते = पिंजारणें. ] मांजर शेंपूट पिंजारतें म्हणजे केस पसरतें. (धा. सा. श.)

पिंजारी [ पंजिकारः = पिंजारी ]

पिटुकलें [ प्रथुकं (young of an animal) पिटुक. पिटुक + ल (स्वार्थक) = पिटुकलें ] प्रथुक म्हणजे कोणत्या हि प्राण्याचे लहान अर्भक. उंदराचें पिटुकलें. young one of a rat. (भा. इ. १८३६)

पिटणें [ पिट् शब्दसंघातयोः ] पिटणें (टाळी, डांगोरा) (ग्रंथमाला)

पिठवडी - पिठवडी = पिष्टवर्ति (पिठाचें एक तिखट पक्वान्न) पिठोरी = पिष्टपूरिका (घिंवरासारखें एक पक्वान्न)

घिवर = घृतपूरः (घिऊर = घिवर ) एक पक्वान्न.

पिठोरी = पिष्टगौरी । पिठोरी पूर्णिमा म्हणजे ज्या पूर्णिमेस पिठाची गौरी करून पूजितात ती ।

पिठी [पिष्टिका = पिठी]

पिठोरी १ [ पिष्टपूरिका = पिठोरी) (२) [पिष्टगौरी अथवा पीठगौरी = पिठोरी]

पिट्ठा १ [ पिपाठः (पौनः पुन्येन पाठः) सन्चा अभ्यास ] त्यानें काव्याचा पिट्ठा पाडला = तेन पिपाठः (सं) पादितः । म्हणजे त्यानें काव्याचा सडकून पाठ केला. (२) [ पिष्टकः । तिळाच्या कूटाची ढेप। ] पिट्ठा पाडणें म्हणजे तीळ कुटून त्याचें बारीक चूर्ण करतात त्याप्रमाणें एखाद्या पदार्थाचें चूर्ण करणें. अत्यन्त कुंबळणें ।

पिढाण [ पिधानं = पिढाण ] मडक्यावर ठेवावयाचें झांकण.

पिता [ पितृ = पिता ] (स. मं.)

पित्तपापडा [ पीतपर्पटः = पित्तपापडा ] (भा. इ. १८३४)

पित्त्या [ पित्रीय = पित्तीअ = पित्त्य (त्त्या - त्त्यी - त्त्यें) ] (भा. इ. १८३२)

पिंपळ [ पिप्लुः = पिंपळ ] (भा. इ. १८३३)

पिप्परी [ पिप्परी - कौशिकसूत्र २०।२२ प्लक्षोदुंबरः पिप्परीति प्रसिद्धः (!) येथें Bloomfield उद्गगार व आश्चर्य कां दाखवितो न कळे. ] (भा. इ. १८३२)

पिवशी बिवशी [ पितृस्वसृ = पिअससा = पिशवी, बिवशी ] (मावशी बिवशी ह्या सामासिक शब्दांत हा शब्द येतो. स्वतंत्र अस्तित्व सध्यां ह्या शब्दाला नाहीं. लोप झाला आहे.) (स. मं)

पिवळें हिरवें [ पीतंहरितं = पिवळें हिरवें. हरित = हरिअ = हरिव = हिरव (वा - वी - वें) ] येथें हिरवें म्हणजे पिवळें असा अर्थ आहे. (भा. इ. १८३४)

पिवळोखी [ पीतलक्षिका = पिवळोखी ] पिवळोखी म्हणजे पिवळा रंग.

पिवा [ पीव् to be fat स्थौल्ये = पिवा ] Fat, plump.

पिशवी [ प्रसेवक, प्रसेविका. प्रसेविका = पिसवी = पिशवी. (सा - सी, शी - सें) प्रसेविका (leathar vessel) = पिवशी]

पिस [ पिशाच्य = पिशाइ = पिसें (वेड) ] पिसें लागलें म्हणजे पिशाच्य लागलें. (भा. इ. १८३३)

पिसाव [ प्रस्रावः ] *(धातुकोश - पिस ३ पहा)*

पिसारा १ [ पिच्छबर्हः = पिसारा ] (२) [ पिच्छभारः = पिस्सहारा = पिसारा (पाखराचा) ]

पिसारें [ पिच्छाग्रं = पिसारें (बाणाचें) ]

पिसाव [ स्त्रु १ गतौ. प्रस्रावः ] *(धातुकोश - पिस ३ पहा)*

पिस्कारणें [ अपस्किरणं = पिस्करणें, पिस्कारणें (प्रयोजक) ] (भा. इ. १८३२)

पिळका [ पुलकः = पिळका. उ = इ ] अंगाला पिळके देत म्हणजे पुलक देत.

पिळणें १ [ पीडनं = पीळणें = पिळणें ] स मां पीडयति = तो मला पिळतोय्. (भा. इ. १८३४) (२) [ पीडन = पीळण = पिळणँ - णें ] (भा. इ. १८३२)

पी [ प्लीहा (कुक्षिव्याधिः) = पीआ = पी] त्याला पी झाली आहे म्हणजे प्लीहानामक कुक्षिरोग झाला आहे. (भा. इ. १८३३)

पीक [ पक्तिः = पीक (पक्वं) ] (ज्ञा. अ. ९ पृ. १८२)

पीठवण [ पृष्ठिपर्णि = पीठवण ] पृश्निपर्णि असा शब्द अथर्व संहितेंत येतो. परंतु मराठींत अपभ्रंश पीठवण असा ठकारयुक्त आहे. तेव्हां पृष्ठिपर्णि असा ष्ठिकारयुक्त उच्चार मराठीच्या पूर्वजांना माहीत होता असें दिसतें. ही पीठवण कोडावर औषध आहे. अथर्वांत पृष्ठिपर्णि कुष्ठावर सांगितली आहे. (भा. इ. १८३६)

पीठवन [ पृष्टिपर्णि = पीठवन ] (भा. इ. १८३४)

पीतबीत [ पीतविपीत (शाकपार्थिवादि गण) = पीतबीत ] वि पासून निघालेली बि मराठींत संस्कृतांतून आली आहे.

पुकारा [ पुत्कारः = पुकारा (धर्मदत्तचरितम्) ] (भा. इ. १८३४)

पुख्खा [ पूष् १ वृद्धौ. पूषः = पुख्खा ] वृद्धि करणारें अन्न. (धा. सा. श.)

पुचकणें [ प्युस् विभागे. प्युसनं = पुचकणें] पुचकणें म्हणजे विभाग होणें, मोडणें, क्षीण होणें. (धा. सा. श.)

पुचकन् [ प्र + मुच् ६ मोचने ] *(धातुकोश - पुच पहा)*

पुचका [ पृश्निकः = पुचका ] क्षीण, दुर्बळ.

पुचपुचित १ [ पुच्छ् १ प्रमादे ] *(धातुकोश - पुचपुच पहा)* (२) [ प्युस् विभागे = पुच. प्युसप्युसितं = पुचपुचित ] पुचपुचित म्ह० भाग होण्यास योग्य, पोकळ. (धा. सा. श.)

पुच्चा, पुच्ची [ पुषः Vulva वैजयंती = पुच्चा, पुच्ची ]

पुटकुळी [ पिटका = पिटकुळी (स्वार्थे ल), पुटकुळी ] (भा. इ. १८३४)

पुटपुटणें [ पुट् (बोलणें) = पुटपुट (द्विरुक्ति) ] (ग्रंथमाला)

पुंडा ऊस [ (१) पौंड्रक = एक प्रकारचा ऊस. पौंड्रक = पौंडा = पुंडा. (२) पुंड्र = पुंड्र. ] (भा. इ. १८३३)

पुडी [ पुटि, पुटी = पुडी, पुड ] *(पुड पहा)*

पुडुत, पुडुतीपुडुती, पुढचा, पुढला, पुढां, पुढील, पुढून [ *पुढें १ पहा* ]

पुढें १ [ वैदिक नाम पुरस् पासून पुढ. 'पुढ' ची सप्तमी पुढें, पंचमी पुढून, षष्ठी पुढचा, सप्तमी पुढां.

पुरतः = पुडुत, पुडुता, पुडुतीपुडुती. पुढपासून विशेषण पुढला, पुढील. ] (ग्रंथमाला) (२) [ प्रभृति (पासून) = पुढें ] ततः प्रभृति = त्या पुढें (तेव्हां पासून)

पुतण्या-णी [ पुत्रान्यक = पुतन्यअ =

पुतन्या = पुतण्या-णी ] पुत्रासारखाच दुसरा पुत्र, भावाचा मुलगा. (स. मं.)

पुतळी [ पुत्रिका = पुतरिआ = पुतळी ] पुत्तलिका हा शब्द पुत्रिका शब्दाचा अपभ्रंश आहे.

पुता - ती - त [ पुत्रक = पुतअ = पुता - ती - त ] (स. मं.)

पुत्र [ पुत्र = पुत्र, पूत ] (स. मं.)

पुरण [ पृच् to mix. पृग्ण mixed (Vaidik) = पुरण (mixture) मिश्रण] पुरणाच्या पाटल्या म्हणजे सोन्यांत इतर धातूंचें मिश्रण करून केलेल्या पाटल्या.

पुरमाशीण [ पूर्णमासिनी = पुरमाशीण ] पूर्ण महिने झालेली गर्भारीण.

पुरवठा [ पूर्यवंटः = पुरवटा, पुरवठा ]

पुरवणें [ पुर्व् पूरणे. पुर्वणं = पुरवणें ] पिछा पुरवणें म्ह० पाठलाग पूर्ण करणें. (धा. सा. श.) (२) [ पृ १० पूरणे = पुरवणें ] शक्ति असणें. कोणाला हि जातां पुरवत नाहीं = केनापि गंतुं न पार्यते. (धा. सा. श.)

पुरुष १ [ पुरुष म्हणजे नवरा असा अर्थ मराठींत आहे. आमचे पुरुष घरांत नाहींत. ह्या वाक्याचा अर्थ माझा नवरा घरांत नाहीं असा आहे. हा अर्थ मराठीने संकृतापासून घेतला आहे.

त्वं मम भार्या भव अहं तव पुरुषो भवामि। आश्वलायन गृह्यसूत्र - गार्ग्य नारायणीयवृत्ति - १-६-१ ] (भा. इ. १८३६) (२) [ पौरुष (मस्तकावर सरळ वर हात केलेल्या पुरुषाची उंची) = पुरुष ] ही विहीर सात पुरुष खोल आहे, येथें पुरुष म्हणजे विवक्षित उंचीचें मान आहे व हा पुरुष शब्द संस्कृत पौरुष शब्दापासून निघालेला आहे. प्राकृतांत येतांना संस्कृत शब्दांतील वृद्धि काढून टाकण्याचा प्राकृताचा व मराठीचा स्वभाव आहे. संस्कृत भाववाचक नामें मराठींत व प्राकृतांत अपभ्रष्ट होतांना हा विकार दृष्टीस पडतो. पौष = पूस इ. इ. इ. (भा. इ. १८३७)

पुरुषात्कार [ पुरुषकारः = पुरुषात्कार (साक्षात्काराच्या सादृश्यावरून) ] हा शब्द मी आमच्या मातुःश्रींच्या तोंडून फार वेळां ऐकिला आहे.

पुरेपुर १ [ पुरु पुरु (much) = पुरेपूर. पुरु वैदिक आहे ] exceedingly, पुष्कळ. (२) [ पुरुहं + पुरु = पुरोपुर = पूरेपूर ] पुरुहं व पुरु ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ पुष्कळ असा आहे. एकार्थक दोन शब्द जोडून अतिशय दाखविलेला आहे. (भा. इ. १८३५) (३) [ परिपृ (परिपूरं) = पुरेपूर ] Filled to the brim. (४) [ पुरुहुः पुरुः = पुरेपूर ] पुरुहू व पुरु दोन्ही शब्दांचा फार (स्फार) असा अर्थ आहे. बाहुल्यार्थ द्विरुक्ति. (५) [ पुरेपूर दूध प्यालों, ह्या वाक्यांत पुरेपूर म्हणजे पुष्कळ. वैदिक शब्द पुरु. त्याची द्विरुक्ति पुरुपुरु. पुरु म्हणजे पुष्कळ. पुरुपुरु म्हणजे सडकून पुष्कळ. पुरुपुरु या शब्दाचा अपभ्रंश पुरेपूर ] (भा. इ. १८३३)

पुऱ्या विशींत [ पूर्वे वयसि = पुऱ्या विशींत] (भा. इ. १८३४)

पुर्वणें [ पुर्व् १ पूरणे. पुर्वणं = पुर्वणें ] मरण पुर्वेल = मरणं पुर्व्यंत (कर्मणि). हा धातू पूर् या धातूहून निराळा. (धा. सा. श.)

पुष्प [ पुष्प = पुप्फ + ल = पोफल. पोफल

= पुष्प (ज्ञानेश्वरी) ] पूगीफल या शब्दापासून हि पोफल निघतो. (भा. इ. १८३३)

पुसकन् [ पुस् पोसयति. पाद वगैरे सोडणें = पुसकन्, फुसकन्, फुसकुली] (भा. इ. १८३४)

पुसणें १ [ पुस्त = पुस्स = पुस किंवा पुस्त = पुत्थ = पुच्च = पुस ] पुत्रः पितरौ पुस्तयति = पुत्र पितरांस पुसतो. पुसणें म्हणजे सन्मान करणें. (२) [ प्रोंच्छन = पुंछण = पूंसणें = पुसणें ] पुसणें म्हणजे घासून नाहींसे करणें. (ग्रंथमाला)

पुसपुसणें [ पृच्छ् = पुसपुसणें ] घरच्या गोष्टी पुसपुसून तिनें मला सळो का पळो केलें. येथें ही सबंध द्विरुक्ति आहे. (भा. इ. १८३६)

पुस्तपास्त [ बुस्त् to honour +बस्त् to enquire = पुस्तपास्त ] to enquire or pay respect.

पुळपुळीत [ पुल (पूर्ण न झालेलें धान्य, फोल) = पुळपुळीत ] पुळपुळीत म्ह० अपूर्ण, अशक्त, भरींव नव्हे असा.

पुळुका [ पुलकः = पुळका, पुळुका ] पुळका म्हणजे रोमांच. अळुके-पुळुके या संयुक्त जोड शब्दांत हा शब्द येतो. (भा. इ. १८३५)

पूड, पुडी [ पुडि (खंडने) = पुड, पूड ] पूड म्ह० वांटून केलेली बारीक भुकटी. (भा. इ. १८३६)

पूत [ *पुत्र पहा* ]

पूपी [ पूपिका (एक मधुर पक्वान्न) = पूपिआ = पूपी = पोपी ] (भा. इ. १८३३)

पूल [ पूल् संघाते ] दोनी तीरांचा संघात करणारा कृत्रिम रस्ता. (ग्रंथमाला)

पेंग [ प्र + इंग = पेंग. अप + इंग = पेंग (अ लोप) ] (धा. सा. श.)

पेच (चा - ची - चें) [ प्रेत्य = पेच्च = पेच (मेलेलें) = (लेचे) पेचें ] (भा. इ. १८३२)

पेटणें १ [ प्र + इंध. प्रेंधनं = पेंढणें = पेंटणें, पेटणें. ध = ढ = ट ] पेटणें म्ह० जळणें. (धा. सा. श.) (२) [ इट् १ गतौ. प्र + इट = पेट ] उ० - हट्टास पेटणें म्हणजे जाणें. (धा. सा. श.)

पेटी [ पेटिका ] (ज्ञा. अ. ९ पृ. ५१)

पेठ [ (न.) पीठं = पेठ (स्त्री) ] व्यापारपीठं = व्यापाराची पेठ.

पेंड (मोत्यांचा) [ (मुक्ता) पिंडः = पेंड ] (भा. इ. १८३४)

पेंडरी [ पिंड (मांसाचा गोळा) = पेंडरी ] (स. मं.)

पेंडळें [ पिंडलकं = पेंडळें ] *(पेंडाळें पहा)*

पेंडाऱ्या [ पिंडहारिकः = पेंडाऱ्या ] भारेवाला.

पेंडाळें [ पिंडलकं = पेंडळें. पिंडालिः = पेंडाळी, पेंडाळें, पेंडाळा ]

पेडें [ पेटं (संहतिः) = पेडें ] सोन्याचें, मोत्यांचे पेडें.

पेंढ [ पिण्याक = पेण, पेंढ ] निस्नेह तिल चूर्ण. (भा. इ. १८३७)

पेढी १ [ पीठ = पीढ = पेढ = पेढें (ग्रामविशेष) ] बसावयाचा ओबडधोबड पाट. (२) [ पीठिका = पीढिआ = पेढी ] पैसे देण्याघेण्याचें स्थान. (ग्रंथमाला)

पेढें [ पेढी पहा ]

पेण [ पिण्याक ] *(पेंढ पहा)*

पेणें १ [ प्री ९ तर्पणे. प्रयणं = पेणें ] पेणें म्हणजे तृप्ति करणारें उपायन. (धा. सा. श.) (२) [ अप्ययनं = पेणें ]

अध्ययन म्हणजे जोडणें. (भा. इ. १८३६)

पेरण [ परिधानं = पेऱ्हाणँ = पेराण = पेरण (वस्त्रविशेष) ] (भा. इ. १८३३)

पेरणें [ ईर् गतौ, कंपने. प्रेरणं = पेरणें ] नजर पेरणें = दृष्टि प्रेरणं. (धा. सा. श.)

पेरू १ [ परूषक = पेरू ] (२) [ पीलु = पेरू ] एक वृक्ष व फळ आहे.

पेरें [ पर्वन् = पेरें ] (स. मं.)

पेला-प्याला [ पेरु हा शब्द छांदस आहे, वेदांत येतो. माध्यंदिनीय वाजसनेयसंहिता ६-१०. पिबतीति पेरुः पानशीलः ।

पिबत्यनेति पेरुः पात्रं । रलयो रभेदः । पेरुः = पेलुः । पेलुकः = पेलुआ = पेला - प्याला ] पिण्याचें लहान सोयस्कर भांडें. (भा. इ. १८३३)

पेषकार [ पेशस्कारी (सोनार) = पेषकार] Treasurer. (बृहदारण्यक, चतुर्थं ब्राह्मणं ४)

पैं [ पैं हे पादपूरक मराठीं कवितेंत फार येतें. ह्याचा मूळ अर्थ झटकन्, जलदी. पदि = पइं = पैं अशा परंपरेनें हा शब्द निष्पन्न झाला आहे. ] (स. मं.श्रावण शके १८२६)

पैक [ ज्ञानेश्वरींत पैक = समुदाय शब्द येतो. त्याच्या सप्तमीचें रूप पैकीं. पन्नास माणसांपैकीं = पन्नास माणसांच्या समुदायांतील ] (स. मं.)

पैजारा [ पादत्रा = पायजारा = पैजारा ] *(थारा १ पहा)*

पैठ (ठा-ठी-ठें) [प्रतिष्ठित = पइट्ठिअ = पैठ (ठा-ठी-ठें) ] well established.

पैठा [ स्था १ स्थाने प्रतिष्ठित = पइट्ठिअ = पैठा ] (धा. सा. श.)

पैस, पैसा [ प्रयासः ] *(धातुकोश पैस ४ पहा)*

पो [ पव (पो (शेणाचा) ] पव म्हणजे शेण. (भा. इ. १८३५)

पोई १ [ उपोदिका = पोइआ (उ लोप) = पोई (वनस्पति-विशेष, मायाळू वेल) ] (भा. इ. १८३६) (२) [ प्रपीति] *(पवई पहा)* (३) [ (सं) प्रहि = (प्रा.) पोढी (कुंडें. शिलालेख नं. ५) = पोई. पानीय प्रहि = पाणपोढी = पाणपोई ] (ग्रंथमाला)

पोंक [ पुंग ] *(पोंग २ पहा)*

पोकळ १ [ प्रोत्कील = पोकिळ = पोकळ] पोकळ म्हणजे आंतून रिकामें केलेलें. (२) [ प्र + उत्कल = प्रोत्कल = प्रोक्कल = पोकळ ] आंतून भरींव मगज काढून घेतलेला. (ज्ञा. अ. ९ पृ. ८५)

पोक्त १ [ प्रयोक्तृ (efficient) = पोक्त] पोक्त माणूस स्त्री म्हणजे efficient man or woman. (२) [ वच् परिभाषणे - प्र + वच्. प्रोक्त (प्रसिद्ध) = पोक्त ] पोक्त माणूस म्ह. प्रसिद्ध संभावित माणूस. (धा. सा. श.)

पोख, पोंख [ उख् गतौ. उंख् गतौ. प्रोख, प्रोंख = पोख, पोंख ] (धा. सा. श.)

पोंग १ [ पुंग (ढीग) = पोंग ] (२) [ पुंग (टेंगूळ, उंचवटा) = पोंग, पोंक]

पोंगडा [ पौगंडः = पोंगडा ]

पोंगडें [पोगंडकं = पोंगडें (पोर) ]

पोच [ प्रोत्साहः ] *(धातुकोश - पोच ६ पहा)*

पोंच [ प्रपंचः = पवंचो (कर्पूरमंजरी) = पोंच ] आमचा पोंच तो किती?

पोचट [ प्रोज्झट = पोचट. प्र + उज्झ् to abandon ]

पोट १ [ पुष्टिः = पोट ] फुगारा, supplement, minor divisons. (२) [ प्रोथम् emlryo = पोट ] तिचें पोट वाढलें, फुगलें her embryo grew up. (३) [ पुष्ट = पोट्ट = पोट] पुष्टि देणारा अवयव. (स. मं.) (४) [ प्रोथ् १ पर्याप्तौ ] प्रोथ = पोट. प्रोथः = पोटरः प्रोथा = पोटरी. प्रोथनं = पोटरणें. जोंधळा पोटरीस आला म्हणजे पर्याप्त झाला, गाभ्यांत पूर्ण झाला. (धा. सा. श.)

पोटभरू [ पुर्टिभरः = पोटभरू ] a mere eater.

पोटरणें [ प्रोथनं ] *(पोट ४ पहा)*

पोटरा [ प्रोथः ] *(पोट ४ पहा)*

पोटरी १ [ प्रोथा ] *(पोट ४ पहा)* (२) [ प्रकोष्ट = पोट्ट = पोटरी ] (स. मं.)

पोटली [ पोट्टली = पोटली, पोटळी ] पोटली म्ह० पुरचुंडी. (भा. इ. १८३४)

पोटोबा [ पुष्टपतिः (देवताविशेष, अथर्ववेद) = पोटोबा ]

पोट्या [ प्रवटः = पउटा = पोट्या (गहूं)]

पोठरणें [ प्रोथ् to be complete, full, to be in embryo पोठरणें ] to be in full embryo जोंधळा पोठरला, पोठरीस येणें.

पोत १ [ पोत = पोत (वस्त्रविशेष) ] (भा. इ. १८३४) (२) [ पोतः = पोत. गृहस्थाने पोतः (अमकोशटीका) ] पोता कडे खासगी कडे, गृहकृत्या कडे, हा शब्द जमाखर्चांत येतो. (३) [ पोत = वोट = बोट Boat ] (भा. इ. १८३४)

पोतरें [ पोत्रं - cleansing garment, cloth (from पू to cleanse) = पोतरें, पोतेरें ] a cleansing cloth.

पोतें [ पौतवं (एक धान्याचें माप) = पोतँ = पोतें ] पोतेंभर धान्य. (भा. इ. १८३३, ३४)

पोतेरें १ [ पोत्रं ] (पोतरें पहा) (२) [ पूतिवस्त्रं = पोतेरें ] सारवून घाण काढण्याचें वस्त्र. (३) [ पवित्रं = पोतरें = पोतेरें. पूयते अनेन इति पवित्रं] ज्यानें स्वच्छ केलें जातें तें पोतेरें. (४) [ पवित्रवस्त्रं = पोतेरें] पोतेरें म्हणजे भुई पवित्र करण्याचें वस्त्र. पवित्र करतांना स्वतः वस्त्र मलिन होतें, सबब पोतेरें म्हणजे मलिन वस्त्र असा उलट अर्थ होऊन बसला.

पोथी [ पुथ् (भाषार्थे) = पोथ, पोथी, पोथिका ] (ग्रंथमाला)

पोथ्यापूर [ पुस्तिकापूलिकः = पोथिआपूर = पोथ्यापूर. ल = र ] पोथ्यांचा ढीग.

पोपट, पोपटपंची १ [ पोपुट्यते (पुट् भाषायां) = पोपट ] वैशेष्यानें अतिशय बोलणारा पक्षी तो पोपट. प्रथम पोपट हें त्या प्राण्याचें गुणदर्शक विशेषण होतें, नंतर विशेषणच त्याचें सामान्य नांव झालें.

पंचिका (पंच् विस्तारवचने) = पंची. पोपटपंची म्हणजे पोपटाचें विस्तृत तें च तें बोलणें. (भा. इ. १८३६)

पठ चें यङ् (क्रियासमभिहार) पापठ होतें. परंतु प्राकृतांत पोपठ असें रूप होई. पोपठः = पोपट (तोंडपाठ म्हणणारें पांखरूं) पापट्यते = पापठः. पंच् (विस्तारवचने) = पंच. पंचिका = पंची. पापठपंची = पापटपंची = तोंडपाठ करून व्याख्यान करणें. पाचें पो पोपट शब्दावरून झालें आहे.

(धा. सा. श.)

**पोपडा १** [ पल्पूलः ] *(पापोडा पहा)* (२) [ पोपुड्यते (पुड् उत्सर्गे) = पोपुडा = पोपडा ] सुटून निघालेला कवचा म्हणजे पोपडा. (भा. इ. १८३६)

**पोपी** [ पूपिका ] *(पूपी पहा)*

**पो पो** [ पि ६ गतौ पिय पिय = पो पो ] पो पो म्हणजे चल चल, चलाव चलाव. (धा. सा. श.)

**पोफळ** [ पूगीफल किंवा पुष्पफुल्ल ] *(पोय २ पहा)*

**पोबारा १** [ पर्ब् गतौ. पर्बः= पोबारा ] absconding पर्ब् या धातूचा अर्थ abscond, to get away stealthily and speedily. (२) [ (प्र) व्रज् ]

**पोबारा (१३)** [ सपादद्वादश = पावबारा = पोबारा (सलोप) ]

**पोंबारा** [ पादोनद्वादश = पोंबारा ]

**पोब्बारा** [ व्रज. प्रव्राजः = पब्बारआ = पब्बारा = पोबारा, पोब्बारा ] त्यानें पोब्बारा केला म्हणजे संन्यास घेतला. (धा. सा. श.)

**पोय १** [ पोतिः = पोइ = पोय (नारळाची)] (२) [ पूगी = पोय. पूगीफल = पोयफळ = पोफळ (सुपारीचें फळ). पुष्पफुल्ल = पोफळ (पुष्प) ]

**पोर १** [ पुत्रक = पुतरअ = पुअरअ = पोर = मुलगा ] (स. मं.) (२) [ पोर शब्द मराठींत पुल्लिंगी हि आहे व स्त्रीलिंगी आहे. नपुंसकलिंगाशीं सध्यां कर्तव्य नाहीं. संस्कृतांत हि पुत्र शब्द मुलग्याचाहि वाचक आहे व मुलगीचा हि वाचक आहे.]

पुत्रशब्दः पुंसि स्त्रियां च स्मृतौ दृष्टः ।
आकृता वा कृता वापि यं विन्देत्सदृशत्सुतं
पौत्री मातामहः तेन दद्यात्पिंड हरेद्धनम् ॥
इति ।
दौहित्रेण मातामहः पौत्री भवतीत्यर्थः । मनुः ।
लोके च दुहितरि पुत्रशब्दं प्रयुञ्जाना दृश्यन्ते ऐहि पुत्रेति ।
मंत्रे च दृश्यते । "पुमान्स्ते पुत्रो जायताम्" इति ॥
तस्मात् पुमांसः पुत्राः इति विशेषणं ।
(आश्वलायनगृह्यसूत्र गार्ग्यनारायणीयवृत्ति - १-७-३) (भा. इ. १८३६)

**पोरकें-का-की** [ पुत्रकक = पोरकें-का-की; पोरटा-टी-टें ] (स. मं.)

**पोरगा इ. इ.** [ पुत्रक = पुतरक = पुअरग = पोरग (गा - गी - गें). मूलक = मूलग (गा - गी - गें). लहानग (गा - गी - गें) = लघीयस् + क. लांबग (गा - गी - गें) = लंब + क ] (भा. इ. १८३३)

**पोरटा - टी - टें** [ पुत्रक ] (पोरकें पहा)

**पोरवकें** [ पूर्वकं = पोरवकें ] supply.
उ. - जिये पदवियेचेनि पोरवकें ।
ते मातें पावति सुखें ।
हे पालति मज विशेषें । करुं आवडे॥
ज्ञा. १०-१२०.

**पोरवड** [ पुत्रकावर्त = पोरवड ] पोरांचा घोळ.

**पोरा - री - र** [ पुत्रक = पुतरक = पुअरअ = पोरा - री - र ] (स. मं.)

**पोरांडे घर** [ पुत्ररंड = पोररंड = पोरांड = पोरांडें घर ] जेथें पोरें व बायका मात्र आहेत तें घर. (स. मं.)

**पोरी** [ पीवरी = पोरी, पोर ] कोंकणांत मोठ्या वीस पंचवीस वर्षांच्या सुनेला

सासवा पोर हा एकाकी शब्द लावतात.

पोरें सोरें [ पुत्रक सोदरक = पोरें सोरें ] (स. मं.)

पोवतें [ पवित्रं = पोवतें. अ = ओ ]

पोहणें [ प्रोहण = पोहणें. प्रोह् पुढें जाणें ] पोहणें म्हणजे हातांनी पाण्यांत गती करणें. अथवा प्रवह् = पउह = पोह. नदींत पोहतो = नद्यां प्रवहति अथवा प्रोहति. (भा. इ. १८३३)

पोहोचणें [ प्रस्थानं ] *(पहचणें पहा)*

पोळ १ [ प्लोष = पोळ (भाजणें) ] (भा. इ. १८३४) (२) [ गुजराथेंतील शहरांतील कित्येक लहानमोठ्या पेठांना पोळ म्हणतात. ह्या शब्दाचे संस्कृत प्रतोलि, प्रतोल हे शब्द होत. प्रतोल = पओल = पोळ ] (स. मं.)

पोळा [ पूल् १ संघाते. पूलः = पोळा ] पोळा म्ह० बैलांचा संघ ज्या सणांत करतात तो. (धा. सा. श.)

पोळी [ पुटी = पुली = पोळी (गव्हाची) ] (ग्रंथमाला).

पौंड [ प्रोत + डी - डयनम् ] *(धातुकोश - पौंड पहा)*

प्यारा [ प्रियकारः (३-२-४४) = पिआरा = प्यारा ] प्रियंकरः व प्रियकारः असे दोन शब्द पाणिनि देतो. पैकीं प्यारा, पिआरा या मराठी व हिंदी शब्दांवरून प्रियकारः हा शब्द पाणिनिकालीं प्रचलित होता हें दिसतें.

प्याला [ पेरु ] *(पेला पहा)*

प्रकाल [ प्र + कल् to drive forwards, to urge. प्रकालः urging, insistence = प्रकाला ]

उ. - तैसा सांख्याहूनि पाहा प्रांजला ।
परि आम्हांसारखेयां जी अभोलां ।
एथ आथि काहिं प्रकाला । तो साहों
ए वर ॥ ज्ञा. ५. १६५

प्रचीति [ प्रतीति (विश्वास) = प्रचीति. त = च ] (भा. इ. १८३७)

प्रयागवळ [ प्रयागपालकः ] *(गयावळ पहा)*

प्रवेसणें [ प्र + विश् = प्रविश् = प्रवेसणें]

प्रसाद [ प्रसादन (boiled rice) वैजयंती कोश = प्रसाद ] boiled rice as a खिरापत in a temple.

प्राञ्च् forward shows that the Aryans came from the प्रतीची West and travelled towards the East.

प्राण [ अपराण्हः = पराण्ह = प्राण्ह = प्राण ]अन्न मिळतां मिळतां रोज प्राण जातो.

अन्ने मेलिप्यति नित्यं अपराण्हः भवति, जायते । (भा. इ. १८३४)

प्रायश्चित्त [ प्रायस् (प्र + आ = यस् to trouble) = to trouble exceedingly.

प्रायश्चित्त mind exceedingly exercised after a fault, crime etc, etc.

प्राय (यः) शब्द निराळा (प्र + अय् घञ् or इ - अच् वा ) going away, dying as an expiation. ]

प्रेष १ [ प्रैषः (पाणिनी ८-२-१०४) = प्रेष] हा शब्द ऐतिहासिक मराठी पत्रांत येतो. (२) [ प्रैष (निरोप पाठविणें = प्रेष ] प्रेष म्हणजे निरोप. प्रेष्य = प्रेष. प्रेष = चाकर, जासूद.

मराठींत प्रेष या शब्दाचे चाकर व निरोप असे दोन अर्थ आहेत व ते प्रेष्य व प्रैष या दोन भिन्न संस्कृत शब्दांपासून निघालेले आहेत.

(भा. इ. १८३७)

## फ

फक्कड १ [ फक्क् १ असद् व्यवहारे ] फक्कड = नीच कृत्य करणारा = चैनी = दुराचारी. (ग्रंथमाला) (२) [ फक्क् १ असद् व्यवहारे. फक्कटः = फक्कड] फक्कड म्हणजे असभ्य, छिचोर. (धा. सा. श.) (३) [ प्रकृष्ट = फक्कड] प्रकृष्टं प्राकृतं = फक्कड प्राकृत.

फजित [ अपजित = फजित ] Defeated.

फजिति [ प्र + च्युति ] *(धातुकोश - फजित १ पहा)*

फज्जा १ [ प्रजयः (overpowering) = फज्जा ] (२) [ प्रहासः jest = फज्जा] (३) [ अपजयः = फज्जा] Defeat. (४) [ अपजित = फज्जा] *(फजित पहा)*

फज्ज्या [ प्र + च्यु (प्रच्यावः) ] *(धातुकोश - फजित १ पहा)*

फज्या [ अपजयः ] *(पच्या पहा)*

फट [ फटः cheat = फट. फटाकडी a female cheat ]

फटकन् [ फट् + कृ ] *(धातुकोश - फटक २ पहा)*

फटकन्, फटदिनी [ *चटकर पहा)*

फटकळ [ स्पष्ट + कल (बोलणारा) = फटकळ ] अति स्पष्ट बोलणारा.

फटकारा, फट्कारा, फटकारणें [ फट्कारः = फटकारा ] अव्यय फट्

फटकून [ फट् कृ ] *(धातुकोश - फटकर २ पहा)*

फटकूर [ पाटकचीरं = फाटकूर = फटकूर] फटकूर म्हणजे फाटलेलें वस्त्र.

फटफजिती (१) [ स्फंट् (थट्टा करणें) = फट. स्फंटयति ] कोणाचें फट म्हणून घेणार नाहीं म्हणजे थट्टा करून घेणार नाहीं. (२) [ स्फंट्, स्फंड् to jest, to laugh at = फट. फजीइत persian = फजिती] फट म्हणजे फजिती.

फटफटित [ स्फटस्फटित = फटफटित ] (भा. इ. १८३४)

फटफटित [स्फटत्स्फटितं] *(धातुकोश- फटफट २ पहा)*

फटाकडी १ [ फटः ] *(फट पहा)* (२) [ स्पष्टाकृति = फटाकडी ]

फटुकफळी [ प्रत्युत्फलिका = पच्चुफ्फळी = फटुफ्फळी = फटुकपळी ]

फड [ स्फटः = फड (निवडुंगाचा) ] सापाच्या स्फटेसारखा दिसणारा निवडुंगाचा भाग तो. (भा. इ. १८३६)

फडकाव १ [ स्फट. स्फटकाम्य = फडकाव] (धा. सा. श.) (२) [ स्फालकाम्य] *(फाळणी पहा)*

फडफडित [ स्फटस्फटित = फडफडित (भात वगैरे) ]

फण [ फणः = फण ] शेतकऱ्याचें एक हत्यार. हें सापाच्या फणेसारखें असतें.

फणफणणें [ फण् गतौ ] (ग्रंथमाला)

फतकल [ फल्क ] *(फतकुलें पहा)*

फताडा [ स्फीताढ्यः = फिताडा = फताडा] फताडा निवडुंग म्हणजे अतिशय ढालगज पानाचा निवडुंग.

फतुकलें [ फल्क (विस्तीर्ण शरीर) = फतकल (लठ्ठ बाईचे विस्तृत कुल्ले), फतुकलें ] (भा. इ. १८३४)

फंद १ [ स्फंड् थट्टा करणें. स्फंड = फंद] स्फंड - फंद म्हणजे थट्टा, थट्टा होण्याजोगें कर्म. (भा. इ. १८३३)

(२) [ स्पंद (घालमेल) = फंद ] (भा. इ. १८३५) (३) [ स्पंद = फंद (सेतुबंध, ८-२५) (भा. इ. १८३२)

फंदी [ स्फंडिन् = फंदी ] फंदी म्हणजे विनोदी, थट्टेखोर. (भा. इ. १८३३)

फन्ना [ पड् - पंडयति नाशने = पंड: = फण्णा = फन्ना ] destruction. फन्ना उडविणें. to destroy, consume.

फरक, फरकन् [ फलति विशीर्यते इति फलक:. फलक = फरक (भेद). फलंकृत्य = फरकन् ] भा. इ. १८३४)

फरकाट्या [ प्ररोहकाष्टिका = फरकाट्या] झाडाच्या फरकाट्या.

फरड १ [ पर्यटी ] *(धातुकोश - फरड १ पहा)* (२) [ अट् १ गतौ. पर्यटि: = परड = फरड ] सर्पस्य पर्यटि: = सापाची फरड. फरड म्हणजे फिरण्यानें पडलेला मार्ग. (धा.सा.श.)

फरडणें [ अट् १ गतौ. पर्यटनं = फरडणें पर्याटि = फराडी = फरड ] उ. - सापाची फरड. (धा. सा. श.)

फरडा १ [ प्रष्ठ (leader) = फरडा ] (२) [ स्पर्ध: = फरडा ] फरडा लेखक म्हणजे ईर्षावान् लेखक (भा. इ. १८३५) (३) [ स्पर्ध् १ संघर्षे ] *(धातुकोश - फरड २ पहा)*

फरपट [ परि + पट् ]

फरपट, फरपड, फरफट [ पट् १० ग्रंथे. परिपाटी = फरपट, फरपड ] उ. - सापाची फरपट (धा. सा. श.)

फरफटत [ फर् to scatter ] *(फरफर १ पहा)*

फरफर १ [ फर् (द्विरुक्त) to scatter (Vedik) = फरफर, फरफटत ] (२) [ फर to scatter (Vaidik) द्विरुक्त = फरफर ] फरफर ओढणें. to drag scatteringly.

फरफरणें [ स्फर् कांपणें, कंपायमान होणें. द्विरुक्त स्फरस्फरणं = फरफरणें ] (भा. इ. १८३३)

फरसफोडी [ परशु स्फोटितानि दारूणि = फरसफोडा पाणिनि २-१-३२ ] *(कुऱ्हाडफोडी पहा)*

फरा १ [ फलक = फलअ = फला = फरा (कंबरेचा) ] (स. मं.) (२) [ प्रहर:, प्रहरक: = फरा ] मारण्याचें हत्यार. फरागदगी, दांडपटका हीं हत्यारें प्रसिद्ध आहेत. (३) [ भर = फरा ] १ भर: = भारा, ओझें, गठडी. २००० पल = २० तुला = १ भर. भर: म्हणजे एक माप आहे. (ज्ञा. अ. ९ पृ. १७२)

फरारी १ [ परिहारिन् one escaping = फरारी ] one escaping (२) [ परापहारी = पराअआरी = परारी = फरारी ] तो द्रव्य घेऊन फरारी झाला म्हणजे परापहारी झाला. द्वितीयार्थ: - पळाला. (भा. इ. १८३४)

फरी [ प्रहरिका = फरी (गदगा) ] खेळण्याचें एक हत्यार.

फर्जी [ प्रजि: (subduer) = फर्जी. The conqering प्रधान.

फर्माविणें [ फरमाना नामधातु (फारसी) = फर्मावणें, फर्माविणें ] to proclaim.

फलकट [ फलिकरण ] *(फलकण पहा)*

फलकण [ फलिकरण (ऐतरेय ब्राह्मण) = फलिकण्ण = फलकण = फलकट ] (भा. इ. १८३४)

फवा १ [ प्रवाह: = पवहो = फवा ] Current, sudden sprey of water. (२) [ प्रवाह = पहव (महाराष्ट्री) =

फवा ] (३) [ प्रवाहः ] *(धातुकोश - फव १ पहा)*

फवारणें [ प्रवहः or प्रवाहः (नामधातु) = फवारणें ]

फवारा १ [ प्रवहः or प्रवाहः (नामधातु) = फवारा ] current of water. वाफेचा फवारा = बाष्पप्रवहः (२) [ प्रवाहः] *(धातुकोश - फव १ पहा)*

फशीं पडणें [ पत् १ पतने. पाशपतनं = फशीं पडणें ] (धा. सा. श.)

फस [ पांशु (चिखल) = फस ] खड्डयांतील फस म्हणजे चिखल.

फंस [ भ्रंश् १ अवस्त्रंसने. भ्रंश्, भ्रंस्, = फंसणें, फसणें. भ = फ ] (धा. सा. श.)

फसगत [ प्रहासगतिः = फसगत ] Condition of being mocked.

फसफस १ [ पस्पशा (प्रस्तावना) = फसफस ] एकदांची फसफस संपली म्हणजे प्रास्ताविक धडपड संपली. (धातुकोश फसफस १ पहा) (२) [ (प्र + हस्) प्रहसिः द्वित्व = फसफस ] हसणें, खिदळणें. फसफस फारशी माजली आहे, असें मुलींना उद्देशून बोलतात.

फसफसणें [ प्रस् १ विस्तारे. प्रसप्रसनं = फसफसणें ] विस्तार पावणें. कणीक फसफसली म्हणजे भिजून विस्तार पावली. *(धातुकोश - फसफस २ पहा)*

फसवणें [ पक्षवादन = पच्छवाअण = फसवाण = फसवणे (ण) ] (भा. इ. १८३२)

फस्त १ [ अपहस्त = (अलोप) फस्त ] अपहस्त म्हणजे लुटलेलें. (भा. इ. १८३७) (२) [ प्रहस्त (पतित) = पहस्त = फस्त ]

फळ [ फल (edge of a weapon वैजयंती) = फळ ] तरवारीचें फळ.

फळफळणें [ फल् = फळफळणें ] सबंद द्विरुक्तीनें हि मराठींत पौनःपुन्यवाचक क्रियापदें साधतात. (भा. इ. १८३६)

फळा [ फलकः = फळा ] *(फळी पहा)*

फळी १ [ फली (small piece of wood) = फळी ] फलकः = फळा (२) [ परिघ = फलिह (जैनमहाराष्ट्री) = फळी ]

फाउर [ स्फाय् स्फायुर swollen, enlarged = फाउर ] फुगट. उ. - नीलिमा अंबरीं । कां मृग तृष्णालहरी ।
तैसा वायां चि फाउरी । वावो जालें ।। ज्ञा १३-१०५

फाक [ प्रशाखा = फाक ] branch, slip.

फाज [ फंजी = फाज (भाजी) ]

फाजील १ [ प्राज्यं (much, overmuch वैजंयती) + ल = फाजील (redundant) ] (२) [ प्राज्य abundant, plentiful + (स्वार्थक ल) = फाजील.] abundant, over abundont फाजील सामान redundant furniture. (३) [ प्रहसिर jesting, jestful = फाजील ] फाजील पोरगा a jesting boy, mannerless lout.

फाटणें १ [ स्फुर् प्रकाशणें) स्फारयति (णिच्) = फाटणें ] फाटलें म्हणजे प्रकाशलें, उजाडलें. (भा. इ. १८३६) (२) [ स्पर्ध = फड्ड = फट्ट = फाट ] तेन सह वा तस्मै स्पर्धते = त्याशीं फाटतो, फाटून आहे. (भा. इ. १८३४)

फांटा [ फाण्ट (absence of exertion वैजयंती कोश) = फांटा ] फांटा देणें म्हणजे कोणत्या हि कृत्याचा अभाव करणें.

फाड-फाडी [ स्फटिक = फाड - डी ] दगडाच्या चिर्‍यांना फाड म्हणतात. (भा. इ. १८३६)

फाडा-फाडी [ स्फटी - फाडी ] सोनार लोक फाडी लावून धातु शुद्ध करतात. (भा. इ. १८३६)

फाडा [ स्फटा ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३३)

फाडून खा [ स्फंट्, स्फंड् ]

फाया [ स्फाय् १ वृद्धौ, पसरणें, वाढणें. स्फायः = फाया ] फाया म्हणजे परसण्याकरितां कापासादिकांवर घातलेलें सुवासिक तैलादि द्रव्य.

फार १ [ प्राय (exceeding) = फार, पार] प्रायगत = पार गेलेला, फार गेलेला. प्रायमृत = पार मेलेला, फार मेलेला. (२) [ स्फार = फार (बहुत)] (ग्रंथमाला)

फारकत [ परिकृति ] *(धातुकोश - फारकत पहा)*

फारकरून [ प्रायःकृत्वा, प्रायःकृत्य = फारकरून ] फारकरून म्हणजे बहुशः

फार चड [ प्रचंड = फारचड ] तस्य करणं प्रचंडं = त्याचें करणें फार चड आहे. चड, चडेल हे शब्द चंडपासुन निघाले आहेत. (भा. इ. १८३६)

फार पुराणा [ प्रपुराणः = फार पुराणा. प्र = फार ] (भा. इ. १८३४)

फास [ प्रासः = फार ] that which is thrown पाशः = फसा dice

फासका [ प्राकषिक (गांडू, निरुपयोगी माणूस) फासका ] a worthless man, गांडू.

फासणें [ स्पर्शनं = फंस्सणं = फांसणें - णी - णा ] (भा. इ. १८३२)

फासळी [ पर्सु = फर्सु = फास = फासळी] (स. मं.)

फासा [ पाशः = फासा ] *(फास पहा)*

फांसा [ प्रासकः = फांसा ] dice.

फाळ [ स्फालः = फाळ (नांगराचा) ]

फाळका [ स्फालककः = फाळका (केळीच्या पानाचा) ]

फाळणी [ स्फालनिका = फाळणी. स्फालकाम्य = फडकाव ] (धा. सा. श.)

फितना १ [पीतनक = फितना] एक वासाचें द्रव्य आहे. (२) [ पीतनः yellow orpiment = फितना ] a yellow scent.

फिरकणें [ प्रेषणं ] *(भिरकणें १ पहा)*

फिरकें [ स्फिरत्कं = फिरकें ]

फिरणें, फिरून [ प्रति + ईक्ष् = प्रतीक्ष् to wait for = फिरणें, फिरून ] थोडा फिरून ये = स्तोकं प्रतीक्ष्य याहि.

फिस्स [ पिस् १० भाषार्थे = फिस्स ] (धा. सा. श.)

फिळफिळीत [ प्ली गतौ (द्विरुक्त) = फिळफिळीत ] watery buttermilk running like water.

फीत [ स्फीति = फीति = फीत ] फुगवून सैल विणलेलें कापड. (भा. इ. १८३३)

फुकट १ [ फू (त्कृ) तं = फुक्कट = फुकट] केवळ फूत् असा तोंडानें वारा सोडून होणारें तें फुकट. (भा. इ. १८३६) (२) [ अपोहकटा = फुकट, फुकट्या ] going away with a mat.

फुकरणें [ *फुंकरणें पहा* ]

फुंकरणें [ फुंकृ = फुंकरणें. फूत्कृ =

फुकरणें, फुंकरणें ] संस्कृतांत फूत्कृ, फुत्कृ व फुंकृ अशीं तिन्हीं रूपें असावीं. (भा. इ. १८३६)

फुगारा [ फूत्कारः = फुगारा ]

फुट [ स्फुट = फुट (स्पष्टार्थक) स्फुटकळ = फुटकळ ] (भा. इ. १८३५)

फुटकळ १ [ स्फुटकळ ] *(फुट पहा)* (२) [ स्फुटकल्पः = फुटकळ ]

फुटाणा [ स्फुट + धान्यक = फुट + दाणा = फुट + आणा = फुटाणा ] (भा. इ. १८३२)

फुटाणी [ पुथ् भाषार्थः पुथाना = फुटाणी] talkative woman. बायको फुटाणी.

फुणगी [ स्फुलिंग = फुणिंग = फुणग (गी)] स्फुलिंग = म्हणजे फुणगी. (भा. इ. १८३३)

फुंदणें [ स्पंद् = स्पंदन = फुंदणें ] धातूचें स्पुंद असें हि रूप असावें. (भा. इ. १८३३)

फुलणें १ [ फुल् संचलने ] *(फुलें पहा)* (२) [ स्फुल् = फुल. स्फुलन = फुलण (णें) ] फुलणें (विस्तव, कोळसा). (भा. इ. १८३३)

फुलारी [ फुल्लहारी = फुलारी ]

फुलें [ फुल् संचलने = फुलें, फुलणें, उत्फुल्ल, उफळणें ] उफुलून बाहेर आलें तें फुल. (ग्रंथमाला)

फुलोरा [ फुल्लभरः = फुलोरा ]

फुलौरा [ फुल्लपूरः ] (ज्ञा. अ. ९ पृ. २४)

फुसकन् १ [ पुस् पोसयति ] *(पुसकन पहा)* (२) [ स्फुर्च्छ् १ विस्तृतौ ] *(धातुकोश - फुसक २ पहा)*

फुसकुली [ पुस् पोसयति ] *(पुसकन् पहा)*

फुसफुशित [ पुष् फुगणें द्विरुक्त = फुसफुशित ] Merely blown up.

फुसफुसणें [ पुस्फूर्जिष् = फुसफुस + णें = फुसफुसणें ] फुसफुसणें म्हणजे एक प्रकारचा भयप्रद आवाज करणें. (भा. इ. १८३५)

फूत्कटा [ फूत्कृतेन ] फूत् असा तोंडानें वारा सोडला असतां, म्हणजे बिनखर्ची. (ज्ञा. अ. ९ पृ. १६९)

फूट १ [ पृथक् = पुढो = फूट ] seperate. फूट वस्तू = पृथक् वस्तु. (२) [ स्फुट् = फूट ] (३) [ स्फुट् ६ विकसने १० भेदने ] स्फुट = फूट. स्फोटनी = फोडणी. स्फुटिका = फोडी = फोड. (धा. सा. श.)

फूल [ पुष्पक = फुल्ल = फूल ] पुष्पक म्हणजे एक प्रकारचा नेत्ररोग.

फूस १ [ प्र + उत् + सह् = प्रोत्साहिका = फूस ] प्रोत्साहन. *(धातुकोश - फूसदे पहा)* (२) [ प्रोत्सह् = फोस्स = फूस] फूस म्ह० प्रोत्साहन.

फें [ अपेहि ! begone ! = (अलोप) फें !] फें फें करावयाला लावीन = अपेहि अपेहि इति वाचयिष्यामि.

फें, फेंफें [ प्रेहि ( प्र + इ to die) = फें] प्रेहिवाणिजा a rite in which no वैश्य is allowed.

तुला हि फें तुझ्या बापाला हि फें. प्रेहि म्हणजे मर ही भाषा तुला हि लावतों व तुझ्या बापाला हि लावतों.

फेंगडा १ [ प्रज्ञुः ११. प्रज्ञु + टः (स्वार्थक) = पंगुडा = फेंगडा. प्रगते जानुनी यस्य प्रज्ञुः ] (धा. सा. श.) (२) [ प्रज्ञु, प्रज्ञ + ट = प्रज्ञट. प्रज्ञट = पञट = पञड = पेंगड = फेंगडा (डा - डी - डें)] प्रज्ञ, प्रज्ञु म्हणजे ज्याच्या गुडघ्यांत फार अंतर आहे तो. ट हा कुत्सितार्थक प्रत्यय. (भा. इ. १८३७)

फेटा [ प्रभ्रष्ट ] *(फेंटा पहा)*

फेंटा [ प्रभ्रष्ट a garland worn or suspended on the knot of hair on head = फेटा, फेंटा ] a cloth worn or suspended on the head.

फेणी १ [ प्रहेणिका (एक खाद्य) = फेणी] (२) [ फेनक, फेनिका (white boiled rice flour) = फेणी ]

फेपरें १ [ प्रवेपः = फेपरें (कंप) ] (२) [ प्रवेप्र, प्रवेपिर ] *(फेंपरें पहा)*

फेंपरें [ प्रवेप्र, प्रवेपिर trembling = फेपरें, फेफरें, फेंपरें, फेंफरें ] a disease in which there is great trembling of the body.

फेफरें, फेंफरें [ प्रवेप्र, प्रवेपिर ] *(फेंपरें पहा)*

फेंफरें [ प्र + वेप् १ कंपने - प्रवेपिरम् ] *(धातुकोश - फेंपर पहा)*

फे फे [ प्रेहि प्रेहि = फे फे ] तस्य प्रेहि, प्रेहि, अपेहि अपेहि जाता = त्याची फे फे झाली - उडाली.

फेफे [ फि म्हणजे क्रोधादि विकार. (द्विरुक्ति फिफि = फेफे ] फेफे होणें म्हणजे विकारानें भ्रममाण होणें.

फेंफें [ प्र + इ - प्रेहि = फें फें ] *(फें पहा)*

फेरा [ पर्ययः = फेरा ] सर्पः बाहुं पर्येति = साप हाताला फेरा घालतो.

फेस १ [ स्फिच् = फिस = फेस ] तुझा फेस काढीन. तव स्फिचौ कर्षिष्यामि म्हणजे तुझे कुल्ले ओढीन. (भा. इ. १८३४) (२) [ प्रैषः distress = फेस ] तोंडांतुन फेस गळणें, फेस काढणें.

फैल [ प्रहेल, प्रहेल्का (riddle, ridding position) = फैल ] फैलावर घेणें म्हणजे शब्दताडण करणें.

फोक [ उक्ष् १ सेचने. प्रोक्षः = फोक ] अत्यंत पातळ पाण्यासारखा ढाळ. (धा. सा. श.)

फोड १ [ स्फुटिका = फोडी = फोड (स्त्री)] (२) [ स्फुटिका = फुडिआ = फोड (स्त्री) ] (भा. इ. १८३५) (३) [ स्फोट = फोड (पुं.) ] (भा. इ. १८३५, १८३४)

फोडणी [ स्फोटनी = फोडणी ] *(फूट पहा)*

फोडणें [ वद् १ भाषणे ] - अपवद = फोड.

अपवदति = (अलोप) पोडतो = फोडतो.

खर्द् १ दन्दशूके = खर्दः म्हणजे दंशक शब्द.

नांवानें खडे फोडणें - नाम्ना खर्दान् अपवदति = नांवानें खडे फोडतो. (धा. सा. श.)

फोडीवं [ स्फुटेलिम = फोडीवँ ]

फोदा [ (पाणिनि कन्यानां प्रमदः) प्रमदः = पंवदा = फोदा ] rejoicing.

तुझ्या आईचा किंवा बापाचा फोदा = तव मातुः पितुर्वा प्रमदः मूळांत फोदा या शब्दांत बीभत्स असें कांहीं नाहीं. Rejoicing of the father or mother.

फोद्या [ प्रो ढा ह्या married woman, wife = फोद्या. प्र + उत् + वह् to marry. ] a wife : hence by implication, the female genetic organ.

फोद्या चालला काशी the wife is going to काशी

लवड्या तुझी गत कैशी oh husband? what shall you do?

फोपसा [ पुप्फुल (वातानें फुगलेला) = फोपसा ] (भा. इ. १८३३)

फोपाटा [ प्र + उत् + पाटय् ] *(धातुकोश - फोपाट पहा)*

फोपीस [ फुफ्फुस = फोपीस ]

फोफसणें १ [ पुष् ४ पुष्टौ - पोपुष्यते = फोफुसणें = फोफसणें ] फोफसणें म्हणजे अतिशय पुष्ट होणें. (भा. इ. १८३६) (२) [ पोस्फुर्छ्यते = फोफुसणें = फोफसणें = फोफसा ] फोफसणें म्हणजे अति पसरणें अंगाने इ. इ.

फोफसा १ [ पोपुष्यः = फोफसा ] अतिशय पुष्ट. (भा. इ. १८३६) (२) [ पोस्फुर्छ्यति ] *(फोफसणें २ पहा)*

फोफाटा [ प्र + उत् + पाटय् ] *(धातुकोश - फोपाट पहा)*

फोल [ पूल्यम् (पोंचट दाणा) = फोल ]

फौज्या [ प्रयोज्यः (servant, servitor) = फौज्या ] तो फौज्या आहे, झालें! he is a servitor, that's all.

## ब

ब [ वप्त्री ] *(बाई ६ पहा)*

बइंगण [ वातिंगणः = बइंगण ]

बक [ अर्भक = अब्भक = (अलोप) बक] बक म्हणजे पिल्लूं.

बकबक्या [ भषभषकः = बकबक्या ] भषणं श्वरवः

बकरा [ भोलिर्बहुकरो वक्रग्रीवो मेषस्तु लोमशः (त्रिकांडशेष). 'बहुकर' पासून बकरा ही व्युत्पत्ति कृत्रिम दिसते. वर्कर = बक्कर = बकरें- रा - री ] (ग्रंथमाला)

बकरूं [ वर्करतर ] *(रूं पहा)*

बकवा [ भषद्वाच् = बखवाअ = बकवा ] Vain talk.

बकाबक [ भक्ष्याभक्ष्यं = बक्खाबक्ख = बकाबक ] बकाबक खातो म्हणजे बरें वाईट न पाहतां खातो. (भा. इ. १८३७)

बकाबका [ भक्षंभक्षं = बकाबका ]

बखतर [ वक्षस्त्रं = बखतर ]

बखाटी १ [ वक्षणा = बखाटी] सा वः प्रजां जनायद् वक्षणाभ्यः (१४-२-१४) (२) [ वक्षोस्थि = बक्खोट्ठि = बखाटी] उरावरचें हाड. (३) [ वक्षोस्थि = बक्खोट्ठि = बखोटी = बखाटी ] पोट बखाटीला गेलें म्हणजे भुकेनें इतकें ओसरलें कीं वक्षस्थलाच्या हाडापर्यंत गेलें. (भा. इ. १८३७)

बखेडा १ [ प्र + क्ष्वेड् किंवा क्ष्विड् १ शब्दे. प्रक्ष्वेडः (गडबड, गोंधळ) = बखेडा ] *(धातुकोश - बखेड पहा)* (२) [ प्रक्ष्वेडः a loud indistinct noise = बखेडा ] confusion, noise, clamour.

बख्खळ १ [ बहुकल = बख्खळ (पुष्कळ)] (२) [ पुष्कल = बुख्खळ = बुख्खळ = बख्खळ ] हा शब्द गांवढ्यांत फार.

बग [ वश = बख = बग ] influence. बोलबगें = वाग्वशात् (ज्ञानेश्वर)

बग ! [ भकोः ] *(बघो पहा)*

बंगण [ वातिंगणं ] *(वांगें ३ पहा)*

बगल [ फारसी ] (सं.मं.)

बगहो ! [ भकोः ] *(बघो पहा)*

बंगी [ विहंगिका (पेटी) = बिअंगिआ = ब्यंगी = बंगी ] बंगी म्हणजे नीट चोहोंकडून बांधलेली पेटी, पिशवी इ. इ. विहंगिका हा शब्द खुंटीचा वाचक म्हणून समजतात; परंतु तो पेटीचा हि

वक्क झंला, असे बगे या मराठी अपभ्रंशावरून दिसतें.

बगेंय - टी - टें [ बाहुपूर्त = बगार्टे - टा - टीं. ह = घ = ग. ठ = ड = ट ]

बघ ! [ भकोः ] *(बघो पहा)*

बघणें १ [ वध् १ रोधे ] बघणें - तुझें बघून घेतों; दम धर. (धा. सा. श.) (२) [ पश् ] *(पहणें पहा)*

बघहो ! [ भगोः = बघो ! बघहो ! भोः (अकच्) = भकोः = भगोः ] बघो, बघहो हीं मराठींत संस्कृतांतल्याप्रमाणें अव्ययें आहेत. बघ या क्रियापदाशीं संबंध नाहीं. बघो म्हणजे भो, अरे.

बघो ! १ [ भगोः ] (बघहो पहा) (२) [ भकोः (भोः अकच्) = बगहो ! बघो ! बघ ! बग ! ] भोः आगतोऽस्मि = बगहो ! आलें.

बचक [ प्रसरक = बचक, बचका ]

बचका १ [ प्रसरक ] *(बचक पहा)* (२) [ प्रचायकः = पचाका = बचाका = बचका ] पुष्पप्रचायः = फुलांचा बचका. बचका म्हणजे हातांतला फुलांचा पुंज.

बचनाग [ वत्सनाभ = बच्चनाह = बचनाग] (भा. इ. १८३७)

बचावणें [ विच्छ् १० गतौ. विच्छ = बचणें. विच्छायते = बचावतो. (धा. सा. श.)

बची [ वत्सक ] *(बच्चा २ पहा)*

बचू १ [ वासुः ] *(बाची पहा)* (२) [ वत्सक ] *(बच्चा २ पहा)*

बचेळी [ पीचालिः ] *(बेचाळी पहा)*

बच्चा १ [ वयस्य = बअच्च = बच्च (संबोधन) बच्चा ] बच्चा म्हणजे मित्रा.

वत्स या शब्दापासून निघालेला बच्च शब्द निराळा. त्याचा अर्थ मूल, पोर.- बरोबरीच्या माणसांना जो बच्चा शब्द मराठींत म्हणतात तो वयस्य या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. (भा. इ. १८३४) (२) [ वत्सक = बच्चअ = बच्चा - च्ची - च्चें, बचू, बची ] (स. मं.)

बच्चाजी [ वंचकः = बंचआ = बच्चा ] बच्चाजी म्हणजे फसव्या, लुच्चा. वत्स पासून निघालेला बच्चा शब्द निराळा.

बच्चीं [ अपत्यानि = (अलोप) वच्चाँइ = बच्चीं ] हा शब्द मराठींत प्रायः अनेकवचनी नपुंसकलिंगी वापरतात. (भा. इ. १८३४)

बछेरा [ वत्सतरः = बछेरा ] शिंगरूं.

बजरंग [ वज्रांग = वजरांग = बजरंग. रा तील आ चा अ झाला ] हा शब्द अंजनीपुत्राचा वाचक आहे. (भा. इ. १८३३)

बजरबटु [ वज्रवृत्त = वजरवट्ट = बजरबट्ट = बजरबटु ] (भा. इ. १८३४)

बजरबट्टू [ वज्रवटकः = बजरबट्टू ] वज्र म्हणजे कठिण व वटक म्हणजे वाटोळा खडा.

बजित [ व्यथित (कष्टदशा प्राप्त झालेलें माणूस) = बजित Distressed.

बट १ [ वट (दोरांचा लहान जुडगा) = बट] (स. मं.) (२) [ वटी = बटी = बट ] वटी म्हणजे रज्जु. केसाची बट, कापसाची बट.

बटबटीत १ [ व्यक्तव्यक्त = बत्तबत्त = बट्टबट्ट = बटबट, बटबटीत ] (धा. सा. श.) (२) [ वि + अच् ]

(चंदन) बटवा १ [ वस्तुकः = बट्टुआ = बटवा ] वस्तुक म्हणजे चंदनबटवा.

(२) [ वास्तुकं = बात्थुअं = बाटुअ = बटवा ]

बटाट्या [ अवटीटः flatnose person = बटाट्या ] चपट्या नाकाचा.

बट्टी १ [ भृष्टिः = बट्टी ] Fried wheaten round food. (२) [ भ्रस्ज]

बट्टू [ अवटुः (मानेवरचा उंच भाग) = बटु (अलोप) = बट्टू ] मानेची घाटी. (भा. इ. १८३६)

बट्ट्याबोळ [ वस्तिकापूलः = बट्टिआबोळ = बट्ट्याबोळ ] वस्तिका म्हणजे वस्त्राच्या दशा व पूल म्हणजे ढीग. बट्ट्याबोळ म्हणजे दशांच्या दोरांची गुंतागुंत, गोंधळ, गुंतागुंत.

बठ्ठा १ [ अवस्थः (शिस्न) = बठ्ठा ] शिस्न. घ्या माझा बठ्ठा. (२) [ अवहस्तः (हाताचा मागला भाग) = बठ्ठा ] हाताचा बठ्ठा. (३) [ अवष्टंभः = बट्टंहा = बठ्ठा ] त्यानें बठ्ठा दाखविला म्हणजे अवष्टंभ ऊर्फ दर्प ऊर्फ उरमटपणा दाखविला. (भा. इ. १८३५) (४) [बस्तः (बस्तिः) = बठ्ठा] बठ्ठयांत म्हणजे वस्तींत. (भा. इ. १८३४)

बठ्ठू [ अवस्तु unreality, nonentity = बठ्ठू ] nonentity, nothing. अवस्तुता = बठ्ठ्या. घ्या माझा बट्ठू take nothing from me. घ्या माझा बठ्ठ्या.

बठ्ठ्या १ [ अवस्तुता ] (बठ्ठू पहा) (२) [ बस्तिकः = बट्ठिआ = बठ्ठ्या ] (भा. इ. १८३४)

बड (डा-डी-डें) १ [ अभ्यधिक = बढिअ (अलोप) = बढा = बडा ] (२) [ वड्र = बड (डा - डी - डें) ] (३) [ बाढ - बड (डा-डी-डें). बाढमुष्णां। वाग्भट - अष्टांगहृदय - सूत्रस्थान - अध्याय ५ श्लोक २८ ] (भा. इ. १८३४)

बंड १ [ भंडः = बंड ] दांडगा पोरगा. (२) [ वंड (उनाड) = बंड ] उनाड मुलगा. (३) [ भंडः (buffoon) = बंड ] मुलगा फार बंड आहे म्हणजे चावट खोडकर आहे. (४) [ वंटः unmarried man, truant profligate = बंड ] Boistrous chap, mutinous chap. (५) [ वंटालिका a kind of battle, rebelion = बंडाळी. वंट revolt = बंड. unorthodox fighting, mutiny ]

बडगा [ परिघातः a club, iron bludgeon = बडगा. परिघात = बडिघाअ = बडगा ] club, bludgeon सोडगा.

बडबड्या [ वदावदः = बडाबड = बडबड्या]

बडवणें १ [ व्यध् ४ हनने. व्यधनं = बडवणें ] (धा. सा. श.) (२) [ विधमनं = बिडवणँ = बडवणें. विधमनं = निहननं ] (रामायण - सुंदरकांड - सर्ग ६० श्लोक १०) (भा. इ. १८३४)

बडवा १ [ बटुकः = बडुआ = बडवा, भडवा ] अरे भडव्या = रे बटुक (शिवी असेल तेव्हां). भाड्या शब्द निराळा. भडव्या, मागें सर = बटुक, पार्श्वे अपसर. (२) [ बटुकक = बडुअअ = बडुआ = बडवा ] (भा. इ. १८३२)

बडा १ [ बृहत् = बडा (मोठा) ] (२) [ वड्रः = बडा (मोठा) ]

बडाई [ वड्रता = बडई = बडाई, बढाई ] मोठेपणा.

बंडाळ [ वंटालु = बंडाळ ] Boistrous chap.

बंडाळी [ वंटालिका ] *(बंड ५ पहा)*

बडिवार [ वृद्धिकारः = बडिवार ]

बढाई १ [ बद् १ भाषार्थः ] *(धातुकोश - बढाव १ पहा)* (२) [ वड्रता ] *(बडाई पहा)*

बतकाम [ व्यतिक्रम ] *(बदकर्म पहा)*

बताडा [ बृहदाढ्यः = बताडा ]

बताणा १ [ वितानः Own = बताणा ] (२) [ अवतानकः = (अलोप) बताणा] पागोट्याचा बताणा.

बतावणी १ [ वृतु भाषायां. वर्तयति = बतावतो. ] बतावणें म्ह. असत्य भाषण करणें. (धा. सा. श.) (२) [ स्तु २ स्तुतौ. प्रस्तावना = पतावणी = बतावणी ]

बतावणीकर [ प्र + स्तु ] *(धातुकोश - बताव २ पहा)*

बत्तासा [ वृत्ताशः = बत्तासा ] खाण्याचा साखरेचा वाटोळा पदार्थ.

बत्तिशी [ द्वात्रिंशी = बत्तिशी ] (स. मं.)

बत्ती १ [ व्यक्ति (स्पष्टपणा) = बत्ती ] (२) [ वर्तिः (दिवा) = बत्ती ] दिवाबत्ती. (३) [ वर्तिका (वात) = बत्ती ] दिवाबत्ती. (४) [ वर्तिः (गुंडाळी) = बत्ती ] पागोटेंविशेष. (५) [ वर्तिका (सोटा) = बत्ती ] सोट्याचा मार. बत्ती देणें = मारणें सोट्यानें. (६) [ वस्त् १० क्लेशे. वस्तिः = बत्ती देणें (मारणें) ] बत्ती (पागोटें) व बत्ती (वर्तिका) हे शब्द निराळे. (धा. सा. श.) (७) [ बद्धि (बध् - बाध्) = बत्ती (मार) ] बत्ती देणें म्हणजे मारणें.

बद [ बद् १ स्थैर्ये ] *(बंद १ पहा)*

बंद १ [ बद् १ स्थैर्ये = बंद. बदि असा धातु असावा ] बद (रुपया) स्थिर झालेला, आवाज न काढणारा रुपया. द्विरुक्ति = बदबद. (धा. सा. श.) (२) [ बंध (दोरी, सुतळी) = बंद ]

बदकर्म [ व्यतिक्रम = crime, transgression बतकाम, बदकर्म ]

बदचाल [ व्यतिचारः = बदचाल ] offence against custom.

बदडणें [ बध् लगडादिनी ताडणे, उपरोधे. बद्ध = बदढ = बदडणें ] बदडणें म्हणजे काठी वगैरेंनी उपरोध करणें. (भा. इ. १८३६)

बदबद [ बद् १ स्थैर्ये ] *(बंद १ पहा)*

बदाबद १ [ (Vaidik) बाध् Red बद्बध् = बदाबद ] thump on thump. बदाबद चेंडूचे रट्टे मारणें. (२) [ (Vedik) बद्बध (intensive बध) oppress intensively = बदाबद ] चेंडू बदाबद मारिला.

बद्द [ बद् स्थैर्ये = बद्द, बदद् ]

बदद्‌ १ [ बद् ] (बद्द पहा) (२) [ अवद्य = बद्य (अलोप) = बदद् ] अवद्य म्हणजे निंद्य. (भा. इ. १८३६)

बन्दर [ व्यन्तर supernatural beings = बन्दर ]

बंधुला [ बंधुलक (दासीपुत्र) = बंधुला ] (भा. इ. १८३२)

बनणें १ [ वनु क्रियासामान्ये ]

त्याचें घर बनतें = तस्य गृहं वन्यते ।

त्यानें घर बनविलें = सः गृहं प्रावनयत् ।

मला बनत नाहीं = मे न वन्यते (भावे) (धा. सा. श.) (२) [ (वन्) वननं = बनणें ] काम बनलें = कर्म वनितं (वन् सिद्ध होणें) मला बनतें = मे वन्यते (वन् तयारी करणें) इ. इ.

(भा. इ. १८३३)

बनात [ ऊर्णावत् (लोंकरीचें) = वुण्णाअत = बुणात = बनात ] लोंकरीचें वस्त्र. (भा. इ. १८३३)

बनाव [ वन् क्रियासामान्ये. वनापयति = बनावणें. वनापः = बनाव ] (धा. सा. श.)

बप्पीह [ वापीह (वापीला टाळणारा, चातक) = बप्पीह (चातक) = बापू ] चातक विहिरीचें पाणी पीत नाहीं. (भा. इ. १८३६)

बंब १ [ द्वंद = बंब ] काय बंब वाजतो तो वाजूं द्या म्हणजे युद्ध, पराक्रम होतो तो होऊं द्या. (२) [ द्वंद्वं = बंब, बोंब] तो काय बंब सांगतो = स किं द्वंद्वं मंत्रयते। द्वंद म्हणजे युद्ध, व बंब म्हणजे रहस्य, व बंब म्हणजे रहस्य, गूढ.

बंबाळ [ भंभालि ] *(भंभाळ पहा)*

बंब्या [ ब्रह्मा = बंभो = बंब्या ] हा बंब्या आला !

बभुक [ बुभूष = बभुक ] over-ornamental. रंग बभुक दिसतो.

बभ्रा [ अवब्रवः (बेअब्रू) ill report, evil news = बभ्रा Bad report.

बरँ १ [ परमं (अंगीकारे अव्ययं) = बरँ! बरवँ ] (२) [ (वैदिक) भल certainly = बरँ ] (३) [ वा रे ! = बरँ बरें ] कसँ बरँ.

बरकत [ बरी + गती = बरगत = बरकत. वर = बर. कर्मधारय होतांना प्रथम शब्दाचें मूळरूप. (भा. इ. १८३२)

बरं कां [ वरं कं ] *(बरें कां पहा)*

बरगडी १ [ वंक्रिः = बर्गडी, बरगडी ] (२) [ उरस् (छाती) + गड (समुदाय) = उरोगड = बरगड = वरगड = बरगडी ] छातीच्या व भोंवतालच्या हाडांचा समुदाय. (स. मं.)

बरड [ वरट = बरड ] धान्यविशेष.

बरणी [ भरणी = बरणी ] लोणचें भरण्याचें भांडें, पातळ पदार्थ भरावयाचें पात्रविशेष.

बरबटणें [ भ्रंश् १ अवस्रंसने. बरीभृश्यते = बरबटणें ] गांड गुवानें बरबटली म्ह. अतिभ्रष्ट झाली (धा. सा. श.) म. धा. १८

बरव १ [ परम = वरव = बरव (वा - वी - वें) बरवा हा शब्द अतिशयवाचक ऊर्फ तमभाववाचक मराठींत आहे. (भा. इ. १८३७) (२) [ वरिमन् (विशेषण - श्रेष्ठ) = बरिवँ = बरव (वा - वी - वें)

बरवा [ वरीयस् better = बरवा ]

बरळणें १ [ वृधु भाषायां. वृध् = बरड = बरळ ] बरळणें म्ह० विसंगत बोलणें. (धा. सा. श.) (२) [ व्रण् १ शब्दे = बरळणें. ण् = न् = ल = ळ ] (धा. सा. श.) (३) [ लप् १ व्यक्तायां वाचि. प्रलपनं = बरळणें. प्ररटनं = परळणें = बरळणें ] (धा. सा. श.)

बरी, बरीक [ वराकिका = वराइआ = बरी, बरीक ] ती बरीक मेली = सा वराकिका मृता.

बरीक २ [ वरं कं ] *(बरें कां पहा)*

बरें १ [ वा रे ! ] *(बरँ ३ पहा)* (२) [ परमं ! = बरें (अव्यय अंगीकारार्थी) ] (भा. इ. १८३७)

बरें कां [ वरं कं = बरं कां, बरीक, बरें कां.

कं निदायां सुखे वा निपातः ] त्याची बरीक नोकरी गेली.

'बरीक' = बरं कां (Do you see) (भा.

१८३४)
बर्गी [ वर्गिन् = बर्गी ] वर्ग means a fighting horde.- बर्गी हें नांव इतर प्रांतस्थ लोक मराठ्यांना लावतात.
बर्तन [ वर्धनं (पात्रविशेष) = बर्तन (हिंदी)]
बर्सात १ [ वर्षर्तु rainy season = rainy season (२) [ वर्षारात्र rainy season = बर्सात ] rainy.
बलक, बलग [ वलज = बलक, बलग ] वलज म्हणजे हाडाच्या आंतील रस. अंड्याच्या आंतील रसाला बलक म्हणतात.
बलुता, बलुतें, वलुतें [ प्लेव् to serve प्लेवितृ = बेलुता = बलुता ] village servant. प्लेवितं = बलुतें the requisites of a village servant.
बलूल १ [ बलूल = बलूल. बलं न सहते बलूलः ] तो पोरगा बलूल आहे म्हणजे दुर्बल, हैबान आहे. (२) [ बल + ऊल = बलूल ] आळशी, भित्रा. (भा. इ. १८३४)
बवा [ भवत् = बवअ = बवा, बोवा, बुवा, बावा ] (भा. इ. १८३४)
बस १ [ बस् to stop ] बस, पुरें झालें = stop, it is enough. (२) [ पशु (सम्यगर्थे निपातः) = वसु = बसु = बस (निपात) ]. बस = उत्तम, पुरे. (भा. इ. १८३४) (३) [ अव + सो to finish Imp. second sing स्य. अवस्य = (अलोप) बस!] Finish!, end ! stop!. (४) [ वश = बस, हरिसबसविसप्पमाणहियए = हर्षवशविसर्प्पद्हृदयः त्याचा बस बसला म्हणजे त्याचा वश, अधिकार, सत्ता स्थापित झाली ] बस म्ह० वजन, अधिकार. त्याचा त्या घरांत बस बसला म्हणजे वश, अधिकार चालू झाला. (भा. इ. १८३६) (५) [ वस् ४ स्तंभे. वस्य = बस, बस्स. वसुस्तंभे, वस्यति ] वस्य म्हणजे थांब, बस, बस्स म्हणजे थांब, पुरे. मराठींत हें आज्ञार्थक रूप अव्यय झालें आहे. (धा. सा. श.)
बसक [ विश्. उपवेशिका = बइसिका = बसक ] बसक म्हणजे जनावरांची बसण्याची जागा. (धा. सा. श.)
बसणें [ वस् स्तंभे ] तो गप्प बसला = सः निशब्दः अवस्यत्. बसला म्हणजे स्तब्ध झाला. उपविश् पासून निघालेला बैस, बस धातू निराळा. (धा. सा. श.)
बसवणें [ प्रमाणें, बसवणें, उदाहरणें बसवणें, ताळा बसवणें वगैरे प्रयोगांत बसवणें हा शब्द उपवेशन या शब्दापासून निघालेला समजणें असमंजस आहे. येथें बसवणें हा शब्द संस्कृत अवसेय, अवसान या शब्दापासून निघालेला स्पष्ट दिसतो.
उदाहरणानि अवसेयनि = उदाहरणें बसवावीं.
प्रमाणं अवसेयं = प्रमाण बसवावें.
अवसेयं = बसवावें म्हणजे जाणावें. बसवणें म्हणजे जाणणें असा मराठी धातू आहे.] ( भा. इ. १८३५)
बसाव [ सो ४ अन्तकर्मणि. व्यवसायः = बसाव ] *(धातुकोश - बसाव १ पहा)*
बस्तान १ [ अवस्तान = बस्थान = बस्तान (अलोप) ] बस्थान म्हणजे अवस्था, स्थिति. (भा. इ. १८३६) (२) [ व्यवस्थान = बस्तान ] आधान, रहाणें, स्थिति. (३) [ अवस्थान =

बस्तान (अलोप) ] (४) [ अवस्थानं settled position = बस्तान ]

बहकणें [ बृह्, भष् भाषार्थे. बृह = बह = बहकणें ] *(भकणें पहा)*

बहर [ बर्हः = बहर ] बर्ह म्हणजे प्रामुख्य, प्राधान्य, व्याप्ति.

बहिण [ भगिनी = बहिणी = बहिण, बहिणा, बहिणी, वहिनी ] (स. मं.)

बहिणा, बहिणी [ भगिनी ] *(बहिण पहा)*

बहु [ बह्वयस् = भूयस. comparative of बहु अपभ्रंश ]

बहुत [ प्रभूत = पहूत = वहूत = बहूत, बहुत ] अस्य लक्ष्मी रपि प्रभूता जाता (धर्मदत्तचरितम्) = त्याला द्रव्य हि बहुत जालें. या बहुत शब्दाचा बहु या संस्कृत शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

बहुतशहाणा [ ईषदूनः विचक्षणः बहुविचक्षणः । बहुविचक्षणः = बहुत शहाणा ]

बहुतशहाणा म्हणजे शहाणपणांत किंचित् कमी, फार हुशार, अतिशहाणा इत्यादि ठिकाणीं फार, अति हे शब्द उणेपणा दाखवितात. विभाषा सुपो बहुच् पुरस्तात्तु (५-३-६८)

बहूत [ प्रभूत ] *(बहुत पहा)*

बळ [ वलय = वळ, बळ ] रोगविशेष.

बळकट [ बल + कट (साधनीभूत) = बळकट. मल + कट = मळकट. तैलोत्कट = तेलकट इ. इ. इ. ]

बळद, बळध [ बल् ११. बलं धत्ते = बळद, बळध ] बळद म्हणजे धान्य सांठविण्याची जागा. (धा. सा. श.)

बळस [ बलासः स्नेहभूस्थिरः ॥ (केयदेव - पथ्यापथ्यविबोध) बलास = बळस, बळसा ] लहान मुलांच्या घशांतून श्लेष्मा निघतो बळस. (भा. इ. १८३४)

बा १ [ वप्तृ ] *(बाप २ पहा)* (२) [ पाद = पाअ = वाअ = बा ] *(व्यक्तिनाम कोश - बा पहा)*

बाइका [ वामिका ] *(बाई १ पहा)*

बाइको [ बामिका = अवावा = बाइकाऊ = बाइको, बायको ]

बाइरी [ वामातरी ] *(बायडी पहा)*

बाइल [ महिला = वइ्ल = बइ्ल = बाइल] बाइल म्हणजे स्त्री.

बाइलघाण्या [ महिलाघ्नः ] *(घाण्या पहा)*

बाइलबडगा [ वप्त्रीबटिका = बाइलबडिगा = बाइलबडगा ] भार्या व रांड. बटु पोरगा याचें स्त्रीलिंग बटिका (पोरगी, दासी). (स. मं.)

बाइलवेडा [ महिलाविधेयः = बाइलवेडा ]

बाई १ [ (वामा) वामिका = बाई, बाइका] woman. (२) [ वप्त्री = बाई] progenitress, mother, woman. (३) [ भवती = बअई = बाई ] Lady. (४) [ भगवती = बअअई = बाई ] (५) [ भगवती = बअवई = बावी = बाई ] ये बाई = एहि भगवती. बाई भिक्षा वाढ = भवति भिक्षां देहि. भवती = बअई = बाई. (भा. इ. १८३४) (६) [ वप्त्री = वप्पी = बप्पी = बापी = बावी = बाई, बाय, बायो, बाईल, बायको, ब ] बीं पेरणारी. (स. मं.)

बाईबापडी [ वामावप्त्रिका = बाइबापडी = बाईबापडी ] वामा म्हणजे स्त्री व वप्त्रिका म्हणजे स्त्री. बायाबापड्या म्हणजे स्त्रिया.

बाईल [ वप्त्री ] *(बाई ६ पहा)*

बाईलवेडा १ [ महिलाविधेयः (subject

to wife) = बाईलवेडा, बाइलवेडा ] स्त्रीवश. (२) [ वष्त्रीविधेयः = बाईलवेडा. वष्त्री + ल (स्वार्थक) = बाईल ]

बाका १ [ वाग्यः speaking cautiously = बांका, बाका ] cautious and expert. (२) [ वक्कन् (Vakvan) great speaker, clever speaker = बाका, बाँका, बांका ] clever, efficient.

बाका - की - कें [ पाकः = वाका = बाका - की - कें ] पाकशब्दः प्रशंसायां प्राशस्त्ये व । (आश्वलायनगृह्यसूत्र गार्ग्यनारायणीयवृत्ति १-१-२) हा पाक शब्द अल्पत्वार्थक हि संस्कृतांत आहे. परंतु त्यापासुन मराठींत कोणता अपभ्रंश झाला आहे, तें सध्यां सुचत नाहीं. (भा. इ. १८३६)

बाँका [ वक्कन् ] *(बाका २ पहा)*

बांका [ वक्कन्, वाग्यः ] *(बाका २, १ पहा)*

बांकून [ वंक् १ कौटिल्ये. वंकित्वा = बांकून ] बांकून वागणें म्ह० कौटिल्यानें वागणें. (धा. सा. श.)

बागुर्डा [ वल्गुलकीटकः = बागुल्डा = बागुर्डा ]

बागुल १ [ वल्गु १ माधुर्ये, पूजायां. वल्गुल = बागुल ] (धा. सा. श.) (२) [ वल्गु = बागुल ]

बाचणें [ भाष् = भास् = बाच् (वाचणें) ] (भा. इ. १८३२)

बाज १ [ वाह्या = बाज, बाजलें ] बाजेवर बसून नद्या तरून जात. (२) [ मंचिका = वाजी = वाज = बाज ] वाज (खाट) शब्द ज्ञानेश्वरींत येतो. (३) [ भज् १ सेवायां. रंजाभाजः = रंडीबाज. गंजाभाजः = गांजेबाज. अहिफेनभाजः = अफीणबाज. स्मश्रुभाजः = मिशाबाज इ. इ. इ. ]

बाज हा फारशी हि शब्द आहे, परंतु वरील शब्दांत तो नाहीं. शिवाय फारशी बाज शब्द संस्कृत भाज शब्दाचाच अपभ्रंश आहे. (धा. सा. श.)

बाजत् [ बाह्यतः = बाजत् ]

बाजा [ वाद्यः = बाज्जा = बाजा ] वाद्यं कुरु = बाजा कर.

बाजारबसवी [ भार्यारु + उपवेशिनी = बाजारबसवी ] दुसऱ्याच्या स्त्रीच्या ठाईं प्रजोत्पादन करणारा असा जो त्याला अनुरक्त जी स्त्री तिला बाजारबसवी म्हणत. दुकानांचा समूह जो बाजार त्याशीं येथें वस्तुतः संबंध नाहीं. (भा. इ. १८३७)

बाजीकरी [ व्याजीक्रिया = बाजीकिरी = बाजीकरी = बाजीगरी ] व्याजीकरण म्ह० फसवणूक.

बाजीगरी [ वाजीक्रिया = बाजीगरी ] मंत्रौषधिक्रिया.

बाजीराव [ वत्सस्य पुत्रः वात्सिः । वात्सि = बाच्चि = बाची = बाजी. वात्सिराजः = बाजीराव ]

बाजें [ बाह्यं = बाजे, बाजें ] बाहेरील. बाजा गोष्टी काय कामाचीं?

बाट्या [ व्रात्यं = बाट्या ]

बाठी [ बीजाष्टिः (बीज + अष्टिः) = बिआठि = ब्याठी = बाठी ] आंब्याची बाठी.

बाड [ बद् १० भाषायां ] *(धातुकोश - बाड पहा)*

बांड १ [ वंड् to cover = वंड्यः = बांड] लुगडें धडोतीचें. (२) [ वंठः (अविवाहित तरुण पुरुष) = बांड ]

तरणा बांड म्हणजे तरणा अविवाहित पुरुष. (३) [ बन्धकी ] *(बांडगी पहा)*

**बांडगी** [ बन्धकी = बांडकी = बांडगी, बांड] ती बांड आहे म्हणजे पुंश्चली आहे. (भा. इ. १८३४)

**बांडगुळ १** [ वंदागुल्मं = वांडगुळ = बांडगुळ ] वंदा म्हणजे वृक्षादनी. (२) [ वनगुल्मः ] *(बाणगुळ पहा)*

**बाडा** [ बद् १० भाषायां ] *(धातुकोश - बाड पहा)*

**बाणगुळ** [ वनगुल्मः = बणगुळ = बाणगुळ = बांडगुळ ]

**बात १** [ वार्त्ता = वत्ता = बत्ता = बात] हकीकत. (भा. इ. १८३४) (२) [ व्याघात = बाहात = बात ] अडथळा. हें काम होणार नाहीं म्हणजे काय बात आहे = काय अडथळा आहे? (भा. इ. १८३४)

**बातमात** [ वार्त्तामात्रं = बातमात ]

**बातल, बाताड्या** [ वातिकः ] *(बात्या पहा)*

**बातुकली** [ व्यात्युत् + केलि mutual sport = बातुकली, भातुकली. (वि + आ + अति + उत्) ] पोरांची भातुकली girl's mutual sports.

**बात्या** [ वातिकः = बात्या ] वातिक म्हणजे धूर्त.

गीतनृत्यहसितैः उन्मत्ततां आवहंति वातिकाः। (बाण - हर्षचरित - चतुर्थोश्वास, पृष्ठ १३८, निर्णयसागर) बात्या, बाताड्या, बातल हीं ह्या शब्दाचीं रूपें आहेत. (भा. इ. १८३५)

**बादली १** [ वार्देलिका = बादोली = बादली] बादली म्हणजे विहिरींतून पाणी काढण्याचा डोल. (२) [ फालं कार्पासं बादरं (अमर - द्वितीयकांड - नृवर्ग १११) ] बादर म्हणजे कापसाचें वस्त्र, कापड. बादरकं = बादल (ला - ली - लें) मराठशाईत आहेरार्थ बादली देत असत. (भा. इ. १८३४)

**बांध** [ बंध = बांध (नदीचा) ] (भा. इ. १८३४)

**बांधवणें, बांधावणें** [ बधृ १० संयमने. बंधयति = बांधवणें, बंधापयति = बांधावणें ] (धा. सा. श.)

**बांधा** [ बंधक = बांधा (लागाबांधा) ]

**बांधे** [ वंदा = बांधा, बांधें ] बांधें म्हणजे वृक्षादनी.

**बांधेसूत** [ बद्धसूत्र = बाधसूत = बांधेसूत. बंधसूत्रित = बांधेसूत ]

**बाप १** [ पा = पालन करणें. कुर्भ्रश्च (उणादि सूत्र २२) प्रमाणें पपुः पालकः पपु = बपु = बापु = बप्प = बाप ] पिता. (भा. इ. १८३२) (२) [ वप्तृ = वप्प = बप्प = बाप, बापूस, बाप्या, बा ] बीं पेरणारा. (स. मं.) (३) [ द्व्यात्मन् = बाप्प = बाप ] तो माझा बाप आहे म्हणजे तो माझा दुसरा आत्मा आहे. (भा. इ. १८३४) (४) [ मराठी बाप शब्दाचें निर्वचन - ज्ञानप्रकाशाच्या ११ जुलैच्या (१९१०) अंकांत रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी यांच्या "मराठी शब्दसिद्धि" या पुस्तकाचें कोण्या परीक्षकानें त्रोटक परीक्षण केलें आहे. त्यांत बाप या शब्दाची जी व्युत्पत्ति रा. रा. जोशी यांनीं दिली आहे ती त्या परीक्षकाला मान्य नाहीं. अमान्यतेचें कारण तो येणें प्रमाणें देतो. "वप्तृ यापासून पकाराचा लोप होऊनच शब्द साधेल; असें एकही उदाहरण नाहीं

कीं, ज्यामध्यें प्त या जोडाक्षराचा उत्तर अवयव गळाला आहे." म्हणजे पकाराचा लोप होऊन वत्त असाच शब्द साधेल; वप्प असा शब्द कदापि साधणार नाहीं. असा या परीक्षकाचा अभिप्राय आहे. तो कितपत साधार आहे तें येथें पहावयाचें आहे.

२ कोणत्याही शब्दाच्या व्युत्पत्तीचा विचार तीन पद्धतींनीं करावा लागतो. पहिली आदेशपद्धति; दुसरी ऐतिहासिक पद्धति; व तिसरी तौलनिक पद्धति. पैकीं आदेशपद्धतीचा उपयोग दोन गतींनीं करतां येतो; अनुलोमगतीनें व प्रतिलोमगतीनें. मूळ वैदिक शब्द किंवा संस्कृत शब्द घेऊन त्याला महाराष्ट्री, अपभ्रंश व मराठी भाषांत येतांना कोणकोणते आदेश होऊन, मराठी रूप येतें, तें अनुलोमपद्धतीनें पाहावयाचें असतें. जेथें वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री किंवा अपभ्रंश ह्यांतील रूपें माहीत नसून केवळ मराठी रूपानें माहीत असलेला शब्द व्युत्पादावयाचा असतो, तेथें आदेशशास्त्रनियमानुसार त्या मराठी शब्दाचीं अपभ्रंश, महाराष्ट्री, संस्कृत व वैदिक रूपें कल्पावयाचीं असतात. जेथें अनुलोमदेशपद्धति, ऐतिहासिक पद्धति व तौलनिक पद्धति, या तिन्ही पद्धति थकल्या, तेथें ही प्रतिलोमदेशपद्धति लावणें अवश्य होतें. व्युत्पाद्य मराठी शब्दाचें वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री किंवा अपभ्रंश ह्यांपैकीं कोणत्याही भाषेंत पूर्वरूप आढळलें असेल, तर बाकी राहिलेल्या भाषांपुरतींच तेवढीं पूर्वरूपें आदेशनियमानुसार कल्पावीं लागतात. व्युत्पाद्य मराठी शब्दाचें पूर्वभाषांतील पूर्वरूप किंवा पूर्वरूपें ऐतिहासिक पद्धतीनें सांपडतात. तीं सांपडलीं असतां आदेशपद्धतीचा व ऐतिहासिक पद्धतीचा मिलाफ होतो व निर्वचन बलवत्तर होतें.

३. ह्या तीन पद्धतींतून बाप ह्या मराठी शब्दाला प्रथम ऐतिहासिक पद्धति लावली असतां निरुक्ति सुकर होईल. कारण मग कल्पनेचें काम म्हणजे प्रतिलोमादेशपद्धतीचें काम फार थोडें राहील, कदाचित् बिलकुल राहाणार नाहीं. बाप हा शब्द मराठींत पितृवाचक आहे. ह्या शब्दाचें अपभ्रंशांत व महाराष्ट्रींत कोणतें रूप होतें तें ग्रंथांतरीं सांपडल्यास पाहावयाचें आहे.

डॉक्टर फ्लीट यांनीं corpus Inicriptionum Indicarum च्या तिसऱ्या खंडांत वलभ्रीच्या चवथ्या शिलादित्याचा शक ६८९ तला एक ताम्रपट दिला आहे. त्यांत बप्प हा महाराष्ट्री शब्द आला आहे.

"परमभट्टारक - महाराजधिराज - परमेश्वर - श्री बप्प - पादानुध्यातः"

ह्या पदांचें डॉक्टर फ्लीट येणेंप्रमाणें इंग्रजी भाषांतर देतात :-

"Who meditated on the feet of the परमभट्टारक, महाराजाधिराज and परमेश्वर "his glorious father". म्हणजे बप्प या शब्दाचा अर्थ father असा डॉक्टर फ्लीट करतात. हा शब्द जुना प्राकृत म्हणजे महाराष्ट्री आहे, संस्कृत नाहीं, असेंही डॉक्टर सांगतात. इतकेंच नव्हे, तर त्यापासून मराठी बाप शब्द निघाला असेंही स्पष्ट सुचवितात.

बापाला गौरवानें पितृपादाः असें

म्हणण्याची चाल होती तीच बप्पपादाः या महाराष्ट्रीसंस्कृत सामासिक शब्दांत दिसून येते. बप्प = पितृ

हा बाप शब्द इतरही आणीक अनेक काश्मीर कांची वगैरे देशांतील ताम्रशिलालेखांतून सांपडतो. मेवाडच्या गुहिलवंशाचा मूलोत्पादक जो पुरुष (A. D. 735) त्याचेंही नांव बप्प होतें. शक ४०५ मधल्याही एका ताम्रपटांत (C. I. I. Vol. III, No. 22) बप्प शब्द आलेला आहे; आणि तो आणखी विशेषनाम म्हणून आलेला आहे. म्हणजे शक ४०५ च्या अगोदर बरींच शतकें हा शब्द सामान्यनाम म्हणून प्रचलित असला पाहिजे. तात्पर्य, शातवाहनांच्या कालीं महाराष्ट्रांत हा शब्द होता. निदान शक ४०५ च्या सुमारास चांगलाच प्रचलित होता.

एवंच बाप या शब्दाची महाराष्ट्री बप्प या शब्दापर्यंत पिढी लागली.

कादंबरीच्या उत्तरभागारंभीं बाणतयानें खालील उद्गार काढले आहेतः-

बीजानि गर्भितफलानि विकाशभांजि
वप्त्रैव यान्युचितकर्मबलात्कृतानि।
उत्कृष्टभूमिविततानि च यांति पोषं
तान्येव तस्य तनयेन तु संहतानि ॥

येथें वप्तृ या शब्दाचा अर्थ पिता असा आहे. शिवाय कोणत्याही चांगल्या कोशांत वप्तृ या शब्दाचा अर्थ पिता, बींजी असा सांपडेल.

एवंच, संस्कृत वप्तृ, महाराष्ट्री बप्प व मराठी बाप अशीं हीं तीन रूपें आपल्या पुढें आहेत. तिहींचा अर्थ पिता असा आहे. पैकीं महाराष्ट्री बप्प व मराठी बाप या शब्दांची आदेशप्रक्रिया सर्वमान्य आहे. संयुक्ताक्षरापरत्वामुळें मागील स्वराला दैर्घ्य येऊन संयुक्ताक्षर असंयुक्त झालें आणि बप्प चें बाप झालें.

अपभ्रंशांतील बापु हें रूप उकार लागून बनलेलें आहे, आणि तें विचारांत घेण्यासारखेंही नाहीं. सबब, निर्देशमात्रानें त्याची बोळवण करून, संस्कृत वप्तृ व महाराष्ट्री बप्प यांचा आदेशसंबंध कोणता तें सांगतों.

वप्तृ शब्दापासून बप्प शब्द निष्पादितांना ज्ञानप्रकाशांतील परीक्षकाला जी अडचण आली ती ही कीं, प्त चा प्प होणें शक्य नाहीं. तेव्हां कोणत्या किमयेनें तो तुम्ही बनवितां तें बोला, नाहीं तर आपली चूक कबूल करा, असा त्याचा प्रश्न आंहे.

संस्कृतांतून महाराष्ट्रींत येतांना प्त चा त्त हा आदेश नियमानें होतों, हें परीक्षकाप्रमाणें मलाही मान्य आहे. लवरखेरीज करून संयुक्त व्यंजनांतील उपरिष्ठ हलाचा लोप होतो व अधःस्थ हलाचा होत नाहीं, असा नियम आहे. तो प्त च्या बाबतींतही खराच असणार. संस्कृतांतून महाराष्ट्रींत येतांना प्त तील उपरिष्ठ जो प् त्याचा लोप होतो व अधःस्थ त ला द्वित्व येतें - या नियमाप्रमाणें पाहातां, वप्तृ या शब्दांतील (प्त चा त्त होऊन वत्तु असें महाराष्ट्री रूप व्हावें; जसे नप्तृ = नत्तु) परंतु तें तसें होत नाहीं हें तर आपण प्रत्यक्ष पाहातों. तेव्हां याला तोड काय करावी व ह्या अडचणींतून कसें निघावें? अथवा बाब दुर्भेद्य व असाध्य म्हणून तशीच सोडून द्यावी व हताश होऊन स्वस्थ बसावें? बाप, बप्प व

वप्तृ हे तीन पितृवाचक शब्द मुलगा, बाप व आजा ह्या क्रमानें एकाच वंशाचे व बीजाचे आहेत ह्यांत संशय नाहीं. कां कीं, बप्प ह्या महाराष्ट्री शब्दाचें संस्कृत मूळ शोधून काढण्यास प्रतिलोमादेशपद्धतीनें ज्या अटी हव्यात त्यांपैकीं बहुतेक सर्व वप्तृ ह्या शब्दांत आढळतात. (१) शब्द त्र्यक्षरी पाहिजे. (२) त्याचें आद्याक्षर आदेशानें ब होण्यासारखें पाहिजे. आणि (३) द्वितीयाक्षर संयुक्त असून आदेशानें प्प होण्यासारखें पाहिजे. पैकीं पहिल्या दोन अटी वप्तृ ह्या शब्दांत आहेत. तिसरी अट मात्र ह्या शब्दांत सकृत्दर्शनीं आढळत नाहीं. ऐतिहासिक पद्धतीच्या जोरावर एवढें तर निखालस म्हणतां येतें कीं, इष्ट शब्द वप्तृ तर असलाच पाहिजे. आदेशप्रमाणच्या दोन अटीही तेंच सांगतात. तेव्हा प्रमाणांचा तर जोर वप्तृ ह्या शब्दाला सडकून आहे. एक तिसरी अट मात्र सकृत्दर्शनीं आड येते. ती टाळावयाचा रस्ता येणेंप्रमाणें :-

आत्मन् ह्या शब्दाला अप्प व अत्त असे दोन आदेश होऊन दोन प्रकारचीं रूपें साधतात. हे अप्प व अत्त आदेश आत्मन् ह्या शब्दापासून निर्वचनकार येणेंप्रमाणें साधितात. आत्म. = आत्व = आत्प त्म चा त्व, त्व चा त्प, आणि त्प चा प्त होतो, असें सांगण्याचा आशय आहे. आत्प ह्या आदेशाचें आप्त रुपांतर होतें, असें मानिल्याशिवाय अत्त हें रूप साधत नाहीं. ह्या स्थलीं त् आणि प् यांचा स्थलव्युत्क्रम होतो. तसाच स्थानव्युत्क्रम वप्तृ ह्या शब्दांत होऊन वप्त्‌ृ असें रूप होतें व उपरि लोप होऊन बप्प असें रूप बनतें. वप्प चें बप्प होतें, व बप्प चें मराठींत बाप होतें. वत्पृ पासून वप्प बनण्यास स्थानव्युत्क्रमाच्या नियमाचा आश्रय करावा लागतो. तो करणें निरुक्तिशास्त्राच्या नियमांना धरूनच आहे.

स्थानव्युत्क्रमाचा आश्रय करावयाचा नाहीं, असा आग्रह धरावयाचा असल्यास, बप्प ह्या शब्दाचें निर्वचन अन्यमार्गानेंहीं देतां येण्यासारखें आहे. वप् ह्या धातूपासून वापक असें नाम बनतें व त्याचा अर्थ वप्तृ सारखाच बहुतेक होतो. मग,

वापक, = बावअं = बापअ = बप्पअ = बप्प असें परंपरित रूप साधतां येतें. हें रूप चार मजल्यांनीं साधलें. परंतु वप्तृ = वत्पृ = बप्प

हें रूप दोन मजल्यांनींच साधतें. सबब ह्या दुसऱ्या रूपसिद्धीचा सौलभ्यास्तव मी आश्रय केलेला आहे. हा आश्रय अक्षरव्युत्क्रमाच्या नियमाला धरून आहे. तेव्हां तो सशास्त्र आहे, ह्यांत संशय नाहीं. मी आपल्या ज्ञानेश्वरीचें प्राचीनत्व सिद्ध करण्याकरितांच केवळ बाप हा शब्द वप्तृ ह्या शब्दापासून साधला असें नाहीं. तर तो तसा शास्त्रानुसार साधला जातोच. बाप शब्द वापक शब्दापासून साधला तथापि त्यानें माझ्या ज्ञानेश्वरीचें प्राचीनत्व अणुमात्र ढळत नाहीं. वापक या शब्दाहून वप्तृ हा शब्द संस्कृतांत जनक ह्या अर्थी विशेष प्रचलित असल्यामुळें तो मीं स्वीकारिला आहे. ह्याहून दुसरा

हेतु नाहीं. ह्या दोन व्युत्पत्त्या बाप ह्या शब्दाच्या मला दिसतात. ह्याहून सरस अशी एखादी व्युत्पत्ति परीक्षक जर दाखवूं शकेल तर ती स्वीकारण्यास माझ्याकडून कांकूं होणार नाहीं. (ज्ञानप्रकाश, आषाढ शु. २ शके १८३२)

बापदादे - जन्म देणारे व अन्न देणारे. (स. मं.)

बापु [ चातक ह्या अर्थी बापु शब्द महाराष्ट्रींत आहे. ज्ञानेश्वरींत बापिया असा शब्द आहे. हा शब्द संस्कृत पा धातूपासून आला आहे. हा शब्द संस्कृत पा धातूपासून आला आहे. पा = पिणें. पपु = पिणारा. पपुरेव पापुः. पापु = बापु = बापिया, = बापु ] बापु म्ह० चातक. (भा. इ. १८३२)

बापुचातक – ज्ञानेश्वरींत बाप, बापु हा शब्द ह्या अर्थी येतो. त्याचें मूळ प्राकृत बप्पीहो. धनपालाच्या पाइलच्छींत खालील शब्द आहेत :–

गहरो वओ य गिद्धो सारंगो चायओ य बप्पीहो ॥ १२६ ॥

ज्ञानेश्वरींतील चातकार्थक जो बापु शब्द तोच मराठींतील पुरुषवाचक प्रेमार्थी बापु शब्द होय. (स. मं.)

बापुडीं [ पापधियः, पापिष्ठाः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४४)

बापू [ वापीह ] *(बप्पीह पहा)*

बापूस, बाप्या [ वप्तृ ] *(बाप २ पहा)*

बाबजादे = बापाची पोरें (बिनबापाच्या पोरांहून भिन्न.) जाद हा फारशी शब्द आहे. (स. मं.)

बाबरझाटी [ वर्वरीकः (कुटिल केशः) = बाबर ] बाबरझाटी म्हणजे कुटिल केशांचें जुंबाड.

बाबा [ भावः = बाबा ] (भा. इ. १८३४)

बाभूळ [ बभ्रुल = बब्भुल = बाबुळ = बाभूळ = बाभळ ] बभ्रु रंग ज्या झाडाच्या सालीपासून निघतो तें झाड. बाभळी रंग भगव्या रंगाहून निराळा असतो. भगवा रंग जास्त चकाकणारा असतो. बाभळी रंग फिकट व निस्तेजस्वी असतो. (भा. इ. १८३३)

बामणबुवा [ ब्राह्मणब्रुवः = बामणबुवा ] (भा. इ. १८३४)

बाय [ वप्त्री ] (बाई ६ पहा))

बॉय Boy [ पोत = वोअ = वोय = Boy] (भा. इ. १८३३)

बायको १ [ वामिका + अवावा ] *(बाइको पहा)* (२) [ वप्त्री ] *(बाई ६ पहा)*

बायडी, बायरूं [ वामातरी = बाइरी, बायडी. प्रेमदर्शक बायरूं ]

बायो [ वप्त्री ] *(बाई ६ पहा)*

बार [ भारः = बार ] बंदुकींत बार भरणें म्हणजे दारूचें द्रव्य ठासणें.

बारगीर [ वारकीरः (Porter) = बारगीर] वारकीर म्हणजे हमाल. लाख्या बारगीर, ह्या प्रयोगांतील बारगीर शब्द संस्कृत वारकीर शब्दापासून निघालेला आहे. फारशी बारगीर शब्द निराळा. (भा. इ. १८३६)

बारडी [ वार्धिः (वार् + धिः) = बारढी,= बारडी ] पाणी सांठवण्याचें भांडें.

बारबोडी [ वारवधूकः ] *(बारबोड्या १ पहा)*

बोरवोड्या १ [ वारवधू - वारवधूकः (रांडांचा नायक, कुंटण, नपुंसक) = बारबोड्या ] (२) [ द्वारमोटकः = बारवोडआ = बारबोड्या ] बारबोडी

गाय, बारबोडा घोडा, बारबोर्डे डुकर म्हणजे सबंद दारचें दार मोडणारी गाय, घोडा किंवा डुकर. हा अपशब्द मराठींत गणतात, परंतु तसा प्रकार नाही. खुंटमोडओ हत्थी = खुंटबोड्या हत्ती. (भा. इ. १८३६)

बारव [ वारिवह् = बारिव = बारव ] एक प्रकारचा वाहता कूप.

बारा [ व्यपरदशन् ] *(अकरा २ पहा)*

बारी [ द्वारिका (दार) = बारी ] बाहेरबारी = बहिर्द्वारिका. नगरबारी = नगरद्वारं. चारबारी = चतुर्द्वारिका.

बारीक १ [ वरीयस्क excellent, superior = बारीक ] superior बारीक काम तो स्वतः करतो he manipulates the superior work. (२) [ अर्भक small = (अलोप) बारीक ] small.

बार्गळ [ व्यर्गलं = बार्गळ. व्यर्गलं = निरर्गलं.

बार्डी १ [ वार्धिः = बार्डी ] बार्डी म्हणजे पोहरा. वार्धिः म्हणजे पाण्याचा सांठा. (२) [ वार्धिः = (ocean, receptacle of water) = बार्डी ]

बाल [ वाल = बाल ] कोवळे केंस. (ग्रंथमाला, स. मं.)

बालंट [ व्यलीककटं = बालिअअट = बालट = बालंट ]

बालू [ बल्लव (गुराखी) = बालू ] गुराखी लोकांना संस्कृतांत बल्लव म्हणत. कोंकणांतून मुंबई वगैरें शहरीं घरकाम करण्याकरितां जे कोकणे येतात त्यांना सर्वांना बालू म्हणतात. हे सर्व पूर्वी गुराखी होते.

बावची [ बाकुची = बावची ]

बावरणें [ बाभ्रश्यते (भ्रंश्) = बावरणें ] बावरणें म्हणजे अतिशय भ्रंश पावणें. (भा. इ. १८३६)

बाँवरणें [ भ्रम् (बंभ्रम्यते) = बाँवरणें ] (भा. इ. १८३६).

बावळ [ व्याकुल = बाउळ = बावळ (ळा - ळी - ळें) ] भयव्याकुलः = भयानें बावळा. (भा. इ. १८३५)

बावा १ [ वर्मन्. गोंविदवर्मन् = गोंदबाबा] (२) [ भवत् ] *(बवा पहा)* (३) [ भगवत् ] *(बोवा पहा)*

बावासा [ भवादृशः = बावाइसा = बावासा. त्वादृशः = तुसा. मादृशः = मीसा. कृष्णादृशः = कृष्णासा. तात्पर्य हा स (सा - शी - सें) प्रत्यय दृश ह्या संस्कृत प्रत्ययापासून आलेला आहे व तो मराठींत वाटेल त्या नामाला लागतो. (भा. इ. १८३४)

बाव्हटा १ [ बाहुपुटकः = बाव्हटा ] (२) [ बाहुअस्थि = बाव्हड्डि = बाव्हटी, बाव्हटा ]

बाव्हली [ पुत्तलिका ] *(बाहुली २ पहा)*

बाव्हळ [ बाहुमूल = बाव्हळ ] The base of the arm.

बासट [ सट्ट ]

बांसड [ वंशान्धः = बांसड ] टिरी.

बासन १ [ भृज्जनं (तवा, कढई इ. शिजविण्याचीं भांडी) = बासन. ] (२) [ वसनस्य इदं वासनं. वासन = बासन ] वसन (वस्त्रें) बांधण्याचें कापड तें बासन. (भा. इ. १८३३) (३) [ भाजन = बासन ] बासन म्हणजे भांडें. (भा. इ. १८३४)

बाहणा [ भावना = बाउणा = बाहणा ] बाहाना हा फारसी शब्द निराळा. बाहणा म्हणजे भावकरण.

बाहणें १ [ आवाहनं = वावाहणँ =

बाहणें] बाहणें म्हणजे बोलावून आणणें. हा शब्द जुन्या मराठींत आढळतो. (भा. इ. १८३४) (२) [ बाह् १ प्रयत्ने. बाहनं = बाहणें] बाहणें म्हणजे आपलेकडेस आणण्याचा प्रयत्न करणें. (धा. सा. श.) (३) [ व्याव्हानं ] *(बाहाणें पहा)*

बाहवा [ व्याधिघातः = बाहिहाआ = बाहावा = बाहवा ]

बाहाणें [ व्याव्हानं = बाहाणें, बाहणें ] व्याव्हे म्हणजे निरनिराळ्या माणसांना निरनिराळें बोलावणें. (भा. इ. १८३६)

बाहार १ [ व्याहृति (मधुर नर्मभाषण) = बाहार ] ह्या गाण्यांत काय बहार आहे? (२) [ व्याभारः = बाहार = बाहार किंवा भारः = बाहार ] (भा. इ. १८३४)

बाहुल [ पुत्तल = वुत्तल = बुअल = बउल = बाहुल (ला - ली - लें) ] (ज्ञा. अ. ९ पृ. २६)

बाहुली १ [ भावली (गारोड्याचें हावभाव करणारें लांकडाचें मनुष्याकृति यंत्र) ] (स. मं.) (२) [ पुत्तलिका = (बुहली) = बाहुली, बाव्हली, भावली, भाउली. पुत्तलकं = बाहुलें ]

बाहुलें [ पुत्तलकं ] *(बाहुली २ पहा)*

बाहू [ बाह = बाहू ] (स. मं.)

बाहेरचें [ बहिस्थं ] *(कोठचें पहा)*

बाळ [ बाल = बाळ ] (स. मं.)

बाळगणें [ वल्गु २ माधुर्ये, पूजायां. वल्गूयति = बाळगतो ] गाय बाळगणें म्हणजे तिशीं माधुर्यानें वर्तन करणें. (धा. सा. श.)

बाळंत, बाळंतीण [ बालांतर्वत्नी ] *(बाळांतीण पहा)*

बाळंतें [ बालांतर्वत्नीवस्त्रं = बाळंतें ] बाळंतिणीचीं वस्त्रें.

बाळसें [ बालिश्यं = बाळसें. ब्राह्मण्यादि गण]

बाळांतीण [ बालांतर्वत्नी = बाळांतीण, बाळंतीण, बाळंत ]

बाळिंगा [ बाललिंगः = बाळिंगा ] तरुण एडका.

बाळी [ भल्ली = बल्ली = बाली = बाळी] अलंकार. कस्तूरी तिलकं बाले भाले भल्ली विराजते.

बाळें [ बाल्यं = बाळें ] म्हातारचळ.

बि [ वि = बि ] करणेंबिरणें = विकृ. निजणेंबिजणें = विनिद्रा. बि नें हजारों धातू मराठींत संस्कृतांतल्याप्रमाणें होतात.

बिंग [ व्यंग = बिंग ] (भा. इ. १८३४)

बिंगाट [ व्यंगार्थ ] *(बिंगाड पहा)*

बिंगाड [ व्यंगार्थ the state of being crippled = बिंगाड, बिंगाट ] व्यंग.

बिग्राणी [ विक्रेणी ] *(जवकिरा २ पहा)*

बिघा १ [ (द्विगुः) द्वैगवः = बिघा ] बिघा म्हणजे दोन बैलांनी नांगरली जाईल इतकी जमीन. (२) [ द्विग्रहक = बिघअ = बिघा ] (ग्रंथमाला)

बिघाड १ [ विघटन = विघडन = बिघडण = बिघडण नाम, बिघाड ] (ग्रंथमाला) (२) [ अभिघात = बिघाड ] (भा. इ. १८३६) (३) [ विघात = बिघाड] (भा. इ. १८३६) (४) [ बिघाटः = बिघाड ] (भा. इं. १८३६)

बिचकणें १ [ विज् ३ भयचलनयोः विज्काम्यति = बिचकणें ] भयानें चलन पावणें. (धा. सा. श.) (२) [ बिचक् (चक् भिणें) = बिचकणें (भा. इ. १८३६)

बिछाना [ विशायः (Turn of sleeping पाणिनि ३-३-३९) विशायनः = बिछाना ] sleeping clothes.

बिजवर [ विजामातृ one who has purchased a wife = बिजवर ] a man who marries a second wife of course with money. द्वितीयवर ह्या शब्दाशीं कांहींएक संबंध नाहीं.

बिजागरी [ बीजार्गला = बिजागरी ]

बिजौरा [ बीजपूरक = बिजौरा ] (भा. इ. १८३४)

बिटा [ वृथा ] *(बेटा पहा)*

बिडती [ द्विधागतिः, द्विधास्थितिः = बिडती] दोहोंकडून अडचणीची स्थिति.

बिडलोण [ विड्लवण = बिडलोण ] (भा. इ. १८३६)

बिंडा [ द्व्यंडकः = बेंड्या having two testicles बिंडा (a proper name in मराठी) ]

बिडाल [ विटाद = बिडाल ] विट म्हणजे उंदीर व अद म्हणजे खाणारा - मूळ संस्कृत शब्द विटाद. त्याचा अपभ्रंश बिडाल. कालान्तरानें विटाद शब्द मागें पडून बिडाल शब्द च संस्कृत म्हणून रूढ झाला.

बित्तंबातमी - बातमी हा बातनी ह्या फारसी शब्दापासून मराठींत आला आहे व बित्तं हा शब्द संस्कृत वृत्त शब्दापासून किंवा विवृत्त शब्दापासून निघाला आहे.

वृत्त = वित्त = बित्त.

विवृत्त = बिवत्त = बिअत्त = बित्त.

विवृत्त म्हणजे विशेष वृत्त.

बित्तंबातमी हा मुसलमानी अमलानंतर मराठींत जोडशब्द बनला आहे. बित्तं म्हणजे बातमी. (भा. इ. १८३६)

बिथरणें [ वितर्जन = बिथर्रण = बिथरणें. विर्तज् गर्हायां । ]

बिदा [ विद्या = बिदा ] ही बिदा तुम्ही कोठें शिकलां = इयं विद्या युष्माभिः क्वाधीता?

बिदा करणें [ वि + दा to grant = बिदा करणें. ] to grant, to gift.

बिंदुलें [ बिंदु a detached partical. बिंदुलः तस्य भावः बैंदुल्यं detachment वेगळेपणा. बैंदुल्यं = बिंदुलें. बिंद् अवयवे to split, to detach ] (ज्ञा. अ. ९)

बिदौणी [ द्विदोणिकः = बिदौणी, बिदौनी (a district)

बिन [ विहीन (वि + हीन) = बिन विहीनवस्त्रं = बिनवस्त्र. (adj. or adv.)

बिनसणें [ वि + नश् = बिनस (णें) ] कुंसगेन पुत्रो विनश्यति (धर्मदत्तचरितम्) (भा. इ. १८३४)

बिन्मोल [ विनामूल्यं = बिन्मोल (क्रियाविशेषण) बिनमोल ]

बिबवा वाघ [ बिंबक = बिब्बअ = बिबव = बिबवा ] वाटोळे ठिपके आहेत तो. (ग्रंथमाला)

बिबोटी [ विभूति = बिबोटी ] Medicine given to children, ashes of some herbs.

बिब्बा [ विभाषा = बिबासा = बिबाहा = बिब्बा ] त्यानें ह्या कामामध्यें बिब्बा घातला म्हणजे विकल्प घातला. येथें बिब्बा म्हणजे विकल्प असा अर्थ आहे. बिब्बा घालूं नको म्हणजे हें करूं कां तें करूं असा विकल्प आणूं नको. (भा. इ. १८३६)

बिब्बा (वाघ) [ द्विपिन् = बिबिअँ = बिब्बा, बिब्या ]

बिब्या वाघ १ [ द्विपिन् = बिबिआ =

बिब्या = बिब्बा ] बिब्बा नांवाच्या झाडाशीं व त्याच्या फळाशीं ह्या शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. व्याघ्रः पंचनखो द्वीपी ॥ (भा. इ. १८३७) (२) [ द्वीपी व्याघ्रः = बिब्या वाघ ] द्वीपी म्हणजे बेटासारखे ठिपके असलेला वाघ.

**बियाळ** [ बीजलः = बियळ = बियाळ ] सिध्मादिभ्यश्च (५-२-९७)

**बिरडणें** [ अर्द् १० हिंसायाम्. व्यर्दनं = बिरडणें. ] चिरडणेंबिरडणें = अत्यर्दनंव्यर्दनं (धा. सा. श.)

**बिरडी १** [ विरूढ (मोड आलेला दाणा) विरूढीः = बिरडी ] (२) [ विरुध्] *(विरढा पहा)*

**बिरड्या** [ विरूढिका = बिरूडिआ = बिरुड्या = बिरड्या ] विरूढक म्हणजे मोड आलेलें धान्य. (भा. इ. १८३४)

**बिरबिरीत** [ वि + री ४ स्रवणे ] *(धातुकोश - बिरबिर पहा)*

**बिराजा** [ द्वैराज्यं = बिराजा ] Divided dominions एक्कल काजा । दुद्धी बिराजा.

**बिराढ १** [ विराध Vexation, annoyance = बिराढ, बिऱ्हाड, बिऱ्हाढ ] Vexation. हें बिराढ एकदां जाऊं द्या. - Let us rid of this annoyance. म. धा. १९ (२) [ वि + राध् to hurt, offend विराद्धं = बिराढ, बिऱ्हाड, बिऱ्हाढ ] Vexation. हें काय बिऱ्हाड आणिलें आहेस What is this plague you have brought? (३) [ विराष्ट्र ] *(धातुकोश - बिऱ्हाड १ पहा)*

**बिराहाड** [ विराष्ट्र ] *(धातुकोश - बिऱ्हाड १ पहा)*

**बिरीद** [ वि + रुद् - बिरुदम् ] *(ब्रीद पहा)*

**बिरुध** [ वीरमुद्रा = बिरुद ] वीराचें वीर्यदर्शक चिन्ह.

**बिरूद** [ वि + रुद् - बिरुदम् ] *(ब्रीद पहा)*

**बिऱ्हाड १** [ विराद्धम् ] *(बिराढ १ पहा)* (२) [ विराध ] *(बिराढ २ पहा)* (३) [ विराष्ट्र ] *(धातुकोश - बिऱ्हाड १ पहा)* (४) [ वि + राध् ]

**बिऱ्हाढ** - [ विराध ] *(बिराढ १ पहा)*

**बिलगणें १** [ अपिलग् = पिलग् = बिलग् अथवा विलग् = बिलग् ] दोहींचा अर्थ एखच, चिकटून असणें. (भा. इ. १८३३) (२) [ विलग्न = बिलगणें] (भा. इ. १८३४)

**बिलबिलीत १** [ बिल् भेदने (द्वि.) ] *(धातुकोश - बिलबिल २ पहा)* (२) [ ब्ली to crush (द्वि.) ] *(धातुकोश - बिलबिल १ पहा)*

**बिल्ली** [ बिडाली = बिलाली = बिल्ली ] मांजरी. (भा. इ. १८३३)

**बिवड** [ विवर्तकः = बिवड ] पिकाचा पालट करणारा. (ज्ञा. अ. ९ पृ. १८२)

**बिवशी** [ पितृस्वसृ ] *(पिवशी पहा)*

**बिशी १** [ बृसी (ब्रुवन्तः अस्यां सीदन्ति, पढणारे जींत राहतात ती जागा, खाणावळ ) = ब्रिशी = बिशी ] खाणावळ. (भा. इ. १८३३) (२) [ विशिपं abode = बिशी ] An abode or धर्मशाळा for लिंगायतs and जैनs. (३) [ (वि + शी) विशय = बिशी = भिशी ] धर्मशाळा, उतरण्याची जागा. (भा. इ. १८३४) (४) [ वृषी (व्रतिनां आसनं) = ब्रिसी = बिसी, भिसी, बिशी, भिशी ] लिंगायतांच्या भिक्षुकांच्या राहाण्याच्या

जागेला बिसी, भिसी सध्यां म्हणतात.

बिसुमार [ विस्मारं = बिसुमर = बिसुमार = बेसुमार ] बेसुमार म्हणजे ध्यान न ठेवितां. बेसुमार काम करितो म्हणजे मागेंपुढें लक्ष्य न ठेवतां काम करतो. फारसी बेसुमार शब्द निराळा. (भा. इ. १८३४)

बिस्तारा [ विस्तार ] *(थारा ३ पहा)*

बिळगणें [ विलगनं = बिळगणें ] (भा. इ. १८३५)

बीजागरी [ बीजार्गला = बीजागरा = बीजागरी ]

बीजें १ [ वृश्यः going (masc.) (from विच्छ् to go) = बीजें neuter ] बीजें करणें. to effect going. (२) [ वि + या - वियातं departure = बीजें (ज्ञानेश्वर) ] departure. बीजें केलें.

बीड [ कीटाद्दशगुणं मुंडं मुंडात्तीक्ष्णं शताधिकम् ।
कांतं लक्षगुणं प्रोक्तं बिडालंच तदर्थकम्।।
बिडाल = बीड (लोखंडाचा प्रकार) ] (भा. इ. १८३४)

बीत [ द्वितय = बितअ = बीत (फांशांची)] (भा. इ. १८३४)

बीद - बिदा [ विधा (प्रकार) = बीद. (अनेकवचन बिदा ] त्याच्याजवळ लपंडावीच्या कितीतरी बिदा आहेत. म्हणजे प्रकार आहेत. (भा. इ. १८३४)

बीन [ वीणा = बीणा = बीण = बीन ]

बीवड १ [ विवृद्ध ] *(बेवड पहा)* (२) [ वीवध (धान्यसंचय) = बीवड]

बीळ [ विल्लं = बीळ ]

बुकलणें [ वृष् १० हिंसायाम् ] *(बुक्का पहा)*

बुक्का १ [ वृष् १० हिंसायाम् = बुकलणें. वृषः = बुक्का, बुक्की ] (धा. सा. श.) (२) [ वृकधूपः = बुक्का (धूपचा लोप). अनेकपदार्थकृतधूपस्य धृकधू इति नाम । ]

बुचकळा [ बुभुत्सुकला = बुच्चकळा = बुचकळा ] state of wanting to know, i. e. suspense.

बुचकावणें [ बुध् १ बोधने ] बैल बुझतो = बुध्यते बलीवर्दः .
तो बैलाला बुझवतो = सः बलीवर्दं बोधयति
तो बैलाला बुझकावतो = सः बलीवर्दं बोधकाम्यति. (बुझावा अशी इच्छा, प्रयत्न करतो)
बोधकाम्यति = बुझकावणें, बुझगावणें, बुजगावणें, बुचकावणें. (धा. सा. श.)

बुचडणें [ व्युच्चरणं = बुचडणें ] तां व्युच्चरति = तिला बुचडतो. बुचाडणें. व्युत्सादनं = बुचाडणें. व्युत्सादयति = बुचाडतो. बुचाडणें. व्युच्चाटनं = बुचाडणें. (भा. इ. १८३६)

बुचडा १ [ वृज् (वांकडें होणें) = वुज = बुज = बुच = बुचडा ] (स. मं.) (२) [ बद्धचूडा = बचूडा = बुचडा ] बुचडा म्हणजे बांधलेले केश.

बुचाडणें [ व्युत्सादनं = बुचाडणें. व्युच्चाटनं = बुचाडणें. ] (बुचडणें पहा)

बुच्चें १ [ व्युत्तंस = बुच्चें ] अलंकार नसलेलें नाक वगैरे. (२) [ व्युत्थं = बुच्चें ] नथेशिवाय नाक बुच्चें दिसतें = नस्तिकां विना नासिकं व्युत्थं दृश्यते.

बुजगावणें [ बोधकाम्यति ] *(बुचकावणें पहा)*

बुजबुजाट [ बुद्बुदालिः = बुजबुजाट ] बुडबुड्याप्रमाणें गर्दी.

बुझकावणें, बुझगावणें [ बोधकाम्यति ] *(बुचकावणें पहा)*
बुझणें [ बोधनं = बुझ्झणँ = बुझणँ = बुझणें ] (स. मं.)
बुझे [ बुध्यते = बुज्झए = बुझे = बुजे ] (भा. इ. १८३३)
बुट्टी [ व्युति = बुट्टी ] *(धातुकोश - बुटव पहा)*
बुडणें [ व्रुड ६ संवरणे. व्रुड् (बुडणें) = बुड] (भा. इ. १८३६)
बुडी [ बुल्लिः (बुल् बुडणें), बुडिः (बुड् संवरणे) ] ( ज्ञा. अ. ९ पृ. ७८)
बुढ्ढा बेटा कोणी ब्राह्मण [ वृद्धविटः कोपि ब्राह्मणः = बुढ्ढा बेटा कोणी ब्राह्मण. दशकुमारचरित्र पंचमोश्वासः ]
बुथी, बुंथी [ बृहतिका = बुथी, बुंथी ] *(धातुकोश - बोथार पहा)*
बुंद [ वृंद (मोठें) = बुंद ] खाऊन बुंद झाला आहे.
बुंधा [ बृध्नः ] *(बूड १ पहा)*
बुबुळ [ बुद्बुर = बुब्बुल = बुबुल ] (भा. इ. १८३२)
बुबूळ [ बुळबुळीत डोळ्यांतील भाग तो ] (स. मं.)
बुभुक्कार [ बुक्कार = वानराचा शब्द, सिंहाचा शब्द ] (ग्रंथमाला)
बुरख [ वृक् आदाने ]
बुरखंड [ वृक्षस्कंधः, वृक्षखंडः वा = बुरखांड, बुरखंड ]
बुरखणें [ वृक्ष् १ आस्तरणे = बुरखणें, बुर्खा (cover for face) ] (धा. सा. श.)
बुरखा १ [ मुखरक्षः ] *(भुरका पहा)* (२) [ वृक्ष् १ आस्तरणे ] *(धातुकोश - बुरख पहा)*
बुरखांड [ वृक्षस्कंधः ] *(बुरखंड पहा)*
बुर्खा [ वृक्ष् १ आस्तरणे ] *(बुरखणें पहा)*
बुर्णूस [ ऊर्णावस्त्र = बुर्णाउस = बुर्णूस ] लोंकरीचें वस्त्रविशेष. (भा. इ. १८३३)
बुर्बुर [ बुर्बुर किंवा बर्बुर (उदके निघंटुः) = बुर्बुर ] पावसाची बुर्बुरं म्हणजे पावसाचें पाणी. (भा. इ. १८३६)
बुलबुल [ बुल्बुलः = बुलबुल ]
बुल्ली [ बुलिः Vulva वैजयंती कोश = बुल्ली ] Penis of a child. बुलि meant vulva and also penis.
बुवा १ [ भवत् ] *(बवा पहा)* (२) [ भूतः = बूआ = बुवा, बूआ, बुआ, बोवा, बोआ ] (भा. इ. १८३४) (३) [ पुमान् = बुवाँ = बुवा (पुरुष)] सः पुमान् अब्रवीत् = तो बुवा बोलला. (भा. इ. १८३४) (४) [ पुमान् = वुवा = बुवा ] कोपि पुमान् आगतः = कोणी बुवा आला. (५) [ पुमान् = बुवा ] एकः पुमान् उवाच = एक बुवा म्हणाला.
बुळबुळित [ प्रुष् , प्लुष् १ स्नेहने ] *(धातुकोश - बुळबुळ १ पहा)*
बुळबुळीत [ बुल् बुडणें, पाण्यानें भिजणें. बुलबुलित = बुळबुळीत ] वारंवार पाणी पडून घसरट झालेला दगड, जमीन, पदार्थ इ. इ. (भा. इ. १८३३)
बुळा [ बुल् पाण्यानें निसरट सैल होणें. बुल्क = बुळअ = बुळा ] बुळा म्हणजे सिथिल, सैल, सुका दाठर नव्हे तो. (भा. इ. १८३३)
बूड १ [ बृध्नः = बुड्ड = बूड. बृध्नः = बुन्धा = बुंधा ] (२) [ व्यृद्धिः ] *(धातुकोश - बुड ५ पहा)* (३) [ ऋध् ४ वृद्धौ. व्यृद्धिः (विगता ऋद्धिः) = बुडी = बूड ] (धा. सा. श.)

(४) [ वि + ऋध् ]

बृहस्पति - बृहस्पति म्हणजे नास्तिकशिरोमणि. हा मुलगा मोठा बृहस्पति आहे म्हणजे नास्तिक आहे, अद्वातद्वा बोलणारा आहे.

बेंगरूळ [ व्यंगरूप = बेंगरूअ. बेंगरूअ + ल (स्वार्थक) = बेंगरूअल = बेंगरूळ] तो मनुष्य बेंगरूळ आहे म्हणजे रूपानें व कृतीनें व्यंग आहे. ह्या शब्दाचा बंगळूर या नगरवाचक शब्दाशीं कांहींएक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

बेघाट [ विघाट = बेघाट ] (भा. इ. १८३६)

बेचंगळ [ बीच + अंगुलि ] बोटांमधील भाग. (स. मं.)

बेचा [ वयस्या, वयस्यः ] *(बेची पहा)*

बेचाळी [ पीचालिः = बेचाळी, बचेळी ] पीच म्हणजे खालचें जाभाड.

बेची [ वयस्या = बइच्चा = बेचा, बेची. वयस्यः = बइच्चा = बेचा ] बेचा व बेची हीं दोन मराठींत आवडतीं नांवें आहेत. (भा. इ. १८३४)

बेजार [ विज्वर = बिज्जर = बेजर = बेजार. विशिष्टः ज्वरः विज्वरः ] चिंताविज्वरः = चिंतेनें बेजार. (भा. इ. १८३४)

बेट [ वेष्ट् १ वेष्टने. वेष्ट = बेट ] बेट a place surrounded by water. (धा. सा. श.)

बेटा १ [ द्विता (वैदिक) खरोखर या अर्थी. द्विता = बीटा = बेटा ] काय बेटा झालें = कि द्विता संवृत्तं? (भा. इ. १८३४) (२) [ वृथा in vain = बेटा, बिटा ] तो बेटा मेला = स वृथा मृतः he died in vain, to no purpose. (३) [ विथक् (शैघ्र्ये) = बिठअ = बिटा, बेटा (टा-टी-टें) ] बेटा म्हणजे जलदीं, शीघ्र.

बेट्या [ वीट + क = बीट + अ = बीटा = बेटा (Lad) = बेट्या. विटिका = बेटी ] अरे बीट्या असा हि उच्चार करितात. (भा. इ. १८३३)

बेडूक १ [ भेकमंडूक = बेअअंडूक = बेडूक] (२) [ मंडूक = बेडूक. मंडूकतरी = मंडोदरी ] female frog.

बेडें [ वितर्दिः = बेडी, बेडें ] अंगणांतील गुरें बांधण्याचा गोठा.

बेंड्या [ ब्यंडकः = बेंड्या ] *(बिंडा पहा)*

बेताल [ वितालं ] *(वेताळ पहा)*

बेपरवा [ द्विप्रव्रजिनी = बिपरवाइई = बेपरवारि.

द्वौप्रव्रजतीति द्विप्रव्राजिनी स्वैरिणी इति यावत् ।

(आश्वलायनगृह्यसूत्र - गार्ग्यनारायणीय वृत्ति १-५-६) ]

एकदां प्रव्रजन शास्त्रसिद्ध आहे. दोनदां प्रव्रजन करणें म्हणजे स्वैराचरण होय. बेपरवा म्हणजे स्वैरवृत्तीचा. बेपरवा हा फारशी शब्द निराळा. त्याचा अर्थ बेमुरवत असा आहे. संस्कृतोत्पन्न बेपरवा ह्या शब्दाचा अर्थ स्वैराचारी. (भा. इ. १८३६)

बेंबटणें [ बेबिट्यते (बिट् आक्रोशे) = बेंबटणें, बेबटणें ] अतिशय आक्रोश करणें, ग्लान होणें, अशक्त होणें. (भा. इ. १८३६)

बेंबल [ विव्हल = (महाराष्ट्री) भेंबल = बेंबल ] (भा. इ. १८३२)

बेबळणें [ बेबिल्यते (बिल् भेदने) = बेबळणें] अतिशय भेदणें. (भा. इ.

१८३६)

बेंबी [ बिंबका - की = बेंबइ = बेंबी, बेंबट. बिंब = वाटोळा पदार्थ ] (स. मं.)

बेरकटणें - बेरीच्या कटानें लिप्त होणें.

बेरड १ [ वैरधी (द्वेषी) = बेरड ] अगदीं बेरड आहे म्हणजे द्वेष करणारा आहे. (२) [ द्विरद = बेरड ] बेरड म्हणून हत्तींची एक जात आहे.

बेरें [ व्यलीकं = बेलिअँ = बेरें. पीडार्थे व्यलीकं (अमरकोश) बेरें म्हणजे पीडा, अप्रिय, अकार्य.

काळें बेरें म्हणजे दुष्ट अकार्य. कालक म्हणजे दुष्ट, दोषयुक्त.

बेलें [ बैल्वं (पात्रं) = बेलें ] बेलाच्या फळांत भस्म ठेवतात त्याला बेलें म्हणतात. बिल्वादिभ्योऽण् (४-३-१३६)

बेवड [ विवृद्ध = बिवढ्ढ = बेवड = बीवड] उगाच वाढलेलें गवत. (भा. इ. १८३४)

बेवारशी [ विपर्यासी = बिवरसी = बेवारशी ] बेवारशी घर = विपर्यस्तं गृहं •

बेवारशी व्यवहार = विपर्यस्तः व्यवहारः बेवारशी बोलणें = विपर्यस्तं वचनं बेवारसी या फ़ारसी शब्दाशीं येथें संबंध नाहीं.

बेश - तदा पेशलं भवेत् = तईं बेश होइजे दशकुमारचरितं - द्वितीय उच्छ्वासः

बेशक [ विशंकं = बेशक (शंकेबिगर) ]

बेसन [ वेसनं (डाळीचें पीठ) = बेसन ] (भा. इ. १८३६)

बेसुमार [ विस्मारं ] *(बिसुमार पहा)*

बेस्वाद [ विस्वाद = बिस्वाद = बेस्वाद ] बेचव. (भा. इ. १८३४)

बेहडा [ वहेडुकः = बेहडा ]

बेहेडा [ विभीतक = बिहीडअ = बेहेडा ] (भा. इ. १८३४)

बेळकें [ बिलकं = बेळकें ] (भा. इ. १८३६)

बैठला [ उपविष्ट + ल = बइठला, बैठला (Sat). उपविश् = बैसणें. ] निष्ठा बैठला (from उपविष्ट) बैसला (उपविश्श + ल = बैसला)

बैता [ पेव् to serve = पेवितृ servant = बेइता = बैता ] village servant. बलुता (प्लेवितृ)

बैतुल [ वैतुल = बैतुल ] बैतुल शब्द चिहणादिगणांत येतो.

बैदुल [ वैडूर्यः = वेदुलियो = बैदुल ] costly stone ची गोटी.

बोआरा [ व्यो (लोखंड) + कारः ] *(बोरा पहा)*

बोक [ वक्त्रं = बोक्कं = बोक, भोक. वक्त्राढ्यं = बोकाड, भोकाड ] भोकाड म्हणजे तोंड. (भा. इ. १८३४)

बोकड [ बुक्क = बोकड ] (ग्रंथमाला)

बोकंडी [ स्कंद. अभ्यवस्कंदि = (अलेप) (भोखंडी) = बोकंडी, बोकांड ] (धा. सा. श.)

बोकणें, बोकळणें [ बुक्क ] *(भोकणें पहा)*

बोका १ - बोकडासारखा प्राणी. लठ्ठ, केसाळ व क्रूर मार्जार (ग्रंथमाला) (२) [ वृकः = बोका ] बोका म्ह. लांडगा. (व्याघ्रादिगण उपमितं व्याघ्रादिभिः)

बोका-की [ मुकयः - यी a kind of animal = बोका-की ] नरमादी या अर्थी बोका-की शब्द योजतात.

बोकाड [ वक्त्र = बोकाड (तोंड) (बकड्ड = बोकाड) ] बोकाड पसरूं नको

म्हणजे तोंड उघडून रडूं नको.
बोकांड [ अभ्यवस्कंदि = (अलोप) भोखंडी = बोकंडी = बोकांड ] माझ्या बोकांडीस बसला म्हणजे माझ्यावर धाड घातली.
बोगा [ भोगः (expanded hood of a serpent) = बोगा ] any expanded पोक.
बोंगा [ पुंगक = बोंगा ]
बोचकभवानी १ [ व्यवसायभवानी = बोचकभवानी ] उद्योगी बया. (२) [ मूषकभवानी = बूचकभवानी = बोचकभवानी ] भवानी deity of the मूषकs.the e. robbers. (३) [ मुंच् १ गर्वे. मुंचक = बुंचक = बोचकभवानी ] गर्विष्ठ फसवी मुलगी. सहाव्या गणांतील मुच् मुंच् निराळा. (धा. सा. श.)
बोचका [ व्यंसक (cunning) = बोचका ]
बोचणें [ व्युष् ४ विभागे. व्योषणं = बोचणें] (धा. सा. श.)
बोंचणें [ कर्मणि ब्रूस्यते = बोंचतें (अकर्मक) ब्रूस् इजा करणें हिंसायाम्. ब्रूसयति = बोंचतो (सकर्मक) ] (भा. इ. १८३६)
बोचरा १ [ व्युच्चारकः = बोचरा ] व्युच्चारक म्हणजे सीधा मार्ग सोडून वर्तन करणारा. (२) [ व्युच्चरक going astray, adulterous = बोचरा, भोसडा ] adulterious व्युच्चर्यः = भोसडिच्या adulterous.
बोचा १ [ बुस् उत्सर्गे. बोसः = बोचा ] बोचा म्हणजे उत्सर्ग करण्याचें इंद्रिय. (धा. सा. श.) (२) [ मुंचक = बुंचा = बोचा ] मुंचक म्हणजे अंड, आंड. बोचा म्हणजे अंड. (३) [ बुसः the organ that voids offal = बोचा. बुस् to omit, to void.]
बोज [ ओजस् = वोज = बोज ]
बोजड [ व्यायत, व्युघत = बोजड ] बोजड म्हणजे आकाराबाहेर आडवेंतिडवें लांबलचक.
बोजा [ अवोह्यः (अव + उह्य) = बोजा ]
बोट १ [ पोत = वोट = बोट ] नाव. इंग्रजींत हि boat असा च शब्द आहे. आगबोट = अग्निपोतः (२) [ चिंचेच्या बोटाप्रमाणें ज्याची आकृति दिसतें तो अवयव. पुट = पोट = बोट ] (स. मं.)
बोंड [ वृंत = बोंड ] वृंत म्हणजे स्तनाग्र. बोंड म्हणजे स्तनाचें अग्र, कळीचें अग्र, कशाचें हि अग्र.
बोडक [ वर्धक = वडुक = बोडक (कां - की - कें) ] वर्धक म्हणजे कापलेलें, केंस कापलेलें. जिचे केंस कापले किंवा काढले किंवा भादरले आहेत ती बोडकी.
ज्याची डोक्यावरती केंसांचें किंवा वस्त्रांचें आच्छादन नाहीं तो बोडका. ज्याच्यावरतीं कुसळांचें आच्छादन नाहीं तें बोडक्याचें भात. (भा. इ. १८३४)
बोडका १ [ मस्करिन् (यति) = बोडका = फजिती ] (२) [ व्युदक = बोडका - बोडकें (तळें वगैरे ज्यांत पाणी नाहीं तें) ] बोडक्याचें भात = व्युदकीयाः तंडुलाः
बोडका-की [ बुड् (त्यागणें) पासुन बोडका-की ] ज्यांनीं केस किंवा अलंकार त्यागिले आहेत त्या व्यक्ति. स.मं.
बोडकिच्चा [ वार्धकिनेयः = बोडकिच्चा ]
बोडकी [ वर्धकी (वेश्या, जारिणी) =

बोडकी ]

बोडकें १ [ मुंडकं = बोडकें ] (२) [ मूर्धकं = बूढकं = बोडकें (मस्तक) ] (३) [ मूर्धन् + क = मूर्धक pate = बोडकें pate ]

बोडक्याचें (भात) [ मुंडकशालिः = बुंडक = बोडक. मुंडकीय = बोडक्याचें (भात)]

बोडण १ - नित्य जे 'वार्षिक कुलाचार व नैमित्तिक जे विवाहादि संस्कार ह्यांच्या प्रारंभीं किंवा अंतीं बोडण भरण्याची चाल कोंकणस्थांत आहे. बोडण भरणें म्हणजे कोणत्याहि शुभ धातूची देवीची प्रतिमा किंवा प्रतीक घेऊन तिला अन्नाचे, प्रायः कणकेचे अलंकार घालून, अन्नाचा प्रायः दहीदुधाचा अभिषेक करून, अन्नाचा म्हणजे पुरणाचा नैवेद्य दाखविणें. नैवेद्य दाखविल्यावर, मूर्तीसुद्धां सर्व संभार सुवासिनी एकत्र कालवितात आणि शेवटीं उत्तरपूजेकरितां प्रतिमा काढून घेऊन, नंतर त्या कालविलेल्या संभारांतून भोजनास आलेल्या सर्व कुलस्त्रियांस, कुलपुरुषांस व कुलबालकांस प्रसाद वांटतात. असा हा बोडणाचा विधि आहे. हा विधि श्रुतिस्मृतिशास्त्रोक्त नाहीं, तंत्रोक्त आहे. गोपीनाथ दीक्षित ओक यांनीं शक १६८७ त समाप्त केलेल्या संस्काररत्नमाला नामक ग्रंथांत, हा बोडणाचा कुलाचार सांगितला आहे. हा संस्काररत्नमालाग्रंथ आनंदाश्रमसंस्कृतग्रंथावलींत छापून आलेला आहे. त्याच्या २६५ व्या पृष्ठावर गोपीनाथ दीक्षित म्हणतात -

"यदि मोटनाचारश्चेत् सोपि कार्यः ।
तच्चमोटनं उक्तं मेरुतंत्रे ।
अथ मोटनकं वक्ष्ये देवाविर्भावकारणं ।
पाकक्रिया प्रकर्तव्या चतुर्भक्ष्यसमन्विता ॥
भार्यया साधकेन्द्रस्य पातिव्रत्यादियुक्तया ।
अप्रसूताः स्त्रियः पंच आहूय सुकुमारिकाः॥
अलंकृताः पवित्रास्ता एकपंक्त्योपवेशयेत् ।
तत्रादौ विघ्नपस्थानमंत्रे तु बटुकस्य च ॥
चकारात्कुलदेवतायाः
ताः संपूज्य महापात्रे पवित्रे तत्र चार्पयेत् ।
क्रमाद्द्विगुणमानेन मध्वाज्ये च सितादधि॥
दुग्धं च निक्षिपेत्तत्र नैवेद्यं तत्र निक्षिपेत् ।.
कुमारिकायाहस्तेन मन्थुयेयुः स्त्रियश्च तत् ॥
स्त्रीभिस्तस्मिन् मध्यमाने देवावेशः प्रजायते।
देवावेशे जायमाने सुगंधो वाति मारुतः ।
सर्वं मनोगतं वक्ति देवताशु प्रसीदति ।
सिध्यंति सर्वकार्याणि मोटनानां शतेन च ।
नखैर्भवेद्विवाहस्तु पंचाशद्भिः सुतस्तथा।
नखै विंशैरित्यर्थः । पंचाशद्भिः सुतलाभ इत्यर्थः ।
अशीत्या गतराज्याप्तिर्विंशत्या लभते धनम्।
अष्टोत्तरशतेनापि असाध्येन तु मेलयेत् ॥
कौमारिका चेष्टदेवं कौमार्या ईरितो विधिः।
इति ।
कौमारी योगेश्वरी । तदुद्देशेन विधिर्भवतीत्यर्थः ।

सैंपाक करावा, पांच अप्रसूत स्त्रिया पांच कोंवरणींसह बोलवाव्या, जोगेश्वरीची प्रतिमा घ्यावी, मोठी परात घ्यावी, तींत मध, धूप, साखर, दहीं, दूध, व नैवेद्य घालावा व त्या स्त्रिया व कोंवारणी ह्यांच्याकडून तो संभार कालवावा. कालवतांना देवी अंगांत येते व सर्व मनोगतें बोलते. शंभर बोडणांनीं सर्व कार्यें सिद्ध होतात. वीस बोडणांनीं लग्न होतें. पन्नासांनीं पुत्र होतो. ऐशींनीं

गतराज्य मिळतें. विरांनीं धनसंपत्ति मिळते. अष्टोदर्शांनीं असाध्यसिद्धि होते.

असा हा मेरुतंत्रोक्त विधि आहे. कित्येक तंत्रक्तविधि श्रुतिस्मृत्युक्त असतात. त्यांपैकीं हाहि विधि कदाचित् असेल.

मोटन = वोडण = बोडण

गोपीनाथ दीक्षित कोंकणस्थ पडले. तेव्हां त्यांनीं ह्या आचाराचा उल्लेख केला. नारायण दीक्षितादि देशस्थ धर्मशास्त्रकार ह्या विधीचा उल्लेख करीत नाहींत. गोपीनाथ दीक्षित ओक आनंदीबाई पेशवीण इचे संबंधी होते म्हणतात.

विघ्नांचें मोटन ऊर्फ बोडण ज्या आचारानें होतें त्या आचाराचें नांव बोडण.

ज्या आचारांत अन्नादि संभार मोडून चूर्ण करावयाचा असतो तो बोडणविधि होय. (भा. इ. प्रथम संमेलनवृत्त) (२) [ ओदन = वोडण = बोडण ] बोडण भरणें. बोडण म्हणजे कुलधर्मांत अन्न बायका कालवून मळतात तें. (भा. इ. १८३३) (३) [ बहूदनं (षड्रस अन्न) = बोडण ] देवीचें बोडण भरणें म्हणजे देवीला षड्रस अन्नाचा नैवेद्य दाखविणें. (४) [ वि + अवदान = बेडण ] Gift of food to deity. (५) [ अवदान ] *(बोडाण पहा)*

बोडन्ती १ [ वृध् - वर्ध् कापणें. वदन्तीप्रमाणें वर्धन्ती. वर्धन्ती = वडुन्ती = वोडन्ती = बोडन्ती ] बोडन्ती म्हणजे कापणी, केंसांची कापणी, हजामत (कुत्सितार्थक) (भा. इ. १८३४) (२) [ मोटन्ती = वोडन्ती = बोडन्ती ] मोटन्ती म्हणजे मोडणें, हाणून पाडणें. मी त्याची बोडन्ती केली म्हणजे मी त्याला वाचेनें हाणून पाडिला. (भा. इ. १८३६)

बोडंती [ मुड् १ न्यग्भावे ] *(धातुकोश - बोड ७ पहा)*

बोंडलें [ मंडलकं a circular vessel = बोंडलें ]

बोडा [ वोढृ = बोडा ] Penis, husband.

बोडाण [ अवदान = बोडाण, बोडण ] बोडण भरणें = अवदानं बिभर्ति, अभ्यवहरति.

बोड्यो [ वर्धक = बडुअ = बोड्डुअ = बोड्डा - ड्डी - डें. वर्धककः = बोड्यो ] मुलाला वर्धक, वर्धमान इत्यादि शुभ शब्दांनीं हाक मारण्याची चाल संस्कृतांत होती. (भा. इ. १८३६)

बोड्ड्यो [ वयोधास् = बओढा = बोड्ड्या = बोड्ड्यो ] वयोधास् म्हणजे तरुण मुलगा. हा शब्द कोंकणांत फार.

बोण [ भोजनं = भोअणँ = बोणें, बोण, बोन, बोनें ]

बोणें [ भोजनं ] *(बोण पहा)*

बोथाटी [ वृथाटनिः = बुथाटणी = बोथाटणी = बोथाटी ] अटनि म्हणजे धनुष्याची किंवा शस्त्राची कोटि, टोंक. ती तीक्ष्ण ज्या शस्त्राची नाहीं तें शस्त्र बोथट.

बोन, बोनें [ भोजनम् ] *(बोण पहा)*

बोंब १ [ ॐ = वोम् = बोम् = बोंब ] तंत्रांत असें सांगितलें आहे कीं, त्रैवर्णिकांनीं ॐ असा उच्चार करावा व शूद्रांनीं वोम् असा उच्चार करावा. (२) [ द्वंदं ] *(बंब २ पहा)*

बोबडा १ [ बोबल (बल् धातूचें यङि रूप) = बोबडा = बोबडा-डी-डें ] (ज्ञा. अ. ९ पृ. ८) (२) [ बल्बलाकरः ]

(*धातुकोश - बोबड पहा)*

बोभाट १ [ भट् परिभाषणे ] (भाट २ पहा) (२) [ (भर्त्स्) बाभर्त्स्यते = बोभाटतो ] (भा. इ. १८३६)

बोभावणें [ भट् परिभाषणे ] *(भाट २ पहा)*

बोरा [ व्यो (लोखंड) + कारः = बोआरा, बोरा, बोहारा, बोहरा ] लोखंडाचा बेपार करणारा. व्यवहारिन् पासून निघालेला शब्द बोहारी आहे, बोहारा नाहीं.

बोऱ्या [ बादरिकः = बोऱ्या. बदराणि उंछति इति बादरिकः (४-४-३२) ] बोऱ्या म्हणजे बोरें वेंचून निर्वाह करणारा म्हणजे दरिद्री. बोऱ्या म्हणजे दरिद्रीं.

बोल १ [ वल्ह = बल्ह = बल्ल = बोल. अचा ओ ] (ज्ञा. अ. ९) (२) [ वोल gum-myrrh = बोल, बोळ ] Gum - myrrh.

उ. - आंगा बोल माखुन तपें । विकावेया आपणपें ।
अंगना हीन पडपें । जिया परीं ॥
ज्ञा. अ. १७-२४५

बोलकें [ वल्ह - वल्हत्कं = बोलकें ] (धा. सा. श.)

बोलणें १ [ पुल् १ वृद्धौ. पोलनं = बोलणें] आतां धंदा बोलूं लागला म्ह० भरभराटीस येत चालला.

हा मराठी बोल धातू संस्कृत पुल् पासून निघालेला आहे. (धा. सा. श.) (२) [ वह्ल (बोलणें) = बह्ल = बोल्ल = बोल = बोलणें ] वह्ल हा धातु पाणिनीय धातुपाठांत आहे. (ग्रंथमाला)

बोले [ वल्हिहि) *(यइ पहा)*

बोवा १ [ भगवत् = बअवअ = बोवा, बावा] अचा उच्चार ओ होऊन या बवा + एहि भवन्. भुवा आला (पोरांना भीति दाखवितांना) = भूतः आगतः
ये बावा = एहि भाव.
बाबा आले = भगवन्तः आगताः
एथें बोवा ! आपलें कांहीं चालत नाहीं.
एथें बोवा ! = अत्रबवन् ! (संबोधन) (भा. इ. १८३४) (२) [ भवत् ] *(बवा पहा)*

बोहरा [ व्योः + कारः ] *(बोरा पहा)*

बोहरी [ भुरिः ] *(धातुकोश - बोहर पहा)*

बोहारा [ व्यो + कारः ] *(बोरा पहा)*

बोहिरी [भुरिः] *(धातुकोश-बोहर पहा)*

बोळ १ [ वोल = बोळ (औषध) ] Gum-myrrh. (भा. इ. १८३६) (२) [ वोल ] *(बोल २ पहा)*

ब्याद [ विवादकं = बिआदअ = ब्यादा = ब्याद ] व्याधि या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

ब्येंब्यें १ [ वि + रु ] (२) [ मीम् (द्वि.) = ब्यें ब्यें ] (३) [ रु २ शब्दे. बिंबीरवं (माधवचंपू १३ श्लोक) = ब्यें ब्यें आवाज. (धा. सा. श.)

ब्रीद [ विरुदं (वि + रुद् to proclaim ) = ब्रीद, बिरीद, बिरूद ]

## भ

भकणें १ [ वस्क् १ गतौ. वस्कनं = बक्खणें = भकणें ] कोणीकडेतरी भकला म्ह० हिंडत गेला. (धा. सा. श.) (२) [ बृह, भष् भाषार्थे. बृह = बह = बहकणें ] भष् = भख् = भक् = भकणें] भकणें, बहकणें म्हणजे भलतीकडे बोलत सुटणें. (ग्रंथमाला)

**भक्कम** [ बृहत्क्रम = बहक्कम = भक्कम] बृहत्क्रम म्हणजे मोठा जोरदार.

**भगकन्** [ मृग् (ज्वाला) ] *(धातुकोश - भगभग ३ पहा)*

**भंगट** [ भग्निष्टः = भंगट ] विचारशक्तीच्या कामीं अतिशय मोडलेला. भांगेशीं कांहींएक संबंध नाहीं.

**भंगणें** [ वधि आक्षेपे निंदायां । गतौच । वंगनं = वंगणें, भंगणें ] ढेंकुणाच्या संगें हिरा जो भंगला म्ह. आक्षिप्त झाला. (धा. सा. श.)

**भगदेव** म्हणजे बाहेरख्याली, स्त्रीलंपट (भा. इ. १८३७)

**भगभग** [ भक्ष्यमक्षिका = भकभका = भगभग (स्त्री.) ] भगभग म्हणजे खाखा. (भा. इ. १८३७)

**भगरा** [ विड्ग्रहः = भगरा ] मुलगा भगरा हगतो.

**भगवा-वी-वें** [ भगव. भार्गव = भग्गव = भगव. भृगुक = भगुअ = भगव. भार्गव व भृगु म्हणजे चकाकणारें, लखलखणारें. लखलखणारा रंग तो भगवा. भगवी छाटी = भृगुका शाटी, भार्गवी शाटी. भगवा झेंडा म्हणजे लखलखणाऱ्या रंगाचा झेंडा. भगवा = Purple colour. संन्यासी, तापसी भगवें वस्त्र पांघरतात. भगवें म्हणजे दुर्मुजी. रामदासी रंग भगवा किंवा दुर्मुजी असे. भगवें घेणें म्हणजे भगवें वस्त्र पांघरणें, संन्यासी बनणें. ] (भा. इ. १८३३)

**भगवा झेंडा** [ भगवद्ध्वजदंडः = भगवा झेंडा (इंद्राचा झेंडा) ]

**भगवें** [ भृगु (tawny) भगवें ] (भा. इ. १८३६)

**भगास** [ भग्नाशं = भगास ] सर्व जग भगास दिसूं लागलें.

**भंगी** [ भंगी (indirect hint) = भंगी ] श्लोकाची भंगी करणें म्हणजे पूर्ववक्ता जो श्लोक म्हणेल त्याचें अंत्य अक्षर किंवा शब्द यांनीं प्रारंभ होणारा श्लोक दुसऱ्या मनुष्यानें म्हणणें.

**भंजन** [ व्यंजन (चटणी) = बंजन = भंजन]

**भजें** [ भज् १० विश्राणने. भज् (भाजयति) = भाजणें. भज्यं = भजें. भक्तः = भात ] (धा. सा. श.)

**भटार** [ भ्रष्टकार किंवा भ्रष्टहार = भट्टार = भटार.

**भटार** (प्रा.) + खानह् (फा.) = भटारखाना. भ्रस्ज् धातु ] (भा. इ. १८३३)

**भट्टारक** [ भर्तृ = भर्तार = भट्टार. भट्टार + क = भट्टारक ] संस्कृत नाटकांत नटी आपल्या नवऱ्याला म्हणजे भर्त्याला भट्टार या प्राकृत सन्मानदर्शक नांवानें संबोधते. तेव्हां भट्टार हा शब्द भर्तृ या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप आहे. पुढें भट्टार हा शब्द जशाच्या तसा पुन्हा संस्कृतांत घेतला. हा संस्कृतीकृत भट्टार, भट्टारक शब्द जुन्या ताम्रपटांतून राजांना अनेक स्थळीं लावलेला आढळतो. (भा. इ. १८३३)

**भट्टिकाव्य** [ भर्तृ - (हरि) - काव्य = भट्टिकाव्य. भर्तृ = भट्टि ] (भा. इ. १८३३)

**भट्टी** [ भृज् १ भर्जने. भृष्टिः = भट्टि = भट्टी (कुंभार वगैरेंची) (भा. इ. १८३३)

**भडक १** [ बर्हक (चमकणारे) = भडक ] लालभडक. (२) [ भर्ग (उजेड,

लखलखणारें तेज) = भरग = भडग = भडक ] लालभडक = रक्तं भर्गं. (३) [ अभ्यंधिक (अतिशयित, श्रेष्ठ) = भडक ] लालभडक supremely red. (४) [ अभ्यंधिक surpassing excellent = भडक ] exceedingly. लालभडक surpassingly red.

Note - भडक विशेषणाच्या पुढें येतो. मागें येता तर विशेषण होता. येत नाहीं; सबब क्रियाविशेषण अव्यय.

भडभड १ [ भटभटाय ] (धातुकोश - भडभड ३ पहा) (२) [ भडि परिभाषणे. भडभड (द्विरुक्ति), भडभडून येणें, रडणें ] (ग्रंथमाला)

भडभडून १ [ भटभटाय ] *(धातुकोश - भडभड ३ पहा)* (२) [ भटभटायित्वा = भडभडून ] भडभड आवाज होऊन किंवा करून. (भा. इ. १८३६)

भडभड्या [ भट् १ परिभाषणे. भटभटकः = भडभड्या ] (धा. सा. श.)

भडभुंजा १ [ बरीभृंजकः (भ्राज् to fly) = भडभुंजा ] a fryer of grain. (२) [ भृज् १ भर्जने. भरीभृजः = भडीभुंजा = भडभुंजा ] धान्य भाजणारा. (धा. सा. श.) (३) [ भृष्ट भुंजक = भट्ट भुंजअ = भडभुंजा ] भाजलेलें धान्य तयार करणारा तो भडभुंजा. (भा. इ. १८३३)

भडवा १ [ बटुकः contemptible chap, = भडवा ] जा भडव्या. get away chap. (२) [ बटुक stupid fellow = भडवा ] भडव्या! you stupid fellow.

भडाग्नी [ वडवाग्नि = बडआग्नी = भडाग्नी]

भडेराक्षस [ अभ्यधिको राक्षसः = भडे राक्षस ] भडे राक्षस म्हणजे राक्षसाहून मोठा राक्षस.

भणभणाट [ बण् १ शब्दे ] *(धातुकोश - भणभण २ पहा)*

भतीजा [ भ्रात्रीयः = भतीजा ]

भत्ता [ भृत्य (वेतन, पगार) = भत्ता ] ज्यादा पगार, वेतन.

भदें [ वपनं भद्राकरणं. भद्रं = भद्द = भद] तुझें भदें करून टाकतों = तुझी हजामत करतों. (ग्रंथमाला)

भद्या [ भद्रक = भद्या ]

भंपक [ भव्यक = भब्बक = भंपक ] (भा. इ. १८३२)

भपकारा [ अभ्यपक्रमः ] *(धातुकोश - भपकर पहा)*

भप्प, भप्पकन [ बाष्प = बप्फु = भप्प. भप्प + कन = भप्पकन (जाळ झाला)] (भा. इ. १८३२)

भंभाळ [ भंभालि = भंभाळ, बंबाळ ] आगीची भंभाळ म्हणजे आगीच्या धुराचा लोट.

भयाण [ भयानक = भयाण ]

भयाभीत - हा शब्द रामदासांनीं उपयोजिला आहे. उ. - "भयाभीत तो अक्षयी मोक्ष देतो," "भयाभीत निश्चित ये स्वस्वरूपी." या समासाचा विग्रह भय + अभीत असा स्पष्ट आहे. परंतु त्यापासून विपरीत अर्थाची निष्पत्ति होते. तेव्हां भियाभीतः - भयाभीत अशा परंपरेनें हा युधिष्ठिर सारखा मराठींत अलुक् समास समजावा. (भा. इ. १८३७)

भर [ भृत = भर ] भर उन्हाळा = संभृतः ऊष्णकालः

भर १ [ भर इति संग्राम नाम (निघंटु) ] संग्राम. वादाच्या भरांत तो वाटेल तें

बरळतो, येथें भर याचा अर्थ युद्ध, संग्राम असा आहे. (भा. इ. १८३४) (२) [ मासात् प्रभृति = महिना भर ]
वर्षात् प्रभृति = वर्षा भर
वर्षप्रभृति = वर्षभर
दिवसप्रभृति = दिवसभर
दिवसात्प्रभृति = दिवसा भर ]

**भरकटणें** [ अभ्यवकर्षणं = भरकरणें (र व क यांचा परिवर्त) ] भरकटणें म्हणजे वांकडें तिकडें लिहिणें. (भा. इ. १८३६)

**भरड** [ म्रद् ]

**भरडणें** [ अर्द् १० हिंसायाम्. अभ्यर्दनं = (अलोप) भिरडणें = भरडणें ] (धा. सा. श.)

**भरणें १** [ वर्ह् परिभाषणहिंसाच्छादनेषु. वर्ह् to give = भरणें (पैसा, फी वगैरे). वर्ह् to speak = भरणें (रागें)] (धा. सा. श.) (२) [ भर्व् (भर्वति) अत्तिकर्मा (निघंटु) तो अन्न भरतोहे = तो अन्न खातो आहे = स अन्नं भर्वति. (प्रयोजक) आई मुलाला अन्न भरवते. (भा. इ. १८३४)

**भरताड** [ भृतभांडकं = भरताड ] रहाटावरील भरलेलीं सर्व मडकीं.

**भरपूर १** [ परिपूरित ] (२) [ परिपूर्ण = भरपूर ] completely full. (३) [ भूरिपृ = भूरिपूरं = भरपूर ]

**भरभरणें** [ बर्भर्ति (भृ) = भरभरणें ] भरभरणें म्हणजे अतिशय भरणें. (भा. इ. १८३६)

**भरभराटणें** [ बर्बर्धि (बृह् वृद्धौ) = भरभराटणें ] भरभराटणें म्हणजे अतिशय वाढ होणें. (भा. इ. १८३६)

**भरमसाट** [ भ्रमसृष्टिकं = भरमसाट ]

**भरवसा १** [ पराश्वासः ] *(धातुकोश - भरवस ५ पहा)* (२) [ वरिवस्या = बरिवसा = भरवसा ] वरिवस्या म्हणजे पूजा, भक्ति. माझा त्याच्यावर भरवसा आहे म्हणजे भक्ति आहे. (३) [ पर्यवसायः (निश्चय, खात्री) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ७९)

**भरंवसा** [ परिविश्वासः ] *(धातुकोश - भरंवस पहा)*

**भराडी** [ भरटक = भरडअ = भरडा = भराडी ] एका प्रकारचे भिक्षेकरी (भा. इ. १८३३) (२) [ भरतः (नट) = भराडी ] खेळ करून पोट भरणारी एक जात आहे.

**भरावसा** [ पराश्वासः ] *(धातुकोश - भरवस ५ पहा)*

**भरिवसा** [ परिविश्वासः ] *(धातुकोश - भरंवस पहा)* म. धा. २०

**भरीत** [ भरितं = भरीत (लेह्य) ] दध्ना भरितं = दह्याचें भरीत. दहीं वगैरे पातळ पदार्थांनीं केलेलीं वांगें इत्यादिकांचीं खाद्यें.

**भर्तार** [ भर्तृ = भर्तार (अनेकवचन मराठींत) भातार ] (स. मं.)

**भल !** [ भल ! = भल ! (ऋग्वेद) ]

**भल (ला - ली - लें) १** [ वल्लभ = बल्लह = भल ( ला - ली - लें) ] भला नवरा = वल्लभः नववरः. भली स्त्री = वल्लभा स्त्री. सर्व पुरुषांत स्त्रीला नवरा भला = सर्व पुरुषेषु स्त्रियः पतिः वल्लभः । भद्र व व्हल या दोन शब्दांपासून निघालेले भल शब्द निराळे. (२) [ बहल (पुष्कळ, दाट, घट्ट) = भल ( ला - ली - लें) ], भलें मोठें enormously great, hugely great.

**भलंदन** [ हें एका ऋषीचें व गोत्राचें नांव

आहे. ] भलंदन म्हणजे मराठींत अगडबंब पुरुष. (भा. इ. १८३४)
भलमोठें [ बहलमहत् = भलमोठें ] बहल म्हणजे अतिशय.
भला [ भद्रः friendly = भला friendly] भद्र ! = भल्या good man. भद्रम् = भले good ! agreeable! ]
भलारी [ भारहारः = भालार = भलारी ] भलारी म्हणजे भारा वाहाणारा पानांचा वगैरे. (भा. इ. १८३४)
भले [ भलम् ] *(वल्हे पहा)*
भलें १ [ बहलं (निबिडं, निर्भरं) भलें ] भलें मोठें = बहलं महत् (२) [ भद्रं = भलें (आर्द्र = ओल्ल. द्र = ल्ल) ] (ज्ञा. अ. ९ पृ. १०३)
भलेरी १ [ भलकारिका = भलेरी ] भल रे दादा भल असें ओरडून सांवे निसणें, याला भलेरी म्हणतात. (२) [ फलेग्रहि (यथाकालीन फलद्रूपता) = भलेरी ] work in a body for gathering in the fields.
भलोबा [ भलन्दनः (एकशेष) = भलः = भलोबा (आदरार्थक) ] (भा. इ. १८३६)
भल्ल (ल्ला - ल्ली - ल्लें) [ भद्रः = भल्लः = भल्ल (ल्ला - ल्ली - ल्लें) ] भल्ला मोठा = चांगला जबर.
भवंड [ भ्रम ]
भवंडणें [ *भोंवडणें पहा* ]
भवया, भंवया [ भ्रुवर्तिका ] (भिवया पहा)
भवरा [ अभिह्वरः crookedness, complexity, whirpool = भवरा, भोवरा] संसारस्य अभिह्वरे = संसाराच्या भवऱ्यांत.
भवानी [ भवंती a virtuous woman = भवानी ] ए भवान्ये ! ही शिवी मराठींत उपरोधिक आहे.
भवाळ [ बहुवल्लभ = भोअल्लह = भवाळ] राजे भोळे भवाळ असतात = राजानः बहुवल्लभाः सन्ति राजे लोकांना प्रेमपात्रें फार असतात असा अर्थ.
भविन्नल [ भू - णिच् भवयति निष्ठा भविन्न + ल (स्वार्थे) = भविन्नला (झाला) ]
भसकदिशी [ दृश् १ प्रेक्षणे. भषकदृश = भसकदिशि ] *(धा. सा. श. व आडदीठ पहा)*
भसकन् १ [ मस्क् १ गतौ ] (धातुकोश - भोसक ३ पहा) (२) [ भृश् to be powerfull भृशति = भसकन् ] vehemently, powerfully.
भसदिशी [ भषकदृश् = भसदिशी ] भषकदृश् म्हणजे कुत्र्याप्रमाणें.
भसदिशी अंगावर येतो म्हणजे कुत्र्याप्रमाणें अंगावर येतो.
भसभशीत [ भसित reduced to ashes ] भस् to reduce to ahses. imaginary धातु not given in धातुपाठ.
भसाडा [ भस् भर्त्सनदीप्त्योः ] भसाडा म्हणजे ठळठळित, ठसठसित. (भा. इ. १८३३)
भळभळाट १ [ बर्ह् १० प्रसरणे; बल्ह् १० प्रसरणे ] (धा. सा. श.) (२) [ भ्लाश् १ दीप्तौ. भ्लाश् (द्विरुक्त) = भळभळाट ] भळभळाट म्ह. झळझळाट. (धा. सा. श.)
भाईचार [ भ्रात्राचारः = भाईचार ]
भाउजी [ भ्रातृ + आर्य = भाव + अज्ज = भाउ + ज्ज = भाउज = भाउजी ] (स. मं.)
भाउली [ पुत्तलिका ] *(बाहुली २ पहा)*

भाऊ १ [ भाम = भावँ = भाऊ ] बहिणीचा नवरा. (भा.इ. १८३३) (२) [ (सं.) भाव (Respected sir) = भाउ = भाऊ (बहुमानार्थी) ] हा शब्द खानदेशांत फार ऐकूं येतो. (भा. इ. १८३३)

भाऊबंध [ भ्रातृबंधु = भाऊबंध ] (स. मं.)

भाऊबीज [ भ्रातृद्वितीया = भाऊबीज ]

भाकड [ मर्करा (वांझ) = मक्कडा = भाकड ]

भाकडकथा [ अभ्याख्यातकथा = (अलोप) भाकडकथा. ख्या २ कथने ] अभ्याख्यात falsely accused, false, खोटी.

भाकर [ भक्ष्याहार = भक्खार = भाकार = भाकर ] अशिष्ट लोक भाकार असाच उच्चार करितात. मूळ पुल्लिंगाचें मराठींत स्त्रीलिंग झालें आहे. लहान भाकर ती भाकरी. (भा. इ. १८३३)

भाकाढ [ बष्काढ्या = भाकाढ ] विऊन फार महिने झालेली. *(उंटाड पहा)*

भांग [ भंग = भांग ] (सं. मं.)

भागणें [ भज् १ सेवायाम्. भाक्तं (मिळविलें) = भागलें ] जगला म्हणजे भागलें म्ह० मिळविलें. भागणें. (मिळवणें). (धा. सा. श.)

भागला [ अभ्यागतः = भागअ + ल = भागला - ली - लें ] अभ्यागतः अतिथिः = पाहुणा भागला. चांदोबा, चांदोबा, भागलास का? = चंद्र चंद्र अभ्यागतोऽसि किम्?

भांगसळ [ भंगशलाका = भांगसळ ]

भाग होणें - तें करणें मला भाग झालें = तत्करणं मे भाग्यं अभवत्. भाग्यं आवश्यकं. तें करणें हा मराठींत समास आहे.

भाचं - चा - ची [ बहिणिस्स = बहिणिच्च = भणच्च = भंच्च = भांच = भांच = चा - ची ] भावाला बहिणीचा मुलगा भाचा होतो, बहिणीला भावाचा म्हणजे भावाच्या बायकोचा म्हणजे वहिनीचा मुलगा भाचा होतो. (स. मं.)

भाज [ भार्य्या ] *(भाजा पहा)*

भाजणें [ ऊन भाजतें, या वाक्यांत जो भाज धातु येतो तो संस्कृत टुभ्राजृ दीप्तौ धातूपासून आला आहे. भ्राज् = भाज ] (भा. इ. १८३७)

भाजा [ भार्य्या = भाज्जा = भाजा, भाज] (स. मं.)

भाजी [ (सं) भाजी = भाजी (म) ] (भा. इ. १८३३)

भाजीवाला [भाजीपालः = भाजीवाला ]

भाट १ [ भट्ट (क्षत्रिय व ब्राह्मणी यांचा पुत्र) = भाट ] (२) [ भट् परिभाषणे = भाट, बोभाट, बोभावणें ] (ग्रंथमाला)

भाटकन्, भाडदिनि [ *चटकर पहा)*

भातकुट्या [ भक्तकुट्टकः = भातकुट्टा इ. इ. ] (भा. इ. १८३३)

भांड [ भंडः = भांड (मस्कऱ्या) ]

भांडकुदळ [ कुर्द् १ क्रीडायाम्. कुर्दलः = कुदळ, भांडकुदळ ] भांडकुदळ म्हणजे क्रीडेनें भांडण्यांत पटाईत.

भांडवल १ [ भांडमूल्य = भांडउल = भांडवल ] (ज्ञा. अ. ९ पृ. १७५) (२) [ भांडपदम् = भांडवड = भांडवल] (भा. इ. १८३४) (३) [ भांडबलं = भांडवल ] मूलधन (भा. इ. १८३७)

भांडेंकुंडें [ भांडं कुंडं = भांडेंकुंडें. भांडं

भूषणमात्रेपि इति विश्वः ] चोरानें तिचें भांडेंकुंडें नेलें म्हणजे दागदागिने नेले.

भाड्या - ब्राह्मण्यां वैश्याद् यो वैदेहको जातः तेन राज्ञां शुद्धान्ते अन्तःपुरे स्थित्वा राज्ञीनां रक्षणं कर्तव्यं । तेन सामान्यवनिताः पोष्याः । तेषां भाटी तस्य जीविका । स शूद्राद्धीनः । पण्यांगनानां राज्ञां च तदिच्छया संगतं कुर्यात् ॥ भाटी म्हणजे भाडें. सामान्यवनितांच्या भाड्यावर उपजीविका करणारा जो वैदेहक तो च भाटिक. भाटिकः = भाडिआ = भाड्या. हा शब्द प्राकृत स्त्रिया प्राकृत पुरुषांना अपशब्दार्थी सध्यां महाराष्ट्रींत लावितात.

टीप - वरील उतारा जातिदर्पणनामक ग्रंथांतून - मजजवळ असणाऱ्या - पृष्ठ ४, पंक्ति ७।८।९ - घेतला आहे. (भा. इ. १८३२)

भाणें [ भाजन = भाअण = भाणँ = भाणें = भांडें ऱ्हस्वत्वदर्शक भाणडें = भांडें] (ग्रंथमाला)

भात [ भक्तः = भात ] *(भजें पहा)*

भातुकली [ व्यात्युत् + केलि ] *(बातुकली पहा)*

भातें [ भृत्यकं wages. hire = भातें ] मजुरी, पोटगी.

भातोण [ भक्तकुण = भातोण. भक्तस्य पाकः भक्तकुणः (५-२-२४) ]

भानगड [ भ्रम् ४ भ्रमणे. भ्रमनिगडितं = भांनिगड = भानगड ] भानगड म्हणजे भ्रमानें घेरलेली स्थिति. (धा. सा. श.)

भानचोद [ भगिनीसुत = बेहेणसोद = भेनचोद = भोनचोद ] भानचोद ही मराठींत शिवी नाहीं. भानचोद म्हणजे बहिणीच्या मुला! बहिणीला चोदणारा असा उत्तान अर्थ उगाच करतात.

भांबावणें [ बंभ्रम्यते (भ्राम्) = भांबावणें] भांबावणें म्हणजे अतिशय भ्रममाण होणें. (भा. इ. १८३६)

भारकस [ भारकर्षः = भारकस ] भारा बांधण्याची दोरी, कसा.

भारंगी [ भार्गी = भारगी = भारंगी ] (भा. इ. १८३४)

भारी १ [ भारिन् (जड) = भारी ] (२) [ भूरि = भारी (adverb) ] ऊ चा आ होणें जरा अपरिचितांतलें आहे; पण येथें झाला आहे हें निश्चित.

भारीस [ भृश = भारीस (सा - शी - सें)] (भा. इ. १८३४)

भारूड [ व्याहृतिः (utterance) = भारूड]

भारूढ [ भारोढं (भार + ऊढं) = भारूड, भारूढ ] भारेण ऊढं म्हणजे वजनानें भरलेलें.

भाव ! [ भगवन् = भअवँ = भावँ = भाव !] नाटकांत येणारा भाव हा शब्द प्राकृत आहे व भगवत् शब्दाचा अपभ्रंश आहे. परंतु चिरोपयोगानें संस्कृत म्हणून वापरला जातो.

भावजय [ भ्रातृजाया = भाउजाय = भावजय ] (स. मं.)

भावंड [ भ्रातृगंड = भाऊगंड = भाओंड, भावोंड = भावंड ] (भा. इ. १८३३)

भावली [ पुत्तलिका ] *(बाहुली पहा)*

भावीण [ भामिनी = भाविणी = भावीण ] स्त्रीविशेष, जातिनाम. (भा. इ. १८३७)

भास [ अभ्यास = भास (अ लोप) ]

त्याला शास्त्राचा किंचित् भास आहे. ह्या वाक्यांत भास ह्या शब्दाचा अर्थ अभ्यास असा आहे. (भा. इ. १८३६)

भाळ [ भाल = भाळ ] (स. मं.)

भिकाटणें [ भिक्षाटनं = भिकाटणें ] (भा. इ. १८३६)

भिकार [ भैक्ष्याहाराः = भिकार ] भिकार म्हणजे भिक्षेकऱ्यांचा समूह. भिक्षाहारी = भिक्कारी = भिकारी.

भिंगारी [ भृंगारि = भिंगारी ] चंबू, झारी.

भिजणें [अभ्यंजन = अब्भिज्जण = भिजणें. अचा लोप ] (भा. इ. १८३२)

भिजत [ विधीयमान = भिजत (वि + धा)] तद्विधीयमानं पद्यते = तें भिजत पडलें आहे.

भिजवणें [ अभिध्या = भिज्झा = भिज ] देवांना भिजवा = देवान् अभिध्यायथ. (भा. इ. १८३४)

भिडणें १ [ (अभि द्रु) अभिद्रवण = भिडणें] जवळ देणें. (भा. इ. १८३६) (२) [ अभ्यटंण = अब्भिटण = भिडण = (भिटण) ] (प्रयोजक) भेटणें. (जवळ येणें) (भा. इ. १८३२) (३) [ अभिडीनं = (अ लोप) भिडिणें, भिडणें ] अभिडी म्हणजे जवळ उडणें, जाणें. (भा. इ. १८३७)

भिडस्त १ [ व्रीडाग्रस्त = भिडस्त ] Modest. (२) [ व्रीडास्थ = वीडत्थ = भिडस्त Bashfull. (३) [ विध्वस्त (Ruined, Eclipses) = भिडस्त ]

भिडा १ [ अभिध्या = भिडा (इच्छा) = भीड ] अध्भध्या म्हणजे इच्छा. भिडा धरूं नको म्हणजे कशाची इच्छा धरूं नको. (भा. इ. १८३७) (२) [ व्रीड् ४ लज्जायां. व्रीडा (लाज) = भिडा, भीड ] *(धातुकोश - भिडाव ३ पहा)*

भिडावणें [ अभिधावनं = भिडावणें ] जवळ धावणें. (भा. इ. १८३६)

भिडू [ अभीष्टः ] *(भीड ६ पहा)*

भिनणें [ भिन्न = भिन (णें) ] (भा. इ. १८३६)

भिरकणें १ [ भ्रेष् १ गतौ. भ्रेषणं = भेरकणें = फेरकणें = फिरकणें. भ्रेषणं = भेरकणें = भिरकणें ] (धा. सा. श.) (२) [ पर्यवकिरणं = भिरकणें, भिरकवणें. पर्यवकृ = इकडे तिकडे पिस्कारणें, फेकणें. ] (भा. इ. १८३६)

भिरकवणें [ पर्यवकिरणं ] *(भिरकणें २ पहा)*

भिरका [ परिक्रामकः = भिरका. परिक्रामिका = भिरकी ] a whirling cart.

भिरकावणें [ भ्रम् ४ भ्रमणे. भ्रमीकाम्यति = भिरकावतो ] तो दगड भिरकावतो = सः दृषदं भ्रमाकाम्यति (भ्रममाण करण्याची इच्छा करतो). (धा. सा. श.)

भिरकी [ परिक्रामिका ] *(भिरका पहा)*

भिवई [ भ्रूपंक्ति = भूंवई, भिंवई, भुंवई, भुवई ] (स. मं.)

भिंवई [ भ्रूपंक्ति ] *(भिवई पहा)*

भिवया [ भ्रूकुटि = भुवडी. भ्रुवृत्ति = भुवइ, भ्रुवर्तिका = भुवइआ = भुवया = भवया (उ = अ) , भंवया ]

भिशी [ (वि + शी) विशय ] *(बिशी ३ पहा)*

भिषज् [ अभि + संज् = (अ लोप) भिषज्] one serving at the side of a sick man, nurse, doctor.

भिसें [ बिसं अस्याः अस्तीति बिसिनी. बिसं = भिसें ] कमळाच्या देठाचा गाभा, बोरूचा पांढरा गाभा.

भिस्त [ विश्रब्धिः = बिसध्धि = भिस्ति = भिस्त श्रभ् १ प्रमादे ] भिस्त म्हणजे

विश्वास.

भीक १ [ भीषा = भीक ] मी त्याला भीक घालीत नाहीं म्हणजे मी त्याला भीत नाहीं. (२) [ अभि + ईक्षा = अभीक्षा = (अ लोप) भीक ] care, account मी त्याची भीक धरीत नाहीं, मी त्याला भीक घालत नाही. I don't care for him.

भीड १ [ अभिष्टि help, assistance = भीड] Protection मी त्याची भीड धरीत नाहीं I do not rely upon his help. (२) [ व्रीड् ४ लज्जायां - व्रीडा] *(धातुकोश - भिडाव ३ पहा)* (३) [ व्रीडा = भीड ] modesty (४) [ अभि + ईड् स्तुतौ. अभीडा (अ लोप) भीड ] regard, cosideration. (५) [ विधिः = बिढि = भीड (rule)] संध्येची भीड पाळणें. to observe the rules of prayer. (६) [ अभीष्टता = भिट्टइ = भिडा (स्त्री) ] सार्थवाहस्य अभीष्टः = सार्थवाहाच्या भिडेचा. (खेळांत) माझा भिडू = मे अभीष्टः (भा. इ. १८३४)

भीतर [ अभ्यंतर = अब्भितर = भीतर. प्रारंभींचा अ लोपतो ] (भा. इ. १८३२)

भीरदिशि टरकावणें [ भ्री to tear भ्रीणातिङ्ग]

भुइनळा [ बृहन्नालः (दारूनें भरलेली नळी) = भुइनळा ] एक प्रकारचें दारूनें भरलेलें मातीचें पात्र.

भुईआंवळी [ भूम्यामलकी = भुईआवळी ]

भुईजांबळी - भूमिजंबुका - भुईजांबळी

भुईपोई [ भूम्युपोदका = भुईपोई ] (भा. इ. १८३४)

भुकिस्त [ भुक्ष् - बुभुक्षित = भुकिस्त ] (धा. सा. श.)

भुगा १ [ भुज् (6 th तुदादि to bend विभुजति) = भुगा = भुग्नः] (२) [ भुग्न = भुग्ग = भुग्गा = भुगा] (भा. इ १८३६)

भुंगा १ [ भुजंगः = भुंगा ] हा भुंगा पाठीमागें लागला आहे. (२) [ भृंगः = भुंगा. भृंगकीटिका = भिंगुर्टी but भुजंगः = भुअंगो = भुंगा ] त्याचा माझ्या पाठीमागें भुंगा लागला आहे म्हणजे सर्प लागला आहे.

भुज [ भुज = भुज - जा ] (स. मं.)

भुंडा [ मुंडः a bald head or any limb = भुंडा, भोंडा ] भोंडा हात, भोंडी करंगळी, भौंडा पाय means an arm or finger or foot unornamented i. e. bald.

भुताटणें [ वेष्ट् १ वेष्टने. भूताविष्टि = भूताटी. भूतावेष्टनं = भूताटणें, भुताटणें ] (धा. सा. श.)

भुत्या [ भृत्यः = भुत्या ] देव्याः भृत्यः = देवीचा भुत्या. खंडोबाचे किंवा अंबेचे सेवक.

भुद [ बुंद् ] *(भोंदणें पहा)*

भुंद [ बुंध् ] *(भोंदणें पहा)*

भुयार १ [ भूम्यागारं = भुइआआर = भुय्यार = भुयार ] (२) [ भ्वागार = भुयार ] *(भुयेर पहा)*

भुयेर [ भूगृहं = भुयेर. भ्वागार = भुयार]

भुर (रा - री - रें) [बभ्रु = भुर (रा - री - रें) अ चा व उ चा विपर्यय ] (भा. इ. १८३४)

भुरक (का - की - कें) [ भृतक = भुरअक = भुरक (का - की - कें) ] भुरका म्हणजे द्रव्य घेऊन तेवढ्यापुरतें

काम करणारा. (भा. इ. १८३४)

भुरकन् १ [ वि + स्फुर् ६ किंचिच्चालने] *(धातुकोश - भुरभुर २ पहा)* (२) [ भुर् to quiver = भुरकन् उडणें]

भुरका [ मुखरक्षः = मुरखा = भुरखा, बुरखा, भुरकी. म चा भ होतो ]

भुरकी [ मुखरक्षः ] *(भुरका पहा)*

भुरटा [ मृतकः चोरः = भुरटा चोर. मृतक servant ] भुरटा चोर a thief from amongst servants.

भुरभुर जळणें [ भृ ९ भर्त्सने. भृ भाजणें = भुरभुर ] (धा. सा. श.)

भुवइ [ भ्रुवत्ति ] *(भिवया पहा)*

भुवडी [ भ्रूकुटि ] *(भिवया पहा)*

भुवया [ भ्रुवर्तिका ] *(भिवया पहा)*

भुंवया [ भ्रुवर्तिका = भुवइआ = भुवया = भुँवया ] (ग्रंथमाला)

भुसकुट्ट्या [ बुसकुट्टकः = भुसकुट्टा इ. इ.] (भा. इ. १८३३)

भुस्सा [ ब्रूस् हिंसायां १०. ब्रुसः = भुस्सा] भुस्सा पाडणें म्हणजे समूळ नाश करणें. (धा. सा. श.)

भूक [ बुभुक्षा = भुक्षा = भुक्खा = भूक] (ग्रंथमाला)

भूतल (ला - ली - लें) [ अभिभू = भुवणें, भोंवणें to be aflicted with. अभिभूत = (निष्ठा) भूतल (ला - ली - लें) ]

भूतलें [ भू - भूत + ल (स्वार्थक) भूतल (ला - ली - लें) ] मागील, गत

भूयस् [ बहु + इयस् = भूयस् (बहुतर) बहु = भु. बह्वीयस् = भूयस् ]

भूवई [ भ्रूवती = भूवई (dual) ] considered in मराठी as a singular.

भेकड [ भेष्, भ्रेष् १ भीतौ. भ्रेषट = भेकड] (धा. सा. श.)

भेजणें [ अज् १ गतिक्षेपणयोः. अभ्यज् to unite = भेजणें ] (धा. सा. श,)

भेजना [ विसेधनं = भेजना. षिध गत्यां ।] गंगां विसेधति (सिद्धांतकौमुदी) = गंगा भेजते.

भेट [ n. अभीष्टं = भेट f]

भेटणें [ अत् १ सातत्यगमने. अभ्यत् (अभि + अत्) = ( अ लोप) भेटणें. अभ्यतनं = भेटणें ] to visit. (भा. इ. १८३७ व धा. सा. श.)

भेंड [ भिंद् १ अवयवे . भिंदं = भेंड ] बोरूचें भेंड = अवयव. (धा. सा. श.)

भेंडा [ भिंडीतक ] *(भेंडी पहा)*

भेंडी [ भिंडीतक = भेंडा, भेंडी (वनस्पति)]

भेदरणें १ [ भीदरणं = भेदरणें (भी + दर)] अति भिणें. (भा. इ. ३६) (२) [ भीदरणं = भेदरणं (भीतीनें डरणें) = भेदरणें ] (भा. इ. १८३४) (३) [ विद्रवणं = बिदरणँ = बेदरणें = भेदरणें ] फार डरणें.

भेद्या १ [ अभिज्ञः = (अ लोप) भेद्या ] ज्ञाता. त्या शास्त्रांतला भेद्या पाहिजे म्हणजे गूढज्ञाता पाहिजे. (२) [ भेदक (चुगलखोर) = भेद्या ] गृहभेदकः = घरभेद्या.

भेनचोद [ मेहनचोदकः = भेनचोद ] one who copulates with penis.

भेलगा [ भेदकः = भेलगा. द = ड = ल]

भो [ भोः = भो (हें अव्यय खानदेशांत फार प्रचलित आहे) ]

भोक [ वक्त्रं ] *(बोक पहा)*

भोंक [ भूकं = भोंक ]

भोकणें [ बुक्क् कुत्र्याप्रमाणें शब्द करणें = भोकणें, बोकणें, ओकसाबोकशी,

बोकलणें. ] (ग्रंथमाला)
भोकसा [ अभ्यवकाशः ] *(धातुकोश - भोकस २ पहा)*
भोकाड [ बुक्क = बोक्क = भोक. विस्तारदर्शक भोकाड ] त्यानें भोकाड पसरलें म्हणजे त्यानें तोंड वासलें. भोकाड म्ह० तोंड. (भा. इ. १८३४)
भोगदा [ अभ्यवकाशः ] *(धातुकोश - भोकस २ पहा)*
भोंगळ [ भूमंगल = भुवंगळ = भुओंगळ = भोंगळ ] (भा. इ. १८३७)
भोगवटा [ भोगपट्टः = भोगवटा ]
भोजनभाऊ १ [ भोजनभ्रातरः = भोजनभाऊ (table-parasites) पात्रेसंमितादयः when contempt is expressed) ] (२) [ भोजने - बहुलाः = भोजन-भाऊल = भोजनभाऊ (Parasite) ] भ्रातृ = भाऊ या शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३३)
भोजें [ भोज्यं = भोजें ]
भोंडलें [ भूमंडलं = भोंडलें ]
भोंडा [ मुंडः ] *(भुंडा पहा)*
भोत [ पोत = वोत = बोत = भोत ] (भा. इ. १८३४)
भोतण [ बहुतृण (क्षुद्रवस्तु, तुटका पेंड्रा) = भोतण ]
भोद [ बुद्, बुंद् ] *(भोंद पहा)*
भोंद [ बुद - बोदति - ते, बुंद - बुंदति - ते, बुंध् - बुंधति - ते, वुंद् - वुंदति - ते = भोंदणें, भोदणें भुंदणें भुदणें] to teach in a vicious way, to mislead बुध - बोधयति, बुध्यति, बोधते to teach rightly. बुद् - to teach in a wrong way.
भोपळा [ बृहत्फलः = भोपळा ] बृहत्फला राजपुत्री तिक्तबीजा च तुंबिका । ॥ राजनिघंटु ॥ बृहत् चा अपभ्रंश भो झाला आहे. कडू भोपळ्याला संस्कृतांत बृहत्फला, कटुतुंबी हीं नांवें आहेत. (भा. इ. १८३७)
भोंभावणें [ Red बोबुक्क् (द्विरुक्ति) = भोंभावणें ] to bark incessently. बुक्क् = भो भो.
भोभुकणें [ बोबुक्क् Red = भोभुकणें ] to bark incessently.
भोला १ [ भौरः ] *(धातुकोश - भुल १ पहा)* (२) [ भ्रमिरः = भोला ] शिवाचें नांव. *(भोळा पहा)*
भोंवडणें [ भ्रम् ४ भ्रमणे. भ्रमंति या नामापासून हें मराठी क्रियापद निघालें आहे. भ्रमंति = भवंडी = भोंड, भवंड] नामाला णें लावून मराठींत क्रियापदें होतात. उ. - बदलणें (फारसी बद्दल) (धा. सा. श.)
भोंवता [ भ्रमतः = भंवता, भोंवता, भोंवताली. सभ्रमतः = सभंवता, सभोंवता, सभोंवताली ] (ग्रंथमाला)
भोंवताली [ भ्रमतः ] *(भोंवता पहा)*
भोवरा [ अभिह्वरः ] *(भवरा पहा)*
भोंवरा [ भ्रमरकः = भँवरअ = भोंवरा ] (ग्रंथमाला)
भोंवरी [ भामरिका = भोंवरी ] रहाटाचा दांडा * कोंकणांत रहाटाचा बैल ज्या वर्तुळ जागेंत फिरतो त्या जागेला भोंवरी म्हणतात. ज्यांत फिरतो ती जागा.
भोंवऱ्या [ भ्रम् ४ भ्रमणे. भ्रमर्यः = भोंवऱ्या. भ्रमरी = मधमाशी ] भोंवऱ्या म्ह० मधमाशा. (धा. सा. श.)
भोंविन्नली [ भ्रम् णिच् निष्ठा भ्रामित + ल = भोंविन्नल (ला - ली - लें) (फिरली)

माडगांवकर ६-७६ ] भोविन्नणें असें क्रियापद धातू नाहीं. माडगांवकर व गोडबोले यांनी निष्ठा अशा फार धातू कल्पिले आहेत.

उ. - जैसी ते शुक्राचेनि आंगभारें ।
नळिका भोविन्नली येरी मोहरे ।
तरी तेणें उडावें परि न पुरे ।
मनशंका ॥ ६ -७६ ज्ञानदेवी

**भोसड १** [ भसत् कटिदेशः उपचारात् मत्संबंधिनि पायौ । भसत् = भोसड. अ चा ओ ] भसत् म्हणजे अपानद्वारं. भोसडीचा म्हणजे अपानद्वारचा, अपानद्वारानें जन्मलेला. भसत हा शब्द ऋग्वेदांत आढळतो. (भा. इ. १८३६) (२) [ भसद् (पश्चाद्, भाग, गुद, योनि) = भोसड. अ = ओ ] क्रियापद भोसडणें म्हणजे योनीवरून शिव्यां देणें. (भा. इ. १८३७)

**भोसडणें** [ भर्त्स् १० भर्त्सने. भर्त्स = भअसड = भोडस ] भोसडणें म्हणजे भर्त्सना करणें. (धा. सा. श.)

**भोसडा** [ व्युच्चरक ] *(बोचरा २ पहा)*

**भोसडिच्या** [ व्युच्चर्यः ] *(बोचरा २ पहा)*

**भोसल** [ भोज + ल भोजल = भोसल (ला - ली - लें) ] भोज हा शब्द अशोकाच्या शिलालेखांत आला आहे. (भा. इ. १८३२)

**भोळा १** [ भौरः ] *(धातुकोश - भुल १ पहा)* (२) [ भ्रम् to be perplexed : भ्रमिरः भ्रमिलः = भोळ (ळा - ळी - ळें) ] Perplexed, confounded. भ्रमिरः = भोला (शिवाचें नांव)

**भोळें** [ बहुलं = भोळें ] बहुल म्हणजे वानवा, शंका. भोळें म्हणजे साशंक, अनिश्चित.

**भ्या** [ भिया fear = भ्या (Vulgar) ] fear.

**भ्याड १** [ भयद्रुतः = भ्याडुआ = भ्याड ] भयानें पळणारा. द्रुतंद्रुतं = दुडदुड. द्रु १ गतौ.] (धा. सा. श.) (२) [ भेलः प्लावे भीलुकेच निर्बुद्धि मुनिभेदयोः (विश्वकोश) भेल = भेड = भ्याड ] (भा. इ. १८३३)

**भ्रांतिवट** [ भ्रांतिवृत्ति = भ्रांतिवट ]

## म

**मउत** [ मुक्ति ] *(मौत पहा)*

**मक** [ (सर्वादिगण) मक् = मग्, मक् (निपात) ] (भा. इ. १८३३)

**मखर** [ मखगृह = मखघर = मखअर = मखार = मखर ] मख म्हणजे उत्सव. मखर म्हणजे उत्सवाची जागा. (भा. इ. १८३३)

**मख्खी** [ मक्षा (गुप्तदोष, गुह्य) = मख्खी]

**मग्** [ (सर्वादिगुण) मक् = मग् (निपात)] *(मक पहा)*

**मग १** [ माङ् ] (ज्ञा. अ. ९ पृ. १.) (२) [ (सं) मार्गतः = (प्रा.) मग्गओ = मग्ग = मग (क्रियाविशेषण) ] (ग्रंथमाला) (३) [ किमंग! ] *(मंग पहा)*

**मंग** [ किमंग! = (किलोप) मंग, मग ] मेला, मग त्याचें काय घ्यावें = मृतः चेत्, किमंग तस्य ग्राह्यं ?

**मचमच १** [ मच् १ कथने, कल्कने. मचामचा = मचमच ] खाणें थोडें आणि मचमच फार म्हणजे बोलणें फार. (धा. सा. श.) (२) [ मर्च् शब्दे. मर्चा = मचमच (द्विरुक्ति) ] (धा. सा.

श.) (३) [ मिज् (बोलणें). मिज् = मिच् = मच् = मचमच ] (द्विरुक्ति) ] (ग्रंथमाला)

मचमचीत [ मृष् सेचने (द्विरुक्त) मृषन्मृषत् = मचमचीत ] मचमचीत म्हणजे पाण्यानें बेचव झालेला पदार्थ. (धा. सा. श.)

मच्छर १ [ मश (मळ) हर = मच्छर ] (२) [ मक्षितर = मच्छिअर = मच्छिरुं = मछरूं = मच्छर (मच्छरध्वनी) ] *(रुं पहा)* (३) [ मत्स्यतर = मछअर = मच्छरुं = मच्छर (मांस मच्छर) ] *(रुं पहा)*

मज [ मम = मज्झ = मज ] *(माझ पहा)*

मज्जा [ मज्जा = मज्जा (सं) ] (स. मं.)

माझ [ मदीय झा - झी - झें. मम = मज्झ = मज हें तिन्ही लिंगीं सारखें. मह्य = मज्झ = माझ. एका कालीं सं. षष्ठी मह्य अशी होती (प्रांतिक किंवा पूर्व वैदिक) ] (ज्ञा. अ. ९ पृ. २)

मटकन् १ [ मट् अवसादने (सौत्रधातु) + अकच् = मटकन्, मट्ट, मट्टा ] *(धातुकोश - मटक १ पहा)*

मटकन् २, मटदिनि [ *चटकर पहा* ]

मटकळ [ मृतकल्प = मढकळ = मटकळ]

मटकी १ [ मकुष्टिका = मकुटी = मटुकी = मटकी. कटयोः विपर्यासः ] (२) [ मुकुष्टिका = मुकुटी = मुटुकी = मटकी (धान्य) ]

मट्ट [ मट् १ अवसादने ] *(मटकन् १ पहा)*

मट्टा [ मट् १ अवसादने + अकच् ] *(धातुकोश - मटक १ पहा)*

मठ्ठ १ [ मठ् to dwell. मठः = मठ्ठ (स्थिर)] (२) [ मृष्ठ = मठ्ठ. मृष्टक = मठ्ठअ = मठ्ठा ] (ग्रंथमाला)

मठ्ठा १ [ मृष्टक ] *(मठ्ठ २ पहा)* (२) [ मंथः = मठ्ठा ] (३) [ मस्तु (दधिभवो मंडः) = मठ्ठा ]

मडकें [ मृद्घटः = मडकें ]

मडगुलें [ मृद्घट = मडगुलें ] मडगुलें म्हणजे मातीचें गाडगें.

मंडोदरी [ मंडूकतरी (अश्वतरीप्रमाणें) = मंडोदरी ] small undeveloped female frog.

मढें [ मृत = मड. मृतक = मढअ. मडचें अनुनासिक रूप मडँ. मडँचें कठोर मढं. मढं चें वर्तमान मराठी मढें ] (स. मं.)

मण [ मनह् (a Babylonian weight of 40 ltos. avoirdupois) (भा. इ. १८३२)

मणका [मणिकक = मणका ] (स. मं.)

मणगट [ मणि + गट = मणगट, मनगट] (स. मं.)

मणे [ मणे विमर्शे प्राकृते. मन्ये = मणे = म्हणे ] तो मणे (अगर म्हणे) पळाला. (भा. इ. १८३२)

मंतर फुकणें [ मंत्र + स्पृक् ]

मत्कुण [ मत्कृमि = मृत्कृण = मत्कुण ] (भा. इ. १८३२)

मत्ता [ (मात्रा) मत्ता = मत्ता ] मालमत्ता ह्या शब्दांत माल हा फारसी व मत्ता हा प्राकृत शब्द आहे.

मंत्र [ मंत्रस्पृक् = मंतर् फुकणें ] कानांत मंतर् फुकणें = कर्णे मंत्रस्पृक्. मंत्र म्हणून कानाला स्पर्श करणें.

मदत [ मद् ४ मदे = मदत (अफू) ] (धा. सा. श.)

मदारीचा [ मदारीय = मदारीचा (हत्ती). मदार म्हणजे सुवास ] मदारीचा हत्ती म्हणजे ज्याच्या अंगाचा सुगंध सुटतो तो हत्ती.

मधचें [ मध्यस्थं ] *(कोठचें पहा)*

मनकरणी [ मणिकर्णिका = मनकरणी ] एक प्रकारचें भांडें.

मनाई [ मन् to stop स्तंभे ] मनाई म्हणजे नाकारणें, थांबवणें.

मनोरथ [ मनश्चासौ रथश्च मनोरथः । मन एव रथः । मनरूपी रथ ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४)

मनौरा [ मनस्कार = मनोआरा = मनौरा. चित्ताभोगो मनस्कारः । (अमर-प्रथम कांड - धी वर्गः - (२) ] पुनः पुनः मनसि करणं मनस्कारः चर्चा विचारणा। (ज्ञा. अ. ९ पृ. ४)

मंमं [ (अम् to eat ) अमं = मंमं (द्विरुक्ति, अ लोप) ] मंमं करणें म्हणजे गुरगुटा भात लहान अर्भकांनी खाणें.

मरकी १ [ मरको मारिरुत्पातः (त्रिकांडशेष) = मरकी, मारि ] (ग्रंथमाला) (२) [ (पु.) मरक (रोग) = (स्त्री) मरकी ] (भा. इ. १८३३)

मरगई [ मृतगतिः = मरगई ] मी अगदीं मरगईला आलों.

मरगळ [ मृतकळा = मरअगळ = मरगळ] (भा. इ. १८३६)

मरतुकडें [ मृतकिष्टं = मरतुकडें. काष्टकिष्टं = काटुकडें ] डें हा प्रत्यय इष्ट पासुन आला आहे व तमभावदर्शक आहे.

मरमारु [ मर्मारुक ] *(धातुकोश - मरमर पहा)*

मरी [ मृति स्ते भूयात् = मरीं तुझी होवो. मृती = मरी ]

मरुळी [ मरुपल्ली = मरुळी ] (भा. इ. १८३६)

मर्तिक [ मार्तक्यं (मृतक म्हणजे प्रेत, त्यासंबंधीं क्रिया) = मर्तिक ]

मऱ्या [ मर्यक a little man = मऱ्या ] मऱ्या! कोठें जळला होतास?

मर्वा [मरुबक = मरुअअ = मर्वा ] (भा. इ. १८३४)

मलई [ मृज्या washings, purifications = मलई, मळई, मळी ] मलई म्हणजे दुधावरची साय. मळई म्हणजे लोणी, साखर, उसाचा रस अति तापवला असतां वर साचतें दाट धुवण तें. मळईचा च अपभ्रंश मळी.

मलखांब [ मल्लस्तंभ = मलखांब ] (भा. इ. १८३२)

मलमल [ मलमल्लकं (आच्छादनं) = मलमल (वस्त्रविशेष) ]

मवागी [ मृद्वंगता = मवागी ]

मवाळ [ मृदुल = मउल = मवळ = मवाळ] (ग्रंथमाला)

मवाळी [ मृदुलता = मवाळी ]

मस [ (पु.) मसिः = मस (पु.) ] मस म्हणजे अंगावरील काळा डाग.

मसण [ मृषाज्ञान ignorance, false knowledge = मसाण = मसण ] मसण तुझें your ignorance असा प्रयोग वडीलधाऱ्या स्त्रिया मुलामुलीसंबंधानें करतात.

मसणा, मसण्या [ अमुष्यायणः (अमक्याचा पुत्र) = (अ लोप) मसणा, मसण्या ] मसण्यानें अमुक केलें न तमुक केलें.

मस्करी [ मस्करिन् (यति) = संन्यासी ] मस्करी करणें म्हणजे असंन्यस्त माणसाला संन्याशासारखें समजणें, करणें. (ग्रंथमाला)

मस्त [ समस्त ] सर्व, पुष्कळ. *(समदें पहा)*

महागणें [ मघि कैतवे. मंघनं = महगणें =

महागणें ] तो आतांशीं महागला आहे म्ह० लुच्चेगिरीनें दिसत नाहींसा झाला आहे. (धा. सा. श.)

महांगिरी [ मंगिनी (तारू) = महांगिनी = महांगिरी ] एक प्रकारच्या तारवांना महांगिऱ्या म्हणतात.

महात [ महामात्यः = माहात, महात, माहूत] हा शब्द पंचतंत्र प्रथमतंत्र यांत आला आहे.

महामूर [ महामूल्य = महामूर = म्हामूर ] पुष्कळ किंमतीचें, पुष्कळ.

महारपोरें [ महाकार = महार = (गाईच्या कातड्याचा धंदा करणारा). पौर = पोर ] शहरांतील महारपोरें म्हणजे शहरांतील अंत्यज नगरवासी. पौर (पोर) म्हणजे नगरवासी. पुत्रपासून निघालेला पोर शब्द निराळा.

मळई [ मृज्या ] *(मलई पहा)*

मळकट [ मल + कट ] *(बळकट पहा)*

मळकें [ मलत्कं = मळकें ]

मळभ [ मलाभ्रं (काळसर अभ्र) = मळभ]

मळवटा [ मलपट्टः = मळवटा ] कपाळाला मळवटा भरणें म्हणजे बेढब कुंकू किंवा गंध लावणें. (भा. इ. १८३४)

मळसूत्र [ मूळसूत्र = मळसूत्र ]

मळी १ [ मृज्या ] *(मलई पहा)* (२) [ मालः ] *(माळ पहा)*

मा, माअ [ मातृ ] *(माता पहा)*

माउमिऊं [ मातृमुखः = माउमुउ = माउमिऊं ] भय, भित्रेपणा.

माउली १ [ मातृ + ली (स्वार्थक) = माउली] (ज्ञा. अ. ९ पृ. ८) (२) [ मातुली ] *(ऐरणी पहा)* (३) [ मात्रावलि ] *(मावलि पहा)*

माक (का - की - कें) [ मत्क = माक. त्वत्क = तुक. युष्मत्क = तुमाक ] क प्रत्यय लागून विशेषणें होतात व तीं खानदेश व कोंकण या प्रांतात योजतात.

माकडहाड [ मर्कट + अस्थि ] (स. मं.)

माकण १ [ मणिका = (अक्षरविपर्यास) = माकणी ] (२) [ मणिकिका = माणकी = (व्यत्यास) माकणी = माकण ] माकण म्हणजे मोठी घागर. माकणीचें घोडें = मणिकीयः घोटकः.

माका [ मार्कवः = माका ]

माखणें [ म्रक्षण = मख्खण - माखण = माखणें ] (ग्रंथमाला)

मागवाला [ मार्गपालः = मागवाला ] (भा. इ. १८३४)

मागसणें [ अग्र. मा + अग्रस्य = मागस. मा + अग्रस्यति = मागसणें ] (धा. सा. श.)

मागां [ माग्रं ] *(मागें पहा)*

मागुतीं [ माग्रभूतं = माग्गहूतं = माघौत (ता - ती - तें) = मागत (ता - ती - तें). मागुत या विशेषणाची सप्तमी मागुतीं] (भा. इ. १८३६)

मागें १ [ माग्रं = मागां. माग्रे = मागे. माचिरं, माविलंबितं या अव्ययांप्रमाणें अग्रेच्या उलट माग्रे व अग्रंच्या उलट माग्रं अशीं अव्ययें संस्कृतांत होतात. (भा. इ. १८३६) (२) [ मार्गे = माग्गे = मागे = मागे पृष्ठिमार्गे = पाठिमाग्गे = पाठीमागे = पाठिमागें. मागचा, मागून, मागां, मागुता ] (ग्रंथमाला)

माघोत (ता - ती - तें) [माग्रभूत = मागउत = मागौत, माघोत (ता - ती - तें) ] माघौत म्हणजे पश्चात् भूत. आगे मागे असें मराठींत म्हणतात, आगे म्हणजे अग्रे व मागें म्हणजे माग्रे.

आगेच्या उलट मागें. (ज्ञा. अ. ९ पृ. ६२)

माघोतीं [ माग्रभूतं ] *(मागुतीं पहा)*

माच करणें [मज् उन्मादे ] म्हैस माच करत्ये. *(माज पहा)*

माचा [ मंचक = माँचा = माचा ]

माज [ मज् उन्मादे ]

माजण [ मस्ज् ६ मज्जने. मज्जन = माजण (मानभावी शब्द) ] (धा.सा.श.)

मांजर [ मार्जार = मंजर (महाराष्ट्री) = मांजर. मार्जार = मांजार (Vulgar) ]

माजाड [ मध्यास्थि = माजाडी = माजाड (कंवर). मध्यकटं = माजाड (कटिमध्य) ]

मांजार [ मार्जार ] *(मांजर पहा)*

माझ [ मदीय झा - झी - झें. मदीया = माझी. मम = मज्झ = मज हें तिन्ही लिंगीं सारखें. मह्य = मज्झ = माझ. एका कालीं सं. षष्ठी मह्य अशी होती. (प्रांतिक किंवा पूर्ववैदिक) (ज्ञा. अ. ९ पृ. २, ३)

माठ [ मंथः = मांठ ] मातीचें भांडें.

माठर [ मंथर = माठर [ हा गडी माठर आहे म्हणजे मंद आहे.

माडणा [ मर्द् - मर्दना - नी ] *(मादना पहा)*

माडळ [ मर्दल = माडळ ] एक वाद्य आहे.

मांडा [ मंडकः = मांडा. अत्युष्णो मंडकः पथ्यः (शार्ङ्धरसंहिता) ]

माडी [ माडिः (राजवाडा) = माडी ]

मांडी १ [ मंडः (अग्रभागः) = मांड. मंडिका (अगभागः) = मांडी ] सक्थीचा अग्र म्हणजे पुढचा भाग तो मांडी. (२) [ (बैठक मांडण्याचा किंवा घालण्याचा अवयवय) = मांडी (मांडणें धातूपासून) ] (स. मं.)

माणकी (१) [ मणिका = माणकी ] भांडें (२) [ मणिकिका = माणकी ] मोठी घागर.

माणसळ [ मनुष्यानुशीलनं ]

माणुसघाण्या [ मनुष्यघृणी = माणुसघाण्या]

माणूसघाण्या [ मनुष्यघ्नः ] *(घाण्या पहा)*

माणें [ मानं = माणें, मावणें; मापनं = मापणें ] (भा. इ. १८३६)

मात १ [ मात्रा = मत्त = मात = मातु ] गोष्ट, वृत्त, धन. (भा. इ. १८३२) (२) [ मंतु (विचार) = माँतु, मात ] (भा. इ. १८३३) (३) [ मन्त्र = मात]

मातक्यान् [ माकीम् = मात्कीम् = मातकियान् = मातक्यान् ] (भा. इ. १८३४)

मातखणी १ [ मृत्खनि = मातखणी ] (२) [ मत्खनी = मातखणी. खन् १ अवदारणे ] (धा. सा. श.)

मातणें [ मत्त = मात (णें) ] (भा. इ. १८३६)

मा तऱ्ही [ मक् तर्हि = मा तऱ्ही = मग तर] (भा. इ. १८३३)

माता [ मातृ = माता, माअ, माय, माव, मा] (स. मं.)

मातेरें [ (मृत्तरं) मार्त्तर्यं = मात्तरँ = मातेरें. मृत्तिकेहून हि वाईट अशी दशा किंवा (मृततरं) मार्ततर्यं = मातअरँ = मातेरें. मृत्यूहूनही वाईट अशी दशा. (भा. इ. १८३४)

मात्रा [ मात्रा म्हणजे पोटभर मित अन्न, मोजकें अन्न. आम्ही दिवसांतून एकदां मात्रा देतों, असा भाषणसंप्रदाय आहे. येथें मात्रा म्हणजे मिताहार. (भा. इ. १८३४)

माथंडी १ [ मृत् + हंडिका = माथंडी ]

मातीचें भांडें. (२) [ मंथहंडिका = माथंडी ] ताक घुसळण्याचा डेरा.

**माथणी १** [ मंथ् ] (२) [ मंथनी = माठणी = माथणी. ] (३) [ मंदामणि = मांदावणी = मांदाणी = माथणी ]

**माथें** [ मस्तक = मथ्थअ = माथ = माथँ = माथें ] (स. मं.)

**मांद** [ मंद किंवा मंद्र = मांद (दा - दी - दें) मांद म्हणजे लहान, क्षुद्र, अल्प.

**मादना** [ मर्द् - मर्दना = मादना, माडणा (मानभावी) ] (धा. सा. श.)

**मादरचोद** [ मातृसुत = मादरसोद = मादरचोद ] मादरचोद म्हणजे आईच्या मुला! भानचोद व मादरचोद हे अपशब्द असते तर संभावितहि घरांत या शब्दांचा उच्चार झाला नसता.

**मांदळ** [ मर्दलः = मादळ = मांदळ ]

**मांदी** [ मंडिः (assemblage, सभा) = मांदी ] Retinue, crowd, assemblage.

**मांदूस** [ मंजूषा = मांदूस ] पेटी.

**मांदें** [ मांद्यं = मांदें ] जडपणा.

**मान** [ मन्या = मान ] (स. मं.)

**मानई** [ माणवक = माणई = मानई ] पोरगा.

**मानगुटी** [ मन्यागुटी = मानगुटी ] स. मं.

**मानपान** [ मान = मान. पण्य = पाण = पान ] मानपान म्हणजे मोजलें जाणारें धान्य व पान म्हणजे विकल्या जाणाऱ्या भाज्या वगैरे पदार्थ. (नीतिशास्त्र = कौटिल्य) हरितपण्य = green vegetables.

**मानमोडी** [ मानमुकुट = मानमुकुड (जुना शिलालेख नं. १४) = मानमोड = मानमोडी ] जुन्नराजवळील एका डोंगराचें नांव. (ग्रंथमाला)

**मापणें** [ मापन = मापणें ] *(मापें पहा)*

**माप भरणें** [ मी - मापयति. नाम माप death ] त्याचें माप भरलें. his death comunicated.

**माबाप !** [ महाभाग = महाभाअ = माबा! ह्या माबा! संबोधनाचा उच्चार भिकारी मराठींत माबाप! असा करतात. ]

**माभळभट** [ महाभल्ल = माभल = माभळ] भल्ल म्हणजे अस्वलासारखा अवजड, मंद इ. इ. महाबल या शब्दाशीं संबंध नाहीं.

**मामंजी** [ मामक + आर्य = मामाजी = मामंजी ] (स. मं.)

**मामा १** [ मामक (आईचा भाऊ) = ममअ = मामा ] (भा. इ. १८३३) (२) [ मामक = मामअ = मामा (आपला जवळचा संबंधी, नंतर आईचा भाऊ), मामी ] (स. मं.) (३) [ मामक (माम mother मामक related to mother) = मामा. मामी wife of मामा. मामी = माई, mother माई मामी = माई ]

**मामी** [ *मामा ३ पहा* ]

**मामू १** [ मातृ + मा (द्वित्त) = मामा = मामू (उकारान्त) ] (स. मं.) (२) [ मयोभूः (मय इति सुखनाम, सुखस्य भावयिता = मामू ] यस्ते स्तनः शशयु र्यो मयोभूः (अथर्ववेद, सप्तमकांड, अनुवाक १ सूत्र १२ ) मामू म्हणजे मुलाला सुख देणारा स्तन.

**माय** [ मातृ ] *(माता पहा)*

**माया** [ मात्रा = मायाँ = माया ] कागदाला माया सोडणें.

**मारका - की - कें** [ मारुकः = मारका ] नास्य ग्राम माहरेयुः अभिमारुका हैष देवः प्रजा भवतीति (आश्वालायन

गृह्यसूत्र ४-९-३२)

मारक या शब्दाहून हा (मारुकोत्पन्न) मारका - की - कें शब्द निराळा आहे. तो बैल मारका आहे, ती गाय मारकी आहे, तें वांसरूं मारकें आहे. परंतु तें औषध, तो उपाय, ती सूचना मारक आहे. मूळ संस्कृत प्रत्यय दोन्ही ठिकाणीं निरनिराळें आहेत. (भा. इ. १८३६)

मार बस [ पायावर मार बसणें to receive a bruise on the leg. (वैदिक) मृ to bruise, crush मृणाति ]

मारि [ *मरकी १ पहा)*

मारू [ माङ् ऋधक् =मारू ] ऋधक् सत्ये निपातः मारू म्हणजे खरें तर, उत्तम, बेश. (भा. इ. १८३४)

मारून कुटून [ मृ ९ हिंसायां + कुट्ट् ६ छेदने ] *(धातुकोश - मारकुट पहा)*

मारून - मुटकून [ मुट् ६ मर्दने + अकच्] *(धातुकोश - मारकुट १ पहा)*

माल [ माङ् to measure माङः = माल ] that which is measured. धान्य, कापड वगैरे मोजलेले पदार्थ.

मालक - holder of land.

मालथिलें [ म्लै - म्लात + ल = मालथिलें] निस्तेज झालेलें.

माव १ [ मातृ ] *(माता पहा)* (२) [ माया = मावा = माव ] (३) [ मव् बंधने. माव = बंधन ] (ग्रंथमाला)

मावणें [ मानं ] *(माणें पहा)*

मावमिऊं [ मातृमुखिकं = माउमुइअ = माउमिऊं मावमिऊं (अव्यय) ] मातृमुख म्हणजे मूर्ख. माउमिऊं म्हणजे मूर्खासारखें.

मावलि [ मात्रावलि = मावलि, माउली ] (स. मं.)

मावशी - सा [ मातृस्वसृ = मावससा = मावशी - सा ] आईची बहीण, आईच्या बहिणीचा नवरा. (स. मं.)

मावळण १ [ मातुलानी ] *(ऐरणी पहा)* (२) [ मात्रावलिक ] (मावळा पहा)

मावळा १ [ मात्रावलिक = मावलिअ = मावळ्या = मावळा, मावळण (स्त्री) (मातेच्या घराकडील माणसें) ] (स. मं.) (२) [ मातुलः ] *(ऐरणी पहा)*

मांव् मांव् [ मायु (द्विरुक्त) = मांव् मांव्, म्यांव् म्यांव् ] (cats sound.) मायुंकरोति (निरुक्त II, 9.)

माशा मारणें [ मशक मारणं = माशा मारणें] हत्ती न मारतां सिंह काय माशा मारील = गजं विहाय सिंहः किं मशकान् मारयिष्यति?

माशी [ मक्षा (दोष) = माशी ] माशीला माशी लिहितो म्हणजे पोथींतील दोष सुद्धां जसेचे तसे लिहितो.

मासा [ माषः = मासा (परिमाणविशेष) ] मासे बारा तोळा एक.

मासुर्डी [ मांसवध्री = मासुर्डी, मासुर्डे (मांसाचा तुकडा) ]

मासोळी १ [ मच्छालि ] (२) [ वल् १ वेष्टने, संवरणे. मच्छवलयिका = मासोळी ] एक मच्छाकृति पायांच्या बोटांतला दागिना आहे. (धा. सा. श.)

माहेर [ मातृगृह = माअघर = मायघर = माय्हर = माह्यर = माहेर (माहेरवासशी) (स. मं.)

माहोर [ मधुफलपुष्पबर्हणं ] *(धातुकोश - म्हुर पहा)*

माह्येरें [ मातृगृहाणि = माह्येरें प्रथमा बहुवचन. मात्रीयकाणि = माह्येरें (मामा) मातरा (parents). Vaidik=

माअरा माह्येरें - Parents. ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४)

माळ १ [ मालक a wood near a village = माळ ] a wood near a village, open woody ground. (२) [ धनपालाच्या पाइअलच्छींत खालील श्लोकपाद आहे :- मलओ उज्जाणमारामो ॥ १३८ ॥

मालः = मलओ = मळा = बाग. ज्याचा धंदा मळ्यांत तो माळी. जो पदार्थ मळ्यांत होतो तो माळवद. लहान मळा = मळी. (ग्रंथमाला)

माळण [ म्लानिः = माळण (स्त्री - नेत्ररोग)

माळवद [ *माळ २ पहा* ]

माळा १ [ मालवक = माळा (माचा) ] क्षेत्रोच्चप्रदेशे मालवकः कृतः । सिंहासनद्वात्रिंशिका. (२) [ अक्कुड्डो होइ मंचो मालोय घरोवरिं होइ ॥ (जैनग्रंथ) मालः = माळा (घराचा वरला भाग)

मिचकणें, मिचकावणें [ श्मीलनं ] *(चिमकणें पहा)*

मिचणें [ मिष् = मिस् = मिच् (मिचणें) ] (भा. इ. १८३२)

मिचमिचित [ मिद् स्नेहने = मिचमिचित, मिजमिजित, मिसमिशित ] to be unctuous oily.

मिजमिजित [ मिद् स्नेहने ] *(मिचमिचित पहा)*

मिटणें [ (मीट) मील् संकोचे = मिटणें, मिलणें ] (ग्रंथमाला)

मिठास [ मृष्ट - मृष्टीयस् = मिठास - मिट्ठ ( ट्ठा - ट्ठी - ट्ठें) चा तरभाव ]

मिठी १ [ मिष्टिः = मिठी ] satiation (२) [ मिथित = मिठिअ = मिठी ] मिठी म्हणजे दोन माणसांचें बिलगणें. (भा. इ. १८३६)

मिणमिणित [ मिद् ४ स्नेहने ] तेलकटलेला, तुपटलेला. *(धातुकोश - मिणमिण ४ पहा)*

मित्ती [ मितिः = मिती ]

मिथणें [ मिथ् (मिळणें) ] (भा. इ. १८३२)

मिंदा १ [ मिध्, मिद् ४ स्नेहने ] *(धातुकोश - मिंध २ पहा)* (२) [ मिद्धः ] *(धातुकोश - मिडक पहा)*

मिंध (धा - धी - धें) [ मिध् ) मिद्धः = मिंधा, मिथ्, मिध् म्हणजे प्रेमानें एकत्र होणें ] मिंधा म्हणजे कशाच्यातरी करितां दुसऱ्याशीं मिथून वागणारा. (भा. इ. १८३६)

मिंधा १ [ मिद्ध (नामधातु) ] *(धातुकोश - मिंध ३ पहा)* (२) [ मिद्धः ] *(धातुकोश - मिडक पहा)* (३) [ मिधु, मिद् ४ स्नेहने ] *(धातुकोश - मिंध २ पहा)* (४) [ मिंद् स्नेहने. मिंदित = मिंदा, मिधा ] मिंधा म्हणजे कश्यानें तरी चिकटून जाणें, बद्ध होणें. (धा. सा. श.)

मिनिट् Minute [ निमिष a minute portion of time = (विपर्ययानें) मिनिट ] मायन्यूटचा उच्चार मिनिट कां व्हावा?

मिरवणें [ मिहिरायते = मिरावतो = मिरवतो. मिहिर (सूर्य) = मीर, मिर. मिहिरायते म्हणजे सूर्याप्रमाणें चमकतो. किंवा मील्. मीलय् = मिरव. मील् म्हणजे चमकणें. अशी हि व्युत्पत्ति होईल ] (भा. इ. १८३६)

मिर्गी [ मृगी = मिर्गी, मुर्गी (कोंबडी)

मिशमिशित [ मृष् (द्वि.) ] *(मिसमिशित पहा)*

मिशी [ स्मश्रु = मिशी, मिसरूं ] (स. मं.)

मिषमिषित [ मृष् (द्वि.) ] *(मिसमिशित पहा)*

मिशमिशित १ [ मृष् to bear, suffer द्विरुक्त = मिसमिशित, मिषमिषित, मिशमिशित ] a for bearing man.
(२) [ मिद् स्नेहने ] (मिचमिचित पहा)
(३) [ मृश् to rub द्विरुक्ति = मिसमिशित ]

मिसमिशीत [ मिषु ६ सेचने (द्विरुक्त) मिषमिषत् = मिसमिषीत, मिसमिशीत rubbed, soft. ] मिसमिषीत म्ह० पाण्यानें ओलसर झालेला पदार्थ. (धा. सा. श.)

मिसमिषित [ मिषु ६ सेचने ] *(मिसमिशीत पहा)*

मिसरूं [ स्मश्रु ] *(मिशी पहा)*

मी [ अहं ] (ज्ञा. अ. ९)

मीं झवँ तुम्हाला व तुम्हीं झवँ मला. हें विनोदपर वाक्य सर्वांना माहीत आहे. यावत् = जावँ = जवँ = झवँ.

अहं यावत् युष्माकीनः

यूयं यावत् मामकीनः ॥

या संस्कृत वाक्यांचें वरील वाक्यें भाषांतर आहेत.

यावत् - तावत् [ भा. इ. १८३२)

मीठी [ मिथितं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३६)

मुकटा [ मूतकः = मुटका = मुकटा ] (मू विणणें) मूत (निष्ठा) पासून मूतक म्हणून विणलेलें वस्त्र. कोशाचें, रेशमाचें, तागाचें विणलेलें जें वस्त्र तें मूतक. (भा. इ. १८६६)

मुख [ मुख = मुख ] (स. मं.)

मुखडा [ मुखाकारः appearnace, look = मुखड़ा ] Mien, look, appearnace of the face.

मुखडा - डें - मुख शब्दाचें ऱ्हस्व रूप. (स. मं.)

मुखवटा [ मुखपट्टः = मुखवट्टः = मुखवटा] (तुलना) चेहरेपट्टी.

मुंगशी [ भुजंगाक्षी = मुंगशी. भ = म ] वनस्पतिविशेष.

मुगुंस [ मद्गुशः (नकुलः) हेमचंद्र - उणादिगणविवृत्तिः = मुंगुस, मुंगूस ]

मुगूट [ मुकुट = मुगूट ]

मुंगूस १ [ अंगूष = ओंगूस = ओंगुस = मोंगुस = मुंगूस ] (महाराष्ट्राचा वसाहतकाल पृ. १०३)
(२) [ मद्गुशः ] *(मुंगुस पहा)*

मुंगूसवेल [ अंगूषवल्लि = मुंगूसवेल ]

मुग्गदलं [ मुद्गलं = मुग्गदळ = मूगदळ - मुग्दळ ] (भा. इ. १८३४)

मुंजा [ मुंजक = मुंजा ] (स. मं)

मुटकें [ मोटकं (गोळी) = मुटकें ] पिठाचा गोळा. मुष्ठिकं = मुटकें (मुठीनें वळलेलें)

मुडदा [ मृ ६ प्राणत्यागे. मृतः = मुरदा = मुडदा. मृतस्पृश = मुडदेफरस = मुडदेफरास ] मृताला शिवून त्याचें शव वाहाणारा. (धा. सा. श.)

मुडदार [मूढदारक = मुडदार] Mad son, mad lad.

मुडदेफरास [मृतस्पृश्] *(मुडदा पहा)*

मुडा [ मूतः मूतकः मू बंधने मूतः मूडा = मुडा ] मूत म्हणजे बांधलेला गठ्ठा, पांटी. (ज्ञा. अ. ९ पृ. ३०)

मुंडी १ [ मुंडिका = मुंडी ] डोकें
(२) [ मूर्धन् = मुंढ. मूर्धनी = मुंडी ] मुंडी मुरगाळणें.

मुंढा [ मुष्टिकः = मुड्ढा = मुंढा ] मुंढा हात म्हणजे मुष्टिना उपलक्षितः हस्तः ।
मुदल [ मूलदेयं = मूलदें = मूदलें (विपर्यय) = मुदलें = मुदलँ ] (भा. इ. १८३३)
मुदलीं [ मुधा + ल ] *(मुधलीं १ पहा)*
मुदी [ मुद्रिका = मुदी, मूद ]
मुधलात् [ मुधा + ल ] *(मुधलीं २ पहा)*
मुधलीं १ [ मुधा (व्यर्थे निपातः) + ल (स्वार्थे) = मुधाल = मुधली, मुदली, मुदलांत ] तो मुधली हें काम करीत नाहीं. मुधली म्हणजे व्यर्थ. (भा. इ. १८३४) (२) [ मुधा + ल (स्वार्थी) = मुधाल = मुधल. सप्तमी मुधलीं; पंचमी मुधलात्. मुद्दल या फारसी शब्दांशीं येथें कांहीं एक कर्तव्य नाहीं.] (भा. इ. १८३३)
मुधळ [ मृध् १ हिंसायाम् ] *(धातुकोश - मोधळ २ पहा)*
मुरदड [ मृदर ] *(मुरदाड पहा)*.
मुरदा [ मृ ६ प्राणत्यागे. मृतः = मुरदा ] *(मुडदा पहा)*
मुरदाड [ मुदर (खेळाडू, क्षणभंगुर) = मुरदड = मुरदाड ] मुरदाड माणूस म्हणजे चंचल, निरुपयोगी माणूस.
मृदंग = मुरदुंग.
मुरदाडशेंग [ मृद्दारशृंगकं = मुरदाडशिंग = मुरदाडशेंग ]
मुरम [ मुरगंड ] *(मुरुम पहा)*
मुरांबा [ मूर्ताम्लः ] *(मोरावळा पहा)*
मुरुम [ मुरगंड pistules on the face = मुरुम, मुरम ] मुरमाची पुटकुळी.
मुरूम [ मुरमंड (मुरगंड) eruption on the face = मुरूम ] eruption on the face मुरुमाची पुटकुळी a boil of मुरूम
मुर्गी [ मृगी ] *(मिर्गी पहा)*
मृर्दुंग्या [ मुदंगिक = मुर्दुंगिअ = मुर्दुंग्या ] (भा. इ. १८३२)
मुर्मुरे [ मुर्मुर = तुसांवर किंवा पानांच्या पाचोळ्यावर किंवा भुसावर भाजलेलें भात. मुर्मुरक = मुर्मुरा ] (भा. इ. १८३२)
मुर्वत [ मुर्व् बन्धने. मुर्वति tie = मुर्वत ] त्याला मुर्वत नाहीं म्हणजे माणुसकीचें वगैरे बंधन नाहीं.
मुलगा [ मूल्क ] *(पोरगा पहा)*
मुलगा - गी - गें [ मूल (मोलयति, बीं पेरतो) + अ = मल, मुलगा - गी - गें (बीजारोपणाचें फल) ] (स. मं.)
मुलूख (मूर्ख) [ मूर्ख याचा सौरसेनींत अपभ्रंश विकल्पानें मुरुख्ख होतो. महाराष्ट्रीची मराठी बनतांना मुरुख्ख याचा अपभ्रंश मुलूख. उ. - तो साऱ्या मुलखाच्या शहाणा आहे. येथें मुलखाचा म्हणजे मूर्खाणाम्. मुलूख म्हणजे प्रांत असा अर्थ नाहीं. मुलूख म्हणजे प्रांत हा अरबी शब्द आहे.
तो साऱ्या मुलखाचा शहाणा याचें शब्दशः संस्कृत भाषांतर 'स सर्वेषां मूर्खाणां विचक्षणः अस्ति' असें आहे. (राधामाधव विलासचंपू पृ. १६३)
मुसमुशित [ मृत्स्नमृत्स्नित = मुसमुशित ] (भा. इ. १८३४)
मुसकी [ मुष्कः (अंडकोशः मुसक.) स्त्रीलिंग (मराठी) मुसकी ] गवादी मांजराची मुसकी वैदू लोक विकतात. मुसकी म्हणजे अंडकोश. (भा. इ. १८३४)
मुसळ्या [ मुसल्यः = मुसळ्या ] इतर सूक्ष्म यंत्रानें काम न करतां ओबडधोबड

यंत्रनें काम करतो तो मुसळ्या.
मुसळानें मारण्यास योग्य असा मुसल्य शब्दाचा संस्कृतांत अर्थ आहे. परंतु मराठींत तो अर्थ नाहीं.
मुळमुळित [ मृदुलमृदुलित = मुळमुळित ] softish.
मुळा [ मूलक = मुळा ] (भा. इ. १८३४)
मुळी [ मूलिका = मुळी ]
मुळूमुळू १ [ मुहुर्मुहुर् = मुउळमुउळ = मुळूमुळू (हळूहळू किंवा वारंवार) ] मुहुर्मुहुरविललाप = मुळूमुळू रडली. (२) [ मुहुर्महुस् = मुळूमुळू ] मुहुर्मुहुरश्रूणि मुंचन् (पंचतंत्र १ आषाढभूतीची कथा) (धातुकोश - मुलक पहा)
मूग [ मौग्ध्यं = मुग्गं = मूग ] तो मूग गिळून बसला म्हणजे मौग्ध्य गिळून बसला. किंवा [ मौक्यं (मूकभावः = मूग] तो मूग गिळून बसला म्हणजे मूकता गिळून बसला.
मूठ १ [ मुष्टि = मूठ ] (स. मं.) (२) [ मुस्तुः = मूठ ]
मूड [ मूताः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४०)
मूद १ [ मुद्रा = मुद्दा = मूद (भाताची अलंकारविशेष) मुद्रा प्रत्ययकारिणी (भट्टोजी, उणादि १७८) ] (भा. इ. १८३३) (२) [ मुद्रिका ] (मुदी पहा)
मूप [ अनुपम ] (अमूप पहा)
मूर [ मूर्वा = मूर, मोर (वेल) ] एक वनस्पति.
मूस [ मूषा = मूस ]
मूळ [ मूलं (पिढीजात दास) = मूळ (नपुंसक) मूळ येणें म्हणजे माहेरचें किंवा सासरचें बोलावणें येणें. हें बोलावणें मूल म्हणजे दास घेऊन येई. (भा. इ. १८३३)
मूळवा [ मूलवापः (sowing roots for planting) मूळवा. क्षुद्रवापः = खुडवा]
मेंग [ मृतांग = मिअंग = मेंग (सापाची)] साप मेंग टाकतो म्हणजे साप मेलेली कातडी टाकतो. (भा. इ. १८३२)
मेंग्या [ मितंगमः हस्ती (मितनखे च ३-२-३४) = मिअंगआ = मेंग्या ] मेंग्या म्ह. सुस्त.
मेट [ मेथिः = मेढी = मेढ. मेट = मेथकं] कोंकणांत व मावळांत शिपायांची चौकी.
मेडशिंग [ मेढ्रशृंगी = मेडशिंग (स्त्री) ] (भा. इ. १८३६)
मेडशिंगी [ मेढ्रशृंगी= मेढशिंगी (अजाशृंगी), मेडशिंगी ]
मेढ १ [मेथिः, मेधिः (ना.) मेठिः (ना.) = मेढ ] (२) [ मेथि (post) = मेढी, मेढ ]
मेढशिंगी [ मेढ्रशृंगी = मेढशिंगी (वनस्पति)] अजाशृंगी, मेषशृंगी अशीं हि संस्कृत नांवें हिस आहेत. (भा. इ. १८३७)
मेढ्या [ महर्द्धिकः महिढिआ = मेढिआ = मेढ्या ] मेढ्या म्हणजे समृद्ध, श्रेष्ठ, पुढारी.
मेण [ मिह् १ सेचने. मेहनं = मेण ] (धा. सा. श.)
मेतकूट १ [ मैत्रीकूटम् = मेत्तकूडम् = मेतकूट ] a firm friendship (२) [ मेथ्यांचें कूट तें मेथकूट = मेतकूट ] (भा. इ. १८३३) (३) [ मिथः = कूट = मितकूट = मेतकूट ] मेतकूट म्हणजे परस्पर, अन्योन्य गूढ स्नेह. (भा. इ. १८३३)

मेथोडा [ मेथिकावटकः = मेथोडा ] बाळंतिणीचें औषध.

मेंदा [ मिंद्. चेंदामेंदा (छिद् + मिद् ) cut and turned into grease

मेर [ मीरः (मर्यादा) = मेर (स्त्री) ] (भा. इ. १८३३)

मेर मेरी [ मर्या = मेरा = मेर = मेरी ] मर्या म्हणजे मर्यादा. (भा. इ. १८३३)

मेला १ [ मेट्, मेड्, म्लेट्, म्लेड् to be mad = मेला ] तो मेला गेला, मेल्याला कांहीं समजत नाहीं, येथें मेला म्हणजे वेडा. वेडा = मेटः, मेडः. मेला = म्लेटः, म्लेडः वेडा मेला हे शब्द बायकांच्या बोलण्यांत हमेष येतात. (२) [ म्रेटः, म्लेटः mad = मेला ] mad. तो मेला आंगावर आला the mad man assaulted me. मेला हा शब्द महाराष्ट्रांत बायकांच्या तोंडीं फार आहे.

मेलेलें [ मृतमृतं ] *(ओलेलें पहा)*

मेहुडें [ मेघ = मेघु = मेहु = मेहुडें (अल्पत्वदर्शक) ] लहान अभ्र. (ग्रंथमाला)

मेहुण [ मिथुन = मिहुण = मेहुण ] जोडपें. (स. मं. )

मेहुणा - णी - णें [ मिथुनक = मिहुणअ = मेहुणा - णी - णें ] जोडप्यापैकीं एक. (स. मं.)

मेळा [ मेलक = मेळा ] (भा. इ. १८३७)

मैत्र [ मैत्र्यम् = मैत्र ] friendship

मैंद [ महेंद्र = महिंद = मइंद = मैंद ] इंद्रासारखा सुखावलेला, आळशी, मंद. (भा. इ. १८३२)

मोकळा [ भूकलः = म्हूकला = मूकळा = मोकळा (घोडा)

मोकाट [ मुक्ताटक = मोकाट ] lose and vagrant beast.

मोकाटणें [ मुक्ताटनं = मोकटणें ] (भा. इ. १८३६)

मोकाड - ट [ मुक्ताटं = मोकाट - ड (गुरूं)] मुक्त आहे अटा म्हणजे फिरणें ज्याचें तें गुरूं. (धा. सा. श.)

मोख १ [ मुष्युकः = मोख (नारळाचा वगैरे) ] (२) [ मयूख (शंकु) = मऊख = मोख ] लतांची अग्रें.

मोखा [ मोक्षकः = मोखा (वृक्ष) ]

मोगर [ मुद्गर = मोग्गर = मोगर (रा - री- रें) ] (भा. इ. १८३२)

मोगा [ मुद्रः = मोगा ] पात्रविशेष.

मोघम् [ मोघं = मोघम् (अव्यय) ] मोघं म्हणजे निष्फल, अनिश्चित. संस्कृतांतून मराठींत जसें चें तसें आले आहे.

मोघा - मोगा [ मुद्रः = मोगा, मोघा ]

मोजणें [ मृष् = मुस = मुझ = मोझ = मोजणें (सहन करणें) ] मी त्याला मोजीत नाहीं = अहं तं न मृष्ये. गणनार्थक मोजणें, मेजणें हे शब्द निराळे. (भा. इ. १८३४)

मोट [ मुट् क्षेपणे ] विहिरींत टाकावयाचें चामड्याचें भांडें. (ग्रंथमाला)

मोटकें [ मूतकं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३६)

मोटाड [ महादाढ्यः = मोटाड ]

मोठमोठ (ठा - ठी - ठें) [ येनाल्पेन यत्नेन महतो महतः शब्दौघान्प्रतिपद्येरन् । (पतंजलि महाभाष्य Vol. I. P. 6 Kielhorn) महत् = मोठ. महत् + महत् = मोठमोठ (ठा - ठी - ठें) द्विरुक्तिची चाल संस्कृतांतून घेतली. (भा. इ. १८३३) मोठी आई (मातामह) या शब्दाचे भाषांतर मोठी आई)

मोठें [ महत्तर = मोट्टअ = मोठें ] (ग्रंथमाला)

मोडणें १ [ मुद् १० संसर्गे. मोद = मोड. मोदनं = मोडणें ] मोदयति सक्तून् घृतेन = तुपानें सातू मोडतो. पाण्यानें दहीं मोडतो = मोदयते दधि पयसा. (धा. सा. श.) (२) [ मुडि खंडने ] (ग्रंथमाला)

मोतीहार [ मौक्तिकहारः = मोतीहार ] मौक्तिक

मोप [ अनुपम ] (अमूप पहा)

मोरकुंचा [ मयूरकूर्चिका = मोरकुंचा ]

मोरचूद [ मयूरकतुत्थं = मोरथूत = मोरचूत = मोरचूद ] मयूरकं तुत्थांजन इति अमरः

मोरचेल [ मयूरचेली = मोरचेल ]

मोरवेल [ मूर्वावल्लिः = मोरवेल (वनस्पति)] (भा. इ. १८३७)

मोरशेंडा [ मयूरशिखंडः = मोरशेंडा ]

मोरांबा [ मूर्ताम्लः ] *(मोरावळा पहा)*

मोरावळा [ मूर्ताम्लः = मुर्रआवळा = मोरावळा. मूर्ताम्लः = मुर्रआम्ब = मोरांबा, मुरांबा ] मोरांबा किंवा मोरावळा या शब्दांतील आंबा,आंवळा ह्या शब्दांचा आंबा किंवा आमलक ह्या शब्दांशी कांहीं एक संबंध नाहीं. मोरांबा किंवा मोरावळा जसा आंब्याचा किंवा आंवळ्याचा करितात, तसा सफरचंदाचा, खारकेचा किंवा इतर अनेक फळांचा करतात व त्या त्या फळांच्या साखरेंत मुरविलेल्या त्या त्या आम्लास त्या त्या फळाचा मोरावळा किंवा मुरांबा ही संज्ञा देतात. (भा. इ. १८३४)

मोरी [ मूर्छ् १ मोहसमुच्छ्राययोः मूर् = मोरी मूर्छतीति मूः । पाणी मुरतें जेथें ती मोरी. मूर्छनं= मुरणें (धा. सा. श.)

मोरू [ मयूरतर ] *(रू पहा)*

मोहरा [ बुद्धिबळाच्या डावांत १६ मोहरे व १६ पायिक असतात त्यांना सध्यां १६ मोहरीं व १६ प्यादीं हीं नांवे आहेत. मुख्य महत्त्वाचे जे ठोकळे त्यांना मोहरे म्हणत. मोहर हा शब्द मुख = मुखर = मुहर = मोहर अशा परंपरेनें मराठींत आला आहे. ह्या मोहर शब्दाचा फारशी मोहरें हा शब्द अपभ्रंश आहे. ज्ञानेश्वरांच्या कालीं बुद्धिबळांचा डाव प्रचारांत होता, असें ज्ञानेश्वरीवरून दिसतें. मुसलमानांनीं हा डाव नवीन निर्माण केला ही समजूत निराधार आहे] (सरस्वतीमंदिर -अश्विन शके १८२६)

मोहरें [ मुखाग्रं ] (ज्ञा. अ. ९ पृ. १४८)

मोहाचा नारळ [ मधुनारिकेलं = मोहाचा नारळ. मधु = महु = मोह (honey sweet)]

मोहोरक [ मुखरकः = मुहरका = मोहारका]

मोहोरबंध बांधणें [ मयूरिकाबंधं बध्नाति = मोरबंध = मोहारबंध बांधतो ] पिशव्या बांधण्याची मयूरिकाबंध नांवाची गांठ असे. मोहोरबंद हा फारसी शब्द निराळा.

मोहोळ [ मध्वालयं = मोहळ (मधाचें घर), मोहोळ ]

मोळा १ [ मुकुलः = मउळ = मोळा ] दातांचे मोळे = दंतमुकुलाः मोळे तोडूं नको = न उमललेलीं फुलें तोडूं नको. (२) [ मौलः (आचारः) = मोळा ] मोळा म्हणजे मूल आचार.

मोळी १ [ मौली = मोळी. मौले गता मौली] डोक्यावर असलेली ती मोळी,

डोक्यावरील ओझें. (भा. इ. १८३४) (२) [ मौलिका (डोक्यावरील ओझें) = मोळी ] मौलि म्हणजे डोकें.

**मौत** [ मेल्या माणसाला पुरण्यास जें नेणें त्याला खालच्या प्रतीचे लोक मौत म्हणतात. मुक्ति = मुत्ती = मौती = मौत = मउत. देहापासून मुक्ति म्हणजे सुटका जेथें मिळते तें स्थान, किंवा क्रिया किंवा स्मशानयात्रा. ] (स. मं.)

**म्यावम्याव** [ मा ]

**म्यांव् म्यांव्** [ मायु (द्विरुक्त) ] *(माव् मांव् पहा)*

**म्हण १** [ भणितिः = म्हणिइ = म्हण ] (२) [ भणिति = म्हणिइ = म्हण ] म्हणाला, म्हणला [ भण् = म्हणला (1st conj.) भ - णा (९ वर्ग क्रीणादि) Pischel P 358 S 514 = म्हणाला. ]

**म्हणून** [ माङ् अन्वक् = माङ्अनू = माङून = मनून = म्हणून (निपात) ] माङ् = मग. अन्वक् म्हणजे नंतर. म्हणून म्हणजे मग नंतर. तो दारू प्याला, म्हणून मेला = मग नंतर मेला. (भा. इ. १८३४)

**म्हणे** [ मणे विमर्शे प्राकृते. मन्ये = मणे = म्हणे ] उ. - तो मणे (अगर म्हणे) पळाला. *(मणे पहा)*

**म्हस, म्हैस** - हे दोन शब्द मराठी शब्दकोशांत मान्य समजावे. संस्कृतांत महस् व महिषी अथवा महिस् असे शब्द आहेत. त्यांवरून प्राकृतांतून मराठींत म्हस व म्हइस ऊर्फ म्हैस शब्द आले आहेत. म्हशीला व म्हैशीला अशीं रूपें मराठींत होतात. तीं दोन निरनिराळ्या शब्दांचीं होतात. एका म्हैस या शब्दाचीं होत नाहींत. महिषः या शब्दापासून म्हैसा हा पुल्लिंगी शब्द मराठींत झाला आहे. त्याचें दुसरें रूप भैसा वऱ्हांडात योजतात. (भा. इ. १८३२)

**म्हसका** [ मृष्यकः = म्हसका ] चोळण्याचें कोणतेंही द्रव्य. अंडाला म्हसका चोळणें, लावणें.

**म्हसरूं** [ महस् + तर ] *(रूं पहा)*

**म्हैस, म्हैसा** */ म्हस पहा ]*

**म्हैसाड** [ महिषाढ्यल् ] *(उंटाड पहा)*

**म्होप** [ अनुपम ] *(अमूप पहा)*

**म्होरक्या** [ मुहिरकः = म्होरक्या ]

## य

**यंदा** [ आइंदह् (फारसी) = यंदा, औंदा, आंवदा ]

**यमाई** [ यमिनी (देवताविशेषः अथर्ववेद - तृतीयकांड, अनुवाक ६, सूक्त २९) = यमाई ] ही वैदिक देवता आहे.

**यऱ्हविं** [ इतरथा हि ] (ज्ञा. अ. ९ पृ. १८)

**यंव** [ एवं (निपात उक्तपरामर्शे) = यंव. अनवकृप्तौ ] (भा. इ. १८३४)

**यवनिका** [ यवन Ion या ग्रीक शब्दाशीं यवनिका (पडदा) या शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. कारण ग्रीक नाटकांत पडदा होता कीं नव्हता, याचा च मुळीं संशय आहे.

यवनिका हा शब्द युञ्ज् बंधने या क्यादि वर्गांतील धातूपासून यवन, यवनिका अशा परंपरेनें निघाला आहे. यवनिका म्हणजे बंधनिका. बंधनिका म्हणजे, माझ्या मतें, रंगाच्या पाठीमागें बांधलेला वस्त्रपट. ] (भा. इ. १८३३)

याती [ ज्ञाति = जाँती = याती ]

यावा [ ज्ञापक = जावअ = यावा ] यावा शब्द रामदासाच्या ग्रंथांत येतो.

येइ [ ऐहि, याहि, वल्हिहि, करिहि, ह्या पूर्ववैदिक रूपांपासून मराठी येइ, जाइ, बोले, करी, करि हीं आज्ञार्थक मध्यम पुरुष एकवचनीं रूपें निघालीं आहेत. ]

येकी [ एकी म्हणती काय जालें? असा प्रयोग मराठी पद्यांतून येतो. तेथें एके या संस्कृत अनेकवचनाचें एकी, येकी हें मराठी रूप आहे. ] (ग्रंथमाला)

येजा [ इ २ गतौ. एहियातं = येजा = एजा येजा करणें । मयूरव्यंसकादयः ।] (धा. सा. श.)

येणें [ एनेन ] *(एणें पहा)*

येबैस [ एहिउपविशं = येबैस. इ. २ गतौ [ येबैस करणें. मयूरव्यंसकादयः ।

१ खातापिता २ हगताओकता
३ बसताउठता ४ न्हाताधुता
५ खाताजेवता ६ निजताउठता
७ देताघेता ८ धावतापळता
इ. इ. इ.

येरजारा [ इ २ गतौ. एहिरे याहिरा = येरजारा ] मयूर व्यंसकादि गणांत हा शब्द आहे. (धा. सा. श.)

येवढी [ एतावतिथी ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३८)

## र

रखेली [ रक्षिता = रखिल्ला = रखेली] (स.मं.)

रगटी-टें [ लक्तिका ] *(लक्ती पहा)*

रगड १ [ ह्रग् १ संवरणे. ह्रगितं = रगड]रगड म्हणजे पुरेसे, पुष्कळ, आच्छादण्यासारखे. (धा. सा. श.) (२) लगड pretty, handsome = रगड] Pretty, plenty.

रंगणास आण [ रंह् १ गतौ] (धातुकोश- *रंघव पहा)*

रगत [ रक्त = रगत ] रात किंवा राक असा अपभ्रंश नियमाप्रमाणें न होतां, मराठींत रगत अपभ्रंश झालेला आहे.

भक्त = भगत क्लिष्ट = किळ्सट्
शक्त = सकत लुब्ध = लुबडं
फक्त = फकत भृष्ट = भाजट
तख्त = तखत कुष्ट = कुजट
वख्त = वखत घुष्ट = घुसळ

संस्कृतात किंवा इतर भाषांत ज्या शब्दाचें अन्त्य क्त, ख्त, ब्ध, ष्ट ही जोडाक्षरें असतात, त्या शब्दांचे मराठीत अपभ्रंश जोडाक्षरे फोडून होतात.

रगत म्हणजे तांबडा असा अर्थ आहे. लालरगत हें मराठींत जोडविशेषण मुसुलमानकालीं बनलें आहे. (भा. इ. १८३६)

रगतगळूं (रक्तगुल्म = रगतगळूं] (भा. इ. १८३६)

रंगाथिल (ला-ली-लें) [ रंगान्वित + ल (स्वार्थे) = रंगाथिल (ला-ली-ले)] coloured.

रंगाथिले [ रंगान्वित + ल = रंगाथिलें ] रंगविलेले.

रटरटणे [ रट् परिभाषणे ] रटरटणें (भात वगैरेंचें). (ग्रंथमाला)

रटाळ, रट्याळ [ रटालु = रटाळ, रट्याळ] रटाळ, रट्याळ म्हणजे व्यर्थ बडबडणारा किंवा वटवटात्मक.

रट्टा [ अरत्नि (elbow)=रट्टा] हाताचा रट्टा मारलान्

रंडगोळक [ रंडागोपालक] *(कुंडगोळक पहा)*

रडतान [ अनध्यायो रुद्यमाने समवायो जनस्य च ।। १०८।। (मनु -चतुर्थाध्याय)
रुद्यमाने रोदनंध्वनौ । भावे लकारः । (कुलूक)
रडतांना पढूं न ये, या वाक्यांत रडतांना हे रूप भावे रडतान या कृदन्ताचें सप्तमीचें रूप आहे. मराठींत, भावे, कर्मणि व कर्तरि एकच रूप होतें.] (भा. इ. १८३४)
रंडीबाज [ रंजाभाज् = रंडीबाज ] बाज हा फारसी शब्द भाज् या संस्कृत शब्दापासून निघाला आहे किंवा त्याचा सहोदर आहे.
रताळू [ रक्तालुः = रताळू]
रती [ रक्ति (गुंज १.७५ ग्रेन)] (भा. इ. १८३२)
रद, रद्द, रद्दी [ रद् १ भेदने. रदः = रद, रद्द, रद्दी] रद्दी कागद म्हणजे फाडलेले, टाकून दिलेले कागद. (धा.सा.श.)
रपरप, रपारप [ रपि शब्दे ] (ग्रंथमाला)
रमारमी [ रम् to pause, stop, loiter : रमः + रमिः = रमारमी] stopping and loitering किती रमारमी केली तरी कर्ज फेडलेंच पाहिजे. रमारमी करून कसातरी निसटलों.
र र करणे [ री ९ गतौ. रेरीयते = रेरे = रर करणें म्हणजे अत्यन्त मंदगतीनें शिकणें ] रे रे करीत शिकतो. (धा. सा. श.)
रश्शी [ रज्जु = रस्सू = रस्सी. रशना = रसआ = रस्सी. रश्मि = रस्सि = रस्सी] तिसरी व्युत्पत्ति विशेष ग्राह्य तिन्ही खऱ्या. (भा. इ. १८३६)
रसोई [ रससूदिका = सरहूईआ = रसोईआ = रसोई ] षड्रसांचा जो पाक म्हणजे सूद ती रसोई. सूद म्हणजे शिजवणें, पाक. (भा. इ. १८३७)
रस्ता देणें [ दत्तवर्त्म = रस्ता दिलेला] हा प्रयोग संस्कृतांतून आला आहे.
रस्सा १ [ रस्यः = रस्सा] (२) [ रसकः = रसा] रसक म्हणजे मांसाची आमटी, soup. (भा. इ. १८३६)
रस्सी [ रश्मि = रंसि = रस्सी] (भा. इ. १८३२)
रहाट [ अरघट्ट = रहाट, लाट]
रहाटागर [ अरघट्टाग्रहारः = रहाटागर ]
रहाणें [ ली ९ श्लेषणे. लयनं = रअणें = रहणें = रहाणें- राहणें ] लयन म्हणजे वास करणें, वास करण्याचे स्थान.
रहाणे हा मराठी धातु ली-लय् ह्या संस्कृत धातूपासून निघाला आहे ह्यांत संशय नाहीं. (भा. इ. १८३६)
रळी [ लल् १ विलासे. ललिः = रळी ] खेळ, विनोद. (धातुकोश-रळ पहा)
राई १ [ राजिका (कृष्णसर्षप) = राई (मोहरी) धान्यविशेष ] (भा. इ. १८३७) (२) [ राजि = राई (अंब्यांची ओळ)] (भा. इ. १८३७)
राउल [ राजकुट = राजकुल (राजगृह) = राउल] ( ज्ञा.अ. ९ पृ. १४६)
राखडी [ रक्षिका ] *(राखी पहा)*
राखणावळ [ रक्षणामूल्यं = राखणाऊळ = राखणावळ]
राखी १ [ रक्षिका an amulet to protect = राखी, राखडी ] (२) [ रक्षी अथवा रक्षा = राखी] श्रावणी पूर्णिमेला मनगटांत बांधलेली दोरी. (भा. इ. १८३६)
राखोंडी [ रक्षाकूटि = राखाऊडि = राखोंडी, राखोंडी, राखुंडी] (२) [ रक्षाकुंडी = राखोंडी] राखेचा खड्डा.
राखोळ [ रक्षामूल्यं = राखोळ ] गाईंचे चरण्याबद्दल भाडें.

रांग [रघ् १ गतौ ] (धा. सा. श.)
रांगणें १ [ रंगण = रांगणें ] (भा. इ. १८३७) (२) [ रिंगणें = रांगणे. इ=आ] (भा. इ. १८३७)
रागिट [ रागाविष्ट = रागाइट्ट = रागैट्ट = रागीट = रागिट.]
राघू [ राघ् (नाम) म्हणजे कर्ता माणूस. त्याचें ममतादर्शक रूप राघू, राघ् = राघ = राघू] तो काय राघू आहे = तो मोठा कर्तासवरता आहे. (भा. इ. १८३४)
रांजण [ अलंजरः=(अलोप) लंजर = रांजर=रांजण]
राजवट [ राज्यवृत्तिः = राजवट]
राजवटी १ [ राज्यवृत्ति = राजवटी] (२) [ राज्यावस्थिती = राजावठिइ = राजावटी = राजवटी]
राजवर्ख [ राजवर्चस् = राजवर्क, राजवर्ख] राजाला शोभण्यासारखी, उत्तमोत्तम. (भा. इ. १८३६)
राजवर्खी [ राजावर्त (cloth of different colours) = राजवर्ख. र्त = र्ख]
राजवर्खी बांगड्या म्हणजे नाना रंगाच्या बांगड्या.
राजस (सा-सी) [ राजर्षि = राजस (सा-सी) राजर्षे ! = राजसा! (पुल्लिंग) राजसे (स्त्रीलिंग)] राजसा! हे संबोधन लावण्यांत व गाण्यांत मराठी भाषेंत फार येतें.
राजी [ राजोपजीविन् = राजोपजीवी = राजी ]
attached to the master. लोक राजी राखणें to keep people attached to the master, king.
राजी-होणें [ राध् राध्यति = राजी होणें] to be affectionate towards.
कृष्णाय राध्यति = कृष्णाला राजी होते.
राजे लोक [ राजलोकाः = राजे लोक] राजांचे मंडळ. (भा.इ. १८३६)
राड [ द्राड् तुकडे तुकडे करणें. द्राड् = राड ] (भा. इ. १८३४)
रांडरूं [ रंडातरी = रांडरी, (प्रेमदर्शक) रांडरूं]
राडा [ ह्रदः = राडा ] रक्ताचा, शेणाचा, चिखलाचा राडा.
राणा [ राजन्यः = राअणा = राणा]
राणीवसा [ राज्ञ्यावासः = राणीवसा]
रातवा [ रात्रिपातः = रातवा] रातवा म्हणजे रात्रीचा सर्व समय.
रात्रीं औषींस, औषीं [ रात्रौ दोषसी = औषीं (द =अ)] (भा. इ. १८३३)
राप [ राद्धि] *(राब पहा)*
राब [ राद्धि = राब्भी = राबी = राब = राप] गुळाची राब म्हणजे शिजवून दाट केलेला रस.
रामरगडा [ रामह्रदः] *(रामराडा पहा)*
रामराडा [ रामह्रदः = रामराडा. रामह्रदः = रामरहंडा = रामरघडा = रामरगडा] रामह्रद म्हणजे परशुरामानें मारिलेल्या क्षत्रियांच्या रक्ताचा ह्रद म्हणजे हौद. त्यावरून कोणताहि बीभत्स पातळ पदार्थाचा सांठा.
रायभोग [ राजभोगीनाः (तंडुलः) ५-१-९ पाणिनि = रायभोग (तांदूळ) ] राज्ञे हिताः तंडुलाः राजभोगीनः तंडुलाः
रायवळ [ राजपालित = रायवळ ] राजाची रानांतील लांकडें.
रायावळा [ राजामलकः = रायावळा ]
रास [ रासः (गौळ्यांचें नृत्य) = रास]
राहराहून [ रह् १ त्यागे ] (धातुकोश-*राह ५ पहा*)
राहाटी [ राद्धिः ] (धातुकोश-*रहाळ पहा*)

राहिलेपण [ रु to sound, hum णिच् रावय् निष्ठा रावित. रावित + ल = राइअल = राहिल. रावितत्वन (Vaidik) = राहिलपण = राहिलेपण humming] सरलेयां गीता चा समारंभु। न वचे राहिलेपणा चा सोभु। (ज्ञानेश्वरी १८-४२१)

राहिलेपण म्हणजे नादत्व, अनुरणन।

गाणें संपलें तरी त्याचें अनुरणन मागें काहीं काळ रहातें तसें.

राहुटी [ रथ्याकुटी = राहउटी = राहुटी ] राहुटी म्हणजे प्रवासांतील पटकुटी म्हणजे तंबू.

राळ १ [ राला = राळ] (२) [ राद्धि from राध् to kill, exterminate राद्धि = राढि = राळि = राळ ] राळ करणें, उडवून देणें to exterminate.

रिठा १ [ रिष्टः = रिठा ] (२) [ अरिष्टक = रिठा (अलोप)] (भा. इ. १८३४)

रिणकरी [ ऋणकारी = रिणकरी]

रिणको [ ऋणकामः] *(धनको पहा)*

रितें [ रिक्त = रित्त = रित = रितँ = रितें-ता-ती] (ग्रंथमाला)

रिप् रिप् १ [ रिफ् to utter a grating sound = रिपरिप पाऊस पडतो ] (२) [ रिप् to revile] आतां रिप्रिप् पुरे.

री १ [ री to howl] री ओढणे to howl after any one. (२) [ री (वृकशब्दः) = री]

री म्हणजे कोल्ह्याचा शब्द. री ओढणें म्हणजे एक कोल्हें ओरडले म्हणजे बाकीचीं जशीं ओरडतात तसें करणें.

री ओढणे [ री ९ गतौ. री (शब्द करणे) = री ओढणें] (धा. सा. श.)

री री करणें [ री to howl]

री री करीत जाणें [ रि to go]

रीस १ [ ऋक्ष = रीस] अस्वल. (२) [ ऋषभ = रिसह = रीस ] मराठीत अडाणी बेडौल माणसास रीस म्हणतात.

मूळ ऋषभ हा शब्द संस्कृतांत पुरुष-ऋषभ वगैरे सामासिक शब्दांत श्रेष्ठत्व दाखवितो. विपरीत लक्षणेने मराठींत रीस कनिष्ठत्व, अधमत्व दर्शवितो. (भा. इ. १८३६)

रुई १ [ ऋतिः (मार्ग, रस्ता) = रुइ = रुई] ही बोलण्याची रुई नव्हे म्हणजे मार्ग नव्हे. (२) [ रोहित् (मृगविशेषः) (हसृरुहियुषिभ्य इतिः उणादि १०२) रोहित् = रोहिअ = रोही = रुई ] हरिण एक प्रकारचें. (भा. इ. १८३३)

रुका १ [ रुक्म (सुवर्ण, लोखंड) = रुक्क = रुक. रुक्मकः = रुका ] एक कनिष्ठ नाणें. (भा. इ. १८३२)

(२) [ भोजप्रबंधांत रुक्म म्हणून एका नाण्याचा उल्लेख आहे:- "ततो बाणाय रुक्माणां पंचदशलक्षाणि प्रादात्" भोजानें बाणाला पंधरा लाख रुक्म दिले, असें बल्लाल लिहितो. रुक्म या शब्दाचा अर्थ सोने किंवा लोखंड असा आहे. पंधरा लाख सोन्याचीं नाणीं भोजानें दिलीं असतील हें संभवत नाहीं. तेव्हां लोखंडाचे पंधरा लाख रुक्म भोजानें दिले असावे, असा पक्ष रहातो. तेव्हां रुक्म हें नाणे काय होतें? रुक्मः या शब्दाचा मराठीत अपभ्रंश रुक्का, रुका असा होतो व होत आहे. सरासरी १८ रुक्यांचा एक आणा होतो व १६ आण्यांचा एक रुपया होतो. म्हणजे एक लाख रुक्मांचे सध्याच्या मानाचे सरासरी पांचशें किंवा साडे पांचशें रुपये

होतात. भोजानें शेकडो कवींना लक्षलक्ष नाणीं दिलीं. हीं नाणीं सोन्याचीं होती, असें समजल्यास कुबेराची ही संपत्ति पुरली नसती. सबब रुक्म हें अगदीं हलकें नाणें भोजाचे वेळेस होते असें म्हणावें लागतें. हें भोजाच्या वेळचे रुक्म नाणें पेशवाईंतील किंवा शिवकालीन रुक्का या नाण्याचें च पूर्वज आहे.

रुकार [ रै करोति (अव्ययप्रकरणम् ददाति) = रुकारतो] रुकारणें म्हणजे देणें, होय म्हणणें. (भा. इ. १८३४)

रुकार, रुकारणे] ऊरुरीकारः = (उलोपे) = रुकार ] रुकार म्हणजे मान्यता. ऊरुरीकरणं = रुकारणें. (धा. सा. श.)

रुखरुखित १ [ रूक्ष harsh) द्विरुक्त = रुखरुखित ] very harsh, rough. (२) [ रूक्षरुक्षित = रुखरुखित] (भा. इ. १८३४)

रुचा [ ऋच्छका (इच्छा) = रुचआ = रुचा ] रुचि शब्द निराळा.

रुचीबेरुची [ रुचिविरुचि = रुचीबेरुची ] विरुचि = वाईट रुचि. (भा. इ. १८३४)

रुंद [ वृंद = वुंद = रुंद. वृंदिष्ट = वुंदिट्ट = रुंदट] (भा. इ. १८३२)

रुपया [ रूप्यकः ] *(निष्क पहा)*

रुळी [ रूढि]

रूं = गुरूं, मेंढरूं, वासरूं, पाखरूं, कोकरूं, बकरूं, म्हसरूं, मछरूं, वाघरूं, हातिरूं या शब्दांतील रूं हा प्रत्यय पाणिनीय ष्ठरच् प्रत्ययापासून निघाला आहे. वत्सोक्षाश्वर्षभेभ्यश्च तनुत्वे ष्ठरच् (५-३-९१) ह्या सूत्रांत तनुत्वदर्शक तर प्रत्यय सांगितला आहे. वत्स (मूल) आणि वत्सतर (लहान मूल).

वत्सतर = वच्छअर (महाराष्ट्री)
= वच्छरूं ( अपभ्रंश)
= वासरूं (मराठी)

तरः, तरी तरम् असा तिन्ही लिंगी हा प्रत्यय आहे.

गुतर = गुअर = गुरूं = गोरूं (ज्ञानेश्वरी) = गुरूं.

पक्षितर = पक्खिअर = पक्खिरुं = पाखिरुं (ज्ञानेश्वरी) = पाखरूं.

वर्करतर = बक्करअर = बाकरूं = बकरुं.

मक्षितर = मच्छिअर = मच्छिरुं = मछरूं = मच्छर (मच्छरदानी).

मत्स्यतर = मछअर = मच्छरुं = मच्छर (मांसमच्छर).

व्याघ्रतर = वाघरूं. हस्तितर = हातिरूं

महस् + तर = म्हसअर = म्हसरुं=म्हसरूं.

कुक्कुरतर = कूउत्तर = कूत्तरुं = कुतरूं.

मयूरतर = मोरअर = मोअरुं = मोरूं.

पाडा, पाडी हे शब्द म्हशीच्या वत्साला लावतात. तर प्रत्यय लागून

पाड + तर = पाडअर = पाडरूं = पारडूं.

पाड + तरी = पाडरी = पारडी = पारडें.

कोंकरूं व मेंढरूं ह्यांचे मूळ संस्कृत शब्द धुंडाळले पाहिजेत. रूं हा मराठींतील ऱ्हस्वत्वदर्शक प्रत्यय आहे. (भा. इ. १८३२)

रूपबेरूप [ रूपं विरूपं = रूपबिरूप = रूपबेरूप] फारशी बे शीं काहीं संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

रेकणें १ [ रेकृ १ शंकायां. रेकनं = रेकणें] दमधर, असा रेकूं नकोस म्हणजे शंका येऊन बावचळल्यासारखें करूं नकोस. (धा. सा. श.) (२) [ रेकणें = म्हशीचा शब्द. रेष = खिंखाळणें (घोड्याचे) = आवाज (म्हशीचा) ] (भा. इ. १८३२) (३) [ रेष् अव्यक्ते

शब्दे. रेषण = रेकण = रेकणें ] (ग्रंथमाला)

रेखाटणें [ रेषाकर्षणं] *(रेंघाटणें पहा)*

रेंघाटणें [ रेषाकर्षणं = रेघाटणे, रेंघाटणें, रेखाटणें.] (भा. इ. १८३६)

रेज, रेजा [ रेतज, रेतजा (धुळीचा कण) = रेजा, रेज ]

रेटणें १ [ लेट् स्वप्ने, धौर्त्ये. लेट्यते = रेटतो]

तो रेटतो म्हणजे धूर्तपणानें चालतो.

त्यानें रेटून दिली म्हणजे झोंप घेतली. (धा. सा.श.) (२) [ लेट् धौर्त्ये. लेट्यति = रेटतो ] कसेंतरी रेटून नेलें म्हणजे शाठ्य केले. (धा.सा.श.) (३) [ रेट् १ परिभाषणे. रेटनं = रेटणें ] रेटून बोलणें म्हणजे लावून बोलणें. (धा.सा.श.)

रेटा [ रीढा (अपमान) = रेटा, (रेटणें म्हणजे अवमानानें पलीकडे लोटणें)]

रेड [ रेडा, रेडी, रेडें, रेडकूं, रेडकी ) रिष्यते इति रेट् । रिषति हिंसार्थः । यज्ञकर्मणि या रिष्यते सा रेट्. ज्या म्हसराला यज्ञकर्मात मारतात तें रेट् रेड्, रेट्, = रेड् = रेड (डा-डी-डें) रेडसि ६-१८ माध्यंदिनीय वाजसनेयसंहिता.] (भा. इ. १८३३)

रेती [ रीति (कीट, गंज) = रेती (कीटासारखी अती बारीक वाळू) किंवा रेता = रेती]

रेफ [ रिफ = कर्कश नाद करणें. (नाम) रेफ = कर्कश नाद = र (उच्चार) ]! अलीफ=अलेफ=अरेफ = अ हा कर्कश नाद करणें. आसुरभाषांत अ चा उच्चार कंठांतून करतात, तेव्हां अलेफ शब्द संस्कृत अरेफ ह्या शब्दाचा आसुर अपभ्रंश आहे. (भा. इ. १८३२)

रेरे [ रय् to go ] रेरे चालला आहे.

रेलणें [ लैण् श्लेषणे. लैणनं = रेलणें. ल=र; ण=ल] (धा.सा.श.)

रेव [ रेता = रेव (स्त्री) ]

रेवड [ रयपथः = रेवड] नदीची रेवड म्हणजे वाळूची वाट.

रेवन्त - रेवन्त देवाचा उल्लेख वराहमिहिर-बृहत्संहिता अध्याय ५८ श्लोक ५६ व विष्णु पुराण ३ (२,६,७) श्लोक) येथें आहे. ही देवता घोड्यावर बसून मृगया करीत असलेली कोरीत किंवा घडवीत. हिच्या प्रतिमा महाराष्ट्रांत खेडोखेडीं सांपडतात. कलकत्त्याच्या Indian Museum मध्यें ह्या देवाची एक मृगयाक्रीड मूर्ति आहे. रेवन्त हा शब्द रैमत् = रेमन्तः (अनेकवचन) ह्या संस्कृत शब्दाचा महाराष्ट्री अपभ्रंश आहे. रैमत् म्हणजे श्रीमन्त, लक्ष्मीवान्; 'रेवन्त' ह्या प्राकृत रूपानें ज्या अर्थी हा शब्द बृहत्संहितेंत व विष्णुपुराणांत येतो, त्या अर्थी हे दोन्ही ग्रंथ प्राकृत-महाराष्ट्री प्रचलित झाल्यावर बऱ्याच किंवा काही कालानें झाले असले पाहिजेत. बृहत्संहितेचा काल प्रसिद्ध आहे. तोच विष्णुपुराणाचा काल असावा; कारण विष्णुपुराणांत गुप्तांचा उल्लेख आहे. (भा. इ. १८३२)

रोक [ लोक्]

रोख १ [ रोषः = रोख (क्रोधस्थान) ] आमच्यावर रोख कां? त्याचा रोख माझ्यावर आहे = तस्य रोषः ममोपरि. (२) [ रोकः (रोखीची खरेदी) = रोख] (३) [ अपरोक्ष = रोख (अ आणि प यांचा लोप)] अपरोक्ष निंदा म्हणजे रोख निंदा. (भा. इ. १८३४) (४) [ रोक (प्रत्यक्ष खरेदी) = रोख]

रोखणें [ वृक्ष् १ वरणे, पसंत करणें. वृक्ष् = रोख + णें = रोखणें ] मला रोखून बैल धांवला म्हणजे मला निवडून काढून बैल धांवला. (धा.सा. श.)

रोगट [ रोगित ] *(रोगीट पहा)*

रोगराई [ रोगराजिः = रोगराई (रोगांची साथ) रोगराज्यं = रोगराई (रोगांचें राज्य)]

रोगीट [ रोगित = रोगीट, रोगट ] रोगः संजातः अस रोगितः (५-२-३६)

रोठा [ लोष्टः ] *(रोठी पहा)*

रोठी [ लोष्टः = रोठा (दगडाच्या सारखी वाटोळी, मोठी सुपारी), रोठी]

रोड १ [ रोड् उन्मादे ] *(रोडणें पहा)* (२) [ रुद्रः (रुद् अश्रुविमोचने) = रुड्डः = रोड ] रडका वाळलेला, आसवें ढाळणारा. (भा. इ. १८३३) (३) [ रौद्र (तामस) = रोड्ड = रोड ] तामस अतएव क्षीण.

रोडणें [ रोड् उन्मादे = रोडणे, रोड] उन्मादानें वाळणें. (ग्रंथमाला)

रोडा [ रोडः (चूर्ण) = रोडा ] दगड, विटा इत्यादींचे तुकडे.

रोराण [ रोरवण ] *( रोराव पहा)*

रोराव [ रु २ रोदने, रोरवीती = रोरावतो. रोरावः = रोराव. रोरवण=रोराण ] रोराण म्हणजे अति मोठ्यानें हाका मारणें. (धा. सा. श.)

रोशें गवत [ रोहिषं तृणं = रोशें गवत. गोअत्तं = गवत्तं = गवत] (भा. इ. १८३७)

रोशेल १ [ रोहिशतैलं] *(तिळेल पहा)* (२) [ रोहिसतैल = रोइसएल = रोशेल=रोशेल] (गर्दवाग्भट) (भा. इ. १८३४)

रोषणाई [ रुश् प्रकाशणें णिच् = रोषणाई] illumination

रोही [ रोहित्] *(रुई २ पहा)*

रोळी [ र व ण क} र व णि का}= रोणी = रोळी] रं व ण क म्हणजे पाणी निथळण्याकरितां केलेलें कळकाचें पात्र. (भा. इ. १८३६)

## ल

लकडा [ लकुटः, लुगडः] *(लांकुड पहा)*

लकड्या [ लागुडिकः = लकड्या ] पहिलवान, one with a stick, भालदार.

लकतर [ लक्तक (चिंधी) + तर = लकतर] फाटकी चिंधी.

लकब [ लक्ष्मन् ] *(लब पहा)*

लंका [ लंका = दुराचारी स्त्री] प्रस्तुत लहान पोरींना विनोदानें अपशब्दार्थी किंवा अवगुणार्थी लावतात. (भा. इ. १८३२)

लक्ती [ (लक्तक) लक्तिका = लक्ती] फाटकें वस्त्र. लक्ती = रगटी-टें. (भा.इ. १८३७)

लखलखणें [ लष (ख) कांतौ ] (ग्रंथमाला)

लखलाभ १ [ लखलाभ = लाखलाभ. लाखृ अलमर्थे लखलाभ = पुरेसा लाभ] (ग्रंथमाला) (२) [ लास् to be sufficient ] तुझें द्रव्य तुला लखलाभ होवो be sufficient to you.

लग [ लकः an ear of wild rice = लग]

लंगड [ डा-डी-डें) [ लंग = पायानें व्यंग] (भा. इ. १८३२)

लंगडणें [ लंग् (लंगडणे), लंगट = लंगड. लंगटति = लंगडणें ] लंगडणे हा नामधातू आहे.

ट व ड ज्या कित्येक मराठी धातूंत येतात ते धातू नामधातू होत. (धा.सा.श.)

लंगणें १ [ लंघ् १ क्षये. लंघनं (क्षय पावणें) = लंगणें] (धा.सा.श.) (२) [ लंग् १ गतौ = लंगणे] लंघनानें मी अगदी लंगून गेलो म्हणजे दुर्बल झालों. लंघ धातू निराळा व लंग निराळा. (धा.सा.श.)

लगतरी [ लक्तक + वस्त्र = लगतअअर = लगतर (री-रें) ] लक्तक म्हणजे फाटके वस्त्र, फटकूर. (भा. इ. १८३७)

लंगर [ अलंकार = (अलोप) लंगार = लंगर] नवरा गळ्यांत सोन्याचे लंगर घालील कीं, या वाक्यांत लंगर म्हणजे अलंकार.

लंगरसोनें [ अलंकारसुवर्ण = लंगरसोनें]

लगाम [ ललाम (अश्वभूषा) = लगाम]

लगोरी १ [ लग्नगोलि = लग्गगोरी = लगोरी] (भा. इ. १८३२) (२) [ लगुरः ] *(लांकुड पहा)*

लग्गा १ [ लग्नक surety, boil = लग्गा. लग् १ सङ्गे, गतौ ] (२) [ लग् १ सङ्गे, गतौ. लग्नक = लग्गा] (धा.सा.श.)

लघालघा १ [ लघ् भाषार्थः (द्वि.) ] (धातुकोश-लघलघ १ पहा) (२) [ श्लाघश्लाघं = लघालघा ] लघालघा जीभ बोलते = श्लाघश्लाघं जिव्हा वल्हति. (३) [ लंघ् to speak = लघालघा]

लचका [ लुंच् १ अपनयने. लुंच् लचका घेणें. लुञ्चिका = लुचका = लचका] (धा.सा.श.)

लज्जत् [ रसयतिः = लझअति = लजति = लजत् = लज्जत् ] रसयति म्हणजे चव. (भा. इ. १८३६)

लज्जत [ रस् nown रसति taste = लझत=लज्जत] taste.

लटकन् लटदिनि *[चटकर पहा]*

लटलट कांपणे [ लट् बाल्ये. बाळ चालतांना जसें कांपतें तसें कांपत चालणें. लटलट (द्विरुक्ति)] (ग्रंथमाला)

लटुपुटीचा, लटुफुटीचा [ लट् बाल्ये व स्फुडि, स्फुटि परिहासे. लटस्फुंटा = लटुफुटी = लटुपुटी] लटुपुटीचा म्हणजे पोरखेळ व परिहास यांचा. (धा.सा.श.)

लंड [ लंड = गू] घ्या आमचा लंड म्हणजे घ्या आमचा गू. (भा. इ. १८३२)

लडका-कीक [ ललकक = लडका-की-क. लल्ल, लल्लु] (स.मं.)

लडका-की, लाडू (बाई) [ दारक = डारक -लाडक = लडक (का-की) ] लडका व लडकी हे दोन शब्द हिंदी भाषेंत प्रचलित आहेत, मराठींत नाहीत. हिंदीत नपुसंकलिंग नाही. आतां

दरिका = डारिआ = राडिआ = लाडी. लाडी हा स्त्रीवाचक शब्द मराठीत प्रचलित आहे. लाडू हें त्याचें दुसरें रूप आहे. लाडका-की-कें हे लट् धातूपासून निघाले असून लडका-की या शब्दांतून अर्थात् निराळे आहेत. (भा. इ. १८३६)

लडबड [ लट् + बल्ह = लडबड]

लड्ड १ [ श्लथ = लट्टः] तो माणूस लड्ड आहे म्हणजे शिथिल, आळशी, मंद आहे. (२) [ लड्डः (childish, stupid) = लड्ड]

लढ् [ to fight) युद्ध करणें. [ १ लढणें. २. लढाई. ३ लढा. ४ लढवय्या. ५ लढाऊ. पाणिनीय धातुपाठांत रध हिंसासंराध्योः असा धातु आहे. हिंसार्थी रध् आहे. र चा ल् व ध् चा ढ् होऊन लढ् हें महाराष्ट्रींतून अपभ्रंश

द्वारा मराठींत रूप आलें आहे. लढ् चा मूळचा अर्थ ठार मारणें. द्वितीयार्थ युद्ध करणे. तृतीयार्थ भांडणें; ईरेस पडून त्वेषानें वाद करणें; इत्यादि] (भा. इ. १८३२)

लत्ता [ नक्तकः, लक्तकः = लत्ता] लत्ता म्हणजे कपडा.

लपेटणें [ वेष्ट् १ वेष्टने. लतावेष्टनं = लतेटणें = लपेटणें ] लतावेष्टन म्ह. आलिंगन. (धा.सा.श.)

लप्फा [ लक्ष्मन् = लप्फ = लप्फा ] बायकांच्या लुगड्याचा किंवा पैठणीचा जो कलाबूताचा किंवा रेशमाचा पदर त्याला लप्फा म्हणतात.

लब [ लक्ष्मन् characteristic, mark = लक्ब characteristic, लबक, लब (मिश्यांची लब, घेंऱ्याची लब) ]

लबक [ लक्ष्मन् ] *( लब पहा)*

लबका [ लिप् उपदेहे. उपदेहो वृद्धिः लिप्तकः = लबका] चिखलाचा लबका म्हणजे लिबलिबित गोळा. (धा.सा.श.)

लबलब, लबालब [ लबि शब्दे ] (ग्रंथमाला)

लमाण [ लोहवणिक् = लोहवाणि (कुडें, शिलालेख नं. २०) = लोहवाण = लहवाण = लव्हाण अथवा लमाण ] (ग्रंथमाला)

लय १ - लय काल, लय वेळ, लय पीक असे शब्द गांवढे योजतात. येथे लय म्हणजे अंत. लय वेळ म्हणजे मर्यादातिक्रान्त वेळ; अमर्याद वेळ; अति फार वेळ; अर्थात्

लय म्हणजे फार, पुष्कळ, अति, अमर्याद. (भा.इ. १८३२) (२) [ रयस् velocity = लय] continuous, much. लयलूट much excessive gain.

लला [ ललक = ललअ = लला (ली-लें) ललक = लडक (का-की-कें) ] लला म्हणजे मूल किंवा लाड. ललक म्हणजे लाड. (ज्ञा. अ. ९ पृ. ४)

लल्ल [ ललकक] *(लडका पहा)*

लल्लाट [ ललाट = लल्लाट] (स.मं.)

लल्लु [ ललकक ] *(लडका पहा)*

लव १ [ लोमन् = लव] (स.मं.) (२) [ लव (कालाचा अंश) एकोनपंचाशदुच्छ्वासप्रमाणः कालः लवः] लवमात्र डोळा मिटेना म्हणजे अत्यल्प काल इ. इ. इ.

लवंगी [ ललामगु = लवंगी ] ललामगु हा शब्द शिश्नार्थी तैत्तिरीयसंहितेत आला आहे. ललामगु चे स्त्रीलिंग ललामगिका. त्यापासून मराठी लवंगी. लहान मुलांच्या शिश्नांना बायका लवंगी म्हणतात.

लवघा, लवंघा [लंघः (शोष)] *(धातुकोश - लवंघ पहा)*

लवंडणे [ लोड् १ उन्मादे. लौड = लवंडणे, लवडणे. लौडः (लिंग) = लौडा] (धा.सा.श.)

लवडसवडी [ अव्यय) [ सपदि (तात्काळ at once, without delay, hurriedly) = सवडी]

लवणें १ [ ली ९ श्लेषणे ली = लवणें ] डोळा लवतो म्हणजे खालीं वर होतो. (धा.सा.श.) (२) [ नमनं = लवणँ = लवणें. न = ल ] थोरांपुढें लवावें म्हणजे नमावें. (भा.इ. १८३७)

लव बाई लव [ लम पुत्रि लम = लव बाइ लव] अगदीं दोन तीन वर्षांच्या मुलींचे खेळतांना म्हणण्याचें गाणें आहे. त्यांत आई म्हणते लव बाई लव. येथें लव हा शब्द लम् (रमणे) या धातूपासून निघाला आहे. लम=रमस्व=लव. लम् हें रम् चें प्राकृत रूप आहे. रम आत्मने परंतु लम

परस्मै. लव बाई लव म्हणजे रम पोरी रम, खेळ पोरी खेळ. (भा. इ. १८३६)

लव लव [ लप लप = लव लव ] लव लव साळू बाई, मामा येतो speak o darling, your uncle is coming.

लव्हाळा [ लघुलयः = लव्हाळा]

लस [ लसीका = लस]

लसालसा [ लष् to long for = लसालसा खातो ]

लहंगा १ [ ह्रग् to cover] (२) [ह्लगः (ह्लग to cover) = लह गा = लहंगा] petty coat.

लहान [ लघीयान् + लहान ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६४)

[ लघीयान् = लहीआन् = लहान ] अति बारीक. (ग्रंथमाला)

लहानगा [ लघीयस् + क] *(पोरगा पहा)*

-ला १ [ आरे ] *(स १ पहा)* (२) [ आरात्] *(स १ पहा)*

लांकुड [ लकुटः = } लकुड, लाकडी = लाकुड, लगुडः = लकडा.

लगुरः = लगुरी = लगोरी (डाव). (भा. इ. १८३२)

लाख १ [ लक्तक = लाख ] (२) [ लाख् १ अलमर्थे, लाख्यः = लाख्या, लाख ] लाख माणूस म्हणजे कामाला पुरेसा माणूस. लाख्या बारगीर म्हणजे समर्थ बारगीर. (धा.सा.श.) (३) [ लाघ्, लाख् सामर्थ्ये, लाख=लाख, लाख्या] लाख माणूस म्हणजे समर्थ माणूस. लाख्या बारगीर म्हणजे समर्थ, शूर शिपाई, लायक या फारशी शब्दापासून ल्याक् हा शब्द मराठींत आला आहे. त्याचा व समर्थार्थी लाख शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

लाखणी [ श्लक्ष्णिका = लाखणी सुपारी (मऊ चिकण सुपारी)]

लाखाटणे [ लाख् १ शोषणे. लाक्षाक्तं = लाखाट (क्रियापद लाखाटणें )] लाखाटणें म्हणजे लाखेनें माखणें. (धा.सा.श.)

लाखोली [ लक्षावलि = लाखोली]

लाख्या १ [ श्लाघ्यः = लाख्या ] श्लाघ्यः वारकीरः = लाख्या बारगीर. (२) [ लाघ्, लाख् सामर्थ्ये ] *(लाख ३ पहा)* (३) [ लाख् अलमर्थे ] *(लाख २ पहा)* (४) [ लाख् to be competent] लाख्या बारगीर competent horseman.

लागणें १ [ लाघ्, राघ् १ सामर्थ्ये. लाग] आम्हास लग्नास मणभर साखर लागली. ह्या कामास १०० माणसें लागतात. (धा.सा.श.) (२) [ लग् १ सङ्गे, गतौ. लग् (बंद होणें) = लागणें (बंद होणें)] घर लागले म्हणजे बंद झाले, पडलें, रिकामें झालें. (धा.सा.श.) (३) [ लाखृ, लाखृ शोषणे. राखनं, लाखनं = लागणे ] तो मरीनें, प्लेगानें लागला म्हणजे शुष्क झाला. (धा.सा.श.)

लागलेंच [ द्राकूच = ( ल प्रत्यय लागून) लागलाच - लीच - लेंच. द्राक् म्हणजे जलद, तत्काल; तोच अर्थ लागल या शब्दाचा आहे. मराठींत विशेषण आहे; संस्कृतात अव्यय आहे. ] (भा. इ. १८३३)

लाघव [ श्लाघिमा = लाघव ] कवीचें लाघव म्हणजे स्तुति करण्याचें कौशल.

लाघवी [ श्लाघाविन् = लाघावी = लाघवी] लाघवी म्ह. हांजी हांजी करणारा, मर्जी संपादन करणारा. लाघावी व लाघवी ही दोन्हीं रूपें भाषेंत प्रचलित आहेत. (भा. इ. १८३४)

लाँच [ (स्त्री) लंचा = लाँच (स्त्री) ] (भा.

इ. १८३४)

लाज १ [ लज् to cover अपवारणे (आच्छादणें) = लाज (कासोटा) ] त्यानें माझी लाज काढली म्हणजे कासोटा फेडला. (२) [ लज् १ प्रकाशने. लंजा = लाज ] दिव्याची लाज म्हणजे प्रकाश. (धा.सा.श.) (३) [ (पुं.) लंज (कोसाटा) = लाँज = लाज (स्त्री) ] लाज म्ह. कासोटा. त्यानें लाज सोडली आहे म्हणजे कासोटा सोडला आहे. कोणी बाई म्हणतेः-त्याने माझीं लाज काढली म्हणजे त्याने माझा कासोटा फेडला. (भा. इ. १८३४) (४) [ लज् १० अपवारणे ] लाज काढली. (धा.सा.श.)

लाजाळू [ लज्जालुः = लाजाळू]

लाट १ [ राध् - राधः good fortune, prosperity = लाट ] prosperity, gain. लाट लागला. (२) [ अरघट्ट] *(रहाट पहा)* (३) [ रत्निः (पुं. स्त्रि.) (Elbow to fist) = लाटण = लाट = लाटणे ] हाताची लाट, लाटण. (४) [ लाटः (जीर्णालंकार) = लाट (आकस्मिक लाभ) ]

लाटण [ रत्निः] *(लाट ३ पहा)*

लाटणे [ रत्नि = लटणि = लाटणी = लाटणें ] (भा.इ. १८३६)

लाड [ ह्राद्, ल्हाद् १ सुखे. ह्रादः, ल्हादः = लाड. ह्रादिनी = लाडण ] लाड करणें म्ह. सुख होईल असें वागवणें. (धा.सा.श.)

लाडका [ ह्राद् १ सुखे. ह्रादकः = लाडका]

लाडण [ ह्रादिनी ] *(लाड पहा)*

लाथ [ लत्ता]

लाथाडणें [ लत्तास्तृतं = लाथाड, लाथाडणें (+णे) संस्तृत=संथड (जैनमहाराष्ट्री) उपस्तृत = उपत्थड (जैनमहाराष्ट्री) ] (भा. इ. १८३६)

लापट [ लंपट = लापट]

लाफ्या [ लंफ = उडी मारणे. लाफ्या = लंफक = उड्या मारणारा = बोलतांना उड्या मारणारा = गप्पा ठोकणारा ] (भा. इ. १८३२)

लांबगा [ लंब + क] *(पोरगा पहा)*

लांबबिंब [ लंबविलंब [ लांबबींब = लांबबिंब. विलंब = बिअंब = बिंब] (भा. इ. १८३४)

लाभ [ विक्रेत्रा मूलादधिकं ग्राह्यं लाभः ।] धान्य मापतांना पहिल्या अधोलीस लाभ म्हणतात. लाभ म्हणजे वाढीची, व्याजाची अधोली. ती पहिल्यांदा काढून घेत.

लाभणें [ लाभपासून नामधातु] धान्य मापतांना पहिल्या अधोलीस लाभ म्हणतात. प्रयासानें कोणास पहिला मुलगा झाला म्हणजे मुलगा लाभला म्हणतात. (धा.सा.श.)

लामणदिवा १ [ लावण्यदीपक = लामणदिवा] (भा.इ. १८३२) (२) [ लावण्यदीपः = लावणदिवा, लामणदिवा]

लारी [ लोहिताखारी] *(कहारी पहा)*

लालडी [ ललाटिका (तिलकविशेषः) = लल्लटिका = लालडिआ = लालडी] ornament. कपाळावर बांधण्याचा एक दागिना.

लालुच [ लोलुंचा = लालुच]

लालुचणें [ लुञ्च् १ अपनयने. लोलुञ्च्यते = लालुचणें ] (धा.सा.श.)

लावणी [ मूळ संस्कृत शब्द लापनी. त्याचें प्राकृत लावणी ] ह्या लावण्या महाराष्ट्रांतील लोकांच्या तोंडीं आज दोन हजार वर्षांपासून आहेत. शृंगार, प्रेम

वगैरे विषयांवर लापनी ऊर्फ लावणी गाण्याचा छंद इतर कोणत्याही राष्ट्रांतल्यापेक्षां महाराष्ट्रांतील लोकांना विशेष आहे. (सरस्वतीमंदिर श्रा. १८२६)

लावणीसंचणी [ लापनीसंचयनी = लावणीसंचणी ]

लावालाव १ [ लामकालामकं = लावालाव. लमकस्य भावः लामकं. लामकं + आलामकं = लामकालामकं.] लमक म्हणजे जार, दुष्ट, पुरुष. त्याचा गुण तो लावालाव. (२) [ लापालापिका = लावालाव] लावालाव म्हणजे बोलून भांडण लावणें.

लाहालाहा १ [ लष् (द्वि.) ] *(धातुकोश-लाहालाहाकर पहा)* (२) [ लभ् १ प्राप्तौ. लालभः = लालहा = लाहालाहा. लभ्‌चा क्रियासमभिहार ] लाहालाहा म्हणजे मिळविण्याची अतिशयित हाव. (धा.सा.श.)

लाहो [ लंभ्, रंभ् शब्दे. रंभः, लंभः = लाहो ] a continuous cry.

लाह्या [ लांजिका = लाइआ = लाया = लाह्या. (apirated) लाही (एकवचन)]

लिक् Lick [ लिलिक्षति (लिह्) = Lick] English लिक् lick is desederative of लिह् derived from:]

लिंगाईत [ लिंगायत्त = लिंगाईत ]

लिंग्या [ लिंगिन् (लुच्चा, ढोंगी ) = लिंगी. लिंगिकः = लिंगिआ = लिंग्या ] (भा. इ. १८३६)

लिफाफा [ लिप्तपत्र = लिफाफा ] a cover for a letter. फारशींत लिप् to paint, write पासून लिफाफा शब्द गेला आहे.

लिवणें [ लिप् = लिव ] संस्कृतात लिहिणें या अर्थी दोन धातू आहेत, लिख् व लिप्. लिख्‌पासून लिहिणें व लिप्‌पासून लिवणें. लिवणे हा शब्द महाराष्ट्रांत ब्राह्मणेत्तर जाती हमेश योजतात, व हा शब्द शुद्ध आहे. लिहिणे या शब्दाचा अपभ्रंश नाहीं. (भा. इ. १८३४)

लिवलिवणें [ लिप् ( लिप्त = भक्षित) = लिव (द्विरुक्त) लिवलिवणें ] जीभ फार लिवलिवते आहे, म्हणजे फार खाण्यास इच्छिते आहे. (भा. इ. १८३५)

लिहालिहा [ ( Vaidik रे रिह (continuously licking) from रिह to lick = लिहालिहा ] जीभ लिहालिहा करते खाण्याला.

लुकलुकणे १ [ लोक् १ दर्शने.लोकनं (लोक्‌ची द्विरुक्ति) = लुकलुकणें ] (धा. सा. श.) (२) [ लोकृ दर्शने. द्विरुक्तीनें लुकलुकणें म्ह. थोडें थोडें दिसणें] (धा.सा.श.)

लुगडें [ दुकूलं = डुगूलं = लुगूडँ = लुगडे] देशमुख व पाटील व सरदार यांना पूर्वी वस्त्रें देत त्यांना लुगडीं ही संज्ञा असे. (भा.इ. १८३३)

लुंगवणें [ लुष्, लूष् १० चौर्ये. लुष्, लूष् (लूषयति) = लुखवणें = लुंगवणें (चोरणें). लूष् चोरणें (चुरादि) ] (धा.सा.श.)

लुचका १ [ लुचकः ] *(धातुकोश-लोचक पहा)* (२) [ लुंच्]

लुंचणें [ लुंच् १० बलादाने. लुंजनं = लुंचणें] पोर दूध लुंचतें म्हणजे थान ओढून पिते. पोर थानाचा लुचका घेतें म्हणजे ओठाने दुधाकरतां थान ओढतें. (धा.सा.श.)

लुचाडणें [ लुञ्च् १ अपनयने. लुंचादानं = लुचाडणें ] (धा.सा.श.)

लुची [ रुचित = लुचिअ = लुची ] श्राद्धांत रुचितं म्हणून तृप्तिप्रश्न करितात. लुची जीभ म्हणजे रुचकर अन्न खाणारी जीभ. (भा. इ. १८३४)

लुच्चा १ [ लुंच् अपनयने. लुंचक = लुच्चअ = लुच्चा ] (ग्रंथमाला) (२) [ लुप्सा = लुच्चा (One who लुभ्s or लुप्s]

लुटारू [ लुंठाकरः = लुटारा, लुटारू ]

लुटुलुटु चालणें [ लुट् प्रतिघाते. लुटुलुटु (द्विरुक्ति) चालणें म्हणजे प्रत्याघात झालेला मनुष्य चालतो तसें चालणें. लुटुलुटु यांतील ट बद्दल मराठी टु आला आहे. हा उ षणु वगैरे अनेक शब्दांत येतो. ग्रंथमालेंतील माढें येथील शिलालेखांत षणु रूप आलें आहे. ] (ग्रंथमाला)

लुबडा [ लुब्धकः = लुबडा]

लुबरा [ लुभिरः (लुभति) लुभ् ४ आकांक्षायाम् = लुबरा ] हावरा. (धा.सा.श.)

लुबाडणें १ [ लुभ् ४ आकांक्षायाम्. लुब्धापनं = लुबाड - अणं = लुबाडणें ] (भा.इ. १८३६) (२) [ लुभ् ४ आकांक्षायाम्. लुब्धादानं = लुब्बाडाणँ = लुबाडणें ] (धा.सा.श.)

लुला [ लोल : (कांपणारा) = लुला]

लुसलुशीत १ [ लूष् (भवादि भूषविणें) = लुसलुशीत ] (धा.सा.श.) (२) [ श्लक्ष्णश्लक्ष्णित = लुसलुशीत] (भा. इ. १८३४)

लूट [ लोप्त्रं = लोट = लूट ] चोरांची लूट म्हणजे चोरलेलें धन.

ले -घरले (खानदेशी) = गृहस्य आरे near the house. ला बद्दल खानदेशांत व बंगालींत ले योजितात.

लेक १ [ रेक a debased fellow = लोक] लेका! नीच. (२) [ ललक = लअक = लेक, लेंकरूं (खेळणारें)] (सं.मं.)

लेंकरूं १ [ ललकतर = लेंकअर = लेंकर = लेकरूं] (ज्ञा. अ. ९ पृ. १७) (२) [ ललक ] *(लेक २ पहा)*

लेका! [ रेक! (नीच मनुष्य) = लेका!]

लेकुरवाळी [ ललकतरपाली = लअकअरवाळी = लेकरवाळी = लेकुरवाळी] लहान अर्भक जतन करणारी स्त्री.

लेचापेचा १ [ लिश् ४ अल्पीभावे + पिश् अंशभावे.

लेशकपेशक = लेच्यापेच्या = लेचापेचा.

श=च] weak and reduced. (धा.सा.श.) (२) [ लिशः + पिशः. लिश् अल्पीभावे + पिश् अवयवे ]

लेच्यापेच्या [ लिश् to grow small = लेश्यः = लेच्या. पिष् to hurt = पेष्यः = पेच्या]

लेंडं [ लेंड = गू (पशूंचा)] (भा. इ. १८३२)

लेंडुक [ लेष्टुक = लेठुक = लेडुक = लेंडुक]

लेणार [ रत्नगृह = लअनघर = लेन्हार = लेणार]

लेणें - रत्न. रच्यास्थानीं मागधींत ल; कारण मागधीत र हा उच्चारच नाही. महाराष्ट्रीची मराठी होतांना मगधांतील लोकांच्या संगतीनें रअण हा उच्चार लअण = लयण = लइण = लेणें असा मराठींत लकारयुक्त झाला. (राधामाधवविलासचंपू पृ. १६२)

लेपें [ लेप्यम् (चित्र) = लेपे ] भिंत, कापड इत्यादींवरील चित्र.

लेंबडा [ श्लेमष्टः] Phlegmy *(लेमडा पहा)*

लेंभडा [ श्लेष्मटः] Phlegmy

लेमडा [ श्लेष्मटः = लेंबडा, लेंभडा, लेमडा] Phlegmy. शेमडालेमडा. श्लेष्मट = शेंबडा.

लेचका [ लेचकः] (धातुकोश-लेचक पहा)

लोटणें १ [ लोट् स्वप्ने. अति लोट = रात्र झाल्यामुळें लोटलों = अतिरात्रं अलोटम्] लोटणें = निजणें. (भा. इ. १८३३) (२) [ लोट् पूर्वभावे = लोट. दिवस लोटले = दिवसाः अलोटन्. लोटणें = गत होणें. लोटणें (ढकलणें) लोट् धौर्त्ये।] (भा. इ. १८३३) (३) [ लुट् १ भाषायां] त्यानें शिव्यांची लाखोली लोटली म्ह. अति शिव्या दिल्या. लोटणें म्ह. अति बोलणें. (धा.सा.श.)

लोठा [ लोष्टः = लोठा] मोठेमोठे लोठे मारणें.

लोड [ लोटकं = लोड ] पाठ टेकून लोळण्यास उपयोगी असा तक्क्या.

लोढणें १ [ स्त्र्यगारं अंतःपुरं अवरोधनं (अमरद्वितीयकांड-पुरवर्ग ११) रोधन = लोढण] लोढण म्हणजे स्त्री.

वडिलांनी आमच्या गळ्यांत हें लोढणें अडकविले आहे म्हणजे स्त्री अडकविली आहे. लोढणें (रोधन) याचा अर्थ प्रतिबंध असाहि आहे. त्यामुळें हा शब्द मराठींतहि व्यर्थक आहे. (भा. इ. १८३४) (२) [ लोडनं प्रतिघाते] (ग्रंथमाला)

लोंढा [ लुंडकः = लोंडा, लोंढा. लुंडक = गोळा ]

लोण [ लवनं = लोण] कोणा वर लोण येणें.

लोणकढें [ क्वथ् १ निष्पाके. नवनीतक्वथितं = लोणकढें (तूप)] (धा.शा.स.)

लोणा [ लवणक = लोणअ = लोणा ] ओलासारखा जमिनीवर येणारा मिठाचा एक विकार. (भा. इ. १८३३)

लोथ [ लुन्थ् १ हिंसायाम् = लोथ (मृतशरीर)] शीर कापून बाकी राहिलेला शरीराचा भाग. (धा.सा.श.)

लोधा [ लुब्ध = लोद्ध = लोध (धा-धी-धें)] (भा. इ. १८३२)

लोंबणें [ लुबि अदर्शने. लुंबनं = लोंबणें ] तो आडमार्गांत लोंबत राहिला म्हणजे दिसत नाहींसा झाला. (धा.सा.श.)

लोळविणें [ लू ९ छेदने. लोलूयनं = लोळविणें] तरवारीनें लोळवणें = असिपत्रेण लोलूयनं. लोळणेंचें णिच् जो लोळविणें तो धातू निराळा. (धा.सा.श.)

लोळा [ लोहलः = लोळा] लोहल म्हणजे सांखळीची मधली मोठी कडी.

लौंड [ लैंड = वेड्यांसारखें वागणें. लौड = लौंड (उन्मत्त, मूर्ख मनुष्य) = लौंडा, लवडा (उन्माद = शिस्न)] (भा. इ. १८३२)

लौडा [ लौडः] *(लवंडणें पहा)*

लौंडा [ रुंड (offspring of mule on a mare) = लौंडा (Bastard), लवंडा]

लौंडी [ रुंडिका = लुंडी = लौंडी, लवंडी ] रुंडिका म्हणजे कुंटण.

## व

व [ उत (आणि) = उअ = व ] ओ, व, हें अव्यय फारशीत संस्कृतसदृश प्राकृतांतून गेलेलें आहे; व मराठींत महाराष्ट्रीद्वारा उतरलेलें आहे. व हें अव्यय फारसींतून मराठींत आले असे म्हणण्याचें कारण नाहीं. (भा.इ. १८३५)

वइनी [ गृहवत्नी = वयनी = वइनी] घरांतील यजमानाच्या पत्नीला वयनी म्हणतात. वयनीबाई म्हणजे गृहवत्नी. भगिनीपासून वहिनी व बहीण हे दोन शब्द निघतात.

वई [ वृति = वइ = वई ] वई म्ह. कुंपण (ग्रंथमाला)

वखवख [ वृष्]

वखवखणें १ [ वृष्. वीप्ता, आभीक्ष्ण्यं) वृष्वृष् = वखवख] वखवख म्ह. अत्युत्सुक होणे. (धा.सा.श.) (२) [ वष् हिंसायां. वष् = वख् = वखवख (द्विरुक्ति)] (ग्रंथमाला)

वग १ [ अवगति = वगइ (अलोप) = वग (स्त्रीलिंग) ] अवगति म्हणजे माहिती, परिचय, ज्ञान. (भा.इ. १८३६) (२) [ वग् गतौ ] (ग्रंथमाला)

वंगण १ [ व्यंजनं = वंगण] वंगण म्हणजे गाडीच्या चाकाचें ओंगण. (२) [ म्रक्षण (तेल) = वंगण]

वंगणें १ [ वगि गतौ. वंगनं = वंगणे] वंगणें म्हणजे नम्रतेची गति कमी करणें. (धा.सा.श.) (२) [ वघि आक्षेपे निंदायां। गतौच । वंघनं = वंगणे ] कसा वंगला म्हणजे निंदेनें मऊ आला. (धा.सा.श.)

वगत [ अवगति (ज्ञान) = वगत]

वगळणें [ अवगलन = ओगळण = वगळण = वगळणें ] (ग्रंथमाला)

वचक-वचकणे १ [ वष्क = वसक = वचक. वष्कन = वचकणें ] वष्क म्हणजे पहाणें. (भा. इ. १८३४) (२) [ उच्चकनं = वचकणें ] उच्चकनं म्हणजे आदराने पहाणें. (भा. इ. १८३७)

वचणें [ वि + अय् to waste away = वचणें ] नासणें.

वचावचा [ वच् परिभाषणे - वचंवचम् = वचावचा (बोलतो)]

वजा [ वज्]

वटई [ वर्तका = वटई] पक्षिविशेष.

वटवट [ वट् परिभाषणे ] (ग्रंथमाला)

वटी [ वर्तिका ] *(वाटी पहा)*

वठणे १ [ वंठ] *(उठणे ३ पहा)* (२) [ व्यथ् १ भयसञ्चलनयोः व्यथ् (कोरडे होणें) = वठणें ] वृक्षः व्यथते = झाड वठते. (धा.सा.श.) (३) [ उठ् उपघाते ] (ग्रंथमाला)

वठवणे [ प्रस्थापन = पट्ठावण = वट्ठावण = वठावणें = वठवणें ] (भा. इ. १८३२)

वडप [ वर्षापात = वडप (ज्ञानेश्वर) fall of rain, rainfall. वंडर wander [वठ् वंठति एकचर्यायां to wander to wander alone, to wander. wander हा शब्द वंठर या संस्कृत शब्दाचा सहोदर आहे.]

वडा १ [ वटक = वडा (भक्ष्यविशेष) ] (भा. इ. १८३५) (२) [ वटकः पिष्टपूरःस्यात् (त्रि. शे.) ] (ग्रंथमाला)

वडीलधारें [ { वृद्धस्य इव धारा (सादृश्यं) यस्य} वृद्धधारं = वडीलधारें ]

वणवा [ वनवह्निः ] (ज्ञा. अ. ९ पृ. १७१)

वणिज १ [ वणिज् (कृ), वाणिज्यं (कृ) ]

वणिज करणें [ वणिज्कृ to trade = वणिजकरणें किंवा वाणिज्यंकृ = वणिज करणें. वाणिज्य या भाववाचकाचें मराठी वणिज.]

वणिजे [ वाणिज्यं = वणिजे]

वदन्ता [ उदन्ता = वदन्ता (बातमी)] उदन्ता म्हणजे बातमी. (भा. इ. १८३७)

वनसं ] वरकश्वसा = वरअससा = वअअंस = वनस = वनसं ] नवऱ्याची बहीण.

(स.मं.)

वन्सं [ पतिश्वसा = वइससा + वइंसा = वयन्स = वन्सं ] अनुनासिक आगंतुक. मराठींत असा आगन्तुक अनुनासिक अनेक शब्दांत येतो. शिंपी, कदांचित् तुंप, मंग, (vulgar), समुंदर इ. इ. इ. (भा. इ. १८३३)

वयिल [ व्यवहित + ल = वहिल (लाळीलें), वयिल, वायल, वायिल, वाहिल] separate

वर १ [ त्या वर = तत् परि after, beyond that, over and above that] (२) [ परि (वृक्षं परि against the tree ) = वर, वरि ] सैन्या वर = सैन्यं परि (३) [ परम् = वर ] तस्मात् परं न अब्रुवम् = त्या वर मी बोललों नाहीं. (४) [ द्रव्यं परि on account of money = द्रव्यावर उड्या मारतो ] (५) [ शतात् परा = शें वर, शंभरा वर. सहस्रात् परा = हजारा वर. शंभरा व हजारा या पंचम्या आहेत]

वरकड १ [ परिकर: retinue, servants, subordinates = वरकड (लोक इ.इ.)] (२) परिकथा fiction = वरकड ] वरकड बोलणीं काय कामाचीं what's the use of fictitious talk. (३) [ प्राकृत = पराकड = वराकड, वरकड ] (बाणहर्षचरित) प्राकृतप्रमदेव प्रारोदीत् = वरकड स्त्रियांप्रमाणे फार रडली. प्र = फार. (भा. इ. १८३५)

वरख [ परिष्कार: ornament = वरख ] वरखाची बांगडी म्हणजे ornamental बांगडी. साधी बांगडी आणि अलंकाराची बांगडी ती वरखाची बांगडी.

परिष्कारीया = वरखाची.

वरचट [ परिशिष्ट = वरचट ] बाकी. वरचट वस्तू विकून टाकल्या remaining things were sold off.

वरचढ [ वर्षिष्ठ = वरचिढ = वरचढ. को वो वर्षिष्ठ आ नरो (१-८-३७-६ ऋग्वेद)] वर्षिष्ठ म्हणजे अति उंच.

वरचील [ उपरि + चि]

वरताळा [ परिताल: = वरताळा]

वरदान [ परिदानं restoration of a deposil वरदान ] हें वरदान द्यावे मज.

वरदी [ परिदेय: = वरदी ] trusted, favoured.

वरधारा [ वृद्धदारक = वरधावा (वनस्पति)]

वरधावा १ [ परिधाय: (लवाजिमा, स्वारी) = वरधावा (retinue) ] वराचा वरधावा म्हणजे नवरदेवाची स्वारी. (२) [ परिधाव् to pursue ] लग्नांत वरधावा म्हणून एक प्रसंग असतो. त्यांत नवऱ्याचा pursuit नवरीकडील माणसें करतात.

वरपंकी [ उपरिपांक्तिक: = वरपंकी]

वरपणें [ वल्भ् १ भोजने. वल्भ् = वरपणें, ओरपणें.

व=व, ओ. ल=र. भ=प ] (धा.सा.श.)

वरपास [ परिपार्श्वे = वरपास ] वस्तू वरपास कोठें असली तर सांपडेल.

वरबडणें *[ वोरबडणें पहा)*

वरम [ मर्मन् ] *(वर्म पहा)*

वरमाय [ वरमातृ = वरमाअ = वरमाय ] (स.मं.)

वरवंटा १ [ परिवंटनं ] *(धातुकोश-वरवंट २ पहा)* (२) [ परिपंथ: ] *(धातुकोश-वरवंट १ पहा)* (३) [ वरीवृंतन = वरवंटा (Continuously rolling about ) वृन्त् धातूचें अभ्यस्त रूप

आहे.

वरवर १ [ परिपरि = वरवर. परर्वजने ।] देशांत वरवर पाऊस पडला म्हणजे देश वर्जून पाऊस पडला, देशांत तुरळक पाऊस पडला. (२) [ परि परि कृ, रट्, हस् etc. = वर वर करणें, रडणें, हसणें ] to do cry laugh superficially.

वर वर [ परेर्वर्जने (८-१-५ पाणिनि) ] परि परि त्रिगर्तेभ्यः वृष्टो देवः म्हणजे त्रिगर्ताला सोडून वर वर पाऊस पडला. वर वर बोलणें म्हणजे मुख्य मुद्द्याला सोडून वर्जून बोलणें. येथें वर वर याचा अर्थ वर्जून असा आहे.

वरात १ [ व्रात, व्रातिः = वरात ] व्रात, व्रातिः म्हणजे जनसमूह. (२) [ पर्याप्ति end, completion = वराती = वरात] लग्नाची वरात completion ceremony of marriage. हुंडीची वरात honouring a हुंडी.

वरिचिल [ उपरि + चि = वरिचिल, वरचील] sitting above.

वरिचील [ उपरि + ची]

वरि वरि [ उपर्यध्यधसः सामीप्ये (८-१-७ पाणिनि) उपरि= वरि ] उपरि उपरि ग्रामं = गांवा जवळ जवळ.

वरि वरि म्हणजे अति जवळ.

वरि वरि हा शब्द तुकाराम योजतो.

वरील [ अपरस्थ = अवरिल (जुन्नर शिलालेख) = वरील = वरलें, ला, ली] (ग्रंथमाला)

वर्चष्मा [ वर्चस्मन् ] *(वर्चस्मा पहा)*

वर्चस्मा [ वर्चस्मन् = वर्चष्मा, वर्चस्मा ] वरचढपणा.

वर्चस्व [ हा शब्द संस्कृत वर्चस्व या शब्दापासून निघाला आहे. वर्चस्त्व = वर्चस्व] (भा. इ. १८३३)

वर्म १ [ मर्मन् = वर्म ]

स मे मर्म क्राथयति = तो माझें वर्म काढतो. क्राथ् = काढ म्हणजे हणणें. स मे मर्माणि कर्षाति = तो माझीं वर्मे काढतो. कृष् = काढ म्हणजे फरपटून ओढणें. (भा. इ. १८३६) (२) [ मर्मन् = वर्म, वरम] वर्मी जखम = मर्मणि यक्ष्मा.

वऱ्या [ वरका = वरआ = वाऱ्या (हेमचंद्र)] (ग्रंथमाला)

वर्षअखेर [ वर्षाक्षरी] *(अखेर पहा)*

वऱ्हाड [ नवऱ्या मुलाबरोबर लगिनघरीं जी मंडली जाते तिला वऱ्हाड म्हणतात. वर + हाट = वरहाट = वरहाड = वऱ्हाड (नवऱ्या मुलाचा बाजार) (ग्रंथमाला)

वलगणें [ अवलगनं = वलगणँ = वलगणे]

"वलग्गए दिठ्ठी" हेमचंद्र-काव्यानुशासन पृ. २४६ पं. ४ निर्णयसागर. (भा. इ. १८३२)

वलुतें [ प्लेव् to serve प्लेवितं ] *(वलुता पहा)*

वल्लभ [ परिरंभक embracerm lover = वल्लभ. परिरंभ्यं = वालभ love ]

वल्हें ! [ भलं! = वल्हे! भले! ] Molesworth म्हणतो त्याप्रमाणें लघुशीं काहीं संबंध नाहीं.

वल्हें [ वहित्रं, वाहित्रं]

वसकन् १ [ वक्ष् १ रोषे = वस ] वसकन् म्हणजे angrily (धातुकोश-वसक २ पहा, धा.सा.श.) (२) [ वष् हिंसायाम्] वसकन् आंगावर आला म्हणजे क्रूरपणें हिंसा करण्याकरितां आंगावर आला. (धा.सा.श.)

वसतींचे घर [ वासतेयं = वसतिज्जं = वसतीचें (चा-ची-चें)]

वसवसणें [ वश् २ कांतौ, इच्छायाम्.

द्विरुक्तीनें वशवश = वसवस ] खायला वसवसतो आहे म्हणजे अतिशय इच्छा करीत आहे. (धा.सा.श.)

**वसू** [ वृषभः = वसहो = वसू ] Bull.

**वहान** [ वहनं = वहान]

**वहाळ** [ अवहालिका] *(वाहाळ पहा)*

**वहाळी** [ अवहालिका a bound hedge, wall = वहाळी ] a hedge. वहाळीनें जा go along the hedge. *(वाहाळ पहा)*

**वहिनी** [ भगिनी ] *(बहिण पहा)*

**वहिल** [ व्यवहित + ल = विअहिअ + ल = विहिअल = विहिल = वहिल (ला-ली-लें) = वायल (ला-ली-लें)] वायल, वहिल म्हणजे पृथक्, निराळें, तुटक. (भा.इ. १८३३)

**वळगणें** [ अवलग्न = ओळगण = ओळंगणें = वगळणें] वेली वगैरेचें वर चढणें. (ग्रंथमाला)

**वळचण** १ [ वलभी ] *(वळी पहा)* (२) [ वलीकस्थानिका = वळीयचाणी = वलचाण=वळचण ] (३) [ वलभीस्थान = वलइचाण = वळीचाण = वळचाण = वळचण ] वळचाण असा उच्चार गांवढे अजून करतात. (भा. इ. १८३२)

**वळणें** [ वृत् = वर्तय् = वळ] हस्तवर्तं वर्तयति = हातानें गोळी वळतो. गोवरी वळतो = गोपुरीषं वर्तयति. (भा. इ. १८३६)

**वळंबा** [ वलंबः perpendicular = वळंबा, ओळंबा ]

**वळी** १ [ वली = वळी] (स.मं.) (२) [ वलभी = वळी, वळचण] घराच्या वळी किंवा वळचणी गळताहेत.

**वाड्गें** / *बाणे पहा]*

**वाईक** [पातिक = वाईक. आस्थेवाईक = आस्थापातिक. नातेवाईक = ज्ञातिपातिक]

**वाईट** [ पापिष्ठ = पाविठ्ठ = वाइट्ट = वाईट] तो वाईट माणूस आहे = सः पापिष्ठः मनुष्यः

**वाकडें तिकडें** [ वक्रं तिर्यक् = वांकडें तिकडें (पंचतंत्र लघुपतनकाची कथा)]

**वांकणें** [ वंक् १ गतौ वंकनं = वांकणें ] वांकून नमस्कार करावा म्हणजे खालीं गती करून नमस्कार करावा. (धा.सा.श.)

**वांकस** [ वार्क्षं = वाँकस. वृक्षादनी = वार्क्षं]

**वाका** [ व्याख्या = वाखा = वाका] आकारांत म्हणून साम्यानें पुल्लिंगी. फारसी वाका शब्द निराळा.

**वांकुडा** १ [ वक्रट = वांकुड (डा-डी-डें) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ८) (२) [ वाह् १ प्रयत्ने = वागणें. ह = घ = ग. सिंह = सिंघ = सिंग] (धा.सा.श.) (३) [ वगि गतौ । धातुपाठे भ्वादिः। वग =वागणें म्हणजे चालणें ] तो कसा वागतो म्हणजे चालतो. (भा. इ. १८३४)

**वागणें** [ वगि गतौ. वगनं = वागणें ] तो कसा वागतो? = सः कीदृशः वगति (धा.सा.श.)

**वागूळ** [ वल्गुली ] *(वाघूळ पहा)*

**वांगें** १ [ वातिंग = वांगें ] egg-plant (२) [ वार्तांग = वाआंगं = वांगे ] (३) वार्तिंगणं = वाइंगण = वांगें, वंगण]

**वाघरूं** [ व्याघ्रतर ] *(रूं पहा)*

**वाघाटी** [ व्याघात-व्याघातिका (कौटिल्य) = वाघाटी ] a shrub.

**वाघांटी** [ व्याघ्राटक = वाघांटी] (भा. इ.

१८३४)

वाघाड [ व्याघ्राढ्यः ] *(उंटाड पहा)*

वाघूळ [ वत्गुली (जैनग्रंथ) = वागूळ, वाघूळ]

वांचवणें [ वंच् १० प्रलंभने. वंचयति (वर्जयति) = वांचवतो ] व्ययं वंचयति = खर्च वांचवतो. (धा.सा.श.)

वाचून, वांचून १ [ वृच्, वृज्, वृंज्] *(धातुकोश-वांच ३ पहा)* (२) [ वर्ज् १० वर्जने. वर्जयिता ] *(धातुकोश-वांच २ पहा)*

वांचून (शिवाय) [ वचणें म्हणजे जाणें. न वचणें म्हणजें न जाणें. वचणें व नवचणें हे दोन्ही शब्द ज्ञानेश्वरकालीन आहेत. वचणें ह्याचे प्रयोजक रूप वाचणे. वाचणे म्हणजे घालवणें. वाचून=घालवून. तुजवाचून म्हणजे तुला घालवून, सोडून, तुझ्या खेरीज. (ग्रंथमाला)

वाजट [ वादरत disputations = वाजट] भांडखोर, वादी, विवादांत कुशल. उ.- हें जाणों मृत्यु रागिठा। सिंहाडेयाचा दरकुटा। परि काइ वाजटां। पूरिजतसे॥ ज्ञा. १३-६०

वाजणें, वाजे [ वाशृ शब्दे । वाश्यते = वास्सए = वासे = वाजे ] तुंडं वाश्यते = तोंड वाजे. (भा. इ. १८३३)]

वाजवणें [ वी (वीणें) वाययति = वाजवतों] वाजवा जा म्हणजे स्त्रीसंग करा असा प्रयोग मराठींत करतात. येथें वाजवा म्हणजे विण्याची क्रिया होईल असें विधुवनाचें कृत्य करा. (धा.सा.श.)

वाजवी [ कुत्सितं बहु भाषते सः वाचालः वाचाटः सम्यग्बहु भाषते सः वाग्मी. वाग्मी (वाज् + मिन्) = वाजवी. वाग्मी = वाचवी = वाजवी. ग = ज] वाजवी बोलतो म्हणजे वाग्मी भाषते.

वांझ करटोली [ वंध्या कर्कोटक वल्ली = वांझ करटोली ] (भा.इ. १८३७)

वाट १ [ वार्ता = वाट] पोटापाण्याची व्यवस्था. (२) [ पथिवस्तुनि वाटः स्यात् (त्रि.शे.) ] (ग्रंथमाला)

वांटा, वांटणें [ वट् वंट् विभाजने ] (ग्रंथमाला)

वाटाणा [ वटधान्य = वटदाण = वटआण = वटाण = वटाण = वाटाणा. वट = वाटोळी गोळी] (भा. इ. १८३३)

वाटी १ [ (वैदिक) अष्ठीवत् = अट्ठि = आठि = वाटी (घुडघ्याची) ] (भा. इ. १८३४) (२) [ वर्तिका = वट्टिआ = वटी, वाटी (चंदनाची) ] (भा. इ. १८३२)

वाटेचें [ पाथेयं = वाटेचें] किंचित् पाथेयं अत्तुं दत्तः = कांहीं वाटेचें खायला द्या. वाटेचें म्हणजे वाटेंत खाण्याचा पदार्थ.

वाड १ [ वड्र = वाड] पुष्कळ. (भा. इ. १८३३) (२) [ बहुत ह्या अर्थी वाड शब्द ग्राम्य भाषेंत सध्यां योजतात. जसें वाड वेळ. वृद्ध = वड्ढ = वाढ = वाड.] (ग्रंथमाला)

वांड १ [ वंडा (जारिणी) = वांड] (२) [ वंडा unchaste woman = वांड, वंडकी] (३) [वड् विभाजने. वंडति. वांड = विभक्त राहणारा, बेपर्वाईनें असणारा ] (ग्रंथमाला) (४) [ वंड ( पुंश्चली) = वांड ] (भा. इ. १८३३)

वांडकी [ वंडा ] *(वांड २ पहा)*

वांडकीच (चा-ची-चें) [ वान्धकिनेय = वांडकिच (चा-ची-चें) ] छिनाल बाईचें पोर. (भा. इ. १८३६)

वाडगें [ वाटक = वाडअ = वाडा. वाटकक = वाडगअ = वाडगा-गी-गें] (ग्रंथमाला)

वाढ [ उपपादय = उववाडअ = वाड =

वाढ] अन्नं उपपादय = अन्न वाढ. (भा. इ. १८३२)

**वाढदिवस** [ वर्धमानदिवस] *(वाढवीस १ पहा)*

**वाढवणें** [ (वर्ध) वर्धापन = वड्ढावण = वाढावणें = वाढवणें. वर्ध् कापणें, तोडणें] तुटणें, तूट येणें. (भा. इ. १८३३)

**वाढवीस १** [ वर्धमान दिवस = वाढद्दिस = वाढवीस, वाढदिवस. वर्धमानदिवस (नाळ कापण्याचा दिवस) (भा. इ. १८३६) (२) [ वृद्धदिवस = वड्ढद्दीस = वाढवीस] वृद्ध-द्धा म्हणजे मूल किंवा मुलगी त्याचा दिवस तो वढवीस. (भा. इ. १८३३)

**वाण १** [ उपायन] *(वायन पहा)* (२) [ अपायन = वाअण = वाण (न्यूनता) उपायन = वाअण = वाण (अधिकता, बक्षीस)] वाण म्हणजे कमतरता व वाण म्हणजे बक्षीस असे दोन भिन्न शब्द मराठींत आहेत. (३) [ पाणः (trade) = वाण] वाणजिन्नस म्हणजे विकण्याचा जिन्नस, वणिज् शब्दाशीं संबंध नाहीं.

**वाणसी** [ पण्यस्त्री = वाणसी ] वेश्या.

**वाणा** [ दीनवर्णः = दीनवाणा. दीनवर्ण = दीनवाणें. वाण गाईचा = गोः वर्णः (जातिः)]

**वाणी** [ मन् ४ मनने ] देवावाणी चालतो=देवमानी चलति. माणसावाणी बोलतो = मनुष्यमानी वक्ति

येणें देवावाणी, माणसावाणी हे समास आहेत. देवं आत्मानं मन्यमानः देवमानी. (धा.सा.श.)

**वाणें**, वाहणें, वाहिणें, वाइणें, वायणें. वाहणें म्हणजे अर्पण करणें.

**वातरट** [ वातर (वायू झालेला, वादळी) वातरिष्ठ = वातरिट्ठ = वातरट ] वेडा, भंगट, (भा. इ. १८३३)

**वादबीद** [ वादविवाद = वादवीआद = वादवीद = वादब्याद ] (भा. इ. १८३४)

**वांदर** [ व्यंतर = वांदर, बांदर ]

**वांधा** [ व्यव + धा - व्यवधान ] *(धातुकोश-वाढ ८ पहा)*

**वाँधा** [ (स्त्री) वाधा (विरोध) = वाँधा (पुल्लिंग)] (भा.इ. १८३६)

**वाधाणा** [ व्यय + धा - व्यवधान ] *(धातुकोश-वाढ ८ पहा)*

**वानर** [ वननर = वानर (wood-man=ape) ] वा + नर हा समास मला मान्य नाहीं.

**वापवणें** (धोतर) [ वै-वायति-वापयति (शोषणें) वापन=वापवणें ] नवें कोरें धोतर धुणें, शुष्क करणें. (भा. इ. १८३४)

**वापसा** [ वापसमय = वापसा ] season to sow.

**वाफा** [ वप्र = वाप्प = वाप्फ = वाफा ] मळ्यांतील चौकोन. (ग्रंथमाला)

**वाफारा** [ बाष्पभरः = वाफारा ]

**वाभाडा** [ बाध् १ लोडने. बाबाध्य = वाभाड, वाभाडा. आबाधा = आबाढा = आबाळ, आबळ (वेदना दुःख)] (धा.सा.श.)

**वायगोळा** [ वातगुल्मः = वायगोळा]

**वायणें** *( वाणें पहा)*

**वायन** [ उपायन = वायन (वाअण) वाण] (भा. इ. १८३६)

**वायफळ १** [ व्यर्थफल = वायफळ ] (२) [ वायुफलं (इंद्रधनुष्य) = वायफळ (खोटे) व्यर्थ] (३) [ व्ययफलं =

वायफळ ]
वायल [ व्यवहित + ल] *(वयिल पहा)*
वायवर्णा [ वात रुणः = वायवर्णा (वृक्ष)]
वायस [ वयस् = वायस ] सर्व पक्षी, केवळ कावळाच नव्हे. सर्व पक्षी या अर्थी हा शब्द तुकाराम योजतो. (भा. इ. १८३४)
वायाँ [ म्लान = वाअ = वाय = कोमेजलेलें, फुकट गेलेलें. वाय हा प्रातिपदिक त्याची चतुर्थी वाया, वायाँ ] वायां गेले = नाशाप्रत गेलें. (ग्रंथमाला)
वायिल [ व्यवहित + ल] *(वयिल पहा)*
वार १ [ व्री to choose = व्रायः choice = वार] a selection to a dinner given to a begger student. (२) [ वारक = वार] वारक म्हणजे प्रतिदिवशींचें देणें, जेवण वगैरे. वारानें जेवणें म्हणजे प्रतिदिवशीं नेमलेल्या घरीं जाऊन जेवणें. (३) - पुणें, सातारा, सोलापूर वगैरे महाराष्ट्रांतल्या शहरांत कित्येक पेठांना रविवार, आदितवार, सोमवार, शनवार अशी नावें आहेत. हीं नावें दिवस या अर्थी जो वार शब्द आहे त्यावरून पडलीं, अशी कित्येकांची समजूत आहे. आठवडयाच्या सात नांवांवरून पेठांचीं नावें पडलीं म्हणावें, तर कित्येक शहरांत एकदोन दिवसांच्याच नांवानें पेठा आहेत. एकदोन पठाच त्या शहरांत असतील म्हणून एकदोन दिवसांचीं नांवें पडलीं म्हणावें, तर सातांहूनहि अधिक पेठा त्या शहरांत असलेल्या आढळतात. गांव किंवा शहर प्रथम वसलें त्या वेळीं फक्त एकदोन पेठा होत्या व तेवढ्यांना एकदोन दिवसांचीं नांवें दिलीं, असा एक पक्ष आणतां येण्याजोगा आहे. पण दिवसांचींच नांवे पेठांना कां दिलीं, ही शंका राहतेच. ह्या शंकेचे निराकरण करावयाला वार या शब्दाची प्राचीन परंपरा पाहिली पाहिजे. Epigraphica Indica च्या पहिल्या खंडांत सीयडोणी शिलालेख डॉ. कीलहार्नांनीं छापला आहे, त्यांत वार हा शब्द खालील स्थलीं येतोः-

पंक्ति
२ द्वाविंसतिकच्छितराकयोर्व्वारे वारप्रमुख
४ वारस्वस्ताय
७ वहुलूरुद्रगणयोर्व्वारे वारप्रमुखस्थानेन
१० वारप्रमुखस्थानसंबद्धकन्दुकानां
११ सीयडोण्यां वारप्रमुखस्थाने अइवुआनरसिंघयोर्व्वारे
१९ अ (इ) वुआनरसिंघयोर्व्वारे
२३ वारपद्मयोर्व्वारे
२९ पाहुदेदेकयोर्व्वारे
३० तुण्डिप्रद्युम्नयोर्व्वारे
३६ पाहूदेदेव्वायोर्वरे

Epigraphica Indica च्या पहिल्या खंडांत डॉ. हुल्झ यांनीं ग्वालेर येथील वैल्लभभट्ट स्वामीच्या देवळांतील दोन शिलालेख छापले आहेत. पैकीं दुसऱ्या शिलालेखांत हा शब्द असा येतोः-

२/३ सार्थवाहप्रमुख सव्वियाकानां वारे

२. सीयडोणी शिलालेख संवत् ९६० पासून १०२५ पर्यंत खोदला जात होता व वैल्लभ भट्टस्वामीचा शिलालेख संवत् ९३३ तला आहे. म्हणजे वार हा शब्द शक ८७६ त प्रचलित होता.

३. वार ह्या शब्दाचा अर्थ ह्या दोन शिलालेखांत (१) जमात व (२) पेठ या दोन अर्थी योजलेला आहे. वार या शब्दाचा अर्थ जमाव,जमात असा अमरकोशांत दिला आहे. शिवाय वार म्हणजे दरवाजा, असाहीं एक अर्थ आहे. प्राचीन काळीं महाराष्ट्रांत व सध्यां

गुजराथेंत कित्येक पेठांना दरवाजे असत व असतात. दरवाजा बंद केला म्हणजे पेठ बंद होत असे. दरवड्याच्या भीतीनें पेठेला दरवाजा केलेला असे. ह्या दरवाजाला वार हा मध्यकालीन संस्कृत इकवा प्राकृत शब्द होता. त्यावरून लक्षणेने वार म्हणजे दरवाजाच्या आंतील पेठ असा अर्थ झाला. वार म्हणजे दरवाजे व पेठा ज्यांनीं बांधल्या त्यांचीं नावें त्या वारांना किंवा पेठांना सहजच मिळत. सीयडोणी शिलालेखांत (१) वहुलू व रुद्रगण यांचा वार, (२) अ (इ) वुआ नरसिंघ यांचा वार, (३) वारप व पद्य यांचा वार, (४) पाहू व देदेक यांचा वार, (५) [ द्वाविंसतक व छित्तराक यांचा वार आणि (६) तुंडि व प्रद्युम्न यांचा वार असे सहा वार बांधणाऱ्यांच्या नांवानें उल्लेख आलेले आहेत. हुल्झनें वार याचा अर्थ जमात असा एकच दिला आहे; व कीलहार्नानें ह्या शब्दाचा अर्थ मुळींच दिला नाहीं. परंतु ह्या शिलालेखांत वर लिहिलेल्या सहा स्थळीं वार ह्या शब्दाचा अर्थ पेठ असा आहे, हें मीं वर स्पष्ट करून दाखविलें आहे.

४. शक ८७६ त बांधणाऱ्यांच्या नांवानें वारांचा उल्लेख करीत. पुढें मुसलमानी अमलांत बांधणाऱ्यांच्या नांवाची ओळख बुजून म्हणा किंवा मनुष्यांच्या नांवांपेक्षांहीं ग्रहांचीं नावें बरीं वाटलीं म्हणून म्हणा, वार ह्या शब्दाचा उपयोग ग्रहांच्या नांवांबरोबर होऊं लागला. कदाचित् वार म्हणजे दिवस व वार म्हणजे पेठ ह्या दोन अर्थांचा वाचक असा एकच शब्द असल्यामुळें, पेठांना आधुनिक लोकांनीं दिवसांची नांवे दिली असावी, असे दिसते की, पूर्वी प्रत्येक धंद्याच्या व जातीच्या लोकांच्या निरनिराळ्या पेठा असत व त्यांस त्या लोकांचे वार म्हणत. पुढें मुसलमानी अमलांत वाटेल त्या जातीचा माणूस वाटेल त्या वारांत राहूं लागल्यामुळें व धंदे व जाती ह्यांच्या जमातीचें माहात्म्य कमी झाल्यामुळें, वारांच्या पाठीमागील अधिष्ठात्या व्यक्तींच्या नांवाचा लोप झाला आणि त्या नांवांच्या ठिकाणीं वार शब्दाच्या अनेकार्थत्वामुळें ग्रहांचीं नावें आलीं. एकंदरीत, वार हा शब्द एक हजार वर्षांचा जुना आहे. (सरस्वती मंदिर-संकीर्ण लेख)

वारा [ वातरः = वाअरा = वारा] (ज्ञा. अ. ९ पृ. १९)

वारी १ [ वृ १० आवरणें. वारि = वारी] खाण्यावारी = खादनवारि (खादनं वृणोति वारयति आच्छादयति एवं प्रकारेण). अर्जुनवारि पौरुषं (नलचंपूः चतुर्थ उच्छ्वासः १८ श्लोक) (धा.सा.श.) (२) [ वारिः-री (प्रवाश्यांची टोळी) = वारी] पंढरीची वारी म्हणजे पंढरीला जाणाऱ्या प्रवाश्यांची टोळी.

वारकरी म्हणजे वारीला जाणारा प्रवाशी.

वारून - मी त्याला वारून आलों = मी त्याचा त्या कामापासून निषेध करून आलों.

वारयित्वा = वारून = बजावून, निषेधून. निवारयित्वा = निवारून. (ग्रंथमाला)

वारूळ १ [ वामलूर = वाँरूळ = वारूळ. र च्या स्थलीं ळ आणि ळ च्या स्थलीं र, असा वर्णविपर्यय झाला आहे. ] (भा. इ. १८३२) (२) [ श्लीपदं पादवल्मीकं ॥ वल्मीक = वारूळ ] (भा. इ. १८३४) (३) [ वल्मीकूट

ant-hill = वर्वीऊड = वारूळ. ल=र. ट=ड = ल=ळ] (४) [ वल्मीगृहं = वाळूर = वारूळ ] ant-hill (५) [ वामलूर = वावरूळ = वारूळ ]

**वालभ** [ परिरंभ्यं]

**वाली** [ व्री to support : व्रायः = वाली] supporter. माझा वाली कोण? who is my supporter?

**वाव १** [ व्यामः = वाव (करसहितयो बाव्होरन्तरं) व्या + मा ३ माने ] (धातुकोश-वाव पहा) (२) [ व्योम = वोवं = वाव ] (स.मं.) (३) [ व्यापः = वाव (व्याप्ति, सवड). व्यामः = वाव]

**वांव १** [ व्यामः] *(वाव ३ पहा)* (२) [ व्याम (चार हात प्रमाण अंतर) = वांव ] (भा. इ. १८३६)

**वावडी १** [ व्यावृत्ति exclusion = वावडी] वावडी होईल म्हणजे exclusion shall result. (२) [ वाताटी = वावाडी = वावडी ] पतंग.

**वावडे १** [ व्यावृत्तक = वावडअ = वावडँ = वावडें ] आरोग्यापासून वांकडें नेणारें तें वावडें. (स.मं.) (२) [ व्यापद् = वावडें ] रोगीट.

**वावर १** [ वापार्हं (क्षेत्रं) = वावार = वावर] वावर म्हणजे पेरण्याला योग्य जमीन.

**वावरणें** [ (व्रज्) वाव्रज्यते = वावरतो ] वावरणें म्हणजे वांकडें तिकडें फिरणें. (भा. इ. १८३६)

**वाव्हटा** [ वाहुअस्थि] *(वाव्हटा २ पहा)*

**वाशेळें** [ वासिर = वाशिल = वाशेळें (तूप वगैरे) ]

**वांसा** [ वंशक = वंसअ = वांसा (नाकाचा)] (स.मं.)

**वासरूं** [ वत्सतर ] *(रूं पहा)*

**वासिपु** [ व्या + क्षिप् ४ क्षेपे - व्याक्षेपः ] चलबिचल. *(धातुकोश-वासिप १ पहा)*

**वासिपे** [ वासाप्यते (वस् १०छेदे, अपहरणे)] *(धातुकोश-वास १ पहा)*

**वास्त** [ वस्त् to enquire, beg, solicit वस्तिः = वास्त ] solicitation, enquiry. तो लुच्चा म्हणून कर्जाची वास्त सोडिली.

**वास्त पुस्त करणे** [ वस्त् to solicit + पुस्त् to honour = वास्तपुस्त ] inquiry about and regard for any one.

**वाहणा** [ उपानहौ = पाहणाओ (स्थाणगसुत्त) = वाहणा ] वाहणा हें रूप वस्तुतः द्विवचनात्मक असून मराठींत अनेकवचनीं योजतात. (भा.इ. १८३२)

**वाहणें** */ वाणें पहा /*

**वाहतुक** [ वाहतुकं = वाहतुक ] वहतु म्हणजे रस्ता. वाहतुक म्हणजे रस्ता चालून जाण्याचें भाडें.

**वाहाण** [ प्रा + नहिता (caus. p.p.) shoe, boot = पाण हां (मानभाव ग्रंथ) = वाहाणा, वाहाण ] shoe.

**वाहाणा** [ प्रा + नहिता] *(वाहाण पहा)*

**वाहावा** - संस्नवभागा स्थेषा बृहंतः प्रस्तरेष्ठाः परिधेया श्च देवाः । इमां वाचं अभि विश्वे गृणन्त आसद्यास्मिन्बार्हिषि मादयध्वम् । स्वाहा वाट् ॥ १८ ॥ (२) [ विद्यावृद्धः = विजावाडा = विजवटा (Sarcastically learned) विद्योतक = विजोटा = विजवटा (प्रकाश पाडणारा Sarcastically) ] (३) [ विद्यामत्तः = विज्जवट्टा = विजवटा (intoxicated by his wisdom). विजयमत्तः = विजवटा mad

with success ] (४) [ विद्यावत् = विजवटा (wise sarcastically) ]
**विजा १** [ ईजा] *(इजा पहा)* (२) [ वि + ईज् ]
**विंझणा** [ वीजनः ] *(विंझुणा पहा)*
**विझणें** [ विध्मा = विज्झा = विझ. विझ + णें = विझणें ] (भा. इ. १८३६)
**विझवणें १** [ विध्मायते ] *(विझावणें पहा)* (२) [ विधमनं = विझवणें]
**विझावणें** [ विध्मायते = विझ्झाअतो = विझावतो, विझवतो ] (भा.इ. १८३२)
**विंझुणा** [ वीजनः = विज्जणो = विंझुणा, विंझणा, विंजणा ]
**विट** [ विष्]
**विटणें १** *[ वीट पहा)* (२) [ विन्ट् हिंसने = विटणें ] वस्त्र विटलें. (धा.सा.श.) (३) [ विष् विप्रयोगे। विष्णति ] रंग विटला म्हणजे रंगाचा विप्रयोग झाला. माझें मन विटलें म्ह. मनाचा विप्रयोग झाला. (धा.सा.श.) (४) [ विंटनं = विटणें. विण्ट् वुण्ट् हिंसने, वस्त्र विटलें = वस्त्रं विंटितं किंवा वुंटितं ] (भा.इ. १८३६)
**विटाळ** [ भ्रष्ट = बाट. विभ्रष्ट = बिट. भ्रष्टविभ्रष्ट = बाटबिटणे. विभ्रष्टनं = विटणें ] (भा.इ. १८३६)
**विटाळणें** ] विट्वलितं विटलितं = विटळलें विटळलें षिलालितं विटालितं = विटाळलें. टल् टल् वैक्लव्ये ] (भा. इ. १८३६)
**विटाळशी १** [ विट्टालशयाना = विटाळशी] (२) [ विट्वालासुः = विटाळशी ] (३) [ विष्टरजस् = विट्टलसी = विटळशी = विटाळशी. विष्टं रजः यस्याः विष्टरजाः ] विष्ट म्हणजे टाकाऊ. (भा. इ. १८३६) (४) [ विष्टालसा = विट्टाळशी = विटाळशी. विष्टया अलसा म्हणजे विष्टेनें मद, थकलेली ] विष्टा म्हणजे शरीरांतून वहाणारें टाकाऊ रक्त. परंतु रजस् या पदार्थाशी ज्या अर्थी विटाळशीचा संबंध आहे त्या अर्थी पहिली (३) ही व्युत्पत्ति ग्राह्य दिसते. (भा.इ. १८३६) (५) [ विभ्रष्टरजा = विटलसी = विटाळसी ] जिचे रजस् भ्रंश होते ती विटाळशी. (भा. इ. १८३६) (६) [ विष्टरजाः = विट्टलसी = विटाळसी ] विष्ट म्हणजे स्रवणारे आहे रजस् जिचे ती स्त्री. बहुव्रीहि समास. विष्ट् सेचने या धातूचें निष्ठारूप विष्ट. विष्ट म्हणजे स्रवणारें. विष्टरजस् म्हणजे जिचें रजस् स्रवते आहे ती स्त्री. ह्या शब्दाच्या अनेक व्युत्पत्त्या मी करून पाहिल्या. परंतु ही व्युत्पत्ति आतां कायम समजावी. (भा.इ. १८३६)
**विटी** [ वीटा ( महाभारत-आदिपर्व) = विटी ] विटीदांडूच्या खेळांतील हत्यार. (भा. इ. १८३६)
**विटी (दांडू)** [ वीटा = इटीदांडू खेळण्याचा लाकडाचा दोन चार बोटांचा तुकडा. आ=ई (मराठी स्त्रीलिंग) ] (भा.इ. १८३४)
**विडा १** [ व्रीड् ४ चोदने. व्रीडः = विडा ] विडा उचलणें म्ह. युद्धचोदना स्वीकारणें. नागवेलींच्या पानांच्या विड्याशीं संबंध नाहीं. (धा.सा.श.) (२) [ विदथ (प्रतिज्ञा) = विडा ] विडा मांडणें to set up a pledge.
**विडा तोडणे** [ व्रीडा तोडणे = वीडा तोडणें] नागवेलीच्या पानांच्या विड्याशी (व्रीडा) वीडा शब्द उच्चारसाम्यानें एक मानण्याकडे प्रवृत्ति झाली. (ग्रंथमाला)

विडी [ विष्टि = विट्टि = विडी ] मुसळ वगैरेंना जें लोखंडाचें वलय किंवा वळें घालतात त्याला विडी म्हणतात. (भा. इ. १८३५)

विणणें [ इव् १ व्याप्तौ. इन्वति = विणतो] त्यानें माझ्या भोंवतीं जाळें विणलें म्हणजे जाळ्याची माझ्या भोंवतीं व्याप्ति केली. (धा.सा.श.)

विणणें बिणणें [ वयति विवयति = विणणें बिणणें] बिनणे निरर्थक जोडशब्द नाहीं. (भा. इ. १८३४)

विंदाण [ वि = इंद् ऐश्वर्ये: वींदन = विंदाण] ऐश्वर्य.

विद्रें [विद्रिय (निंदित, वांकडें) = विद्रें ] अविद्रियाभिः ऊतिभिः (अनिंदिताभिः संरक्षणैः) १-९-४६-१५ ऋग्वेद

विनवणी [ विज्ञापना किंवा विनमनी किंवा विज्ञपन.

विज्ञापना = विनावणी

विनमनी = विनवणी

विज्ञपना = विनवणी ] (ज्ञा. अ. ९पृ. ३)

विधवा [ विधवा = विध्वा] (स.मं.)

विधुर [ विगतः धवः यस्याः सा विधवा । विगता धुरा यस्य सः विधुरः । ] धव म्हणजे नवरा, धुरा म्हणजे बायको. धू धातूपासून धव व धुरा हे शब्द निघाले आहेत. धवन करणारा जो तो धव; धवन करून घेणारी ती धुरा. (भा. इ. १८३४)

विन्द्या [ इन्द् १ परमैश्वर्ये. वीन्द्रः = विन्द्या] (धा.सा.श.)

विपाय [ विपाक (ना.) ] *(धातुकोश-विपाइ पहा)*

विरजण [ विजण (अमरकोश) = विरजण] र मध्येंच घुसडला गेला. (भा. इ. १८३२)

विरजणें [ विरंजन = विरंजणें ] दुधाचें रूपरंग बदलणें म्हणजे विरजणें. विरजण म्हणजे दुधाचें रूपरंग बदलणारी वस्तु आम्लादि. (भा.इ. १८३४)

विरढा [ विरुध् = विरढा, बिरडी (बिरड्या plural) ] a grain which germinates through soaking.

विराढ [ विराष्ट] *(बिऱ्हाड ३ पहा)*

विराणें [ वि + रण् to sound : विराणनं = विराणें ] Military musical instrument.

विरी [ वीर्य (potency)= वीरी] lustre, potency, उजळा, शक्ति.

विरोळा [ विरुलः = विरोळा ] पाणसाप.

विर्घळणें [ आविर्गलनं = विर्घळणें ] (भा. इ. १८३६)

विऱ्हाढ [ विराद्धं] *(बिराढ २ पहा)*

विवंचणें [ मन् ४ ज्ञाने. मीमांसनं = विवंचणें] विवंचोनि बोले (रामदास) (धा.सा.श.)

विंशति [ द्विदशति = विअशति = विंशति] पूर्ववैदिक भाषेंत दशन् प्रमाणें दशति हा शब्द १० दहा या अर्थी होता. द्विदशति म्हणजे दोन दहा. द्विदशति या पूर्ववैदिक शब्दाचा अपभ्रंश विंशति. द्वि तला प्रथम द काढून टाकला आहे व दशति यांतील प्रथम द च्या बदला अनुस्वार उच्चारला आहे. कित्येक भाषाशास्त्रज्ञ शति, शत या शब्दाचा अर्थ पूर्ववैदिक कालीं दहा होता, असें प्रतिपादन करतात. परंतु ते असामंजस्यास्तव मला रुचत नाहीं.

त्रिदशति = त्रिअशति = त्रिंशति = त्रिंशत्.

चत्वारिदशति = चत्वारिअशति = चत्वारिंशत्.

पंचदशति = पंचअशति = पंचाशत्.

पंच या शब्दांत अन्त्य अ असल्यामुळें द चा लोप होऊन तत्स्थानीं अनुस्वार झाला नाहीं.

षष्‌दशति् = षष्‌षटि = षष्टि.

दोन ष झाल्यामुळें एकाचा लोप. षष्टि म्हणजे सहा दहा.

सप्तदशति = सप्तअअति = सप्तति

अष्टदशति = अषअअति = अषीति = अशीति

मधल्या अबद्दल ई व षबद्दल श.

पूर्ववैदिक अष्टदशति चा वैदिक अपभ्रंश अशीति

किंवा अष्, अश् असा हि आठ ह्या अर्थी पूर्ववैदिक शब्द असावा.

नवदशति = नवअअति = नवति

संस्कृत = मराठी

विंशति = वीस

त्रिंशत् = तीस

चत्वारिंशत् = चाळीस

पंचाशत् = पंनास

षष्टि = साटि = साठ

पण

सप्तति = सत्तर

सप्तति चें सत्तर कसें व्हावें? र कोठून आला? प्राकृत वैय्याकरण सप्तति चें सत्तरि असें रूप निपाततात इतकेंच. कारण देत नाहींत. स चा स रहातो. प्त चा त्त होतो. पण ति ची रि कशी व्हावी. ति ची इ होईल. रि कोणत्याहि समंजस नियमानें होणार नाहीं. सप्तति चा अपभ्रंश होतांना ति ची रि होते, असें म्हणणे म्हणजे काहीं नियम सांगणें नव्हे, व कारण हि देणें नव्हे. अनेक वस्तूंच्या ठाईं जो येक सामान्य धर्म रहातो त्याचें कथन करणें म्हणजे नियम सांगणें. तसा प्रकार सप्तति चा अपभ्रंश सत्तरि होतो, हें सांगतांना झालेला दिसत नाहीं. तेव्हां, मराठी सत्तर ह्याचा उगम संस्कृत सप्तति शब्दांत नाहीं. मला वाटतें, पूर्ववैदिक भाषेंत सात ह्या अर्थी सप्तृ असा शब्द असावा.

सप्तृदशति = सत्तरअअइ = सत्तरि = सत्तर. अशा दृष्टीनें पाहिलें असतां, आपल्या पूर्ववैदिक कोशांत सप्तृ हा शब्द गणावा लागतो. अन्यथा मराठी सत्तर शब्दाची यथाशास्त्र व्युत्पत्ति होत नाहीं. (भा. इ. १८३५)

विंशा, विंशे [ विंशतिकः (a coin) = विंशा plural विंशे]

विशेष [ विशेषक = विशेषअ = विशेष (विशेषण) ]

विशेष गुण येथें विशेष हा शब्द गुण शब्दाचा विशेषण आहे व तो विशेषक या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे.

विसकटणें, विसकडणें *[ विचकटणें पहा]*

विसकरणें [ विष्किर = विसकिर = विसकर, विसकरणें ] (भा. इ. १८३४)

विसणैल [ विक्षणित + ल] दुखलेले, विषण्ण झालेले. *(धातुकोश-विसण १ पहा)*

विसंबणें [ विश्रमण ] *(विसमणें पहा)*

विसंभणें [ विश्रंभणं = विसंभणें ] (भा. इ. १८३४)

विसमणें [ विश्रमण = विसमणें, विसंबणें, विश्रामः = विसावा ] (भा. इ. १८३४)

विसवशित [ वि + सि १ तंतुसंताने (द्वि.)] *(धातुकोश-विसविस १ पहा)*

विसविशित [ वि + सि १ तंतुसंताने द्विरुक्त] *(धातुकोश-विसविस १ पहा)*

विसविशीत [ विष् १ सेचने (द्विरुक्त) विषद्विषत् = विसविशीत ] विसविशीत म्हणजे पाण्यानें शिथिल झालेला पदार्थ.

(धा.सा.श.)

**विसाणल** [ विशामित + ल = विसाणल] *(धातुकोश-विसाव ३ पहा)*

**विसाणले** [ विशान्त + ल = विसाणले ] (धातुकोश - विसाव ३ पहा)

**विसावण** [ वि + शो पातळ करणे. विश्यान = विसाण, विसावण (ऊन पाण्यांत) ] पाण्यांत विसाण घालणें म्हणजे थंड पाणी घालून ऊन पाणी पातळ, क्षीण करणें. (भा. इ. १८३४)

**विसावा १** [ वि + श्रम्. विश्रामः = विसावा] *(धातुकोश विसाव ४ पहा)* (२) [ विशायः = विसावा ] अनुक्रमेण प्रहरकादीनां यत् शयनं सः विशायः। विसावा म्हणजे पहारेकऱ्याचें क्रमाक्रमानें निजणें.

**विस्तव १** [ वि + तप् (with Euphonistic स् inserted) noun विस्तपः fire = विस्तव, विस्तु, विस्तो ] fire. When repeated action is indicated स does not change to ष. (२) [ विष्णु] *(विस्तु पहा)*

**विस्तु** [ विष्णु (अग्नि) = विष्टु = विस्तु = विस्तव] विस्तु असा उच्चार गांवढे करतात. मराठींत अग्निवाचक विस्तु हा शब्द नित्यांतला झाला आहे. (भा. इ. १८३२)

**विस्तू** [ वि + तप्, विस्तपः ] *(विस्तव १ पहा)*

**विस्तो** [ विस्तपः ] *(विस्तव १ पहा)*

**विहीर** [ विवर = विअर = वीर = विहीर] विवर (नपुसंक) = विहीर (स्त्री.). (भा.इ. १८३२)

**विळखणें** [ विलक्षणं = विळखणें ] मी त्याला विळखणें असा प्रयोग आढळतो. (भा.इ. १८३४)

**विळखा १** [ (स्त्री) विश्लिक्षा = विळिखा = विळखा (पु.)] (भा.इ. १८३४) (२) [ विल् ६ संवरणे = विळखा ] विळखा म्हणजे वेष्टणें. (धा.सा.श.)

**विळखां** [ विल् ]

**विळा १** [ वि + लू to cut (लावः) = विळा] (२) [ लू ९ छेदने. वि + लवः = विळा वि + लविः = विळी ] (धा.सा.श.) (३) [ इली (शस्त्रविशेष) = विळी, इळी, (पुल्लिंग) इळा, विळा] (भा. इ. १८३६)

**विळी १** [ वि + लविः ] *(विळा २ पहा)* (२) [ इली ] *(विळा ३ पहा)* (३) [ (वि) लू. विलाविका = विळी]

**वीट १** [ द्विष् २ अप्रीतौ. द्विट = वीट] (धा.सा.श.) (२) [ इष् ९ भृशार्थे. इष् = वीट ] गोडाचा वीट आला म्हणजे अतिशय प्राप्त झाला. (धा.सा.श.) (३) [ विष् ९ विप्रयोगे. विष्टि = वीट] त्या वस्तूवरून माझें मन विटलें म्हणजे त्या वस्तूची गरज मला भासत नाहींशी झाली. (धा.सा.श.)

**वीत १** [ वितरित = वीत] (स.मं.) (२) [ वी २ प्रजने. वीतं = वीत ] वीत म्हणजे वेत, वीण. (धा.सा.श.)

**वीस** [ विंशति ] *(विंशति पहा)*

**वीसदेओ** - मानभावांच्या (लीलाचरित्र या नांवाच्या) ज्या ग्रंथाचा परिचय गेल्या सभेस सभासदांस झाला त्या ग्रंथांतील दहा पांच चरित्रांत वीसदेओ हा शब्द एकाहून जास्त वेळां आला आहे. असें एक चरित्र संकेत लिपींतून एथें उतरून घेतो:-

रात्रीं वीहीरणी ओंवीया अरोगणे ॥

= करमणूक = खाणे

चक्रधरा रात्रीचा : पूजाअवसरु : (=वेळ)

जाला : गंगे पैलाडी सेत तेथ : आले : धनूवाटी (=क्षेत्रनाम) येकी चंद्रमा होता असें : ओंबीयां देखीलीयां : भटी : म्हटलें : ओंबीया घेओजी : चक्रधरं : उगे ची : मागोतें : म्हटलें : जी जि ओबीयां जालीया असती तरि घेओं : उत्तर केले जालीया नसती की गा : जी जिः जालीया असति : तरि घेया : मग : भटोबास घेओं लागलेः म्हटलें : चीरूनीं घेया : मगः भट चिरुनीं जालीया जालीया घेतिं : चक्रधर : पूढारें मळेया वरीः आलें : श्रीकरी गोफणं घेतली : थै भोरडीयें थै भोरडीये म्हणोनिः सोंकरिलें : (=ओरडणें:) तवं चंद्रमा मालवला : आणि चक्रधर : आले : तवं वारा सूटलां : तें थोर वावधान (=वावटळ आलें : ) तेव्हळिः चक्रधरः मेरूचां (= डोंगर) कोहकिं : = (गुहा) आसन जालें : लुखदेओ बा यें : चक्रधरा : आड पसवडी (=पासोडी) धरीलीः तवं भटोबा बोबाऊं लागले : लुखदेया : लुखदेया : लुखदेया : सबदु दीघलां : नागदेवा ये : चक्रधर येथ असतिः भटोबास आले : तवं वावधान नावेक समले : मग : म्हटले : कां गां ओंबीयां बाजा नां कांः जी जिः वीसदेओ नाही : म्हटलें : गुफे हुनी घेउनी याः हा घेया पैल दीवाः दीसतु असेः मगः भट गेले : वीसदेओ घेउनी आले : तव भटां सरीसी आउसे (= विशेषनाम आलीं :) तवं : चतुर्धरा : मर्गज - (विशेषनाम) सी आसन जाले : तवं भट ओबीयां भाजुनी घेउनी आले : मग : चक्रधर : गुफे सी : आले : मग : जी : ओंबीयां चोखटा केलीयां : कोवळीया नीवडीलीया : आतु साखर घालौनी ओळगवीलीया : (=घोळल्या) यरी (= इतरांस) वाटे वाटौनि दीधलीयाः चक्रधराः प्रसादु केला मग आवघेयां भगत जनां देवविलिडे । चक्रधरें : आरोगीलीया : गुळळ (=गरळ) जाला : वीडा ओळगवीलां : (=दिला) मग : पहुडु (-निद्रा) स्वीकरीलाः ॥ ११ ॥

वरील चरित्रांत वीसदेओ हा शब्द दोनदां आला आहे. ओंब्या भाजण्याकरितां वीसदेवो पाहिजे होता. या शब्दाचा अर्थ वाचकांच्या ध्यानांत सहज आल्यांवाचून राहणार नाहीं. वीसदेओ म्हणजे ज्याला सध्यां आपण वर्तमान मराठींत विस्तव म्हणतों, तो मूळ संस्कृत शब्द वैश्वदेव. भोजनापूर्वी विश्वे देवांकरितां ज्या अग्नीत आहूती टाकतात, त्याला वैश्वदेव म्हणतात. वैश्वदेव पेटला, वैश्वदेवांत आहुती टाकल्या, इत्यादि लौकिक उक्तींत वैश्वदेव म्हणजे अग्नि असा लौकिक अर्थ अद्याप हि प्रतीतीस येतो. ह्या वैश्वदेव शब्दाचे अपभ्रंश येणेंप्रमाणें होत आले -

वैश्वदेवः = वीसदेओ
= वीसदो
= वीस्तो = विस्तू
= विस्तव

पैकीं विस्तो, विस्तू हा अपभ्रंश कांहीं लोक योजतात. कांहीं लोक विस्तव असा उच्चार करतात. वस्तुतः अशिष्टांचा विस्तू, विस्तो हा उच्चार मूळाच्या अधिक जवळ आहे, हें सांगणें नलगे. कित्येक वर्षांपूर्वी विष्णू या शब्दापासून विष्टु, विस्तु, अशा परंपरेनें विस्तव हा शब्द मीं व्युत्पादिला होता. परंतु त्याला ऐतिहासिक आधार कांहीं एक नव्हता. प्रस्तुतच्या व्युत्पत्तीला ज्या अर्थी

ऐतिहासिक आधार सांपडला आहे त्या अर्थी वैश्वदेवः = वीसदेओ = विस्तो = विस्तव ही परंपरा मान्य करणें अपरिहार्य व संयुक्तिक आहे. (भा. इ. १८३७)

वेखंड [ वचाखंडं = वेखंड ]

वेगळा १ [ विकलः = वेगळा] (२) [ वैगल्य (विगलत्व) = वेग्गल = वेगळ = वेगळँ = वेगळें, ळा-ळीं ] (ग्रंथमाला)

वेगाढ [ वेगाढ्य = वेगाढ (ढा-ढी-ढें) (एकनाथ-रुक्मिणीस्वयंवर)]

वेंघ १ [ अंघ् १ गत्याक्षेपे. वेंघ] उ.- त्यानें पर्वत वेंघला. (धा.सा.श.) (२) *[ धातुकोश - वेंग २ पहा]*

वेच [ व्ययः = वेच] *(वेंचणें पहा)*

वेचणे १ [ व्यंय् १० वित्तसमुत्सर्गे. व्यय् = वेचणें.

व्ययः = वेच] खर्चवेच (खर्च फारसी + वेच प्राकृत) द्रव्य वेचणें म्हणजे खर्चणें. (धा.सा.श.) (२) [ विज् ३ पृथग्भावे = वेचणें ] तांदुळांतून खडे वेचणें म्ह. पृथक् करणें. (धा.सा.श.)

वेचणें बेचणें [ वेचनं विवेचनं = वेचणें वेचणें ] (भा. इ. १८३४)

वेज [ वेधः = वेज] वेज म्हणजे मोत्याचें भोंक.

वेझ [ व्यध् to pierce]

वेटोळ्या [ पट्टोलिकाः = वट्टोळिआ = वटोळिआ = वेटोळ्या (सनदापत्रें) अ=ए] खांकेंत वेटोळ्या घेऊन कोर्टात जातो म्हणजे पट्टोलिका ऊर्फ सनदापत्रें घेऊन कोर्टांत जातो.

वेड १ [ (पुं.) वेधः = वेड (न.)] त्याला दारूचें इतकें वेड लागलें = म्हणजें वेध लागला. (२) [ मेट्, मेड् to be mad = वेड] (३) [ वैधेय (मूर्ख) = वेढे अ = वेढ =वेड (डा-डी-डें)] वेळझवा असा शब्द कवितेंत येतो. (भा. इ. १८३५)

वेडगळ [ विधेयकल्पः = वेडकळ = वेडगळ] किंचित् कमी वेडा तो वेडगळ. ईषदसमाप्तौ कल्पं (५-३-६७)

वेडझवा [ एडधवः (बहिरा नवरा) = एडझवा = वेडझवा] (भा.इ.१८३४)

वेडपा [ विधेयात्मा = वेडपा (वेड्या मनाचा)] विधेयं = वेडें (सेवक, प्रवण)

वेडबंबः [ एडबंबः = वेडबंबः ] (भा.इ. १८३४)

वेडा १ [ एड =एडक = एडअ = एडा येडा = वेडा] अकर्ण एडो बधिरः (हेमचंद्र) (ग्रंथमाला) (२) [ वैधेयः foolish (वैजयंती) = वेडा]

वेडामुका [ एडमूकः = वेडामुका] (भा.इ. १८३४)

वेडावणें [ एल् ११. एलाय = वेडाव ] गाण्यानें माकड वेडावून गेलें म्हणजे चेष्टा करूं लागलें. (धा.सा.श.)

वेडें (आसक्त) [ विधेय = विडेअ = वेड डा-डी-डें) ] भक्तजनानुरोधविधेयानि तु भवंति देवतानां मनांसि । (बाण - हर्षचरित - चतुर्थोच्छ्वास - पृष्ठ १२३ - निर्णयसागरप्रत) देवतांचीं मनें भक्तजनांवर वेडीं होतात. तो तिच्यावर वेडा झाला = स तद्विधेयो वभूव । (भा. इ. १८३५)

वेडें-डा-डी [ वैधिक -की (dogmatic) = वेडें-डी-डा] वेडी समजूत = dogmatic, unreasonable idea.

वेणा [ वेदना = वेअणा = वेणा (प्रसुतीच्या)] (भा.इ. १८३४)

वेणी [ वेणी = वेणी] (स.मं.)
वेणीफेणी [ वेणीप्रवेणी = वेणीफणी. (संस्कृमहाराष्ट्री अपभ्रंश)] (स.मं.)
वेत [ वी २ गर्भधारणे. वीति = वेत ] वेत म्हणजे गर्भधारणा. (धा.सा.श.)
वेताळ [ वितालं = वेताल, वेताळ. वैतालः = वेतालः = वेताळ]
वेथा [ व्यथा = वेथा ]
वेल [ वेल्लः (वेल् हलणें) = वेल. वेल्लि = वेल.] (ज्ञा. अ. ९ पृ. ६७, ६९)
वेलबुटी १ [ वल्लिव्यूति. वि + वे १ तंतुसंताने ] (धातुकोश-वेलबुट पहा) (२) [ व्ये १ संवरणे. वल्लिव्यूति = वेलबुटी] व्यूति म्हणजे विणणें. (धा.सा.श.)
वेल्हाळ १ [ वेल्लहल a libertine, a lover = वेल्हाळ ] a lover dear to a woman. वेल्लहला = वेल्हाळी a woman dear to her husband. (२) [ वेल्ल् गतौ : वेल्लालु = वेल्हाळ. वेल्ल् to walk gracefully] a woman who walks gracefully. (३) [ वेल्लहला a sensual woman = वेल्हाळ, वेल्हाळा ] a young amorous woman.
वेल्हाळा [ वेल्लहला] *(वेल्हाळ ३ पहा)*
वेल्हाळी [ वेल्लहला] *(वेल्हाळ १ पहा)*
वेव्हाणी [ व्यवधानिः separateness = वेव्हाणी] भिन्नव्यवस्था, प्रविभाग. उ. - तैसें प्रकृतिचां गुणीं । जेया कर्माची वेव्हाणी । केली आहे वर्णीं । चौ हीं इहीं।। ज्ञा. १८-८२४
वेसण [ गेष् अन्विच्छायाम्. गेषण - गवेसण = गवसणें. गवेसण = वेसण (गचा लोप)] (ग्रंथमाला)
वेसवा १ [ वेश्या = वेसवा ] Courtezan (२) [ वेशः पण्यस्त्रिया भृतिः । तया यो जीवति स्त्री पुमान् वा स वेशवान् । (मनु-चतुर्थाध्याय-८४, कुल्लूक). वेशवान् = वेसवा ] वेसवा म्हणजे कुंटीण किंवा कुंटण. (भा. इ. १८३४)
वेसवार [ वेशवारः (मसाला) = वेसवार]
वेस्वा [ वेस्वा म्हणून जो अपशब्द मराठींत आहे त्याचें मूळ वेसा अव्वा = वेश्या अव्वा. अव्वा = स्त्री.] (सरस्वतीमंदिर शके १८२६)
वेसूवार [ वेसवारः = वेसवार (मसाला)] धणे, सुंठ, मिरे इत्यादींचा मसाला.
वेहकळ [ वैकंकत (वनस्पतिविशेष) = वेहकळ]
वेळ [ वेला (अक्लिष्टमरणं) = वेळ ] त्याची वेळ आली म्हणजे मरण आलें.
वेळणी [ विल् आच्छादणें. वेलनी = वेळणी] (भा. इ. १८३४)
वेळणें १ [ विल् १० क्षेपे = वेळणें ] पाय वेळतो म्हणजे इकडें तिकडें हलवतो. (धा.सा.श.) (२) [ वेल् हलवणे. वेलन = वेळण, वेळणें, वेळणी] (भा. इ. १८३३)
वेळू [ वेणुः = वेळू. ण = ळ]
वैद्यमानी [ वैद्यंमन्यः = वैद्यमानी]
वैरण [ पति + आभरण = वइरण, वैरण] the petticoats given by the husband to the bride at a wedding.
वैरणें [ (वि + ईर) वीरणं = वैरणें ] भात वैरणें म्हणजे भात भांड्यात घालणें. (भा. इ. १८३४)
वैरागर [ वज्रागर = वइरागर = वैरागर ]
वैराण [ विरिणं शून्यमूषरं (अमर-तृतीयकांड-नानार्थ-वर्ग-५६) शून्यं निराश्रयो देशः। उषरं स्थलभेदः तद्विरिणमिति स्यात्. वैराण हा शब्द विरिण या शब्दापासून

निघाला आहे. विरिणस्य इदं वैरिणं । देश वैरिण झाला आहे = देश वैराण झाला आहे] (भा. इ. १८३३)

वोज १ [ ओजस् = वोज (नपुसंक) ] (भा. इ. १८३३) (२) [ ऊर्जा = उज्जा = वोजा = वोज (स्त्री) ] (भा. इ. १८३३)

वोटा [ प्रकोष्ठः = वओटा = वोटा = ओटा]

वोडंबर [ अवडंबर (ज्यांत उंबर म्हणजे ढोलकें वाजवून खेळ करतात तो खेळ, गारोड्याचा खेळ)] (ज्ञा.अ. ९ पृ. ८४)

वोढ [ वध्]

वोढि [ ऊह् : ऊढि idea, consider-ation.

आ + ऊह् : ओढि idea, consider-ation. = वोढि ] idea, consider-ation.

उ. - परि धर्मपत्नी कां धांगडि । पोसितां जरि एक वोढि । तरि कां अपखडि । आणावी आंगां । ज्ञा. १८-९३६

वोतारी [ अव + तप् १ संतापे] *(धातुकोश-ओत् २ पहा)*

वोथंबा [ अव + स्तंभ् - अवष्टंभः ] *(धातुकोश-वोथंब पहा)*

वोपासीर [ उपाश्रय dependence upon, reliance upon = वोपाशिर ] thing on which dependence or reliance is placed.

उ.- ॐपासीरयाचें बळ । घेउनी मिरवी कीळ । तैसे रत्न न्हेवे निखळ । चक्रवर्ति हा ।।

अमृतानुभव जुनी पोथी १३७

वोरबाडणें [ व्रश्च् ६ छेदने. वरीवृश्च्यते = वरबडणें = वोरबडणें = ओरबडणें ] (धा.सा.श.)

वोल्हावणें [ ओलावणें पहा]

वोशट, वोशेट [ वशिष्ट (वसा superlative ) = वोशेट, वोशट ] full of greese हाताला वोशेट लागेल म्हणजे वसा, चर्बी लागेल.

वोह [ उधन = वोह (कास)]

वोहर [ वधूवर = वोहर ] (स.मं.)

वोहरा [ वधूवरक = वोहरा ] (स.मं.)

व्याजबीज [ व्यायव्ययः = व्याजबीज. आय = आज. विआय = व्याज. विशेषेण आयः = व्यायः व्यय = बीज ] (भा. इ. १८३४)

व्याही [ विवाही = विआही = व्याही ] (स. मं.)

व्हा जा *[ करणं ये पहा]*

व्हेरी Very [ परिशून्य very empty. परि = वरि = Very ]

## श

शपत् [ शंवत् (अंतःकरणे, अभिमुख्ये) = शपत् (निपात) ] येईल तर शपत् इत्यादि वाक्यांत हा निपात मराठींत आढळतो. (भा. इ. १८३४)

शंभरावा [ शततमः = शंभरावा. त्रिंशत्तमः = तिसावा. दहावा, नववा इ. ]

शरम [ श्रम् ४ खेदे. श्रमिः = शरम ] (धा.सा.श.)

शरमणें [ श्रम् तापे खेदेच। श्रम = शरम ] त्याला शरम वाटली = त्याला खेद वाटला. फारसी शरम शब्द मराठींत स्त्रीलिंगी असल्यामुळे हा प्राकृत शरम शब्द हि स्त्रीलिंगी झाला आहे. (भा. इ.

१८३३)
शरिर [ शरीर (सं.) = शरिर ] (स. मं.)
शर्य्यत [ श्वर्त् गतौ श्वर्तिः = शर्यत ] race फारसी नाहीं.
शहाण १ [ शिक्षाज्ञ = सिह्मणु = सिहाण (णा-णी-णे) = शहाण (णा-णी-णें) सिहाण शब्द ज्ञानेश्वर व दासोपंत योजतात. (भा. इ. १८३२) (२) [ विचक्षणवती वाचं वदेत् (ऐतरेय ब्राह्मण) वेदकालीं कोणालाहि कांहीं काम सांगतांना असे शब्द योजीतः—
"देवदत्त, विचक्षण, गां आनय" म्हणजे देवदत्त या संबोधनापुढें विचक्षण हें विशेषण उच्चारीत. (विचक्षण) चक्षण = सहण = शहाण (णा-णी-णें). देवदत्ता, शहाण्या, गाय आण] हा प्रयोग सध्यांहि आपण मराठीत करितों. (भा.इ. १८३४) (३) [ सज्ञानः = सयाणा = शहाणा] ब्रजभाषेंत सयाने (शहाणा) असा अपंभ्रंश आहे.
शहारा [ सीत्कारः = सीयारा (ज्ञानेश्वरी) = शहारा ] shivering.
शा - *(सा २ पहा)*
शाई [ श्यावा = श्याई = शाई. शामिका = शाइआ = शाई ] शाई म्हणजे काळा रस हा प्रथम अर्थ. नंतर कोणत्याहि रंगाच्या लिहिण्याला योग्य अशा रसास शाई हें नांव पडलें. (भा. इ. १८३४)
शाडू [ शादः (कर्दमः) = शाडू]
शाण [ छगण ] *(शेण पहा)*
शानदार १ [ सान्द्रं] *(छानदार २ पहा)* (२) [ सान्द्र] *(छानदार ३ पहा)*
शांदार [ सांद्र] *(छानदार ३ पहा)*
शाहजोग [ साधुयोग्य = साहुजोग = शाहजोग] वाटेल त्या सीध्या माणसास मिळणारी हुंडी.
शाहाळें [ शालूकं] *(शाळें पहा)*
शाळू १ [ शीतालुः = शिआळू = शाळू. शीतं न सहते शीतालुः ] शाळू सोबती म्हणजे कष्ट मेहेनत न सोसणारे स्नेही. (२) [ शयालु = श्यालु = शाळू] (भा.इ. १८३४)
शाळें [ शालूकं = शाळें, शाहाळें. हाकार उच्चारसौकर्यार्थ] नारळाला शाळें, शाहाळें म्हणतात.
शिकंदर - हा फारसी शब्द अलेक्सेंदर या ग्रीक शब्दापासून निघाला आहे हें सांगावयाला नको च. निघण्याचा प्रकार असा -
अलेक्सेंदर = अलेक्सिंदर = कसिंदर = सिकंदर = शिकंदर.
अले = अल् अरबों आर्टिकल झालें; व अल्सिकंदर असा शब्द बनला. पैकीं अल् हें आर्टिकल उडून नुसता सिकंदर शब्द राहिला. पुरातन शिलालेखांत अलिकसुंदर असें संस्कृत रूप या शब्दाचें आढळतें. "नशीब शिकंदर" अशी म्हण फारसींतून मराठीत रूढ झालेली सर्वांना माहीत आहे च. (भा. इ. १८३२)
शिंकणें [ शृंख् (शिंकणें) = शिंक (आपस्तंबीय धर्मसूत्र)] (भा. इ. १८३४)
शिकरण [ शिखरिणी = शिकरण (केळ्यांची वगैरे)] (भा. इ. १८३४)
शिंकरणें [ सिंघाणकरणं = शिंखाणअरणँ = शिंकारणें = शिंकरणें ] शिंकरणें म्हणजे नाकांतला मळ काढणे. (भा. इ. १८३६)
शिकरी [ शिक्यराजिः = शिकराई = शिकरी. शिक्यरज्जुः = शिकराई = शिकरी ] रहाटाच्या घडमाळेच्या

शिंक्यांचा दोर.

शिंका [ छिक्का = शिंका (अनुस्वारीकरण)] (भा. इ. १८३३)

शिखर [ शीर्ष = शिखर ( र व ष यांचा व्यत्यास)] शिखर म्हणजे डोकें.

* कोवळ्या नारळाला म्हणतात (संयोजक).

१ रहाटावरील घडमाळेला ज्या दोरीनें पाण्याचे लोटे बांधतात ती दोरी (संयोजक)

शिखराथिला [ शिखरान्वित + ल = शिखराथिला ] आथिला प्रत्ययान्त शब्द सदा विशेषणें असतात, क्रियापदें नसतात.

शिंगरूं [शिशुकतरं = शिउगअरं = शिगरूं = शिंगरूं ] शिंगरूं म्हणजे अश्वशिशु.

शिंगाडा [ शृंगाटक = शिंगाडअरं झिंगाडा] (भा. इ. १८३३)

शिजणें [ शिजि अव्यक्ते शब्दे ] भात वगैरे शिजतांना जो अव्यक्त शब्द होतो, त्याच्या अर्थी. (ग्रंथमाला)

शिजे [ षिधु संराद्धो । संराद्धिर्निष्पत्तिः । अन्नं सिध्यति = सिज्जइ = अन्न सिजे शिजे ] (भा. इ. १८३३)

शिट् [ शिट् अनादरे = शिट् छित्, छत्, छे छीः] (ग्रंथमाला)

शिटी [ क्ष्विदा = सिटी = शिटी. क्ष्विद् to whistle]

शिडकाव १ [ शीकृ १ सेचने. शीकापातः] *(धातुकोश-शिडकाव ३ पहा)* (२) [ शीकृ १० आमर्षणे. शीकापातः = शिकाव = शिडकाव (डागमः)] (धा.सा.श.)

शिडी [ श्रेढि = शिडी ]

शिणक [ श्लिष् १ दाहे ] *(शिळख पहा)*

शितवड [ सिक्थावर्त = शितवड ] शितांचा घोळ.

शितें [ सीमन्तकं = शितें (भांग)]

शिंदळ [ शिस्नदेवनी ] मैथुनाची आवड असणारी. *(धातुकोश-शिंदळ पहा)*

शिदोरी [ सिद्ध + आहार्यं = सिदोरी, शिदोरी ] शिदोरें म्हणजे शिजवलेले अन्न.

शिनळ १ [ शिस्नदेवनी] मैथुनाची आवड असणारी. *(धातुकोश-शिंदळ पहा)* (२) [ छिन्ना = शिन (+ स्वार्थक ल) = शिनळ ] छिन्ना म्हणजे जारिणी.

शिपटी १ [ शिफा] *(शेपाटी पहा)* (२) [ शिफा = शिप +टी (ऱ्हस्वत्व दर्शक) = शिपटी ] शिपटी म्हणजे झाडाचा फोक. शिफा म्हणजे तरुप्ररोह. (३) [ शिफा = शिप. शिप + ऱ्हस्वत्वदर्शक टी = शिपटी. मूलादूर्ध्वं गता शिफालता ] शिपटी म्हणजे फोकाटी.

शिपणें, शिंपणें [ सिन्व् = सिप्प = शिपणें, शिंपणें. सिन्व् = सेचने ] (भा. इ. १८३६)

शिपतर [ शिफास्तर = शिपतर ] शिफास्तर म्हणजे लवचीक फांद्यांचें टोपलें. शिफा तरुप्ररोहः ।

शिवें [ सिध्म = सिव्व = शिवें ] (भा. इ. १८३४)

शिमगा [ शृंगार = शिमगाअ = शिमगा ] शृंगार म्हणजे काम, कंदर्प. शिमगा म्हणजे कंदर्पक्रीडा, लक्षणेनें कंदर्पक्रीडेचा वार्षिक दिवस म्हणजे शिमगा. शिमगा करा = शृंगारं कुरु. शृंगार म्हणजे कंदर्पक्रीडेचीं वस्त्रादिक भूषणें. (भा. इ. १८३३)

शिरकणें [ श्रेकृ गतौ । धातुपाठ, भ्वादिः । श्रेकृ = शिरक् ] तो इकडे शिरकत नाहीं म्हणजे गमन करीत नाहीं. शिरणें धातू निराळा. (भा. इ. १८३४)

शिरचेंच्या [ छिद् ७ द्वैधीकरणे. शीर्षछेद्यः = शिरचेंच्या ] (धा.सा.श.)

शिरड [ श्रेधी, श्रेढी = शिरड ] मडक्यांची शिरड म्हणजे एकावर एक ओळ, रांग, उतरंड.

शिरणें [ श्रि = शिर (शिरणें). श्रि म्हणजे जाणें] तो घरांत शिरला = सः गृहं श्रितः (भा. इ. १८३६)

शिरशिरी [ चिरि ५ हिंसायाम् ] *(धातुकोश-शिर १ पहा)*

शिरा १ [ शै, श्रै, श्रा, श्री १ पाके ] *(शिज ५ पहा)* (२) [ श्रायः = शिरा] पक्वान्न, पाक. (३) [ श्रा = शिरा] कोणत्याहि पदार्थाचा पाक. (भा. इ. १८३३)

शिराणी [ श्रि प्राप्तौ. श्रयणी = शिरअणी = शिराणी ] प्राप्ति, आश्रय. (भा. इ. १८३३)

शिरावेध [ सिराव्यधः = शिरावेध ] (भा. इ. १८३७)

शिराळें [ शिरालं = शिराळें. शिरालं शिरासंपन्नं फलं] फलविशेष.

शिरें १ [ क्षीरं (juice) = सिरें, शिरें ] juice for ink. (२) [ श्रृतं = शिरें (शाई करण्याचे)] (३) [ श्रीञ् पाके. श्रीः = शिरा (गव्हाचा) श्री = शिरें (पकवलेला शाईचा रस) ]

शिलक [ शिल (कापणीनंतर शेतांत राहिलेले दाणे) + अकच् = शिलक, शिल्लक ] remaining portion, leavings.

शिल्लक [ शिल (कापणीनंतर शेतांत राहिलेलें धान्य) = शिल्लक ] *(शिलक पहा)*

शिवण [ श्रीपति = शिवण ] वनस्पति.

शिवण गंभारी [ श्रीपर्णी = शिवणी = शिवण (वनस्पति)] (भा.इ. १८३७)

शिवणें, उसवणें [ सो व उत्सो ह्या धातूंपासून शिवणें व उसवणें निघाले आहेत ] (ग्रंथमाला)

शिवर (रा-री-रें) [ शपिरः = शविरा = शिवरा] शिव्या देणारा, तोंडाळ. (भा. इ. १८३४)

शिवशिवणें [ सिमसिमाय = शिवशिव (णें)] (भा.इ. १८३३)

शिंवशिंवणें [ चिमिचिमायते = शिंवशिंवते] (भा. इ. १८३४)

शिवळ [ शीश् (शब्दः) ] *(शीट पहा)*

शिवी [ छिका = शिवी ]

शिसव, शिसू [ शिंशपा = शिसवा = शिसव = शिशवी ] (भा. इ. १८३४)

शिसवी [ शिंशपा = शिसवी = सिसवी (वृक्ष) ]

शिसार [ शीर्षार्शः = शिसार ] head-ache.

शिसू १ [शिंशपा ] *(शिसव पहा)* (२) [ सुशवी = शिसवी, शिसव, शिसू]

शिळक [ श्लिष् १ दाहे] *(शिळख पहा)*

शिळख [ श्लिष् १ दाहे. श्लिष् = शिळख, शिळक, शिणक ] भाजून वेदना होतात तशा वेदना. (धा.सा. श.)

शिळें [ सीतल = सीअळ = सीळ = शिळ (ळा-ळी-ळें) ] (भा. इ. १८३३)

शी (प्रत्यय) - सा-सें - [ भग्नदेशीय = भंगलीशी, भंगलासा, भंगलेंसें.

नग्नदेशीय = नागवासा, नागवीशी, नागवेंसें.

पुत्रकदेशीय = पोरगासा, पोरगीशी, पोरगेंसें.

वृद्धदेशीय = बुड्ढासा, बुढ्ढीशी, बुढ्ढेंसें]

शीट १ [ शीश् (शब्दः) = शीट, शीळ, शेळ, शिवळ ] शीश् असा शब्द म्हणजे शीळ. (२) [ शिंघ् १ आघ्राणे. शिक्थ]

पाखरांचा गू. *(धातुकोश-शिट १ पहा)*

शीण १ [ स्विन्न = सिण्ण = सीण = शीण] सीण असा उच्चार कित्येक करतात. (भा. इ. १८३२) (२) [ शीर्ण = शीण] (ज्ञा. अ. ९ पृ. ६७)

शीत [ सिक्थ = सिथ्थ = शित्त = शीत] (ग्रंथमाला) शीर १ [ शिरस = शीर (नपुं.) ] (२) [ शिरा = शीर ] (स.मं.)

शीर, सर [ शील = शीर = सीर = सर.
प्रमाणशीलं = प्रमाणशीर, प्रमाणसर.
रीतिशीलं = रीतशीर, रीतसर ]

शीळ [ शीश् (शब्दः) ] whistle *(शीट १ पहा)*

शुक् [ शुक् to move गतौ to gate away = शुक् ] get away, to a cat

शुक्क्, षुक्क् [ षुक्क् = शुक्क ] षुक्क् जाणें असा संस्कृत धातू आहे. मांजराला शुक्क् किंवा षुक्क् म्हणून महाराष्ट्रांत हांकलतात. ज्या वेळेस संस्कृत भाषा बोलण्यांत होती म्हणजे पाणिनीच्या वेळेस मांजराला जा, नीघ, असें सांगावयाचें म्हणजे षुक्कस्व असें रूप योजीत. त्यावरून मराठींत आज्ञार्थाचें द्वितीय एकवचन षुक्क असे परंपरेने आले आहे. ह्या मराठींत षुक्क रूपावरून पाणिनीय षुक्क, ष्वक्क, ष्वस्क्, स्वस्क् हे धातू रोजच्या बोलण्यांतले होते, केवळ पाणिनिकल्पित नव्हते, हें उघड होतें. इतकेंच नव्हे तर सिद्ध होतें. मराठी व्युत्पत्तीवरून पाणिनीय धातुपाठावर प्रकाश हा असा पडतो. (भा. इ. १८३५)

शुंभ [ शोभार्थे ] निव्वळ शोभेचा जो माणूस तो शुंभ. (ग्रंथमाला)

शेक [ सेक = शेक ] अग्निसेकः = आगीचा शेक = अग्नीयशेक (भा.इ. १८३४)

शेखी [ शैक्ष्यं skill, learning = शेखी] प्रौढी.

शेगटवणी [ शिग्रुकपानीयं = शेगटवणी ] शेगटाच्या शेंगाचा काढा.

शेगडी [ शकटी = शगडी = शेगडी ] अंगारशकटी = आगीची शेगडी (भा. इ. १८३६)

शेगवा [शिग्व्रा ] *(शेवगा पहा)*

शेज [ शय्या = शेज ] ओळी, अन्योन्यसंनिकर्ष. या पदानां परान्योन्यं मैत्री शय्येति कथ्यते । (प्रतापरुद्रीययं - काव्यप्रकरणम्)

पुस्तकें एका शेजेनें लावणें म्हणजे ओळीनें एकमेकांना चिकटून ठेवणें. (भा. इ. १८३४)

शेजार १ [ सज्जगृह = सज्जार = सेजार = शेजार ] शेजार म्हणजे जवळचें घर. (भा. इ. १८३६) (२) [ सज्जकार = सज्जार = सेजार = शेजार ] सज्जकार म्हणजे जवळीक, जवळ करणें. त्या पुस्तका शेजारीं हे पुस्तक ठेव = तस्य पुस्तकस्य सज्जकारे इदं स्थापय.

सज्ज चिकटणें, जवळ होणें. (भा. इ. १८३६) [ शय्यागृह = शेजार, सेजार ] (भा.इ. १८३६)

शेट [ सेधः = शेट ] सेध म्हणजे शेपूट. शेट उपट म्हणजे शेंपूट उपट. माणसाला शेंपूट नाहीं, सबब उपस्थीय केस.

शेटमारी [ शिट् अनादरे. शेट = अनादर, मारि=मृत्युप्राय रोग] या दोन्ही शब्दांनीं अनादर व तिरस्कार दाखविला जातो. हे दोन्ही उच्चार अपशब्द नाहींत. Damn, plague, take thee ह्या

वाक्यांतील Damn व plague ह्या शब्दांप्रमाणेंच वरील शब्द आहेत.

शेंडी १ [शिखंडि = शिअंडि = शेंडी ] (स.मं.) (२) [ शिखंडि = सिकंडि = सिअंडि = सेंडी = शेंडी ] शिखंडि = अल्पशिखा. (ग्रंथमाला)

शेण १ [ छगण = शगण = शअण = शाण = श्याण = शेण ] (ग्रंथमाला) (२) [ शकन् (गाईचें शेण) = शअण = शाण = शेण ] शाण हा उच्चार अद्याप अशिष्ट करतात. (भा. इ. १८३३)

शेणकूट *[ शेणगंड पहा]*

शेणगंड [ गंड = वीर, शूर पुरुष, श्रेष्ठ पुरुष.

शेणगंड [ शेणवयांतील उत्तम पुरुष (विपरीत लक्षणेनें, अधम शेणवई)

न्हावगंड = स्नापिकगंडः (उत्तम न्हावी, विपरीत लक्षणा)

ब्राह्मणगंड = उत्तम ब्राह्मण (विपरीत लक्षणेंनें वाईट अधम ब्राह्मण)

शेणकूट = (कूट = मुख्य) विपरीत लक्षणेंनें अधम, नीच शेणवई ] (भा.इ. १८३२)

शेणवड १ [ श्यैनंपाता (शिकार) = शेणवड. शकन् + पाता = शेणवड ] होळीच्या सणांत शिकार करीत. श्येनपासून हि शेण शब्द निघतो, व शकन् पासून हि शेण शब्द निघतो. (२) [ शकन् + आवृत्ति = शेणावड = शेणवड ] (३) [ शकपाता] *(धूळवड पहा)*

शेतखाना [ शकनूखनिः = शेणखाना, शकृतखनिः = शेतखाना ] शकृत्खनिः = म्हणजे गुवाचा खड्डा.

शेतगणा [ क्षेत्रगणः = शेतगणा ] गांवच्या सर्व शेतांचा समूह.

शेतभात [ क्षेत्रभक्तिः = शेतभात ] भक्ति म्हणजे तुकडा, भाग. भात म्हणजे तांदूळ या शब्दाचा येथें काहीं एक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

शेती [ क्षेत्रपत्यं = शेती ]

शेंदणे [ स्यन्दनं = शेंदणे, सेंदणे ] (भा. इ. १८३६)

शेपाटी [ शिफा a fibrous root = शिपटी, छिपटी, शेपाटी ] a twig of tree.

शेंब १ [ श्लेष्मन् Phlegm = शेंब, शेम] शेंब हगतो passes phlegmy matter through anus. [ श्लेष्मन् = शेंब] आंव झाली असतां गुदद्वारा जो आम पडतो त्याला शेंब म्हणतात.

शेंबडा [ श्लेष्मल ] *(शेमडा पहा)*

शेंबूड १ [ श्लेष्मधातु Phlegm = शेबूड] Phlegm. (२) [ श्लेष्मोदक = शेम्मोड = शेमोड = शेंवोड = शेंबोड = शेंबूड] (भा. इ. १८३३)

शेम [ श्लेष्मन् ] *(शेंब १ पहा)*

शेमडा [ श्लेष्मल = शेमडा, शेंबडा ]

शेमणें १ [ शेप = शेप (Phlegmetic) शेपन् = शेमणें] (२) [ शेप] (३) [ (सं.) शेव = (प्रा.) शेम = (म.) शेमणें (पुल्लिंग) ] (भा. इ. १८३२)

शेर १ [ श्रेयः = शेर (अधिक श्रीमान्) ] तेवढ्यानें तो शेर झाला = तेन स श्रेयानभवत्. (२) [ सेरः = शेर ] सेर शब्दाची व्याख्या भास्कराचार्यांनीं लीलावतींत केली आहे. बहुशः हा शब्द भास्कराचार्यकालीन मराठी आहे.

शेरणी [ श्रेणी = शेरणी ] श्रेणी म्हणजे एका च धंद्याच्या माणसांचा समाज. त्यांना वांटून देण्याचा पदार्थ तो शेरणी. (भा.इ. १८३३)

**शेरास सवा शेर** [ जयति श्रेयसः सपादश्रेयस्तरः = शेरास सवा शेर. श्रीमानाला अधिक श्रीमान जिंकतो. ]

**शेरी** [ सैरेयी turned up by the सीर plough, under plough = शेरी ] land under plough, cultivated land. शेरी जमीन, शेरी.

**शेलक** (का-की-कें) [ शिल् वेंचणें. क प्रत्यय लावून शेलक (का-की-कें)] (भा. इ. १८३३)

**शेलकें-का-की** [ शिल् उंछे (वेंचणें) = शेलकें ] choice, picked.

**शेलटी** [ सल्लकी = शेलटी ] वृक्ष.

**शेला** [ चेलः = सेला = शेला. चिल् ६ वसने] *(धातुकोश - शेल १ पहा)*

**शेव १** [सेवि (बोर) = शेव ] शेव म्हणजे फळफळांवळ. (२) [ सेवं (शेवफळ) = शेव ]

**शेवगा १** [ शिग्रा = शेगवा, शेवगा (गर्दे-वाग्भट)] (भा.इ. १८३४) (२) [ शिग्रुकः = शेउगा = शेवगा]

**शेवट** [ छंबट् ! (नाशदर्शक अव्यय) = शेंवट ] शेंवट! तो मेला = छंबट् स मृतः महाभारत ३-१८-२६ त हा शब्द येतो.

**शेंवट** [ सीमन् = शिवँ = शींव = शींवट (अतिशयदर्शक) = शेवट ] (ग्रंथमाला)

**शेवती** [ शतपत्री = शेवती ]

**शेवा** [ शेव् सेवने = शेवा, सेवा ] म्हणजे सेवा शब्दाप्रमाणें शेवा शब्द हि शुद्ध संस्कृत आहे. (भा. इ. १८३३)

**शेळ** [ शीश् (शब्दः) ] *(शीट पहा)*

**शेळपट** [चिल्लपटः = शेळपट ] चिल्ल म्हणजे सैल व पट्ट म्हणजे वस्त्र आहे ज्याचें तो. शेळपट म्हणजे अजागळ, चापूनचोपून धोतर, वस्त्रें न नेसणारा.

**शेळी** [ छेलिका = शेळी. छगली = शअळी = शेळी] छेलिका हा शेळी ह्या मराठी प्राकृत शब्दावरून बनविलेला संस्कृत शब्द आहे; मूळ शब्द छागः (भा.इ. १८३५)

**शोकी** [ सौखिकः = शोकी] सुखाभिलाषी.

**शोफा** [ शतपुष्पा = शअउप्फा = शोफा ]

**शौनिक** [ शाकुनिकः = शौनिकः ] शौनिक हा संस्कृत शब्द शाकुनिक या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. शकुनान् हंति शाकुनिकः (४-४-३५)

**श्यानी** [ करूनश्यानी, जेवूनश्यानी, घेऊनश्यानी इ. धातुसाधित अव्ययांतले. हा श्यानी प्रत्यय वैदिक भाषेंत तुरळक आहे. हा पाणिनीयं संस्कृत भाषेंत नाहीं व कोणत्याहीं प्राकृत भाषांत नाहीं. वैदिक भाषेंत सन् ला इ प्रत्यय लागून सनि ~~असें सनन्त रूप धातूंना जोडून कांहीं~~ थोडीं धातुसाधित अव्ययें बनतात. जसे- गृणीषणि, तरीषणि, नेषणि इ. ह्या सनि-षणि प्रत्ययापासून मराठी श्यानि प्रत्यय आला आहे. (राधामाधव विलासचंपू पृ. १८५)

**श्रद्धा १** [ श्रद्धा (शौच) = श्रद्धा ] शौच, परसाकडेस. (२) [ शृधा (पादणें) = शर्धा, श्रध्धा ] पादणें. भिक्षुक लोक सोंवळ्यांत असतांना हा शब्द योजतात. श्रध्धेला गेला म्हणजे अपानद्वारा वायू सोडण्या करितां गेला. (भा. इ. १८३७)

**श्रद्धासु** [ श्रत् + धा-धास (सिच्) श्रद्धासुः = श्रद्धासु] faithful.

**श्रध्धा** [ शर्धा = श्रध्धा ] श्रध्धेला जातो म्हणजे वायू सरण्याला जातो.

**श्रु-श्रवति** = सराव. अश्रुणोत् = सुनणें, सुनावणें. (भा.इ. १८३४)

## षु

षुक्क् [ षुक्क् ] *(शुक्क पहा)*

## स

स [ अच्छ ] गृहं अच्छगम्य = घरा सजाऊन.

स १ [ गृहम् + अच्छ (towards (Vaidik)) = घरा + स = घरास
गृहस्य + आरे, आरात् = घरा + ला = घराला
गृहस्य + अन्ति = घरा + ते = घरातें ] (२) [ घरास = गृहं आच. स हा प्रत्यय आच ह्या पूर्ववैदिक विरळ अव्ययापासून निघालेला समजणें युक्त] *(आसपास पहा)*

स (सा-सी-सें) [ पुत्रदेश्य almost a boy = पोरगेलासा. मनुष्यदेश्य = मनुष्यसा. पशुदेश्य = पशूसा.
देश्य = स (सा-सी-सें)]

सई १ [ सति (सो to cut) end, destruction = सई, सै, सही ] end, destruction, finish. वसई सई केली Vasai was captured. स्मृति = सई, सय memory. सई मारणें म्हणजे अखेरी मारणें. (२) [ सत्यम् ! = सई !] गेलो त सई = गतः अहं तावत् सत्यम् I did go after all, indeed. (३) [ सखि ! = सहि ! = सई !] सया, सये, इत्यादि वैभक्तिक व लैंगिक रूपें. (४) [ गांवढे लोक सई शब्द प्रत्येक क्षणीं ह्या अर्थी मराठींत सध्या योजतात. हा सपदि ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. सपदि = सअइ = सइ = सई.] (सरस्वतीमंदिर) (५) [ सखि = सहि = सइ = सई ] कसा जातो पाहूं तो सई = कथं गच्छति पश्यामस्तावत् सखे. सई या शब्दाचें संबोधन सये. सई हा शब्द पुल्लिंगी हि आहे व स्त्रीलिंगी हि आहे. सया, सय्या हे हि शब्द सखि शब्दापासून निघाले आहेत व ते लावण्यांत अर्थातच फार येतात. (भा. इ. १८३४)

सउरा [ शकुलः = सउरा, सौरा] (भा. इ. १८३६)

सकट [ सकृत् ] बरोबर, together *(सगट पहा)*

सकत [ संशक्त = सकत ] Powerfull (अशिष्ट)

सकलाद - हा शब्द फारशींत सगलाद असा आहे. इंग्रजींत scarlet असा आहे. इटालियन भाषेंत scarlatto; तुर्की iskerlet; फ्रेंच scarlate असा आहे. मूळ कोणत्या भाषेंत हा उत्पन्न झाला तें सांगता येत नाहीं. म्हणजे एका प्रकारचें Broad-Cloth. Scarlet या रंगाशी या शब्दाचा कांहीं संबंध नाहीं. चिनी भाषेंत Sakala म्हणजे एका प्रकारची silk-brocade. मराठेशाहींत सकलादी अफगानिस्थान, इराण व यूरोप या देशांतुन महाराष्ट्रांत येत. येथें होत नसत. त्या अर्थी हा शब्द परदेशी आहे असे दिसतें. बहुशः फारशी सगलाद शब्दावरून आला आहे. इंग्रजी scarlet हा हि शब्द फारशी सगलादवरून च घेतला असावा. एक मध्यें घुसडून दिला आहे. हा इंग्रजी बोलण्याचा स्वभाव हि आहे. (भा. इ. १८३२)

सकारणें [ सत्कृ = सकार (णें) ] (भा. इ. १८३२)

सकाळ १ [ सत्काल = सक्काळ = सकाळ] उत्तम शुभ काल तो सकाळ. संध्याकाळ हा शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगी आहे. त्याच्या च धर्तीवर सकाळ हा शब्द हि पुल्लिंगी व स्त्रीलिंगी होता. संध्याकाळ ह्या सामासिक शब्दांत संध्या हा शब्द स्त्रीलिंगी तरी आहे परंतु सत्काल ह्या शब्दांतील सत् स्त्रीलिंगी नाहीं. तेव्हां केवळ संध्याकाळ ह्या शब्दाच्या अनुकरणानें सकाळ हा शब्द स्त्रीलिंगी मानला गेला आहे. मला सकाळ झाली. सकाळ झाला. संध्याकाळ झाली. संध्याकाळ झाला. दुपार झाला. दुपार झाली. (भा. इ. १८३३) (२) [ सकालम् early in the morning = सकाळ, सकाळीं ] early in the morning.

सक्त [ असक्तं (त्वरितं) = सक्त (अलोप) (क्रियाविशेषण, अव्यय ) ] त्यानें सक्त मेहेनत केली = सः असक्तं उद्यतः .

सगट [ सकृत् (together) = सकट = सगट ] बरोबर together छत्रीसगट = छत्रीसुद्धां. सरसगट = सर्वसकृत्. (भा. इ. १८३३)

संगवई [ संवयस् = संगवई ] compassion.

सगा [ सखा = सगा. सखासोदरक = सगासोयरा ] (स. मं.)

सगा सोयरा [ सखा सोदरक ] *(सगा पहा)*

संगीन १ [ संगः (संगिनी) a kind of weapon = संगीन] (२) [ संगृह्णाति = संगिण्हइ = संगीन ] संगीन तयारी = comprehensive preparation.

संघष्टण [ संघर्षण पासून संघष्टण आला नाहीं. संघृष्ट पासून संघष्ट आणि संघष्ट पासून संघष्टण. घृष्ट असा धातू धरला. संघर्षणपासून सांघरण असें रूप व्हावें. तें वर्तमान मराठींत नाहीं. संघष्टण आहे. (भा. इ. १८३६)

संच [ षच् समवाये = संच, सांचवणें ] (ग्रंथमाला)

सचकार [ सत्यंकार = सच्चँकार = सचकार] (भा. इ. १८३२)

संचळ [ सौवर्चल = सौच्चळ = संचळ. ] (भा. इ. १८३४)

सचोटी [ सत्यवृत्तिः= सचोटी ]

सच्च ( च्चा- च्ची -च्चें) [ सत्य = सच्च (खरे). शस्य = सच्च (प्रशंसनीय)]

सच्चा १ [ शस्यं = साचें, सच्चें, सच्चा ] (२) [ सस्यकः किंवा शस्यकः = सच्चा (अप्रतिम साधू)] शस्यक शब्दांतील श चा स पाणिनीय कालीन प्राकृतप्राबल्य दाखवितो.

सजण [ सज्जन = सजण] (स. मं.)

सजणा ! [ संज्ञा to be of the same mind, to understand one another = संजानानः = सजण ] one who is of the same mind with the speaker. सजणा हें संबोधन लावण्यांत फार येतें. सुजन शब्द निराळा.

संजाब [ फारसी] (स. मं.)

संजोग [ संयुगः union, fit = संजोग ] union fit.

सज्जा [ सद्या (सद् to sit ) = सज्जा ] माडीवरील बसावयाची पुढची जागा.

सज्जीखार [ स्वर्जिकाक्षार = सज्जिआखार = सज्जीखार ] (भा.इ. १८३४)

सटकन् [ सट्ट् १० हिंसायाम् ] *(धातुकोश-सडक २ पहा)*

*सटकन् सटदिनि [ चटकर पहा]*

सटाणा १ [ षष्टिहायन = सटाणा ] षष्टिहायन म्हणजे मोठा हत्ती, त्यावरून

सटाणा. म्हणजे मोठा, अगडबंब. (२) [ स्तनकः सटाणा. स्तन् to thunder ]

**सटी** [ श्वठिः, श्वठ् १ असंस्कारे ] (धातुकोश-सठ पहा)

**सडक** १ [ सरक going = सडक adverb सडक चालला went on continuously (२) [ सरकः a continuous road = सडक] (३) [ सध्र्यंच् = सडक ] तो सडक निघून गेला म्ह. नीट सरळ निघून गेला. सडक रस्ता = नीट सरळ रस्ता. शेवटीं नीट रस्त्याला सडक म्हणूं लागले. (धा.सा.श.)

**सडा** [ ( शडि संघाते) शडः = सडा] (२) [स्यदः = सडा ] shower, voilent shower.

**संडास** [ संदेशः (जरद्रर्ता) = संडास] old pit for night-soil. अथर्ववेद-द्वितीयकांड ४३

**सढळ** १ [ शिथिर extended (दानार्थं प्रसारित) = सढळ ] देण्याला सढळ हात असणारा. (२) [ श्रद्धावत् = सड्ढाल = सढाळ = सढळ ] सढाळ असा उच्चार गांवढे लोक करतात. (भा. इ. १८३२)

**सण** १ [ क्षणः = सण ] (२) [ शणु (अथर्ववेद) = सण ] hemp.

**सणई** [ सानिका] *(सनई पहा)*

**सणंग** १ [ सनंगु, (a kind of leather) = सणंग. (सनंगुः चसः, हविस, संक्तुः) उगवादिभ्यो यत् (५-१-४ पाणिनि) उकारान्त शब्दांत हा शब्द पाणिनीयांत आहे ] सणंग म्हणजे मराठींत तलम उत्तम कमावलेल्या कातड्यासारखें कापड. (२) [ सनंगु a kind of leather garment = सणंग (५-१-२ पाणिनि) ] सणंग म्हणजे मराठीत कापडविक्ये कापडाच्या, धोत्राच्या किंवा लुगड्याच्या तुकड्याला म्हणतात. अत्यन्त पुरातन कालीं आर्य कातड्याचीं वस्त्रें पांघरीत, नेसत, असें दिसतें.

**सणणणण** [ सनश्वन् ] *(सणसणित पहा)*

**सणवई** [ क्षणवृत्तिः = सणवई. सणवई म्हणजे सणाच्या दिवसाचें वाढणें.

**सणसणित** १ [ सनश्वन् = सणसणित, सणणणण, सणाणणें, खणखणित ] (२) [ सनीषण (सन् to gain) सणसणणें, सणसणून बोलणें ] (३) [स्वनस्वनितं = सणसणित. स्वन् १ शब्दे ] मोठ्या आवाजाचें. *(धातुकोश-सणसण २ पहा)*

**सणाणणे** [ सनश्वन् ] *(सणसणित १ पहा)*

**सणा वारीं** [ क्षणस्य वारे = सणा वारी ] सणा ही षष्ठी आहे.

**सणा सुदी चा** [ क्षणस्य सुदिनस्य त्यत् = सणा सुदी च (चा-ची-चें)

**सतका** [ सत्कारः = सत्का, सतका] a present to kings by subjects.

**सतत** [ तन् ८ वृद्धौ. सततं, संततं = सतत] (धा.सा.श.)

**सतरा** [ सप्तापरदशन् ] *(अकरा २ पहा)*

**संतापणें** [ संतप्यति = संतापणें ] (भा. इ. १८३३)

**संतापवणें** [ संतापयति = संतापवणे ] (भा. इ. १८३३)

**सतावणें** [ सत्रायते (सत्रं पापं चिकीर्षती) = सतावतो ] (भा.इ. १८३३)

**सत्तर** १ [ सप्तति] *(अकरा १ पहा)* (२) [ सप्तदृशति ] *(विंशति पहा)*

**सत्रंज** [ शत्रुंजयः (३-२-४६) = सत्रंज ]

सत्रंज हा शब्द फारशींत बुद्धिबळाच्या डावाला लावतात.

सत्रा [ सत्रा always (वैदिक) = सत्रा (मराठी अप्रकृत many besides the right one) ] तुभ्यं ब्रह्माणि सत्रा दधिरे to thee songs have been offered always. सत्रा बोलणीं नकोत. सत्रा गोष्टी सांगतो, ह्या वाक्यांत सत्रा म्हणजे सोळा अधिक एक असा अर्थ नाहीं. सदा, पुष्कळ, अवांतर असा अर्थ आहे.

सत्त्वाथिला [ सत्वान्वित + ल = सत्वाथिला. नामान्वित + [ ल नामाथिला]

संथ १ [ शंत (सुखी) = संथ ] संथ निजला आहे म्हणजे सुखी निजला आहे. (२) [ संस्त् (निजणें) = संथ ] संथ पडला आहे म्हणजे निजून पडला आहे.

संथा १ [ संस्तावः = संथाआ = संथा. पाणिनी ३-३-३१ यज्ञे समि स्तुवः समेत्य स्तुवंति यस्मिन्देशे छंदोगाः स देशः ] (२) [ श्रंथा = संथा (श्रंथ १० to arrange संदर्भे ] (३) [ संहिता = संथा ] वेदपाठाची संथा.

सदाफुली [ सदंपुष्पा = सदाफुली ] (सायण अथर्व = ४ कांड - ४ अनुवाक - सू. २० ऋ.).

संदूक [ सं + धुक्ष् to kindle : संधुक्षा = संदूक ] a kindling tapering cloth.

सनई १ [ स्वनिका = सानिका = सनई. स्वन् १ शब्दे ] सानिका, सानेयिका हे स्वनिकाचे अपभ्रंश आहेत. (२) [ सानिका (वाद्यविशेष) = सनई, सणई ]

सनला [ सं + ली to cling. संलयः = सनला, संल्ला ] well powdered lime which adheres completely.

सनाटा १ (वैदिक) श्नथ् = to do violence सनाटा ] violent, enormous. (२) [ सनाथः = सनाटा. नाथ् संपत्तिमान् होणें] सनाटा म्हणजे संपन्न, बळकट. (३) [ सनाथः (powerful) = सनाटा. संनाथः = सन्नाटा]

सनोळख १ [ स ओळख व न ओळख = सनोळख = ओळखीचें किंवा नोळखीचें] उ. तीर्थ अतीर्थ हे भाष । उदकी नाहीं सनोळख । माडगांवकर ज्ञानदेवी १८-५५९.

पाणी प्यावयाचें असल्यास तीर्थ, अतीर्थ ही ओळख किंवा नोळख विचारांत घ्यावयाची नसते. (२) [ सना ancient + ओळख as if acquianted with anything from very old. ]

उ.- जे जग चि सनोळख । जगेंसी जुनाट सोयरिक । आप पर हे भाक। जाणणे नाहीं।। माडगांवकर ज्ञानदेवी १३-३५८

सन्नाटा [ संनाथः] *(सनाटा ३ पहा)*

संप [ षप् समवाये ] (ग्रंथमाला)

सपक [ पच् १ पाके. संपक्व = सपक ] सं चा स मराठींत हमेश होतो. सपक म्हणजे अति शिजविल्यानें बेचव झालेला. (धा.सा.श.)

संपणें [ समापन = संपन = संपणँ = संपणें ] (ग्रंथमाला)

सपाट १ [ समप्रस्थ (horizontal) = सपाट] (२) [ सपाट (समभूभाग) = सपाट ] (३) [ सत्पथः = सपाट (रस्ता) (रत्थ्या) ]

सपाटा [ पत् १० गतौ. संपातः rush = सपाटा, झपाटा ] rush at सं चा मराठींत स होतो. प्रावृट्संपातः = पाउसाचा सपाटा. रोगसंपातः = रोगाचा सपाटा. (धा.सा.श.)

सपाटून १ [ सम् + पाट् १० अवयवे ]

(धातुकोश-सपाट २ पहा) (२) [ सम् + पत्र (नामधातु) ] (धातुकोश - सपाट १ पहा) (३) [ पत्र ११. सपत्रं = सपाट (अतिव्यथने) सपाटून खातो म्हणजे अति खातो. (अष्टाध्यायी-५-४-६१) (धा.सा.श.)

**सपासप्** [ सर्पंसर्पं ] *(सप्सप् २ पहा)*

**सपासप** [ क्षिप्रंक्षिप्रं ] *(सप्सप् १ पहा)*

**सपीट** [ संपिष्टं = सपीट ] उत्तम बारीक दळलेलें.

**सपील** [ संपीलु ( संपूर्ण दूध पिणारें वासरूं इ. = सपील)] ज्ञानेश्वरी.

**सप्पा** [ संप्सा = सप्पा (eating up) प्सा खाणें ] तत् संप्साय शुद्धो भवति ते खाऊन टाकून शुद्ध होतो. (बृहदारण्यक, पंचमोध्यायः चतुर्दश ब्राह्मण).

**सप्सप्** १ [ क्षिप्रंक्षिप्रं = सिप्सिप् = सप्सप् (जलद) = झप्झप्, सपासप, झपाझप. ] (२) [ सर्पंसर्पं = सप्सप्, झप्झप्, सपासप्, झपाझप्. सृप् सरपटणें]

**सफेत** [ श्वेत = सवेत = सपेत = सफेत] सफेत हा फारशी शब्द संस्कृतांतून फारशी भाषांत गेलेला आहे. (भा. इ. १८३४)

**सबर** [ सत्वहर = सव्वअर = सब्बार = सबार = सबर ] सबार उच्चार गांवढे करितात. (भा. इ. १८३२)

**संबळ** १ [ शंबल] *(सांबळ पहा)*
(२) [ शंबुल = संबळ, सांबळ ] शंबुल म्हणजे प्रवाश्याच्या सामानाची धोकटी.

**सभोंवता** [ सभ्रमतः ] *(भोंवता पहा)*

**समई** [ संदीपिका = समइइआ = समईआ = समई, समय ] दिवा. (भा. इ. १८३३)

**समज** [ सम् + बुध् ४ अवगमने. सम् + बुध् = संबुध = समुज = समज ] *(धातुकोश - समज ५ पहा)*

**समंजस** [ समनुज्ञीप्सु agreeable, approved, intelligent = समंजस agreeable intelligent ]

**समजाव** [ सम् + आ + ज्ञापय]

**समदा-दी-दें** [ समस्त = समदा-दी-दे ] entire.

**समदे** १ [ समुदित = समुदिअ = समुद = समद (दा-दी-दें) ] समदें म्हणजे एकत्र केलेलें, गोळा केलेलें. सम् + उत् + इ = समुदि. (भा. इ. १८३३) (२) [ समस्त = समत्त = समतें = समदें] सर्व. [ समस्त = मस्त ] सर्व, पुष्कळ. (भा. इ. १८३२) (३) [ समुदितम् total, aggregate. = समुदें, समदें ] total, whole, all.

**समधात** [ समधातु = समधात ] त्याची प्रकृति समधात आहे = तस्य प्रकृतिः समधातुः (भा. इ. १८३४)

**समुदें** [ समुदितम् ] *(समदे ३ पहा)*

**समेट** १ [ स्मिट् १० अनादरे. स्मेट = समेट ] (धा.सा.श.) (२) [ इ २ गतौ. समेत = समेट ] समेत म्हणजे एकमत. (धा.सा.श.)

**समैक** [ सम्यक् = समैक ] excellent उ.- तरि तप जे कां समैक । ते हि त्रिविध आइक ।शारीर मानसीक । शब्दीक गा।। =ज्ञा. १७-१९९

**समोर** [ मुखर = मोहर = मोऱ्ह = मोर. संमुखर = संमोहर = समोऱ्ह = समोर] (ग्रंथमाला)

**सयसुमार** [ स्मृतिस्मारः = सयसुमार ] दोन्ही शब्दांचा अर्थ स्मृति असा आहे.

**सर** [ सरः = सर (माळ)]

**सर** १ [ शील ] *( शीर पहा)*

(२) [ इशतर = सअर = सर] (काल) कालिशतर = काळसर (पीत) पीतलिशतर = पिवळसर.

सरकणें [ स्नेकनं = सरेकणं = सरकणें. स्नेक् गतिकर्मा ] (भा. इ. १८३५)

सरकार [ सर्वकारकः = सरकार. कृ. ८ करणें ]

अष्टाध्यायी ( उत्तरपदवृद्धौ सर्वंच ६-२-१०५ )

सरज्या [ सर्वजित् ] *(सर्जा पहा)*

सरड [ शरट = सरड (डा-डी-डें) ] (भा. इ. १८३२)

सरडा १ [ शरंडः = सरडा] (२) [ सृदाकुः = सरडा ] पालीच्या जातीचा प्राणी.

सरता १ [ स्मर्यमाणः = सरता ] सरता संतांत = सत्सु स्मर्यमाणः (२) [ स्मर्यमाणः = सरता ]

हा शब्द संतनामावळींत येतो. केला सरता संतांत म्हणजे संतांत स्मरण करण्याजोगा केला. सरता कर्मणि कृदन्त आहे.

सरदी [ शर्धिः = सरदी. शृध् आर्द्रीभावे ]

सरपण [ श्रपणं = सरपण (पंचतंत्र अंधकुब्जकथा )]

सरभरित [ सम् + परि + भृ ] *(धातुकोश-सरभर पहा)*

सरमिसळ [ मिश्र् १० संपर्के. सर्वमिश्रं = सरमिसळ ] (धा.सा.श.)

सरस [ सर्वरसः = सरस. सर्जरसः = सरस. धूपः सर्वरसः सर्जरसः।]

राळेसारख्या कातडीं वगैरेंपासून केलेल्या चिकास हि सादृश्यानें सरस म्हणतात.

सरसकट् [ सर्वसकृत् ] (सरसगट् पहा)

सरसगट् [ सर्वसकृत्= सारॅसकट् = सरसकट् = सरसकट्. सरसगट् ] सरसगट् म्हणजे सर्व एकाच वेळीं.

सरसगट [ सर्वसकृत् = सरसगट]

सरसर, सरसरां [ सरसरं = सरसर, सरसरा, सरासरा, सरसरां, सरांसरां ]

सरसा [ सरसः = सरसा ] सरसा म्हणजे ताजा. दिवा सरसा करणें म्हणजे काजळी झाडून ताजा करणें.

सराई १ [ श्रयीः सरई = सराई. श्री १ सेवायाम् ] धर्मशाला, उतरण्याची जागा. (२) [ श्राया = सराय, सराई ] श्रायः shelter पाणिनि ३-३-२४.

सराटा १ [ श्रृंगाटः = सराटा ] (२) [ श्वदंष्ट्रा = सराटा ]

सराय [ श्राया] *(सराई २ पहा)*

सराव १ [ स्रावः flowing forth = सराव ] (२) [ स्नु १ गतौ ] *(धातुकोश-सराव २ पहा)*

सरांसरां [ सरसरम् ] *(सरसर पहा)*

सरासरी [ सर्व + असर्व = सर्वासर्व, सर्वासर्वस्यभावः = सार्वासार्वं.सार्वासार्विका = सरासरी ]

सर्जा [ सर्वजित् = सरजिअ = सरज्या, सर्जा ] सरज्या हा शब्द पोवाड्यांत शिवाजीला लावलेला असतो.

सर्जू [ सर्ज् प्रापणे ] व्यापारी. *(धातुकोश-साट ३ पहा)*

सर्दी [ छर्दिः (आजार) = सर्दी ] फारसी सर्दीपासून हि हा शब्द व्युत्पादितात. (भा.इ. १८३३)

सर्पण १ [ चृप् १० संदीपने to kindle चर्पणं = सर्पण ] that which, kindles. (२) छृप् १० संदीपने. छर्पणं = सर्पण] जळण. (३) [ श्रपण (शिजवणे) = सरपण. श्रा २ पाके ] शिजविण्याला लागणारें लाकुडफाटें म्हणजे सरपण. सरपणाला म्हणजे शिजविण्याला लाकुडफाटे पाहिजे. असा

प्रयोग होतो. त्यावरून लांकुडफाट्याला च सरपण म्हणूं लागले. (भा. इ. १८३३)

सर्वजाण [ सर्वज्ञ] *(सुजाण पहा)*

सरसर [ सरंसरं = सर्‌सर्‌, झर्‌झर्‌. सृ सरणें ]

सल [ शल्य (शरिरांत घुसलेली बाह्य वस्तु) = सळ, सल (पोटांत). ल्य ळ किंवा ल] (भा. इ. १८३४)

सलग [ संलग्न = सलग ] (भा. इ. १८३५)

सलगी १ [ संलग्नता = सलगी] (२) [ संलगना किंवा त्याहून उत्तम सहलगना. संलगना = सलगी ] संचा अनुस्वार मराठीत उडून जातो, हें लक्षात ठेवण्यासारखे आहे. तं सं ताडयति- त्यांस मारतो. षष्ठी किंवा तृतीया. सलगी = संलग्ना किंवा सहलग्ना. (ज्ञा. अ. ९ पृ. ३)

सल्ला [ सम् + ली ] *(सन्ला पहा)*

सवंग १ [ समर्घ = सवंग] (२) [ सम्यक् = सवंग. सम्यग् स्नेही = सवंग स्नेही. सम्यग् सूद्यमः = सवंग सौदा ] सवंग म्हणजे चांगला (लक्षणेनें वाईट) (३) [ संस्कृत स्वयंग्राहम् ह्या शब्दाचे प्राकृत सअंगाहम् असें रूप होतें. ह्या सअंगाहं शब्दाचा मराठी संक्षेप सअंग. सवंग आहे. सवंग सौदा म्हणजे असा सौदा कीं, स्वतःच्या हातांचा उपयोग करून वाटेल तितका न्यावा; दमडीहिं खर्चावयाला नको. (सरस्वतीमंदिर, श्रावण शके १८२६)

सवंगडी १ [ सांगतिकः = सवंगडी ] (२) [ सवयोगडकः ] *(सवंचोर पहा)*

सवघड [ स्ववघटं = सवघड ] मूळ अर्थ बरेच अवघड, नंतर अवघडच्या उलट.

सवंचोर [ सवयश्चोराः = सवंचोर thieves of the same age. सवयोगडकः = सवंगडी ]

सवड १ [ शमथुः = सवड ] शमथुः म्हणजे शांति. मला सवड नाहीं म्हणजे कामाच्या गर्दीमुळें शांति नाहीं. (२) [ संपत्तिः] *(संवड पहा)* (३) [ समर्द्धि] *(सवंडी पहा)* (४) [ समृद्धि ] *(सवडी पहा)*

संवड १ [ संपत्तिः = संवडी = संवड, सवड] कालस्य संपत्तिः = काळाची संवड. (२) [ समृद्धि = सवड ] तुला सवड झाली म्हणजे पैसे दे = यदा ते समृद्धिः स्यात् तदा द्रव्यं प्रतिदेही.

सवंड [ समर्द्धि] *(सवंडी पहा)*

सवडि [ सपदि ( in a moment, instantly) = सवडि ] लवडसवडि - जुनीं काव्यें.

सवडी [ समृद्धि = सवडी, सवड ] मला सवड झाली म्हणजे = यदि मे समृद्धिः स्यात्.

सवंडी [ समृर्द्धि = सवडी = सवड, सवंड] competence सवडीनें कर्ज फेडूं म्हणजे समृद्धी आली असतां कर्ज फेडूं.

सवत [ सपत्नी = सवत्ती = सवत ] (स.मं.)

सवता [ स्वायत्त = सवता (स्वतःच्या अधीन)] सवता सुभा म्हणजे स्वायत्त सुभा. स्वतंत्र पासून सतंत अपभ्रंश होतो.

सवतें-ता-ती [ स्वतंत्र = सवँत्त = सवत (ता-ती-तें) ] सचंतर असा हि अपभ्रंश सध्यां मराठीत होतो. सतंतर असें हि रूप आढळतें व तें सचंतर हून प्राचीन आहे. (भा. इ. १८३३)

सवंदणी [ शुन्धनी ] *(सौंदणी पहा)*

सवन [ स्वननं = सवन ] सवन म्हणजे गातांना स्वरावर जें स्वामित्व ठेवतात

तें स्वरस्वामित्व.

सवंय [ (पु) समय (चाल, कायदा, संगति) = सवंय (स्त्री) ] (भा.इ. १८३३)

सवरतो [ स्वरयति = सवरतो ] स्वर म्हणजे दोष काढणें. बोलतो सवरतो म्हणजे बोलतो आणि दोष काढतो. (भा.इ. १८३५)

सवशान [ शवशयनं = सवशान (स्मशान)] हा शब्द गांवढे योजतात.

(झाडणें) सँवाँरणें [ संमार्जनं = सँवाँरअणँ = संवारणें = संवारणें ] (भा. इ. १८३४)

सवाशीण, सवाष्ण १ [ संवासिनी (a woman cohabiting with her husband ) = सवाशीण, सवाष्ण ] (२) [ सुवासिनी = सवाष्ण ] (स.मं.)

सवें [ समता = सवआ = सवा; सवें सप्तमी एकवचन स्त्रीलिंग ] (ज्ञा. अ. ९)

संशयबिंशय [ संशयबिंशयः = संशयबिंशय] doubts and objections. सं च्या सादृश्यानें वि वर अनुस्वार.

संसार [ संसारमार्गः योनिद्वारे (त्रिकांड शेषः)] संसार म्हणजे योनि, असा अर्थ संस्कृतांत आहे, तो च महाराष्ट्रांत मराठीत परंपरेने रूढ आहे. (भा. इ. १८३६)

ससेमिरा - सिंहासनद्वात्रिंशतिकेच्या द्वितीयकथेंत हीं चार अक्षरें आली आहेत. हीं चार अक्षरें चार श्लोकांची प्रथमाक्षरें आहेत. कृतदोषाबद्दल जी चिंता लागते तीस मराठींत ससेमिरा म्हणतात.

सस्त [ सस् to sleep ससस्ति अश्वकः (तै. संहिता) = सस्त निजलाहे ]

सहज [ सहस् = सहज ] सहज म्हणजे शीघ्र. (भा.इ. १८३४)

सहज (अव्यय) [ सहसा = सहजा. सहसि = सहजी. सहजासहजी accidentally. सहसा उपसृत्य coming accidentally ]

सहजात [ सहसा = सहजा = सहजात. त आगंतुक] (भा. इ. १८३४)

सहजासहजीं [ सहसासहसि = सहजासहजी] (भा.इ. १८३४)

सहणें व सोसणें [ सह् = सह = सहन = सणणें. सहस्य = सोस (सोसणें) ] सोसणें म्हणजे सहन करणें. (भा. इ. १८३३)

सहरी [ शफरी = सहरी (एक प्रकारचा मासा)]

सहल [ सहचार = सहआल = सहाल = सहल] सहल म्हणजे मित्रांबरोबर फिरावयास जाणें.

सहाण [ शाणः = सहाण ]

सहेली [ सहेला (खेळगडीण) = सहेली ] female friend.

सळसळणें [ षल् गतौ =सळसळणें (सर्पादिकांचें, पाण्यांचें)] (ग्रंथमाला)

सा *[ शी पहा ]*

सा-शा [ सह् बलवान् असणें या धातूपासून साह् आणि साह् चा अपभ्रंश सा-शा. ]

नागरशा, प्रतापशा इत्यादि क्षत्रियवाचक शब्द यांतील शा-सा हा शब्द साह्-षाह् या वैदिक शब्दाचा अपभ्रंश आहे. परंतु

मोतीसा, बुलासा इत्यादि क्षत्रियेतर वाचक शब्द यांतील शा-सा हा शब्द साधु-साहु या शब्दाचा अपभ्रंश समजणें युक्त.

तुराषाह् ह्या वैदिक सामासिक शब्दांत जो साह् हा पोटशब्द येतो त्याचा अपभ्रंश गुजराथींत शा-सा असा होतो. (महिकावतीची बखर पृ. ७८)

साई [ स्वामिन्] *(सांव पहा)*
साउली [ शामा + ली = साँवली (छाया) = साउली किंवा छाया + ली (स्वार्थक) = साअली = सावली = साउली ] (ज्ञा. अ. ९ पृ. ६)
सांकव [ संक्रमः (पूल) = सांकव, सांकू]
सांकू [ संक्रमः] *(सांकव पहा)*
साँकू [ शंकु = संकु = साँकू ] ओढ्यावरील कैंच्या मारून बनविलेला फांद्या, वेळू वगैरेंचा पूल. (ग्रंथमाला)
साख [ साक्षिन् = सक्खी = साख ] witness.
साख पटली = witness approved.
साखरनिंबू [ शर्करानिंबूक = साखरनिंबू = साखरलिंबू ] (भा.इ. १८३४)
साखरपरी [ शर्करापारी = साखरपारी = साखरपरी ] पारी म्हणजे शकल. साखरपारीच्या वड्या म्हणजे कणिकेंत साखरेचीं शकलें घातलेल्या वड्या.
साखरपरीच्या वड्या [ शर्कराप्राया वर्तिका = साखरपरीच्या वड्या. प्राया = परीच्या]
साखऱ्या *[ दह्या पहा]*
सांखवेल [ शंखिनीवल्ली = सांखवेल]
साखी [ साक्ष्यं = साखी ]
सांग [ शंकुः = सांक = सांग ] एक हत्यार आहे.
सांगड १ [ संघाटः (लाकडांचा ताफा) = सांगाड = सांगड, सांघड ] सांगड म्हणजे काठ्या, भोपळे वगैरेंचा ताफा. (२) [ संगति किंवा संगतं = सांगड] (३) [ संघटिः = सांघड = सांगड ] (४) [ संघातः = सांगड ] एकत्र केलेल्या वस्तू. (५) [ संघट्टिः = सांगड] *(घड पहा)*
सांगडें [ संकटम् = सांगडें ] अवघड.
सांगणी १ [ सम् + गण् १० भाषणे] उपदेश. (२) [ संगणिका ] *(धातुकोश-सांग १ पहा)*
सांगणें-पांघणें [ संख्यापनंप्रख्यापनं = सांघणे पांघणें ] (भा. इ. १८३४)
सागळ [ (छगल) छागल - सागळ ] बकऱ्याचें मऊ कातडें. (भा.इ. १८३३)
सांगाती [ संघाते = सांगाती (vulger) ] तस्य संघाते = त्याच्या सांगातीं.
सांगोवांगी [ संख्याव्याख्याः संख्याव्याख्यम् = सांगोवांगी ] सांगण्यावरून व वाखाणण्यावरून.
सांघणें-सांगणें [ संख्यापनं = संघवण = सांघणे ] (भा. इ. १८३२)
साच ( चा-ची-चें) [ शाश्वत = सासअ = साच (चा-ची-चें) (शाश्वत, निरंतर) सत्य = सच्च = साच (खरें) ]
साचें [ शस्यं] *(सच्चा १ पहा)*
साज १ [ सज्ज = साज (गाणारणींचीं सर्व वस्त्रें इ. )] सज्ज म्हणजे वस्त्रें घालणे. (भा. इ. १८३३) (२) [ सज्जा (Equipment) = साज] सारा साज तयार करून, कसबीण नाचूं गाऊं लागली. (भा.इ. १८३६)
साजणी [ सज्जनी = साजणी ] (स.मं.)
साजरा गोजरा [ सत्हयगिरिः = सज्जइरि = साजेरी = साजरा. गुत्हयगिरिः = गुज्जइरि = गुजेरी = गोजरा ]
सांजवणी [ सम् + धे णिच् धापय = सांजव. संधापन = सांजवण, संधापनी = सांजवणी ] *(धातुकोश-सांजव २ पहा)*
सांजा [ संयावः = सांजाआ = सांजा, संयावस्तु घृतक्षीरगुडगोधूमपाकजः। ] दूध, तूप, गूळ व गहूं मिळून जो पाक त्याचे नांव सांजा. (भा. इ. १८३६)

सांजावणें [ दिवस सांजावतो = दिवसः संध्यायते. मला सांजावतें = मे संध्यायते (भावे). मी काळ क्रमतों = अहं कालं क्राम्यामि (simple). मला करमतें = मे क्रम्यते (भावे)] (भा.इ. १८३३)

साजूक [ सद्यस्क = सज्जुक = साजूक = ताजें, नवें ] (ग्रंथमाला)

साटें १ [ घराटें साटें, गाडीचा साटा इत्यादि शब्दसमूहांत जो साटें, साटा शब्द येतो तो संस्कृत शकट शब्दाचा अपभ्रंश आहे. शकटः = सअटा = साटा - टे.

शरीरं शकटं देहं पुरं कायं कलेवरं ॥

॥धन्वंतरीयनिघंटु॥ ] (भा. इ. १८३७) (२) [ शट्टकं (पाणी व तूप घातलेलें पीठ) = साटें ] आंब्याचें, फणसाचें साटें म्हणजे पाणी व तूप घालून कुटून केलेली आंबरसाची पोळी.

सोटें (लोटें) [ षट् अवयवे] साटें म्हणजे वाटा. co-partnership. (भा. इ. १८३३)

साठ [ षष्टि] *(विंशति पहा)*

सांठ [ संस्था] *(धातुकोश-साठव २ पहा)*

सांटवणें [ संस्थापनं = संठ्ठावणँ = सांठवणें] (भा. इ. १८३२)

साठीं [ सध्रि] (ज्ञा. अ. ९ पृ. ३४)

साठी [ साहिती = साठीं (aquisition) (सप्तमी) साठीं (आवाप्त्यर्थ) साठी ह्या शब्दाचें हें निर्वचन खरे.] *(साठी पहा)*

साठीं १ [ साहिती] (२) [ साहिती = साइटी = साटि, साठी, साठीं (सप्तमी)] तस्स्यार्थे (ज्ञा. अ. ९ पृ. ७७) (३) [ तस्य + अर्थे = तस्स्यार्थे (प्रा.) तस्साठम्मि = तस्साठइँ = तस्साठीं = तसाठीं = त्यासाठीं ] साठीं हा प्रस्तुत कालीं चतुर्थीचा प्रत्यय समजतात. परंतु वस्तुतः तो षष्ठीचा प्रत्यय स्य व अर्थे ह्या दोन पदांच्या संहितेपासून निष्पन्न झाला आहे. (स.मं.)

साठीचें भात [ षष्ठिकः = साठी] (भा. इ. १८३४)

सांड [ षंडः = सांड] वळू बैल.

सांडगा [ शांडाकः = सांडगा ] (भा.इ. १८३४)

सांडणी [ संडयनी (सम् + डी) flying together with man perched = सांडणी ] a camel flying with post-speed.

सांडणीस्वार a swift horseman, camel-man.

सांडणीस्वार [ स्यंदनी अश्ववारः = सांडणीस्वार]

स्यंदन = रथ.

वेगवान गाडीच्या घोड्यावर बसणारा.

सांडरूं [ साध्वीतरी = साडरी = सांडरी ] हा शब्द स्त्रीला प्रेमानें लावतात.

सांडस १ [ संडिश = सांडिस = सांडस ] हत्यार. (भा.इ. १८३३) (२) [ संदंश = सांडस (वाग्भट-यंत्रविधि)] (भा.इ. १८३४)

साण [ शान = साण, साहाण ] (भा.इ. १८३७)

सात १ [ शक्ति = सत्ती = सात] देव्याः शक्तिः = देवीची सात, साथ. (२) [ साति = सात सै to destroy] destruction.

साँत [ साति = सात = साँत ] साति म्हणजे ओळ, पंक्ति. तापाची साँत म्हणजे तापाची ओळ. (भा.इ. १८३७)

सातवण [ सप्तपर्ण = सत्तवण्ण = सातवाण = सातवण] (भा.इ. १८३२)

सातेरें १ [सप्तवारकं = सातेरें ] सात

दिवसांचें जुडगें. (२) [ साप्तान्तर्यं = सातेरें ] काढ्याचें सातेरें म्हणजे सात दिवस काढा घेण्याचा क्रम.

**साथ १** [ साहिती (accompaniment) = साथ ] साथ करणे. (२) [ स्वस्ति = सथ्थि = साथ ] साथ देणें म्हणजे दुसऱ्याच्या भाषणाला, गाण्याला किंवा कृतीला 'स्वस्ति' म्हणून म्हणणें. पुढें ताल धरणें असा अर्थ निघाला. (ग्रंथमाला)

**साथी** [ सहस्थिति = साथिइ = साथी = साथ ] साथ म्हणजे सहकार.

**सांद** [ संधिः ] *(सांदी पहा)*

**सांदणें** [ संदा (संदित) = सांदणें ( ग्रंथणें)] सांधणे धातू निराळा. (भा.इ. १८३५)

**सादळणें** [ आर्द्र ११. सार्द्र = सादळ ] सादळणें म्हणजे सार्द्र, ओलें होणें. (धा.सा.श.)

**सांदी १** [ संधि = सँधि = सँदी ] भिंतीच्या सांदीस बसूं नको म्हणजे भिंतीच्या संधीस, जेथें दोन भिंती मिळतात तेथें. (भा. इ. १८३६) (२) [ संधिः = सांदी, सांद, सांध] घराच्या सांदीकोपऱ्यांत म्हणजे संधींत व कूर्परांत.

**साध (धा-धी-धें)** [ साधु = साध (simple) उभयगतिस्तस्य भवति साधीयो वा यष्टिहस्तं गमिष्यति । (पंतजलि-व्याकरणमहाभाष्य - Vol. I, P. 81, Line 5-Keilhorn येथें साधीयस् शब्द simple साधा या अर्थी योजिला आहे.)] (भा. इ. १८३३)

**सांध** [ संधिः] *(सांदी २ पहा)*

**सांधा** [ संधि = सांधा ] (स.मं.)

**साधासुधा** [ साधुः सुधीः = साधासुधा ].

**साधून** [ आ + सद् पद्यर्थे ] रात्र साधून पळाला. *(धातुकोश-साध ४ पहा)*

**सान** [ सन्न (अशक्त, ठेंगू, अत्यल्प) = सानें, सान] (लहान) सान.

**साना** [ सनातन perpetual = साना] perpetual, continuous. उ.- जिये ब्रह्माचलाचां आघाडां। पहिलेया संकल्पजलाचेया उभडा । सवें चि महाभूतांचा बुडडा। साना आला ॥ ज्ञा. ७-६७.

**सानें १** [ सन्न] *(सान पहा)* (२) [ सन्न weak, feeble = साने ] weak, feeble, दुर्बल. (३) [ सन्न (क्षीण) = सानें ] weak.

**सान्हाउ** [ सन्नाहः accouterments = सान्हाउ, सान्हाओ सान्हाव, सान्हाअ ] चिलखत.

**सांपळा** [ पाशजालक = पासलअ = सापला = सांपळा (अक्षरविपर्यास) ] (स.मं.)

**सांबर** [ सृमर = सांबर ] a kind of deer.

**सांबळ १** [ शंबुल] *(संबळ २ पहा)* (२) [ शंबल (पाथेयपात्र) = संबळ, सांबळ, चंबळ, चवाळें ] (भा.इ. १८३६)

**सांबारें १** [ सांभारिकं, संभारं] *(सांभारें पहा)* (२) [ भृ to fry भृणाति. संभारः = सांबारें ] (धा.सा.श.) (३) [ सम् + भृ. संभारकं = सांबारे ]

**सांभारें** [ भृ १ भरणे. सांभारिकं, संभारं = सांभारें = सांबारें ] संभार म्हणजे मसाला. मसाला घातलेलें डाळीचें आंबट वरण. (धा.सा.श.)

**सामान्य** [ सामान्यक = सामान्यअ = सामान्य (विशेषण)] तो पुरुष सामान्य आहे.

**साय १** [ श्यै १ गतौ. श्याया = साय]

(धा.सा.श.) (२) [ सार्या] (धातुकोश-साय १ पहा) (३) [ श्राया, श्रा, श्याया] (धातुकोश-साय १/२ पहा) (४) [ स्यै-स्या to coagulate = साय] दुधावरची साय coagulation of scum on milk. (५) [ छाया = साय, सायटें ] दुधाची साय = दुग्धछाया.

सायटें [ छाया ] *(साय ५ पहा)*

सार [ तुझ्या बोलण्यांत कांहीं सार नाहीं, या वाक्यांत सार या शब्दाचा अर्थ न्यायादनपेतं असा आहे. सार म्हणजे न्याय्यसारं न्यायादनपेतं (काशिका २-४-३१) ] (भा.इ. १८३७)

सारखा [ साक्षात् (प्रत्यक्षे) = साखा. र मध्यें येऊन सारखा ] तो सारखा बघत होता = सः साक्षात् पश्यन् आसीत्. (भा.इ. १८३४)

सारंगी [ शार्ङ्ग = धनुष्य) = सारंगी ] धनुष्यानें वाजविण्याचें वाद्य.

सारमंडळ [ स्वरमंडल (वाद्यविशेष) सारमंडळ. स्व = सा. स्वर = सूर ]

सारवट गाडी [ सर्वपथीनः रथः = सारवटी गाडी, सारवड गाडी ] a cart serviceable on any road good, bad or indifferent.

सारवणें [ वृ ९ संभक्तौ. संवर्य = सांरवणें (वर्णविपर्यय)] शेणानें सारवतो = शक्ना संवर्यति. (धा.सा.श.)

सारा [ सं + रा to grant, bestow = सारा ] gift, सं + रा = संरा ] land assessment grant by a landholder to the Government.

सारीगम [ स्वरग्राम = सारगाम = सारीगम. सा + री + ग + म = सारीगम]

सारीपाट १ [ शारीपट्टः = सारीपाट] (२) [ शारिपट्टः = सारीपाट]

सारूं (गुजराथी) [ चारु = सारूं ]

साल [ शल्कं = साल] (२) [ शल्क (नपुसंक) = साल (स्त्री) ] झाडाची त्वचा. (भा.इ. १८३४)

सालई [ सल्लकी = सालई ]

सालवन [ शालिपर्णी = सालवन (वनस्पति)] (भा.इ. १८३४)

साला-ली-लें [ श्यालक = सालअ = साला-ली-लें ] (स.मं.)

साल्या [ श्यालिक = सालिअ = साल्या ] बायकोचा भाऊ, बहिणीचा नवरा. (स.मं.)

सांव [ स्वामिन् = सावी = सांव, सांई ] साव म्हणजे स्वामी, राजा.

साव = साऊ = साहू

औरंगझेबानें शिवाजीच्या नातवाला साव, साहू म्हटलें त्यांत विशेष कांहींच नव्हतें. साव, साहू या शब्दांचा अर्थ राजा असा मराठींत होता च.

सावकास [ स्वावकाश = सावकास ] सावकास म्हणजे स्वतःला बनेल तसें, स्वेच्छेनें, मंद.

सावध १ [ सावधि (अवधि = अवधान) = सावध ] (२) [ समवहित greatly attentive = सावध ] very attentive.

सांवरणें [ वृ ९ संभक्तौ. संवर्य (आच्छादणें) = सांवरणें ] पदर सांवरणें = प्रदरसंवर्यणं] (धा.सा.श.)

सांवरासांवर [ सम् अंबर्यति ] *(धातुकोश-सांवर ५ पहा)*

सांवरी [ शाल्मली = सांवरी ] हा वृक्ष निराळा खालच्याहून

सांवरी [ शंबरी = सांबरी = सांवरी ] (दोन्ही शब्द-भा. इ. १८३४)

सावली [ छाया ] *(सांवली पहा)*

सांवली [ श्यामलिका = सांवली छाया = सावली (स्वार्थे ल) ]

सांवळा गोंधळ [ शांभलिकः गौंदलः = सांवळा गोंधळ ] ज्यांत दुराचारी रांडा गातात असा गोंधळ.

गोंधळ वस्तुतः सदाचारी देवदासी ऊर्फ मुरळ्या यांनीं घालावयाचा असतो. त्याच्या ऐवजीं चाहाटळ मुरळ्या ज्या गोंधळांत आढळतात, त्याला सांवळा गोंधळ म्हणतात. त्यावरून लक्षणेनें कोणत्या हि चाहाटळ, अप्रेक्षणीय व असाधु कृत्याला सांवळा गोंधळ म्हणण्याची चाल महाराष्ट्रांत आहे. (भा. इ. १८३७)

सावळें [ शबलं = सावळें ] सावळें परब्रह्म म्हणजे शबलं ब्रह्मं. तुकारामाच्या अभंगांत हा शब्द येतो.

सांवळ्या [ शामलकः = सांवळ्या. पंचतंत्र-चतुर्थतंत्र-कथा ६. ]

सावाय १ [ समवाय multitude = सावाय] multitude, समुदाय.

उ.- ऐसा स्वयंभु जो जीव लाटु। सावायें विण उद्भटु । तो शौर्य गा श्रेष्ठु । पहिला गुणु ॥ ज्ञा. १८-८५४

समुदायाखेरीज जो एकटा असून शूर. (२) [ साहाय्य = सावाय (मदत) ज्ञानेश्वर, सावाव (वो)]

सावाव [ (वो) [ साहाय्य] *(सावाय २ पहा)*

सावावो [ समवायः ] *(धातुकोश-साव पहा)*

सावेरी [ शतपर्विका = सअपेरी = सावेरी (वनस्पतिविशेष) दूर्वा] (ज्ञा. अ. ९ पृ. ८५)

सासरा [ श्वशुरक = ससुरअ = सासरा ] (स.मं.)

सासरें [ श्वश्रूगृह = सासुघर = सासुर = सासरें (नवरीचें) (सासुरवासी-शी) ] (स.मं.)

सांसिनल [ संसिन्व् म्हणजे चांगलें भिजणें. संसिन्वित = साँसिन्नअ + ल = साँसिन्नल, साँसिनल ] सांसिनले (ज्ञा. अ. ९ ओं. ४) निष्ठा बहुवचन. साँसिनले म्हणजे चांगले भिजलेले. (ज्ञा. अ. ९ पृ. ५)

सासुर्डी [ साश्रुधी = सासुर्डी ] सासूचें निंदाव्यंजक रूप. (भा.इ. १८३३)

सासुरवाडी [ श्वशुरवाटी = सासुरवाडी (नवऱ्याची) ] (स.मं.)

साहाण १ [ शान] *(साण पहा)* (२) [ शानिका = साण = साहाण ] सोनें घासण्याचा, तेजण्याचा दगड. निशानं तेजनं.

साहू [ साधु (वार्धुषिक, व्याजबट्टा करणारा) = साहू] सावकार

साळढाळ [ शालाशिथिल = साळढाळ ]

साळसुध [ शालाशुद्ध] *(ठाणसुध पहा)*

साळी १ [ शालिष्टक = साळिअ = साळी] (भा. इ. १८३७) (२) [ शालिनी (उत्तम स्त्री) = साळी ]

साळोत्री [ शल्यतांत्रिकः = साळिअंत्री = साळोत्री ] प्रथम शल्यतंत्र या शब्दाचा अर्थ फक्त शस्त्रक्रिया असा होता. नंतर घोड्याच्या रोगचिकित्सेला तो शब्द लागूं लागला.

शल्यतंत्र = साळोत्र.

शालिहोत्र ऋषि होता व तो अविवैद्य होता आणि त्याच्या नांवावरून शालिहोत्रं हा शब्द निघाला, वगैरे नंतरच्या गप्पा आहेत.

सिठी [ सृष्टिः = सिठी ] creation.

सिरें [ क्षीरं] *(शिरें १ पहा)*

सी-स [ आसात् इति अंतिकनाम (निघंटु) आस ह्याची पंचमी आसात्. आस

ह्याची सप्तमी आसे.
गृहस्य आसे = घरा + आसीं = घरासीं = घरास.
त्या घरास परसूं आहे म्हणजे त्या घराजवळ परसूं आहे.
हें स-सी प्रवचनीय मराठींत वैदिक आसात् या अव्ययापासून आलेलें आहे.] (भा.इ. १८३४)
सीधा [ सिध्रः (साधुः, भट्टोजी, उणादि १७९) सिध्र = सिध्ध = सीध (धा-धी-धें) ] (भा.इ. १८३३)
सीयारें [ सीत्कारः ] *(शहारा पहा)*
सुआरा [ सूपकारः ] *(सुवारा पहा)*
सुई [ सूचि = सुइ = सुई ] (भा. इ. १८३२)
सुईण [ सूतिज्ञा = सुइण्णा = सुईण ]
सुकट [ शुष्कल = सुक्कल = सुकल = सुकड = सुकट, ड = ल ] सुकट म्हणजे एका प्रकारचे मासे. (नड्वलाभ्यः शौष्कलं) (मा. वा. सं. ३०-१६)
शुष्कल म्हणजे सुकें मत्स्यमांस. (भा.इ. १८३३)
सुकरि -री [ शुकृत्य quickly = सुकरि ] quickly, promptly. उ.-ज्ञा. १५-३५७ माडगांवकर पोथी.
सुकलेलें [ शुष्कशुष्कं ] *(ओलेले पहा)*
सुकाळ [ सौकल्य = सुकाळ ]
अन्नस्य सौकल्यं = अन्नाचा सुकाळ. सौकल्य म्हणजे औदार्य, चंगळ.
सुकेळें [ शुष्ककदलं = सुकेळे ]
सुखाटणें [ सुखाटनं = सुखाडणें = सुखाटणें] (भा. इ. १८३६)
सुंगट [ चिंगेटः = सुंगट ] a kind of fish.
सुगंधी [ सुवासिक तेलें विकणाऱ्याला आपण सध्या मराठीत सुगंधी म्हणतों. कात्यायनकालीं त्याला सुगंध म्हणत-सुगंधः आपणिकः । परंतु कात्यायनकाली सुगंधि हा शब्द फुलें वगैरेंना लावीत. सुगंधि पुष्पं, सलिलं । ] (भा. इ. १८३६)
सुगावा [ सम् + अव + गम् = समवगमः] *(धातुकोश-सुगाव ४ पहा)*
सुगी [ सुगति = सुगई = सुगी ] चांगल्या पिकाचे दिवस. (स.मं.)
सुगीदुगी १ [ सुगतिदुर्गति = सुगइदुग्गइ = सुगीदुगी] (२) [ सुग-ता दुर्ग-ता = सुगीदुगी ] Opulence and famine. good and bad times.
सुग्रण [ सुग्रहिणी = सुग्रण ] ती, बाई, सुग्रण आहे हो म्हणजे ती सुग्रहिणी आहे, संसार दक्षतेनें पाहणारी आहे. (भा.इ. १८३४)
सुघड [ सुघटं = सुघड]
सुचित [ सुचित्र = सुचित]
सुजणें [ श्वज् (गतिकर्म) = सुज.] माझें काय सुजतें आहे? जातें आहे. (भा.इ. १८३३)
सुजाण [सुजज्ञान = सुजाण. ज्ञा ९ ज्ञाने. जानत् = जाणता ज्ञात = जाणलेला. सर्वज्ञ = सर्वजाण. ज्ञानप्रज्ञान =जानपछाण ] (धा.सा.श.)
सुजे [ शुचिर् पूतीभावे । शुच्यते = सुज्जए = सुजे ] (भा.इ. १८३३)
सुट (टा-टी-टें) [स्वस्थ = सुट्ठ = सुट ] सुटा मनुष्य, सुटी बाई, सुटें मूल. सुटी बाई सैंपाकाला हवी = स्वस्था स्त्री स्वयंपाकाय भाव्या. (भा.इ. १८३४)
सुटणें १ [ सम् + उत् + सट्ट ] *(सुसाटणें पहा)* (२) [ श्वठ् (संपणे) = सुठ = सुट] शाळा सुटते = शाला श्वठति (भा.इ. १८३३) (३) [ श्वठ = सुठ = सुट ] जाणें निघणें. गाडी सुटते =

गंत्री श्वठति (चालू होते) श्वठ (गतिकर्म). (भा.इ. १८३३) (४) [ सृष्ट = सुट्ट = सुटणें ] बाण सुटला = बाणः सृष्टः (भा.इ. १८३६)

सुटसुटित १ [ सुट्ट अल्पीभावे द्वित्त = सुटसुटित ] not fat, moderately lean. (२) [स्था १ स्थाने. सुस्थसुस्थित = सुटसुटित ] (३) [ सूत्थसुत्थित = सुटसुटित] (४) [ चुट्, चुट्ट अल्पीभावे लहान होणे = सुटसुटित, सुट्टा] (५) [ श्वठ् to be accurate द्विरुक्त = सुटसुटित ] accurate, measured. (६) [ सुत्थ ११. सुत्थसुत्थित = सुटसुटित ] (धा.सा.श.) (७) [ सुट्ट १ अनादरे, अल्पीभावे - सुट्टसुट्टित ] सुटसुटित म्हणजे लठ्ठ नव्हे तो, सडपातळ. *(धातुकोश-सुट १६ पहा)* (८) [ सु + युट्ट १ अल्पीभावे = सुटसुटित ] *(धातुकोश-सुट १७ पहा)* (९) [ सुष्ठुसुघटित = सुटसुटित ]

सुट्टा [ चुट्, चुट्ट अल्पीभावे ] *(सुटसुटित ४ पहा)*

सुडगें [ समुद्ग a covered box, casket = सुडगें ] an earthen vessel at the संक्रांति.

सुडसुडीत [ श्वठ् to be accurate द्विरुक्त = सुडसुडीत ] accurate, measured, stiff.

सुड़ाचा (कागद) [सुदायः = सुडाजा = सुडाचा ] सुदाय म्हणजे मुद्दाम खास देणगी. सुडाचा कागद म्हणजे राजाकरितां खास तयार केलेला कागद.

सुत [ सुप्त + ल ] *(धातुकोश-सुव ४ पहा)*

सुतक [ सूत्रक = सूतक = सुतक) (स.मं.)

सुताडा [ सूत्रपटः = सुताडा ] कापसाची सुतें विणून केलेलें जाडेभरडें बसावयाचें वस्त्र.

सुंद १ [ शौंड = सुंद ] दारूने सुंद म्हणजें शिथिलगात्र झाला आहे. (२) [ सुमंद = सुवंद = सुंद]

सुदट [ सुदृढं = सुदट, सूदट ]

सुंदर [ सूनर = सुंदर. यो वाद्यते ददाति सूनरं वसु (१-८-४०-४) सूनरं = सुंदर नरं ] संस्कृत सुंदर शब्द वैदिक सूनर शब्दापासून निघाला आहे.

सुद्धां [ सार्धं = सार्द्धं (जैनमहाराष्ट्री) = सद्धँ (महाराष्ट्री) = सुद्धँ = सुद्धां ] येथें महाराष्ट्री किंवा अपभ्रंश अ चा उ झाला आहे. (भा.इ. १८३२)

सुधा १ [ सुधी (चांगल्या मनाचा) = सुधा] (२) [ शुद्धधीः = सुधा ] तो सुधा मनुष्य नाहीं म्हणजे शुद्धधी नाहीं. (३) [सुधी (विद्वान, जाणता) = सुधा] well-disposed

सुनबहिरी [ शूनबधिरता = सुनबहिरी ] शून म्हणजे सुजलेलें. (भा.इ. १८३४)

सुना [ स्नुषा] *(सून पहा)*

सुना-नी-नें [ सून (रिकामा) = सुना-नी-ने]

सुनावणी [ संज्ञापना = सण्णावणा = सनावणी = सुनावणी. अ बद्दल उ]

सुपडें [ शूर्पपुटं ] *(सुपलें पहा)*

सुपली [ शूर्पपुटिका = सुपली ] *(सुपलें पहा)*

सुपले [ शूर्पपुटं = सुपडें, सुपलें. शूर्पपुटिका = सुपली ]

सुफराट, सुफराटें [ सुस्फारयत् ] *(उपराट पहा)*

सुंब [शुल्ब] *(सुंभ पहा)*

सुबक [ सुभगं = सुबक ] सुभगं उक्तं त्वया = तूं सुबक बोललास.

सुंभ [ शुल्बं वराटकं स्त्री तु रज्जु स्त्रिषु वटी गुणः ॥ २७॥ (अमर-द्वितीय कांड-शूद्रवर्ग).

शुल्ब = सुब्ब = सुंब = सुंभ (दोर) अनुनासिक आगंतुक ] (भा.इ. १८३३)

सुमार १ [ स्मृ १ स्मृतौ, to recollect = सुमार ] त्याला सुमार राहिला नाहीं म्हणजे आठवण राहिली नाहीं. (२) [ सुकुमार = सुउमार = सुमार ] पाहिली, मुलगी सुमार आहे, येथें सुमार म्हणजे सुकुमार, अल्पतनु, लहान, मुलाच्या मानानें कोवळी असा अर्थ आहे.

सुर् (sur-round) [ सम्परि = सुर्. circharge. sub पासून सर काढणें अयुक्त.]

सुरगांठ [ सूद्ग्रंथिः = सुर्गांठ. निर्ग्रंथिः = निर्गांठ ].

सुरपाटी [ सृपाटी = सुरपाटी ] सृपाटी म्हणजे माप, मर्यादा. सुरपाटी म्हणजे मापाची, मर्यादेची रेष.

आट्यापाट्यांतील मधली मेजाची मुख्य पाटी.

सुरवाड [ सुवृद्धिः = सुरवाड ] (ज्ञा. अ. ९ पृ. १८२)

सुरवाडणें [ सुवर्धनं = सुवड्ढण = सुरवाडणें ] निर्वर्धनं = निर्वड्ढण = निरवाडणें. निर्च्या धर्तीवर सुर्] (भा. इ. १८३२)

सुरवाडु [ श्रुतिवादः ] (ज्ञा. अ. ९ पृ. ४०)

सुरसुरणें [ शूर् १० विक्रान्तौ. शूरशूरयं = सुरसुर ] सुरसुरणें = आंगी पराक्रम येण्याची धमक येणें. (धा.सा.श.)

सुरा [ सुरा चषकमद्ययोः (मेदिनी) ] पाणी प्यायचा. (भा.इ. १८३३)

सुरू [ सुर (द्रुम) = सुरू ] वृक्षविशेष, देवदाराचा प्रकार.

सुरू करणें [ श्रु १ श्रवणे. श्रुकरणं = सुरूं करणें ] काल व्याकरण सुरू केलें. (धा.सा.श.)

सुर्गांठ [ सुंग्रंथि ] *(निर्गांठ पहा)*

सुर्गांठ [ सूद्ग्रंथिः ] *(सुरगांठ पहा)*

सुलटपालट [ सुश्लिष्टं प्रश्लिष्टं = सुलटपालट (गाण्यांतील) श्लिष् ४ आलिंगने ]

सुवाण [ सुपण्यं = सुवाण ] Plentiful commodities

सुवारा [ सूपकारः = सुआरा, सुवारा ] cook.

सुसटणें [ सुसाटणें पहा ]

सुसाटणें [ सम् + उत् + सट्ट् to be powerful = सुसाटणें, सुसटणें, सोसाटणें, सोसटणें, सुटणें ] to be powerfully blowing.

सुस्कारा-री-र [ श्वस्कारः = सुस्कारा. रिः = री ]

सुस्त [ श्वस्त = सुस्त. श्वस् २ निश्वसने, धापा टाकणें ] सुस्त म्हणजे धापा टाकीत निर्जीव होऊन बसलेला.

सुळ्कन् [ श्लंक्, श्लंग् १ गतौ ] *(धातुकोश-सुळक २ पहा)*

सुळकी [ श्लंका = सुळकी ]

सुळकुंबा [ शूलकुंबः = सुळकुंबा] धातुकोश - सुळकर पहा

सुळावरची पोळी [ शूलस्य उपरिष्टा पोलिका = सुळावरची पोळी ] शूल म्हणजे मांसादि भाजावयाचा लालभडक लोखंडी खिळा. त्यावरची पोळी काढावयाची म्हणजे हात व तोंड भाजावयाचें. वध करण्याचा सूळ निराळा. (भा. इ. १८३७)

सूं [ शु (शैघ्र्ये ) = सू = सूं ] (भा. इ. १८३४)

सूक [ शुक्र] *(सूख पहा)*
सूख [ शुक्र = सुक्क = सूक, सूख] तिला नवऱ्याचें सूख नाहीं म्हणजे शुक्र नाहीं.
सूजणे [ असूया ११. असूयनं (अलोप) सूजणें ] त्याचें बरें झालें तर तुझें काय सूजतें ? तस्य कल्याणेन तव किं असूय्यते (भावे) (धा.सा.श.)
सूट १ [ सुदाति] (२) [ सृष्टिः = सूट]
सूड १ [ सूद् to destroy = सूड] (२) [ असूयतिः (noun from असूया) = सूड] सूड उगवणें to take revenge. (३) [ षूद् क्षरणे । सूदः = सूड ] सूड म्हणजे खरड, वैरनिर्यातन. निषूदनः म्हणजे मारणारा. (४) [ सूद् murder, kill, destroy = सूड ] सूड घेणें to retaliate murder.
सूतगोतं [ सूत्रगोत्रं = सूतगोत]
सून १ [ स्नुषा = सुण्हा = सुना (एकवचन)] वस्तुतः सुना हे एकवचन असतां तें अनेकवचनीं समजतात व त्याचें एकवचन सून करतात. (स.मं.) (२) [ स्नुषा = सुन्हा = सून] मुलाची बायको. (भा.इ. १८३३) (३) [ सुना (मुलगी) = सून] मुलाची बायको. (भा.इ. १८३३) (४) [ स्नुषा = सोहूणा = सुना = सून] (स.मं.)
सूनबहिरी [ शूनबधिरता = सूनबहिरी ]
सूबा [ श्वः = सुवो = सूबा ] tomorrow.
सूर [ स्वर = सूर, स्वरवाहनं = सूर वाहणें] (भा.इ. १८३४)
सें *[ शी पहा ]*
सेजवळ [ शय्यापालः = सेजवळ ]
सेजार [ शय्यागृह ] *(शेजार ३ पहा)*
सेंदणें [ स्यन्दनं ] *(शेंदणे पहा)*
सेली [ शिरि sword, arrow = शिलि = सेली ] बाण
उ.- हाथि हाला फुलिं । पासिवणें जेविं न घली । तैसा नोहोटे दुर्वाक्यसेलीं । सेलिला सांता ॥ ज्ञा. १३-४९५
सैंघ [ शीघ्रं = सिघ्घं = सैघ = सैंघ ] सैघ, सैंघ हा शब्द ज्ञानेश्वरींत येतो.
सैती [ शक्तिः = सत्ती = सइती = सैती] एक हत्यार आहे.
सैपाक, सैंपाक [ हा शब्द स्वयंपाक या शब्दापासून अडाणी लोक व्युत्पादितात, परंतु ती व्युत्पत्ति अशास्त्र आहे. खरा संस्कृत शब्द सूदपाक असा आहे. सूद म्हणजे शिजवणें व पाक म्हणजे हि शिजवणें. सूदपाक हा जोड शब्द आहे. जोडींतील दोन्ही अवयवांचा अर्थ एक च. सूद याचा अर्थ मसाला असा हि होतो. पण मसाला ज्यांत नाहीं अशा भाकरीच्या भाजण्याला हि सैपाक च म्हणतात, सबब मसाला हा अर्थ येथें अनिष्ट आहे.
सूदपाक [सूअपाक = सोपाक = सैपाक, सैंपाक. अनुनासिक वैकल्पिक ] (भा.इ. १८३७)
सैपाकी, सैपाक्या [ सूदपाकिन् = सोपाकी, सैपाकी, सैपाक्या] (भा.इ. १८३७)
सैराट [ स्वैराटक = सैराट ] vagrant at will.
सैरावैरा [ स्वैरंस्वैरं = सैरावैरा. ईर् गतौ. कंपने. प्रथम स्वचा स, व द्वितीय स्वचा व झाला आहे. ] (धा.सा.श.)
सैरीण [ स्वैरिण = सैरिणी = सेरीण ] ह्या नांवांचीं गाणीं ज्ञानेश्वर-एकनाथादिकांचीं आहेत. (भा.इ. १८३३)
सैल [ चिल्ल् सैल होणें = सैल ] शिथिल पासुन हि सैल शब्द निघतो. चिल्लपट्ट

= शेळपट (अजागळ, चापूनचोपून धोतरवस्त्रें न नेसणारा). (धा.सा.श.)
सैंवर [ स्वयं = सयं. स्वयंवर = सयंवर = सैंवर ]
सोइ [ श्रुति = सुइ = सोइ (श्रौति) आधार]
सोई [ समता, समिति] *(सोय २ पहा)*
सोईचें [ समयोचित suited to the occasion, timely = सोईचें ]
सोकटी [ सहकंठिका = सोकटी ] मानेची सोकटी म्हणजे कंठाचें पुढें येणारें शंक्वाकृति हाड.
सोकावणें [ सक्त = सक्क = सोक (क्रियापद) सोकावणें ] सोकावणें म्हणजे सक्त होणें. (भा. इ. १८३६)
सोक्षमोक्ष [ संमोक्षः मोक्षः = complete emancipation or simple emancipation. संमोक्ष complete freedom]
सोख [ शोष = सोख. शरीरशोष = शरीरसोख] पाण्याचा सोख म्हणजे पाण्याचा शोष. (भा.इ. १८३४)
सोंग [ स्वंगा = सोंग (लक्षणेनें कुरूप स्त्री). शोभनं अंगं यस्याः सा स्वांगा ] (भा.इ. १८३४)
सोगभोग [ सौभाग्यभंगः = सोहागभंग = सोआगभग = सोगभोग. अ चा ओ ] (भा.इ. १८३६)
सोंगळ १ [ सुमंगल = सुवंगळ = सुओंगळ = सोंगळ ] (भा.इ. १८३७) (२) [ स्वंगुलिः (well-fingured) = सोंगळ ]
सोजी [ सूद्या = सोजी ] एक प्रकारचा शिजवलेला भात. सूद् शिजविणे. (भा.इ. १८३७)
सोट १ [ शौट् १ गर्वे. शौटः = सोट] सोट म्हणजे गर्विष्ठ माणूस. (२) [ शोठ = सोट (सोटभैरव), सोट्या ] सोट म्हणजे आळशी, लुच्चा माणूस. (भा.इ. १८३३)
सोटभैरव [ स्वस्ति भैरवाय = सोट्टिबहिरवाअ = सोट=बहिरव = सोटभैरव ] सध्यां हा शब्द दुर्वचन झाला आहे. (भा.इ. १८३२)
सोट्या [ शोठ] *(सोट २ पहा)*
सोडणें १ [ छोरणं (त्यागणे) = सोडणँ-णें. जसें छुरि = सुरि ] (भा.इ. १८३३) (२) [ छोटनं = सोडणे. छोटनं मोचनं]
सोडचिट्ठी [ सहोड (मुद्देमालासह) = सोड ] सोडचिट्ठी म्हणजे मुद्देमालासह दिलेले पत्र.
सोडमुंज [ समूढमौंजी = सोडमुंज (मुंज that is brought to successful finish arrangement. ]
सोद १ [ शुध्] (२) [ स्वद (सुष्ठु अत्ति) = सोद (दा-दी-दें)] चांगलें खाणार (रा-री-रें). सोदी जीभ म्हणजे चांगलें मिष्टान्न खाण्याला सवकलेली जीभ. श्राद्धांत, स्वदितं ?असा प्रश्न श्राद्धदेवांना करतात. (भा.इ. १८३४)
सोंद [ शुध् ]
सोदा १ [ चोदः = सोदा ] paramour. (२) [ शोध्यः (आरोपी) = सोदा] शोध्या स्त्रीः = सोदी बायको (दुष्टारोप आलेली बायको) (३) [ शूद्रक = सुदअ = सोदा ] अरे सोद्या, म्हणून लहान मुलांना म्हणतात. शूद्रक म्हणजे लुच्चा शूद्र. (भा.इ. १८३४)
सोध, सोंध [ शुध्]
सोनकुला, सोनकुली, सोनकुल्या, सोनुकल्या (vaidik) सूनु son or daughter ]
सोनकुल्या [ सूनु = सोन + कुल्या =

सोनकुल्या, सोनी (मुलगी), सोन्या (मुलगा) ] (स.मं.)

सोनी १ [ सूनु ] *(सोनकुल्या पहा)* (२) [ सुतन्वी ] *(सोनू पहा)*

सोनुकल्या [ सूनु] *(सोनुकला पहा)*

सोनू [ सुतनु = सोनू. सुतन्वी = सोनी]

सोनें १ [ स्योन (happiness good) = सोनें म्हणजे चांगले ] स्योन हा शब्द वेदांत फार येतो. तिचें सोनें झालें. (२) [सवनं = सोनें. सू १ ऐश्वर्ये ] तिचें सोनें झालें म्हणजें यज्ञीय आहुति झाली, मंगल परिणाम झाला. सुर्वणाशीं कांहींएक संबंध नाही. (३) [ शोभनं = सोण्हं = सोने ]

तिचें सोनें झालें = तस्याः शोभनं भूतं.

तदा सोण्हं भवे (मालविकाग्निमित्रं, प्रथमोंकः) सोनें या धातूशीं येथें काहीं एक संबंध नाहीं.

सोन्या १ [ सूनु ] *(सोनुकल्या पहा)* (२) [ सुजन = सोन्या ] माझ्या सोन्या my good man! (३) [ सूनुकः (dimunitive) = सोन्या ] माझ्या सोन्या, असें करूं नको = my son, don't do so.

सोन्यासारखी वेळ [ सवनं = सोनें ] सवन म्हणजे यज्ञ, यज्ञिय स्नान, सोन्यासारखी वेळ म्हणजे यज्ञिय स्नान करण्यासारखी शुभ वेला.

सोप (पा-पी-पें) [ सु + उपाय ) सूपाय = सोपा (पा-पी-पें). (सु + आप्यं ) स्वाप्यं = सोप ( पा-पी-पें)] सुलभ आहे उपाय ज्याला तें सूपाय किंवा सुखानें लभ्य तें स्वाप्य. (भा.इ. १८३६)

सोपट १ [ शुल्ब + टं = सोपट ] सोपट म्हणजे केळीनारळीच्या पानाच्या देठाची चिरफळी. (२) [ शुष्कपत्रं = सोअपट्ट = सोपट ] पोर अगदीं वाळून सोपट झाला. केळीचे सोपट.

केळीच्या किंवा नारळीच्या सुकलेल्या पानाच्या देठाला सोपट म्हणतात.

सोंपणें [ समर्पणं = सोप्पणं = सोंपणें ] (भा.इ. १८३२)

सोपारे [ सूपायतरं ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३७)

सोबत १ [ सहभवत् ] *(सोभत पहा)* (२) [ सहवर्ति = सोबती, सोबत ] (३) [ सहवृत् = सोबत ] accompanying.

सोबती [ वृत् १ वर्तने. सहवर्ति = सउबत्ति = सोबती ] (धा.सा.श.)

सोभत [ सहभवत् = सोबत, सोभत] one who accompany, free company.

सोमट [सोष्मन् = सोह्म = सोम, सोमिष्ट = सोह्मिट्ट = सोष्मिट = सोमट ] सोमट म्हणजे बरेंच उष्ण, अति उष्ण नव्हे तें कवोष्ण = कोमट, म्हणजे थोडें उष्ण. (भा.इ. १८३३)

सोमळ [ सुकुमार = सुउमाल = सोमाल = सोमळ ] किंचित् उष्ण. (ग्रंथमाला)

सोय १ [ सुगति = सुअइ = सोई = सोय] (ग्रंथमाला) (२) [ समता, समिति likeness = सोई, सोय] likeness. (३) [ समय prosperity = सोय ] prosperity.

उ.- कुबेरु आथिला होए । परि तो नेणे चि माझे सोये । संपत्ति मासी नोहे। श्रीनिवासु ।। ज्ञा. १६-३५५

परि तो नेणें चि माझी सोय he has no idea of my prosperity माझ्या धनाढ्यतेची त्याला कल्पना नाही. (४) [ समय engagement, contract = सोय ] आधी माझी सोय लावा first fulfil my engagement.

सोयरा [ स्वयंवरः = सोयरा ]
बायकोचा सोयरा म्हणजे स्वयंवरः, जार. सोदर पासून निघालेला सोयरा म्हणजे संबंधी. नवरा छिनाल बायकोवर रागावून सोयरा पहा म्हणून म्हणतो, तेथे सोयरा या शब्दाचा अर्थ स्वयंवरः असा आहे.

सोयरा-री-वे [ सोदरक = सोअरअ = सोयरा-री-रे] (स.मं.)

सोयरीक [ स्वयंवरकता = सोयरीक ] सोयरीक म्हणजे नवरा किंवा नवरी पाहिलेलें स्थळ. ह्या सोयरीक शब्दाचा संबंध सोदर शब्दाशीं बिलकुल नाहीं.

सोयेर १ [ सूतिकागृहं = सोयेर] (२) [ सौंदर्य = सोएर = सोयेर] (स.मं.)

सोर, सोरू, सोरूं [ सूकर = सोर (डुकर) सूकरकं = सोरू, सोरूं (लहान डुकर)]

सोलणें [ लू ९ छेदने. सुलूः (सुष्ठु लुनाति) (सोलणारा) सुलवनं = सोलणें ] चांगले कापणें. (धा.सा.श.)

सोलाणा, सोलाणें [ सुलुधान्यम्] *(धातुकोश-सोल २ पहा)*

सोलींव [ शल्किम = सोलीव ]

सोले [ सुलुः = सोले ] *(डोळ पहा)*

सोंवळ [ सुमृदुल = सोंवळ ] tender, soft, delicate.

सोवळें १ [ क्षौम (silken) + ल (स्वार्थक) = सोंवळे ] सोवळें is a cloth made of silk. सोवळें याचा अर्थ रेशमी वस्त्र. या पलीकडे कांहीं नाहीं. (२) [ क्षौमदुकूलं = सोंवळें. औमदुकूलं = ओंवळें ] क्षौम (रेशमी ) व औम (ताग, सण यांचें). (३) [ प्राकृत ओल्लं शब्दाचे मराठी ओले हे रूप आहे. संस्कृत शुष्क शब्दाचें प्राकृत सुअ होतें. सुअ + ओल्लं = सुओल्लं = सोअल्लं = सोवळें = शुष्कोल्ल. ओल्याचें वाळलेलें तें सोवळें. तसेच अव + ओल्लं = अवोल्लं = ओवळें, ओलें नाहीं तें ओवळें. कोरडें वस्त्र ओलें करून वाळवलें म्हणजें सोवळें होतें आणि ओलें होण्याच्या अगोदर तें ओवळें असतें.] (सरस्वतीमंदिर श्रावण शके १८२६)

सोवेरी [ सुपर्वा (बांबू) ] (ज्ञा. अ. ९ पृ. ८५)

सोशीक १ [ चीक् १ सहने अभ्यास चेचीक] *(धातुकोश-सोस २ पहा)* (२) [ शीक् १ आमर्षणे यङ्लुगन्त शिशीक् ] *(धातुकोश-सोस ३ पहा)*

सोस [ समुत्साहः = सोस ] great ardour.

सोसटणें [ सम् + उत् + सट्ट ] *(सुसाटणे पहा)*

सोसणें [ सह् ] *(सहणे पहा)*

सोसबाहुली [ सोत्सुक = सोत्सुअ = सोस. भावुक = भाउअ = बाहु
बाहु + ल = बाहुल. (स्त्री) बाहुली.
सोस + बाहुली = सोसबाहुली (सोत्सुकभावुका)]
कोणत्या हि पदार्थाविषयीं अत्यंत उत्सुक मुलीला हा शब्द लावितात. (भा.इ. १८३४)

सोसाटणें [ सम् + उत् + सट्ट ] *(सुसाटणें पहा)*

सोसू (भावली) [ सुवस् one who wears a garment well = सोसू ] सोसभावली म्हणजे अलंकार घालून नटणारी मुलगी, स्त्री.

सोहाळ [ (नपुं.) सौहार्द = सोहाळा (पु.) सुखसोहळा = सुखसौहार्द] (भा.इ. १८३३)

सोहाळा [ (संस्कृत) F. शोभालिः = सोहाळा masc. (मराठी) ] ज्ञानेश्वराच्या

पालखीचा सोहाळा.

सोळभोक [ सर्वभक्ष्यः = सोळभोक. अ = ओ ] ब्राह्मणः सर्वभक्ष्यः = सोळभोक ब्राह्मण.

सोळा १ [ षडपरदशन् ] *(अकरा २ पहा)* (२) [ श्लोक्यः = सोळा ] तूं मोठा सोळा आहेस, ठाऊक आहे.ह्या वाक्यांत सोळा म्हणजे श्लोक्यः, यशस्वी, लौकिकवान्.

सोळे [ शुक्ल = सुकल = सुअळ = सोळ (ळा–ळी–ळें), सोवळें] सोळें वस्त्र म्हणजे शुक्ल वस्त्र. (भा.इ. १८३४)

सौंदण [ समुंदन = सौंदण. उन्द् to wet ]

सौंदणी [ शुन्धनी (परटाचें धुण्याचे भांडें) = सौंधणी, सवंदणी. शुन्ध् to purify]

सौंधणी [ शुन्धनी ] *(सौंदणी पहा)*

सौरसें [ स्वारस्येन] (ज्ञा. अ. ९ पृ. ५८)

सौरा [ शकुलः ] *(सउरा पहा)*

Star [ स्तृ (तारा) = star ] (भा.इ. १८३३)

स्तव [ स्तु आरंभणें. स्तव = आरंभ. त्यास्तव = तयास्तव = त्याला आरंभून = त्याच्या करितां. मायेस्तव = मायेला आरंभून = मायेकरितां ] (ग्रंथमाला)

स्त्रीघाण्या [ स्त्रीघ्नः *(घाण्या पहा)*

स्मशान [ शी २ स्वप्ने. शवशयन = सवशान = स्मशान ] (धा.सा.श.)

स्वच्छउज्जळ [ स्वच्छं उज्ज्वलं = स्वज्छ उजळ ] (भा.इ. १८३४)

स्वार १ [ स्वारः (बंधनं) = स्वार ] चोराला स्वार करून आणिलें म्हणजे बंधन करून आणिलें. अमरे क्षीरस्वामी. (२) [अश्ववारः = असिवार = सिवार = स्वार ] आसिंवार शब्द जुन्या मराठींत आढळतो. (स.मं)

## [ह]

हकाटा [ हक्कारः ] *(धातुकोश-हकार १ पहा)*

हकारा [ हक्कारः ] *(धातुकोश-हकार १ पहा)*

हकारुनि [ आकार्य्य = हक्वारिअ = हकारुनिया ] (भा.इ. १८३२)

हगणे १ [ हद, (हग) पुरीषोत्सर्गे ] (ग्रंथमाला) (२) [ अघ् १,११ निंदायाम्, अघ् पाप करणे, चुकणे. अघनं = हगणें ] उ.- येथें आपण हगलांत म्ह. चुकलांत. (धा.सा.श.)

हगरड [ हदिरवाटिका = हगिरवाडी = हगरड ] हगरड म्हणजे गुवामुताचा उकिरडा.

हंजा [ हद्या (प्रिया) = हज्जा = हंजा ] नाटकांतील नायिका आपल्या सहचरीला प्राकृतांत हंजे म्हणजे प्रिये, my dear, म्हणत. संस्कृतांत हृद्ये, प्रिये, हे शब्द असत. टीकाकारांना हंजा हा शब्द हृआ शब्दापासून निघतो, हें माहीत नव्हतें. तें हा शब्द देश्य समजत!!! देश्य म्हणजे अनिर्वचनीय, अव्युत्पाद्य.

हजार [ सहस्त्र = हहस्र = हजर = हजार] हजार हा शब्द फारसीतून मराठींत आलेला नाहीं. उघड उघड सहस्त्र या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. स चा ह प्राकृतांत होतो. सें, शें, शेंभर, शंभर, लक्ष, लाख, कोटि, क्रोडि, क्रोडं वगैरे सर्व संख्यावाचक शब्द संस्कृतांतून आलेले आहेत. त्यांच्याप्रमाणें च हजर, हजार, हज्जार हा हि शब्द संस्कृतोत्पन्न आहे. (भा.इ. १८३३)

हजारी [ सहस्त्री = हहजरी = हजारी ]

हजारी कारंजे.

हट् [ अट् = हट् (संबोधने, निपात). अट् (अव्ययप्रकरणम्, संबोधने] (भा.इ. १८३३)

हटकन्, हटदिनि / *चटकर पहा]*

हटकारणें, झिटकारणें [ हट् निंदायां. हट = झिट ] (ग्रंथमाला)

हटणे १ [ अट्ट् १ अतिक्रमे. अट्ट् (अट्टते) = हटे (diminish, lessen). अट्ट (अट्टयते) = हटवतो (dim, lessen). अट्ट = आट. = अट्टय = हटव ] (धा.सा.श.) (२) [ हट् बलात्कारे = हटणें, हट्ट ] (ग्रंथमाला)

हट्ट [ हट् बलात्कारे ] *(हटणे २ पहा)*

हंडी [ हंडिका = हंडी ]

हड्डी [ अस्थि = हड्डी ] (स.मं.)

हणतो बिणतो [ हन्ति विहन्ति = हणतो बिणतो. विहन = बिअण = बिण. बिहनन = बिअणण = बिणणे ] बिणतो हा कांहीं तरी जोड शब्द नाही. हाणतोबिणतो म्हणजे हाणतो जोरानें हाणतो. (भा.इ. १८३४)

हणमा [ हनुमान् = हणुमा (महाराष्ट्री) = हणमा ]

हंतरी [ आस्तरण = अथ्थरण = आँथरुण = हांतरूण, हंतरूण, हंतरी (आस्तरी)] (भा.इ. १८३२)

हंतरूण [ आस्तरण] *(हंतरी पहा)*

हनवटी [ हनुपाटी = हनवाटी = हनवटी ] (स.मं.)

हमरीतुमरी वर येणे [ अहं रे त्वं रे = हमरी तुमरी, हामरी तुमरी ]

हपापा [ हा ३ त्यागे. हापय + आप = हपापा ] (धा.सा.श.)

हंबारणें [ करीषश्छगणो हंभा रेभणं च गवां ध्वनौ (त्रि. शे.) (ग्रंथमाला)

हंबारा [ रु २ शब्दे. हंबारवः = हंबारा ] गाईचा शब्द. (धा.सा.श.)

हंभारणें [ अभि शब्दे. अंभ + रवः = हंबारा ] गाईच्या शब्दाला अंभ शब्द लावीत. (धा.सा.श.)

हरकाम्या [ सर्वकर्मीणः पुरुषः = हरकाम्या. स = ह ] doing all work as need be.

हरभरा [ चणको हरिमंथकः ॥ १८ ॥ (अमर-द्वितीयकांड-वैश्य वर्ग ) हरिभरक = हरभरा. हरिभृत्, हरिभरक असा दुसरा एक शब्द हरभऱ्याला संस्कृतांत असावा] घोड्यानें फोडण्याचें धान्य, घोडा खातो तें धान्य. (भा.इ. १८३३)

हरास [ ह्रस् १ शब्दे. ह्रास = हरास ] (धा.सा.श.)

हलवा [ ह्वलः = हलवा. ह्वल् १ चलने, हलवणें ] (धा.सा.श.)

हला ! [ हा निपात प्राकृतांत स्त्रियाम् आहे. वैदिक निपात भल (आकार, आव्हान) भल = हल (पु.), हला (स्त्री.) ] (भा.इ. १८३२)

हल्या [ हालिक = हालिअ = हल्या ] गांवढळ मनुष्य, (ग्रंथमाला)

हव्यास [ शी २ स्वप्ने. भव्याशय = हव्यासअ = हव्यास ] भव्य म्हणजे शुभ व आशय म्हणजे वासना. हव्यास म्हणजे शुभ मिळविण्याची उत्कट आशा.

हसतो बिसतो [ हसति विहसति म्हणजे हसतो व थट्टा करतो ] (भा.इ. १८३४)

हसर (रा-री-रें) [ हस्र = हसर (रा-री-रे)]

हसें [हसें १ हसने. हसितं = हसें ]

हह करणें [ घघ् हसने. घंग = हह] (ग्रंथमाला)

हळद्या (रंग) [ हरिद्राभः = हळद्या ]

हळवें (भात) [ लघीयस् = हळवें ] तयार होण्याला थोडा काळ लागणारें भात. (भा.इ. १८३४)

हळहळ, हळाळ [ हल् १ विलेखने. हलहलिका = हळहळ, हळाळ ] (धा.सा.श.)

हळू [ लघु = हलु = हळू ] (भा.इ. १८३२)

हळुवार [ लघुतर = हलुअर = हळुवर = हळुवार ] (भा. इ. १८३२)

हाँ [ ह (वैदिक) = (अकच्क) = हक = हअ = हा = हाँ (अव्यय) ]

तो आला हाँ = स आयातः ह.

त्वं ह तत्र गच्छ = तूं हाँ तेथें जा.

त्वं तत्र ह गच्छ = तूं तेथें हाँ जा.

त्वं तत्र गच्छ ह = तूं तेथें जा हाँ. (भा.इ. १८३४)

हांक १ [ (वैदिक) आं + कै कायति to implore नाम आका = हांक ] imploration, prayer.

देव माझ्या हांकेस धावला.

देवाने माझी हांक ऐकिली. (२) [ आका ] *(हांक १ पहा)*

हाकाटा [ अहा! कटा! = हाकाटा ] ओरड, भयाची आरोळी ठोकणें. हाकाटणें. (धा.सा.श.)

हाड १ [ अस्थि = हड्डि = हाड ] (स.मं.) (२) [ हार्द love, affection = हाड] love, affection, kindliness. त्याच्या जिभेला हाड नाहीं his tongue has no kindness.

हाडोरा [ अस्थिहरः = हाडोरा ] गुरांची हाडे नेण्याचा हक्क.

हाड् हाड् [ हा धिक् हा धिक् = हद्धी हद्धी = हाडि हाडि = हाड हाड ]

हाणमार [ हानिः मारिः = हाणमार ]

हात १ [ हस्त = हात ] (स. मं.) (२) [ हात्रं (वेतन, मजुरी) = हात ] हात राखून खर्च करणें म्हणजे मजुरीच्या पैशांतून बचत करून खर्च करणें. हात ह्या अवयवाशीं कांहीं एक संबंध नाहीं.

हातघाई १ [ हस्तग्राहिका (हात पकडणे) = हातघाई ] तो हातघाईवर आला म्हणजे हात धरण्यापर्यंत आला. (२) [ हस्तघातिः = हातघाई. हन् to strike ] हातघाईला येऊं नको = हाताने मारामारीवर येऊं नको. (३) [ हस्तघातिः = हातघाई ] हातघाईची लढाई म्हणजे हाताने मारण्याची लढाई.

हातघाई [ हस्तग्राहं = हातघाय (हातघायी सप्तमी) ]

हातचे [ हस्त्यं = हातचें ] हस्तेन कार्यं हस्त्यं. एतन्मद्धस्त्यं = हें माझ्या हातचें.

हातधरणें [ हस्तधारणं = हात धरणें ]

हस्तधारणं वधोद्यतनिवारणस्य । अमरः ।

त्याचा हात कोण धरील = तस्य हस्तधारणं कः कुर्यात् ।

हातपाय [ हस्तपादं = हातपाय] हातापायाला तूप लाव, या वाक्यांत हातपाय हा समाहारद्वंद्व असून एकवचनी आहे. द्वंद्वैकत्वम् (लिंगानुशासन).

हाँतर ! [ अंतर् (अनुमत्यर्थक अव्यय) = हाँतर ! (अव्यय) ] (भा.इ. १८३६)

हातलग [ हस्तलग्न = हातलग ]

हस्तलग्नानि बदरीफलानि = हातलग बोरें.

हातवटा [ हस्तपट्टः = हातवटा, हातोटा, हस्तवृत्तिः = हातवटी, हातोटी ]

हातवटी [ हस्तपाटवं, हस्तपटुता ] (ज्ञा. अ. ९ पृ. २५)

हाताइत [ हस्तायत्त = हाताइत ] placed in the hands.

उ. - अनादि जे मुक्तता । आपुली जे

पांडुसुता । तो मोक्षु हातांइता । होये जेणें ॥ ज्ञा. १४-४८
हाताडणें, हाताळणें [ हस्त ११. हस्तादान = हत्थाडान = हाताडणें, हाताळणें ] (धा.सा.श.)
हातिरूं [ हस्तितर] *(रूं पहा)*
हातुल्यो [ हत्थुल्लो (हस्त, हात) ] कित्येक खेळांत अटींतून सुटावयाचें असलें, म्हणजे पोरी किंवा पोरें हा शब्द उच्चारतात. हा शब्द प्राकृत आहे. थुल्ल्यो, असें हि रूप आढळतें. (भा.इ. १८३२)
हातोटा, हातोटी *[ हातोडा पहा ]*
हातोडा [ हस्त ११. हस्तपट्ट = हातवडा = हातोडा. हस्तपट्ट = हातवटा = हातोटा. हस्तवृत्तिः = हातवटी = हातोटी ] (धा.सा.श.)
हात् तिच्या बहिन! [ (सं.) हा धिग् हा धिग् च भगिनी! (प्रा.) हध्धी हध्धी च बहिणि! = (म.) हात्तिच बहिन! = हात् तिच्या बहिन! ] वस्तुतः ह्या अपभ्रंशांत अपशब्दाचा क्लेशहि नाहीं. (ग्रंथमाला)
हादरणें [ ह्राद् १ अव्यक्ते शब्दे ] जमीन हादरली. (धा.सा.श.)
हांदोळ [ आंदोल् ]
हापटणें [ आपाटनं = हापटणें, आपटणें ] (भा.इ. १८३६)
हाम्‌री तुमरी वर ये [ अहं रे त्वं रे ] *(हमरीतुमरी पहा)*
हामीहामी [ अहमहमिका = हामीहामी ] तो हामीहामी करीत आला. मयूरव्यंसकादिगणांत हा शब्द आहे.
हाय १ [ हय् १ गतौ. हाय = हाय ] क्षीण होणें, थकणें एतदर्थक अव्यय. (धा.सा.श.) (२) [ आकायः (अग्नि) = हाय ] अग्नि. मुलांना विस्तव दाखवितांना हा शब्द योजतात. (३) [ हर्य् १ गतिकान्त्योः. हर्या = हाय ] हाय घेणें, खाणें, धमकीनें भयभीत होणें. (धा.सा.श.)
हायच (चा-ची-चें) [ इहत्य = हैच्च = हायच (चा-ची-चें) ] हा शब्द गांवढे सध्यां योजतात. हायचा म्हणजे इथचा. (भा.इ. १८३४)
हॉंयचा १ [ इहत्यः = हैंचा, हॉंयचा ] एथचा. (२) [ ह्यस्त्यः ] *(हैंचा पहा)*
हार १ [ हारिः = हार (स्त्री). हृ१ हरणे] द्युतांत पराजय. (२) [ (आहार) आहृति = हारि, हार (स्त्रीलिंगी) ] ओळ, रांग. (भा.इ. १८३६) (३) [ हारिः (प्रवाशांचा तांडा, ओळ) = हार (स्त्री.)]
हारा [ हारः (हमालाची पांटी) = हारा ]
हालहाल [ हलहला! हालहाल ] दुःखातिशय.
हावँ [ हवा ! (खरोखर) = हावँ ] ती हावँ सोदी आहे, येथें हावँ हें अव्यय खरोखर या अर्थी योजिलेलें आहे.
हावभरी [ आत्मंभरिता ] *(धातुकोश-हावर २ पहा)*
हावभाव [ हावभाव = हावभाव ] (स.मं.)
हावरा १ [ आत्मंभरः ] *(धातुकोश-हावर २ पहा)* (२) [ ह्वृ १ कौटिल्ये. ह्वर = हावरा. ह्वरि = हूरि = हूलि = हूल (खोटी बातमी) ] (धा.सा.श.)
हांवरा [ हावभरित ,भावभरित} = हांवभरा = हांवरा.
हावहाव [ हू ३ अदने. हावहाव (द्विरुक्तीनें) हावहाव] पोरे हावहाव करितात म्ह. खाण्याची इच्छा करितात. (धा.सा.श.)
हांसळी [ हंसक ( पायांतला अलंकार) हंसक + ली (स्वार्थक) = हांसळी ]

गळ्यांतली, पायांतली हांसळी.

हां हां (म्हणतां) [ अम् quickly द्वित्व = हां हां ] very quickly.

हां हां म्हणता गेला went away very quickly.

हि - ते हि जातात ह्या वाक्यांतील हि चार्थक आहे. ते च गच्छन्ति ह्या संस्कृत वाक्याचें वैदिक भाषेंत ते ईं गछन्ति असें होतें. इमित्यव्ययं चार्थे (मा. वा. सं. महीधर, वेददीप २५-३५). ईं + महाप्राण = हीं. महाप्राणन करण्याचा मराठीचा स्वभाव आहे. तात्पर्य हा हि, हीं वैदिक ईम्पासून निघालेलीं समजणें युक्त आहे. अपि पासून भि, बि, बी निघाला आहे. (भा.इ. १८३३)

हिंग [ इंगुः (रोग) = हिंग ] हिंग हगतो आहे म्हणजे रोग हगतो आहे.

हिंडगा [ हिंडकः = हिंडगा ]

हिणावतो [ हृणीययते = हिणावतो ] लज्जायुक्त करितो. (भा.इ. १८३२)

हितगुज [ गुह्य = गुज्झ = गुज्ज = गुज] (ग्रंथमाला)

हिरमुसणें १ [ मूर्च्छ् १ मोहसमुछ्राययोः ह्रीमूर्च्छनं = हिरमुसणें ] लज्जेनें व्याप्त होऊन जाणें. (धा.सा.श) (२) [ ह्री (2nd conj.) to be ashamed + मुष् = हिरमुसणें ] to be cast down through shame.

हिरमोड [ मुट् १० संचूर्णने. हृन्मोटनं, हृन्मोटः = हिरमोड. हृदयमोटः = हिरमोड] हिरमोड म्हणजे हृदय, हिय्या मोडणें. (धा.सा.श.)

हिरवें चार [ हरित् शारं = हिरवें चार, शार म्हणजे चित्रवर्ण ] हिरवें चार म्हणजे हरिद्वर्ण व चित्रवर्ण. शार म्हणजे green coloured. (भा.इ. १८३६)

हिरसांड [ स्यद् १ प्रस्रवणे. हृत्स्यंदः = हिरसांड ] (धा.सा.श.)

हिरीरी [ ईर् गतौ, कंपने. (द्विरुक्ति) ईरि + ईरिः = ईरीरीः हिरीरी ] हिंवानें अंगांत हिरीरी भरली म्हणजे अतिशय कंप सुटला. (धा.सा.श.)

हिर्‌वट् [ ईर्म + टः = हिर्वट, हिरवट् ] ईर्म म्हणजे क्षुब्ध. तो माणूस हिरवट आहे म्हणजे क्षुब्ध, क्रोधिष्ट आहे.

हिंव्या [ हिम्यः = हिंव्या ] हींव ज्याला येते तो. (भा.इ. १८३४)

हिश्श [ धिष् (शब्दे) = हिश्श]

हिसकणें [ हिष्कनं (हिंसा) = हिसकणें, हिसका इ. ] (भा.इ. १८३७)

ही [ अपि ] (ज्ञा. अ. ९ पृ. ७)

हुकी [ उत् + कै ] *(धातुकोश-हुकाव ४ पहा)*

हुचकणें [ उत्खननं ] *(उचकणें पहा)*

हुचकून [ उच्चक् पहाणें ] *(उचकून पहा)*

हुच्चा १ [ हुर्च्छकः = हुच्चा. हुर्च्छ् कौटिल्ये] कुटिल, लुच्चा. (२) [ हुर्छा (कौटिल्ये) हुर्छेः सनो लुक् छलोप श्च (उणादि २५७) हुर्छ = हुच्च (चा-ची-चें)] (भा.इ. १८३३)

हुडकी [ अच् १ गतौ. उदंचिका, उदंकिका = उडकी, हुडकी ] *(उडकी पहा)*

हुडा १ [ हुडः (a bulwork a tower ) = हुडा ] बुरूज. (२) [ उत् + हा to raise up उद्धः tower = हुडा ] बुरूज, tower.

हुंडा, हुंडी [ हुडि स्वीकारे. हुंडति. ] हुंडा = वराकडील लोकांनीं स्वीकारलेलें द्रव्य. (ग्रंथमाला)

हुडुत् ! १ [ हुडुत् a noise (sound) of threat ] (२) [ (सं.) हुडुत् म्हणजे बैल. अन् + हुडुत् = अन् + उड्डुत् =

अनुडुत् (किंचित् न्यून ऊन असा हुडुत्)] (भा.इ. १८३४)

हुडुत् तुझा बा झवँ - हुडत् तव पिता तावत् किंवा यावत् = बैल तुझा बाप तर ह्याहून या वाक्यांत जास्त गर्ह्य भाग नाहीं. हुडुत्, झवं वगैरे शब्दांचे अर्थ न कळल्यामुळें हीं असलीं वाक्यें कालिप्रचुर भासतात. महाराष्ट्रांत असलीं वाक्ये रागांत, थट्टेंत लहानथोरांच्या बोलण्यांत हमेशा येतात. त्यांचा खरा अर्थ न कळल्यामुळे महाराष्ट्रांतील सरसगट सर्व लोक अभद्र भाषण करणारे असतात, असा कित्येक परदेशीयांचा अभिप्राय पडला. तो अर्थात् अज्ञानजन्य होता, हें उघड आहे. (भा.इ. १८३४)

हुडुत [ हिरुत् वर्जने अव्ययं । (अकच्) हिरकुत् = हिडउत् = हिडुत् = हुडत् ] हुडुत् निघ येथून; हुडुत् तुझा हल्या मारी; वगैरे वाक्यांत हें वर्जनार्थक अव्यय मराठीत योजतात. (भा.इ. १८३६)

हुनका [ सुवर्णकः = हुनका (होन in सुवर्ण = होन)]

हुर, हुर [ उर् गतौ (सौत्रधातू) Imp. 2 nd sing. उर उर go on, go on हुर हुर] a cry when driving sheep.

हुश हुश् [ उत् + श्वस् = हुश् हुश्, हुस् हुस् ] to breath out heavily.

हुष्! हुश्! [ उष् दाहे. उष् उष् = हुष् हुष्] हुष् हुष करणें म्हणजे दाह झाल्याचा दर्शक शब्द करणें.

अति उकाडा किंवा दाह झाला असतां मराठींत हा उद्गार निघतो. (धा.सा.श.)

हुसहुस् [ उत् + श्वस् ] *(हुश् हुश् पहा)*

हुळा [ होलक = हुलअ = हुळा (हरभऱ्याचा)] (भा.इ. १८३४)

हूँ [ ऊम् = हूं (क्रोधनिंदामत्सरदर्शक अव्यय)]

हूड [ हूड् गतौ ] हूड मुलगा = भटकणारा मुलगा. (ग्रंथमाला)

हूद [ उद्र (पानमांजर) = ऊद = हूद ] पानमांजर. (भा.इ. १८३६)

हूल [ हूरिः = हूरि = हूलि = हूल. हृ कौटिल्ये ] false news, report. हूल म्हणजे कुटिल, खोटी बातमी.

हे [ एतद्, अदस्, इदम् ह्या तीन सर्वनामांपासून स्त्रीलिंगी रूप, प्रथमा एकवचन. ही हे रूप अर्वाचीन आहे ] (ज्ञा. अ. ९ पृ. ३)

हे १ [इति = इह = ई = ही = हे ] अहं गच्छामि इति उक्त्वा = मी जातों हें म्हणून; वय गच्छामः इति उक्त्वा = आम्ही जातों हे म्हणून; येथे इति व हे अव्ययें आहेत. (भा.इ. १८३४) (२) [ एतद्, इदम् व अदस् पासून तीन ह निघतात. पहिले दोन ह सन्निकृष्ट अर्थ दाखवितात व तिसरा व विप्रकृष्ट अर्थ दाखवितो. प्रकृतस्थलीं सन्निकृष्टार्थक ह आहे. तेव्हां तो एतद् किंवा इदम् पासून निघालेला समजावा. हा, ही, हे.] (ज्ञा.अ. ९पृ. १)

हेकट [ इतिकथ (दुष्ट) = हेकट ]

हेंका, हेंकांडणें [ इदं = हेंका ] हेंका म्हणजे हें असें कां असा हट्ट धरणें. (धा. सा. श.)

हेंका, हेंकांडणें [ इदं किमितका ] to ask reason there of.

हेंगाडा १ [ इंगितानभिज्ञः = एंगाडा = हेंगाडा ] (२) [ एककांडः ] *(धातुकोश- हेंगाड २ पहा)* (३) [ इतिकथ deviating from the rules of his caste, lawless = हेंगाडा ] हेंगाडी भाषा, कृति, जाति.

हेटकर [ हेतिकर = हेटिकर = हेटकर ] हेति म्हणजे कुऱ्हाड, परशु. (भा.इ. १८३४)

हेटकरी [ हेतिकराः = हेटकरी ] हेति म्हणजे फेकण्याचें हत्यार.

हेटाळणें [ हेडनं = हेटाळणें. यद्देवा देवहेडनं देवासश्चकृमा वयं । (शुक्लयजुर्वेदसंहिता-अध्याय २०-कंडिका १४) हेड् असा, मूळ धातु. त्याला आळ प्रत्यय लागून मराठी हेटाळ. ड् = ट् ] हेडनं म्हणजे अपराध. हेटाळणें म्हणजे अपराध करणें, उपमर्द करणें. (भा.इ. १८३७)

हेडा, हेड्या [ हिडकः = हिडा = हेडा, हेडया. हिंड् १ गतौ हिंडक = हिंडगा.] गुरांचे कळप घेऊन हिंडणारे.

हेंदारें [ हिंडीरः a man, a male ] सैरावैरा चालणारा गचाळ मनुष्य. (ज्ञा. अ. ९ पृ. १४३)

हेदू [ हेमदुग्ध = हेदू ] वृक्षनाम.

हेर [ निशाचरो गूढनरो हेरिकः प्राणिधि श्च सः ।। १६८ ।। धनंजयकोश. हेरः एव हेरिकः ।। ] (भा.इ. १८३३)

हेल, हेलकरी [ हेलः = हेल] हेल म्हणजे लग्नादि समारंभाच्या वेळीं पाणी वगैरे घालून मजा, करमणूक करणें. हेलकरी म्हणजे अशी करमणूक करणारीं माणसें. त्यावरून दुसरा अर्थ ओझेवाला.

है [ है (हैहेप्रयोगे हैहयोः ८-२-८५) = है] देवदत्त है अशी पाणिनिकाली हाक मारीत. कोर्टांतून शिपाई कृष्णाजी रघुनाथ है अशी अद्यापहि वकिलांना व साक्षीदारांना हाक मारतात, तेथें है हें अव्यय समजावें, आहे चा अपभ्रंश समजूं नये. परंतु हजर हाय येथें हाय आहे चा अपभ्रंश समजावा.

हैंचा १ [ हयस्त्यः = हैंचा, हाँयचा (कालचा)] (२) [ इहत्यः ] *(हाँयचा पहा)*

हैचें [ इहत्यं = हैचँ = हैच (चा-ची-चें)] हैचें म्हणजे एथचें. हा शब्द कोंकण्या लोकांत फार.

हो १ [ भोः] (ज्ञा.अ. ९ पृ. ५७) (२) [ ओमित्यंगीकारार्थः ।। तथास्तु।। ३१-२ Weler, माध्यंदिनीयवाजसनेयसंहिता महीधरकृत वेददीप.

ओं या निपाताचा अर्थ वैदिक भाषेंत होकारार्थी, अनुमत्यर्थी आहे. ओं = हों = हों किंवा हों ] हों उच्चार कोंकणात, हो उच्चार देशावर; हो! येतो म्हणजे बरें आहे, तथास्तु, तुझ्या म्हणण्याप्रमाणें येतो. (भा.इ. १८३३)

होईल जा, होऊं या, होऊं ये */ करूं ये पहा]*

होकार [ साधुकारः = हाहुकार = होकार] तेन साधुकारः दत्तः = त्यानें होकार दिला. (भा.इ. १८३३)

हो जा */ करूं ये पहा ]*

होच्चा [ आहोस्वित् = होच्चिअ = होच्चा! आहोस्वित् भोः = होच्च हो!]

होट [ ओष्ठ = ओट्ठ = ओठ = वोठ. अधरोष्ठ = अहरुट्ठ = हउट्ठ = होट ] होट व वोठ हे दोन भिन्न शब्द आहेत. खालचा ओठ तो होट. (भा.इ. १८३२)

होंड १ [ हुंडः (व्याघ्रः) = होंड (वाघासारखा क्रूर मुलगा ) ] पाणिनी Gwss ३-३-१०३. (२) [ हुंडः (मूर्ख) = होंड ]

होडगे [ होडः ] *(होडी पहा)*

होडी [ होडः (boat) होडिका = होडी, होडें, होडगें होड् to go ] होडी = small boat.

होतील जा [ करूं ये पहा]

हो! ना! [ अहो नु = हो ना!]

होपण [ अहोबत = होपत = होपण = (निपात) ] (भा.इ. १८३४)

होय! [ अथकिं = अहइं = होइ = होय ] आलास? होय! आलों = आगतोऽसि? अथ किं! आगतोस्मि।

होय बा, हो बा [ हो बत = होबअ = होबा, होय बा ] (भा.इ. १८३४)

होरणें [ रुह् १ प्रादुर्भावे. अवरोहणं = अरोहणें = होरोणें = होरणें ] जमीन होरली म्हणजे तिच्यांतील माती खालीं निघून गेली. अपहरणं = ओहरणे = होरणें. (धा.सा.श.)

होरी [ होडा (तरुण मुलगी) = होरी ]

होल (ला-ली-लें) [ निष्ठा भूत + ल = होल ( ला-ली-लें) (झाला) ]

होळी [ होलाका = होळी ] हुल म्हणजे लिंगानें घट्टन करण्याचा व्यापार. नीचीकृत्य जघनं उपरिष्टाद्‌घट्टयेत् इति हुलः (वात्स्यायन कामसूत्र पृ. १६२, निर्णयसागरप्रत).

हौद [ ह्रद = हौद (pond) ]

हौस [ अवस् (वैदिक तृप्ति) = हवस = हौस ] मनिची हौस म्हणजे मनाची तृप्ति. (भा.इ. १८३४)

ह्मात्रा [ महत्तरक = ह्मात्तरअ = ह्मातरा = ह्मात्रा. महत्तर = ग्रामजन ] (ग्रंथमाला)

ह्यावर [ इतः परं = इआवर = या-, ह्या -वर ]

ह्यावरीं (अव्यय) [ अथापरं = अहावरे = हावरी, ह्यावरीं, ह्यावर ] ह्यावर, त्यावर (तथापरं), हीं मराठीत अव्ययें संस्कृतांतून आलेलीं आहेत. ह्या आणि वर असे दोन शब्द निराळे नाहींत.

●

# व्यक्तिनाम-व्युत्पत्ति-कोश

अजंभट [ अय्यम = अज्जम = अजम्. अजम् + भट + अजंभट ] (भा.इ. १८३४)

अजेसेने [ अजितसेन = अजियसेण = अजेसेन] (भा.इ. १८३५)

अन्त्या [ अनन्त = अंत्या (एकशेष) ] विशेषनाम). (भा.इ. १८३६)

अंदोजी, अंधोजी [ अंधक (यदुवंशीय) = अंदोजी, अंधोजी ]

अनुबाई [ अनसूया = अन्, अनी (एकशेष)] (भा.इ. १८३६)

अन्या, अन्याबा [ अनन्त = अन्या (एकशेष) अन्याबा (बहुमानदर्शक) ] (भा.इ. १८३६)

अंबिके [ अंबिके ] *(दासींचीं नावें पहा)*

अबू [ अभिभू (काशीराजाचा पुत्र-भारत) = अबूजी]

अंबे [ अंब ] *(दासींचीं नावें पहा)*

अर्जोजी [ अर्जुनादित्य = अर्जोजी ] *(आदित्य पहा)*

अहिमणी [ अभिमन्यु = अहिमणी ( प्राकृत)]

आदित्य [ अर्जुनादित्य = अर्जोजी

कृष्णादित्य = कन्हू (कन्ह चें ममतादर्शक) + जी = कान्होजी

धनादित्य = धनाजी

नागादित्य = नागोजी, नागाजी

परशुरामादित्य = परस (एकशेष) + जी = परसाजी, परसोजी

बालादित्य = बालाजी, बाळाजी, बाळोजी

भगादित्य = बगाजी, बगोजी

भीमादित्य = भिउजी, भिमाजी, भिमोजी

मानादित्य = मानाजी, मानोजी

यशआदित्य = एसाजी

युद्धिष्ठिरादित्य = जोध (एकशेष) जी = जोधाजी

रघुनाथादित्य = रघोजी, रघुजी, रघाजी

राजादित्य = राजाजी, राउजी

रामादित्य = रामाजी, रामोजी

लक्ष्मणादित्य = लखाजी, लखजी, लुकजी, लखुजी म. धा. २८

वामनादित्य = वामनाजी, वामनजी, वामनोजी

विक्रमादित्य = विक्रमाजित = विकर्मजी. द = ज. त्य = त

विश्वनाथादित्य = विस (एकशेष) आजी = विसाजी, विसोजी

विष्णवादित्य = विष्णाजी, विष्ण्याजी

व्याघ्रादित्य = वाघोजी, वाघूजी

शंकरादित्य = शंकराजित = शंकराजी, शंकरोजी

शंभ्वादित्य = संभाजी, संभूजी

शिवादित्य = शिवाजी, शिउजी

सूर्यादित्य = सूर्याजी

तात्पर्य, हा जी, आजी, प्रत्यय आदित्य या संस्कृत शब्दापासून निघाला आहे. (भा.इ. १८३६)

इठी [ स्त्री = इट्ठी = इठी] कुणबी स्त्रियेचें विशेषनाम. (भा. इ. १८३२)

उदाजी [ उदयन (a name of a prince) = उदाजी ]

उधोपंत [ उद्धवपंडितः = उधोपंत ]

एडु [ ऐध् १ वृद्धौ. एधतु = एडऊ = एडु] (धनगरामधील एक नांव) एडु=संपन्न. (धा.सा.श.)

एसाजी [ यशआदित्य] *(आदित्य पहा)*

कबीर [ कपिल [ कविर = कबिर = कबीर] प्रसिद्ध कवी व साधू याचे नांव. (भा. इ. १८३३)

कमळें [ कमलिनी ] (दासींचीं नांवे पहा)

कळंभट [ कल्लण = कह्लण = कळम्. कळम् + भट = कळंभट ] (भा.इ. १८३४)

कानडा [ कृष्णडः ] *(कान्हुला पहा)*

कान्हा */ कान्हुला पहा ]*

कान्हुला [ अडज्चुचौ (५-३-८०). उप शब्द पूर्वी असला म्हणजे तद्धितार्थक अडज्चुचौ प्रत्यय होतात म्हणून पाणिनि सांगतो. मराठींत उप शब्दाखेरीज हि हे प्रत्यय होतात-

कृष्णडः = कानडा (विठ्ठलाला हा शब्द कवि लावतात)

कृष्णकः = कान्हा

कृष्णिकः = कान्ह्या

कृष्णियः = कान्ह्या

कृष्णिलः = कान्हुला

राम = रामडा, रामा, राम्या, रामुला

विष्णु = विनुटला, विष्ण्या]

इ. इ. इ.

कान्होजी [ कृष्णादित्य = कन्हू (कन्ह चें ममतादर्शक) + जी = कान्होजी ] *(आदित्य पहा)*

कान्ह्या */ कान्हुला पहा ]*

काळिंदे [ कालिंदि ] *(दासींचीं नांवें पहा)*

काळूबाई [ काला (विशेषनाम) = काळूबाई व्याश्रयकाव्य-४-५१]

कुशा [ कौशिकः = कोसिआ = कुशा (पुरुषनाम) ]

कुशी [ कोशिकी = कोसिइ = कोशी = कुशी (स्त्रीनाम) ]

केरू [ केयूरक = केरू (Proper name)]

कैके [ केतकि ] *(दासींचीं नांवें पहा)*

कोंडू [ हा शब्द कानडी कोंड म्हणजे घेणारा या शब्दापासून निघाला आहे. ताम्रपटांतून वातापिकोंडें, मदिरैकोंड, म्हणजे बदामीं शहर घेणारा, मदिरै घेणारा, असे समास येतात. कोंड = कोंडू (ममतादर्शक). (ग्रंथमाला)

कोंडूबाई [ कुण्डा (विशेषनाम) = कोंडूबाई व्याश्रयमहाकाव्य-४-५१]

खंडोबा [ हेमचंद्र हरस्कंदौ या संस्कृत द्विवचनाचें हरखंडा असें प्राकृत रूप देतो. खंडा हें अनेकवचन आहे; कां कीं प्राकृतांत प्रायः द्विवचन नाहीं. तात्पर्य स्कंद या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप खंड असें होतें. त्याचे ममतादर्शक मराठी रूप खंडू व प्राशस्त्यदर्शक मराठी रूप खंडोबा. म्हणजे महाराष्ट्रांत जेजुरी, पाली वगैरे ठिकाणचे जे खंडोबा आहेत ते मूळचे स्कंद होत. स्कंद म्हणजे कार्तिकस्वामी. कार्तिकस्वामीचें देऊळ पुण्याच्या पर्वतांस आहे, ते स्कंदाचे म्हणजे खंडाबाचे च होय. इतकें च कीं, पर्वतीवरच्या त्या देवाचें नांव संस्कृत आहे व जेजुरीच्या देवाचें नांव प्राकृत आहे. स्कंद ही देवता वीरांची व योद्धयांची फार पूर्वीपासून आहे. स्कंदाला सेनानी हें अपरनाम आहे. त्याची उपासना वीर करितात. महाराष्ट्रांतील सर्व जातींचे

मराठे (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, रामोशी वगैरे) खंडोबा हें आपलें कुलदैवत कां समजतात तें वरील उद्‌घाटनावरून समजणार आहे. खंडोबा हें शिवदैवत आहे, असें कित्येक लोक समजतात, तें अर्थात् निराधार आहे. स्कंदपुराणांत स्कंदोपासकांची म्हणजे खंडोबाच्या उपासकांची माहिती सांपडते. (भा.इ. १८३२)

गणबा [ गणपाल] *(धणबा पहा)*

गणंभट [ बहुतेक सर्व भिक्षुकांच्या नांवांत मकार विकल्पानें उच्चारतात. त्या बहुतेक ठिकाणी तो अनुस्वार अण्णा = अण्ण = आण् = ण् = अनुस्वार अशा परंपरेनें आलेला आहे.

उदाहरणें: — गणभट व गणंभट,
नानाभट व नानंभट,
तात्याभट व तातंभट, बजाभट व बजंभट,
कृष्णभट व कृष्णंभट
गणाण्याभट = गणण्भट = गणंभट
नानाण्णाभट = नानण्भट = नानंभट
कृष्णाण्णाभट = कृष्णण्भट = कृष्णंभट
इ. इ. इ. (भा.इ. १८३४)

गवि - *( युधि पहा)*

गागा ( भट्ट) [ गार्ग्यः = गाग्गा = गागा] हें घरचें आवडतें नांव आहे. (भा.इ. १८३३)

गांधारी [ गंधर्व या शब्दाचे प्राकृत गांधार अथवा गंधार. गंधार या शब्दाचें पैशाची प्राकृत खंदार. खंदार हा शब्द मराठी ऐतिहासिक पत्रांतून व बखरींतून येतो. गांधारी हा शब्द प्राकृत आहे. तो भारतांत येतो. त्या अर्थी प्राकृत भाषा प्रचलित झाल्यावर भारत झालें हें स्पष्ट आहे. (भा.इ. १८३२)

गुण्या [ गुण्यः = गुण्या (पुरुषनाम) ] (भा.इ. १८३४)

गोणाबाई [ गोणा (संस्कृत स्त्रीनाम) = गोणा (स्त्रीनाम) ] (भा.इ. १८३४) [ गोणा (विशेषनाम) = गोणा. व्याश्रयमहाकाव्य-४-५१ ]

गोमा १ [ गोतमः = गोयमा = गोमा (विशेषनाम) ] (भा.इ. १८३६) (२) [ गोमान् गोमी (अमर-द्वितीयकांड-वैश्यवर्ग-५८) गोमान् = गोमा] गोमाजी बिन तिमाजी, व गोमा गणेश ह्या शब्दांतील गोमा हा शब्द गोमान् ह्या संस्कृत शब्दापासून निघाला आहे. (भा.इ. १८३३)

गोरा कुंभार [ गोरभ ( Proper name) = गोरा ] गोरभ हें नांव पूर्णभद्राच्या पंचतंत्रात तंत्र १ कथा ३ यांत आलें आहे.

ग्यानी, ग्यानू [ ज्ञानदेव] *(नानू १ पहा)*

चुडामण [ चूडामणि = चुडामण ]

छगन [ शकुनि = छगुनि = छगन (विशेषनाम) ] (भा.इ. १८३६)

जजाबा [ ययाति = जजाबा, जिजाबा (व्यक्तिनाम) ]

जजु [ यज्यु (यजुर्वेदज्ञ) = जज्यु, जजु] (भा.इ. १८३६)

जनी १ [ जन्या (करवली) = जनी. जनिः (सून) = जनी] (२) [ जानकी =जाणइ = जाणी = जणी = जनी] (भा.इ. १८३२)

जनू [ जनार्दन (एकशेष) = जनू ]

जळंभट [ जह्लण = जळण = जळं. जळं + भट = जळंभट ] (भा.इ. १८३४)

जानू १ [ जन्युः (ब्रह्मदेव) = जानू. जन्यः (करवला) = जानू ] (२) [ जानुक = जाणुअ = जानू ] हा शब्द शांकुतल नाटकांत श्यालाच्या भाषणांत येतो.

(३) [ जन्हुः = जानू ]

जानोजी [ जन्हु = जानोजी ]

जिउ, जिउबा [ जीमूत = जीवूअ = जिऊ, जिउ, जिउबा ] जिउ, जिउबा, जिवाजी, जिवा हीं विशेषनामें जीमूत पासून निघालेलीं आहेत.

जिऊ [ जीमूत = जिऊअ = जिऊ (पुरुषनाम) ] (भा.इ. १८३३)

जिजा [ जया = जजा = जिजा (स्त्रीनाम). जिजाबाई = जया ]

जिजाबा [ ययाति ] *(जजाबा पहा)*

जिवा १ [ जीमूत] (जिउ पहा) (२) [ जीवक = जिवा, जिऊ ] जीवक म्हणजे दास, चाकर. जिवा, जिऊ ही शूद्रादिकांत व क्वचित् ब्राह्मणादिकांत नांवें असतात.

जिवाजी [ जीमूत ] *(जिउ पहा)*

जुजुत्सु [ युयुत्सु = जुजुत्सु ( हा जपानी शब्द बहुशः आर्य आहे)]

जोजार [ यज्वर (sacrificer) = जोजार] जोजार नागेश = यज्वरः नागेशः हें मराठी ग्रंथकारांचें नांव आहे.

जोधाजी [ युधिष्ठिरादित्य = जोध (एकशेष) + जी = जोधाजी ] *(आदित्य पहा)*

ठकी [ स्थगिका (रंडी, तांबूलकरंकवाहिनी) = ठकिआ = ठकी ] (भा.इ. १८३३)

टिंटाकराल - हा शब्द कथासरित्सागराच्या १२१ व्या तरंगाच्या ७२ व्या श्लोकांत आला आहे. तसाच कर्पूरमंजरींतहि टेंटाकराल आला आहे. सोमदेवानें बृहत्कथेचा तर्जुमा संस्कृतांत यथामूल केला. तेव्हां गुणाढ्यानें ठिंठाकराल हा शब्द योजिला, असें म्हणावें लागतें. ठिंठाकराल हें कथासरित्सागरांत कितवाचें नांव आहे. हा कितव जुगारी असे. गुणाढ्य विक्रमादित्याचा उल्लेख करितो. सप्तशतीचा कर्ता व गुणाढ्याचा आश्रय जो हालसातवाहन तो हि विक्रमादित्याचा उल्लेख करितो. गुणाढ्य उज्जयिनीच्या पालक राजाचा हि उल्लेख करितो. हा पालक विद्याधरचक्रवर्ति जो नरवाहनदत्त त्याचा समकालीन होता, असें गुणाढ्य म्हणतो. पालकाच्या वंशांत शुद्रक झाला असल्यास तो विक्रमादित्याच्या पूर्वी झाला असला पाहिजे. प्रायः शूद्रक विक्रमादित्याच्यापुर्वी व नरवाहदत्ताच्या नंतर झाला असावा. म्हणजे मृच्छकटिक शकपूर्व २०० च्या पूर्वीं व पांचशेच्यानंतर रचिलें गेलें असावें. हीं सर्व विधानें गुणाढ्य प्रमाण धरल्यास विश्वसनीय समजावयाचीं आहेत. (भा.इ. १८३२)

तानी, तान्ही [ तन्वी = तानी, तान्ही ] तानीबाई, तान्हीबाई हें मराठींत स्त्रीव्यक्तिनाम झालें आहे.

तुकाराम - तुकाराम हा शब्द तुकणें = तोलणें ह्या धातूंतील तुका व राम ह्या दोन पदांचा बनला असावा असा कित्येकांचा समज आहे; परंतु ह्या शब्दाची तुका आणि राम अशीं पदें पाडणें रास्त नाहीं. कारण, तुका ह्या पदाचा कांहीं अर्थ देतां येत नाहीं. मूळ शब्द तोषाराम (तोषा + आराम) त्याचें प्राकृत तोखाराम; त्याचा अपभ्रंश तोकाराम; त्याचें तुकाराम. आत्मन् + आराम = आत्माराम. शांत + आराम = शांताराम. कृपा + आराम = कृपाराम. दया + आराम = दयाराम. परंतु सीता + राम = सीताराम. कृष्ण + राम = कृष्णराम. नारो + (त्याचा बाप) राम = नारोराम. पण नंदाराम

= नंद + आराम. (सरस्वतीमंदिर, आश्विन शके १८२६)

दह्न - हें नांव गुर्जर राजांच्या वंशावळींत शक ४०० पासून सुमारे शक ७०० पर्यंत येतें. हा शब्द प्राकृत आहे. ह्याचें मूळ संस्कृत दध्र. हा दध्र शब्द बाणाने योजिला आहे:-

"मातृशयनीयतूलिकातलनिषण्णः च तनयोन्यं तनयं अभिषेक्तुकामस्य दध्रस्य करूषाधिपतेः अभवन् मृत्यवे।"

बाणः - हर्षचरितं - षष्ठः उच्छ्वासः. दध्र = दड्ड.

दह्न = दध्र हे व्यक्तिनाम त्या काली इतर वंशांत हि प्रचलित होते, असे हर्षचरितावरून दिसते. (भा.इ. १८३५)

दत्त्या [ (देव) दत्तक (दुर्दैवी दत्त) = दत्तअ =दत्ता, दत्त्या (एकशेष). रामक = राम्या इ.] (भा.इ. १८३४)

दामा [ ददातीति दामा = दामा ] दामा शेटी = दामा श्रेष्ठिन्.

दारकी - हें नांव शूद्रांत आढळतें. पण्यस्त्री दारिका दासी। द्वारका शब्द निराळा. (भा.इ. १८३३)

दासींचीं नांवें - हर्षचरिताच्या अष्टमोच्छ्वासांत बाणाने दासींचीं नांवें (पृष्ठें २४६, २४७) दिली आहेत. त्यांवरून मराठींत खालील नांवें आलीं आहेत.

१ कलहंसि = हंशे (एकशेष)
२ सुंदरि = सुंदरे
३ मंगलिके = मंगळे
४ शबरिके = सबरे, सवरे, शबरे
५ मातंगिके = मंगे
६ वात्सिके = वच्छे
७ नागरिके = नागरे
८ विराजिके = बिर्जे
९ भृंगारधारिणि = भुंगे
१० केतकि = कैके
११ मेनके = मेनके
१२ विजये = बिजे
१३ नर्मदे = नर्मदे, नबु
१४ सुभद्रे = सुभद्रे
१५ वसंतिके = बसन्त्ये
१६ मुक्तिके = मुक्तये
१७ मंजुलिके = मंजुळे
१८ कालिंदि = काळिंदे
१९ कमलिनि = कमळे
२० रोहिणि =रुई
२१ अंब = अंबे
२२ अंबिके = अंबिके
२३ सीमंतिनि = शेवंते

हीं सर्व नांवें शूद्रांत महाराष्ट्रांत सध्यां हरहमेष आढळतात. (भा.इ. १८३५)

देवण [ दैवज्ञ = देवण्ण = देवण ] देवणभट असें विशेषनाम कोकणांत अद्याप हि क्वचित् आढळतें.

देवानंपिय - १ देवानंपिय व पियदसि हें दोन प्राकृत शब्द अशोकाच्या शिलाशासनांत येतात. पैकीं, देवानंपिय ह्या पांच अक्षरांसंबंधानें विवेचन करतो. ही पांच अक्षरें जुळून लिहिलीं तर ह्या पांच अक्षरांचा एक सामासिक शब्द होतो. ह्या पांच अक्षरांतून पहिंली तीन अक्षरें जुळून निराळीं लिहिलीं, म्हणजे देवानं व पिय असे दोन व्यस्त शब्द होतात. आतां अशोकाच्या शिलाशासनांत पांच हि अक्षरें मिळून एक च सामासिक शब्द मूल लेखकानें मानिलेला होता किंवा देवानं व पिय असे दोन शब्द मानिले होते, तें शिलालेखांवरून स्पष्ट होत नाहीं. शिलालेखांत प्रायः एकापुढें एक सारखी अक्षरें लिहिली असल्यामुळें;

समास आहे कीं व्यास आहे हें प्रथमदर्शनी सांगणें अवघड जातें. तेव्हां, आपल्याला एकच तोड राहते. समास मानून अर्थ काय होतो व संदर्भाला कितपत जुळतो हें पहावयाचें; किंवा व्यास मानून अर्थ काय होतो व संदर्भाला कितपत जुळतो हें पहावयाचें. पैकीं समास मानून अर्थ काय होतो तें प्रथम पाहूं. देवानंपिय ह्या प्राकृत सामासिक शब्दाचें संस्कृतरूप देवानांप्रिय, देवानांप्रिय या संस्कृत सामासिक शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक, मूर्ख हा अर्थ व दुसरा देवप्रिय हा अर्थ. दिव् धातूचे दोन अर्थ होतात, (१) खेळणें व (२) प्रकाशणें. पैकीं, खेलनार्थक दिव् पासून निघालेल्या देव शब्दाचा अर्थ जुगारी असा होतो; व प्रकाशनार्थक दिव् पासून निघालेल्या देव शब्दाचा अर्थ निर्जर असा होतो. पहिल्या पक्षी देवानांप्रिय या सामासिक शब्दाचा अर्थ जुगाऱ्यांचा लाडका, अतएव निंद्य, मूर्ख असा निंदार्थक होतो; व दुसऱ्या पक्षीं अमरांचा लाडका, अतएव पूज्य असा स्तुत्यर्थक अर्थ होतो. दोन्ही अर्थ अशोकाच्या कालीं प्रचलित होते, हे उघड आहे. स्तुत्यर्थानें यद्यपि कोणी देवानांप्रिय हा सामासिक शब्द आपल्याला लावून घेतला, तत्रापि ऐकणाऱ्याच्या मनांत त्या समासाचा मूर्ख हा अर्थ निंदार्थ उठण्यासारखा आहे. तेव्हां हा व्द्यर्थक सामासिक शब्द अशोकानें आपल्याला लावून घेतला असेल, असें मानण्याकडे प्रवृत्ति होत नाहीं. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, देवानांप्रिय ह्या शब्दाचा लाक्षणिक अर्थ मूर्ख असा अशोकाच्या नंतर झाला, अशोकाच्या कालीं त्याचा देवप्रिय हा एकच वाच्यार्थ होता. पतंजलि, शंकराचार्य व बाण यांनीं देवानांप्रिय हा सामासिक शब्द स्तुत्यर्थक/योजिलेला आहे, तेव्हां अशोकाने हि तो स्तुत्यर्थकच योजलेला आहे, असे हि कित्येकांचें म्हणणें आहे. ह्या म्हणण्यानें देवानांप्रिय ह्या शब्दाच्या मी दाखविलेल्या व्द्यर्थत्वाला कोणत्या हि प्रकारचा बाध येतो असें दिसत नाहीं. अशोक, पतंजलि, बाण यांनीं प्रकाशनार्थक दिव् धातूपासून निघालेला स्तुत्यर्थक देवानांप्रिय समास योजिला असेल व प्रकरणानुरोधानें ऐकणाऱ्याच्या किंवा वाचणाऱ्यांच्या मनांत स्तुत्यर्थ संदर्भानें उद्भवूं हि शकेल. परंतु निंदार्थक अगदीं उद्भवूं शकणार नाहीं, असे नाही. पतंजलि, शंकराचार्य व बाण ह्यांनीं हा शब्द संदर्भानुरोधानें स्तुत्यर्थक योजिला असल्यामुळें, त्यांची गोष्ट सोडून देऊं. अशोकानें प्रौढीनें व सद्भावानें हें विशेषण आपल्याला लावून घेतलेलें आहे; तेव्हां वाचणाऱ्याच्या किंवा ऐकणाऱ्याच्या मनांत देवप्रियतेच्या बरोबर मूर्खत्वाचा हि अर्थ उठण्यासारखा आहे. विशेषतः वाचक किंवा श्रोता जर विरोधीपक्षांचा किंवा थट्टेखोर स्वभावाचा असेल, तर दोन्ही अर्थ त्याच्या मनांत उद्भवून, त्याच्या मुखावर हास्याची छटा तेव्हांच उमटेल. प्रत्यन्तरार्थ एक उदाहरण देऊं. समजा कीं, भगवान् बुद्धानें आपल्याला सिद्धार्थ हें नांव घेतलें व ते सद्भावानें घेतलें. निरनिराळ्या श्रोत्यांच्या मनावर ह्या शब्दाच्या श्रवणानें काय भावना उमटतील तें पहा. श्रोता जर बुद्धानुयायी असेल, तर सिद्धार्थ शब्दानें चारी अर्थ ज्याचे सिद्ध झाले आहेत अशा थोर पुरुषाची कल्पना

त्याच्या मनांत उभी राहील. परंतु श्रोता जर बुद्धविरोधी असेल, तर सिद्धार्थ म्हणजे फोडणी देण्याची मोहरी असा अर्थ करून, तो चार थट्टेखोर लोकांत बरा च हंशा पिकवील. असा हंशा उत्पन्न होऊं नये म्हणून च कीं काय, अमरसिंहानें बुद्धाच्या नाममालिकेत सिद्धार्थ हा शब्द न घालतां, त्याचा पर्याय शब्द जो सर्वार्थसिद्ध तो घातला आहे. सिद्धार्थो मत्स्यं चखाद, हें वाक्य ऐकून, (१) बुद्धानें मासा खाल्ला हा अर्थ जसा भाविकाच्या मनांत उद्भवेल, तसा च (२) मोहरीनें मासा खाल्ला, हा अर्थ विरोधी थट्टेखोराच्या मनांत उद्भवेल. ग्रंथांतून सिद्धार्थ शब्द येतो, परंतु व्यर्थत्वानें तो थट्टेस पात्र होईल, हें त्या ग्रंथकाराच्या ध्यानांत यद्यपि आलें नाहीं, तत्रापि तें अमरसिंहाच्या ध्यानांत आलें व त्यानें तो शब्द मुद्दाम गाळला, असें मला वाटतें. तो च प्रकार अशोकाचा कां न व्हावा? प्रायः झाला असावा; व त्यानें देवानांप्रिय हा शब्द सामासिकभावनेनें योजिलेला नसावा, व्यस्तभावनेनें योजिलेला असावा.

२ वरील पृथक्करणानें एवढे निश्चित झालें कीं देवानंपिय असा समास धरून अर्थ नीट बसत नाहीं, संशयाला जागा रहाते. तेव्हां व्यस्त पदें धरून काय अर्थ निष्पन्न होतो तें पाहूं. दे वा नं पि य ह्या एकापुढे एक येणाऱ्या पांच अक्षरांचे असे दोन भाग पाडले असतां, दोन अर्थ निष्पन्न होतात. देवानां प्रियः हा एक अर्थ व देवेभ्यः प्रियः हा दुसरा अर्थ. प्राकृतांत चतुर्थीचें काम षष्ठी करते. देवानांप्रिय म्हणजे देवांचा लाडका व देवेभ्यः प्रियः म्हणजे देवांना लाडका. दोन्ही विभक्ती घेतल्या तरी मतलब एक च. देवानां प्रियः म्हणजे liked of the gods व देवेभ्यः प्रियः म्हणजे dear to the gods. ह्या दोन्ही अर्थांतून व्हिन्सेन्ट स्मिथ्चा Sacred हा अर्थ वाटेल तितकी ओढाताण केली तत्रापि निघत नाहीं. आपल्या Early History of India, 2nd. Ed. P. 166-Note मध्ये स्मिथ् येणें प्रमाणें लिहितोः– "His Sacred and Gracious Majesty" is a fair equivalent of देवानंपिय पियदसि which words formed an official title and cannot be rendered faithfully by etymological analysis.

स्मिथने Sacred हा अर्थ कित्येक युरोपियन राजांच्या बिरुदावळीच्या उपमानांवरून काढिलेला आहे. इंग्लंडचे राजे आपणास धर्माचे व संस्थानाचे मुख्य समजतात व स्वतःस Sacred, High, Gracious वगैरे बिरुदे लावितात. तो च प्रकार अशोकाने केला असावा, असें स्मिथ्ला वाटलें इतकें च. परंतु स्मिथ्नें एक च गोष्ट ध्यानांत घ्यावयाची होती, ती ही कीं, इंग्लंडातल्याप्रमाणें भारतवर्षांत धर्माचें आदिस्थान राजाच्या ठायीं कधीं हि व कोणीं हि मानिलेलें नाहीं. धर्माचे आदिस्थान भारतवर्षांत फार पुरातन कालापासून वेदादिग्रंथांच्या व त्यांचा आशय सांगणाऱ्या धर्मगुरूंच्या ठायीं अधिष्ठापिलेलें आहे. इंग्लंडातल्याप्रमाणें भारतवर्षांत धर्म हा राजाचा अंकित नाहीं; राजा धर्माचा अंकित आहे. भारतवर्षांत वस्तुतः राज्य कोणाचें? तर धर्माचें. मोठमोठ्या राजांच्या व महान् महान् महंतांच्या अशा उक्ती

आहेत कीं, भारतवर्षांत धर्मराज्य आहे. या धर्मराज्याचीं, पुरोहित, राजा, अमात्य, दुर्ग, बल, कोश वगैरे अंगें आहेत. म्हणजे भारतवर्षांत राजा हा धर्मराज्याचें एक अंग आहे. इंग्लंडांतल्याप्रमाणें धर्माच्या वरती अधिकार करणारा नाहीं. तेव्हां, स्मिथ् म्हणतो त्या अर्थानें Sacred हें विशेषण अशोक आपणा स्वतःला खुळ्यासारखा लावील, हें बिलकुल संभवत नाहीं. आपण देवांचे किंवा देवांना लाडके आहोत, असें अशोक स्पष्ट म्हणतो. ह्या म्हणण्याचा आशय काय? इतर माणसे काय देवांचीं लाडकीं नाहींत कीं अशोकाने च तेवढी आपल्या लाडकेपणाची फुशारकी मिरवावी? तर तसें नाहीं. अशी फुशारकी अशोक मिरवीत नाहीं. अशोक एका वैदिक संप्रदायाला अनुसरून हे शब्द वापरीत आहे. भारतीय आर्यकुलांत फार पुरातन कालापासून असा एक संप्रदाय आहे कीं, आपलें पाळण्यांतील खरें नांव कोण्या हि आर्यानें प्रकट करूं नये; एखाद्या टोपण नांवानें आपली प्रथा करावी किंवा निदान मूळ नांवांत थोडा तरी फेरबदल करून मग तें प्रकट करावें. ह्याविषयीं सूत्रांतून स्पष्ट उल्लेख आहेत व हिंदुस्थानांत हा संप्रदाय अद्याप हि विद्यमान आहे. ऐतरेयोपनिषदाच्या तृतीय खंडाच्या शेवटीं ह्या पुरातन संप्रदायांचें एक नामांकित उदाहरण दिलें आहे. त्याला ब्रह्म दिसले. तेव्हां इदं अदर्शम् असें उद्गार त्याने काढिले. ह्या उद्गारांवरून त्याचें नांव इदंद्र असें पडलें. त्या इदंद्राला परोक्षत्वाने सर्व देव इंद्र असें म्हणून लागले. कां कीं, देव परोक्षप्रिय आहेत. प्रत्यक्ष जें इदंद्र हें अक्षरत्रयात्मक नांव तें परोक्षप्रिय देवांना आवडलें नाहीं, एतदर्थ त्यांनीं इंद्र हें अक्षरद्वयात्मक परोक्ष नांव पसंत केलें. " तं इदद्रं सन्तं इंद्र इति आचक्षते परोक्षेण, परोक्षप्रिया इव हि देवाः।" ह्यांत, देव हे परोक्षप्रिय आहेत, ही गोष्ट प्रामुख्यानें लक्ष्यांत ठेवावयाची आहे. पशू जें आहेत ते प्रत्यक्षप्रिय असतात. म्हणजे इंद्रियांना जें सहज गोचर होईल तें पशूंना किंवा पशुतुल्य द्विपादांना पसंत किंवा प्रिय होतें. परंतु जे देव आहेत, जे ज्ञानी आहेत, त्यांना परोक्ष जें अनुमानादिप्रमाणजन्य ज्ञान ते प्रिय असतें. असें जे परोक्षप्रिय देव त्यांनीं इदंद्र हें जें प्रत्यक्ष नांव त्यांत फेरबदल करून इंद्र असें परोक्ष नामाभिधान पसंत केलें. आतां अशोकाच्या शिलाशासनांतील देवानंपिय पियदसि राजा या शब्दांत हा पुरातन संप्रदाय कसा प्रतीत होतो तें पहा. अशोकाचें मूळ पाळण्यांतील नांव अशोक. हें प्रत्यक्ष नांव स्वतः उच्चारणें किंवा योजणें पुरातन संप्रदायाच्या विरुद्ध. सबब, पियदसि ह्या परोक्ष नांवाचा अशोकानें उपयोग केला आहे. उपयोग करतांना असा परोक्ष नांवाचा उपयोग कां केला तें हि अशोक देवानंपिय ह्या शब्दांनीं व्यंजीत आहे. देवानां म्हणजे परोक्षप्रियाणां प्रियः अहं, असें अशोक व्यंजीत आहे. परोक्षप्रिय जे देव त्यांचा प्रिय जो परोक्ष नांवानें प्रथित पियदसि राजा तो असा हुकूम करतो इ.इ.इ. शिलाशासनांत अशोक असें नांव अशोकानें कोठें हि कोरवलेलें नाहीं; पियदसि हें परोक्ष नांव च तो स्वतः

सदा योजीत असे. कारण, तसा संप्रदाय भारतवर्षांत फार प्राचीन काळापासून होता. तात्पर्य, प्रियदर्शिन्, पियदसि, हें अशोकाचें परोक्ष नांव आहे. स्मिथ् म्हणतो त्याप्रमाणें पियदसि ह्या शब्दाचा अर्थ gracious असा नाहीं. मुळीं हे विशेषण नाहीं. हें विशेषनाम आहे. दीपवंशांत अशोकाला पियदसि ह्या च नांवानें उल्लेखिलेलें आहे. दीपवंशांत असा प्रयोग व प्रकार झालेला आहे, हें हि स्मिथ् विसरला आहे व अज्ञानानें gracious असें भाषान्तर करता झाला आहे.

३. स्मिथ् ज्याप्रमाणें पियदसि या शब्दाचा अर्थ गाफिलपणानें Gracious असा करतो, त्याप्रमाणें च इतर कित्येक लोक या शब्दाचा अर्थ Seeing bliss, आनंद पाहणारा असा तितक्या च गाफिलपणें करतात. खरा अर्थ असाः– परोक्षप्रियः देवाः। परोक्षं प्रियं येषां ते परोक्षप्रियाः। देवांना परोक्ष हे प्रिय आहे. ते परोक्ष अशोक पहातो. तेव्हां तो देवांना जें प्रिय तें पहातो. अर्थात् अशोक देवांना प्रिय असणार च. तेव्हां प्रियदर्शिन् याचा अर्थ Seeing inferentially असा आहे. अशोक हा साध्या प्रत्यक्ष तेवढ्या गोष्टी पाहून राज्य हांकणारा नव्हता, तर परोक्ष अनुमानाने विचक्षणा व अन्वीक्षण करून राज्यकारभार शिताफीनें चालविणारा धुरंधर मुत्सद्दी होता. ही गोष्ट प्रियदर्शिन् या शब्दानें व्यक्त होते. यद्यपि प्रियदर्शिन् या शब्दांत असा खोल अर्थ आहे, तत्रापि अशोकानें हा शब्द आपलें विशेषनाम केलें आहे व प्राचीन संप्रदायाचा बोज राखिला आहे. चाणक्यानें आन्वीक्षिकी विद्येचें मोठे गोडवे गायिले आहेत ते कौटिलीय अर्थशास्त्र या नांवाच्या नुकत्या च प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत पहावे.

४. आतां देवानंपिय पियदसि राजा या शब्दांचें भाषांतर करूं. देवांना लाडका जो पियदसि नांवाचा राजाः King पियदसि beloved of the Gods. स्मिथ्चे Sacred and Gracious Majesty हें भाषांतर ह्यापुढें त्याज्य व दुष्ट मानावें हें उचित आहे. (भा.इ. १८३५)

**धणबा** - धणबा, गणबा, मोरबा हे शब्द संस्कृतात धनपाल, गणपाल, मयूरपाल असे होते. त्यांचीं प्राकृत रूपें धणबाल, गणबाल, मोरबार अशीं झालीं. नंतर लचा लोप होऊन धणबा, गणबा, मोरबा अशीं वर्तमान मराठींत (सन १०००-१९०४) बनली. बा प्रत्यय पाल ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. जुन्या जैन नांवांत पाल शब्द बराच आढळतो. (स. मं. शके १८२६)

**धनबा** [ धनपाल] *(धणबा पहा)*

**धनाजी** [ धनादित्य] *(आदित्य पहा)*

**धनाबाई** [ धनाका (तरुण स्त्री) = धणाआ = धना ] धनाबाई हें नांव मराठ्यांत आहे.

**धाकी** [ धाकः] *(धाकू पहा)*

**धाकू** [ धाकोऽनड्वान् (उणादि ३२७) हें नांव शूद्रांत फार आहे. धाकः = धाका (की-के), धाक्या, ममतादर्शक धाकू] (भा.इ. १८३३)

**धाक्या** [ धाकः ] *(धाकू पहा)*

**धांदलभट** [ स्थांडिल्यभट्टः = धांदिलभट = धांदलभट ] स्थांडिल्यभट्टः म्हणजे स्थंडिलावर निजणारा तपस्वी. कांहीं नैसर्गिक कामाकरितां बाहेर गेला असतां व्रतार्थ स्थंडिलाकडे परत येण्याची जो

घाई करतो तो.

धोंडभट [ ढुंढि ] *(धोंडी पहा)*

धोंडी [ ढुंढि (गणपति) = धोंडी, धोंडभट, धोंडोपंत ] (भा.इ. १८३३)

धोंडोपंत [ ढुंढि ] *(धोंडी पहा)*

नबु [ नर्मदे] *(दासींचीं नांवें पहा)*

नरश्या [ नृशंसः = नरश्या ] क्रूर, पापी.

नर्मदे [ नर्मदे] *(दासींची नांवें पहा)*

नागरे [ नागरिके ] *(दासींची नांवें पहा)*

नागाजी [ नागादित्य ] *(आदित्य पहा)*

नागूवाई [ नागा (विशेषनाम) = नागूबाई]

नागेश [ नाग + ईश = नागेश अथवा नाक + ईश = नाकेश = नागेश]

नागोजी [ नागादित्य] *(आदित्य पहा)*

नानवा [ ज्ञानदेवः = नानबा, नाना, नानी F.]

नाना १ [ ज्ञानदेवः] *(नानबा पहा)* (२) [ ज्ञानदेव] *(नानू पहा)*

नानाजी [ ज्ञानी = नाना (knowing) ]

नानी १ [ ज्ञानदेवः ] *(नानबा पहा)* (२) [ नना (आई) = ननी = नानी (स्त्रीनाम) ] (भा.इ. १८३४) (३) [ ज्ञानदेव] *(नानू पहा)*

नानू १ [ ज्ञानदेव = ग्यान किंवा नान (एकशेष). ममतादर्शक (ग्यानू, नानू) स्त्रीलिंग (ग्यानी, नानी) ] (भा.इ. १८३६) (२) [ ज्ञानदेवः याचा एकशेष = ज्ञानः = नाना, नानू ]

नारा [ नारद = नारअ = नारा ] नारा शब्द नारायणाचा एकशेष आहे च. शिवाय नारद शब्दाचा हि अपभ्रंश आहे. नामदेवाच्या एका पुत्राचें नांव नारा होतें.

निवृत्तीनाथ [ निर्वृति beatitude = निवृतीनाथ]

परसाजी, परसोजी [ परशुरामादित्य = परस (एकशेष) + जी = परसाजी, परसोजी ] *(आदित्य पहा)*

पांडुरंग [ पांडुरांग = पांडुरंग ] पांडुरांग असा उच्चार ग्रामजन व देशस्थ कोठें कोठें करतात. (भा.इ. १८३३)

पापा [ पापः (संस्कृत पुरुषनाम) ] (हें नाम सध्यां बाटलेल्या मुसलमानांत आढळतें.) (भा.इ. १८३४)

पिरी [प्रीति = पिरइ = पिरी (स्त्री नाम)] (भा.इ. १८३३)

पिर्ती [ प्रीति = पिर्ति, पिर्ती (स्त्रीनाम) (भा.इ. १८३३)

पिऱ्या १ प्रीतक = पिरअअ = पिरा, पिऱ्या (पुरुषनाम)] (भा.इ. १८३३) (२) [ प्रियः = प्रियू = पिऱ्यू = पिऱ्यो = पिऱ्या (माहाराचे नांव ) ]

पुंजा [ पुंजराज = पुंजा (एक देश) ] हे विशेषनाम खानदेशांत बरेंच आढळतें. (भा.इ. १८३५)

पुलुमायी - हें विशेषनाम शातवाहनवंशांतील राजांच्या नांवांत येतें. पुरुमायी=पुलुमायी. पुरुमायी म्हणजे पुष्कळ माया, लक्ष्मी ज्या जवळ आहे तो, श्रीमान्, धनवान् लक्ष्मीवान्. पुरूरवस्, पुरुकुत्स, पुलोमन्, पुलुमन् ह्या विशेषनामांतील आद्यावयव पुरु आहे, असें दिसतें. (भा.इ. १८३३)

पेंदा [ वद् १ भाषणे. प्रियंवदः = पिअंबदो = पेंदो = पेंदा ] पेंदा हे कृष्णाच्या मित्राचें नांव. (धा.सा.श.)

पेंद्या [ उपेंद्रकः = (उलोप) पेंद्या, पेंदा ] कृष्णाचा एक खेळगडी.

बगाजी [ भगादित्य] *(आदित्य पहा)*

बगु [ भग ] *(भगु पहा)*

बगू [ भर्गः = बगू, बगाजी ]

बगोजी [ भगादित्य ] *(आदित्य पहा)*

बचंभट [ वत्स = वच्छ = बचं (भट),

बजं (भट) ]
बचाजी [ वत्स किंवा वर्चस्]
बची [ वत्सा (मुलगी) = बाची, बची ]
बचू [ वासुः ] *(बाची १ पहा)*
बजंभट [ वत्स ] (बचंभट पहा)
बजरंग [ वज्रांग = वजरांग = बजरंग. रातील आ चा अ झाला ] हा शब्द अंजनीपुत्राचा वाचक आहे. (भा.इ. १८३३)
बंड, बंडू [ भंड = बंड, बंडू (ममत्वदर्शक)] बंडोपंत हें नांव मराठींत सामान्य आहे. (भा.इ. १८३५)
बनशीधर १ [ वंशीधर = बनशीधर. वंशी = मुरली] (२) [ वंशीधर (कृष्ण) = बनशीधर, वंशी (कृष्ण) = बनशी. वंशी (स्त्री) वाद्यविशेषः वंशिन् (पुं.) वंशवाद्य ज्याच्या जवळ आहे तो. (भा.इ. १८३६)
बनी [ वनिता = बणिआ = बणी = बनी] मराठींत स्त्रीनाम आहे. (भा.इ. १८३४)
बल्लाळ [ मूळशब्द बालराज. त्याचें अपभ्रष्ट रूप बलराज. त्याचें बालल, त्याचें बालळ, त्याचें स्वरव्युत्क्रमानें बलाळ, त्याचें जोरदार बल्लाळ - बाल - बाळ - बाळजी - बाळाजी, बाळोजी. बल्लाळ व बाळाजी हीं दोन्हीं रूपें एकाच व्यक्तीचीं वाचक असतात ] (सरस्वतीमंदिर शके १८२६)
बसन्त्ये [ वसंतिके ] (दासींचीं नांवें पहा)
बा [ पाद = पाअ = वाअ = बा. ]
देवपादाः देवपाआ = देववाआ = देववा.
गोविंदपादा = गणबा =गणपादाः = गोंदबा.
हरिपादाः = हरबा.
नारायणपादाः = नारबा.
महादेवपादाः = म्हादबा.
बल्लालपादाः = बाळोबा. इ.इ. इ. ]
(भा.इ. १८३५)
बाची १ [ वासु : (a young girl) = बाची, बचू ] (२) [ वत्सा ] *(बची पहा)*
बाचू [ वासू = बाचू (पूत्रीनाम) ] वासू म्हणजे मुलगी.
बाजीराव - इ. स. १२४१ त बाचीराज कर्नाटकांत अधिकारी होता. च चा ज होऊन बाजीराव हें आधुनिक नांव निष्पन्न झालें. (भा.इ. १८३२)
बावण - [ पाष्मन् = पापण = वावण = बावण [ पाप्मन् = पापण = वावण = बावण (विशेषनाम) ] *(शब्द-आवण बावण पहा)*
बामनजी [ वामनादित्य ] *(आदित्य पहा)*
बामह [ मन्मथ ] *(मम्मट पहा)*
बालाजी [ बालादित्य ] *(आदित्य पहा)*
बास [ वयस्य = वअस्स = वास्स = बास = बाह = बा ] विठ्ठलबास, कान्हबास वगैरे नांवें मानभावग्रंथकारांत फार. ह्या नांवांतील बास हा शब्द संस्कृत वयस्य शब्दापासून निघाला आहे व त्याचा अर्थ Companion, associate असा आहे.
मराठींत गणबा, गोंदबा, वासबा वगैरे शब्दांतील बा हा अवयव हि ह्या संस्कृत वयस्य शब्दापासूनच निघालेला आहे. (भा.इ. १८३४)
बाळ [बाल ] (स.मं. शके १८२७)
बाळक्या-की-क [ बालक] *(बाळा पहा)*
बाळभट [ बाल + भट = बाळभट ] (भा.इ. १८३४)
बाळंभट [ बह्लण = बल्लण = बाळण = बाळम्. बाळम् + भट = बाळंभट ] बाळ म्हणजे मुलगा ह्या शब्दाशीं कांहींएक संबंध नाहीं. (भा.इ. १८३४)

बाळा-ळी-ळ [ बालक = बाळअ = बाळा-ळी-ळ, बाळक्या-की-क [ (स.मं. गोतवळा शके १८२७)
बाळाजी १ [ बालराज ] *(बल्लाळ पहा)* (२) [ बालादित्य ] *(आदित्य पहा)*
बाळोजी [ बालादित्य ] *(आदित्य पहा)*
बिकर्मजी [ विक्रमादित्य ] *(आदित्य पहा)*
बिजे [ विजये ] *(दासींचीं नांवें पहा)*
बिजेसिंग [ विजितसिंह = बिजेसिंग ] (भा.इ. १८३५)
बिजेसेन [ बिजितसेन] *(विजेसेन पहा)*
बिर्जा [ वीर्या = बिर्जा (स्त्री नाम). कारंडव्यूह नागकन्यानामानि ] (भा.इ. १८३४)
बिर्जे [ विराजिके ] *(दासींचीं नांवें पहा)*
बिळंभट [ बिह्लण = बिल्लण = बिळम्. बिळम् + भट = बिळंभट ] (भा.इ. १८३४)
भगु [ (भाई, विशेषनाम). भग = (पुं.) भगु, बगु ] (भा.इ. १८३४)
भटंभट [ बृहत्तम = भत्तम = भट्टम = भट्टम्. भटम् + भट = भटंभट ] (भा.इ. १८३४)
भलंदन - भलंदन हे एका ऋषीचें व गोत्राचें नांव आहे. भलंदन म्हणजे मराठीत अगडबंब पुरुष. (भा.इ. १८३४)
भागी १ [ भागीरथी = भागी (स्त्री) (एकेऽशष)] (भा.इ. १८३४) (२) [ भागधेयी (संस्कृत स्त्रीनाम) = भागी (धेय गळालें)] (भा.इ. १८३४)
भामह [ मन्मथ ] *(मम्मट पहा)*
भिउजी [ भीमादित्य ] *(आदित्य पहा)*
भिकंभट [ भीष्म = भीख्म = भिकम्. भिकम् + भट = भिकंभट ] (भा.इ. १८३४)
भिकम [ विक्रमः = विक्कम = भिकम (शेठ, भट)]
भिकमशेट [ विक्रमश्रेष्ठिन् = विक्कमसेट्ठि = बिकमसेट = भिकमशेट ]
भिकाजी [ भैक्ष्याजीव = भिक्खाजीअ = भिकाजी ] begger. हे भिकाजी आले here comes the beggary fellow.
भिकुभट [ भिक्षु = भिख्खु = भिकु ] (भा. इ. १८३४)
भिमाजी, भिमोजी [ भीमादित्य ] *(आदित्य पहा)*
भीम [ बिंब = भिंब (अर्धमागधी) = भीम] ठाण्याच्या बिंबदेवाला भीमदेव असेहीं म्हणतात. (भा.इ. १८३२)
भुंगे [ भृंगारणारिणि ] ( दासींचीं नावें पहा)
मकाजी [ मंकि = मक (मकाजी) मंख = मक (मकाजी) ]
मंगे [ मातंगिके ] *(दासींचीं नांवें पहा)*
मंगळे [ मंगलिके ] *(दासींचीं नांवें पहा)*
मंजुळे [ मंजुलिके ] *(दासींचीं नांवें पहा)*
मढरी (पुत्र) [ माठर (गोत्रनाम) माठरी (स्त्री) = माढरी = मढरी. वाशिष्ठीपुत्र, गौतमीपुत्र, मडरीपुत्र, हीं नावें शातवाहनांच्या वंशांत येतात. माठरक हें विदूषकादींचें नांव संस्कृत नाटकांत येतें. माठरोस्मि गोत्रेण (पतंजलि, महाभाष्य, Vol. I, P. 452 Kielhorn) (भा.इ. १८३३)
मध्व - मध्वाचार्य हा समास मधु + आचार्य किंवा मध्व + आचार्य असा दोन प्रकारांनीं सोडवितां येतो. म्हणजे द्वैतसंस्थापकाचे नांव मधु या शब्दाचा अर्थ गोड (विशेषण) व मध (नाम) असा आहे. (मध्व) मध्वक या शब्दाचा अर्थ भुंगा असा आहे. मधु हें संस्कृतांत देवदैत्य व मानव यांचें नांव आढळतें. मध्व हें नांव संस्कृतांत मनुष्याचें

मध्वाचार्य ह्या समासाखेरीज इतरत्र कोठें आलेलें मला माहीत नाहीं. तेव्हां, प्रश्न असा उद्भवतो कीं, ह्या द्वैताचार्याचें मूळ नांव मध्व कां मधु? दोन्हीं नांवें एका च व्यक्तीचीं असूं शकणार नाहीत. एक मधु तरी मूळ नांव असेल किंवा मध्व तरी असेल. मधु हे जर मूळ नांव असतें, तर त्यापासून तद्धित शब्द माधव असा होता. पण माधवमत असें कोणी म्हणत नाहीं. मध्वमत असा बोलण्याचा व लिहिण्याचा प्रचार आहे. सबब, द्वैताचार्याचे मूळ नांव मध्व होतें, हा पक्ष खरा मानावा लागतो. मध्वक म्हणजे षट्पद, भुंगा मध गोळा करणारा. परंतु मध्वक म्हणे कांहीं मध्व नव्हे. मधु + अक = मध्वक, असा जर विग्रह असेल, तर मध्वक हा मूळ शब्द होईल, मध्व होणार नाहीं. मध्व हा शब्द अपभ्रंश म्हणावा लागेल. मध्व असा स्वतंत्र शब्द संस्कृतांत मध्वाचार्यांच्या पूर्वी नाहीं. तेव्हां एक च तोड रहातें. मध्व हा मध्वक शब्दाचा अपभ्रंश आहे. तात्पर्य, मध्व हा एका प्रकारचा प्राकृत शब्द आहे, असें म्हणावें लागतें. मध्वाचार्य फार विख्यात पुरुष झाला, त्यामुळें मध्व हा प्राकृत शब्द स्वतंत्र संस्कृत विशेषनाम म्हणून योजिला जाऊं लागला इतकें च. (भा.इ. १८३५)

मनसाराम १ [ मनसा हे सापाच्या विषापासून संरक्षण करणाऱ्या देवीचें नांव.

दुर्गाराम, सीताराम, तमा मनसाराम.

मनसाराम हे मराठी विशेषनाम आहे. ] (भा. इ. १८३६) (२) [ मनसः संज्ञायां (६-३-४) ह्या सूत्राप्रमाणे मनसा + राम = मनसाराम हा तृतीया अलुक् समास आहे. कांहीं वर्षांपूर्वी भाऊ] मनसाराम हे नांव पुण्यांत बरेंच ऐकूं येत असे. (भा.इ. १८३६) (३) [ मनीषारामः (मनीषा + आरामः) = मनसाराम]

मनाई [ मनायी (मनोःस्त्री) = मनाई = मनी (स्त्रीनाम) मनावी (मनोःस्त्री) = मनउई = मनू] (भा. इ. १८३४)

मनी १ [ मनसा = मणहा = मणी = मनी, मनु. (कारंडव्यूह किन्नरकन्यानामानि ) ] (भा.इ. १८३४) (२) [ मनावी, मनायी (मनुचे स्त्रीलिंग) = मनी ]

मनु [ मनसा ] *(मनी १ पहा)*

ममती [ ममता (स्त्रीनाम) = ममती ] ममती हें नांव शूद्रांत फार. (भा.इ.१८३३)

मम्मट [ मन्मथ ह्या शब्दाचें अपभ्रंशांत वम्मह असें रूप होतें. व चा ब होऊन बम्मह आणि म्म च्या दैर्घ्यामुळें ब चा बा होऊन बामह. बामह ह्या प्राकृतिक शब्दाचें संस्कृत संस्करण भामह. मन्मथ ह्याच शब्दाचें न्म चें म्म व थ चें ट होऊन मम्मट.]

प्राकृतिक म्हणजे मराठी वगैरे भाषा सुरू झाल्यावर हे दोघे ग्रंथकार झालेले आहेत, हें पहिलें म्हणजे मम्मट व भामह हीं नांवें प्राकृतिक आहेत, हे तेव्हांच ओळखतां येतें. (भा.इ. १८३२)

मयु - १ "The earliest of these Indo-Parthian kings apparently was Maues or Mauas who obtained power in the Kabul valley and Panjab about 120 B.C., and adopted the title of Great king of Kings".

ह्याप्रमाणें Vicent Smith (Early His-

tory of Indian P. 202 First Edition). Maues हा कदाचित् Indo-Parthian वंशाचा राजा असावासा दिसतो, असे लिहितो. तात्पर्य Maues Indo-Parthian असावा कीं नसावा ह्या बद्दल इतिहासकारांस संशय आहे. Maues हा Indo-Parthian वंशाचा नाहीं, हें सिद्ध करण्यास मजजवळ कांहीं सामग्री जुळली आहे, ती इतिहासज्ञांच्या पुढें मांडण्याची परवानगी घेतो. (२) विष्णुपुराण - चतुर्थांश-अध्याय २४-अंक-१३:-

"ततश्चाष्टौ यवनाः चतुर्दश तुषाराः मुंडाश्च त्रयोदशा एकादश मौनाः ।"

असें वाक्य आहे. ह्यांत मौनाः म्हणून जो शब्द आहे तो व Maues हा शब्द एक च आहेत, असे मी म्हणतो.

(३) [ अमरकोश - प्रथम कांड - स्वर्गवर्ग - ७२

"स्यात् किंनरः किं पुरुषस्तुरंगवदनोमयुः"

या श्लोकांतील मयुः हा शब्द व नाण्यांवरील Maues शब्द एक आहेत. Maues या अक्षरांचा उच्चार मयुस् अथवा मयुः- मयुस् हा किंनरवाचक शब्द आहे, म्हणून अमरसिंह सांगतो. ते जर खरे असेल, तर Maues हा राजा किंनरवंशीय होता, व Indo-Parthian नव्हता, असें म्हणावें लागते. (४) [ विष्णुपुराणांत अकरा मौनांनीं राज्य केलें, असें सांगितलें आहे. Vincent Smith मयूंची याद येणेंप्रमाणें देतो:—

(1) Maues. (2) Onones (3) Azes I (4) Azilises. (5) Azes II (6) Gondophares or Guduphara. (7) Abdagases. (8) Orthagnes (9) Arsakes. (10) Pakores. (11) Sanabares.

Vincent Smith हि विष्णुपुराणांतल्याप्रमाणें च अकरा मयूंनीं राज्य केलें, असें हिंदू व युरोपीयन शोधकांच्या शोधांवरून म्हणतो. अर्थात् विष्णुपुराणांतील मौन म्हणजे युरोपीयन शोधकांचे व अमरसिंहाचे मयु होत ह्यांत संशय नाहीं. मयु पासून मौन हा अपभ्रंश असा निष्पन्न होतो. मयु तील यु चा उच्चार सानुनासिक होत असावा.

मयुँ = मऊँ = मउन = मौन

अनुनासिकाचा न असा उच्चार होतो. मयुन, मउन अशा परंपरेनें मौन असें अपभ्रष्ट रूप साधलेलें आहे व तें च विष्णुपुराणकर्त्यानें स्वीकारलेलें आहे. अमरसिंहाने मूळ मयु असे शुद्ध रूप दिलेलें आहे.

५. हे मयु ऊर्फ किंनर लोक अलकेस राहणाऱ्या किन्नराधिपतीचे म्हणजे कुबेराचे परिचारक होत. अलका हें नगर काश्मीरच्या उत्तरेस आहे. ह्या प्रदेशाच्या शेजारीं च पश्चिम दिशेस किंपुरुषवर्ष आहे. किंपुरुषवर्ष म्हणजे किन्नरांचा देश जंबुद्वीपाचा एक भाग आहे. मौर्यांचें राज्य बुडाल्यानंतर जो गोंधळ उडाला व जी बजबजपुरी माजली त्या कालांत कुबेराच्या ह्या मयु नामक परिचारकांनीं काबुल व पंजाब या दोन प्रदेशांत कांहीं काल आपली सत्ता उभारली.

६. तात्पर्य Maues ऊर्फ मयु वंशांतील राजे किन्नरजातीय होते, Indo-Parthian ऊर्फ पारदजातीय नव्हते, असें निश्चयानें म्हणतां येतें. (भा.इ. १८३५)

मऱ्या १ [ मर्यः a young man = मऱ्या

(शूद्रनाम)] (२) [ मर्य a young man = मऱ्या] a name of a man.

मानाजी, मानोजी [ मानदित्य] *(आदित्य पहा)*

मायण [ मात्रज्ञ] *(सायण पहा)*

मिरा (बाई) [ मिहिरा (मिहिर शब्दाचे स्त्रीलिंग) मिहिर हे पुरुषनाम आहे. मिहिरा = मिइरा = मिरा (बाई) ] (भा.इ. १८३३)

मिशरा [ मसूरिका = मिशूरिआ = मिशरा (नायकिणीचें नांव) ] मसूरिका म्हणजे पण्यस्त्रियांची मुख्य. मिशरा नायकीण पुण्यांत प्रसिद्ध होती. (भा.इ. १८३७)

मुक्ता, मुक्ती - हें स्त्रीनाम शूद्रांत आढळते. बंधकी कुलटा मुक्ता (३५ धनंजयकोश)] कुटुंबांतून सुटलेली जी स्त्री ती मुक्ता, मुक्ती. (भा.इ. १८३३)

मुक्त्ये [ मुक्तिके ] *(दासींचीं नांवें पहा)*

मुधोपंत [ मुग्धपंडितः = मुधोपंत]

मेनके [ मेनके] *(दासींचीं नांवें पहा)*

मैना १ [ मदनिका = मयनिआ = मैनी, मैना ] स्त्रियांचे नांव आहे. (२) [ मेनका = मेणआ = मेणा = मैना ] मैनाबाई म्हणजे मेनकाबाई.

मैनाबाई [ मेना अथवा मेनका = मेणआ = मेणा = मेना = मैना ] मैणाबाई, मेणाबाई असेहि उच्चार करतात.

मैनानामक पाखराशीं कांहीं संबंध नाहीं. (भा.इ. १८३६)

मैनी [ मदनिका ] *(मैना १ पहा)*

मोरबा [ मयूरपाल ] *(धणबा पहा)*

यमी [ यमुना = यमू, यमी (एकशेष) ] (भा.इ. १८३६)

यमू [ यमुना ] *(यमी पहा)*

युधि - षत्वप्रक्रियेत गवियुधिभ्यां स्थिरः (८-३-९५) हें सूत्र पाणिनि देतो. हलदन्तात् सप्तम्याः संज्ञायां (६-३-९) या सूत्राखाली कांहीं पाणिनीनें गवियुधिभ्यां स्थिरः हे सूत्र दिलें नाहीं. म्हणजे गवि व युधि ह्या गो व युध् या शब्दांच्या सप्तम्या कांहीं पाणिनि गवियुधिभ्यां स्थिरः या सूत्रांत समजत नाहीं. गवि व युधि ही पाणिनिमते प्रातिपदिके आहेत. गव्यूति व युधिंगम या समासांत गवि व युधि ह्या सप्तम्यां घेऊन गविष्ठिर व युधिष्ठिर हे समास अलुक्समासांत काढण्याचें कारण नाही. (भा.इ. १८३६)

येशी [ यशोदा = येशी, येसू (एकशेष) ] (भा.इ. १८३६)

येसू [ यशोदा ] *(येशी पहा)*

रघाजी, रघुजी, रघोजी [ रघुनाथादित्य] *(आदित्य पहा)*

रंभाजी [ रंभ (वानराचे नांव) जित् = रंभाजी ]

राउजी, राजाजी [ राजादित्य] *(आदित्य पहा)*

रामा [ अनुदात्तं प्रश्नान्ताभिपूजितयोः (पाणिनी ८-२-१००) अगमः पूर्वान् ग्रामान् राम ३ अ = रामा ( आ Vocative ) ] मराठींत संबोधन अकारांत शब्दाचें प्लुत होऊन होतें.

रामाजी [ रामादित्य ] *(आदित्य पहा)*

रामानुज [ रामानुजः मुख्यः एषां ते रामानुजकाः = रामानुज ]

तो रामानुज आहे म्हणजे रामानुजाचा अनुयायी आहे.

रामोजी [ रामादित्य] *(आदित्य पहा)*

रावत्या [ रेवत्याः अपत्यं पुमान् रैवतिकः. रैवतिक = रैवतिअ = रैवत्या = रावत्या (शूद्रनाम) ] (भा.इ. १८३४)

राही [ राधा = राहा. राधी = राही ]

राही हें नांव कुणब्यांत फार. (सरस्वतीमंदिर शके १८२६)

रुई [ रोहिणि ] *(दासींचीं नांवें पहा)*

रुप्या [ रूप्यः = रुप्या (मूलार्थ सुंदर) मारवाडी पुरुषांचे नांव) ] (भा.इ. १८३४)

रूपीबाई [ रुक्मिणी = रुप्पि = रूपी ]

लखजी [ लक्ष्मणादित्य ] *(आदित्य पहा)*

लखणशेट [ लक्ष्मण = लख्खण = लखण] लखणशेट व शिरळशेट या शब्दांचा अर्थ एकच. (भा.इ. १८३४)

लखभट [ लक्ष = लख्ख = लख. लख + भट = लखभट ] लक्ष्या, लखु, लख्या वगैरे अपभ्रंश आहेत. (भा.इ. १८३४)

लखंभट [ लक्ष्मण = लखण् = लखम्, लखम् + भट = लखंभट ] (भा.इ. १८३४)

लखमल [ रक्षामल्ल = रखमल, लखमल] (भा.इ. १८३६)

लखाजी, लखुजी [ लक्ष्मणादित्य ] *(आदित्य पहा)*

लल्लू [ ललित = ललिअ = लल्य = लल्ल = लल्लू ] लल्लूचा मूळ अर्थ सुंदर. त्यावरून विशेषनाम. (ग्रंथमाला)

लाडी १ [ लडहा (सुंदर) = लाडी (स्त्रीनाम)] (भा.इ. १८३४) (२) [ लटह ] *(लाडू पहा)*

लाडू [ लटह beautiful = लाडू, लाडीबाई]

लुकजी [ लक्ष्मणादित्य ] *(आदित्य पहा)*

लोलिंबराज [ रोलंब (भ्रमर) = लोलंब = लोलिंब विशेषनाम) अ=इ]

लोलू [ लोहलः (अस्फुटवादी) = लोलू ] लोलू अण्णा हें मराठींत विशेषनाम झालें आहे. अस्फुट बोलणाऱ्या मुलाला प्रथम लोलू म्हणत.

वच्छे [ वत्सिके ] *(दासींचीं नांवें पहा)*

वाघूजी, वाघोजी [ व्याघ्रादित्य ] *(आदित्य पहा)*

वामनाजी, वामनोजी [ वामनादित्य ] *(आदित्य पहा)*

वारी [ वर्या (स्वयंवरा बाला) = वऱ्या = वारी ] वारी हें मराठींत स्त्रीविशेषनाम आहे. (भा.इ. १८३२)

वाली, वालू, वाल्ही [ वाल्मीका = वाल्ही, वाली ] वाली, वाल्ही, वालू हीं मराठीत स्त्रीनामे आहेत.

वाल्ह्या [ वाल्मीकिकः = वाल्हीइआ = वाल्हीआ = वाल्ह्या ] वाल्ह्या कोळी विशेषनाम.

विजेसेन [ विजितसेन = विजियसेन = विजसेन, विजेसेन ] (भा.इ. १८३५)

विष्णाजी, विष्ण्याजी [ विष्णवादित्य ] *(आदित्य पहा)*

विसाजी, विसोजी [ विश्वनाथादित्य ] *(आदित्य पहा)*

वीठु - सीयडोणी शिलालेखाच्या ४ थ्या व २७ व्या ओळींत वीठु हा शब्द आलेला आहे. म्हणजे हा शब्द शक ८७६ त प्रचलित होता. विष्णूचीं म्हणजे वीठूचीं देवळेंहीं होतीं. अर्थात् पुंडलिकानें पंढरीस वीठूचें प्रतिष्ठापन करण्याच्या अगोदर निदान नर्मदेच्या उत्तरेस वीठूचीं देवळें असत; व त्या देवळांत सर्व जातींचे लोक देणग्या देत. (सरस्वती मंदिर-संकीर्ण लेख)

शंकराजी, शंकरोजी [ शंकरादित्य] *(आदित्य पहा)*

शबरे [ शबरिके ] *(दासींचीं नांवें पहा)*

शाम्या [ शर्मन् =शाम्या ] (भा.इ. १८३४)

शिउजी [ शिवादित्य ] *(आदित्य पहा)*

शिदू, शिदोजी, शिदोबा [ सिद्ध = शिद, शिदू. सिदनाथवाडी, सिदोपंत, सिदनाथ,

शिदोबा, शिदोजी इ. इ. ] (भा.इ. १८३३)

शिरळशेट-शिराळशेट [ श्रीलश्रेष्ठिः = शिरळशेट = शिराळशेट ] शिराळशेट म्हणजे धनाढ्य शेट. श्रील हें विशेषनामहि आहे. सामान्यनामहि आहे. (भा.इ. १८३४)

शिवाजी [ शिवादित्य ] *(आदित्य पहा)*

शेवंते [ सीमंतिनी ] *(दासींचीं नांवें पहा)*

सई [ सती = सई. सईबाई = सती ] (भा.इ. १८३४)

सखुली (ममत्वदर्शक) - ला - ले [सखी शब्दाचें ममत्वदर्शक सखु. सखु + ल = सखुल (ला-ली-लें) ] (भा.इ. १८३४)

सगुण [ सुगण् = सगुण ] आत्माराम सगुण ह्यांतील सगुण शब्द सुगण् शब्दाचा अपभ्रंश आहे. (भा. इ. १८३६)

संतीदास [ शांतिदास = संतिदास, संतीदास. शांति चें प्राकृतांत संति होतें] संतीदास हा एक मराठी ग्रंथकार झाला.

सबरे [ शबरिके ] *(दासींचीं नांवें पहा)*

संभाजी [शंभ्वादित्य ] *(आदित्य पहा)*

संभू [ स्वयंभू = सअअंभू = संभू. शंभु = संभू]

संभूजी [ शंभ्वादित्य ] *(आदित्य पहा)*

सयाजी [ सह्यः = सय्या किंवा सखि = सया ] बहुमानार्थी सय्याजी किंवा सयाजी. तात्पर्य सयाजी हा शब्द संस्कृत सह्य किंवा सखि ह्या दोन शब्दांपासून मराठींत आला आहे. (भा.इ. १८३४)

सवरे [ शबरिके ] *(दासींचीं नांवें पहा)*

सायण - मात्रज्ञ ह्या संस्कृत शब्दाचें माअन्न असें प्राकृत रूप होते. त्याचें प्राकृतिक रूप मायण्ण. त्याचे मायण. तसेच सर्वज्ञ ह्याचे सायण.

सायण व मायण हे दोन्ही शब्द प्राकृतिक आहेत. द्राविडी प्राकृतापासून द्राविडी प्राकृतिक. सायणाचार्य प्राकृतिक भाषा सुरू झाल्यावर झाले. (भा.इ. १८३२)

साळू [ चारु = साळु, साळू, साळू म्हणजे सुंदर, साळू विशेषनाम ] (भा.इ. १८३६)

सिदनाथ, सिदोपंत [ सिद्ध] *(शिदू पहा)*

सुंदरे [ सुंदरि ] *(दासींचीं नांवें पहा)*

सुनरी [ सूनरी ] *(सूनरी पहा)*

सुपडू, सुपडोजी १ [ सुप्रतीक (मदन) = सुपडू, सुपडोजी (व्यक्तिनाम)] सुपडोजी २ [ सुभद्र, सुपर्ण] (३) [ सुप्रतिवर्मन् = सुपडोजी, सुपडू (शूद्रनाम) ]

सुबराव [ सुभ्रूक = सुब्रूअ = सुब्राव = सुबराव ] ज्याच्या भिंवया सुंदर आहेत तो सुब्राव. मराठींत व्यक्तिनाम झालें आहे.

सुभद्रे [ सुभद्रे ] *(दासींचीं नांवें पहा)*

सूनरी [ सूनरी (वैदिक) = सुनरी, सूनरी (स्त्रीनाम) ] सुंदरी निराळी. (भा.इ. १८३३)

सूर्याजी [ सूर्यादित्य] *(आदित्य पहा)*

सोनी [ सुस्नाता = सुण्हाआ = सोण्ही = सोन्ही = सोनी किंवा सुवर्णा = सुअण्णा = सोण्णा = सोणी - सोनी (बालिकानाम)]

सोनू [ सुतनु = सोनू (स्त्रीनाम) ]

सोनूबाई [ सुतनु = सुअणु = सोनू ]

सोम्या [ सौम्यक = सोम्या] आयुष्मान् भव सौम्य। असा आशीर्वाद संस्कृतांत प्राचीन कालीं देत. कोणाला हीं सौम्य म्हणत. ह्या सौम्य शब्दापासून मराठी सोम्या शब्द निघाला आहे. (भा.इ. १८३४)

सोसपार्वती [ सो, सोस् name of पार्वती

= सोसपार्वती ]

हजारीमल्ल [ सहस्रमल्लः = हजरमल्ल = हजारमल्ल = हजारीमल्ल ] मारवाड्यांत नांव आहे.

हमजू, हमजा [ अहंयु (लढवय्या) = हंजू = हमजू - हमजा ] हमजा हे नांव मुसलमानांत आहे पण ते संस्कृतोत्पन्न आहे. (भा.इ. १८३४)

हरणी [ हरेणु र्ना सतीने स्त्री रेणुकाकुलयोषितोः (मेदिनी) हरेणु = हरणी ] स्त्रीनाम. (भा.इ. १८३३)

हंशे [ कलहंसि = हंशे (एकशेष) ] *(दासींची नांवें पहा)*

हातमल [ हस्तिमल (गणपति) = हातमल] वाण्यांत नांव आहे.

हैबत [ अहीवत् हैबत (राव) ] पुरुषनाम मराठ्यांत. (भा.इ. १८३४)

होणम्या ] सुवर्णमयः = होणम्या ] हें विशेषनाम आहे. होणम्या! = रे सुवर्णमय!

हौशी [ हंसी = हौशी (स्त्रीनाम) ]